म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

CO-
वाद

लेखक

मल्हार रामचंद्र मुंडे

किंमत रु. २

सन १८९१

भाग १ ला.

निहालगड किल्ला अगदीं सपाट जमिनीवर असल्यामुळें सभोंवतीं जिकडे तिकडे मोठमोठीं अशोकांचीं व लिंबांचीं झाडें आणि हिरवेंचार गवत यांखेरीज दुसरी वनश्री काय दिसणार आहे ! निहालगड किल्ला बांधून किती काल लोटला असेल कोणाला ठाऊक ! आपण अजून किल्ल्याचे आंत गेलोंच नाहीं, तेव्हां आंत कांहीं तरी यावद्दल लेख बीख असेल असें तरी कसें अनुमान करावें ! बाहेरच्या बाजूला तर कोठें कांहीं लेख दिसत नाहीं; तथापि किल्ल्याच्या बाह्य स्थितीवरून तो फार जुनाट दिसतो, एवढें खरें.

किल्ल्यांत जाण्याला हा एक राजमार्ग व इकडे अनेक उपमार्ग दिसत आहेत. या मार्गाच्या दोन्ही बाजूंस हारीनें चिंचेचीं व पिंपरीचीं झाडें लागून गेलीं आहेत. या मोठ्या रस्त्यानें आंत चाललें म्हणजे अजूबाजूंचीं दृश्यें विस्तृत कुरणें दृष्टीस पडतात. कुरणांत चरणारीं हीं रस्त्याच्या बाजूस असणारीं जनावरें आहेत तीं जाणाऱ्या येणाऱ्यांकडे, चरणें सोडून देऊन, एकदां वर मान करून टक लावून पाहतात; जणूं काय ' आंत आपले काय काम आहे ? ' असें त्यांना विचारीतच आहेत! किल्ला अगदीं आडवळणाला असल्यानें मुद्दाम आमच्या सारखा परकीय, कांहीं विशेष काम असल्याखेरीज, तिकडे कशाला जातो आहे ? तेव्हां या मुक्या जनावरांचें या अनोळखी मनुष्याकडे टक लावून पाहणें अगदीं नैसर्गिकच होय.

हा राजमार्ग संपला म्हणजे ही एक भव्य कमान लागते. ही कमानी-वर कसलीशी एक मूर्ति दिसत आहे. ही अगदीं छिन्नभिन्न झाल्यामुळें कशाची आहे, हें जरी स्पष्ट सांगतां येत नाहीं, तरी ही बहुतकरून मंगळ-मूर्तीची असावी असें वाटतें. या कमानींतून आंत गेलें म्हणजे आपण थेट अगदीं किल्ल्यांत मोतीचौक वाड्याच्या पुढच्या बागेंतच जातों.

बागेंत जिकडे तिकडे मोगरा, बेलिया, मदनबाण, गुलाब, हिरवा चाफा, पण विशेषेंकरून हिरवा चाफाच फार, बहार मारीत आहे. निहालगडा-वरील हिरव्या चाफ्यासारखा चाफा आणखी कोठेंही नाहीं, असें इ-प्रांतांत सर्वतोमुखीं आहे. लोकांकडे खेरच फार नामी वास !! बागेंत गेल्या-

उजव्या हातास हें एक स्वच्छ पाण्याचें डबकें दिसतें. ह्यांत मासे फार आहेत. ह्याला मत्स्यपल्वल असें ह्मणतात. खरोखरच अन्वर्थक नांव!! ह्या डबक्याजवळच, परंतु जरा मागच्या बाजूस, पडका फक्त एक दगडी तटच राहिला आहे, ह्यावर तर निवडुंगानें मार गर्दी केली आहे. डाव्या हाताकडे हा एक रुंद असा उपमार्ग आहे, हा नीट चौकाचे बाजूनें किल्ल्याच्या मागच्या दरवाज्याकडे गेलेला आहे असें दिसतें. ह्या रस्त्याच्या एका बाजूस हा एक भला मोठा वटवृक्ष आहे. ह्याच्या पारंब्या इतक्या मोठ्या आहेत कीं त्यांत मूळ व बुडखा कोणचा हें आतां कोणास सांगतां येणार नाहीं. यांपैकीं कांहीं पारंब्या रस्त्यावर इतक्या वांकून आल्या आहेत कीं पुढें रस्ता आहे हें दिसत देखील नाहीं!

मोतीचौकाच्या दिल्लीदरवाज्याचें तोंड घर सांगितलेल्या कमानकिडेच आहे. चौक अगदीं जुन्या तऱ्हेचा आहे, असें बाह्याकारावरून दिसतें व तो बांधण्यांत फारशी काळजी घेतलेली दिसत नाहीं. कसातरी ओबड धोबड बांधला आहे. चौकाच्या ह्या खिडक्या, एक लहान तर एक मोठी अशा आहेत. कांहींना लांकडी पडदे, कांहींना नुसतीं तावदानें, व कांहींना तर कांहींच नाहीं. कांहींना तर नुसतीं दारें देखील नाहींत! यामुळें सर्व वारा आंत भरभर येतो. ह्यांपैकीं कांहीं खिडक्या अगदीं नव्या दिसतात, जणूं काय कालच लाविल्या आहेत. जिकडे तिकडे उंच उंच सज्जे दिसत आहेत. यांचा गिलावा जाऊन जागोजाग ढलपे पडले आहेत! वारा, पाऊस व ऊन खाऊन खाऊन ते अगदीं काळे होऊन गेले आहेत! चुन्यानें बांधले आहेत, ह्मणून ओळखूं सुद्धां येत नाहींत. त्यांच्यावर जिकडे तिकडे रानटी वेल व त्यांत विशेषेंकरून वासणीचे वेल पुष्कळ उगवले आहेत. पाहणारांस असें वाटतें कीं, यावर वेल उगवले आहेत ते वेल नव्हत, तर ते अगदीं मोडकळीस आलेले सज्जे पडूं नयेत ह्मणून कालास दया येऊन त्यानें या दोऱ्यांनीं त्यांस बांधूनच टाकिलें आहे!! आमच्या एकंदर जुन्या रीतीप्रमाणें चौकाचा दिल्लीदरवाजा गोमुखी आकृतीचा आहे. गोमुखी दरवाजा असल्यानें शत्रूपासून फार चांगल्या तऱ्हेनें बचाव करितां येतो. दरवाज्याचीं झडपें जुनाट उंबराच्या लांकडाचीं आहेत. कपाटांवर जंगी लोंखंडी पत्रे आहेत. ते भक्कम लोखंडी गोल डोक्याच्या खिळ्यांनीं जोडलेले आहेत. त्यांस खिळे कोण ह्मणेल! त्या

लांब्या मधल्या फळिवर दीड दीड हात लांब अणीदार मनगटांसारखे जाड लोखंडी खिळे आहेत.

हा मोतीचौकवाडा पाहिल्याबरोबर फारच आनंद होतो. येथें आलें म्हणजे फिरून येथून जाऊंच नये असें वाटतें. काय मोहक जागा तरी ही !! जिकडे तिकडे शांतता ! पाहणारास असें वाटतें कीं वृद्धापकालीं मुलांवर संसार सोंपवून, किंवा पायांत रुपेरी बेडी असल्यास ती तोडून मायबाप सरकार जी कांहीं अर्धी भाकरी देईल ती स्वस्थपणें येथें खात, एकांतांत शांततेचें सुख भोगीत, गुलाबांचा व चाफ्यांचा सुगंध घेत, आणि मत्स्य-पल्वलांतील मत्स्यांची क्रीडा पाहात, स्वस्थ कालक्रमणा करावी. देवी शांततेच्या राज्यांत गोंधळ कोठून असणार? जिकडे तिकडे तिचा पूर्ण अमल. जिकडे तिकडे राज्ञी शांतादेवीची मुद्रा दिसत आहे ! चौकांतील सर्व तऱ्हांच्या खोल्यांतून, झाडांवर, निवडुंग वाढलेल्या त्या वडया भिंतीवर, फार तर काय भिंतीच्या मागच्या बाजूस असलेल्या विहिरींत सुद्धां !

या विहिरीस पूर्वी सात मोटा होत्या असें वाटतें. कारण सध्यां तीन मोटघणें अगदीं पडलेलीं दिसतात; व बाकीचीं चार त्याच स्थितींत लौकर येणार असें वाटतें. एका मोटवणावर एक मोडकें चाक दिसत आहे. विहिरीचे दुसऱ्या बाजूस तें काय बरें दिसतें ? हं! मोडकें रहाटगाडगें. तुटकी मोडकी ती माळ दिसते पहा! पूर्वी वाड्यांत रहाणाऱ्या तरुण तरुण युवती हौसेनें याच्या योगानें आवडीनें लाविलेल्या झाडांस पाणी पाजीत असत. विहिरींचें पाणी कसें आहे व किती आहे, हें पहावें झटलें, तर झाडांच्या मुळ्यांनीं व वेलींनीं तिचें तोंड अगदीं बंद झालें आहे !

चला, वाचकहो, आपण आतां आंत चौकांत जाऊं व आंतील सर्व वाड्याची बांध बांधणूक व व्यवस्था पाहूं. एखादा परकीय मनुष्य, वाड्याच्या रखवालदारांपैकीं माहितगार बरोबर घेतल्याखेरीज आंत गेला तर चुकावयाचाच ! ! आंत जाऊन पहावें तों एक सोपा दुसऱ्या सोप्यासारखा नाहीं. एक दिवाणखाना शेजारच्या दिवाणखान्याशीं मिळत नाहीं. एक रंगमहाल एक तऱ्हेचा तर दुसरा अगदींच निराळा. एक माडी अ र दुसरी तशी. कांहीं कांहीं खोल्या तर फारच विलक्षण ! एक भली मोठी खोली तींत जावें व तेथील लांकडी छताचे व गिलाव्याचे आश्चर्य करीत उगी-

च सहज भिंतीवरून हात फिरवीत चालले झणजे मध्येंच कोठें थोडासा जरा जास्ती कमी धक्का लागला कीं लगेच फाड झणून भिंतीचे दोन भाग होतात व लागलींच एक दुसरी खोली समोर दिसते ! याप्रमाणें एका खोलींतून आठ आठ खोल्यांत गेलें तरी पहिली कोणची व परत कसें जावें याचा उमजच पडत नाहीं ! एका जिन्यानें वर जावें व चुकून माडीच्या दाराच्या उंबऱ्यावर पाय पडला कीं एकदम जिन्याचें दार बंद ! व तें इतकें बेमालूम कीं जिना कोठें होता हें कांहीं आंत जाणारास कळत नाहीं ! मग खालीं उतरण्याकरितां जिना शोधण्यासाठीं भिंतीवर हात आपटीत चालले झणजे भलतेच ठिकाणीं कोठें:तरी दार उघडून जिना लागतो व तेथून उतरावें तर कोणीकडे तरी भलतीकडेच !! पहिली वाट झणून सांपडणें कठिण ! असे अनेक तऱ्हचे जिने व माडया ! यावरून पाहणारास असें वाटतें कीं हा वाडा कांहीं मनुष्यानें बांधला नाहीं ! तर हें विश्वकर्म्याचेंच किंवा पांडवी कृत्य असावें ! एखाद्या माडींत किंवा सोप्यांत जावें व तेथील त्या नग्न मूर्ति व अतिशय खांब असलेलें काम पाहिलें झणजे वाटतें कीं ही माडी व हा सोपा जैनराजाचे वेळेस बांधलेला असावा ! हा सोपा सोडून पलीकडच्या वरल्या दिवाणखान्यांत गेलें झणजे तेथील भिंतीवरील अरबी हारफांसारखी सोन्याची नक्षी पाहिली झणजे वाटतें कीं हा दिवाणखाना मुसलमानी अमलांत बांधला असावा ! तेथून मागच्या माडींत गेलें व तेथील संधला न केलेल्या,—मग गिलाव्याचें नांव कशाला—भिंती पाहिल्या झणजे असें मनांत येतें कीं, हें काम हेमाडपंतांचेंच खास ! असेंच पाहत पाहत चुकून एकदम दक्षिणेकडच्या स्वयंपाक-घरांत गेलें झणजे तेथील ती पक्क्या विटांनीं बांधून काढलेली लांबची लांब चर, चुनेगच्ची भलेजंगी चारचारशें घागरीचे हौद, जळण सांठवून ठेवण्याकरितां-भिंतींत कोरलेल्या कमानी, पुरण वाटण्याचे मोठ मोठे दगडी पाट, हें सर्व-पाहिलें झणजे वाटतें कीं ही पाकशाला आमच्या रावबाजीच्या वेळेस-तयार झाली असावी !! याप्रमाणें कांहीं विलक्षणच हा वाडयाची रचना आहे. आणखी या वाडयांत किती रंगमहाल, किती माडया, किती जिने व काय काय आहे हें कोणास ठाऊक! प्रसंगाप्रमाणें जें जें दृष्टीस पडेत तें तें खरें. असा वाडा बांधण्यास खर्च काय लागला असेल व किती दिवस बांधून झाले असतील ? बाहेरून पाहतां आंत कांहीं कोठें लेखविख

असेल असें वाटतें, पण इतकें फिरलें तरी आंत कोठेंच लेख आढळत नाहीं ; वृद्ध रखवालदारास विचारिलें तर तो म्हणतो " अबब लई वरस ! माझा बाप सांगत व्हता कीं म्हाल या वाड्याला हजार बारासे वरस. लई जुनाट ! " परंतु इतकें खरें कीं या वाड्या इतका जुनाट वाडा सगळ्या करवीर-प्रांतांत नाहीं. अशा विलक्षण वाड्यांत एखादा गुप्त मार्ग असल्यास कांहीं नवल नाहीं.

या किल्ल्याचे सध्याचे मालक श्रीमंत जगदेवराव हिंमतबहादर यांस गेल्या राणी व्हिक्टोरियाच्या जन्मोत्सवाच्या वेळेस " सर " किताब राणी सरकाराकडून मिळालेला आहे. तेव्हां आपण तरी आतां त्यांस नुसते जगदेवराव कां म्हणा ? सर जगदेवराव असेंच म्हणूं.

आमच्या हिंमतबहादराची लहान मुलगी आपल्या क्रीडागृहांत एक दिवस खेळत असतां, खेळतां खेळतां खालीं जमिनीवर धाडदिशी पडली. त्याबरोबर जमिनीच्या तक्तपोशीच्या कांहीं फळ्या भगदीं ढिल्या पडल्या व डब डब वाजूं लागल्या. मुलीचे हुजरे जवळच होते; त्यांचें लक्ष्य तिकडे गेलें. बिछाईत काढून खालीं सैल झालेल्या फळ्या काढून पहातात तों एक लांकडी दादर दिसला ! या रस्त्यानें कांहीं हुजरे मंडळी आंत शिरली, ते गेले ते थेट खालीं एका खोलींत जाऊन पोंहचले. त्या खोलींत त्यांस एक काळीभोर पेटी दिसली. पेटी उघडावी कीं न उघडावी याची बरीच वाटाघाट झाल्यावर, पेटी उघडून पाहतात तों आंत एक कृष्णाजिन, कांहीं पोथ्या, कांहीं भस्माचे गोळे, कांहीं दर्भाचे बिंडे, कांहीं समिधा, कांहीं यज्ञोपवीतें. हें हो कशाला येथें !! रुपया आठ आणे किंमतीचा माल आणि तो इतका जपून ! यावरून असें वाटलें कीं, जेव्हां जैन लोकांनीं ब्राह्मणांवर भगदीं गर्दी केली, ब्राह्मण पाहिला कीं ओढ त्यास बस्तींत. संन्यासी पाहिला कीं राख त्यास शेंडी, दे हातांत मोराच्या पंखाचा कुंचला कीं टाक नेऊन बस्तींत. तेव्हां कोणी तरी संन्याशी शिष्यांसह त्या वेळच्या किल्ल्याच्या मालकाच्या भयाखालीं या खोलींत धर्मसंरक्षण करीत बसला असावा.

सर जगदेवराव हिंमतबाहादर यांचें वय ५६ वर्षांचे होतें व त्यानें नुकतेंच लग्न केलें होतें. त्यांचा बांधा उंच होता. हाडापेराचा फार बळकट. आवाज मोठा मर्दुमकीचा. त्याचे काळेभोर डोळे फार पाणीदार असत.

अंग पिळदार होतें. गृहस्थ साठीच्या घराला आलेला खरा, परंतु अंगावर एक सुरकुती नाहीं. त्यानें दाढी राखली होती, ती पांढरी सफेत होती. त्या योगानें पाहणारास याचा चेहरा पोक्त दिसे; परंतु याच्या डोळ्याकडे पाहिलें झणजे यास मनापासून हा पोक्तपणा नको असें वाटे. कारण या-
च्या डोळयांत रंगेलपणाचीच झांक विशेष मारीत असे. तरुणपणीं हा फार
चपल, घोडयावर बसण्यांत नंबर एकचा हुशार, अशी चोहोंकडे फार
ख्याति होती.

पहिलें कुटुंब वारल्यावर यानें चौदा वर्षे विधुरावस्थेंत घाल-
विलीं होतीं. यास या कुटुंबाची एक मुलगी होती. तिचें वय
आतां सोळा वर्षांचें होतें. अगदीं लहानपणापासून आजपर्यंत बापाच्या
घरांत पूर्ण मालकीण हीच. जरा कळूं लागल्यापासून किल्ल्यांचा झुंबडा
इच्याच हातांत. ती किल्ल्या घेऊन सर्व घरभर, व बागेंत हवें तिकडे फि-
रत असे. एखादे वेळेस मत्स्यपल्वलावर खेळत बसली असतां तेथेंच तिनें
किल्ल्या विसराव्या. एखादे वेळेस वेणींत गजरा घालण्याकरितां चाफ्याचीं
फुलें तोडण्यास जाई तों तेथेंच कोठेंतरीं झाडांच्या फांदीला किल्ल्या ! कि-
ल्ल्या सांडल्या कीं शोधून आणण्याला हुजुरे व दासी आहेतच तयार. अशा
इतक्या मोकळ्या मनानें व स्वच्छंदानें चाकरनौकरांवर पूर्ण अम्मल बजा-
वीत राहिलेली, तीस आतां सावत्र आई घरांत आल्यावर बरें वाटेल काय?
वाचकहो ! तुम्हीच विचार करा. तुम्हांपैकीं पुष्कळांस सावत्र माता अस-
तील. त्यांस याचा अनुभव असेलच. सावत्र आई घरांत आली कीं पहि-
ल्या मुलांना आपलें वाईट वाटावयाचेंच. काय चमत्कार पहा ! जो बाप
या वाईसाहेब येण्यापूर्वी मुलांवर जीव कीं प्राण करीत असतो, तोच मग
मुलांना परकीय मानूं लागतो. मायेचा ओघ एकदम उलटतो! केवळ प
हिल्या मुलांच्या कल्याणाकरितांच आपण तरुण असतांही आपल्या मनो-
वृत्तींचें आकलन करून व इंद्रियनिग्रह करून जो बाप या बाईसाहेबां
शीं संबंध ठेवीत नाहीं तो खरोखर धन्य. तोच खारा साधु. खरा पिता तोच

बरें असो; याप्रमाणें सावत्र आई घरांत आल्यावर आमच्या छोट्या
बाईस तें बरेंच जाणवूं लागलें. त्यांना आतां आपल्या मनास बराच
आळा घालावा लागला.

इतके दिवस सगळी संसाराची व्यवस्था इजकडेसच असे. दुसरें कोण

सर जगदेवराव यांचे मनांत चंपाबाईविषयीं फार कामेच्छा उत्पन्न झाली. त्यांनीं एकदां प्रतापरावास मुलांबाळांसह निहालगडास मेजवानीस बोलाविलें. चंपाबाईचा आनंदी व मोहक चेहरा एकदां आपल्या दिवाणखान्यांत चमकावा या हेतूनेंच त्यांनीं मेजवानी दिली नसेलना !! त्यांचा मनोदय कोणास ठाऊक ? परंतु असाच कांहीं तरी गुप्त हेतु असावा.

किती विलक्षण वेळ पहा ! या एका दिवसांत जगदेवरावांची स्थिति किती तरी पालटली ! चंपाबाईचे ते काळेभोर, आकर्ण, गरगर फिरणारे डोळे, तिचें तें नासाग्र दृष्टि करून चालणें, तिचा तो काळाभोर केशकलाप, तें कोकिलेसारख्या अवाजानें नम्रपणाचें बोलणें, असें एक का दोन !! असे अनेक वशीकरणाचें तिच्या जवळ साहित्य पाहून आमचे जगदेवराव अगदीं वेडे झाले ! त्यांस असें झालें कीं ही चंपाबाईच केवळ आपलें जीवित !! त्यांचें अंतःकरणांत पूर्वी कधींही असा प्रेमांकुर उद्भवला नव्हता. सगुणाबाईच्या आईबरोबर त्यांचें लग्न झालें होतें तें केवळ स्वार्थाचें. तिच्याबरोबर लग्न झाल्यानें त्यांस बरीच धनवाडी मिळाली. खरें प्रेम हा शब्दच त्या जायापतींस माहीत नव्हता. हा शब्द जगदेवरावांस आतांच माहीत झाला !! व म्हणूनच वाटतें, चंपाबाईशीं लग्न करून ह्या शब्दाची पूर्ण ओळख करून घ्यावी. असें त्यांचे मनांत आलें. असो. एकंदरींत त्यांच्या मनांत चंपाबाईबरोबर लग्न करण्याचें ठरलें. जगदेवराव यांच्या मनास आतां विश्रांति कशी ती ठाऊक नाहीं ! मन नेहमीं साशंक. काय करील विचारा !! बाईसाहेबांनीं त्यांच्यावर पूर्ण अम्मल बसविला. लग्न करण्याचें मनांत आल्यापासून जगदेवराव वरचेवर दुर्गमगडास जाऊं लागले; व चंपाबाईशीं विशेष दळणवळण ठेऊन तिच्याशीं बोलण्याची वरचेवर संधी साधूं लागले.

हा प्रेमांकुर उत्पन्न झाल्यापासून, आपल्या जाहागिरीला कोणी वारस नाहीं, व तो असावा म्हणूनच आपण पुन्हां लग्नाचा विचार मनांत आणिला असें एक घटकेला तरी हिंमतबहादराला वाटलें असेल काय ? मला वाटतें खरोखरच नाहीं. व जरी यदाकदाचित् मनांत आल्यास तो विचार लागलाच ते घालवून टाकीत, असें उघड दिसे. ते पहा, ते विचार करीत बसले आहेत; व मध्येंच त्यांनीं एकदम अंगावर कांटा आल्या-

सारखें करून मानेसें हिस्का मारला ! यावरून काय त्यांचे मनांत आलें तें नाहीं का कळत !

जगदेवरावांच्या मनांत नेहमीं येत असे कीं चंपाबाई ही सरलष्करांच्या येथें कसेंही झालें तरी नौकर म्हणून राहिलेली. तिला तेथें नेहमीं काम करावें लागतें. नेहमीं दुसऱ्याच्या ताब्यांत. ती अगदीं वयानें लहान आहे. तिचें अजून लग्न देखील झालें नसेल, तेव्हां त्या संबंधानें आपण जर कांहीं गोष्ट काढिली तर नकार मिळणार नाहीं, आणि एकदां लग्न झालें म्हणजे तिला मग भ्रम करणें नको, तोडदारा नको, कांहीं नको.

खरोखरच प्रेमपाशानें सर्व विचारशक्ति कुंठित झाल्यावरचे हे विचार !! कधीं कधीं तर जगदेवराव चंपाबाईशीं फार लडिवालपणानें बोलत, व नेहमीं स्तुति करीत. परंतु चंपाबाई हें आपल्या लक्षांत घेत नसे; किंवा लक्षांत येत नसे, कारण तिच्या त्या लोडक नेहमीच्या व गोड भाषणानें व आनंदी स्वभावानें लहानापासून थोरांपर्यंत ती सर्वांस हवीच वाटे. सर्व तिची तारिफच करीत. सर्वांचेंच लक्ष तिजकडे फार असे. मग जगदेवराव कांहीं विशेष प्रेम दाखवितात, असें तिच्या कसें बरें लक्षांत यावें ?

जगदेवराव हिंमतबहादर यांचे वयाला छप्पन वर्षें होऊन गेलीं होतीं. विधुरावस्थेंत एक तपाच्यावर दिवस घालविलेले, तेव्हां लग्नाचा विचार यांच्या मनांत आतां आला अगर्दी, व त्याचकरितां ते येथें वरचेवर येतात व चंपाबाईशीं विशेष प्रीतीनें वागतात, असें लोकांस तरी कसें वाटावें ?

प्रतापरावाच्या बायकोपाशीं त्यांचें यासंबंधानें कधीं तरी बोलणें झालें असावें असें वाटतें. एके दिवशीं सकवारबाई (सरलष्करांची बायको) एका गालीच्यावर बसून चोळीवर कशीदा काढीत होती व तेथें जवळच चंपाबाई, मुलींनीं " क्यानठहस " वर कांहीं काम केलेलें होतें तें नीट नेटकें करीत होती, तेव्हां ती चंपाबाईस म्हणाली, ' तर मग चंपाबाई, तुला आतां मोठी भाग्यशालिनी म्हटलें पाहिजे. तुझी आतां जाहागिरदारीण होणार म्हणायाच्या ! ! '

चंपाबाई, जी खालीं मान करून काम करण्यांत अगदीं गढून गेली होती, ती वर मान करून तोंडावर आलेले ते काळेभोर केस मागें सारि आपल्या यजमानीण बाईकडे आश्चर्यानें टक लावून पाहूं लागली. वि

तिनें आपले केंस सांवरलेले मुख वर केलें, तेव्हां पाहणारांस असें वाटलें कीं हा कृष्णवर्ण ढगांतून पूर्ण चंद्रच उदयास आला ! या वेळेस जर हिंमतबहादर येथें असते, तर हा पूर्ण चंद्र पाहून त्यांच्या मनाची काय स्थिति झाली असती बरें ?

मग हळूच लोकरीचा धागा खुर्चीत ओवतां ओवतां ती म्हणाली, ' काय बाई म्हणतां कोण जाणे '

सकवारबाई —माझं म्हणणं एवढंच कीं तूं एकदा हुकार दिलास कीं झालीस लागलीच हिंमतबहादरीण व निघालगड किल्ल्याची मालकीण. कां, होय कीं नाहीं ? सर्व कांहीं तुझ्यावर आहे ! हे शब्द कानीं पडतांच चंपाबाईचे हातांतून खुर्ची एकदम गळून खाल "कयानव्हास" वर पडली. जरा थोडी निचरा गालावर एकदम गुलाबी छटा दिसूं लागली व पुन्हां लागलीच निचा चेहरा उतरून अगदीं फिका पडला. निचा हाच उतरलेला चेहरा आमच्या सकवारबाईंच्या दृष्टीस कधींच पडला नव्हता.

नंतर सकवारबाई शांतपणानें पुन्हां म्हणाल्या—'अगबाई, इतकं भांबावून याला नको कांहीं ! तुझ्या मर्जीविरुद्ध कां तुला कोणी लग्न कर म्हणतय् ? ' पण खरंच सांगतें जोडा कितीही मोठा नाही शोभेल !! सर जगदेवरावांचे जाहगीर कितही मोठे ! त्यांचा स्वभाव किती तरी उदार ! तुझा मानमरातब मोठा होईल व पुष्कळ गरीब गुरिबांचें बरें करण्याचें तुझ्या हातीं येईल. पण हें सर्व केव्हां ? जेव्हां तुझ्या मर्जीला येईल तेव्हांना ? अंतर्लोकडे त्यांचें लक्ष तुझ्याकडे भारीच वाई लागलें आहे. ' ' त्यांचें लक्ष ' हे शब्द चंपाबाई, अगदीं संभ्रान्त होऊन, पुटपुटली व सकवारबाईस म्हणाली, ' अस्लया गोष्टी वाई बोलू नका. मला कांहीं कळत नाहीं. ही गोष्ट वाई माझ्या मनीं ना ध्यानीं खुद्धां.' "कयानव्हास" ठेवलेल्या पुढच्या चवरंगावर आपलें कोंपर ठेवून डोक्या हातांनीं तिनें डोळे झांकले, व कांहीं वेळ तशीच विचार करीत ती स्तब्ध बसली. तिच्या गळ्यांत एक काळा रेशमी गोफ होता त्यांत कांहींनें एक ओंवलेलें दिसत होतें मग तो कां भारलेला ताईत होता, कीं पेटी होती, कीं आमची सर्व रोगपरिहारक विजेची पुतळी ? तें कांहीं कां असेना ? ती वस्तु ती नेहमीं आपल्या अंगावरच्या पदराखालीं काळजीपूर्वक झांकून ठेवीत असे. तोंडावर हात ठेवून विचार करीत बसली असतां तिनें मधेंच एकदोनदा तोंडावरचा एक

हात काढला व किंचित् रागीट मुद्रेनें गोफांतील ती वस्तु मधलें बोट व-अांगटा यांत धरून चुरगळली.

नंतर बराच वेळ गेल्यावर हळूच तीं आपल्या विद्यार्थिणींच्या आईस ह्मणाली, 'बाईसाहेब, मला वाटतं कांहीं माणसं जन्माचींच आभागीं. सुख कसं तें त्यांच्या नशिबीं नसतं. हिंमतबाहदरांच्या पदरीं पडायाचं माझ्या कांहीं नशिबीं नाहीं, असं मला तर वाटतं.'

हे शब्द तिनें इतक्या कांहीं चमत्कारिक तऱ्हेनें तोंडांतून काढले कीं त्यांनें सकवारबाईस फार आश्चर्य वाटलें, व ती तिजकडे टक लावून पाहूं लागली.

मग सकवारबाई ह्मणाली—काय तूं आभागी ! मग झालं. तुझ्या सारखी सुंदर, आनंदी, पाहिल्याबरोबर ज्याला त्याला हवी हवी अशी वाटणारी कां दुर्दैवी! मग काय? मला वाटतं या जगांत तुजसारख्या माणसाला दुर्दैवी ह्मणणारी तूंच एक, दुसरं कोणी मिळणार नाहीं, तुझं एकदां जगदेवरावाबरोबर लग्न झाल्यावर मग मी उद्यां काय करूं हें बाई आम्हाला मोठं कोडं पडलयं. तिकडे देखील नेहमीं आतांशी असंच ह्मणतात कीं 'उद्यां चंपाबाई गेल्यावर मुलींना शिकवायाला कोण?'

या संभाषणानंतर या विषयावर केव्हां केव्हां चंपाबाईचें व सकवार-बाईचें पुष्कळ वेळ बोलणें निघत असे. आणि या बोलण्यांत मनाची चल-विचल झाल्याचें चंपाबाईचे चेहऱ्यावर कधींही दिसून आलें नाहीं, आणि ह्मणून अर्थातच प्रतापरावाची, त्यांच्या कुटुंबांतील माणसांची व चाकर-माणसांची सुद्धां मनाची पक्की खात्री झाली कीं आज नाहीं उद्यां चंपाबाई हिंमतबाहादरीण होणार. सर जगदेवरावांनीं पुन्हां गोष्ट काढण्याचाच काय तो अवकाश. प्रतापराव नेहमीं ह्मणतात कीं इच्यासारख्या गरीब स्थितींतल्या पोरीनें ही संधी दवडणें ह्मणजे केवळ मूर्खपणा होय.

वैशाखमासीं एके दिवशीं संध्याकाळीं खिडकीशीं चंपाबाई आपल्या वाचनगृहांत स्वस्थ सृष्टिसौंदर्य पहात बसली होती. तिच्या विद्यार्थिणी नुकत्याच कोठें कांहीं कामाकरितां बाहेर गेल्या होत्या. व त्याच वेळेस जगदेवराव प्रतापरावाच्या मुलींना भेटण्याकरितां ह्मणून तेथें आले. चंपाबाइ एकटीच आहे, हें कळल्यावरून ते वर आले. तेथेंच तिच्या समोर बसले आणि इतके दिवस जी अगदीं उराशीं रात्रंदिवस बळगून ठेविली

होती, ती गोष्ट बाहेर काढली. त्यांनीं थोडक्यांत आणि गंभीर स्वरानें आपला मनोदय तीस कळविला, व अखेर म्हणाले, ' जर तूं माझ्या शब्दास मान देणार नाहींस तर राहिलेलें माझें आयुष्य कधींही सुखांत जावयाचें नाहीं. मग सुख हा शब्द आपण विसरलोंच समजा. तूं जर होकार देणार नाहींस तर मग मला या जगांत काय आहे ? सर्व शून्य ! ! एखाद्याच्या मनांत लग्न करण्याचें आहे कीं नाहीं हें पक्कें कळल्याखेरीज लग्न कर म्हणणें मोठें पाप आहे काय ?'

चंपाबाईची दृष्टि सर जगदेवरावाकडे मुळींच नव्हती. नीट खिडकींतून बागेच्या पलीकडे त्या अगदीं कडेशाच्या वेळेस धुंदक धुंदक दिसणाऱ्या हिरव्याचार मैदानाकडे ती पहात होती. या वेळचा तिचा चेहरा आपल्या दृष्टीस पडावा म्हणून आमच्या वृद्ध सरदाराच्या मनांत फार होतें. परंतु तिचें तोंड अगदीं खिडकींत असल्यानें यांच्या मनासारखें मुळींच घडून आलें नाहीं. जरी यांच्या नजरेस तिचा चेहरा पडला असता, तरी ती अति उल्लासवृत्तीनें अगदीं टक लावून एका विवक्षित वस्तूकडे पाहत आहे एवढेंच दिसलें असतें.

जग०—कां? माझें बोलणें ऐकूं आलें नाहीं काय ?

ती म्हणाली 'होय.' ह्या ' होय ' म्हणण्यावरून आपल्याला त्यांच्या बोलण्याचा त्रास आला म्हणून कांहीं तरी असा जवाब दिला, किंवा आपण तें मनावरच घेतलें नाहीं असें तिनें मुळींच दाखविलें नाहीं.

जग०—मग तुझें यावर उत्तर काय ?

तिनें आपली एक नीट नजर लाविली होती ती कांहीं फिरविलीच नाहीं. मग एकदम खिडकींतून जगदेवरावाकडे वळून हात जोडून गरिबाला पदरा * * अशी कांहीं अर्धींच अक्षरें ती पुटपुटली. यावेळेस तिचा चेहरा प्रफुल्ल झाला होता, तो अगदीं कडेशाच्या वेळेस जगदेराव यांस स्पष्ट दिसला.

' आपली मजवर किती तरी दया ! अंतःकरण किती उदार ! मजवर केवढें प्रेम ! मजपेक्षां रूपानें व गुणानें हजारपट चांगल्या अशा मोठमोठ्यांच्या शेंकडों मुली आपल्या पायांवर लोळण घालतील. मग माझी काय कथा ? आपलें मजवर खरेंच प्रेम. मी कोणच्या स्थितींतली आहे, हें आपणच लक्षांत आणा. बाळपणापासून मी गरीबीखेरीज दुसरें काय पाहिलें

आहे ? माझा बाप पूर्वी मोठा खानदानीचा होता. फार हुशार. चालचलणूक फार चांगली. मनाचा फार मोठा व फार सुंदरही तसाच; परंतु घरीं गरीबी झणजे अठरा विश्वे !! आणि माझी आई--नको बाई, तो अठवण झाली कीं पोटांत कसें भडभडूं लागतें. गरीबा-गरीबी-आह्मां गरीबांच्या नशिबीं काय असणार ? सर्वत्र मानहानि, निराशा, निरुत्साह आणि निराहार ! दुसरं काय ? आपल्यासारखे जे सदां आनंदांत दूधभात खाऊन राहणार त्यांस आमची स्थिति कशानें कळणार ? कल्पनादुखां नाहीं हो. मला आतां कांहीं विचारूं नका—मला बोलवत नाहीं. माझा गळा अगदीं दाटून आला. आपल्या सारख्यांच्या पदरीं पडणें नको कोण झणेल ? नाहीं नाहीं.'

या बोलण्यांत तो तशीच हात जोडून बसली होती. तिचें तें नेसलेलें बारीक पांढरें पातळ घामानें तिच्या अंगाला अगदीं चिकटून गेलें होतें. तिचे ते मोकळे कैस तिच्या गळ्यांत आले होते. तिचे डोळे अश्रूंनीं भरल्यानें त्या संध्याकाळांत चमकत होते. आणि तिनें आपल्या हातानें तो काळा रेशमी गोफ घट्ट धरला होता जणू काय त्या गोफानें तिला कोणी फांसच लावीत आहे !! व 'तो नको हो लावूं' झणूनच तिनें तो मोठ्या कष्टानें घट्ट धरला आहे वाटतें !!

'मला बाई आतां विचारूं नका. लहानपणापासूनच माझा स्वभाव फार हट्टी आहे ?' 'चंपाबाई ! चंपाबाई ! कायतें मोकळ्या मनानें बोल. काय, मी आवडत नाहीं—नाहीं—' असें मग जगदेवराव झणाले. 'काय ? आपण झणे आवडत नाहीं ? असें कालत्रयीं होणार नाहीं—'मग माझ्याबरोबर तुझें मनांत दुसरे कोणाशींतरी लग्न करण्याचें आहे वाटतें ?'

हें ऐकून तो मोठ्यानें हासली आणि झणाली, 'या देशांत तर कोणी नाहीं—'

हें ऐकून ते फार आनंदित झाले व कांहीं वेळ गप्प बसल्यावर झणाले 'बरें तर मी तुला अधिक विचारीत नाहीं. खरोखरच मी केवढा मूर्ख !!'

'मग ठरलाना निश्चय ?'

'होय ठरला, ठरला'.

नंतर 'वेरं आहे तर मी आतां येतों,' असें ह्मणून जगदेवराव तेथून निघाले.

हे आमचे प्रेमपाशपद्ध झालेले मूर्ख वृद्ध तेथून जे निघाले ते थेट आपल्या निहालगडाकडे. वाटेनें जातां जातां त्यांचा चेहरा घटकेंत आनंदी, घटकेंत जरा उदास, पुन्हां कांहीं भीतियुक्त असा होई—कां असें कां बरें? कांहीं तरी मनांत विचारतरंग येत आहेत ते काय बरें असावेत?

चपावाई तेथून उठून हळू हळू जिन्याच्या पायऱ्या चढून तिसऱ्या मजल्यावरच्या आपल्या खोलींत गेली. तेथें जाजम दिवा लावून पांढरा सरपोस घातलेल्या आपल्या अंथरुणावर स्वस्थ बसून आत्मगत ह्मणते—'झालं, सुटलें बाई या जाचांतून. लोकांची ताबेदारी ह्मणजे फार कठिण. नको तो पाजउतारा, नको ती सारा दिवस कामाची पिरपिर. आतां मागचें माझें सगळें नाहींसें झालें. देव पावला. पण 'एवढं,—पण एवढं.'—तिनें आपला हात त्या गोफांतून कांहीं काढला नव्हता. अजून बोलतां बोलतां तिनें तो गोफ गळ्यांतून काढून हातांत घेतला आणि त्यांत जी वस्तु ओंवली होती तिजकडे पाहूं लागली.

भाग २ रा.

त्यानें तोंडांत धरलेल्या चिरूटाचें शेवट पाण्यांत फेंकून दिलें व एका कौपर गलबताच्या प्राकारावर उभे राहून शांतपणानें विचार करीत समुद्रवीचींची शोभा पहात तो उभा राहिला.

'किती तरी कंटाळवाण्या ह्या ! हिरवें, निळें आणि काळें. काळें, हिरवें आणि निळें. दुसरें काय ? होय. त्यांची ती स्थिति स्वाभाविकच आहे. परंतु भरपूर तीन महिने ह्मणजे खरोखरच फार कंटाळवाणे वोवा. आणि विशेषेंकरून—'हें अर्धेंच उच्चारलेलें वाक्य पुरें करावें असें त्याच्या मनांतच आलें नाहीं. त्याचे मनांतून ही गोष्ट जाऊन दुसरेंच कांहीं आलें, व या विचारानें त्याचें मन हजारों कोस लांब असलेल्या एका पदार्थाकडे गेलें.

त्यानें आपल्या खिशांतून चिरुटांची डबी काढली आणि ती हातांत घेऊन उगीच तिच्याकडे पाहत,—आपण डबीकडे पाहत आहों हें मनांत देखील नसतां,—कांहीं तोंडांतल्या तोंडांत ह्मणत डबीचें झांकण उघडलें. तोंडांतल्या तोंडांत काय बरें तो ह्मणाला ? 'माझी लाडकी ती मला पाहून किती तरी खुष होईल ? तिला फार आनंद होईल. त्या आनंदभरांत एकदम येऊन मला प्रेमालिंगन देईल. माझ्यांत असा हा फरक पाहून ती अगदीं थक्क होऊन जाईल नाहीं बरें ? गरीब बिचारी ! काय ! तीन वर्षें आणि वर सहा महिने !! अबब ! खरोखरच तिला फार आश्चर्य वाटेल.'

हा गृहस्थ अगदीं तरुण दिसत होता. फार झालें तर त्याचें वय पंचवीशीच्या आंत बाहेर. त्याचा रंग काळासांवळा होता. नेहमीं हास्यमुख असे. डोळे मोठे असून जरा घारे होते. अगदींच घारे म्हणतां येत नाहीं, पण अगदीं काळेही नव्हेत. यानें मिशा मोठया पिळदार राखल्या होत्या. कल्लेही पण चांगले झुपकेदार ठेविले होते. या कल्ल्यानें याच्या तोंडास फार शोभा आली होती. हा फार उंचही नव्हता व फार खुजाही नव्हता. यानें या वेळेस भस्मीरंगाची इजार घातली होती. आंगांत कोट होता, तोही पण त्याच रंगाचा. डोकीला एक तपकिरी रंगाची टोपी होती. कोटाच्या

घडयाळाचे खिशांतून पांढऱ्या सफेत हात रुमालाचें एक शेवट वाऱ्यानें भुरु भुरू उडत हांतें. पायांत "चेकलेदरचा" बूट होता. टोपी जरा पुढेंच व थोडी एका कानावर कलती घातली होती, त्यायोगें त्याचे ते काळेभोर केंस बाहेर दिसत. हा कुमुदबांधव आगबोटीवर " फर्स्टक्लास प्यासेंजरां "- पैकीं एक होता. या गृहस्थाचें नांव नारायणराव चव्हाण. कुमुदबांधव आगबोटींत चहा व रेशीम भरलें होतें, व ती चिनाहून हिंदुस्थानास येण्यास निघाली होती. या आगबोटीवर "फर्स्टक्लास प्यासेंजर" फार थोडे होते एक उतारवयाचा चहाचा व्यापारी आपल्या बायकांमुलांसह, व एक पार्शी जातीची स्त्री. इचें वय अजमासें पंचवीस वर्षांचें होतें. ही मुंबई "यूनिव्हर सिटीची ग्राज्यूएट" होती. चिनांत कांहीं मिशनरी लोकांच्या शाळा आहेत तेथें ही शिक्षक झणून गेली होती; ती आतां जवळ बरीच मालमत्ता झाली झणून पूर्वसंकेताप्रमाणें लग्न करण्याच्या हेतूनें हिंदुस्थानास परत येण्यास निघाली होती, व आमचे नारायणराव चव्हाण. एवढीच कायती मंडळी.

नारायणराव चव्हाण हा आगबोटीवर सर्वांचा फार प्यारा असे. सर्वांचा तो अगदीं जीव कीं प्राण. हा कोण ? याचा रोजगार धंदा काय ? हें जरी तेथें कोणास माहीत नव्हतें, तरी सर्वांची प्रीति त्याचेवर फार होती. कधीं कधीं हा आगबोटीच्या कप्तानास त्याचे कामांत मदत करी. खलाशांस मौजेच्या गोष्टी सांगे, व दुसऱ्या उतारूंबरोबर याची नेहमीं थट्टा मस्करी चाललेली असे. एकंदरींत हा खुशालचेंडू होता. याच्या एकदां गोष्टी सुरू झाल्या झणजे सर्वांस हंसून हंसून पुरे वाट. हंसतां हंसतां पोटें दुखावयाला लागायाचीं. एकदां यांचा हंशा माजला, झणजे वादळासारखा जरी वारा सुटला, तरी यांना झणून कांहीं ऐकावयाला यावयाचा नाहीं. छः नांव कशाला. गृहस्थ मोठा मोकळ्या मनाचा. त्याला जर कोणी झटलें कीं, ' कायहो सदां पोकळ गप्पा मारीत बसतां ? या, एक बुद्धिबळाचा डाव तरी मारूं.' तर आमची ही स्वारी झणे, ' वः खाशी ! ! आम्ही केवढे तरबेज या खेळांत. प्यादे कोणचें व वजीर कोणचा झणून विचारलें तर ऊं हूं ! हत्ती किती घरें चालतो व घोडा किती घरें जातो झणाल तर—चालतो शक्तीप्रमाणें दहा वीस कोस ! ! '

नारायणराव चव्हाण कांहीं मोठे शिकलेले नव्हते. त्यांस पाठशाळेंतून सार्वविषयक ज्ञान मिळालें नव्हतें. जेव्हां आमच्या पार्शीबाई (स.कर

बाई) या राजेभींस ही कादंबरी वाचली कां ? बकलचा इतिहास वाचलो काय ? त्यांत हिंदुस्थानाबद्दल बकलनें काय झटलें आहे ? असें विचारूं लागत, तेव्हां मिशावर हात फिरवीत ' होय, तसेंच ' एवढेंच तिच्याकडे अगदीं टक लाऊन पहात पहात सावें उत्तर हे देत. चहाचा व्यापारी, नारायणराव चव्हाणास, कधीं कधीं राज्यकारभारांविषयीं त्यांचे विचार विचारी. 'कायहो नारायणराव, लार्ड सालिसबरीची कारकीर्द तुम्हांला कशी वाटते ? आयरिश बिल पास होईल काय ? लार्ड डलस्ले इंग्लंडची सैन्याची तयारी नीट नाहीं झणून झणतात, मग याबद्दल तुमचें काय मत आहे ?' यावरही याचें कधींच मनासारखें उत्तर मिळत नसे.

मग सर्व आगबोटीवरचे लोक झणूं लागले, ' वागुद्या त्यांना त्यांचे मर्जाप्रमाणें.' परंतु जेव्हां कुमुदबांधव आगबोट हिंदुस्थानचे जवळजवळ येऊं लागली व सुमारें पंधरा दिवसांत मुंबई बंदरांत ती लागेल असें ठरलें, तेव्हां नारायणराव चव्हाण याच्या वागणुकींत मोठाच बदल दिसूं लागला. त्याच्या मनाची स्वस्थता अगदीं मोडली ! नेहमीं बावरलेला ! खलाशी मंडळीची व याची चांगली घसट असल्यानें तो त्यांत बंदरांत आगबोट कधीं लागेल, आतां किती कोस राहिले, रोज किती कोस आगबोट चालते, आपण कोणच्या वेळेला पोंहचूं, असें विचारून विचारून बेजार करी. मध्येंच एकदम जोरानें पाय आपटी आणि झणे, 'कसली ही मोडकी तुटकी अगदीं खिळ खिळ झालेली आगबोट ! उगीच लुच्चे गुलाम, आगबोट फार उत्तम, सोय चांगली, फार जलद चालगारी झणून वर्तमानपत्रांत लाबलचक नोटीस देतात !' ही अगदीं कुचकामाची. ही मोडून इच्या फळ्या चुलीला तरी लावाव्या !!

दिनराज चौचीसमुद्यांत पश्चिमेच्या बाजूस अगदीं बुडण्याचे बेतांत आहे यावेळेस नारायणरावजींनीं खिशांतली चिरुटाची डबी काढिली व आगपेटींतली काडी काढून चिरुट पेटवून झुरके घेत माकाराबर पश्चिमेकडच्या आकाशाचा विचित्र रंग पाहत स्वस्थ उभे राहून आपल्याशींच झणतात, 'काय, आजपासून आठ दिवसांत मुंबई बंदर दिसेल झणून खलाशी मघां झणाले नाहीं ! बस. पहिल्या होडग्यांतूनच आपण जाणार. कशाला होडगें तरी पाहिजे ? आपण पोंहतच जाऊं, झणजे होडींत सर्व माणसें येण्याची वाट पहावयाला नको ! '

त्याची मित्रमंडळी, त्याचा हा असा उतावळेपणा पाहून फार हंस परंतु आमच्या बाई साकरबाई मात्र त्यांचा हा उतावळेपणा पाहून ज बाईट वाटल्यासारखें दाखवीत.

ती रक्त-लोहित-वर्ण, दिनराजाची शेष राहिलेली कोर अतां विचिसमु दयांत नाहींशी होणार तोंच बाई साकरबाई आगबोटींच्या प्राकारावर जे चव्हाण उभे राहिले होते तेथें आली. या वेळेस खालीं कांहीं मंडळी उत्ते- जक पदार्थ पिण्यांत गुंतली होती. कांहींनीं बिझीकचा डाव लाविला होता, व कांहीं गुलहौशी मंडळी गात होती. बाई साकरबाई वर येऊन नारायण- रावाच्या शेजारी पश्चिमेच्या आकाशांत अगदीं निस्तेज होत चालेल्या संध्यारागाची मजा पहात उभी राहिली.

या बाईचा स्वभाव फार शांत होता व ती फार गुप्तांतःकरणाची होती. ती मंडळींत फारशी मिसळत नसे. कधीं मंडळींत खेळावयाला येत नसे. ती फार मितभाषी होती. तेव्हां मग गप्पा मारणाऱ्या मंडळींत तरी कशाला येईल ? परंतु नारायणराव चव्हाणाचा व इचा स्नेह चांगला झाला होता. त्याशीं मात्र ती मोकळेपणानें वागत असे.

नारायणरावानें तोंडांतुन चिरुट काढला आणि तिला ह्मणाला, ' काय साकरबाई, आमच्या चिरुटापासून आपणाला त्रास तर होत नाहींना ?'

' छे छे. अगदीं नाहीं. तुमचें चालूं द्या. मी उगीच संध्यारागाची शोभा पाहण्यास वर आलें. खरोखरच किती तरी रम्य वेळ ही !'

तो ह्मणाला. ' वरं. काहो अजून किती तरी लांब बोवा ! अजून दहा दिवस आणि दहा रात्री घालवायाच्या! अं आणि मग जमीन दिसणार !' ती ह्मणाली, 'होय. काय ! यापेक्षांही लौकर जावें ह्मणतां ?''

' होय, मला तर वाटतें. तुह्माला नाहीं कां वाटत ?' ' नाहींच ह्मटलें तरी चालेल.'

' तुमचें कोणी तेथें अंतःकरणाचे नाहीं काय ? तुह्माला सामोरें लांबवर कोणी येणार नाहीं कां ? तुमच्या जिव्हाळ्याचे तेथें कोणी नाहीं वाटतें?'

' होय बाई, मला असेंच वाटतें. अलीकडे फार दिवसांत त्यांचे को- णाचें पत्र चित्र अगदीं येत नाहीं,' असें ती बराच लांब सुस्कारा टाकून व खिन्नमुद्रेनें त्याच्याकडे पाहून ह्मणाली.

इतका वेळ ज्या दिशेकडे तीं दोघें पहात होतीं, तिकडून एकदम वळून नारायणराव म्हणाले, 'तें पहा' 'तो पहा प्रतिपदेचा चंद्र.'

तिनें एकदम तोंड फिरविलें व ती अगदीं निस्तेज अशी चंद्राची कोर पाहूं लागली. तिचा मुखचंद्र देखील या वेळेस अगदीं तेजोहीन दिसत होता.

नारा.—फार दिवसांनीं दर्शन झालें, तेव्हां आतां असें वाटतें कीं—'काय वाटतें ?'

नारायणराव—'असें वाटतें कीं लौकरच आपण आतां घरीं पोहचूं.'

नंतर बाई साकरबाई मोठ्या उदास अशा स्वरानें म्हणाली, 'मी घरीं गेल्यावर कांहीं वाईट साईट ऐकायाला न येवो म्हणजे झालें!'—

'काय वाईट साईट ?' असें ते मोठ्या आश्चर्यानें व घाईनें म्हणाले. त्यांचे आंगावर कांटा उभा राहिला व मनांत धस्स झालें.

'मला असें वाटतें कीं—आणि जसजसा हा प्रवास संपत चालला—तस तसें तर फारच वाटतें कीं, घरीं गेल्यावर जर कांहीं अशुभ कानीं आले तर काय बरें माझी अवस्था होईल ? ज्या गृहस्थाला मी भेटायाला म्हणून इतक्या उत्कंठेनें जातें, त्याचें माझ्यावरचें प्रेम उडालें असेल, अथवा कदाचित् मी त्याच्या दृष्टीस पडेपर्यंत त्याचे मनांत प्रेमांकुर असेल, परंतु माझें हें परदेशांतल्या हवेनें व दगदगीनें अगदीं निस्तेज झालेलें मुख पाहिल्याबरोबर तो प्रेमांकुर करपून जाईल ; अथवा कदाचित् तो फार पैशाचा हव्यासी झाला असेल व त्याकरितांच खरें प्रेम नसतां मजला खोटी माया दाखवील ; अथवा तो मेला असेल किंवा आम्हीं आठ दिवसांनीं पोहचूं म्हटलें तर त्याचा अंत झाला असेल, किंवा तो अगदीं मरणोन्मुख अंथरुणावर पडला असेल, व मी भेटायला जायला व त्याचा प्राण जायला एक गांठ पडेल, किंवा मी तेथें पोहोंचल्यावर दोन चार दिवसांतच मरेल. नारायणराव, ह्या गोष्टी माझे मनांत वारंवार येतात व जणूं काय मीं त्या खरोखरच पाहत आहें असें वाटतें ! म्हण आहेना 'वैरी न चिंती तें मन चिंती.'—ह्या कल्पना शेंकडों वेळां दिवसांतून मनांत येतात. शेंकडों वेळां कां हजारों वेळा म्हणा. मला इकडे येऊन आज आठ वर्षें झालीं. इतक्या दिवसांत त्याचें मन पहिल्यासारखेंच असेल काय ? कोणाला ठाऊक ?' असें ती डोळ्यांत पाणी आणून म्हणाली. हे सर्व नारायणरावांनीं फार लक्ष लावून ऐकलें, व या वेळेस त्यांनीं आपल्या तोंडांतला

चिरूट काढून हातांत घेतला होता व 'दोन चार दिवसांतच मरेल,' हे तिचे आखेरचे शब्द ऐकिल्याबरोबर त्यांचा चिरुट हातांतून गळून खालीं पाण्यांत एकदम पडला, व त्यांचा चेहरा कांहीं चमत्कारिक झाला.

नारायणरावाच्या ह्या चमत्कारिक वृत्तीकडे न पाहतां ती पुढें झणाली, 'ज्या वेळेस मी आगबोटींत बसण्याकरितां समुद्रकिनाऱ्यावर आलें, तेव्हां कोण माझा आनंद !! वारंवार मनांत येई कीं त्याला पाहिल्याबरोबर किती तरी मला आनंद होईल ! मला तो मोठ्या प्रेमानें 'खुशाल आलीसना ?' झणून झणेल. मला भेटण्याकरितां, आगबोट बंदरांत आल्याची तोफ झाल्याबरोबर, तो तेथें मोठ्या उत्सुकतेनें येईल. मग आम्ही एकमकांचे शेजारी व्हिकटोरियांत बसून, आनंदानें एकमेकांकडे पाहत व गालांतल्या गालांत हंसत घरांकडे जाऊं. असें कांहीं वाईट साईट माझ्या मनांत एकदां देखील आलें नाहीं. परंतु अलीकडे या पंधरा वीस दिवसांत तर फारच बाई मनांत वाईट येतें. असें वाटतं कीं मी कोणाच्या तरी उत्तरकार्यासच जात आहें !! इतकें कांहीं उदास मन झालें आहे !!'

आमच्या तरुण गृहस्थानें आपलें तोंड एकदम तिच्याकडे फिरविलें. तोंड फिरविण्याबरोबर तो खर्रदिशी उतरलेला चेहरा त्या संध्याकाळचे वेळेस पूर्णपणें तिच्या दृष्टीस पडला.

तो जवळच्या लांकडी कटांजनावर बुक्की मारून त्वेषानें झणाला, 'काय मी मूर्ख ! यानेंकां माझ्या मनांत भीति उत्पन्न व्हावी ! तुम्ही येथें येऊन ह्या गोष्टी मला कशाला सांगतां ? व जिला मी मोठ्या उत्सुकतेनें भेटायाला जातों, तिच्याविषयीं उगीच वाईट कल्पना माझे मनांत येण्यास कां यत्न करतां ? नुस्ती भीति मला कां घालतां ? जिचें मन माझ्याविषयीं अगदीं धुतल्या मोत्यासारखें निर्मळ, माझ्यावर तिची केवढी तरी भक्ति ! किती प्रेम आणि अशा स्त्रीचें मन फिरेल काय ? आज पूर्वेकडे उगवलेला सूर्य उद्यां कदाचित् पश्चिमेकडे उगवेल, झणून कधीं कोणाला संशय आला आहे काय ? कां तुम्ही पोकळ भीति मला घालतां ?'

'तुम्ही आपल्या बायकोला भेटायाला जाणार, तुमची गोष्ट अगदीं निराळी व माझी निराळी; मी कालेजांत असतांना माझा स्नाध्यायी एक तरुण गृहस्थ होता. त्याचा माझा स्नेह फार. तो जातीचा दक्षणी चित्पावन ब्राह्मण. घरचा खाऊन पिऊन फार सुखी ह्या उच्च शिक्षणानें

त्याच्या मनांतला जातिभेद अगदीं नाहींसा झाला होता. तो फार झुरार. देखणाही तसाच. तो आणि मी बरोबरच पास झालों. मग आज आठ वर्षांपूर्वी मी इकडे येण्याचे अगोदर एकेदिवशीं आम्ही दोघे "ब्याकेत"वर संध्याकाळीं फिरत असतां त्यानें मला माझ्याशीं लग्न करीन म्हणून वचन दिलें, व असें ठरलें होतें कीं, मीं त्रिनांत जाऊन कीर्ति व सहजच पैताही त्याजबरोबर मिळवून परत यावें. तोंपर्यंत त्यानेंही ब्यारिस्टर व्हावें. आणि मग दोघांनींही समान अधिकाराचा अनुभव घेत मुंबईत मोठ्या डोलानें रहावें. धर्मसंबंधानें पुष्कळ विचार केल्यावर व सर्व धर्म एकमेकांशीं ताडून पाहिल्यावर "ख्रिच्यानिटि" हाच कायतो खरा धर्म, अशी खात्री होऊन मी तो धर्म स्वीकारला. माझी हकीगत अशी आहे. तुम्हीतर आपल्या प्रिय पत्नीला भेटायाला जाणार. तुमच्या मनांत हीं भीति कशाला ?'

'माझीही कथा अशीच कांहीं आहे,' असें नारायणराव उतावेळपणानें म्हणाले. 'तुम्हांला घर सोडून आठ वर्षें झालीं. आणि मला काय तीं साडेतीन वर्षेंच. आगबोटींत बसल्यापासून आजपर्यंत अशी कल्पना माझे डोक्यांत कधींही आली नाहीं. तुमचें म्हणणें बरोबर आहे. तुमच्या म्हणण्यानें माझ्या मनांत कांहीं यावयाचें नाहीं—येवढ्या साडेतीन वर्षांत काय होणार आहे ? जाउंद्या कीं हो.'

हें ऐकून बाई साकरबाई खिन्न मुद्रेनें हंसली व तिला त्याच्या अशा भोळसर व साध्या स्वभावाबद्दल फार आश्चर्य वाटलें.

'तिचा स्वभाव किती तरी चांगला म्हणून तुम्हांला सांगूं ! किती साळसूद, किती गरीब, माझ्यावर तिचें किती प्रेम ! अशी साध्वी स्त्री मिळणारच नाहीं. खरें पतिप्रेम तिचे जवळच आहे. प्रेम या वस्तूची माहिती तिलाच. याची कांहीं कल्पना तरी तुमच्या मनांत आहे का साकरबाई ? मी जेव्हां इकडे निघून आलों, तेव्हां ती आपल्या तान्हुल्याला पुढें घेऊन निजली होती. किती तरी गोड झोंप ! मी एक चिठ्ठी मात्र तेथें लिहून ठेविली व तिला व माझ्या बाळाला सोडून आलों.'

'तिला न सांगतां सोडून आलां अँ !' असें साकरबाईनें, फार आश्चर्यानें विचारलें.

तिच्या प्रश्नाकडे किंवा तिच्या त्या आश्चर्ययुक्त मुद्रेकडे लक्ष न देतां ते

झणाले, 'होय. तिच्यावरोबर माझें लग्न झालें, तेव्हां मी करवीरप्रांतीं छत्रपति महाराजांच्या पदरीं शिलेदार होतों. त्या वेळेला आमची पलटण शिरोळास होती. शिरोळचें हवा पाणी घोडयाला फार चांगलें. झणून नेहमीं तेथें पुष्कळ घोडा राहत असे. तिचा बापही पूर्वी महाराजांचे पदरीं एका पलटणीचा अम्मलदार होता. त्यानें आपलें सगळें आयुष्य लष्करी खात्यांत घालविलें होतें, व तेथेंच पेनशन घेऊन घर करून राहिला होता. त्याची ही मुलगी रूपानें फार चांगली, लिहायाला वाचायला शिकलेली, फार हुशार. तिच्या बापाचे मनांत तेथेंच कोठें तरी आह्मां शिलेदारांपैकीं एकाला तिला द्यावी असें होतें. त्याचा व माझ्या बापाचा फार स्नेह असे. शिरोळास असते वेळीं आमची जुनी ओळख झणून मी नेहमीं त्यांचे घरीं जात येत असे. त्यानें एक दोनदां लग्नसंबंधानें मजजवळ गोष्ट काढिली, परंतु मी कांहीं पहिल्यानें मनावर घेतलें नाहीं. आह्मी अगदीं अस्सल मराठे, आमचें कुळ मोठें. आह्मी महाराजांच्या ताटचे. हा जरा कडुपैकीं. मग सोयरीक कशी करावी ? माझ्या बापाला तर ही गोष्ट मुळींच पसंत पडणार नाहीं असें वाटे. परंतु तेथें नेहमीं जाण्यायेण्यानें ती तरुणी वरचेवर माझ्या नजरेस पडे. तिचे तें मोहक रूप व हुशारी पाहून, माझे मनांत लग्न करावें असें वाटे. मग पुन्हां एक दोनदां त्यानें ही गोष्ट काढली, झणि झणाला, ' नारायणराव, तुम्ही श्रीमंत अहां, हुशार अहां, मानकरी अहां. दुमालदार अहां, आम्हांस एवढें पदरांत घ्या.' मी अविचारानें एकदम झणालों; ' मी कांहीं तुमचे मर्जीबाहेर नाहीं.' परंतु घरीं बापास या संबंधानें विचारा, झणून त्यांस तरी झणावें किंवा आपण तरी पत्र घालावें, व मग त्यांच्या विचारानें कायतें करावें कीं नाहीं ? पण तरुणपणची पोरबुद्धि. आपला त्याचा कांहीं पूर्वीचा पदर लागला आहे कीं नाहीं, याचा कांहीं विचार न करितां, घरीं न विचारतां, त्या म्हातान्यावर भरंवसा ठेवून, असें कशाला झणा, तिचें रूप पाहून असेंच कां झणाना, लग्न लाविलें. लग्न झाल्यावर मीं घरीं पत्र पाठविलें. पत्र पाहून माझ्या बापास फारच राग आला. त्यानें मला उलट लिहिलें कीं, ' तूं आपली अब्रू घालविलीस. महाराजापाशीं आतां जाण्याला मला तोंड नाहीं ! बोलून चालून तो हलकट कुणबी ! आपला स्नेही झाला व मुलगी चांगली झणून काय झालें ? जात बुडवायाची कीं काय ! मला सर्व माऊबंद छीःथु करूं लागले. आतां

मला पुन्हा तोंड दाखवूं नकोस. सगळ्या कुळाला बट्टा लाविलास. केवळ तूं कुलांगार निपजलास. आतां माझ्या वतनवाडीपैकीं कांहीं एक तुला मिळणार नाहीं. जा देशावर पाहिजे तिकडे भीक मागत.' मग निराळें घर करून राहण्याचें मनांत आणलें. तिच्यावर फारच प्रेम. पगार बेताचाच. ती जें कांहीं मागेल तें तिला द्यावयाचें. कधीं ना नाहीं. त्यावेळचे तसेंच कांहीं वारें असतें. पगार पुरेना. इतके दिवस बाप कांहीं घराकडून पाठवीत असे, म्हणून मी ठाकुरकीनें रहात असें. तेंही आतां बंद. फार अडचण होऊं लागली. तरुणपणीं एक स्त्रीच कायतें दैवत. तिचें सर्व तऱ्हेनें कोड पुरवावयाचें. ती सांगेल ती पूर्व दिशा. खरोखरच सांगतों, या नादानें माणूस अगदीं वेडें होऊन जातें. तिच्या खेरीज मला दुसरा कांहीं नादच नाहींसा झाला. खर्च वाढला. पगार पुरेना. चाकरीचा कंटाळा आला, व दिला एके दिवशीं राजीनामा पाठवून झालें. मग आतां शिरोळास कशाला रहा. मनांत आलें आतां कोठें तरी चैनीनें फिरावें. नाहीं म्हटलें तरी होते कांहीं मजजवळ डागडागीने. होतील अजमास पांच सहा हजारांचे. तेवढ्यावर निर्वाह करावा म्हणून आणलें मनांत. मग शिरोळ सोडून मी व ती गगूनबावडयास जाऊन राहिलों. तिचा बापही पण मधून मधून कांहीं दिवस आमचे जवळ येऊन राहत असे. आतां तरी खर्च वेताचा करावा कीं नाहीं? अंहं! नांव नाहीं. बसून खाऊन किती दिवस पुरेल? माझा सासरा फार खर्चीक, जुन्या चालीचा मराठा. कांहींतरी व्यसन असावयाचेंच. आम्ही व्यसन म्हणतों, पण त्यांना तें वाटत नाहीं. त्यांत हे पैसे जणूंकाय आपलेच समजून तो फार उडवूं लागला. म्हातारी माणसें पैशाच्या कामाला फार वस्ताद. त्यानें आपला खर्चसुद्धां आमचे पैशावरच चालविला. पैसे अगदीं थोडे राहिले. ती वरचेवर बोलूं लागली कीं 'आतां पुढें वाट काय? आपण दोघें व हें एक लहान पोर—निर्वाह कसा होणार? काय कोठें मला मोलमजूरी करावयाला जावयाचें आहे? तुम्ही तर घरीं स्वस्थ बसलां. पोराच्या हातांत कां पुढें करटी देणार'? असें ती अनेक तऱ्हेनें छद्मी बोले. मग करवीरास जाऊन कांहीं रोजगार धंदा बघावा, म्हणून मी विचार केला. करवीरीं गेलों, पण कांहीं साधलें नाहीं. तसाच परत आलों. माझें मन आतां अगदीं उदास झालें. इतके दिवस दोन जीवांचीच काळजी, आतां हें ति-

सरें लहान पोर. कांहीं नौकरी लागली नाहीं झणून तिलाही फार वाईट वाटलें. रागाला आली त्या वेळेस ती मुलाला मांडीवर घेऊन पाजीत बसली होती; तशीच त्याचे पाठीवर हळूच हातानें चापट मारून झणाली,'आतां याचे नशीबीं भीकच!' मला फार वाईट वाटलें, व कोठें तरीं निघून जाण्याचा बेत केला. मग मघां सांगितल्याप्रमाणें चिठ्ठी लिहून ठेवून कोणाला न विचारतां निघालों. चिठ्ठींत कांहीं रोजगार धंदा पाहण्याला बाहेर जातों, येवढेंच लिहिलें होतें. मुंबईस आलों. तेथें बरीच खटपट केल्यावर एका जिवलग मित्राच्या साह्यानें एका मोठया व्यापाऱ्याचा एजंट होऊन चिनांत चहा, रेशीम व अफू खरेदी करण्यास जाण्याचें ठरविलें, त्यानें मला पगार ठरविला तो कांहीं फार नव्हता. सरासरी कसातरी निर्वाह होण्याइतका.--परंतु त्यांत असें एक ठरलें होतें कीं सगळ्या व्यापारांत जो कांहीं नफा होईल त्यांतला सहावा हिस्सा मला द्यावयाचा. चिनांत जाण्याचा खर्च मला आमच्या व्यापाऱ्यानें दिला. चिनांत गेलों व आपल्या कामाला लागलों.'

बाई साकरबाई झणाली—'मोठें धाडसाचें काम तुम्हीं केलें.' 'धाडस कसचें—प्रेमानें बद्ध होऊन, तिला आतां हाल अपेष्टा सोसाव्या लागतील झणून, गोजीरवाणें पोर उपाशी मरेल झणून आलों निघून.' पुन्हां ती झणाली—' वरं, तुम्ही इकडे आल्यावर घरीं पत्र बित्र तरी कांहीं पाठविलें कां ?' ' छेः नांव नाहीं. आतां निघण्याचे पूर्वी पंधरा दिवस पत्र पाठविलें व लवकरच येऊन भेटतों झणून लिहिलें. पत्र काय पाठवूं? पहिल्यानें चिनांत कांहींच बस्तान जुळेना. पुष्कळ खटपट केली. एकावर एक संकटें. या त्रासानें नाहीं पाठविलें पत्र. पाऊण वर्ष असें हालांत काढलें. व्यापार नीट चालेना. नफा अगदीं होईना. झणून वरचेवर आमच्या व्यापाऱ्याचीं पत्रें येऊं लागलीं. फार त्रास झाला. परंतु ईश्वरसाह्य. पुढें चिनांत माझी पत चांगली झाली. माल खपूं लागला. वरचेवर माल पाठविण्यास मालकाचीं पत्रें येऊं लागलीं, मुंबईच्या दुसऱ्या व्यापाऱ्यांनींही मला एजंट केलें. मग दोन वर्षांत मला पैसा पुष्कळ मिळाला. सर्व हिशोब झाल्यावर माझे हिशास वीस हजार रुपये आले. मग हिंदुस्थानास परत

येण्यास निघालें. आणि आतां काय आठ दिवसांत मुंबई व लागलेच आगगाडीनें दोन दिवसांत शिरोळ. तिला व मुलाला कधीं पाहीन असें झालें आहे !!'

'काय हो, सगळया साडे तीन वर्षांत एकच पत्र तिला ?' म्हणून साकरबाईनें पुन्हां त्याला विचारिलें.

'होय. पत्र लिहिण्याला तोंडच नाहीं. काय लिहितों काय ? बहुतकरून मुंबईसच माझ्या मित्राचे पत्यावर किंवा करवीरीं तिचें पत्र येईल. मी पत्ता तिला कळविला आहे,' असें तो झणाला.

पुन्हां त्यानें चिरूट ओढण्यास सुरू केलें. साकरबाईही कांहीं बोलली नाहीं. पश्चिम दिशेचा रक्तवर्ण आतां अगदीं नाहींसा झाला, व पूर्वेकडे उदयास आलेली चंद्राची कोर आतां चांगली चमकूं लागली.

नरायणराव चव्हाणांनीं इतक्यांत चिरूट पाण्यांत फेंकून दिला व साकरबाईस म्हणाले, 'मीं घरीं गेल्यावर जर कां माझ्या कानीं तिची वाईट-साईट वार्ता आली तर मग माझा कांहीं प्राण राहणार नाहीं !'

बाई साकरबाई मोठ्या ममतेनें झणाली, 'नारायणराव, तुम्ही असल्या गोष्टी कशाला मनांत आणतां ? ईश्वर फार दयाळू आहे. तो मनुष्यांचे शक्तीबाहेर त्यांचेवर कधींही संकट आणीत नाहीं. माझ्या मनांत असें विचार येण्याचें कारण असें कीं, आलें एकदां दोन तास शिकवून झणजे झालें. रोज तेंच तें, कधींही पालट नाहीं. मग कामाकडे तितकेंच लक्ष ! पहिल्यानें बरें वाटतें, मग येतो कंटाळा ! असे वेडे वांकडे विचार नेहमीं चालावयाचे. त्यांतलेच सर्व हे विचार.'

'माझें मन सदा पैसा मिळविण्यांत, व व्यापारांत गढून गेलेलें. व्यापारांत हजार तऱ्हेचे घोंटाळे येतात. त्रास होतो. हाल होतात. पैसा कां उगीच मिळतो ? वेळेवर जेवण देखील नाहींहो ! सदा मनांत कीं एकदां श्रीमंत होऊन तिला कधीं भेटेन. दुसरे विचारच नाहींत. असे अभद्र विचार माझे मनांत मुळींच आले नाहींत ! किती मी निर्दय ! साडेतीन वर्षांत एक बोटभर चिठ्ठी सुद्धां तिला पाठविला नाहीं. मी तिची कांहींच चौकशी केली नाहीं. असें दगडासारखें कठिण माझें मन कसें तरी झालें !! याचें मला आतां आश्चर्य

वाटतें.' अशी मनाची क्षुब्ध वृत्ति होऊन नारायणराव तेथें "डेक"वर साकरबाईशीं दुःखोद्गार काढित इकडे तिकडे फिरूं लागले. 'साकर-बाई, मीं शपथ वाहून सांगतों कीं अशी वाईट कल्पना या वेळपर्यंत माझे मनांतच आली नाहीं. आणि आतां हें माझे मनांत वारंवार इतकें येतें कीं, कांहीं अगदीं सुचेनासारखें झालें आहे. जातों आतां, आणि घट-काभर मीं आपल्या "केबीन"मध्यें स्वस्थ पडतों.

तो तेथून गेला व बाई साकरबाई तेथेंच त्या वेळची रत्नाकराची शो-भा पहात बसली.

भाग ३ रा.

हे..... मासाचे दिवस. या दिवसांत एके दिवशीं संध्याकाळीं सूर्यास्ताचे वेळेस पश्चिम दिशा अगदीं तांबडी लाल दिसत होती. जणूंकाय भगवान् सूर्यनारायणानें आपली प्रिया जी पश्चिम दिशा, तीस परम प्रेमानें तांबडा शालूच नेसविला आहे ! काय मनोरंजक वेळ ! हा रक्तवर्ण प्रकाश निहालगडावरच्या मोतीचौक वाड्यांत जातांना लागणाऱ्या भव्य कमानीवरच्या छिन्नभिन्न झालेल्या मूर्तीवर थोडा थोडा चमकत होता.

चौकाच्या खिडक्यांच्या जाळ्यांतून व तावदानांतून रक्तवर्ण किरणें आंत प्रवेश करीत होतीं. रस्त्यांच्या बाजूस असलेल्या चिंचेच्या झाडांच्या उंच शेंड्यावर हीं किरणें पडलीं होतीं, तीं जातां जातां थोडी विश्रांति घेण्याकरितांच कीं काय, त्यावर बसलीं आहेत असें वाटे. मत्स्यपल्वलांतील पाणी या तांबड्या किरणांनीं जणूंकाय तांब्याचा रसरशीत तांबडा रसच आहे असें वाटे. पडक्या तटामागच्या विहिरीच्या मोडक्या चाकावर हीं किरणें पडल्यानें त्यावर कोणी रक्तसिंचन केले कीं काय अशी मनांत उदास कल्पना येई.

या संध्याकाळचे अगदीं शांत वेळेस कुरणांतील गाई, वासरांचें हंबरणें, वृक्षांवरील पक्ष्यांचे मधुर स्वर, मत्स्यपल्वलांतील माशांच्या उसाळ्यांचा आवाज, त्या पलीकडच्या रस्त्यानें शेतकरी लोक माल भरून गाडे घरांकडे नेत, त्या गाड्यांच्या चाकांचा खडखड आवाज, मधून मधून कानीं पडे. निहालगडावर यावेळेस जिकडे तिकडे इतकें शांत होतें कीं जणूंकाय तेथील सर्व वस्ती मोडून लोक निघूनच गेले !

देवडीवरील घड्याळाचे आठ ठोके पडतात कीं नाहीं तोंच वाड्याचें मागील दार हळूच उघडून एक स्त्री बाहेर बागेंत आली.

ही मत्स्यपल्वलाच्या बाजू बाजूनें गवतावरून हळू हळू, पाय न वाजतां पडक्या भिंतीच्या मागच्या बाजूकडे वळली; व त्या पलीकडच्या झाडांत दिसेनाशी झाली.

ही रूपानें कांहीं म्हणण्यासारखी नव्हती ; परंतु इचा चेहरा मात्र फार

मोहक होता इचा रंग काळा होता. डोळे मोठे असून त्यांत कांहीं चमत्कारिक तऱ्हेचें पाणी होतें. इचें नाक तसें सरळही नव्हतें, व अगदीं बसकेंही नव्हतें. इची जेवणी जरा मोठी होती. कपाळावर पिंपळपान व चंद्र गोंदलेला होता. डोळ्यांच्या दोन्ही कोंपऱ्यावर सोगे गोंदलेले दिसत होतें. डाव्या हातावरही कांहींसें झाडाच्या आकृतीचें गोंदलेलें दिसत होतें. तें वृंदावनकरून तुळशीचें झाड असावें. हिनें हातापायांचीं बोटें मेंदीनें रंगवून तांबडीं केलीं होतीं. इचे गळ्यांत एक पुतळ्यांची माळ व चिताक होतें. उजव्या दंडांतच फक्त चांदीची तोळबंद होती. इनें कपाळाकडचे केश उलटे धरून वेणी न घालतां फिरकीबुचडा बांधला होता. तोंडांत विडा होता. तो साधा होता कीं तंबाकूचा कोण जाणे ! ही निपाणकांडी काळी चंद्रकळा कांस मारून नेसली होती ती आडजुनीच होती. इचें वय वीस वर्षांचें होतें. इचें नांव मैनाबाई. ही कांहीं दिवसपर्यंत सरलष्कर यांचे येथें कोठींतली कुणबीण होती. जेव्हां चंपाबाईचे जगदेवरावांबरोबर लग्न झालें, तेव्हां तिनें ईस आपले बरोबर इकडे आणिलें. खरोखरच मैनाबाईचें नशिब आतां उघडलें. सरलष्करांच्या येथें कोठींत काम करतां करतां सांधेन् सांधे ढिले पडत, तें आतां सर्व गेलें. पहिल्यापेक्षां तिप्पट पगार वाढला; व कामही कमी झालें. येऊन जाऊन आतां बाईसाहेबांची वेणीफणी करावयाची, लुगडेंचोळी नीट नेटकी ठेवायाची, व सदा ' जी सरकार ' म्हणत स्वस्थ बसावयाचें !

चंपाबाईचें जगदेवरावांबरोबर लग्न झाल्यापासून तिला आतां निहालकुंवरबाई म्हणूं लागले. परंतु चाकरमाणसें सर्व माईसाहेब म्हणूनच हांक मारीत.

मैनाबाई पडक्या तटापलीकडे त्या जुनाट विहिरीकडे जाऊं लागली, तोंच विहिरीवरच्या धांवेकडून एक मनुष्य हळू हळू इजकडेच येऊन एकदम इच्या समोर उभा राहिला.

आम्ही पूर्वी सांगितलेंच आहे कीं, ही विहीर अगदीं एका बाजूला आडवळणी व तशांत पडकी असल्यामुळें तिकडे कधीं कोणी जात नसे. वाड्याच्या तिसऱ्या मजल्यावरच्या माडीच्या खिडकींतून ही विहीर चांगली दिसत असे. तो मनुष्य त्या स्त्रीस म्हणाला, ' चल आपण तेथें मोऱ्हक्या चाकाच्या धांवेवर बसूं.' तेथें जाऊन बसल्यावर, त्याच्या हातांत एक

कोयता होता, त्यानें धांवेजवळच्या एका वाभळीची साल सहजवृत्त्या ताशीत ताशीत तिला तो ह्मणाला–'कायग ये मैने, कितीतरी आक्रशी हळूच आ-ल्लीस! पायकी वाजला न्हाय—इचभन मला वाटल भूतवीनच आल. मी ह्येच बग त्या वरलीकडल्या बागतन आलों आन् झटल देवडीवर तुझा तल्लास घ्यावा तर तूं पुढेंच!!'

'माझी खोली त्या तिसऱ्या मजल्यावर हाय, आन् तिथन् इकड्च संमद दिसतया. मी तुमाला पाइल आन् इचार केला कीं आपुनच जावं आन् घडिभर हत एक बाजूला बोलत बसावं. आंत मंदी माणसांची लई वर्दळ!! कोनीतरी आपलं बोलन ऐकावयाचं! हिथ लईबेस जागा, कुना-लाबी भ्यायच कारन नाई,'–असें ती ह्मणाली.

हा मनुष्य भला दांडगा धिप्पाड होता. त्याचे दंड अगदीं फिरलेले होते. छाती मोठी भरदार. गर्दन अगदीं एखाद्या माजलेल्या पोळासारखी भरीव. यांचें कपाळ मोठें होतें. यानें डोक्यावर लहानशी शेंडी ठेविली होती व मधली हजामत करून दोन्दीकडे कल्ले राखिले होते. डोकीचे केंस अगदीं रांड असून काळेभोर होते. भिंवया भल्या मोठ्या होत्या, पापण्या असव्या त्यापेक्षां जरा लांब होत्या. नाक मोठें जाड व जरा आपरें होतें. तोंडावर एखादा दुसरा देवीचा वण दिसत होता. पायांत तेल दिलेल्या न-व्या कोऱ्या कर्र कर्र वाजणाऱ्या वहाणा होत्या. चेहऱ्यावर उर्मटपणा फार दिसत असे. बोलणें अगदीं रांड. सर्व शरीर अगदीं घटलेले. एकंदरींत तो जवळच्या कुरणांत चरणाऱ्या पोळांच्या वर्गांतलाच एक ह्मणण्यास हरकत नाहीं!!

तीं दोघे तेथें बसल्यावर, ती जरा पलीकडेच बसलेली त्याच्या अगदीं जवळ येऊन एक हात त्याच गळ्यांत घालून कांहीं प्रेमानें आतां ह्मणणार तोंच तो ह्मणाला 'अग मैने, तुझा हात लई मऊ लागतोया, पहिल्या सारखा न्हाइ. न्हाइ तर इचभन सरलसकारच्या इथ कोर्टांत मुसळ धरून धरून आन् जात्याचा खुटा धरधरून हात अगदीं घोडयाचा खरारा!! ह कायवा! हात अगदीं कापसावानी मऊ! अंगाला लागतात कीं नाहीं कळत बी नाहीं!' ती ह्मणाली, 'कां जोतबा! लया दिसान भेट ह्माली ह्मननशेनी लई आनंद ह्मालाय तुमास्नी व्हय!'

झाडाची साल खरडित खरडितच तो झणाला, 'व्हय गा आनुंद झन्जे आक्सी झालान्.'

या दोघांचें काय नातें असावें हें आमच्या चाणाक्ष वाचकांस सांगणें नकोच; तें त्यांच्या लक्षांत आलें असेलच. मैनाबाईची व वाचकांची ओळख आहेच. जोतबा हा सरलष्कराच्या एका बागेंतील माळी. या दोघांची जुनी दोस्ती.

ती झणाली, 'अर माझ्या जिवा, मी इक्त लांबपतुर माई साहेबासंग हिंडलें त्यान कांहीं जास्ती झालं व्हय?' जोतबा झणाला, 'छत बाईच तरी मास यायच! ते गेले आन् उलट वाटच्या दागदगीन च्वाड मातुर झालीस!'

मैना:—आन् लोक झनत्याती माई साहेबाची लई मर्जी. रोज त्यांच्या ताटच जेवायाला आन् आक्शी माजली. आन् लई फिरलं झणजे चार मुलुखची नजर पडत्यात, लई आराम वाटतया आन् मजा दिसती. नवी नवी मनुक्ष दिसत्यात. नव्या नव्या बोली कळत्यात! माई साहेबांबरोबर आम्ही लई फिरलों. आक्सी पुन, ममई, कलकत्ता आन् बडोद. बडोद्याची भाशा लई वंगाळ; आमच्या मानसाला कुनालाबी कळना. कांहीं बोलल कीं येडच्यावानी बगत. आन् बगा, माझा आई त्या पाटनकराच्या हित व्हती आन् तवा मी धाकली होतें. एकदा पाटनकराच्या मुलीसंग आई गेली होती, तिला तत दिलया. मीबी गेले व्हते. आन् तवा मीबी ती भाशा बोलाया शिकले, झनुन मला तेवढ कळतया. गुजराथी लई हेड-मुंद्र. अस आमी लई फिरलों सगळ्या देसभर. आगीन गाडीनं गेलो झणजे फॅरसकलासांत माईसाहेब व सरकार बसायाच आन् मीबी ततच! आन् तवा मला जोतबा, तुमचा लई आडाव होई बघा. आगीन गाडी नसली कीं चार घोडच्याचा रथ हैच. आमच सरकार तिच्यायानं अगदीं येड झाल्यातीं. माई साहेबाबिगर आक्सी करमत नाहीं. त्या झणत्याल ते थोडे. झातारपन्ची बायकु, आन् मागून केलेली. मग तिचा तोरा काय इचारायचा!'

'पुरे तुझ्या गप्पा. पैशाबगर कांहीं नव्ह बग. तुझा पगार बी झालाय लई, आन् तुझ्यावर माईसाबांची मर्जी बी हाय. एकदा पैसा लइ झाला कीं झाल बग मग, अस चोहनशान कशाला. ह्याभन पाट लावून

टाकूया झनजी झाल. मला बी बायकु न्हाई. झातारी लई थकलिया आन् रोज मला हातान भाकर करायाचा येतो वकत, तवा लई कटाळा आलाया,' असें जोतबा झणाले.

'खरच जोतबा सगळ पैशापाई बगा. आन् परवा सरलसकारच्या हित माई साहेब काय व्हत्या ? माज्याबानी चाकरच नव्ह का ? मजसारखाच काम करून पगार घेत व्हत्या नव्ह का? तुम्ही पाह्यल नाय व्हय ? तत एक पांढर पाताळ दोन रुपयाच, नाहीं तर खुताड लुगड, नाहीं तर तें ममइच चीट नेसत व्हती, तवा कुटला शालू न फालू ! पन् जोतबा खरच सांगते ल्येच तिला लई शोभा देई बगा. रुपानं लई नामी; जशी पिंवळी नागीन ! आन् ते पगाराच ईस रुपय घेऊन मजकड येई आन् झन 'मैना, केवढुसाग पगार, कस कराव?' तरी बर; जेवायाला चांगलें सरलसकरच्या मुलीबरोबर मिळ ! आन् आतां बगा ! तिच्याकड कोन बगनार हय ! !'

तो झणाला, 'जाऊं दे कीं एकदा; पैसा साचव कीं पाट लावलाच बग !' ती कांहींच बोलली नाहीं, मुकाट्यानें बसली. मग बऱ्याच वेळानें ती झणाली, 'राव, तुम्ही वाडा आंत पाहिला काय ? बाजूला अस दिसतया खर पन् आंत लई नामी. इंदरभुवन ! आन् त्यांत माईसाहेबाचा रगमहाल तर लई सुंदर ! जिकडे तिकडे आरसच आरसन आन् तसविराच तसविरा. एक एक आरसा ह्यो मोठा ! ! (हात वर उंच करून). संमद मानुस दिसतया ! परवां जामदार झगाला, या बाईकरितां सगळ हें नव सामान आनलया. लई पैसा ! वंजळीच्या वंजळी दिला झन् !

जोती०:—तिच नसीव लई मोठ सव्वा हात बग.

मैना:—आम्ही गांवाला जायाला निघालों, तवाचा थाट पाहिला नायका तुम्ही. हत्ती, घोड, पालखी, रथन् वग्यान् शिबंदी एकच गर्दी. माईसाहेबांचा केवढा थाट ! महाराजांच्या रानीचाबी नसल. अस सरकार अगदीं मुर्डीत. आन्, पुन्या ममईला गेलों तवा तथ मोठा बंगला घेतला. किती साहेबन् मडमा येत माई साहेबाला भेटाया. अगदीं ही गरदी. मडमान् बाईसाहेब नाचत आन् गात ! माईसाहेबाचा गळा लई नामी ! माईसाहेबांनीं गोशा दिला आता टाकून. भीमंताला कोन नांव ठेवतंय? आज हिथ जवळ र-

ह्नापुरास मोठा साहेब आलाया तिथ हाय मेजवानी. सरकार आन् माईसाहेब गेल्याती तथ. रत्नपूर हिथून सात मैल व्हय काय ? यायाला रात व्हईल तर, तुह्माला वाडा बगायाचा हाय का? मी जमादाराला इचारत्ये आन् नेत्ये आंत.

तुमचीबी जमादाराची बायसी पुसट पुसट वळक हाय. तो लई भला मानुस. नग नाहीं ह्ननायाचा.'

हीं दोघें तेथून उठलीं. आतां बराच काळोख पडला होता. वाड्याचा दिल्लीदरवाजा लाविला होता, दिंडीमात्र उघडी होती. पहिल्यानें मैना आंत गेली. मागून जोतबा गेला. चौकीवर जमादार व शिपाई बसले होते. जोतबाचा व यांचा रामराम झाला, तंबाकू ओढली. मैनानें जमादारास विचारल्यावर तीं दोघें आंत गेलीं. सोप्यावरच्या डाव्या हाताच्या खोलींत ती गेली व एक दिवा लावून आणला. मग जोतबास घेऊन ती उजव्या हाताच्या बाजूनें आपण पुढें व तो मागें अशी चालली. ते वांकडेतिकडे जिने, ते एका खोलींतून दुसऱ्या खोलींत नकळत जाणें, व त्या जिन्याच्या पायऱ्या चढतां चढतां व उतरतां उतरतां संवय नसल्यामुळें जोतिबाच्या पायास गोळे आल्यानें तो त्रासून गेला आणि ह्नणाला, 'कायग कुट आनलस पाताळामंदी ? कसली भेसुर जागा आन् जिनबी कस हायत ! मला डाव हाय कीं माय लई दिवस झाल ह्नन, हित येक खून झाला व्हता. इचीभन उरावर बी बसायाच !' इतक्यांत ती त्यास घेऊन एका मोठ्या सजविलेल्या दालनांत आली व ह्नणाली, 'हा आमच्या माई साहेबाचा रंगमहाल. आज ह्या हित नाहींत ह्नणून दिवा बित्ता नाहीं. रोज लई रोशनाई.' मग तिनें तेथली एक हांडी लाविली आणि ह्नणाली 'बगा आता'. जोतबा आश्चर्यानें तोंड 'आ' करून डोळे वटारून टक लावून चहूंकडे पाहूं लागला. बिचारा रानटी माणूस, त्याला हें काय माहित ? अगदीं भांत्रावला. हळूच मग ह्नणतो, 'मैने, किती पैसा याला लागलाग ? मला वाटत दोनचार पोती सहज !!'

हा रंगमहाल अष्टकोनाकृति होता. मैना, वेड्यासारखा उगीच इकडे तिकडे पहाणाऱ्या त्या जोतीबास ह्नणाली—'या भिंतीवरल्या तसविरा बगा कीं. तुमाला ही चितर वळखत्याती का? ही राधाकृष्णाची; ही कृष्ण आन् गोपी. गोपीची लुगडीं घेऊन तो झाडावर बसलाय पहा! हे काय—ही एक

आवा दिसतीया मी वी नांव इसरलें. यालाच लई रुपय पडल्यात.' मग एकदम भिंतीला हात लाविल्याबरोबर एक दार उघडलें आणि दुसरी खोली दिसूं लागली. तिकडे बोट करून ती म्हणाली, 'ही माईसाहेबांची वेणीफणी करण्याची खोली. ते जिकडे तिकडे आरसे व सुगंधी तेलाच्या बाटल्या पाहून जोतिबा म्हणाला, ' मैने, जिकडे तिकडे आरसच! वाटवी गावना! आन् हिथ कसली घान मारतीया-छन् लई नामी जागा!' मैना हंसून म्हणाली, ' काय राव तुमी लइ ज्ञान! हे अत्तराच वास हाईत-घान व्हय! लईखास! ' मग एकदम एक हिरवा पडदा वर केला आणि म्हणाली ' या इकडे ही डागडागिनं घालीत बसावयाची व लुगडी चोळी नेसावयाची खोली. हित जिकड तिकडे कपाटांत रेशमी कपडे ठेवल्यात. आन् ह्या पेट्या बगा. ह्यांत सगळ डागीन हाईत. हे बगा हिथ खालीच हे शालून् दुपेटेन् चोळ्या कांचोळ्या बाईसाहेब टाकून गेल्यातीं. अगदीं चोळा बोळा! कायतर ते आंता येत्याल तवा आगूदर मला हे नीट ठेवायाच हाय. सावलोक आन त्यांच्या मडमा आल्या म्हणजे हिथच त्या खोलींत भेट घेत्यात. ह्या खुर्च्या बगा कशा हैत. हे कवाच बगा. ह्या मेजाकड बगा कीं. आस काय करता राव ?'

वसंतसेनेचा वाडा पाहून भटजीबोवांची जी स्थिति झाली तीच स्थिति हा वाडा पाहून आमच्या ज्ञानगंधविहीन जोतिबाची झाली. जोतिबा नंतर हें सर्व पाहून अगदीं भ्रमिष्ट होऊन भीतभीत कांहीं जिनसाला हात लावून पाहूं लागला व ' बसू कां नको, वसू कां नको' असें करीत हळूच तेथें एका किनखापानें मढविलेल्या कोचावर बसला. कोचावर चांगलें नीट बसावें कीं नाहीं ? त्या गरीबाला काय जन्मांत ठाऊक! तो कोचा- वा अगदीं पुढच्या टोंकावर बसला! मैना कोठें बरें बसली असेल ? हें तां निराळ सांगितलें पाहिजे ! आमच्या हुषार वाचकांच्या लक्षांत आ- ल्यावांचून कधीं राहिलें नसेल. तेथेंच त्याच्या जवळ ती बसली आणि म्हणाली, ' जोतबा, माईसाहेबाचे डागीने तुमाला दाखवावे असें माझ्या मनांत लई हाय. ती पेटी बगा. पांढरी दिसती ती-ती-ती हत्तीच्या दाताची हाय. लई नकशी केली हाय. पन त्याच्या किल्या माईसाहेब आपल्या जवळ सदा ठेवत्यात.'

जोतिबा त्या पेटीकडे बोट करून म्हणाला-' काय ती पेटी ! अवघ !!

केवढी मोठी ! थुः तिच्या. माझा समदा संसार यांत राहील कीं; आन् येवढभर डागिनचका !!'

मैना त्याचे जवळून चटदिशी उठली व 'अगबाई' म्हणून तेथें पलिकडच्या कोचावर ज्या अस्ताव्यस्त पैठण्या, शालू, चोळ्या वगैरे कपडे पडले होते ते साफसुफ करून, घडया करीत करीत त्यास म्हणाली, 'या पेटींत सगळ हिरे, मोती, माणक, जवाहिर भरलया.' एक काजळी रंगाचा शालू उचलून दोन्ही पदर धरून फडफड झाडूं लागली तों एकदम खळ् अवाज होऊन खालीं कांहीं पडलें. अवाज झाल्याबरोबर तिनें खालीं पाहिलें आणि एकदम म्हणाली, 'बाईसोहबांनीं काल पोटसी किल्ल्या लाविल्या त्या तशाच शालूच्या निऱ्यांतच राहिल्या बरका. बाईसाहेब इसरल्या बरका.' तो किल्ल्यांचा जुंवडा हातांत घेऊन त्यांतली किल्ली उजव्या हाताच्या आंगठ्यांत व तर्जनींत धरून त्यास म्हणाली, 'या तुह्मांला आतां दाखवितें.'

तो 'वरें' म्हणाला आणि कोचावरून उठून पेटीजवळ गेला. तिनें पेटी उघडल्याबरोबर आंतील तें तांबडें भडक मढविलेलें रेशमी कापड पाहून 'अरे देवा' अतें तो एकदम मोठ्यानें म्हणाला. त्याच्या मनांत ते बहुमोल अलंकार हातांत घेऊन पाहण्याचें फार आलें. त्याचे मनांत त्यांतील रत्नखचित अलंकार काढून हातांत घेऊन काय किंमत पडली असावी, हें पाहवें असें आलें. मोठा रत्नपारखी खरा !! मग त्यांतील एक रत्नकंकण उचलून हातांत घेऊन तो म्हणाला, 'मैने, असल एक जर मिळाल तर जन्माची भीक गेलीच बग !' 'हं, तेवढ देवा लवकर जीथल्या तथ.' असें घाबऱ्या घाबऱ्या भयचकित होऊन मैना म्हणाली. 'असल्या ग्वाष्टी बोलता तरी कशा !!' त्यानें तें कंकण हळूच मोठ्या जड हातानें जेथल्या तेथें ठेविलें, आणि दुसरे अलंकार पाहूं लागला.

त्या पेटीच्या चौकटीला एक पितळी आंकडा होता, त्याकडे वोट करून हें काय म्हणून त्यानें विचारलें आणि तो आंकडा सहज ओढला, ओढल्याबरोबर चटकन् ती फळी खालीं पडून एक हिरव्या मखमलीनें मढविलेला पेटीचा खण दिसूं लागला. तो पाहिल्याबरोबर एकदम तो दृष्टीस पडला म्हणून आश्चर्यानें तीस तो म्हणाला, 'अग हें बग काय तें.'

मैनानें तिकडे एकदम पाहिलें आणि म्हणाली, ' अगबाई ! मी नव्हता हा खाण पाहिला कधीं ! काय बर त्यांत हाय ?'

त्यांत कांहीं विशेष महत्त्वाचें नव्हतें. कांहीं एखादा मोत्यांचा डागिना नव्हे किंवा हिऱ्याचाही नव्हे, दुसरें कांहीं नाहीं. फक्त एक लहानसें सुवर्ण पिंपळपान एका कापडांत गुंडाळलेलें आणि अगदीं मऊ पिंवळ्या रंगाची लहानशी कुंची. ती फारच लहान होती, त्यावरून ती अगदीं लहान बारा दिवसांच्या बाळाची असावी असें वाटतें. हें पाहून मैनाबाईला फारच आश्चर्य वाटलें, आणि तोंडांतल्या तोंडांत ती हळूच म्हणाली, ' माईसाहेब या चोरखणांत नेहमीं लपवून ठेवतात तें हेंच बरका ! !' ती थोडीशी हंसली, आणि जोतिबास ' लक्षांत ठेवा अं कोठें होत ते, ' असें म्हणत म्हणत त्या दोन्हीही जिनसा तिनें आपल्या पोटकुळीं लाविल्या.

' तुझ्या इतक गाडाव मी कधींच नाहीं पाहिल. हे कशाला घेतीस ? त्यांत काय हाय !' असें जोतिबा मोठ्या आवेशानें म्हणाला.

' तुमच्या मनांत ते काकुण व्हत व्हय ? आन् मग लागलच बिन भाड्याच घर आल असत कीं, आन् मग कुटली मैना ! ! त्यापेक्षां हे लई नामी, ' असें मैनाबाई आपल्या प्रियकरास म्हणाली. अशा बहुमोल जिनसा सोडून असले हलके जिन्नसच तिनें कां बरें घेतले ? हें तिचें तिलाच ठाऊक ! !

भाग ४ था.

गणपतराव हे एक वकील होते. वकील ह्मणून लिष्टांत त्यांचें नांव होतें. वकील ह्मणून सर न्यायाधीशांच्या कोर्टांत यांचें कधीं कधीं जाणें येणें असे. वकील ह्मणून सदां डोळ्यांला चाळशी लावून नेहमीं फिरत होते. इजार तर आपली मूळचीच. परंतु वकील ह्मणून ती सोडून पाटलोण व बूट घालून चोहींकडे नेहमीं हिंडत. गंजिफा वगैरे आपले खेळ खेळावयाचेच. परंतु वकील ह्मणून ऐन दोन प्रहरीं उन्हाळ्याचे दिवसांत सुद्धां टोपी घालून चोफाळ्याचे माळांवर ब्याट घेऊन तयार. ह्या एवढ्याच गोष्टीवरून जर एखादे गृहस्थ वकील होत असले, तर आमचें कांहीं ह्मणणें नाहीं, तर मग आमचे गणपतराव खरोखरच वकील. परंतु सनद मिळाल्यापासून यांनीं कधीं कोणाचें वकीलपत्र घेतलें होतें काय? किंवा तें मिळण्याविषयीं कधीं खटपट तरी केली होती काय? किंवा तें मिळावें ह्मणून निदान इच्छा तरी? छेः नांव नाहीं, डिग्री घेऊन व सनद घेऊन आज पांच वर्षें झालीं. एक दिवस देखील नाहीं !!

ह्या गृहस्थाचें वय होतें सुमारें तिशीच्या जवळ जवळ. यांच्या स्वभावांत फ[illegible] असे. हा कधीं कशाची काळजी न करणारा. देखणा- ही चांगला [illegible]ता. हा जगदेवरावाचा भाचा. हा आपल्या बापाचा एकुलता एकच. जातीचा मराठा. मग करवीर प्रांतीं कांहीं इनामी उत्पन्न नाहीं असें कधीं तरी होईल काय? कधीं नाहीं. तर मग आमच्या गणपतरावासच कां उत्पन्न असणार नाहीं? यांचें उत्पन्न सालीना चार हजार रुपयांचें होतें. गणपतराव जरा हुशार ह्मणून वडील बारल्यावर त्यांच्या मित्रांनीं त्याला सांगितलें कीं, कसेंही करून वकील हो, ह्मणजे चांगला उत्पन्नदार आहेस, मोठ्या कुळांतला आहेस; झालीं साहेबाची मर्जी तर मिळेल सहज सरन्यायाधीशाची किंवा प्रसंगानुसार दिवाणाचीही जागा. गणपतरावांनींही विचार केला कीं, 'बरें आहे हें, डिग्री घेण्याला व सनद मिळविण्याला काय जास्ती कमी पैसे खर्चावे लागतील, व मुंबईस कांहीं दिवस राहण्यास काय खर्च येईल तेवढाच. वः! मुंबईसारख्या शहरीं राहणें वाईट कोण ह्मणेल? आणि याप्रमाणें सर्व होऊन गणपतराव करवीरीं येऊन वकील ह्मणून फिरूं लागले!

कधीं कधीं उन्हाळ्याचे दिवसांत संध्याकाळीं फारच उकाडा होऊं लागला म्हणजे किंवा तोंडांत चिरूट धरून संगीत नाटकें वाचतां वाचतां किंवा इंग्रजी "सेनसेशनल" कादंबऱ्या वाचतां वाचतां कंटाळा आला, म्हणजे नगरमंदिराच्या बागेंत जरा इकडे तिकडे फिरून एका बाजूस हिरव्यागार लगामंडपाखालीं कोटाचें "बटन" मोकळें करून स्वस्थ लोखंडी बाकावर हवा खात पाय पसरून हे पडत. आणि तेथें कोणा दुसरी वकील मंडळी अशीच हवा खाण्याला येऊन बसली असली म्हणजे तिला उद्देशून हे म्हणत, 'छे बोवा ! आज अगदीं ओव्हरवर्क (अतिशय काम). डोकें आज कसें अगदीं टर्न (फिरून) झालें आहे. क्लायन्टसनीं (पक्षकारांनीं) तर मला भंडाऊन सोडलें आहे.'

हें ऐकून खरोखर उद्योगी वकील मंडळी मोठ्यानें हंसत. हंसूं नये तर त्यांनीं काय करावें ? ते सर्व म्हणत, 'गणपतराव मोठा सालस माणूस. मन मोठें उदार. पण जरा लहरी आहे स्वारी. फार थट्टेखोर. या स्वारीचें जगांत कोणाचें जुळायाचें नाहीं. सदा तब्बेती आणि यांच्यापासून कधीं कोणाला त्रासहीपण नाहीं. मोठा रंगेल. गाणें वजावणें सदां आहेच. सतार तर बोलकी वोलतीच आहे. एकंदरींत गलहौशी खरा. यांचें असेंच चालावयाचें. आहे कशाची काळजी ? वडिलांनीं ठेविलें आहे मिळ[illegible] बरें घेतले [illegible] आहे चैन झालें.'

गणपतराव हिंवाळ्यांत बरेच दिवस निहालगडावर घालवीत. यांना शिकारीचा मोठा नाद. एक उमदा घोडा व चार शिकारी कुत्रीं नेहमीं जवळ बाळगलेलीं असत. या सर्व थाटावरून हे मोठे शिकारी असावेत, असें पाहिल्याबरोबर वाटे. परंतु घोड्यावर बसून मागें चार कुत्रीं घेऊन निहालगडचे रानांत उगीच फिरावयाचें ! कधीं कांहीं सावजाची आशा केली काय ? नांव नाहीं ! घोड्यावर बसण्याची मांड मोठी वळकट ! बसले सात आठ मैल व तेवढ्या वेळांत एखादी चिमणीबिमणी मारली कीं झाली शिकार ! कोणीकडे आमचे शिकारी राव इगळे आणि कोणीकडे आमचे गणपतराव !!

गणपतरावाची आई लहानपणींच वारल्यामुळें निहालगडासच मामाचे घरीं गणपतरावाच्या बाल्यावस्थेचे बरेच दिवस गेले होते. मामाचा लळा याला फार होता. आणि सगुणाबाई व हे लहानपणीं अगदीं एकेडिकाणीं

खेळलेले. लहानपणापासून दोघांचें एकमेकांवर जीव कीं प्राण. निहालकुवरबाईसाहेबांचें व सगुणाबाईचें चांगलेंसें जुळत नाहीं, हें याला माहीत झालें होतें. परंतु या संबंधानें यानें कधींच कांहीं विचार केला नाहीं. फार झालें तर 'सगुणा फार गरीब. सदा आनंदी पण जरा हट्टी आहे,' येवढेंच म्हणे.

आम्हीं हें लिहीत आहों याच्या अगोदर कांहीं दिवस, एके दिवशीं सकाळींच एक "पोटमन्" एक दोन कार्ड व एक पत्र व कांहीं वर्त्तमानपत्रें आणून सर्व खिडकींत टाकून चालता झाला. गणपतराव टपाल पाहूं लागले. त्यांत कार्डा त्यांच्या मित्राच्या होत्या, व पत्र होतें तें सगुणाबाईचें. ती म्हणते. 'बाबांनां आतां या वयात एका तरुण पोरीबरोबर लग्न केलें. पोरीचें कुलशील तरी पहावें कीं नाहीं! तें कांहीं नाहीं. आहे माझ्या एवढीच, उगीच कोडली रोगी पांढरी फिक्कट आहे, आणि तिला म्हणतात फार नाजूक व केतकीसारखी गोरी! केस मोठे लांब, सडक फार चांगले म्हणे! उगीच मागें लांबच लांब कांहींतरी लोळतें झालें! ही कोण हें तुम्हांला माहीत असेलच. ती आपल्या सरलःकराच्या मुलींची करवीराहून आणलेली नवीन मास्तरीण चंपाबाई' पहा! सगुणाबाईचें आपल्या सावत्र आईवरोबर पटेना म्हणून तिनें अमें तिच्या बद्दल लिहावें काय? एकमेकांचें मन शुद्ध नसलें म्हणजे असें व्हावयाचेंच. मनुष्यस्वभावच तसा आहे. हें सगुणाबाईचें पत्र गणपतरावानें चिरूट ओढीतच वाचलें, आणि आश्चर्यानें मध्येंच एक दोनदां भिंवया वर चढविल्या. कार्डा पुन्हां उलथ्या पालथ्या करून पुन्हां पाहून त्या व पत्र तेथें जवळच असलेल्या रद्दी कागदाच्या टोपलींमध्यें फेंकून दिलें. व पोपाख करून सकाळचे "मारनिंग वॉक"ला (हवा खाण्याला) निघाले.

बराच एक अर्धा तास गेल्यावर तो आपल्याशींच म्हणाला, 'तस व्हावयाचेंच. मी हें भाकीतच केलें होतें. 'ओल्ड फूल'(म्हातारा गाढव) झाला आतां अगदीं "म्याड" आतां या सावत्र आईचें आणि सगुणीचें कधीं जुळायाचें नाहीं. सदा आपला ३६ चा आंकडा!'

'तें कांहीं कां असेना. आम्हीं तेथें गेलों म्हणजे कांहीं झालें नाहीं म्हणजे पुरवलें! नाहीं तर आम्ही आपले जेवायाला बसावें आणि यांनीं इकडे मारामाऱ्या कराव्या. मग मात्र जेवणाचा बेत खासा!'

ज्या रात्रीं निहालकुवरबाईची प्रिय दासी मैना आपल्या प्रियकराला

घाडा दाखविण्यास आंत घेऊन गेली त्याच रात्रीचे दुसरे दिवशीं सकाळीं नऊ दहांचे सुमारास करवीरीं आपल्या बंगल्यांतून बाहेर पडून 'रीजंट स्ट्रीट' रस्त्याकडे जाण्याकरितां गणपतराव वळले. यांना अगोदर काम करायाला थोडेंच पाहिजे! त्यांत त्यांच्या दुर्दैवानें त्यांच्या मामाकडून एक हुंडी आली होती. त्याचे रुपये आणण्याकरितां 'रीजंट स्ट्रीट' मधील गोपाळनाईक कुबेर यांचे दुकानाकडे यांस जाणें भाग पडलें.

दुकानांत जाऊन हुंडी पटवून रुपये घेऊन काठी फिरवीत फिरवीत गुजरीच्या तोंडाशीं येऊन माडग्याची गाडी करून घरीं जावें या हेतूनें तेथेंच चिरूट ओढीत गाडीची वाट पहात उभे राहिले; इतक्यांत शेजारच्याच डाव्या हाताच्या बोळांतून एक तरुण गृहस्थ आला, व त्यानें गणपतरावाच्या पाठीवर 'अरे ये' म्हणून चापट मारली. गणपतराव चट्दिशीं मागें तोंड फिरवून म्हणाले, 'अरे गृहस्था, जरा पहात जा. एखाद्याला उंचकाळून पाडशील कीं, कां,? इतकें कां?'

या परकी गृहस्थानें त्यांचे पाठीवरचा हात काढला व त्याच्याकडे टक लावून पाहण्यास आरंभ केला.

जरा थांबून आश्चर्यानें तो परकी गृहस्थ म्हणाला, 'मित्रा, कालरात्रींच येथें आलों आणि म्हटलें तुला भेटायाला जावें तों—'

'मी तुम्हांस कोठें तरी पाहिलें आहे खरें. परंतु आतां नाहीं येत लक्षांत. कोठें बरें? तुमचें नांव—' असें अर्धेंच जरा घोंटाळून त्या परकी गृहस्थाकडे 'आपण आतां आपलें नांव सांगाच,' अशा तऱ्हेच्या मुद्रेनें पाहून गणपतराव म्हणाले.

तो परकी गृहस्थ म्हणाला, 'तर मग तुम्ही नारायणराव चव्हाणाला विसरलां म्हणावयाचें.'

'नारायणराव चव्हाण' हीं अक्षरें ऐकिल्याबरोबर गणपतराव कधीं इतक्या जोरानें बोलायाचे नाहींत, ते जोरानें म्हणालें. 'छेः असें कोठें झालें आहे कीं काय? ओ! व्हेरी ह्यापी, व्हेरी ह्यापी (फार आनंदी फार आनंदी) टु सी यू!' आणि एक हात त्यांचे खांद्यावर ठेवून पुन्हां म्हणाले, 'बरें नारायणराव, कसें काय बोवा सांगा सगळें एकदां अगोदर'

नारायणराव चव्हाणांनीं सर्व हकीकत सांगितली. कुमुदबांधव आगबोटीवर बाई साकरबाईला जी यांनीं हकीकत सांगितली तीच ही.

मग मोठ्या उत्सुकतेनें ते म्हणाले, ' ह्या पहा मजजवळ कांहीं हुंड्या आहेत. यांचे रुपये आणावयाचे आहेत. त्या—नाइकाचे दुकानीं गेलें पाहिजे. त्याची माझी आहे थोडी पहिली पुसट पुसट ओळख. '

गणपतराव म्हणाले, ' अरे, मी आतां तेथूनच आलों. चल जाऊं आणि हुंड्या पटवूं. त्याला किती उशीर आहे, पांच मिनिटांत. '

पाव तासाचे आंत ते दोघे नाइकाचे दुकानीं जाऊन परत पुन्हां गुजरीच्या तोंडाशीं आल्यावर गणपतराव म्हणाले, ' चला जाऊं—छे ' टी-हौस ' मध्यें आणि जरा सकाळचे वेळीं गरम गरम. व्हेरी कोल्ड टुडे. (फारच थंड आज) आणि मग बसूं ' चॉट ' करीत. खरेंच तूं गेल्यावर बांवेस मला फार लोनली (उदास) झालें. '

नारायo—छेः ते कांहीं नाहीं. अगोदर आमच्या पापमोचन होटेल (खाणावळ) मध्यें जावयाचें. घरचें पत्र तेथेंच येईल. तोच पत्ता लिहिला आहे. तूं येथें आहेस हें मला माहित नाहीं. मी समजलों मुंबईसच आहेस. नाहीं तर तुझाच पत्ता लिहिला असता.

लागलींच एक गाडी केली व ते बसून निघाले. वाटेनें सगळ्या गोष्टी नारायणरावाच्याच. दुसऱ्या कसल्या गोष्टी ? ' बस. महाराजांच्या न्यू प्यालेस (नवा राजवाडा) जवळच बंगला नदीचे कांठीं बांधावयाचा ! जाली बोट (क्रीडा नौका) ठेवावयाची ! मी, तूं व ती मिळून संध्याकाळीं जावयाचें फिरावयाला. एक गाडी फक्कड ! चैन अगदीं. दग्दग् बस्स !'

वाटेंत गाडीवाल्यास पापमोचन होटेल अजून किती लांब आहे, म्हणून चार पांच वेळां विचारिलें. अखेर ते एका बंगल्यापाशीं आले. गाडीवाल्यानें गाडी उभी केली व ' हं उतरा ' म्हणाला. ' ही ती होटेल. '

मागें शिलेदार असतांना नारायणरावजी पुष्कळ वेळां येथें आले होते. तरी याचा तो आतां परदेशी चालीचा पोषाख पाहून तेथील चाकरमाणसें याच्याकडे ओळख न पटल्यानें वाकड्या नजरेनें पाहू लागलीं तरीपण रीतीप्रमाणें सर्वांनीं यास सलाम केला व काय हुकूम म्हणून विचारिलें.

नारायo—कांहीं नाहीं. फक्त आम्हां दोघांकरितां रॉजर्स सोडावॉटर व तुमचें कांहीं गरम होण्याचें तांबडें पाणी आणि पेटींत नारायणराव चव्हाण नांवाचें पत्र आहे का पहा म्हणजे झालें.

एकानें सोडावाटरच्या बाटल्या व तांबड्या पाण्याच्या बाटल्या व ग्लास आणून ठेविलें आणि 'पत्र नाय' असें समोरच्या टेबलावरचा धुरळा झाडीत निष्काळजीपणानें झटलें. हें ऐकून नारायणरावास फार वाईट वाटलें व एकदम चेहरा उतरला. मग पुन्हां ते त्या नोकराला म्हणाले, 'तुला नीट समजलें नाहीं पुर्तें ऐकून घे.नारायणराव चव्हाण बरें. पहा जा.' नोकरानें जरा हिरमुसल्यासारखें करून बाहेर जाऊन पांच मिनिटांच्या आंतच परत येऊन झटलें, 'नाय या नांवच नाय. एक घाटगे, एक गाईकवाड व एक माधवराव यांचेंच पत्र. दुसर नाय.'

आमचा तरुण गृहस्थ सोडावाटर वगैरे आणलेले पेय पदार्थ पिऊन त्या खुर्चीवरून उठून पलीकडच्या आराम खुर्चीवर कपाळाला हात लावून स्वस्थ उदासवृत्तीनें पडला. याची फारच निराशा झाली, असें गणतराला सहज दिसून आलें.

नंतर बराच वेळ गेल्यावर तेथें जवळच एका टेबलावर वर्तमानपत्राचा भारका पडला होता; त्यांतील सहज हाताला येईल तें एक वर्तमानपत्र त्यानें हातांत घेतलें, आणि त्या पत्राच्या मुखपत्रांतील मजकूर उगीच सहज तो वाचूं लागला. हें पत्र ज्ञानमंदिर होय. हा कालचाच अगदीं ताजा अंक; या पत्रांतील एकाच प्याऱ्याकडे हा कितीवेळ एकसारखा पहात होता, हें आमच्यानें सांगवत नाहीं. परंतु बराच वेळ गेल्यावर अगदीं रडवें तोंड करून तें पत्र त्यानें गणपतराकडे फेंकलें आणि गळा दाटून येऊन झणाला, 'हें पहा दुसऱ्या कालमांतील मृत्यु या सरदारांतील "तारीख २४ रोजीं गगनपुरास आनंदीबाई, नारायणराव चव्हाणांची बायको"—पुढें वाचवेना व आम्हालाही लिहवेना.

भाग ५ वा.

होय. अरेरे! "आनंदीबाई, नारायणराव चव्हाण यांचें कुटुंब उमर वर्षें बावीस" अशींच तीं हृदयविदारक अक्षरें होतीं खरेंच !!

ज्या वेळेस आमच्या नारायणरावांनीं कुमुदबांधव आगबोटीवर बाई साकरबाईस सांगितलें कीं, तिच्याविषयीं जर मीं कांहीं वाईटसाईट ऐकेन, तर माझा प्राण क्षणमात्र राहणार नाहीं, त्या वेळेस ते खरोखरच अगदीं मनापासून व दृढ निश्चयानें बोलले होते; पण आतां प्रत्यक्ष मृत्युवार्ता कानीं येते ! यापेक्षां ती आणखी काय अमंगल बातमी असणार!! आणि पहा ! असें असूनही, नारायणराव या वेळेस अगदीं निस्तेज होऊन, तोंड गयावया करून, डोळ्यांची पापणी देखील हालत नाहीं असे केवळ पाषाणवत् होऊन आपल्या मित्राकडे पहात आहेत ! तो काय करील बिचारा ! त्या दोन ओळी वाचून तो देखील अगदीं भांबावून गेला !!

ही आकाशाची कुऱ्हाड एकदम त्याच्यावर येऊन पडली ! मग काय एक घाव आणि दोन तुकडे !! आपण वाचलें काय आणि झालें काय हें त्याचें त्यासच सुचेना. अक्षरें समोर दिसत; परंतु काय लिहिलें आहे याचा उमजच त्यास पडेना !!

नंतर त्याच्या मनाची ही भ्रामक स्थिति थोडा वेळ नाहींशी होई व पुन्हां पूर्ववत् त्याचें मन भ्रमिष्ट होई. अशी कांहीं विलक्षण स्थिति चालली होती.

त्या रस्त्यावरच्या पांशुसंयोगानें मळलेली तीं 'पापमोचन हेटेल' च्या खिडक्यांचीं तावदानें, कांहीं ठिकाणीं फाडलेले व कांहीं ठिकाणीं रंग गेल्यामुळें पांढरे झालेले, ते तांबडे अलवानी पडदे, तो पलीकडे "बांबे ग्यॉझिट" वाचीत बसलेला म्हातारा टकल्या, टेबल साफसूफ करितांना पायांतील चढाव कर् कर् वाजवीत इकडे तिकडे फिरणारा तो दाढविला नौकर, ते पलीकडचें सोडावाटर लेमोनेटच्या बाटल्यांनीं भरलेलें, व वेळोवेळीं दार उघडतांना कर् आवाज करणारें तें भकवी कपाट, ह्या व दुसऱ्या अनेक तेथील वस्तूंकडे तो अगदीं दीनमुद्रेनें पहूं लागला !! त्याला असें वाटे कीं ह्या सर्व जिनसा अगदीं

पर्वताएवढ्या मोठ्या झाल्या आहेत, व पुन्हां हें सर्व नाहींसें होऊन कांहीं तरी काळें चिन्ह त्या जागीं डोळ्यांपुढें उभें आहे. तसेंच पांच पन्नास न्हाव्यांचा घर्र घर्र आवाज कानीं पडत आहे, पुन्हां वाटे जणूं काय कोणी आपल्या कानांशीं पांच पन्नास घंटा एकदम वाजवीत आहे, किंवा पांच सहा कापडाच्या गिरणींतील चात्यांचा आवाज एकसमुच्चयेंकरून आपले कानीं सरर्र्र करून पडत आहे ! मध्येंच कोणी तरी, किंवा कांहीं तरी, जमिनीवर धाड्दिशीं पडल्यासारखें वाटे. अशी कांहीं त्याच्या मनाची भ्रामक स्थिति झाली होती.

त्याच दिवशीं संध्याकाळीं थंडीचे वेळीं जिकडे तिकडे अगदीं शांत आहे व ती शांतता रस्त्यांतून मधून मधून जाणाऱ्या येणाऱ्या गाडयांच्या धाकांच्या घडघड अवाजानेंच जरा मध्येंच मोडत आहे, अशा एका रस्त्यावरच्या गृहांत तो दुःखानें विगलित होऊन खिडकीजवळच्या एका लोखंडी पलंगावर अनवधान चित्तानें पडला होता. फक्त मधून मधून दुःखोद्गाराचे श्वासोच्छ्वास निघत होते. ते जणूंकाय त्याच्या प्रियेच्या दहनप्रसंगीं निघणाऱ्या धूमाचे दर्शकत्व होय असें वाटे ! त्याचा मित्र गणपतराव त्याचे जवळच आपला चिरूट ओढीत बसला होता.

मग गणपतरावानें हळूच विचारलें, 'काय नारायणराव, आमच्या या ओढण्यानें तुह्मांला त्रास तर होत नाहीं ना ?'

नारायण०—नाहीं.

कांहीं वेळपर्यंत तो तसाच पलंगावर तेथें खिडकींत टांगलेल्या पिंजऱ्यांतील पक्ष्याकडे पहात पडला. या वेळेस एक मैना फार आनंदानें साद घालीत होती.

'कायहो ह्या पांखरापासून तुह्मांला त्रास होतो होय ? पिंजरे येथून काढून त्या दुसऱ्या खोलींत नेऊन अडकाऊं काय ? होय नारायणराव ?' असें गणपतरावांनीं झटलें.

'नको नको, ह्या वेळेला ही मैना फार छान गात आहे. राहूं दे झाल्या.'

आपल्या चिरुटाची राख झाडून तिचा तो निःसत्व भाग तेथेंच देऊन पलंगावरून उठून पलिकडच्या खोलींत जाऊन लागलींच एक जाडा पेला

घेऊन येऊन नारायणरावाच्या उशाशीं एक "ट्रीपॉड" होतें त्यावर ठेऊन गणपतराव म्हणाले, 'एवढा चहा घ्या म्हणजे तुम्हांला जरा बरें वाटेल.'

आमच्या या दुर्दैवी व दुःखानें विव्हल झालेल्या प्राण्यानें प्रथमतः खोलींत चोहोंकडे फार उदासीनतेनें पाहिलें आणि मग आपल्या मित्राकडे पाहून 'अरेरे' 'शिवाशिव' असें म्हणून 'गणपतराव, आपण कोठें आहोंत हो ?' असें संकटानें म्हटलें !

'नारायणराव असें काय ? बावड्या वरचा माझा हा बंगला नव्हे कां ! तुमचें कांहीं सध्यां येथें घर नाहीं. तेव्हां येथें आहां तोंपर्यंत माझ्या येथेंच रहा म्हणजे झालें.' गाडींत घालून मी तुम्हला येथें आणलें हें नाहीं कां तुमच्या ध्यानांत ?'

एक दोन वेळां आपल्या कपाळावर हात फिरवून जरा तुटक तुटक पण फार सावकाश ते म्हणाले, 'कायरे बुवा, तें सकाळचें वर्तमानपत्र ! एका निमिषांत त्यानें मला जगांतून उठविलें. माझा प्रफुल्लित झालेला आशावृक्ष एका क्षणांत दग्ध करून टाकला ! !'

'हं ! आतां तें नका मनांत आणूं. थोडा चहा घ्या पहिल्यानें.'

मोठ्या कष्टानें उठून बसून दीनमुद्रेनें आपल्या मित्राकडे पाहून 'घेतों बाबा ! तें तर आहेच ! ! झालं ! आटपलें सर्व ! उजाडलें ! गेली बिचारी ! मातीला माती मिळाली ! आतां पन्हां कसची दृष्टीस पडते ! मी गेलों त्या दिवशींच ती मला मेली ! तेवढीच भेट ! काय ! या जगांत आहे म्हणून कधीं तरी भेटीची आशा ! सर्व खुंटलें ! अगदीं किरे लहान वय ! आतां या लहान बाळाला काय करू ! शिव शिव !' असें म्हणून त्याच्या दुःखसागरास भरतें आलें, तें नेत्रोदकांनीं बाहेर पडलें !

गणप०—नारायणराव, मला वाटतें आज सकाळीं आपण जें वर्तमानपत्रांत नांव वाचलें, तें दुसरें कोणाचें तरी असावें. नांवासारखीं नांवें पुष्कळ असतात. आनंदीबाई नांव पुष्कळांचें असतें.

पुरुषोत्तम०—छेः छेः असें कसें होईल हो ! तिचें वय हें वय सारखें जुळत. तं असो, पण पुढें 'नारायणराव चव्हाण' असें आहे, हें नाहीं कां तुमच्या लक्षांत ?

गणप०—पुरती चौकशी केल्याखेरीज काय बोलावें? बातमीदार कांहीं तरी पाठवितात, आणि हे कांहींतरी लिहितात झालें. मुळांत असतें एक आणि लिहितात भलतेंच. कदाचित् ही छापणारांचीही चूक असेल. असेल मुळांत चवथरे आणि छापलें आहे चव्हाण.'

याप्रमाणें आणखी कांहीं गणपतराव बोलणार तोंच 'छेः छेः असें कोठें झालें आहे काय? तीच ती! फुटलें माझें नशिब!' असें म्हणून नारायणराव एकदम पलंगावरून उठून थेट खोलीच्या दाराकडे निघाले. 'अरे! चालला कोठें!' म्हणून गणपतरावांनीं त्यांचा हात धरून त्यास विचारिलें.

'कोठें म्हणजे! गगनपुरीस! माझ्या बाळाला तरी पाहून येतों!' 'छेः आतां रात्रीचे! आतां कोठें "ट्रेन" आहे? सकाळीं नवाचे गाडीला तुम्हीं आम्हीं मिळूनच जाऊं.' असें म्हणून गणपतरावांनीं नारायणरावाच्या हाताला धरून आणून पलंगावर त्यांस पुन्हां बसविलें.

नारायणराव दुःखानें अगदीं विव्हळ होऊन, ग्लानि येऊन पलंगावर पडला; मग कांहीं वेळानें त्याचा थोडा डोळा लागला, अशा कठिण प्रसंगीं शांत झोंप कोठली येते? स्वप्नांनींही पग तेवढयाच वेळांत संधी साधली. स्वप्नें दुसरीं कसलीं? हींच. आपण गगनपुरीस गेलों. आपली बायको जिवंत आहे. कुशल आहे. परंतु तोंडावर पहिल्यासारखा आतां टवटवीतपणा नाहीं; उतार वय झालें आहे. केंस पांढरे होऊं लागले आहेत, आणि आपला मुलगा चांगला धिप्पाड मोठा झाला आहे!

दुसरे दिवशीं सकाळीं नऊ वाजतां नारायणराव "सेकंड क्लासांत" गणपतरावाच्या समोरच्या बांकावर पडले होते. गाडी गगनपुराकडे 'माळरानांतून फार सपाटयानें चालली होती. गगनपुरास सुमारें तिसऱ्याप्रहरीं ते येऊन पोंहोंचले.

टिकीट देऊन कंपौंडाच्या बाहेर आल्यावर गणपतराव म्हणाले, 'नारायणराव, कसें काय बोवा आतां? आपल्याला पाहिजे त्या माणसाचा येथें शोध कसा लागावा?'

हें ऐकून नारायणरावाच्या चेहऱ्यावर निराशेचें विशेष चिन्ह दिसूं लागलें. आमचा एवढा मोठा दिलदार शिलेदार या प्रसंगीं लहान मुलाप्रमाणें

दुःखानें अगदीं व्याप्त होऊन घोटाळ्यांत पडला. आमचे गणपतराव तर सदा रंगेल व निर्व्यापारासक्त ! त्यांना दगदग कशी ती या जन्मांत ठाऊक नाहीं; पण आपल्या प्रिय मित्राकरितां तसदी सोसण्यास ते तयार झाले, व मित्रप्रेमानें प्रोत्साहन मिळून अशा दुःखद प्रसंगीं मित्रसाह्याकरितां त्यांनीं कंबर बांधिली.

गणप०—हें पहा, नारायणराव, आतां प्रथम आपण पोस्ट-आफिसांत जाऊं व तेथें शोध करूं ह्मणजे घराचा पत्ता तेव्हांच लागेल. होय कीं नाहीं ? तुमच्या सासऱ्याचें नांव काय वरें?

नारायण०—त्यांचें नांव तुकोजीराव शिंदे, तिला कांहीं एकटीला येथें पाठविलें नसेल. तेही आलेच असतील.

पुढें कांहीं विशेष भाषण न होतां हें मित्रद्वय पोस्ट-ऑफिसाकडे निघालें. खेडेगांवांत निराळें पोस्ट-ऑफिस कोठलें व पोस्टमास्तर तरी कोठला. शालागृहच पोस्ट-ऑफिस व शाळा-मास्तरच पोस्टमास्तर. तेथेंच शाला-गृहाच्या पडवीला पोस्टाची तांबडी पेटी लोंबत होती त्यावरूनच येथें पोस्ट-आफिस आहे असें कळे. त्या दिवशीं सुटी असल्यामुळें शाळा बंद होती; तेव्हां पोस्टमास्तराची भेट कोठून होणार ? मग आतां काय करावें ह्मणून गणपतराव फार पंचायतींत पडले; परंतु जास्ती कमी विचार करण्यास फुरसत नाहीं, असें मनांत आणून ते दोघे पुढें निघाले. अजमासें वीस पंचवीस हात रस्ता क्रमिल्यावर त्यांचे नजरेस एक इमारत पडली. या इमारतीच्या उघड्या मैदानांत जोत्याला लागून एक आगटी होती तिच्या जवळ कांहीं वेसकर, रामोशी, कणा घातलेले घोंगडें पांघरून बसले होते. कांहीं गांवांतील ठळक ठळक मराठे मंडळी, तंबाकू ओढीत, व ती खाऊन पिचकाऱ्या मारीत सोप्यावर पसरलेल्या फाटक्या, व शाईच्या डागानें विशेष काळे झालेल्या गांवखर्चांतून विकत घेतलेल्या, तरटावर पीकपाण्यासंबंधीं चर्चा करीत बसले होते. तेथें जवळच एक कृष्णवर्ण गृहस्थ आपल्या वर्णाशीं साम्यता पावणारे दंड घातलेलें दुहेरी धोतर नेसून रोजकीर्द लिहीत बसला होता. याच्या या लिहिण्याच्या धंद्यावरूनच हा ब्राह्मण असावा, असें मनांत येई. ह्या लोकांच्या चेहऱ्यावर सतेजता दिसत होती व शरीरबांध्यानेंही हे सदृढ दिसत. यावरून येथील लोक खाऊन पि-

ऊन त्यांगले सुखी व कष्टाळू असावेत, असें पाहणारास सहज वाटे. ही इमारत ह्या गांवची चावडी होय असें वरच्या ह्या सर्व चिन्हांवरून वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. येथें कांहीं वार्ता लागेल ह्मणून जवळ जाऊन त्यांपैकीं एकास गणपतरावांनीं विचारिलें कीं, येथें कोणी तुकोजीराव शिंदे या नांवाचे एक गृहस्थ येऊन राहिले आहेत काय ? या प्रश्नास त्या मंडळींतून लौकर उत्तर मिळालें नाहीं; मग त्यांपैकीं एकजण, आपल्या मित्रमंडळीकडे साशंक मुद्रेनें पाहून पुढें होऊन, असें ह्मणाला, ' होय, आहेत खरे. ते तिकडचे शिलेदार आहेतना ? येथें त्या वरल्या आळींत राहतात. येथें आपल्या मुलीला औषध देण्याला आले तेच कीं नाहीं ? ती त्यांची आजारी मुलगी परवां मेली ?'

' तुकाजीराव शिंदे ' आणि ' त्यांची मुलगी मेली ' हीं अक्षरें कानीं पडतांच अवशेष राहिलेलें नारायणरावाचें धैर्य नाहींसें झालें. ते, तेथेंच पायऱ्यावर दुःखानें मोठा श्वासोच्छ्वास टाकून, मटकन् खालीं बसले. ही वार्त्ता ऐकून त्यांची कंबरच खचली ! ' आतां काय ? झालीं खात्री. जें ऐकावयाचें होतें तें ऐकिलें.'

त्यांची ही शोकाकुल वृत्ति पाहून चावडींतील मंडळी एकमेकाकडे विशेष संभ्रमानें पाहूं लागली.

गणपतराव त्या गृहस्थास ह्मणाले, ' कृपा करून तेवढें त्यांचें घर आम्हांला दाखवितां काय ?'

' चला मजबरोबर, ' असें ह्मणून त्यांपैकीं एकजण, उठून पेठेंतून पश्चिमेच्या रस्त्यानें त्यांस नेऊन, एका घरापुढें उभें राहून, हेंच त्यांचें घर ह्मणून बोटानें दाखवून परतला.

तेथें, त्या दारांत बसलेल्या एका गड्यास ' तुकोजीराव आहेत का घरांत ? ' ह्मणून गणपतरावांनीं विचारिलें.

गडी—नाहीं. ते आतांच आपल्या नातवाला घेऊन समुद्रावर फिरायला गेले. आपण आंत या. आंत दुसरे कोणी पुरुष नाहींत. एक मुलाला संभाळायला ठेवलेली बाई आहे. बसा तिथें सोप्यावर. येतील ते आतां लवकरच.

गणपतराव आंत गेले. त्यांचे मागोमाग नारायणरावही गेले. अंगणांतून सोप्यावर गेले; तेथें मुलाच्या खेळावयाच्या मोडक्या तुटक्या वस्तु

अस्ताव्यस्त पडल्या होत्या, तेथें पलिकडेच एक पानसुपारीचें तबक व तस्त होतें. जवळच्याच एका कोपऱ्यांत एक चिलीम व जळकी तंबाकू पडली होती. त्याची मधून मधून अनभ्यस्त नाकास घाण येत होती.

ते दोघे जेथें सोप्यावर बसले होते, तेथून समोरच उजव्या बाजूला एक खोलीचें दार दिसत होतें. या खोलीला दोन खिडक्या उजेडाकरितां राखिल्या होत्या, त्या उघड्याच होत्या. दारही उघडेंच होतें, म्हणून आंतील सामान नीट दिसत होतें. एक पलंग दिसत होता, कांहीं पेट्या बंद केलेल्या व कांहीं उघड्या दिसत होत्या; व याशिवाय बायकांचें कांहीं विशिष्ट सामान अस्ताव्यस्त पडलें होतें.

सोप्यावर त्यांच्या समोर एका खिळ्याला एक "कॅबिनेट साइज"ची तसबीर लटकत होती. तिच्याकडे सहज लक्ष जाऊन नारायणराव दुःखोद्गारांनीं म्हणाले, 'पाहिलीत कां ती तसबीर?'

शिरोळास शिलेदार असतांना काढलेली त्यांचीच ही तसबीर. किती तरी तसविरींत त्यांचे चेहेऱ्यावर आनंद दिसत आहे!! ती पहा त्यांची प्रिया स्मितवदन करून, प्रेमानें वांकडया नजरेनें हळूच त्यांच्याकडे पहात त्यांच्या डाव्या बाजूला उभी आहे! तो पहा, मागचें बाजूला एक उमदा घोडा दिसतो, तो देखील त्यांचाच.

या प्रसंगीं कांहीं बोलावें तर यांचा शोकाग्नि अधिकच भडकणार, असें जाणून, गणपतराव कांहींच बोलले नाहींत. तें त्यांचें बोलणें ऐकूं न आल्यासारखें करून ते अंगणाकडे उगीच पाहूं लागले.

नारायणराव इकडे तिकडे मुलाच्या खेळावयाच्या जिनसा पडल्या होत्या त्या घेऊन उगीच पहात बसला. बराच वेळ गेल्यावर तो एकदम गणपतरावास म्हणाला, 'अहो, त्या बाईला तरी आंतून हाक मारा. तिला कांहीं विचारूं. तुकोजीराव केव्हां येतात कोण जाणे?' गणपतरावांनीं त्या बाईस हाक मारिली. त्या बाईला पहातांच नारायणराव मोठा हुंदका येऊन रडूं लागला; त्यायोगें त्याच्यानें पुढें कांहींच बोलवेना.

ही बाई या गांवचीच राहणारी. मुळची ही खाऊनपिऊन बरी होती; परंतु म्हातारपणीं एकच मुलगा, तो मेल्यावर फार पंचाइत पडली. म्हा गांवची हवा चांगली असल्यानें पुष्कळ रोगी येथें हवा बदलण्यास येत. इचें घर रिकामेंच, तें ती नेहमीं भाड्यानें लोकांस देई. ही म्हातारी फार

चाचाळ होती. झातारपणचा स्वभावच तसा. गणपतरावानें विचारल्यावर तिनें आनंदीबाईच्या मरणाची सर्व हकीकत सांगितली, व अखेर ती झणाली, 'आल्यापासून या खोलींतच ती निजत होती, व तेथेंच तिचा अंत झाला. चला तुझाला खोली दाखवितें.' ती पुढें व तिच्या मागें गणपतराव व नारायणराव ल्या खोलींत गेले. खोलींत गेल्यावरोबर तो आपला जुना पलंग, कांहीं दिवस करवीरीं असतांना हौसेनें घेतलेल्या कांहीं मौजेच्या जिनसा, तिची ती पलिकडे अस्ताव्यस्त पडलेली फणेराची पेटी, तेथेंच एका पेटीवर व्यवस्थित पडलेली स्त्रीगीतमाला, व दुसरीं कांहीं बुकें, तिचा तो पलीकडे पडलेला वेणींतला बडोदी मोत्यांचा गजरा, हें पाहून आमच्या हतभागी नारायणरावास रडूं अवरेना. त्याचें तें रडणें पाहून ती झातारी झणते, 'यांचें तिचें कांहीं नातें आहे काय? बिचारी आली ती आठ दिवसांनच पार! अगदीं घाईला आली होती!!'

'कांहीं नातें आहे,' हें ऐकतांच नारायणरावाला जास्तीच हुंदका आला, तो कांहीं केल्या आवरेना!

गणप०—'होय बाई, यांची ती बायको.' 'काय! लहान पोराला आणि तिला सोडून पळून गेले होते नाहीं कां? काय बाई तरी काळीज! एकाएकी कोणाला न सांगतां पोराला व तिला सोडून पळून गेले झणून तुकोजीराव परवांच मला सांगत होते. खरेंच त्या वेळेला तुकोजीरावाच्या डोळ्यांचें पाणी कसें तें खळलें नाहीं हो!!' असें ती झातारी मोठ्या कळवळ्यानें झणाली.

रडत रडतच नारायणराव झणाला, 'नाहीं हो मी तिला सोडून पळून नाहीं गेलों!' आणि मग त्यांनें आपली साडेतीन वर्षांची हकीकत सांगितली. पुन्हां कांहीं वेळ थांबून 'त्या-त्या-वेळेला कांहीं मजविषयीं बोलली काय' असें तुटक तुटक, गळा दाटून येऊन, नारायणराव झणाला.

झातारी.—कांहीं नाहीं. अगदीं लहान मुलाप्रमाणें गुपचुप. येथें आल्यापासून ती कधीं बोलतच नसे. एखादा दुसरा शब्द झणजे फार झालें. परंतु अखेरच्या दिवशीं तर ओळखही गेली! आपल्या पोटच्या पोराची देखील ओळख गेली!! मग कांहीं वेळानें पुन्हां बडबडायाला लागली. दुसर कांहीं नाहीं. 'आई कोठें आहे? केव्हां येईल? ये. बस. मी कोठें आलें. बोलाव आईला. झालें, हेंच.'

नारायण०—तिची आई अगदीं लहानपणींच मेली होती. तिची आठवण तिला झाली! आणि माझी अगदींच नाहीं!!

पुढें त्याच्यानें बोलेना. त्याच्या शोकसागरास विशेष भरती आली. त्याचा हा शोक पाहुन ती म्हतारीही रडूं लागली. अगोदरच कोंवळ्या मनाची स्त्रीजात, त्यांत पुत्रवियोगाच्या दुःखानें होरपळलेली, मग दुसऱ्याचें दुःख पाहून इच्या डोळ्याला पाणी आलें यांत विशेष तें काय?

नाकडोळे पुसून ती म्हातारी म्हणाली, 'आतां कां रडतोस बाबा! तेव्हां तुला दया आली नाहीं आणि आतां शोक करून काय उपयोग? इतकी तुझी खरी प्रीति होती, तर तिला सोडून पळून कसें जाववलें बाबा! बरें गेलास तर तिच्या पोटापाण्याची तरी कांहीं व्यवस्था करायाची. तिकडून कांहीं तरी खर्चायाला पाठवावयाचें होतेंस? निदान खुशालीचें पत्र तरी? तें असो आतां. तिच्या स्मशानभूमीवर तुकोजीरावांनीं तेथें छत्री बांधण्याचें काम सुरू केलें आहे. पाहिजे तर पाहून ये जा बाबा. हा गडी ती जागा दाखवील.

'बरें आहे' म्हणून तो व गणपतराव त्या गड्याबरोबर बाहेर पडले. गांवाबाहेर दक्षिण दिशेला एका ओसाड मैदानांत जेथें जागोजाग राखेचे ढीग व जळालेली जमीन दिसत आहे! मृण्मय पात्राचेतुकडे जागोजाग पडले आहेत! अशा ठिकाणीं एका जळालेल्या भूमीच्या तुकड्याजवळ ते जाऊन उभे राहिले. हा सर्व देखावा पाहून नारायणरावाला किती दुःख झालें असेल याची कल्पना करणें वाचकांवरच सोपविणें फार बरें. तेथें दगड चुना वगैरे छत्री बांधण्याचें साहित्य येऊन पडलें होतें.

अरेरे!! जिच्याकरितां नारायणराव चिंतांत असतांना रात्रंदिवस भ्रम करण्यांत गढून गेला होता! जिचें चिंतन तो रात्रंदिवस करित असे, जिला भेटावयाला जाण्याची केवढी तरी उत्कंठा! जिच्या गाढ प्रेमालिंगनाची केवढी तरी आशा! तिच्या आज स्मशानभूमीस पहाण्याचें याच्या नशिबीं यावें ना!! एकंदरींत दैवाची गति विलक्षण खरी! शोकभारानें अगदीं थकून जाऊन जेमतेम करीत, मंद पावले टाकीत, हे दोघें परत आले. मग नारायणरावानें गणपतरावास सांगितलें कीं येथें दगडावर लेख खोदणारा कोणी

मिळतो कां तें शोध करून पहा म्हणजे छत्रीवर प्रेमचिन्ह म्हणून एक लेख तरी नसवूं.

गणपतरावांनीं त्या गडग्याच्या मदतीनें तसा एक पाथरवट हुडकून काढिला; आणि त्यास खालील मजकूर खोदण्यास नारायणरावांनीं सांगितलें.

महासाध्वी, पतिप्रेमासक्ता,

आनंददायिनी, सौभाग्यवती आनंदीबाई

नारायणराव चव्हाण यांची

प्रियभार्या.

मृत्युकाल—वय. २२ वर्षें.

भाग ६ वा.

मागील भागांत वर्णन केल्याप्रमाणें नारायणराव दुःखोदधींत निमग्न होऊन आपल्या सासऱ्याची मार्गप्रतीक्षा करीत आपल्या मित्रासह तेथें सोप्यावर पुष्कळ वेळ बसले; पण अजून तुकोजीराव येत नाहींत, असें पाहून ते आपल्या जिवलग मित्रास ह्मणाले, 'चला, येथें बसल्यापेक्षां समुद्रावरच जाऊं व तेथें त्यांचा शोध करूं.' या सूचनेस गणपतरावाचा रुकार मिळून ते दोघे समुद्राकडे गेले.

तेथें तुकोजीराव एका लहानशा दगडाच्या राशिवर डोळ्याला चष्मा लावून कसलेंसें एक पुस्तक वाचीत बसले होते. त्यांनीं तोंडांत तंबाकूचा बार भरला होता. त्याची पिचकारी मारण्याकरितांच फक्त, यांची एकाग्र दृष्टि मधून मधून पुस्तकापासून बाजूला होई. तेथें जवळच पलीकडे एक लहान मुलगा हातांत एक काटकुटी घेऊन वाळूंत उकरतां उकरतां मध्येंच कांहीं गारगोट्या व शिंपा गोळा करून खिशांत भरीत होता.

मुलाची ती फाटकी टोपी व फाटकें तुटकें मळकें शालनाम्याचें अंगडें पाहून नारायणरावाच्या पोटांत एकदम भडभडून आलें.

नारायणरावाच्या तोंडचीं तुकोजीराव ही अक्षरें कानीं पडतात तों वृद्ध हतांतील पुस्तक बाजूला ठेऊन चटकन् उठून उभा राहिला. त्याचे केश पांढरे झाले होते व त्यांत किंचित् पिंवळी झांक मारीत होती. त्याचें नाक राघूच्या चोंचीसारखें बाकदार होतें. डोळे काळेभोर असून मोठे होते. पण झातारपणामुळें ते आतां खोल गेले होते; तथापि त्यांतील चांचल्यवृत्तीचें तेज पूर्णपणें दिसत होतें. त्यांच्या चेहऱ्यावरून तो फार चंचल स्वभावाचा असावा असें वाटे. त्यांचा पोशाख मळकाच पण सरदारीबाण्याचा होता. हातांत धरायाचें रानचिव्याचें सोडगें तेथें त्याच्या शेजारीं पडलें होतें.

जवळ जाऊन मोठ्या गहिंवर येऊन 'शिव शिव! माझी ओळख पटत नाहीं काय? मला विसरला वाटतें', असें नारायणराव म्हणाले.

नारायणरावास पाहतांच तुकोजीरावाच्या चेहऱ्यावर भय, आश्चर्य, व खेद ह्या मनोविकारांचें एकदम स्वच्छ प्रतिबिंब दिसूं लागलें.

तुकोजी०—(जरा घोंटाळल्यासारखें करून) नाहीं बाबा. खरोखरच मीं पहिल्यानें ओळखलें नाहीं. तुमची ही इतकी हजामत वाढलेली व मिशाही आतां बऱ्याच मोठ्या झाल्या, ह्यामुळें मला लवकर ओळखूं आलें नाहीं.

नारायण०—अरे देवा ! याप्रमाणेंच कां तुम्ही आमची काळजी घेतां ! त्रिनाहून येऊन मला आठ दिवस झाले नाहींत, तोंच मी ही दुष्ट वार्ता ऐकतों ; आणि अशा दुर्धर प्रसंगीं तुम्ही माझ्या मिशाबद्दल चौकशी करतां ! एवढ्याशा तीन वर्षांत माझी ओळखही विसरलां ! तुम्ही प्रत्यक्ष तिचे बाप कींहो ! दुर्दैव माझें दुसरें काय !

तुकोजी०—(डोळ्यांचे अभु पुशीत पुशीत) खरेंच बाबा ! खरेंच बाबा ! तुझा संसार बुडाला ! या जगांतून तूं उठलास ! स्त्रीवियोगापेक्षां तें अधिक दुःख तरुणपणीं या जगांत कोणचें आहे ! ईश्वरच कोपला तेथें आपण मानव कोण काय करणार आहों ! तुझ्यावर बाबा दुःखाचा डोंगर कोसळला ! जर तुम्ही एकच अठवडा अगोदर आलां असतां, तर भेट तरी झाली असती ! तुमच्या बरोबर तीं दोन शब्द तरी बोलली असती ! आपल्या लहान बाळाबद्दल अखेरचे दोन शब्द तरी तिनें सांगितले असते !

आपल्या सासऱ्याचे हे दुःखोद्गार ऐकून शोकाकुल होऊन नेत्रांतून अश्रुधारा चाललेल्या वरचेवर पुसून त्वेषानें नारायणराव म्हणाले, 'आठ दिवसांपूर्वी जर मीं आलों असतों, तर मीं तसि मरूंच दिलें नसतें ! खास तिला मरूं दिलें नसतें !! तिच्या करितां मीं आपला जीव गहाण टाकला असता ! हे ईश्वरा ! हा अमंगळ दिवस पहाण्याचें माझ्या नशिबीं कां आलें ! ती कुमुदबांधव आगबोट मीं बसलों तेव्हांच समुद्रांत खडकावर आपटून फुटून कां बुडाली नाहीं ! किंवा एखाद्या भयंकर जलचरांच्या मुखीं मीं कां पडलों नाहीं ! त्यांचें तरी दोन दिवसांचें भक्ष्य झालें असतें हा देह कारणीं तरी लागता ! आतां जगून मला काय करावयाचें आहे !

नैराश्यवृत्तीनें असे अनेक शोकोद्गार काढीत अगदीं म्लान होऊन ते इतस्ततः फिरूं लागले. त्या म्हाताऱ्याचे डोळे पुसणें चाललेंच होतें. अगदीं चिंताकुल होऊन स्तब्धावस्थेंत बराच वेळ गेल्यावर नारायणराव स्वांतर्गत म्हणतात, 'नाहीं ! नाहीं ! या म्हाताऱ्यानें औषध चांगलें दिलें नाहीं ! काळजी घेतली नाहीं ! हा नाहीं घेणार ! खास नाहीं ! पैशाबांचून सदा

नाडलेला ! याच्या या व्यसनापुढें औषधपाण्याला पैसा कोठून उरणार ! औषधपाणी वेळेवर मिळालें नाहीं हेंच खरें !'

इतक्यांत तें लहान मूल, आपला खेळ सोडून, पळत पळत येऊन, आपल्या आजोबाच्या कंबरेला मोठ्या प्रेमानें मिठी मारून त्यांच्या अंगरख्याच्या पुढच्या पदराला धरून ओढून, त्यांच्या तोंडाकडे प्रेमानें पाहून म्हणालें, 'अजोबा, चला कीं हो घरीं, मला भूक लागली; किती वेळ तरी येथें बसनां ? कंटाळा आला. (खिशांतल्या शिंपा, गारगोट्या बाजवून) हे पहा किती मीं शिंपले गोळा केले आहेत ! मी आतां म्यांतली एकदेखील चंद्राला देणार नाहीं. चला अजोबा.'

मुलाचा तो कोमल अवाज ऐकून पुत्रप्रेमानें हृदय सद्गदित होऊन त्या मुलाजवळ जाऊन नारायणराव दयार्द्र अंतःकरणानें त्याजकडे पाहूं लागले. आमच्या या मुलाचा तोंडवळा अगदीं आपल्या बापासारखाच होता. मुलास एकदम उराशीं उचलून घेऊन ते म्हणाले, 'ये रे माझ्या बाळा, दीड महिन्याच्या वाटेवरून किरे तुला कधीं पाहीनसं होऊन धांवत आलों !! देव तुला तरी आतां सुखी राखो. आतां माझी दुसरी काय आशा! देवानें तूला मार्कंडेयाचें आयुष्य द्यावें. आतां काय ? हा येवढाच कायतो माझा सुक्ष्म आशातंतु आहे. 'नको' म्हणून खालीं उडी टाकून तें मूल म्हणालें, 'मला नाहीं तुमची ओळख, मी आपला आजोबाकडे जातों.'

यावर लडिवाळपणानें पोराच्या तोंडावर हात फिरवून तुकोजीराव म्हणाले, 'लहान बच्चा! त्याला काय कळतें, अज्ञान बेटा! पोराला काय ! म्हण आहेना "खाई गोड कीं आई गोड."

'घरीं चला. येथें फार वेळ बसून लेंकरूं कंटाळलें', असें त्या म्हाताऱ्याच्या म्हणण्यावरून ही सर्व मंडळी त्यांच्या विऱ्हाडीं परत आली. तेथें नारायणरावांनीं त्यांच्या इच्छेवरून आपली साडेतीन वर्षांची हकीकत त्यांस निवेदन केली. तसेंच पुढें त्यांकेंत आपण पैसा ठेवणार आहों, हेंहीपण सांगितलें.

नारायणराव आपल्या बायकोच्या मृत्युसंबंधी कांहीं विचारतील, असें जाणून तुकोजीराव म्हणाले, 'तुम्हीं एकाएकीं निघून गेल्याचें कळ. ल्यावर तिला फारच दुःख झालें. रोजचे रोज ती अधिकच खराब दिसूं लागली. जवळ काय होतें नव्हतें तेंही लौकरच संपलें. माझ्या पेनशनाच्या दोन

रुपड्यांवर कसा निर्वाह व्हावा ? संसाराला कांहीं मदत होईल म्हणून तिनें एक मुलींची शाळा घातली. शाळा बरीच चालली होती. त्यावर कसा-बसा निर्वाहही चालला होता. परंतु बाबा दैवापुढें कोण काय करणार ! दिवसेंदिवस ती जास्तीच खंगत चालली. इला क्षयाची भावना झाली आहे, म्हणून वैद्यांनीं निदान केलें. पुष्कळ उपाय केले, परंतु व्यर्थ. रोज पुढचा कांटा. रात्रंदिवस तुमचें स्मरण. तुमचा तिला अगदीं निजध्यास लागला होता; त्यामुळें या पोराला देखील ती विसरली. अखेर फार प्रकृति बिघडली, तेव्हां हवा तरी पालटावी, असें शेजारी पाजारी म्हणूं लागले. वैद्यांचींही मतें तशींच पडलीं; म्हणून तिला येथें घेऊन आलों. पण बाबा, कशाची हवा आणि कशाची काय ! तिची मातीच येथें ओढली झालें ! ! येथें आल्यावर आठ दिवसांच्या आंतच पार ! होणार सारखी बुद्धि म्हणतात तें खोटें नाहीं ?'

म्हाताऱ्याचें हें बोलणें ऐकून फक्त 'शिव शिव ! दुर्दैव माझें. होणार तें चुकत नाहीं, ' असें उद्गार काढून ते त्यास म्हणाले, 'मुलाला तुमचा फार लळा आहे नाहीं ?'

मांडीवर बसलेल्या मुलाच्या भुरभुर उडणाऱ्या झुलपांवरून साहजिक हात फिरवून तुकोजीराव म्हणाले, ' हो.य आहे खरा. बाळ्या आपल्या आजोबाचा फारच लाडका. अगदीं जीव कीं प्राण. याच्याखेरीज मला आतां कोण आहे ?'

नारायo—मग तर त्याला तुमच्या जवळच आणखी कांहीं दिवस राहूं द्या. या माझ्या मित्राला (गणपतरावाकडे बोट करून) माझ्या सर्व पैशाचे "ट्रस्टी" (निक्षेपधारी) नेमतों. बाळा थोडा मोठा झाला म्हणजे यांच्या ताब्यांत द्या. यांनाच मी त्याचा पालक नेमणार आहें.

गणपo—हें हो काय नारायणराव, पोराला तुम्ही आपल्या जवळच ठेवा, म्हणजे सर्व ठीक होईल.

नारायo—याचें कारण येवढेंच ! मी आतां येथून थेट मुंबईस जाणार व तेथून चिनाला जाणार. आतां मला इकडे कधींही स्वास्थ्य वाटणार नाहीं. बरी आपली तिकडे चार मंडळींची ओळखपाळख आहे. व्यापाराबिपारांत जाईल आपला सहज वेळ. येथें असलें म्हणजे रोज हे सर्व

दृष्टीस पडायाचें, व रोज मनाला वाईट वाटायाचें. दृष्टि आड सृष्टि, कांहीं ही होवो.

नारायणरावाचे हे विचार ऐकून तुकोजीरावाचा चेहरा किंचित् प्रफुल्लित झाल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें, व ही प्रसन्नता आपल्या जामाताच्य लक्षांत न यावी ह्मणून चटकन् उपरण्याच्या पदरानें तोंड पुसून ते ह्मणाले 'खरेंच नारायणराव, तुमचें ह्मणणें अगदीं रास्त आहे. हवा पालट, निराळ्या तऱ्हेचा व्यवसाय, आणि,—आणि,—'

इतक्यांत गणपतराव साशंक मुद्रेनें त्यांच्या तोंडाकडे पाहूं लागले, ह्मणून त्याला पुढें बोलण्याचें सुचेना. ह्मातारा अगदींच गांगरून गेला.

गणप०—तुकोजीराव, तुमच्या मनांत नारायणरावाला कसें तरी करून एकदां घालवून द्यावयाचें आहे वाटतें.

तुकोजी०—असें अगदीं नाहीं. त्यांची हिताची गोष्ट ह्मणून मी सहज बोललों.

गणप०—मला तर वाटतें, त्यांनीं येथेंच रहावें. मुलाला आपल्या जवळ ठेवून त्याचा विद्याभ्यास नीट करवावा. त्याचें लग्न करावें. त्याला संसारांत सुखानें नांदत असल्याचें पहावें. आतां याखेरीज यांना दुसरा व्यवसाय काय आहे? देवानें जी मीठभाकर दिली आहे, ती सुखासमाधानानें खात स्वस्थ बसावें; यांतच यांना सौख्य आहे.

नाराय०—(मोठ्या आग्रहानें) छे, छे, छे. आतां याचें नांव घेऊं नका. माझ्यानें आतां या देशांत घटकाभरसुद्धां राहणें होणार नाहीं. नको बाबा नको! मला येथून केव्हां सुटेनसें झालें आहे. आज पहाटच्या गाडीनेंच करवीराला जाऊन तेथें तेवढी पैशाची व्यवस्था करितों, व लागलीच मुंबईचा रस्ता धरतों. आतां पुरें. जेव्हां एकदां आगबोटींत बसेन, तेव्हां मला जरा बरें वाटेल.

नारायणरावाच्या मनांत पहिल्यानें हजार पांचशें रुपये या वृद्धाजवळ मुलाच्या कपडयालत्त्याकरितां द्यावे ह्मणून आलें; पण आपल्या सासऱ्याचा व्यसनी स्वभाव लक्षांत येऊन, त्यांनीं तो बेत रहित केला; व वर्षाचे काठीं मुलाच्या विद्याभ्यासाकरितां शंभर रुपये व खाऊला ह्मणून पन्नास रुपये गणपतराव देईल, असें त्यांना सांगून त्यांनीं आपल्या मुलाबद्दल खालील दोन शब्द उच्चारिले, 'तुह्मी प्रत्यक्ष मुलाचे आजेच अहां. मुलाला

जपा म्हणून मीं सांगणें व्यर्थ आहे. तथापि माया मोठी वेडी, रहावत नाहीं म्हणून सांगतों. तुकोजीराव, हा लहानाचा मोठा होऊन, विद्याचारसंपन्न होऊन, चारचौघांत नांव मिळवून आपल्या मुलाबाळांत, स्वस्त्रीबरोबर आनंदानें संसार करीत असल्याचें माझे कानीं आलें म्हणजे या जगांतली माझी इतिकर्तव्यता झाली; मग मला स्वर्गसुख मिळाल्यापेक्षां अधिक आहे.'

नारायo—हं गणपतराव, चला आतां. आतांच स्टेशनावर जाऊं व तेथेंच निजूं.

तुकोजीo—छे. असें कोठें वेड्यासारखें केलें आहे कीं काय? दोन घास खा, थोडी झोंप घ्या. आणि पहाटे गाडीच्या वेळेला जा. असें उपाशी तापाशी कोणी गेलें आहे काय? चला उठा गणपतराव.

नारायo—आपल्याला तर कांहीं आतां भूक नाहीं. तुम्हाला फराळ करायाचा असल्यास जा गणपतराव.

तुकोजीरावाच्या फार आग्रहावरून ते दोघेही हातपाय धुऊन पानावर जाऊन बसले. नारायणरावाला कसचें जेवण जातें! एक घास देखील जाईना. त्या पोराकडे पाहून त्याला एकदम रडूं कोसळलें; व तो तसाच पानावरून उठून गेला!

रात्री झोंप त्याला कोठची येते? त्याची प्रिया डोळे झांकले कीं मूर्तिमती समोर उभी राही! उगीच इकडून तिकडे आणि तिकडून इकडे अंथरूणावर लोळत, दुःखाचे सुसकारे टाकीत, ते पडले होते. मधून मधून आपल्या प्रियमित्रास हाक मारीत व किती वाजले म्हणून विचारीत. अखेर पहाटे ते स्टेशनावर निघाले. वृद्ध तुकोजीरावही त्यांच्या बरोबर स्टेशनावर गेले. ते दोघे गाडींत बसल्यावर 'वरचेवर पत्र पाठवीत जा,' म्हणून नारायणरावास सांगून ते परत आले.

'आज बरोबर आठ दिवसांपूर्वी मी आगबोटींत होतों. मुंबई बंदर नुकतेंच दिसूं लागलें होतें, तेव्हां माझ्या मनांचा केवढा उल्लास! तिला भेटण्याची केवढी तरी दृढतर उत्कंठा! तिला पहाण्याविषयीं मन किती तरी घाबरें झालें होतें! मुलाला कडेवर घेऊन, आनंदानें हृदय उचंबळून जाऊन, हास्यवदन करून मला पाहायाला माजघरांतून सोप्यावर ती येईल म्हणून किती वेळां तरी माझ्या मनांत आलें! पण दैवगति किती विचित्र!

काय पहा!! आज तिची राख पाहून चाललोंआहें!!' असेच आपल्या प्रिय भार्येसंबंधी दुःखोद्गार काढीत काढीत, वरचेवर उष्ण अश्रुबिंदु पुशीत पुशीत नारायणराव बोलत आहेत, गणपतराव मधून मधून चार वेदांताच्या समाधानपर गोष्टी सांगत आहेत, तोंच करवीरच्या स्टेशनावर गाडी येऊन उभी राहिली.

करवीरास गेल्यावर गणपतरावाच्या व दुसऱ्या एका चांगल्या वकीलाच्या सल्ल्यानें नारायणरावांनीं आपल्या पैशाची व्यवस्था केली, व गणपतरावास आपल्या प्रिय पुत्राचे पालक नेमून त्यांनीं सर्व व्यवस्था पहावी असें ठरविलें.

गणप०—हें काम फार कठिण बोवा ! मी ! आणि पालक ! मग जुळलें ! अरे, या जन्मांत स्वतांची काळजी घेण्याचें मला माहीत नाहीं ! मीं कधीं संसार केला आहे ? काय करावें आतां ! खरोखरच तूं मला मोठ्या पेचांत घातलेंस.

नाराय०—प्रिय मित्रा, माझ्याकरितां म्हणून या पोरक्या मुलाचें संरक्षण कर. तो म्हातारा त्याला नीट जपतो कीं नाहीं याचा मला संशय आहे. मी या पैशापैकीं कांहीं विशेष नेत नाहीं. फक्त भाडयापुरते पैसे घेतों म्हणजे झालें. मी आपला निर्वाह कसाही करीन. एक पोटाचें काय मोठें !

मनुष्याचा बेत असतो एक आणि ईश्वर करतो भलतेंच. नारायणरावांनींच आपल्या मुलाचे पालक व्हावें असा ईश्वरीसंकेतच दिसतो.

नारायणराव चिनाला जाण्याकरितां म्हणून मुंबईस गेले. तेथें गेल्यावर आगबोट त्याच दिवशीं सकाळीं सुटल्याचें त्यास समजलें. आतां दुसरी आगबोट सुटायाला निदान दोन आठवडे पाहिजेत; मग मुंबईस इतके दिवस उगीच राहून काय करावयाचें, असें मनांत येऊन करवीरीं परत येऊन गणपतरावाचे घरीं मित्रसहवासाचें सुख अनुभवीत ते स्वस्थ राहिले. तेथें आपल्या खोलींत, "सिगरेट" ओढीत, मैनांचे साद ऐकत, आरामखुर्चीवर ते स्वस्थ पडत व मधून मधून 'हा केवढा तरी मोठा दिवस ! हे दोन आठवडे कधीं तरीं संपतात,' असें म्हणत, खिडकींतून रस्त्याकडे पहात वेळ घालवीत.

मुंबईला जाण्याचें अगदीं समीप आलें. आतां एक दोन दिवसांत नि-

घणार तों एके दिवशीं संध्याकाळीं गणपतराव त्यास झणाले, ' माझा एक मित्र काश्मीर, तिबेट वगैरे पहाण्यास जात आहे. मला बरोबर चल झणतो. माझ्याहि मनांत जावें, असें आलें आहे; पण तूं जर मजबरोबर येत असलास, तर मी त्याला ' होय ' झणून सांगतों.

नारायणरावांनीं न जाण्याबद्दल बरेच आढेवेढे घेतले. परंतु गणपतराव अगदीं ऐकत नाहींत, असें पाहून अखेर ' होय. येतों,' झणून ते झणाले, ' आझांला काय ? चिनांतच काय अधिक आहे? हें ठिकाण सोडून कोठें तरी गेले झणजे पुरे. चीन काय आणि काश्मीर काय, आझांला सारखेंच ! '

हे उदासीनतेचे उद्गार ऐकून गणपतरावास बरें वाटलें नाहीं. तो येतों झणाला झणून विशेष चर्चा न करितां ते स्वस्थ बसले.

तिकडच्या ओळखी पाळखीचीं पत्रें मिळवून हे तिघे दिनशुद्धि पाहून प्रवासास निघाले.

प्रवासास निघण्याचे पूर्वी गणपतरावांनीं आपल्या मामाला व सगुणाताईला पत्र पाठविलें. काश्मीर, तिबेट वगैरे देश पहायाला जात आहों, आपल्याबरोबर अपला एक जुना जिवलग स्नेही आहे. तो बरेच दिवस इकडे नव्हता, नुकताच इकडे आला आहे; याचें कुटुंब नुकतेंच वारलें, वगैरे नारायणरावाची त्रोटक हकीकतही त्यानें या पत्रांत सगुणाताईस कळविली होती. उलट टपालावर सगुणाताईनें पत्राचें उत्तर पाठविलें तें असें—

सा. न. वि. वि.—या दिवसांत नेहमीप्रमाणें इकडे येण्याचें सोडून प्रवासास निघालां काय ? कोण थंडी तिकडे ! वर्फतर झणे पुसूंच नये ! असें सांगतात कीं हातांतलें भांडें गळून पडल्याचें कळत देखील नाहीं ! कफप्रकृतीच्या माणसाला ही हवा फार वाईट झणे. तुमची प्रकृति जरा तशी आहे झणून झणतें संभाळा. तिकडे फार दिवस राहूं नका. बाबांना तुमच्याविषयीं फार काळजी लागली आहे. नारायणराव कसे काय आहेत ? तुम्ही इकडे याल तेव्हां आपला वाड़ा दाखविण्याकरितां त्यांस इकडे घेऊन यालच. मी लिहिणें नलगे. काश्मीराहून एक उंची जांभळया रंगाची शाल आपल्या मामीकरितां घेऊन या. तिणें सांगितल्यावरूनच लिहित आहें. किंमत किती कां पडेना ? शाल उत्तम असली झणजे झालें. बाबांना नर्

तिनें अगदीं भाळून टाकलें आहे, तिचें माझें जुळत नाहीं; म्हणजे माझ्या-बरोबर ती रोज भांडतेच किंवा शिवीगाळ करते, असें मुळींच नाहीं. तिचा तो पोरकट, हट्टी स्वभाव मला अगदीं रुचत नाहीं, बाकी सर्व ठीक आहे. कळावें हें विज्ञापना.

आपली
सगुणा.

मुक्काम निहालगड, ता० माहे १८—.

भाग ७ वा.

हतभागी नारायणरावाच्या विधुरावस्थेचें प्रथम वर्ष संपत आलें. शाळू दिवस भराभर निघून चालले, गतवर्षाप्रमाणेंच आज गणपतरावाच्या बंगल्यांत चिरुट ओढीत ही स्वारी बसली आहे. गतवर्षी याच दिवसांत जगांतील प्रत्येक वस्तु आपल्याला दुःख देण्याकरितांच निर्माण झाली आहे, असें त्याला वाटत होतें. मग ती वस्तु चांगली असो किंवा वाईट असो. आमच्या शिलेदारानें याप्रमाणें संकटांत एक वर्ष तर काढिलें. या एक वर्षांत त्याच्या शरीरप्रकृतींत कांहीं मोडा झणण्यासारखा फरक पडल्याचें दिसत नाहीं. परंतु या महासंकटानें याचे मनाला काय धक्का बसला असेल व त्यावर काय परिणाम झाला असेल, तें ईश्वरालाच ठाऊक !!

एकदां प्रवासांत असतां नारायणरावाला गणपतराव सहज झणाले कीं, 'या प्रवासानें तुमच्यांत बरीच हिंमत आली, व जरा तुझांला त्या गोष्टीचा विसरही पडला. यावर नारायणराव एकदम 'खो' करून हंसले आणि झणाले, ' गणपतराव, तुझांला आठवते कां, परवां महाराज सरकारांनीं आपलें सैन्य राणीसरकारास आफगाणिस्थानांतील लढाईच्या वेळेस मदतीस दिलें तें; व तेणेंकरून राणीसरकारची मर्जी बहाल करून घेऊन भला सवा हात लांब किताब मिळविला तो. लढाई संपल्यानंतर सर्व मंडळी परत आली. त्यापैकीं लढाईत पुष्कळ लोकांना गोळ्या लागल्या होत्या, हें अगदीं अशा प्रसंगीं होणें साहजिक आहे झणा. पण त्यांपैकीं कांहींजणांच्या गोळ्या शरीरांतून निघाल्याच नाहींत. तशाच आंत राहिल्या; ते नेहमींप्रमाणें आनंदी धट्टेकट्टे दिसत. परंतु जरा कां पाऊस पडूं लागला, वाईट वारा सुटला किंवा अभाळ आलें, किंवा थोडा गारठा पडला कीं पडली ही मंडळी इवळत, कण्हत. जणूंकाय त्यांना आतांच गोळी लागली आहे ! त्याप्रमाणेंच मित्रा माझी स्थिति आहे. माझी ही जखम कधीं भरणारी नाहीं, मी मरेपर्यंत अशीच ती रहाणार. ही माझी जन्माची सोबतीण आहे. खरी सुख देणारी प्रिया निघून गेली आणि तिनें या सदा शल्यासारखी हृदयास सलणारीला बदली दिली.

काश्मीर, टिबेट वगैरे फिरून आमची ही प्रवासी मंडळी करवीरीं कु-

शल परत आली. आपल्या मित्राच्या खोलींत नारायणरावानें पुन्हां आपलें ठाणें दिलें. मधून मधून शिरोळास मात्र मुलाला पहावयाला जात असे. जातांना कांहींतरी मुलाला खाऊ व कांहीं खेळावयाच्या जिनसा बरोबर नेई, व मुलानें आपल्याकडे यावें अशी फार खटपट करी. परंतु अशा त-ऱ्हेनें कोठें मुलाचा लळा लागतो ? जरी हा तेथें वरचेवर जाई, तरी तो मुलगा आजोबाला सोडून कधींच त्याचेजवळ येत नसे. यामुळें नारायण-रावाला नेहमीं वाटे कीं, ' पोराला ह्याताऱ्याची संवय फार आहे, माझ्या कडे हा कसा येणार ? '

तो आपल्याशींच नेहमीं म्हणे, ' काय करावें ' आज पोराला येथून काढून आपल्या जवळ नेऊन ठेवावें, तर पोर रडून रडून बेजार करील. आजोबाचा एकसारखा ध्यास घेईल. बरें, इतकेंही करून न्यावें म्हटलें, तर आपल्याला काय त्या लहान पोराची उस्तवारी करतां येणार ? बरें, येथेंच नेहमीं राहूं द्यावें म्हटलें, तर त्याला माझी माया तरी कशी लागणार? शि-वाय या ह्याताऱ्याच्या अति लाडानें कदाचित् हा बिघडूनही जाईल.'

बरें असो; एक वर्ष संपलें. वर्षश्राद्ध झालें. त्यानें आपल्या धर्मप्रमाणें सर्व विधि केला. आपल्या प्रिय पत्नीच्या स्मरणार्थ म्हणून एक संवत्सर जे कांहीं प्रेमपुरःसर नियम पाळले होते, ते सर्व आज सुटले. ' झालें, एक वर्ष झालें अं! दिवस काय हां हां म्हणतां जातात.' असें म्हणत एके दिवशीं सं-ध्याकाळचे वेळेस नारायणराव आपल्या खोलीच्या खिडकींत नेहमींप्रमाणें उदासवाणी बसले होते.

याच दिवशीं संध्याकाळीं आमचे वकीलराजेभी नारायणरावाजवळ येऊन बसले आणि म्हणाले, ' उद्यां सकाळीं निढालगडाला सगुणाताईला पत्र पाठवितों कीं, आम्ही दोघे तिकडे शिकारीकरितां एक दोन दिवसांत निघतों म्हणून. '

नाराय०— छेः, गणपतराव, तुम्ही आपले चला, माझें काय काम तेथें ? मी आपला येथेंच—

त्याचें हें वाक्य पुरें होण्याची वाट न पाहतां गणपतराव म्हणाला, ' येथेंच ह्या पांखरांबरोबर व कुत्र्यांबरोबर खेळत वेळ घालविणार वाटतें ? छेः, असें नको बोवा. '

नारायः— अरे सगळें खरें. पण आपल्याला शिकार कोठें येती आहे करायाला? कोणा लेकाला ठाऊक बंदुक आडवी धरायाची कां उभी धरायाची !

मग गणपतराव हंसत हंसत मोठ्यानें म्हणाले, 'वः खाशी ! तुला वाटतें मी मोठा शिकार बहादर अं !! कोणा लेकाला ठाऊक खोकड म्हणजे कसलें असतें तें! आणि ससा म्हणजे कसला असतो तो ! अरे आपलें हें सगळें उगीच ! ही आपली आलीकडे " फ्याशनच " झाली आहे. मग येवो न येवो हा निराळा मुद्दा. गौरकायांची प्रतिमा आपण उतरलीच पाहिजे हें मुख्य तत्व. आज तागाईत आपण एक अल्लून निशाण मारिलें नाहीं. पुढचें काय सांगूं ! निशाण तर मारिलें नाहींच, परंतु बंदुक वागवून वागवून खांद्याला मात्र निशाणी झाली आहे ! निहालगडाला शिकारीला म्हणून येथून जायाचें येवढेंच. खरें म्हणशील तर दोन दिवस हवा पालटल्यासारखें होतें. मामाच्या येथें जरा चमचमीत खायालाही पण मिळतें. मामाचा माझ्यावर विशेष लोभ आहे, तेव्हां वर्षांतून एकदां गेलें म्हणजे त्यालाही पण बरें वाटतें. आणखी माझी त्या गांवांत कांहीं वतनवाडी आहे; तेव्हां तिची देखरेख केल्याप्रमाणेंही सहजच होतें. झालें येवढेंच. यंदा मात्र जरा थोडें जास्ती आहे. आमच्या नव्या मामीसाहेब पाहवयाच्या आहेत. ती काय अगदीं सौंदर्यप्रतिमाच आहे म्हणे ! रतीच म्हटलें तरी चालेल ! म्हाताऱ्यांना पहा कशा अशा बायका मिळतात त्या ! मग नारायणराव कसें काय ? तूं बोवा आलेंच पाहिजेस. त्याखेरीज मजा नाहीं. येणार ना ?'

नारायः—हं चला, तुम्ह्या म्हणण्याप्रमाणेंच कां होईना. आमचें काय गेलें. गाड्यावरोबर नळ्याला यात्रा !

काय असेल तें असो—अलीकडे नारायणरावाची वृत्ति अगदींच सौम्य झाली. तो आपला मित्र सांगेल त्याप्रमाणें नेहमीं अगदीं लहान मुलाप्रमाणें वागत असे. तो सांगेल तें करण्याला तयार. तो सांगेल तिकडे जाण्याला तयार. आपण होऊन कोणचे खेळ खेळण्याला किंवा दुसरे कांहीं असेच विभांतीचे व्यापार करण्याला कधीं तयार नसावयाचा. पण आपल्या मित्रानें बोलाविल्यावर अगदीं मुकाट्यानें तयारी.

'तुम्ही सध्यां निहालगडाला येऊं नका,' म्हणून लागलींच उलट टपालानें सगुणाताईचें पत्र आलें; त्याचें गणपतरावाला फारच आश्चर्य वाटलें. सगुणाताईनें मोठ्या गडबडीनें किचकट अक्षरानें तें पत्र लिहिलें होतें. तिनें येवढेंच यांत लिहिलें होतें कीं, सध्यां आमच्या वाड्यांत तुमच्या सोयीची रिकामी जागा नाहीं, असें निहालकुवरबाई म्हणते. तसेंच ती आणखी म्हणते कीं, शहरांतील लोक म्हणावयाचे मात्र संभावित गृहस्थ म्हणून; परंतु त्यांना रीतभात अगदींच नसते. याकरितां बाबांनीं तिच्या सांगण्यावरून मला असें लिहावयास सांगितलें. बाबा अगदीं तिच्या अर्ध्या वचनांत. ती सांगेल तें प्रमाण. बाबांनीं सांगितलें आहे कीं, मग मी पत्र पाठवीन तेव्हां या.' या लिहिण्याचा काय हेतु असावा, याचा उमजच गणपतरावास पडेना.

'तिनें नको म्हटलें म्हणजे आम्हीं राहतों कीं काय?' असें म्हणत गणपतरावानें या पत्राची सुरळी करून सिगरेट पेटविण्याकरितां काडी ओढून त्याला लाविली; आणि म्हणाला, 'आतां आपण असें करूं या नारायणराव, आपल्याला तर तिला पहावयाचेंच! त्यांच्या वाड्यापासून निहालगडगांव समीपच आहे. आहे वाटतें अजमास मैल दीड मैल. तेथें एक चांगली "होटेल" (खाणावळ) आहे, तेथें राहूं म्हणजे झालें. गांवाला नदीही चांगली आहे. नदींत मासे पुष्कळ आहेत. बसले आपले खुशाल जाळें टाकून. करूं एक आठ दिवस मजा. शिकारीपेक्षां मासे धरण्याचें काम फार चांगलें. दुसरें कांहीं नाहीं. फक्त उगीच दोरीकडे लक्ष लावून कांठावर बसलें म्हणजे झालें. आपल्याला काय मासे सांपडले तर सांपडले, नाहीं तर नाहीं. घटकाभर करमणूक झाली म्हणजे झालें.'

इतक्यांत काय असेल तें असो, यांचें मन बदललें आणि अर्धेच जळालेलें तें पत्र हातांत घेऊन विझवून तो म्हणाला, 'छेः सगुणाताईचें पत्र आणि त्याला असा अग्नि! आपण हें पत्र जपून ठेवणार.' त्या पत्राची त्यानें सुरळी उलगडली, चुरगळलेलें साफ केलें, पाकिटांत घातलें, आणि उठून टेबलावरच्या कपाटांतील 'महत्वाचे कागद' म्हणून ज्या खान्यावर चिट्ठी मारिली होती त्यांत हें पत्र नेऊन टाकिलें. काय यांत महत्वाचे कागद होते हें त्यांचें त्यासच ठाऊक! पक्षकारांचे रोखेबिखे असतील म्हणावें तर त्यांचें नांव नाहीं! जर याला कोणी या वेळेस सांगितलें असतें कीं,

हें जपून ठेवलेलें पत्र पुढें एके महत्त्वाचे प्रसंगीं, एका मोठ्या महत्वाच्या खटल्यांत मुख्य पुराव्याचा कागद होणार आहे, व त्या खटल्यांत आपलें बरेंच अंग असणार आहे, तर यानें खरोखरच आश्चर्यानें भिंवया वर चढविल्या असत्या!, व कांहीं याची निराळीच व्यवस्था केली असती.

वर सांगितल्याप्रमाणें बेत ठरून ते दोघे निहालगडाला जाण्याकरितां मासे धरण्याची सामुग्री घेऊन करवीराहून दुसरे दिवशीं निघून जेवणाचे वेळेस तेथें जाऊन 'सुर्यप्रकाश' खाणावळींत उतरले.

या गांवापासून निहालगड अजमासें दीड मैल होता. वाड्यासभोंवतीं दाट झाडी होती, झगून लांबून पहाणाराला तो सहज दिसत नसे. गांवांतून या वाड्याकडे जाण्याला एक दुतर्फा झाडींतून रस्ता होता. हा वाडा व सभोंवतालची झाडी, लांबून पहाणारास फार उदास दिसे, परंतु जगदेवरावांनीं आपल्या नव्या लाडक्या तरुण सुंदर स्त्रियेकरितां निच्या हौशीप्रमाणें आंत अगदीं इंद्रभुवन बनविलें होतें. लहान अज्ञान मुलाला ज्याप्रमाणें एखादी खेळायाची नवी वस्तु घेऊन दिली झणजे तें अगदीं त्यांत गढून जातें, व त्याखेरीज त्यास दुसरें कांहींच दिसत नाहीं, व आपल्याला ती वस्तु मिळाली झणून फार आनंदांत असतें, व सदा त्याबद्दल कुशारकी मिरवितें; त्याप्रमाणेंच आमच्या या निहालकुवरबाईसाहेबांची स्थिति या बाबतींत झाली होती.

बरें असो. हे दोन गृहस्थ जेवणखाण करून नुकतेच उठून चिरूट ओढीत स्वस्थपणानें खिडकींत उभे राहिले होते. संध्याकाळची वेळ; हवा फार चांगली होती. सूर्याच्या अस्तास चालेलेल्या किरणांची पिंवळी छटा झाडांच्या पानांवरून चमकत होती. शेतांत कांहीं ठिकाणीं पीक उभें होतें, व कांहीं ठिकाणीं मळणी सुरू झाली होती. त्यांतील जोंधळ्याचीं पिंवळीं भरदार कणसें पाहून हे सुवर्णाचे गुच्छच आहेत कीं काय असें वाटे. हेवा हा सर्व प्राण्यांत आहेच. आपल्या देशांतील मनुष्यें जर देशावर पोट भरण्यास जातात, तर आपणही कां जाऊं नये, असें मनांत आणूनच कीं काय पिकाचे दिवसांत कोंकणांतून देशावर आलेल्या भोरड्यांचे थवेचे थवे पिकावर बसत आहेत. शेतकरी लोक आपला गोफणगुंडा वरचेवर मारीतच आहेत. तोंडानें हॉ, हॉ, हो हो, मोठ्यानें सुरूच आहे. पांथस्थ लोक संध्याकाळ झाली झणून गांवाकडे आपले पंचहत्यारी तट्टू गडबडीनें हांकीत

चालले आहेत. मळणी होऊन तयार झालेलें धान्य शेतकरी लोक गाडयांवर भरून, गाडे हांकीत बैलांचे श्रम विसरण्याकारितां गाणें म्हणत म्हणत वेशीच्या आंत, लहान रस्त्यानें बेतानें हळूच जपून जात आहेत. गुराखी आपला गुरांचा कळप घेऊन पांवा वाजवीत संवगडयांबरोबर हमामा घालीत गांवाकडे येत आहेत. गरीब शेतकऱ्यांच्या बायका हातांत लहानसें मेणकटलेलें लोटकें घेऊन घाइघाईनें तेल्याच्या घराकडे सांजवातीपुर्तें तेल आणण्याला चालल्या आहेत. मास्तरानें शाळा सोडून दिल्यावर मुलें गमतीनें 'उद्यां सुट्टी' 'उद्यां सुट्टी' म्हणून ओरडत घराकडे धांवत चालली आहेत. 'काय करावें या सुगीच्या दिवसांत शेतकऱ्यांचीं मुलें शाळेला येत नाहींत. मुलांची संख्या तर निम्मी कमी झाली. उद्यां रावसाहेब आले म्हणजे ठीक नाहीं. पांच मिळतात ते चारच व्हावयाचे किंवा इंदुरी वुक्याचा डवा मिळावयाचा.' असें मनाशीं म्हणत खिन्न मुद्रेनें मास्तरसाहेब घराकडे निघाले आहेत. चावडींत गांवचे राजे (पाटील) आपल्या सैन्याचा (महार, वेसकर) मुजरा घेत बसले आहेत. कुळकरणीआप्पा शिलक मोजण्यांत, कीर्द बंद करण्यांत व 'उद्यां तालुक्याला पोतें पाठवावयाचें काय?' म्हणून पाटलास विचारीत आहेत. गरीब बायकांस बहिर्दिशेस बाहेर जातांना पाहून गेटावरचा पोलीस नाईक मोठ्या डौलानें व अधिकाराच्या जोरानें, 'हद्दीच्या बाहेर जा' म्हणून सांगत आहे याप्रमाणें खेडेगांवातील संध्याकाळची धांदल नेहमीं शहरांत राहणाऱ्यांना कशानें दृष्टीस पडणार! खरोखरच एखादे वेळेस अशा कांहीं प्रसंगानेंच हें पाहण्याची त्यांना संधि येणार; त्यांना ह्या अपूर्व गोष्टी पाहून फार आनंद होतो. याप्रमाणेंच कांहीं अंशीं आमच्या या नगरवासी खाणावळींतल्या पाहुण्यांची हें सर्व पाहून स्थिति झाली.

इतक्यांत चावडीवरच्या घडयाळांत सात ठोके पडले. ते ऐकून गणपतराव नारायणरावास म्हणाले, 'हं नारायणराव, "ड्रेस" करा. चला जाऊं वाड्याकडे. तेथें नाहीं इतक्या लवकर जेवणखाण होत. सर्व मंडळीला भेटूं व तसेंच त्या पलीकडच्या रस्त्यानें सावकाश फिरत फिरत परत येऊं.' खाणावळीचा मालक तेथेंच उभा होता, त्यानें ह्यांचें हें बोलणें ऐकिलें आणि म्हणाला, 'या वेळेला वाड्याकडे जाऊन काय करितां? तुमचे मामासाहेब कांहीं या वेळेला भेटणार नाहींत. तुम्हीं येथें येण्याच्या अगोदर नुकतेंच

आमचे सरकार, बाईसाहेब, आणि ताईसहेब चार घोड्यांच्या गडींत बसून येथें–या येथें–कोणाचे कीं घरीं कांहीं समारंभ आहे तेथें गेले आहेत. मला वाटतें दुर्गमगडासच सरलष्कराचे घरीं कांहीं उत्सव आहे. ते कांहीं इतक्यांत येणार नाहींत. परत येण्याला निदान नऊ साडे नऊ तरी होतील. त्यांचा रस्ता हाच. आपल्या दारावरूनच गाडी जाईल.'

'मग ह्या वेळेस वाड्याकडे जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं,' असें म्हणून ते दोघे गांवाचे बाहेर एक जुनें फार दिवसांचें देऊळ होतें तें पाहण्यास गेले. तसेंच गांवांतून इकडे तिकडे फिरून नदीकडच्या बाजूला जाऊन, उद्यां कोठं मासे धरावयाला बसावयाचें हें ठरवून, तसेंच हळूं हळूं रमत रमत ते आपल्या बिऱ्हाडीं आले; आणि चिरूट पेटवून ओढीत स्वस्थ दारांत बसले.

आठ वाजून गेले. नवाचा अंमल आला. गांवांतील गडबड बरीच मोडली. मधून मधून कुत्र्यांचें भोंकणें मात्र ऐकूं येई. चांदणें स्वच्छ पडलें होतें. इतक्यांत 'सूर्यप्रकाश' खाणावळीच्या दारासमोरच रस्त्यावर एक चार घोड्यांची गाडी एकदम उभी राहिली. मागच्या पायरीवर उभा राहिलेला सैस एकदम घोड्यांचा पट्टा निघाला तो बसविण्याकरितां गडबडीनें पुढें आला.

गाडी उभी राहिलेली पाहिल्याबरोबर गणपतराव उत्सुकतेनें 'अरे, मामासाहेबांचीच गाडी! काय झालें पाहूं तरी' असें म्हणून गाडीकडे धांवत गेले. नारायणराव तेथेंच दारापाशीं चिरूट ओढीतच बसले. सगुणाताई घोड्याकडे पाठ करून बसली होती, ती त्या चांदण्यांत नारायणरावाला स्वच्छ दिसली. जगदेवराव व त्यांचें कुटुंब जोडीनें घोड्याकडे तोंड करून बसलें होतें. जगदेवराव खाणावळीच्या दाराकडच्या बाजूला बसले होते? व पलीकडच्या बाजूला निहालकुवरबाई होत्या, त्यामुळें नारायणरावास ही सुप्रसिद्ध सौंदर्यवल्ली पहाण्यास मिळाली नाहीं.

गणपतराव एकदम गाडीच्या दारापाशीं उभा राहिलेला पाहून जगदेवराव म्हणाले, 'अरे गणू! तूं रे येथें कसा ह्या वेळेला! काय आश्चर्य आहे! आलास तरी कधीं? आणि इकडे कां?' असें म्हटल्याबरोबर गणपतराव म्हणाले, 'मामा तुम्ही इतक्यांत येऊं नको म्हणून लिहिल्यावर मग कशाला येऊं? ह्या गांवांत आमचीं फार दिवसांचीं वतनवाडी, जमीनजुमला; मागें तुमच्या येथें येई तेव्हां हें पाहून जाण्याचें काम सहजच होई. परंतु आतां

मुद्दाम बतनवाडीचा वसूलविसूल पाहण्याकरितां यावें लागलें. वरोवर माझा एक मित्र नारायणराव म्हणून आहे. तो आला आहे येथें मासेविसे धरायाला, व कांहीं करमणूक करण्याला. येणेंच याही दोघ या खाणावळींत

जगदे०—नारायणराव कोणरे ?

गणप०—नारायणराव चव्हाण—

'काय ? नारायणराव चव्हाण आले आहेत ! त्यांना भेटावयाचें माझ्या मनांत फार आहें, ' असें सगुणताई मोठ्यानें व उत्सुकतेनें म्हणाली.

गणप०—काय ? तुला त्यांना भेटावयाचें आहे ! ते पहा, तेथेंच दारांत ते उभे आहेत. हा पहा, त्यांना घेऊन येतों.

आमच्या भार्यानिरत वृद्ध जगदेवरावावर निहालकुवरबाईच्या पोरकट व हट्टी स्वभावाचा अंमल इतका कांहीं जारी बसला होता कीं तो कांहीं पुसूंच नये. गणपतराव नारायणरावाला हांक मारण्याला गाडीपासून वळला मात्र तों जगदेवरावाकडे तिनें अशा कांहीं मुद्रेनें भिंतया चढवून पाहिलें कीं त्यावरून ह्या वेळेस नारायणरावाची भेट घेण्याला उभें राहणें नको व त्यांची भेट नको असें तिनें स्पष्ट दर्शविलें. बाईसाहेबांच्या मर्जीविरुद्ध वागावयाचें कीं काय ! केवढें धाष्टर्य ! केवढें पाप ! केवढा देवाच्या घरचा अपराध ! व तो जगदेवराव यांच्या हातून होईल काय ? जगदेवराव एकदम मोठ्यानें हांक मारून गणपतरावास परत बोलावून म्हणाले, ' नको आतां. मंडळी आतां अगदीं कंटाळली आहे. उद्यां त्यांना वाडयाकडेसच घेऊन ये, म्हणजे निवांत घटकाभर वोलत बसायाला येईल. दोघे तुम्ही जेवायालाच तिकडे या म्हणजे झालें. ' निहालकुवरबाईनीं याला कधींच पाहिलें नव्हतें. ' मामा ' म्हणून यानें हांक मारिली यावरूनच यांचें काय नातें आहे, हें तिच्या लक्षांत आलें, आणि हाच गणपतराव असें तिला कळलें. प्रवासानें या बाईसाहेब इतक्या त्रासल्या होत्या कीं तिला जास्ती कांहीं बोलवलें नाहीं ! फक्त हास्य मुख करून जरा लाडक्या स्वरानें ' या बरंका ' असें मात्र म्हणाली.

इतक्यांत सगुणताई हळूच कानांत गणपतरावास विनोदानें म्हणाली, 'आतां खरं बाईसाहेबांनीं 'या' म्हणून सांगितलें. मग झालें कीं नाहीं ? तुम्यावर मर्जी दिसते खरी. कां मी पत्रांत लिहिलें त्याप्रमाणें आहे कीं नाहीं ?,

'आमच्यावर मर्जी बहाल असावयाचीच. तुला काय ठाऊक ?' असें गणपतरावांनीं हंसत हळूच थट्टेनें उत्तर दिलें.

घोड्याचे पाय टापटाप वाजत, चाकें घडघड करीत, चाबूक काड काड वाजवीत गाडी झपाट्यानें निघून गेली. गणपतराव परत खाणावळीकडे आले आणि आपल्या मित्रास ह्मणाले, 'खरोखरच नारायणराव' इतकी सुंदर स्त्री आपण तर कधींच पाहिली नाहीं. निवळ रतीच आहे. आतां माझें मन तिच्याविषयीं कलुषित होऊं नये खरे, पण खरें तें सांगतों; परवां मी एक फ्रेंच "नाव्हेल" (कादंबरी) वाचलें, त्यांत कामदेवाच्या तडाक्यांत सांपडून एका पात्राची फारच मजा झाली आहे. त्यासारखीच माझी स्थिति व्हावयाला करिते.'

नारायणरावानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तोंडांतला चिरूट फेंकून देऊन एक मोठा मात्र सुस्कारा टाकिला. मागची आठवण त्याला झाली वाटतें. शिलेदार असतांना शिरोळास मौजेनें आनंदांत घालविलेले ते दिवस, तिचें तें लहानपणचें सौंदर्य, तिचें आपलें प्रीतीचें संभाषण, तिचा तो जरा हट्टी पण लवकर समजूत पडणारा स्वभाव, तिचें तें मुलाला पदराखालीं मांडीवर घेऊन स्तनपान करणें, तिचा तो काळाभोर लांब सडक केशकलाप, तिचें तें हस्यमुख, तिचें तें विनोदानें आपल्याकडे अमलकमलदल नेत्रांच्या बांकड्या दृष्टीनें पाहणें, तिची ती मृत्यूची वार्ता, तिची ती गगनपुर येथील छत्री, ह्या सर्व गत गोष्टी त्याच्या डोळ्यासमोर मूर्तिमंत एकदम उभ्या राहिल्या.

इकडे वाड्यांत 'मी बाई आतां अगदीं थकलें. मला कांहीं जेवावयाचें नाहीं. जाऊन पडूं द्या लवकर,' असें एका चाकराला सांगत सांगत जिना वर चढून निहालकुवरबाई आपल्या वस्त्रपरिधानगृहांत गेल्या. मैनाबाईही त्यांच्या मागोमाग वाईसाहेबांचे सर्व कपडे व्यवस्थेनें ठेवण्याकरितां वर गेली.

या दासीबरोबर तिचें वागणें फार चमत्कारिक तऱ्हेचें होतें. घटकेंत रागावत असे. घटकेंत अगदीं मोकळ्या मनानें सख्ख्या बहिणीप्रमाणें तिच्याबरोबर वागणूक. घटकेंत अगदीं तोऱ्यानें हुकूम करण्याची वागणूक. घटकेंत शिव्या, घटकेंत बक्षीस. प्रसंगानुसार कसें वागावें हें मैनास पूर्ण

अवगत असे. एकंदरींत मैना फार हुषार असे. यजमानिणीवर तिची फार भक्ति असे, मग ती खरी किंवा कृत्रिम हें तिचें तिलाच ठाऊक!

आज निहालकुंवरबाईची तब्येत फार खुषींत होती. आपण ज्या समारंभाला गेली होती तेथील हकीकत मोठ्या आनंदानें मैनेला तिनें सांगितली.

एका टेबलावर एक मोठा आरसा होता, त्याजवळ दोन्हीकडे दोन मेणबत्या लाऊन दोन शामदानें ठेविलीं होतीं. त्याचे समोर उभे राहून निहालकुंवरबाई आपले अंगावरचे दागिने काढीत काढीत आरशांत पाहून जरा हंसत हंसत म्हणाली, 'आज अगदीं थकून गेलें बाई मैने; केव्हां एकदां पडेनसें झालें आहे.'

मैना:—माईसाहेबांच्च त्वांड जरा वायस कोमजलया आज, पन या येळला लई नामी दिसंतया. आकसी वृष्ट पडायाची. मीठमेहाऱ्या तरी उतरनें.

'होय तरग!' असें म्हणून निहालकुंवरबाई एका कोचावर जाऊन बसली आणि कपाळाला जरा आंठ्या घालून डोळे वर करून वेणीला हात लाऊन त्रासिक स्वरानें म्हणाली, 'कितीतरी वेणी आवळलीस ग? अगदीं सुचेना मेलं. नेत्र बाई डोकींतले नग काढून. अशी नाहीं झोंप यायाची. वेणी सोड कशी आणि बुचडा बांध नीट कसा येकदां. काय मेलीन वेणी घातली आहे पहा!'

मैना वेणी उकलण्याकरितां मागें उभी राहिली आणि वेणी उकलूं लागली तेव्हां निहालकुंवरबाई म्हणाली, 'कायग मैने, तूं आणि मी अगदीं सारख्या दिसतों म्हणे होय? सगळे लोक म्हणतात कीं अगदीं सारख्या म्हणून!'

'व्हय माईसाहेब. मलाबी संगद आसच ह्मनत्यात. काय मेल्यांना कळतया. आपू[illegible] कुनीकड आणि मी कुनीकड! आपन आक्-
सी चांदनीवानी [illegible]र! काय मेले ह्मनत्यात न्हाईका कुट इंद्राचा
एरावत आन् [illegible]ची तटानी.' असें मैनानें अर्जवानें उत्तर दिलें.

'तस नव्हे[illegible]ाझ्यासारखीच आहेस. तुझें नाक डोळे माझ्या-
सारखेच चांगले[illegible]झा आंगबांधा चांगला आहे, परंतु थोडी काळी
आहेस झालें. [illegible]णा खपण्यासारखा आहे. माझे केस लांब सड-
क काळेभोर [illegible]ोडे भोरे व कुरळे आहेत झालं. माझ्या भिंवया

बारीक रेखल्यासारख्या कमानदार आहेत, तुझ्या मोठ्या आहेत झालं. आमच्या सारखं कुडें तुझांला खायापियाला मिळतें ? झळक पळक कपडे कोडें मिळतात, हें जर तुला असतं तर तूं देखील फार चांगली दिसली असतीस असें ती हंसत हंसत म्हणाली.

ती मग थोडावेळ थांबून पुन्हां म्हणाली, 'काय बाई तरी पुरषाची जात! चटोर मेले. मीं मघां गेले होते तेथें दुसऱ्या पुष्कळ श्रीमंताच्या बायका अगदीं डागिन्यांनीं लकडलेल्या होत्या, पण त्यांच्याकडे कोणी पाहिना. माझ्याकडेच सगळे! सगळ्यांचे डोळे मजकडेच. मी तरी आज पुष्कळ डागिने घालून गेलें नव्हतें, पण काय मेल्यांनीं अगदीं पाहून पाहून बेजार केलें. मला बाई लाज वाटावयाला लागली. मला फार मेल्यांचा राग आला. मैना, खरच काय मी इतकी चांगली आहें, म्हणून ते सगळे मजकडे पाहतात ?'

अशा अनेक तऱ्हेच्या गप्पा त्या दोघींच्या मोठ्या आनंदानें बऱ्याच वेळ चालल्या होत्या. इतक्यांत सगुणा, आईला जेवावयाला बोलवावयाला म्हणून तेथें आली. त्यांच्या अशा गप्पा, हंसणें, खिदळणें तिला अगदीं आवडलें नाहीं; सगुणाताई आपल्या नौकर लोकांबरोबर कधींही फार सलगीनें वागत नसे. जेवढ्यास तेवढें. आपल्या आईचें याप्रमाणें दासीबरोबर हंसणें खिदळणें पाहून सगुणाताईच्या मनाला बरें वाटलें नाहीं. सगुणाताई म्हणाली, ' जेवायाला नाहीं कां येत ? थोडें कांहीं खाऊन नीज. उपाशी कां ?'

' मला बाई भूक नाहीं. माझें डोकें दुखायाला लागलें आहे. तूं आपली जेव जा आणि नीज जा कशी.'

पुढें आपल्या लेकीबरोबर जास्ती न बोलतां, मैनाला ती म्हणाली, ' बांध कींग बुचडा लवकर. वः! विंचरल्याखेरीज बांधतेस वाटतें! काय मेली आळशी तरी. तूं काय तोंडाकडे पहात उभी राहिलीस ? आटप लवकर.'

सगुणाताईला, याप्रमाणें नौकराशीं तिची सलगी पाहून, बाईट वाटलें खरें, पण जास्ती कांहीं न बोलतां ती मुकाट्यानें खालीं गेली.

बाईसाहेबांचा बुचडा बांधणें झाल्यावर डागडागिने, लुगडीं, शालू जेथल्या तेथें ठेवल्यावर मैना खोलींतून बाहेर जाण्याला दाराकडे वळली,

इतक्यांत पुन्हां तिला तिनें हांक मारिली, व ह्मणाली, 'मैने, इकडे येग माझें एक काम करशील कां?' 'व्हय माईसाहेब,' असें तिनें उत्तर दिलें

'हें वग तरमग. उद्यां पहांटे फास्ट ट्रेननें, करवीराला जा, आणि माझं एवढं काम करून ये. कोणाजवळ अगदीं बोलायाचें नाहीं बरं कां. अगदीं गुपचिप. कानास कोन कळतां उपयोगी नाहीं. तूं एवढं काम फत्ते करून आलीस, तर तुला मग एक दिवसाची रजा देईन; जा. तुझा कोण तो मेला माळी त्याला भेटायाला जा. झालं कीं नाहीं? पण कोणाजवळ बोलं नकोस अं. —'

'व्हय जी माईसाहेब,

'जा. तें दार तेवढें घट्ट लाव नाहीं तर कोणी येईल. कडी घालून ये, आणि वैस येथें.'

मैना दार लावून कडी घालून आली; आणि तेथेंच कोचाजवळ माईसाहेबाच्या पायांपाशीं बसली.

निहालकुवरबाई जरा पुढें सरकली, आणि मैनाच्या खांद्यावर एक हात ठेऊन दाराकडे एकदां बघून मैनाला हळूच कांहीं सांगून,मोठ्यानें ह्मणाली, झालं, एवढंच. तेव्हांच करून येशील. अगदीं सोपं बग. कशी लवकर परत येतेस पाहूं. चल बाई निजूं दे आतां,' असें ह्मणून ती तेथून उठून, पलीकडच्या खोलींत जेथें छपरपलंग होता तिकडे गेली. तिच्या मागोमाग मैनाही गेली. पलंगावरच्या गुडघ्या इतक्या उंच परांच्या गादीवर तिनें आपला कोमल देह टाकिला. त्या परांच्या गाद्यांपेक्षां व त्या साटीनच्या उशांपेक्षांही इचें शरीर मृदु!! पलंगावर निजली आणि ह्मणाली, 'मैने, हा इकडचा मच्छरदानीचा पडदा वर टाक. बाहेर कोणाचीं पावलें वाजतात? स्वारी आली वाटतें. जा बाई तूं आतां. तें विसरूं नकोस बरं कां? सकाळीं जातांना त्यांना सांगून जा बरकां, कीं माझा तेवढा हिरवा शालू कलावतूचा कशीदा काढायाला दिला आहे, तो आणायाला जातें ह्मणून.'

दुसरे दिवशीं सकाळीं निहालकुवरबाई बराच वेळपर्यंत उठल्या नाहींत. आठ वाजण्याचे सुमारास तोंड-धुऊन,(अजून वेर्णाफणी व्हावयाची होतीच) तशाच खालीं चहा घेण्याकरितां त्या येऊन बसल्या होत्या. तेथें जवळच जगदेवराव वर्तमानपत्र वाचीत बसले होते. इतक्यांत एक तांबडया डगल्याचा कांखेंत काठडयाची पोतडी अडकाविलेला शिपाई, हातांत एक

नांबडें पाकीट घेऊन, आला. पाकीट त्यानें तिच्या हातांत दिलें आणि एक कागद पुढें करून त्यावर तेवढी सही करून द्या असें म्हणाला.

'काय? तार !' असें ती घाबऱ्या घाबऱ्या म्हणाली. 'काय बरं हें! कोठली!' असें म्हणून भीतीनें तें पाकीट न फोडतां तसेंच हातांत धरून मोठ्या संभ्रमानें आपल्या नवऱ्याकडे पाहूं लागली. पाकिटावर 'चंपाबाई मास्तरीण यांस श्रीमंत प्रतापराव सरलष्कर यांचे घरीं देणें,' असें लिहिलें होतें. त्याप्रमाणें हें पाकीट सरलष्करांच्या घरीं जाऊन तेथून इकडे आलें होतें.

'पाकीट फोड—वाच पाहूं, काय लिहिलें आहे तें. अशी घाबरतेस कां? कांहीं नसेल.' असें जगदेवराव म्हणाले.

ही तार करवीराच्या मिस्, मुलींच्या शाळेची प्रिन्सिपाल, हिची होती. या मिसची चंपाबाईवर (निहालकुवरबाई) फार मेहरबानगी होती. इच्याच शिफारसपत्रावरून तिला सरलष्कराचे घरीं जागा मिळाली होती. ह्या मिस्, फार अजारी पडल्या, आणि त्यांनीं इला एकदां भेटून जा म्हणून ही तार केली.

निहालकुवरबाईनें तो कागद खालीं टेबिला आणि म्हटलें, 'अरेरे! मोठी गरीब! बिचारीची माझ्यावर फार ममता. मला नेहमीं म्हणे कीं, 'चंपे, तूं फार गरीब आहेस. मीं विलायतेला पेनशन घेऊन जातांना माझा हा इथला बंगला व कांहीं पैसे तुला देऊन जाईन. माझं असं नशीब उघडलें हें तिला काय माहीत? मीं तरी चांडाळणीनें पत्र पाठवावें कीं नाहीं. खरंच बाई मला जाऊंद्या तिला भेटावयाला. मीं जाणारच.'

जगदेवराव म्हणाले, 'अलबत. जाच. जर तुला ती तुझ्या गरीब स्थितींत उपयोगी पडली आहे, तर तुला आतां देवानें लोकांना मदत करण्याचें सामर्थ्य दिलें आहे, तर तूं मदत करावीस हेंच योग्य. (वर घडयाळाकडे पाहून) किती बरें वाजले ? साडे नऊ वाजले. पहिली गाडी तर गेलीच. दुसरीला अजून दीड तास अवकाश आहे. चल आटप लवकर. जरा लवकर लवकर आटोप म्हणजे जाऊं आपण गाडीच्या वेळेला स्टेशनावर. मीही स्नान करतोंच बग आतां.'

'मजबरोबर येतां कीं काय?' असें तिनें त्यास जरा खोंचून विचारिलें. ते म्हणाले, 'अलबत. मग काय तुला एकटीलाच जाऊं द्यावें म्हणतोस?' जरा विचार करून ती म्हणाली, 'बरं तर चला.' मिस—नें

आपला पत्ताविसा कांहीं त्यांत लिहिला आहे कां पहावरें', असें त्यांनीं म्हटलें.

'नाहीं—तें कांहीं नाहीं. मला ठाऊक आहे. ब्रम्हपुरीवर वालर स्ट्रीटच्या वरल्या बाजूला नदीकांठीं एक बंगला आहे, तेथें ती नेहमीं राहते. काय बाई त्या बंगल्याचें नांव. मला आतां आठवत नाहीं लवकर. (जरा आठवण केल्यासारखें करून) हो "लव्हली कयासल." तेथेंच ती नेहमीं राहते,'. असें म्हणून ती चटदिशीं उठली. गडबडीनें वेणीफणी करून आंग धुवून जेऊन उठून जाण्याच्या तयारीनें शाल पांघरत आहे तोंच तबेल्यांतून घोड्यांची गाडी येऊन द्वारमकोट्याखालीं उभी राहिली. जगदेवराव गाडींत जाऊन बसले आणि 'हं चल लवकर' असें मोठ्यानें तिला म्हणाले.

या वेळेस माडीवर ती आपल्या वस्त्रपरिधानगृहांत होती. एका खोलींतून दुसऱ्या खोलींत जाण्याला चोर दरवाजे होते हें आम्हीं मागें वाचकांस सांगितलेंच आहे. अखेरच्या खोलीचा बाहेरचा दरवाजा बंद केला म्हणजे बाकी कोणच्याही खोलींत जातां येत नसे. या अशा अगदीं गडबडीच्या वेळेसहुद्धां खोलीच्या बाहेरच्या दाराला दुकाटी चवचें कुलूप लावायला ती चुकली नाहीं. किल्ली आपल्या पोटीं लाविली आणि धडधड जिना उतरून खालीं गाडींत बसावयाला ती आली आणि म्हणाली, 'हं हाण वाबा लवकर आतां. अगदीं थोडा वेळ राहिला. फक्त वीस मिनिटेंच.'



भाग ८ वा.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें जगदेवराव आपल्या नवयौवना स्त्री-वरोवर करवीरास गेले. मग अर्थातच गणपतरावाचें नारायणरावावरोवर वाड्यांत भोजनाला जाणें तहकूव झालें. आणि त्या तरुण दुःखी नारायणरावाची ओळख करून घेण्याचें सगुणाताईचें जरा लांबणीवर पडलें.

नारायणरावाला भेटण्यांत सगुणाताईचा विशेष कांहीं हेतु होता, असें अगदीं नाहीं. फक्त हें तिचें कृत्रिम औत्सुक्य होय, हेंच खरें.

नारायणरावालां, विशेषेंकरून गणपतरावाला भेटण्याला जाण्याचें सगुणाबाईच्या मनांत मात्र फार होतें. ..... मासांतील समारंभसंबंधी गणपतराव कांहीं तरी गोट काढील, कांहीं तरी विनोदाचें भाषण करील, तें एकदां तरी ऐकावें, म्हणून गणपतराव येथें आल्यापासून या तीन दिवसांत गडाहून या गांवाकडे तिनें पांच पंचवीस वेळां आपल्या जरद्या घोडीवर वसून हेलपाटे घातले असतील. अपक्कमायुकांचे व्यवहार असेच कांहीं विलक्षण असतात !

मासे धरण्याच्या खेळापासून आमच्या गणपतरावासारख्या शिथिल वृत्तीच्या मनुष्याला किंतीसा आनंद होणार आहे ? आठ दिवसांतून कधींतरी एखादे दिवशीं घटकाभर मजेनें गळ टाकून वसलें म्हणजे झालें. परंतु येथें आल्यापासून तर रोज सारखाच धंदा. हा कां त्यांचा धंदा, म्हणून यांत त्यांचें मन रमेल ? घटकाभर मजेखातर हे हें काम करणार. वरुणराजाचे प्रियपुत्र धीवरच हा धंदा करूं जाणत. नारायणराव तर काय अगदीं सांब बनले होते; यापेक्षां गणपतराव दरवेशी आणि नारायणराव अस्वल असें झटलें तर विशेष शोभेल. तो नेईल तिकडे नेईल. सर्वस्वी त्याच्यावरच अवलंबून असणारा, अशी त्याची वृत्ति झाली होती. आतां गणपतरावाला या खेळाचा फार कंटाळा आला. वांकडीं तिकडीं वळणें घेऊन गांवाच्या बाजूबाजूनें गेलेल्या नदीच्या कांठीं बाभळीच्या झाडांखालीं किंवा निरगुडाच्या झुडपांखालीं बसून दोरीकडे टक लावण्याचें त्याला फार कटाळवाणें वाटूं लागलें.

बराच वेळ विचार केल्यावर गणपतराव नारा ाणि खाऊ द्यायला ! वीरास आपल्या बावडयावरच्या 'आनंदभुवन' : रखें राहिलें झणजे कंटाळा येतो खरा; परंतुएकं मला आज सकाळींच पेक्षां तेथें राहणें फार वरें. काय हें गांव ! तीन नें विचारिलें आहे कीं, तीन दिवसांत एक दिवस देखील चांगला चिरूट ओ आपली भेट होईल नाहीं. आमचे हे 'सूर्यप्रकाश' खाणावळीचे मालक आणू. करवीरास निदान हा तरी त्रास नाहीं. पाहिजे तेव्हां चिरूट फार नामी त्रास वोवा येथें. व्हेरी ग्लूमी. (फार उदास) नव्हे नारायणरावरावणीनें हो, तुम्हाला कसें वाटतें.

नारायणराव चव्हाण हे कधीं आपल्या मनानें इकडे आले होते ? यांना थोडीच इकडे येण्याची उत्सुकता होती ! गणपतराव चल म्हणाले, व हे आले. मग आतां तरी परत करवीराला जाण्याला हे नको कशाला म्हणतील ? ते म्हणाले, ' खरेंच गणपतराव, चला करवीराला. मलाही तेथें गेल्यावर शिरोळास जाऊन यावयाचें आहे. एक महिन्यांत छोकऱ्याला पाहिलें नाहीं. कधीं पाहिनसें झालें आहे. '

अलीकडे या दोन दिवसांत नारायणराव गणपतरावास एक दोनदां म्हणाला, ' गणपतराव, या जन्मांत आपण कधींही कविता वाचली नाहीं. आपल्याला त्यांत कांहीं विशेष वाटत नाहीं. उगीच आपले टला ट आणि पला प जोडून शब्द जुळविले असतात झालें. कवीसारखी काल्पनिक सृष्टि उत्पन्न करण्याचें माझ्या मनांत कधींच येत नाहीं; परंतु काय असेल तें असो, अलीकडे तीं वारल्यापासून असे विचार कधीं कधीं माझ्या मनांत येतात. एखादे वेळेस असें वाटतें कीं, मीं एखाद्या डोंगराच्या अगदीं पुढें झुकलेल्या कडयावर उभा आहें. खालीं पायथ्याला समुद्र आहे. समुद्रांत वादळ झालें आहे. पर्वतप्राय लाटा माझ्या पायांवर येऊन आदळत आहेत. समुद्रास जास्ती जास्ती भरती येत आहे. मीं ज्या कडयावर उभा राहिलों आहे, तो अगदीं आतां खालीं ढासळतो आहे. आतां तासां दोन तासांत मीं समुद्रांत गडप होणार. '

गणपतरावानें बराच वेळपर्यंत नारायणरावाकडे चकितमुद्रेनें पाहिलें आणि मग मोठ्यानें ' हं ' करून झटलें,' राजेभी, आज कांहीं जास्ती कमी झालें आहे वाटतें. आज फार लेक्चर सुरू केलें आहे ? खरोखरच

अर (हवापालट) पाहिजे आहे. आनंदभुवन
व एजंट स्ट्रीटमध्यें फिरल्याखेरीज किंवा
ऐ) केल्याखेरीज तुला समाधान वाटणार नाहीं.'
हमं पुन्हां ते झणाले. 'कदाचित् या भिकार चिरु-
मागील भागांत सांगि असेल. काय लेकानें चिरुट दिलें आहेत पहा:
बरोबर करवीरास
वाड्यांत भोजनें परत करवीरास जावयाचें, असें त्यांनीं ठरविल्यावर
णरावाची, त्यांची नासाचे आंतच सगुणाताई आपल्या जरद्या घोडीवर बसून
न्यां त्यांना भेटली. उद्यां आपण जाणार, हे गणपतरावाच्या तोंडचे
-ब्द ऐकिल्याबरोबर तिला फार आश्चर्य वाटलें व जरा वाईटही पण
वाटलें.

ती झणाली, ' काय ? इतक्यांत कंटाळा आला! खरंच तुझी कोणी येथें मित्रमंडळी नाहीं, कांहीं नाहीं. वाडयांत आम्ही काय ते तेवढे. गांवांत कोणी नाहीं. तेथें काय पुष्कळ फक्कड स्नेहीमंडळी आणि—'

ती कांहीं पुढें बोलणार तों मध्येंच गणपतराव झणाले, 'मलातर तेथें मुख्य उत्तम चिरुट ओढावयाला मिळतात. निहालगडगांव तर माझी जन्मभूमी. माझी वतनवाडी येथें. हा गांव मला फार आवडतो; परंतु काय उपयोग ? तंबाकु ओढावयाला मिळेल तर ना सगळे ? भोपळीचा पाला तरी बरा बोवा येथल्या तंबाकूपेक्षां !

सगुणाताई—तर मग उद्यां तुम्ही खास जाणार झणावयाचें ?

गणपतराव—अलबत. उद्यां दहा-पन्नासच्या गाडीनें जाणार, ठरलें.

सगुणाताई—तर मग निहालकुवरबाईला नारायणरावांची भेट होत नाहीं ? आणि नारायणरावही, आमच्या या सगळ्या प्रांतांत फार सुंदर झणून नांवाजलेली स्त्री, पहाण्याची संधी घालवितात.

'होय खरेंच ' असें नारायणराव अडखळत अडखळत म्हणाले.

गणपतराव—आग सगुणाताई, आमच्या नारायणरावाला त्याचें कांहींच नाहीं. याचें मन कोठें आहे जाग्यावर? यांना काय ? तिला पाहिले काय ? आणि नाहीं काय ? दोन्हीही सारखेंच. याचें मन सगळें शिरोळास आहे, तेथें त्यांचें आहे एक शेंबडें पोर ! त्याच्या [illegible]

देखील नाहीं ! जातो त्याला वरचेवर भेटायाला आणि खाऊ द्यायला ! काय शिंचें पोर ! अहाहा !

'आज रात्रीच्या टपालांतूनच मी पत्र पाठविनें. मला आज सकाळींच तिचें (निहालकुवर) पत्र आलें आहे. त्यांत तिनें विचारिलें आहे कीं, तुमचा मुक्काम अजून येथें किती दिवस आहे. त्यांची आपली भेट होईल कीं नाहीं म्हणून.'

असें बोलून सगुणाबाईनें एक पत्र काढिलें त्यांत सुवाच्य, फार नामी अक्षरांनीं लिहिलें होतें कीं, 'तूं फार विसराळू आहेस. पक्या आठवणीनें चौकशी करून न विसरतां मला सदरहू माहिती जरूर कळीव.'

'अक्षर किती तरी चांगलें आहे!' असें गणपतराव म्हणाले. 'खरोखरच फार चांगलें आहे नाहीं ? हें पहा,' असें म्हणून सगुणाताईनें गणपतरावाच्या हातांत तें पत्र दिलें आणि आपल्या चपल घोड्याच्या मानेवर थाप मारून 'जरा दम धर बेटा असमानतारा; जरा दमधर.' असें म्हणून एका जाग्यावर उभें राहण्यास कंटाळल्यामुळें पुढें जाण्याकरितां ओढ खाणाऱ्या घोडीस ती चुचकारूं लागली. 'दे बावा लवकर पत्र, ही कांहीं राहत नाहीं–(हं जरा दमभर असें घोडीला म्हणून) असें गणपतरावास ती म्हणाली.

'अहाहा !! काय नामी अक्षर ! असें चांगलें अक्षर आपण कधींच पाहिलें नाहीं. कागद तरी किती नामी आहे ! ह्या अक्षराला तो शोभतो खरा. किती तरी खुबीदार अक्षर—अक्षर पाहूनच तहानभूक हरावयाची. या अक्षरावरूनच ती किती सुंदर आहे हें उघड दिसतें. किती तरी नाजूक हात असले पाहिजेत असलें बाळसेदार अक्षर निघायाला ! अरे नारायणराव, पहा तरी ! छेः तूं मोठा अरसिक बोवा !' असें गणपतराव मोठ्यानें म्हणाले.

शून्यहृदयी नारायणराव या दोघांचें बोलणें चाललें असतां पलीकडे दहा पंधरा हातांवर जवळच एक लहानसा ओढा झुळझुळ वाहात होता, तेथें जाऊन हातांतल्या काठीनें पाणी उगीच ढवळीत उभा होता.

'बरें असूंदे किरे' असें जरा तिरस्कारानेंती म्हणाली. (निहालकुवरची शिफारस इला आवडत नसे. तिचें इचें किती मन शुद्ध होतें हें वाचेकांस

माहितच आहे.) दे बाबा लवकर. अगदीं संध्याकाळ झाली. मला यायें अजून उत्तर लिहावयायें आहे.' (नारायणरावाकडे वळून) 'ओळख ठेवा अं.' (आणि 'चलबाई' असें घोडीस म्हणून) 'येतें बरं गणपतराव,' असें पुन्हां म्हणाली व घोडीस टांच मारून दौडत चालती झाली.

असमानतारा सानरक निघाली. या दोघां गृहस्थांनींही आपल्या बिऱ्हाडाकडे जाण्याचा रस्ता धरिला. सगुणाबाईला गणपतरावाचा फार राग आला असावा असें दिसतें. नाहींतर, 'एक बाबा, कीं हा. हेच काय ते माझ्या जिवाचे; आणि आतां यांचा माझा संबंधही होणार. कसं बाई यांच्याजवळ नांदाव ? फारच लहरी !' असें ती कां म्हणाली असती ?

दुसरे दिवशीं सकाळीं दहा पन्नासाच्या गाडीनें गणपतरावाचे व त्याच्या मित्रायें करवीरीं जाणें झालें नाहीं. आमच्या तरुण वकील साहेबांचें डोकें इतकें दुखूं लागलें कीं त्यांच्यानें अंथरुणावरून उठवेनासुद्धां. त्यांनीं नारायणरावाला सांगितलें कीं,'मला थोडा चहा करून आणून देण्याला सांगा, व आज कांहीं आपलें जाणें होत नाहीं. उद्यां सकाळीं जाऊं.' नारायणराव कधीं आपल्या मित्राच्या विरुद्ध बोलतील काय ? छेः असें कधींही होणें नाहीं. यात्रमाणें जाण्याचा बेत रहित होऊन, गणपतराव दोनप्रहरीं कोठें बाहेर न पडतां अंथरुणावर संगीतशाकुंतल वाचीत पडले.

गणपतराव वरचेवर मधून मधून म्हणत, 'छेः हें कांहीं दुसरे कशानें नाहीं. सगळा हा येथल्या चिरुटांचा गुण. ह्या वेळेला जर तो खाणावळया माझ्या समोर येईल, तर या सोडग्यानेंच त्याचें डोकें फोडितों पहा, लुच्चा कोउला, ब्लडी रास्कल. ह्यांग हिम्.'

खरोखरच त्या खाणावळयाचें नशीब चांगलें, म्हणून त्या दिवशीं बाजार होता आणि तो बाजारांत आउवड्याचें सामान खरेदी करावयास गेला होता. नाहीं तर आज या गरीबाचा कपाळमोक्ष खास ! अलबर्ट एडवर्ड हास्पिटलाचा लागलाच रस्ता धरावा लागला असता विचाऱ्याला !!

सारा दिवस गणपतरावाला चैन पडलें नाहीं. घटकेंत खाणावळयाला शिव्या, चिरुट ओढण्याची वेळ आली कीं पुन्हा उद्धार. घटकेंत आपल्या कुळाला शिव्या, असें कांहीं सारादिवस चाललें होतें. मग शेवटीं .

थंड वेळेस गणपतरावांनीं अमळ आराम वाटल्यावर आपल्या मित्राला बरोबर घेऊन वाड्याकडे जाण्यानें ठरविलें. ते म्हणाले 'फार नाहीं, जाऊन पाहून यावयाला लागतील दोन तास. येथें चार दिवस राहून आणि इतक्या जवळ येऊन तुला निहालगडावरचा मोतीचौकवाडा दाखविल्याखेरीज परत जाणें बरें नाहीं.'

हें मित्रद्वय वाड्याकडे निघालें तेव्हां सूर्य अगदीं अस्तास गेला होता. तें कुरणांतून जवळच्या पाऊल वाटेनें चाललें. ही संध्याकाळची वेळ, जिकडे तिकडे कुरणांत शांत. मधूनच कोठें तरी आसपास पाण्याच्या डबक्यांत असलेल्या बेडकांचा डरांव डरांव शब्द मात्र कानीं पडे. वारा अगदीं नव्हता. झाडाचें पान देखील हलत नव्हतें. पूर्वेकडच्या बाजूला आकाशांत सप्तवर्णालंकृत इंद्रधनुष्य दिसत होतें. आकाशाचा तांबूस तांबूस धुरकट रंग झाला होता, लांबचे पदार्थ जवळ दिसत होते, वनौषधीचा परिमल विशेषेंकरून सर्व कुरणांत पसरला होता, रानपाकोळ्या आकाशांत फार उंच उडत नव्हत्या, गायीवासरें दीर्घ ग्रीवा करून आपलें घ्राणेंद्रिय विस्मृत करून घराकडे निघालीं होतीं. या सर्व चिन्हांवरून लवकरच एक दोन दिवसांत वळवाचा पाऊस येईल असें दिसें. आकाशाकडे पाहून गणपतराव म्हणाले, ' पाऊस लवकरच येईल असें दिसतें. ह्या पहा बेडक्याही ओरडतात. ह्या दिवसांत एखाद्दुसरा वळवाचा पाऊस येतो. नाहीं हो नारायणराव ?'

हे असें बोलत आहेत, तोंच ते वाड्याजवळ येऊन पोहोंचले. वाड्यांतील चौकीवरच्या घड्याळांत सहा ठोके पडले. ते ठोके ऐकून गणपतराव म्हणतात, ' काय सहाच वाजले सारे ! (आपल्या खिशांतलें घड्याळ काढून पाहून) वः आमचे तर सात झाले. काय मामासाहेबांचें घड्याळ ! कांहीं तरी आहे झालें. '

चिंचेच्या बनांतल्या रस्त्यानें ते आंत गेले तों त्यांस सगुणाताई त्या पडक्या विहिरीजवळच हवा खात इकडे तिकडे फिरत असलेली दिसली.

नारायणराव म्हणाले 'कितीतरी येथें शांत आहे. जिकडे तिकडे उदास मला वाटतें. गगनपूर येथील मसणवटच जणूं !!'

हे तिघे मिळून त्या विहिरीवर गेले. ज्याप्रमाणें एखाद्या अति जु-

ट वराबद्दल किंवा विहिरीबद्दल लोक नानातऱ्हेच्या गप्पा सांगतात, म्ह- णजे कोणी तेथें पिशाच आहे म्हणतात, कोणी विहिरींत वाळंतीण पडून मेली ती लागते म्हणतात, कोणी येथें घराचा मालक आहे तो रोज रात्रीं दिसतो, दर अमावास्येस पायलीचें अन्न त्याच्या नेमलेल्या ठिकाणीं टाकावें लागतें नाहीं तर तो घरांत राहणाराला उपद्रव करितो असें म्हण- तात. त्याप्रमाणेंच सगुणाबाईनेंही त्या विहीरीबद्दल परंपरा चालत आलेली एक दंतकथा यांना सांगितली.

गणप०—सगुणाताई, नारायणरावला आंत वाडा दाखवायचा आहे. चल आंत जाऊं.

सगुणा०—'अरे, आल्याबरोबर बोलावेंस कीं नाहीं ! बरें तर चला आंत.'

ते दिल्लीदरवाज्यानें आंत गेले. समोरच्या चौकांतच या दोन गृह- स्थांच्या नजरेस एक स्त्री दिसली. तिचा तो नखरा पाहून आमचे गृहस्थ तिच्याकडे ही कोण असावी असें मनांत येऊन पाहूं लागले. वाचकांस ही स्त्री कोण हें माहीत आहेच. ते नाहीं अशा बुचकळ्यांत पडणार. ही आमची मैना निहालकुवरबाईची लाडकी नखरेबाज दासी. ते वर जा- ण्याकरितां जिना चढूं लागले. तों सगुणाताई तिच्याकडे वळली आणि म्हणाली, 'आम्हीं इकडे वाचनगृह, दिवाणखाना, क्रीडाभुवन, वायुमंदीर पाहून येतों; तोंपर्यंत माईसाहेबांच्या रंगमहालाचें दार उघडून ठेव म्हणजे त्यांना सर्व दाखवूं. जेथल्या तेथें सगळें सामान आहेनाग ?'

'व्हय जी. संमद पाक हाय. पन किल्लीचा हाता न्हाई कीं मजजवळ ताईसाहेब. आन् माईसाहेबांनीं बराबर नेलाया नव्हका.' असें मैना म्हणाली.

सगुणा०—काय किल्या बरोबर नेल्या आहेत! छेः असें नाहीं कधीं व्हावयाचें. पहा नीट. असें काय ?

मैना—व्हय जी. हाता असता तर हिथ, वरच्या खोलींत खुटीला असतोया पन तथ न्हाई. मी मगाच पायला.

सगुणा०—काय बाई तरी माणसाचा स्वभाव ! ही किल्ली कशा- ला बरोबर? इचा रंगमहाल का कोणी खातें वाटतें ? का कोणी चोरून नेतें ? कोणाला जाऊक! फारच चमत्कारिक स्वभाव ! (जरा त्रासानें) जें

कांहीं एकदा मनांत आलें तें आलें सगळ्याला औषध आहे, पण स्वभावाला मात्र नाहीं. काय, म्हणावें तरी काय्‌या स्वभावाला? बाबाला कसा आवडतें कोण जाणें! काय करावें आतां? तिच्या महालांत व वस्त्रपरिधानगृहांत फार सांगल्या चांगल्या तसविरा आहेत. तेथेंच हातानें काढलेली तिची एक तसबीर आहे. फारच नामी. परवां तो तंजावरचा चितारी आला होता त्यानें काढिली. अगदीं हुबेहूब उतरली आहे. बाबांनीं त्याला पांच हजार रुपये दिले!

गणप०—काय करावें आतां. छेः बोवा. आतां असली तसबीर पाहिलीच पाहिजे. (फार उतावळा होऊन) आय मस्ट सी इट ऍट एनी रिस्क कसेंही करून पाहिलीच पाहिजे. तिच्या महालांत जाण्याला दुसरी वाट नाहीं कां ग सगुणाताई?

'काय, दुसरी वाट!!' येवढेंच सगुणाताई म्हणाली.

पुन्हा गणपतराव फार उत्सुकतेनें म्हणाले, 'दुसऱ्या कोणच्या तरी खोलींतून जाण्याला रस्ता असेल बघ. सगळ्या वाड्याभर जिकडे तिकडे चोरवाटा आहेत आणि इथेंच कशी नाहीं? असेल तर.' (थोडावेळ थांबून आठवल्यासारखें करून) 'हं, तुझें तें लहानपणचें क्रीडाभुवन म्हणून खोली होती, त्या खोलीला खालून एक चोरजिना खोलींतून आहे, हें मला ठाऊक आहे. तुला आहे कां आठवण? तूं एकदां खेळतां खेळतां पडलीस आणि धप्‌दिशीं आवाज झाला तो. आम्ही सर्व फळ्या काढून पाहिल्या तों एक खोली व जिना दिसला त्याची आहे कां आठवण, तुझें पूर्वीचे क्रीडाभुवन तेंच आतां तिचें वस्त्रपरिधानगृह होयना? मग तेथुन रंगमहालाला जाण्याला आहेच रस्ता. चल त्या रस्यानें"

याप्रमाणें ठरवून, ते बाकीचा सर्व भाग पाहून आल्यावर, त्या खोलीकडे जाण्याला निघाले. त्यांनीं एक मेणबत्ती लावून घेतली. एका चोरवाटेनें या खालच्या खोलींत ते गेले. तेथील ती दमट हवा, तो कुमट वास ओलसर जमीन पाहून गणपतराव म्हणाले,—'काय! निवळ भुताचीच जागा! भूत कशाचें म्हणा. अशा जागा पाहून मनांत कांहीं येतें आणि 'यासच आपण भूत म्हणतों म्हालें.'

"मला बाई येथें फार गुदमरायाला लागतें. तुम्हीच जा कसे. मी नाहीं येत. मी बाहेर उभी राहतें. काय तरी बाई चोरवाटा! मला वाटतें तिला

नसेल माहित अशी चोरवाट आपल्या रंगमहालांत येण्याला आहे म्हणून.' असें म्हणून सगुणाताई बाहेर आली. मग गणपतराव नारायणरावास म्हणाले, ' नारायणराव, संभाळून अं. अगदीं लहान मुलासारखें रांगत रांगत गेलें पाहिजे. वर चढतांना पहिल्यानें जिन्यांत हळूच डोकें घाला. हळूच चढा. दोन चारच पायऱ्या आहेत, पण फार उंच. कंबरेइतक्या एक एक उंच आहेत. फार जपून बरें, नाहीं तर डोकेंबिकें फुटेल. मी पुढें जातों. माझ्या मागेंच जपून या. बाबा, असें केल्याखेरीज कां तसबीर पहावयाला मिळते ? '

याप्रमाणें नारायणरावाला सर्व सूचना देऊन गणपतराव जिना चढले. नारायणरावही मांगोमाग चालले, जिन्याच्या अखेरच्या पायरीवर उभे राहून गणपतरावानें दोन्ही हातांनीं जोरानें वर रेंटलें. फळी एकदम उघडली व खालीं अंथरलेली ' परशियन कारपेट' त्यांच्या हाताला लागली. तिचा शेवट धरून त्यांनीं ती उलटी केली, तेव्हां चांगली मोकळी हवा एकदम आली; मग ते वर चढले आणि नारायणरांवास ' या हळूच ' असें म्हणाले.

हातांतील मेणबत्तीच्या उजेडानें खोलीभर अस्ताव्यस्त पडलेले कपडे त्यांचे दृष्टीस पडले. कपडे ठेवण्याचें कपाट उघडेंच ! कोंचावर एक हिरवा शालू चोळाचोळा झालेला तसाच. पलीकडे फणेऱ्याची पेटी टेबलावर मोकळीच. कांहीं अत्तरांच्या कुप्यांचीं बुचें निघालेलीं तशींच. हिरव्या चांफ्याच्या फुलांचा सुकलेला गजरा तेथेंच गालीच्यावर. करवीराला जातांना पहिलें लुगडें सोडून दुसरें नेसतांना पहिलें लुगडयाच्या निऱ्या असलेल्या जशाच्या तशाच. एक काचोळी पहिल्यानें हातांत घेऊन मग ती नको म्हणून वाटल्यावरून फेंकून दिलेली, तशीच पलीकडच्या कोपऱ्यांत. गडबडीनें जातांना दागीने अंगावर घालण्याकरितां म्हणून चंदनाची पेटी उघडलेली तशीच. आंतील चांदीच्या डब्या जिकडे तिकडे अव्यवस्थित. याप्रमाणें त्या खोलीभर जिकडे तिकडे बायकांचें सामान पडलें होतें. टेबलावर एक मोठा आरसा होता, त्यांत नारायणरावाला आपले प्रतिबंब पाहून फार मजा वाटली. ह्या वस्त्रपरिधानगृहांतून ते तिच्या रंगमहालांत गेले. तेथें जिकडे तिकडे तसबिरा—कांहीं पुर्ण चित्रशाळेतल्या, कांहीं तंजावरच्या चित्राऱ्यानें काढलेल्या, कांहीं देखाव्यांच्या कांहीं मोठमोठ्या साहेब लोकांच्या व मडमांच्या, व

कांहीं 'फ्रेंच पिकचर्स' नांवाखालीं सोडणाऱ्या कामोद्दीपक तसविरा, त्र तशाच कोकशास्त्रांतील चौऱ्याशी प्रयोगांच्या त्यांत प्रवीणता उत्पन्न करणाऱ्या तसविरा लटकल्या होत्या! त्यांतच एका उंच चौरंगावर एक भली मोठी सोनेरी चौकटींत बसविलेली तसवीर होती. ही एका स्त्रीची, ती उभी असून हास्यमुख आहे अशी काढलेली होती. चेहऱ्यावर आनंद व विलासी स्वभाव उघड दिसत होता.

गणपतराव आणि नारायणराव भिंतीवरचें वेलबुट्टीचें काम व तसविरा पहात पहात त्या तसविरीजवळ आले. तेथें आल्यावरोबर गणपतराव एकदम आश्चर्यचकित होऊन म्हणतात, 'आहाहा! हीत्र ती तसवीर. आपण चांगली पाहूं या. हें पहा .नाराणराव, येथें कांहीं जास्ती उजेड नाहीं. एकच मेणबत्ती. तेवढ्यानें दोघांला एकदम सगळा भाग पहातां येणार नाहीं तर मी अगोदर पाहतों. तोंपर्यंत तू बैस तेथें.' हें ऐकून नारायणराव मागें सरकले आणि आपल्या नेहमींच्या उदास वृत्तीनें एक हात खिशांत व एक हात खिडकीच्या चौकटीवर ठेवून बाहेर पहात उभे राहिले.

नारायणरावांनीं तेथील एक खुर्ची ओढून घेतली आणि मेणबत्ती हातांत धरून त्या तसविरीपुढें पहात बसले. बराच वेळ लक्ष लावून पाहिल्यावर ते आपल्याशींच म्हणतात, 'धन्य आहे त्याची! काय रूप हें! अंबाडीबुचडा पहा कसा नामी बांधला आहे! आणि त्यावर तो फुलांचा गजरा पहा किती शोभा देत आहे तो! केसांच्या आंगीं मृदुपणा तरी किती दाखविला आहे! शिरीषकुसुम यापुढें काय मऊ! हिरवा शालू नेसली आहे. किती खुबदार तरी त्याच्या निऱ्या दाखविल्या आहेत! घोळाच्या निऱ्या पाहा कशा सारख्या दोन्ही पायांचे मधें ऐटींत लोळतात त्या! एक भिंवई वर चढवून पहा कशी हळूच गालांत हंसत आहे! डाव्या हातांत तें बूक तरी किती मौजेनें धरलें आहे पहा. नाक तरी किती सरळ. यांत नथ घातली नाहीं त्यानेंच हें फार शोभत आहे! नाहींतर काय फार विद्रुप दिसलें असतें. नथ कोणाला नकटया, अपऱ्या नाकाला. आहाहा! हुबेहूब निहालकुवरबाई. फार नामी तसबीर. आहाहा ग, तूं फार मूर्ख आहेस असें मी म्हणतों. तुला अशा सुंदरीला असा म्हातारा नवरा!! या काळेभोर केसांला ते पांढरे अंबाडी सारखे केंस शोभतात काय? ती बे-

कडासारखी दाढी या मर्त्त हत्तीच्या गंडस्थळाप्रमाणें शोभणाऱ्या वक्षस्थलावर पडलेली शोभेल काय ? छेः छेः अगदीं नाहीं, केवढी तूं मूर्ख! अशा म्हाताऱ्यावरोबर लग्न करण्यांत तुझा काय बरें मनलब. पैसा म्हणावें, तर याच्या पेक्षां शतपट श्रीमंत व रूपयौवनसंपन्न पुरुषांनीं तुझ्या पायांवर लोळण घातली असती. बरें मानमरतबाच्या आशेनें म्हणावें तरी प्रत्यक्ष महाराज सरकारही तुझ्या पुढें हात जोडून उभे राहिले असते. मग इतरांची कथा काय ? एकंदरींत जगदेवराव (फारच्युनेट) भाग्यशाली, खरा, वेरें असो ' असें म्हणून खुर्चीवरून ते उठले आणि ' नारायणराव, या पहा तुम्ही आतां. अशी स्त्री आपण कधींच पाहिली नाहीं.' असें म्हणून नारायणरावाचे हातांत मेणबत्ती देऊन आपण खिडकीपाशीं जाऊन ' जातीच्या सुंदरांना कांहींही शोभतें ' असें म्हणत उभे राहिले.

नारायणराव मेणबत्ती हातांत धरून खुर्चीवर जाऊन बसले आणि तसविरीकडे पाहून म्हणाले, 'ही कां तसबीर ! जिवंतच स्त्री आहे. बोलत नाहीं. उगीच पहात उभी आहे म्हटलें.' हा काढणारा चितारी नव्हे. प्रत्यक्ष विश्वकर्माच. डोळ्यांतील पाणी पहा कसें चमकतें तें. ओठ जरा उघडे उमळलेल्या कळीप्रमाणें कसे नामी दिसतात. वाटतें आतां कांहीं बोलणार आहे जशी !'

यापेक्षां जास्ती नारायणराव कांहीं बोलले नाहींत. मेणबत्ती उजव्या हातांत घट्ट धरून डावा हात खुर्चीच्या हातावर ठेऊन, अगदीं स्तब्ध होऊन तसबिरीकडे ते पहात बसले. परंतु काय आश्चर्य पहा ! जणूंकाय आगीचा डोंब पुढें आहे. त्यानें अगदीं आंग भाजून निघालें आहे. घामाच्या धारा आंगांतून चालल्या आहेत. ज्वाळा त्या तसविरींतूनच निघत आहेत व त्यानें अगदीं घाबरें होऊन हुरश हुरश करीत अगदीं भांबावून गेला आहे. याप्रमाणें त्याची एकदम स्थिति होऊन मस्तक अगदीं लाल होऊन व भ्रमिष्ट होऊन डोळ्यांची पापणी देखील न हालवीतां दगडासारखा तसविरीपुढें हा बसला.

इतक्यांत गणपतराव खिडकींतूनच म्हणाले, ' अरे, नारायणराव, काय झोंपवीप लागली कीं काय !'

' होय असें खरें ' नारायणराव एकदम सावध होऊन म्हणाले.

गणपतराव म्हणतात ' अरे नारायणराव, तुला थंडी झाली वाटतें. इत-

का करिं तुझा आवाज घोगरा झाला? मघां नव्हता आणि इतक्यांतच मला वाटतं ही संध्याकाळची थंडी आणि त्या खोलींतली दमट हवा, त्यानें तुला असें झालें. आतां परत गेल्यावर जरा थोडें गरम घे म्हणजे झालें. उद्यां सकाळीं साफ होईल. चल जाऊं आतां.'

गणपतरावानें नारायणरावाच्या हातांतली मेणबत्ती घेतली आणि जिना उतरूं लागले, नारायणरावही त्यांचे मागोमाग जाऊं लागले. तेव्हां गणपतराव नारायणरावास म्हणाले कीं, तेवढी फळी खालीं ओढून द्या. त्याप्रमाणें त्यानें फळी ओढून घेतली. पहिल्याप्रमाणें रांगत रांगत त्या खोलींतून बाहेर पडले. बाहेर आल्यावरोबर सगुणाताई त्यांना वाट पहात बसलेली आढळली. तिनें यांना पाहून एकदम 'कसें काय ?' म्हणून विचारिलें.

गणपतराव म्हणाले. 'हो, काम फत्ते.'

'आपल्याला नाहीं बाई ती तसबीर आवडत, चिताऱ्यानें वाजवीपेक्षां फाजील काम केलें आहे. चितारी लोकांची खोडच ती. मला नाहीं वाटत आमच्या माई अशा स्थितींत कधीं उभ्या राहत असतील. आतां कधीं राहणार नाहींत, असें नाहीं मीं म्हणत. असें उभें राहण्याचें मनांत आणल्यास त्या राहूं शकतील, ' असें सगुणाबाई मोठ्या डौलानें म्हणाली.

गणपतराव म्हणाले, ' काय ग सगुणाताई, तुझें हें कुत्सितपणाचें बोलणें? बायकांचा स्वभाव फारच मत्सरी. दुसऱ्यांना सुंदर म्हटलेलें त्यांना कधीं खपावयाचें नाहीं. मग स्वतः आपण कितीका कुरूप असेना ? ती तसबीर ती तसबीर आणि आमच्या मामीसाहेब त्या मामीसाहेब. बस्स. झालें. उगीच कशाला वादविवाद. होय कीं नाहीं ? अभाळ बेरंच आलें आहे. वीज पण चमकते आहे. आम्ही छत्री आणिली नाहीं. एक छत्री दे बरें. जातों आम्हीं आतां. हे पहा नऊ वाजले. चला, उशीर झाला.'

असें म्हणून गणपतराव निघाले, नारायणरावही त्यांचे बरोबर कांहीं न बोलतां मुकाट्यानें चालले. छिन्न भिन्न मूर्ति असलेल्या त्या कमानीपाशीं ते आले. इतक्यांत समोरून एक, दोन घोड्यांची गाडी धांवत कमानींत आली. गाडीला रस्ता सोडावा म्हणून ते दोघे जरा बाजूला झाले. अभाळ आलें होतें, काळोख पडला होता. तरी गाडीच्या कंदिलाचा ओझरतां उजेड या दोघांवर पडला त्यानें, त्यांचे पांढरे कपडे गाडींत बसणारांना दिसले.

कोणी माणूस उभें आहे, असें वाटून गाडीच्या खिडकीच्या बाहेर डोंकावून 'कोण तें, माळी कांरे' म्हणून आंत बसलेल्या स्त्रीनें विचारिलें.

गणपतराव हंसून थोडें पुढें येऊन, 'नाहीं मी आपला गणु' असें म्हणाले. हे कमानीपाशीं उभे आहेत तोंच गाडी सपाट्यानें पुढें जाऊन द्वारप्रकोष्ठाखालीं उभी राहिल्यावर मागें उभा राहिलेला सैल खालीं उतरला आणि त्यानें गाडीचें दार चट्कन उघडलें. जगदेवराव गाडींतून उतरल्याबरोबर वर अभाळाकडे पाहून म्हणाले, 'नाहीं, आज नाहीं पाऊस येत. उद्यां आला तर कोण जाणे'

भाग ९ वा.

'आज कांहीं पाऊस येत नाहीं. उद्यां आला तर येईल' हें जगदेवरावाचें भाकीत अगदीं चुकलें. आमचे दोन गृहस्थ आपल्या बिऱ्हाडीं पोंचतात न पोंचतात तोंच अभाळ अगदीं भरून आलें, दिशा धुंद झाल्या, गडगडाट सुरू झाला, विजा चमकूं लागल्या; त्यांचा कडकड आवाज भयंकर तऱ्हेनें चोहोंकडे नादावूं लागला, व मुसळधारा पाऊस सुरू झाला. अशी स्थिति होऊन चोहोंकडे पाणीच पाणी झालें.

आमच्या गणपतरावाला कधीं म्हणून कशाची भीति टाऊकच नाहीं. पलंगावर 'झोला' (या ग्रंथकाराची कादंबरी) वाचीत हे स्वस्थ पडले. मधून मधून चिरुट ओढणेंही सुरू होतेंच. चिरूट हातांत घेतला कीं, खाणावळवाल्याला शिव्या ह्या आपल्या ठेवलेल्याच. परंतु मेघगर्जनेनें व या विजांच्या कडकडण्यानें नारायणरावाची स्थिति काहीं विलक्षण झाली; मधेंच बूक खालीं ठेऊन चिरूट पेटविण्याकरितां म्हणून, गणपतराव उठून बसले, तों नारायणराव खिडकीपाशीं बसून बाहेरचें काळेंभोर आकाश, ती भयंकर मेघगर्जना, ती सळ्ळ् नागिणीसारखी चमकणारी व डोळे दिपविणारी विद्युल्लता, व तिचा तो लागलीच कडकडाट, त्या वरचेवर जोरानें येणाऱ्या पावसाच्या मुसळधारा, तो अतिगार अंगाला झोंबणारा वारा, हें सर्व पाहत आहेत, असें पाहून त्यांस म्हणाले.

' नारायणराव, तुम्हाला विजेची भीति नाहीं कांहो वाटत ?'

' नाहीं. ' येवढेंच त्यांनीं उत्तर दिलें.

'काय गृहस्था सांगतोस ? अतिशय धीट लोक देखील विजेच्या कडकडण्याला भितात. याला कांहीं भीति म्हणतां येणार नाहीं. असा देखावा पाहून मनाला कांहीं उद्विग्नता वाटणें साहजिकच आहे. मीं खात्रीनें सांगतों, आपल्याला राजश्री भीति वाटत आहे.'

त्यानें उत्तर दिलें, 'छः, अगदीं नाहीं. मला नाहीं कधीं यांची भीति वाटत.'

' नाहीं काय म्हणतोस ? ते पहा, तुझे डोळे कसे घाबरलेल्या माणसासारखे झाले आहेत ते. तोंड पहा कसें झालें आहे तें. आणि नाहीं काय

झणतोस ? मीं खात्रीनें सांगतों तूं भ्याला आहेस,' असें गणपतराव जरा हंसत हंसत पुनः म्हणाले.

'आणि मी खात्रीनें सांगतों अगदीं नाहीं झणून,' नारायणराव जरा डांसून झणाले.

यावर गणपतराव झणाले, 'नारायणराव, असें काय झणतोस, अगदीं भिऊन गेला आहेस. भीतीनें अगदीं घाबरला आहेस, आणि कांहीं तरी बोलतोस झालें.'

नारायणरावाला याचा फारच राग आला आणि, 'गणपतराव जर आतां पुनः घाबरला वगैरे झटले कीं थप्पडच खाल' असें मोठ्यानें झणून तेथून उठून पाय आपटीत आपटीत दाराकडे जाऊन, दार फाड्-दिशीं उघडून तो बाहेर पडला. दार इतक्या झपाट्यानें उघडलें कीं त्या आवाजासरशीं सगळी खोली हादरली.

नारायणराव बाहेर पडले नाहींत तोंच अति मोठी मेघगर्जना झाली. कड कड कड विजेचा आवाज झाला व पुनः जोराची सर आली. तो जो निघाला तो थेट अगदीं पलीकडच्या रस्त्यांत जाऊन उभा राहिला. अशा पावसांत उगीच इकडे तिकडे खालीं वर आजमासें पंधरा मिनिटें फिरला आणि एकदम पुनः आंत येऊन आपल्या निजावयाच्या खोलींत चालला.

गणपतराव तेथें समोरच उभे होते. त्यांणीं यांस असें अगदीं भिजून चिंब होऊन आलेले पाहून झटले, 'निजतां वाटतें जाऊन !'

नाराय०—होय.

गणप०—अरे पण खोलींत दिवा नाहीं ?

नाराय०—नको. मला नाहीं जरूर.

गणप०—अरे पण गृहस्था, असें काय करितोस ? अरे, अगदीं निथळून निघालास. कपडे सर्व भिजून चिंब झाले. काय बोवा इतक्या रात्रीं अशा पावसांत बाहेर जाण्यावांचून कांहीं अडले होतें ? आतां असा कोणचा तुझ्यावर प्रसंग आला होता कीं गेलेंच पाहिजे होतें !

नाराय०—मीं बोवा आतां अगदीं त्रासलों आहे. उगीच बोलून बालून कपाळ नको माझें उठवूंस. पुरे तुझी पिर् पिर् आतां. मला निजूंदे कसा.

तर काय बहार झाली असती ! ! असो. दोघांनीं चहा घेतला. नंतर ' चला बाहेर फिरावयाला जाऊ. गांवांत जाऊं आणि तसेंच त्या पोरांना जेवावयाला बोलावून आणूं ' असें झणून जगदेवराव हातांत काठी घेऊन बाहेर पडले.

निहालकुवरबाई मग आपल्या वस्त्रपरिधानगृहांत गेली. तेथें ती परशिअन कारपेट्रे अस्ताव्यस्त पडलेली पाहून तिला फारच आश्चर्य वाटलें. ती आपल्या दासींस झणाली, ' कुलूप लावून किल्ली घेऊन मीं गेलें अर्धुक येथें कोण आलें असें करावयाला ?! तिनें मैनेला हाक मारिली व उकरून कां झालें झणून विचारिलें. मैना ते दोन गृहस्थ आल्याची करितां झाडांईनीं चोर वाटेनें हें सर्व दाखविल्याची हकीकत सांगित शिदोऱ्या सोडून बाईनें सगुणाताईस बोलावून वर आणिलें आणि ही व लावला आहे. झालेली व तशीच रंगमहालांत तसबिरीजवळ पडलेलगडगांवांत चावडी विला आणि हंसत हंसत जरा रागीट मुद्रेनें, जरस्थ पडला आहे. गरीब छेडलें आणि झटले, ' परकी लोकांनां मीं नसतां चोरडोकींतल्या उवा मारंगमहाल कशाला दाखविलास ? नाहीं झणशील तर, हैं स्नेहविरहित कैस कोणाचें नांव आहे? ' ना० च० ' होय कां? याचा ७, पां स्तनपान करीत, राव चव्हाण होय कां? मला नाहीं बोई हें आवडत. माझ बसल्या आहेत. परवानगीवांचून कोणी येऊं नये. मला जर पहिल्यानेंव नाहीं. परंतु मधून असती तर—' लोखंडी उकटणें घेऊन

ती येवढें अर्धेंच बोलली आणि जरा थांबली. सवेळस ओरडत आहेत. त्तर दिलें नाहीं. परंतु जिना उतरतां उतरतां येवढें मात्र झोत आहे.

पले गणपतराव का परकी आहेत? त्यांच्या बरोबर नारायणरा नकतेच ते आपल्या खिशांतला हातरुमाल केव्हां पडला याचे नारायणरावास स्मरल्या-नाहीं. काय पहा या हातरुमालानें किती तरी चमत्कार केला!—बरें असो.

निहालकुवरबाई मैनाला घेऊन या खोलींतून त्या खोलींत, आणि त्या खोलींतून या खोलींत, हें टेबल येथें ठेव, तें कपाट इकडे ठेव, तो पलंग असा ठेव, तो अरसा तसा ठेव, तें कोंच असें ठेव, असें सांगत हंसत आनंदानें मैनाबरोबर बोलत फिरूं लागली. जेवण झाल्यानंतर वर येऊन ती कांहीं वेळ ' पीआनो ' वाजवीत बसली. तो वाजवितां वाजवितां एकदम उठून ' यात्रा कंटाळा आला ' असें झणून, लोकरीचें काम करीत एका कोंचावर बसली. तेंही पुरें न करितां 'नको हें' असें पुनः झणून, तेथून

झणतोस ?
इंसत हंसत
'आणि
ठांसून झण

चटदिशीं उठून कपाटांतून एक बूक काढून वाचूं लागली. तेंही तसेंच टाकून, डागीन्यांच्या पेट्या उघडून ते पहात बसली. तें पहाण्यानेंही तसेंच अर्धवट टाकून मैनावरोवर पुनः गप्पा सुरू केल्या. याप्रमाणें आनंदानें तिची अगदीं चलविचल झाली होती. एकदेखील काम धड इच्या हातून आज होईना. आजच्यासारखा आनंद तिला कधींच झाला यावर ... नव्हता. आजच्यासारखी आनंदी वृत्ति आम्ही तिची कधींच पाहिली भिऊन गेला आहेस? आज इतका आनंद होण्याचें काय कारण असेल तें तिचें तिलाच बोलतोस झालें.'

नारायणरावाला याचा फिड़ालगडावर मोतीचौक वाड्यांत निहालकुवरवाई अशा आतां पुनः घावरला वगैरे झटभसतां आमचे रंगेल वकीलसाहेब व नारायणराव झणून तेथून उठून पाय आपटीत पें चांगली जागा पाहून वसावें झणून फिरूं लागले. दिशीं उघडून तो बाहेर पडला. दोलसें पाणी पाहून व कांठावर सांत्रली पाहून ते त्या आवाजासरशीं सगळी खोली हादरणारा, गळालूट जामीष खाऊन गळ पाण्यांत

नारायणराव बाहेर पडले नाहींत धरून, पाण्याकडे पहात बसेल. गणपतराव, 'तोंपकड कड कड विजेचा आवाज (विभ्रांति) घेऊं' असें झणून तेथेंच अंगावरचें उपरणें नो निघाला तो थेट अगदीं पलीकडात पाय लांब करून उताणे पडून डोकीची जरीकांडी अशा पावसांत उगीच इकडे तिकडे जागूं नये झणून डोळ्यावर व अर्ध्या नाकावर टेऊन फिरला आणि एकदम पुनः आंत ये चालला.

गळ टाकून वसले होते तेथील माशांचें दैव फार चांगणपतराव तेथें समोरच उभे ज. पाण्यांत दोरी लोंबत होती. ती वाऱ्यानें हाले व त्याचे चिंब होऊन आलेले पाहून पाण्यावर लहान लहान बुडबुडे येत. त्या बुडबुड्यांवर मासे

नाराय०—डुंशाल उडया मारीत. गळाचें आमिष खुशाल तोडून नेत. कारण ते नाराणपरावाचें लक्ष गळाकडे मुळींच नव्हतें. ते पाण्याकडे पहात मात्र होते.
नारा त्यांचें लक्ष भलतीकडेच होतें. त्यांच्या मनांत कांहीं निराळेच विचार या वे-
गणप ळेस येत होते. कशास कांहीं मेळ नाहीं. त्यानें हातांत उगीच नांवाला मात्र
थळून नि कांडी धरली होती, ती इतकी सैल कीं आत्तां गळून पडेल. इतक्यांत
अशा पा चावडीवरच्या घड्याळाचे दोन ठोके पडलेले त्याला ऐकूं आले. त्यानें
णचा तुक हातांतली काठी तशीच खालीं ठेविली. आणि तेथून उठून, गणपतरावाला
नारा जरा थोडीशी डुलकी घेण्याला तसेंच सोडून,—या राजश्रीची डुलकी झणजे
लून कपा तीन तासांची बेगमी, नदीच्या कांठा कांठानें वरल्या बाजूनें ते अजमासें अर्धा

मैल गेले. तेथें त्यानां एक जुना ओबडधोबड बांधलेला लांकडी पूल लागला. तो ओलांडून, कुरणाकडे वळून, निहालगडावर जाण्याला जो रस्ता होता तो त्यानें धरिला.

ही ऐन दोन प्रहरची वेळ. जिकडे तिकडे सामसूम. रानांत पक्षी आनां मंजूळवाणे गात नाहींत. शेतकरी पांखरें हांकण्याकरितां हां हां ह्मणून ओरडत नाहींत. या वेळेला कांहीं पक्षी झाडांवर बसून आपले पंख साफसुफ करीत आहेत. कांहीं जुनाट झाडांच्या खोडांतील किडे चोंचीनें उकरून काढून खात आहेत. गुरांचे कळप थोडी विश्रांति घेण्याकरितां झाडांखालीं रवंथ करीत बसले आहेत. कांहीं गुराखी शिदोऱ्या सोडून खात बसले आहेत. कांहींनीं लगोरीचा डाव लावला आहे. कांहींनीं पांवा वादन सुरू केलें आहे. निहालगडगांवांत चावडी समोर बेसकर घोंगडी पांघरून तणगा लावून स्वस्थ पडला आहे. गरीब कुणब्यांच्या बायका कांहीं वाकळा शिवीत, कांहीं डोकींतल्या उवा मारीत व लांकडाच्या ओबड धोबड काळ्या फणीनें स्नेहविरहित केस विंचरीत, व कांहीं मुलाला मांडीवर घेऊन पदर न घेतां स्तनपान करीत, आपआपसांत गप्पा मारीत, स्वस्थ आपापल्या दारांत बसल्या आहेत. गांवांत जिकडे तिकडे स्वस्थ आहे; गडबड अगदींच नाहीं. परंतु मधून मधून 'जात उकठायाच कां बाई,' ह्मणत हातांत एक लोखंडी उकटणें घेऊन गल्लोगल्लीं वडग्यांच्या चोळी न घालणाऱ्या बायका ह्या वेळेस ओरडत आहेत. व कांहीं ठिकाणीं जातें उकटण्याचा टाकटाक आवाज होत आहे.

निहालगडावर जगदेवराव जरा वामकुक्षी करून उठून, नुकतेच ते वरलकिडील बाग आज पाहून यावें, असें ह्मणून बाहेर पडत आहेत. सगुणाताई, सकाळींच जेवण करून, आपल्या जरद्या असमान ताऱ्यावर बसून कुरणाकडे सृष्टिसौंदर्याचें अवलोकन करीत फिरत आहे. देवडीवर कांहीं शिपाई स्वस्थ घोरत पडले आहेत. कांहीं तंबाकु ओढण्याकरितां चिलीम भरीत आहेत. त्या पैकींच नुकतांच जेवून आलेला एकजण, धुणीपाशीं जाऊन एका लांकडानें राख उकरून पाहून 'अर इच्या, इस्तु अगदींच फिर इजला. आर उटाकीं निजाया काय झाल. कुट शिकारीला गेला व्हता. दमला व्हय लई ? इचभन, दोन पार रात झाल्यावानी घोरत्यात कीं ' असें ह्मणत आहे. त्यांपैकींच एक जण सकाळींच उठून कुत्रावरोबर घेऊन शि-

कारिला गेला होता, तो ससा मारून आणून, तेथेंच जरा लांब डेवलेल्या त्या मृत सावजाकडे एक सारखा टक लावून पाहत वरचेवर शेपूट हलवि-णारा, व वरचेवर जिभळ्या चाटणारा, तो मोत्या कुत्रा बांधून, ' इचभन आज लई दमविल वा. आज राती इतच बरका गनबा ' असें म्हणत आहे. इतक्यांत नारायणराव, कुरणांतील वांकड्या वांकड्या पाऊल वाटेनें, चिंचेच्या झाडांच्या मधल्या रस्त्यानें, छिन्नभिन्न मूर्तीनें सुशोभित झालेल्या भव्य कमानींतून दिल्लीदरवाज्याजवळ आला. पुढें केलेली दिंडी जोरानें उघडून देवडीवरच्या पाहरेकऱ्यांस, जगदेवराव काय करतात म्हणून त्यानें विचारिलें. ' आतांच घोड्यावर बसून सरकार गेल व माईसाहेब तकड फुलबाग मंदीं हायत वाटत; ' असें शिपायानें उत्तर दिलें. हें ऐकून नारायणरावाला जरा वाईट वाटलें, व तिला ' भेटावें कीं जावें, ' असें कांहीं तोंडांतल्या तों-डांत तो बोलला, तें शिपायाला नीट कळलें नाहीं. बरें. मी आलों होतों, म्हणून जगदेवरावाला सांगा, किंवा नव्या रीतीप्रमाणें ही कार्ड त्यांस द्या असें कांहींच न बोलतां तो परत बाहेर पडला. पुढें कांहीं वेळानें सगुणाबाई, चिंचेच्या मधल्या रस्त्यानें न येतां दुसऱ्या र-स्त्यानें येऊन, घोडी तबेल्यांत नेण्याला सैसाला सांगून, रानांत तोडलेलीं फुलें हातरुमालांत घेऊन, आपल्या आवडत्या ' सीझर ' ला बरोबर घेऊन, आपली आई जेथें फुलबागेंत होती तिकडेच गेली. कुत्र्याला पाहिल्याबरो-बर कपाळ जरा वर चढवून गडबडीनें पण तिरस्कारानें तिची आई म्ह-णाली, ' तो ने बाई अगोदर. तो पहा आत्तां मला पाहिल्याबरोबर कसा करील तो. ' खरोखरच सीझर तिला पाहिल्या बरोबर आपलें तोंड आ करून लांब लांब सुळे दांत बाहेर काढून गुर्र गुर्र करूं लागला. ' कसं मे-ल्याला कळतं बघ. मीं भितें म्हणून फारच करतो मेला. कसं तूं त्याला ग-रीब म्हणतेस कोणजाणे बाई. खरोखरच मीं जर कधीं एकटी अंधारांत सांपडलें तर मेला लचकाच काढील; येऊन एकदम नरडींच फोडील. बघ मेल्याचे दांत ' असें म्हणून आपल्या मुलीला पुढें ढकलून आपण तिच्या मागें उभी राहिली. सगुणाताईनें सीझरला ' गप्परे, लाय डाऊन ' म्हट-ल्याबरोबर पलीकडे तो बसला. मग सगुणाताई म्हणाली, ' नारायणराव मघां येथें आले होते, आणि बाबा कोठें आहेत म्हणून विचारीत होते. तूं कोठें आहेस म्हणून ही विचारिलें, म्हणून रामजी सांगत होता आतां. '

तिच्या आईनें वर डोळे करून तिच्याकडे साशंकमुद्रेनें पाहिलें आणि 'संध्याकाळीं जेवायाला येणार आहेत ह्मणून ह्मणत होते सकाळीं. आल्यावर मग होईलच भेट,' असें ह्मणून तेथून निघून आपल्या माडीकडे गेली. वर गेल्यावर मैनाला हाक मारून तो हातरुमाल (नारायणरावचा) उघलून देव य हे कागदाचे कपटे गोळा कर असें तिला सांगितलें. मैना आपल्या बाईसाहेबांच्या हुकमाप्रमाणें करीत आहे इतक्यांत ती ह्मणाली, 'कायग मैने, सकाळपासून कोडें होतीस ? काय करीत होतीस ? आला असेल तो जोत्या ह्मालं—'

मैना०—अं, हेव काय सरकार ! सकाळीं तर हितच व्हतें नव्हका ताईसाब आल्या तवा ! आन आतांच जेऊनश्यानी जरा लवंडल्यें. आन आतांच उटून आपन सांगितल्या वरून आपल्या पांडऱ्या त्या चंदुरी पातळावर कलाबतू कशिदा काढीत व्हते, इतक्यांत आपन हाक मारिली.

असें बोलत बोलत मैनानें तो हातरुमाल उचलून देविला. कागदाचे कपटे गोळा करून बाहेर टाकिले आणि आणखी कांहीं बाईसाहेब हुकूम करतात कीं काय ह्मणून वाट पहात बाईसाहेबांपुढें उभी राहिली, बाईसाहेबांनीं एकदम वर पाहिलें तों त्यांची व तिची नजर एकदम एक झाली. बाईसाहेब ह्मणाल्या, 'तूं मोठी हुषार पोरगी आहेसग. देवानें जों पर्यंत मला सुखाचे दिवस दिले आहेत तों पर्यंत तुला कशाची काळजी नाहीं. समजलीस. दुसरीकडे तुला कोणी पंचवीस रुपये जरी दिले तरी मी नाहीं तुला सोडणार ! मी असल्यावर तुला काय कमी ! !'

भाग १०वा.

गणपतरावाची ही स्वल्प निद्रा संपली. उठून पाहतात तों गळाची काडी कांठावर तशीच पडली आहे, दोरी पाण्यांत पाण्याच्या लहरीबरोबर हेलकावे खात आहे, मासे दोरी सभोंवतीं खुशाल उड्या मारति आहेत; हें सर्व पाहुन त्यांना फारच आश्चर्य वाटलें असेल नाहीं बरें ?

गणपतरावांनीं अळोके पिळोके दिले. टोपी मागेंच डोक्यावर नीट सारली, व उठून बसून पाटीची व मानेची हाडें मोडिलीं. उपरणें पसरलेलें गोळा करून घेऊन, खांद्यावर टाकून, डोळे चोळीत चोळीतच जरा तोंड वांकडें करून, 'नारायणराव' म्हणून हाक मारली. अहाहा ! ती हाक तरी मोठ्यानें मारावयाची होती ! किती तरी हळू ! उगीच कोणाला ऐकूं गेलें न गेलें ! अशाच तऱ्हेनें दोन चार हाका मारल्या तरी, तो 'ओं' देत नाहीं असें पाहून, एकदांचे जांभया देत देत उठून उभे राहून जरा पलीकडे नारायणरावांना पहावें म्हणून, ते गेले; व खिशांतलें वाच काढून जवळ जवळ चार वाजावयाला आलेले पाहून 'अरे किती तरी निजलों ! चार वाजायाला आले कीं' ! असें आश्चर्यानें ते म्हणाले.

'अरे, हा गेला तरी कोठें ? काय चमत्कारिक माणूस ! हें चार वाजले नव्हे कां ? गेला असेल विऱ्हाडीं फराळ झोडायाला. मला उठवावें कीं नाहीं ? भला खादाड ! एकदा खाण्याची वेळ झाल्यावर तो कोणाची वाटबिट पहावयाचा नाहीं. खास तो तिकडेच गेला. चला आपल्यालाही भूक लागली आहे. जाऊं लवकर लवकर,' असें मनाशीं म्हणून त्यांनीं विऱ्हाडाचा रस्ता धरिला.

'चला जाऊं लवकर,' असें गणपतराव म्हणाले म्हणून काय झालें ! भूक किती जरी लागली, व नारायणराव पुढें गेला, तो वाट पाहत असेल असें जरी मनांत आले तरी, त्यांनीं आपली नेहमीची सावकाश या अंगावरून त्या अंगावर डुलत चालण्याची संवय सोडली कीं काय ? अगदीं नाहीं नेहमीप्रमाणेंच रेंगाळत रेंगाळतच मार्ग क्रमूं लागले. खाणावळीच्या दारापाशीं आले तों पांच वाजले. नारायणराव आपली वाट पहात बसला आहे, अशी त्यांच्या मनाची पक्की खात्री. त्यांना वाटलें कीं तो फराळाचें ताट पुढें घेऊन बसला असेल; परंतु आंत जाऊन पाहतात तों तिकडे

तिकडे शून्य. नारायणराव कांहीं नाहीं. याप्रमाणें आपला आज्ञाभंग झालेला पाहून त्यांच्या मनाला फारच वाईट वाटून 'तो गेला तरी कोठें ?' असें उद्विग्नतेनें ते म्हणतात इतक्यांत, खाणावळवाला आंतून आला आणि म्हणाला, 'रावसाहेब, आपल्या हुकुमाप्रमाणें फराळाचें केव्हांच करून टेविलें. कितीवेळ तरी वाट पाहूं? आपण उन उन पाहिजे म्हणून सांगितल्यावरून निखाऱ्यावर तसेंच फार वेळ ठेवल्यानें जळून कोळसा ! आणूं कां ताट ?'

गणप०—बरें. तें असूं दे. नारायणराव कोठे आहेत ? सांग अगोदर. त्यांनी फराळ केला काय ?

खाणाव०—मला हो काय माहीत ? आपण व ते मिळूनच बाहेर पडलां. ते कांहीं अजून इकडे आलेच नाहींत.

गणप०—काय? आलाच नाहीं! मग चांगलें. गेला तरी कोठें? व्हेरि क्यूरिअस '

गणपतराव तसेच गडबडीनें, भरभर माडीवर गेले आणि खिडकींतून पलीकडच्या रस्त्याकडे नारायणरावाला शोधण्याच्या हेतूनें पाहूं लागले. त्यांना त्या रस्त्यांत शेतकऱ्याचा एक चार बैल जोडलेला गाडा सावकाश येत आहे, एक धनगर खांद्यावर एक दहा पंधरा हात लांबीची वेळूची काठी टाकून. तोंडानें हुःश् हुःश् करीत आपल्या मेंढरांचे खांड हाकीत आहे, त्याचा कुत्रा जीभ बाहेर काढून मेंढरांतून मागें पुढें फिरत आहे; व कांहीं मजूरदार लोक कोणाच्या तरी शेतांत विहीर खणण्याला गेलेले, खांद्यावर कुदळी, सुतकी, पहारा, टाकून येत आहेत, येवढेंच दिसलें. परंतु त्यांत त्यांचा इष्ट प्राणी मात्र त्यांना आढळला नाहीं.

असे निराश होऊन, खालीं येऊन पुनः खाणावळवाल्याला 'नारायणराव आले कां,' म्हणून अति साशंक वृत्तीनें त्यांनीं विचारलें.

खाणाव०—नाहीं. येतील आतां त्यांत काय ऐवढें ; उगीच कां उतावळे होतां. तुम्ही करा कीं फराळ. ते करतील आल्यावर.

'मीं कांहीं आतां खात नाहीं' असें म्हणून डोकीला चंदेरी गुलाबी बत्ती घालून ते बाहेर पडले. पण आतां कोणीकडे प्रथम जावें म्हणून विचार करीत दारांत क्षणमात्र ते उभे आहेत इतक्यांत, घाईं घाईनें खाणावळवाला आंतून धांवत आला व म्हणाला 'रावसाहेब मीं विसरलो. आपण गेलां आणि लागलीच आपले मामासाहेब येथें आले. त्यांनीं आपण व

नारायणराव कोठें गेला म्हणून विचारिलें. आज संध्याकाळीं वाड्यांत आपणा दोघांस भोजनाला सांगून गेले. '

' मग झालें तर. ही स्वारी तिकडेच गेली. मामीला पाहिल्यापासून अगदीं वेडाच झाला आहे' " म्याड्क्याप कोठला ! मला येऊं द्यावें कां नाहीं ? पण इतका दम त्याला कोठला ? (पुनः जरा थांबून) छे, वास्तविक म्हटलें तर तो मला घेतल्याखेरीज जाण्याचा नाहीं. गेलाही असेल कदाचित् ! काय सांगावें ? चला तर आतां आपण गडावरच जावें " असें म्हणून गणपतराव वाड्याकडे जाण्याला निघाले. सहा वाजायाला पंधरा मिनिटें कमी होतीं, तों ते वाड्याजवळ येऊन पोंहचले. एकदम देवडीवर जाऊन, मामासाहेब वगैरे मंडळी काय करतात याची चौकशी न करितां नारायणराव चव्हाण येथें आले आहेतका? म्हणून त्यांनीं विचारिलें.

शिपाई एक (मुजरा करून उभे राहून) व्हय सरकार, दोन वाजून गेल असतील किंवा वाजायाचा अम्मल असल् इतक्यांत नारायणराव हित आल व्हत.

गणप०—आणि मग ?

शिपाई—लागलीच परत गेले. पुनः कांहीं आले नाहींत.

गणप०—कायरे, पक्कें तुला ठाऊक आहे कीं, नारायणराव येथें दोन वाजतांच आले होते ?

शिपाई—व्हय सरकार. मी तवा नुकतांच शिकारीहुन आलों आन आमचा गनवा पारा करीत व्हता. त्याचा पारा दोन वाजतांच असतो सरकार.

गणपतराव लागलीच मागें वळले आणि आपल्याशीं फार चिंतामस्त होऊन म्हणाले ' काय ! या गृहस्थाचें झालें तरी काय ? दोन वाजतां होता म्हणावयाचा. आतां किती सहा वाजले. तेव्हां दोन आणि चार सहा; भरपूर चार तास झाले. याचा कांहीं पत्ता नाहीं. काय करावें आतां ! '

गणपतरावाला फारच काळजी लागली. अलीकडे या वर्ष सवा वर्षांत ते आपल्या या प्रिय सन्मित्राला सोडून एक मिनिटभरही राहिले नव्हते. निकट सहवास असून एकाएकी वियोग झाला तर तो फार असह्य असतो. त्यांना नारायणरावाशिवांतून कांहींच सुचेना. आतां त्याला कोठें पहावें अशा घोटाळ्यांत पडून अतिशय जलदीनें ते कुरणाकडे, रस्ता सोडून भाड

वाटेनें चालले. आपल्या प्रिय मित्राचाच विचार करीत, चिंतातूर होऊन गडबडीनें बरेंच लांब गेल्यावर, एका लहानशा टेकडीवर चढून, ' आतां काय करावें ? असें म्हणून, कपाळावरून हात फिरवीत, ते तेथें मुहूर्तमात्र बसले, मग एकदम कांहीं सुचल्यासारखें करून, " आज सी, तो स्टेशनावर गेला, होय खास तिकडेच; दुसरीकडे जातो कोठें ? गेला असेल त्या शेंबडया पोराला पहायाला; वः नारायणराव ठीक ! आतां पहा तुला हुडकून काढतों. " असें म्हणून मोठ्या त्वेरेनें लांब पालिकडे मंगळुरी कौलांचें छप्पर दिसत होतें, तिकडे ते निघाले. तेथें गेल्यावर फलयावर लावलेल्या वेळापत्रकांत गाडी केव्हां गेली हे त्यांनीं पाहिलें. वेळापत्रकावरून गाडी जाऊन जवळ जवळ दोन तासांवर वेळ झाला, असें लक्षांत येऊन विशेष चौकशी करण्यासाठीं, ज्या खोलीच्या दारावर ' स्टेशन मास्तर्स रूम ' हीं भव्य अक्षरें खोदलेला फलक लोंबत होता, त्या खोलींत जाऊन ' काय हो, काशिनाथपंत, मीं परवां करवीराहून आलों तेव्हां माझ्याबरोबर एक गृहस्थ होता तो तुम्हाला स्मरतो कां ' असें त्यांनीं स्टेशनमास्तराला विचारिलें.

काशीना०—आतां तुम्हांला खरें सांगूं गणपतराव, तुम्ही त्या दिवशीं कोणत्याबरें गाडीनें—(वेळ आठवत नाहीं म्हणून गणपतराव मध्येच म्हणाले ४–१५ च्या गाडीनें) हो ४–१५ च्या गाडीनें तुम्ही आलां नव्हे कां ? मग तुम्हाला माहित आहेच त्या ट्रेनला किती गर्दी असते ती !

गणप०—मग तो तुमच्या लक्षांत नाहीं तर ?

काशीना०—(जरा तोंड वाईट करून) नाहीं खरा बोवा.

गणप०—मला एवढेंच पाहिजे होतें कीं मघाच्या ट्रेनला त्यानें करवीराचे तिकीट काढलें कीं काय ? तो पहा जरा उंच आहे, छाती मोठी भरदार विशाल आहे, मिशा ऐटदार असून कपडे भपकेदार आहेत. असा एखादा गृहस्थ करवीराला गेल्याचें आहे कां तुमच्या लक्षांत ?

काशीना०—आज थ्री–थर्टीच्या ट्रेनला दहाबाराच प्यासेंजर होते, आणि——

गणप०—(त्याचें वाक्य पुरें होण्याच्या पूर्वीच) एवढेंच ! मग त्यांत मीं सांगितल्या सारखा कोणी होता काय ?

काशीना०—होय. एक कपेवाला होता खरा. (आपल्या जवळच्या

कोचींग क्लासकडे वळून) होय ना हो गुरुजी, असा एक माणूस होता नाहीं हो ?

गजप०—(गुरुजीस उद्देशून) मीं आतां वर्णन केल्याप्रमाणेंच.

काशीना०—मला काय अतां तितकें आठवत नाहीं, पण पांढरे केस कांहीं नव्हते एवढे खरें. अहो आमच्या येथें काय, किती येतात आणि किती जातात ! आम्ही जर असें—

गणप०—त्यांनीं भस्मी रंगाचा पोशाक केला होता नाहीं?

गुरुजी०—(मध्येंच) होय होता खरा; नाहीं तरी अलिकडे फ्याशनच झाली आहे भस्मी पोशाक करण्याची. गडबडीनें तिकीट घेऊन तोंडानें शीळ घालीत घालीत तो गृहस्थ प्लयाट फार्मावर गेला.

'थ्यांक्यू जंट मेन. होय तोच तो, झाला आतां निकाल. आतां लागला शोध. ठीक आहे. गुड इव्हिनींग जंट्लमेन, असें म्हणून गणपतराव स्टेशनावरून परतले.

वाटेनें जातां जातां ते आत्मगत म्हणाले' काय वेडा पडा, मला कांहीं एक न सांगता निघून गेला ! क्रेझीफेलो; वरें तर, आय मस्ट फालो हीम आपणहि आतां मार्निंगच्या ट्रेनें जाऊं. आतां प्रथम बिऱ्हाडीं जाऊन हा ड्रेस चेंज करून मामाकडे जावें. (वाच काढून पाहून) नुकते कोठें सवासात झाले आहेत, अजून पुष्कळ अवकाश आहे; नारायणराव एकाएकीं मला न सांगतां करवीरीं गेला म्हणून सगीला आणि मामीला अगोदर सांगितलें पाहिजे. खरोखरच तो भोजनाला आला नाहीं म्हणून मामीला फार वाईट वाटेल नाहीं वरें ?'

भाग ११ वा.

दिवाणखान्यांत या वेळेस जगदेवराव एका कौचावर स्वस्थ पडले आहेत; निहालकुवरबाई तेथेंच एका कोंपऱ्यांत 'पिआनो' ठेविला होता तो वाजवींत, संगीत सौभद्रांतलि एक पद त्यांत (पिआनोंत) बसविण्याची खटपट ती करीत आहे; पलीकडे एका आराम खुर्चीवर सगुणाबाई आपल्या आईचे मधुरवादन ऐकत पडली आहे; या वेळेस दिवाणखान्यांत जिकडे तिकडे रोशनाई केली आहे; निहालकुवरबाई वाजवीत बसली आहे तेथें पिआनोचे दोन्ही बाजूला दोन शामदानें पेटवून ठेविलीं आहेत. आज रोजच्या पेक्षां दिवाणखान्यांत विशेष रोषनाई कां बरें ? निहालकुवरबाईही, दागदागिने बेताचेच पण बेचक घालून वर कलाबतुची वेलबुटी असलेलें गुलाबाच्या फुलांचा वास लाविलेलें चंदेरी पांढरें शुभ्र अति नाजूक पातळ नेसून अंगांत हिरवी गार जरी कांठी कांचोळी घालून स्मित वदन करून पिआनो वाजवीत बसली आहे. हें तरी कां ? आज आमचे इंगेल वकील साहेब आपल्या प्रिय मित्राबरोबर भोजनाला येणार म्हणून कीं काय ? कां आपलें हें त्यांचें रोजचेंच आहे ? होय. श्रीमंताला काय कमी ? त्यांत वृद्ध जगदेवराव आपल्या तरुण लाडक्या बायकोचें कोड पुरविणार ! मग काय ?

पिआनो वाजवीत आहे इतक्यांत गणपतराव दिवाणखान्यांत आले त्यांना पाहिल्याबरोबर पिआनोवरचा हात काढून जरा, स्तनावरचा पदर सरकलेला त्या हिऱ्यांच्या आंगठ्यांनीं अलंकृत झालेल्या कमलाच्या देंठा-प्रमाणें नाजूक बोटांनीं वर सांवरून, जरा त्यांचेकडे पाहून, पियानोकडचं तोंड मागें फिरवून थोडें हंसून, 'या गणपतराव तुमचीच वाट आम्ही पाहत आहों. खरोखरच तुम्ही शालजोडी आणलेली फारच नामी वरकां ? मला बाइ फार आवडली. अगदीं माझ्या मनासारखी आणलीन' असें निहालकुवरबाई म्हणाली.

काश्मीर, टिबेट वगैरेकडे आपण फिरावयाला गेलेवेळीं तिकडून शालजोडी आणून यांस दिली यांचें गणपतरावास अगदींच स्मरण नव्हतें. त्यांच्या मनांत या वेळेस दुसरें कांहीं नाहीं, फक्त नारायणराव खेळत

होता ; याजकरितां तिच्या बोलण्याकडे त्यांचें विशेष लक्ष न जाऊन ' तरी मग तुम्हाला आवडली का ' एवढेंच ते सहजावरीं ह्मणून जगदेवराव जेथें बसले होते तेथें जाऊन बसले.

तेथें जाऊन बसल्यावर ते ह्मणाले ' मामासाहेब, तो गेला करविराला. मला कळविलें देखील नाहीं. वेडा कोठला ! '

'काय नारायणराव चव्हाण करविराला गेले ! ' असें आमच्या बाईसाहेब जरा भिंवया वर चढवून आश्चर्यानें ह्मणाल्या.

' काय बाई चंद्रदर्शनाशिवाय कुमुदिनी प्रफुल्ल होईल काय ? चंद्रावांचून रात्रीला शोभा आहे काय ? वसंताखेरीज मदनाला शोभा आहे काय ? पाण्यावांचून मासे कधीं जगले आहेत काय ? तशी गत आज नारायणराव नसल्यानें गणपतरावाची झाली आहे ' असें सगुणाताई आराम खुर्चीवर पडलेली उठून बसून खोंचून ह्मणाली.

' तो फार भला माणूस. तो गेल्यापासून मला कसें चुकल्या चुकल्यासारखें झालें आहे, अगदींच करमेना ; अगदीं वेड्यासारखें झालें आहे. स्नेह फार वाईट. मनांत भलत्या भलत्याच कल्पना येतात. ह्मण आहेना ' वैरी न चिंती तें मन चिंती ' असें ते ह्मणाले.

आमच्या बाईसाहेब जरा पुढेंच सरकून ह्मणाल्या ' मनांत वाईट येतें तें कां ? त्यांच्याविषयीं इतकं कां वाईट मनांत येतें, सांगा तरी ? '

' हें पहा मामी ' आमचे तरुण वकील ह्मणाले. ' एक वर्ष झालें त्यांची बायको मरून; तेव्हांपासून त्यांच्या मनाला जो कांहीं धक्का बसला आहे तो कांहीं केल्या जात नाहीं. आतां तेहमींप्रमाणें तो जेवतो, खातो, पितो, फिरतो संचरतो, सगळे व्यवहार करितो खरे; परंतु सदा उदास ! एखादे वेळेस अगदीं विलक्षणच बोलतो. वरून जरी तो आपलें दुःख दाखवीत नाहीं, तरी मनांत सदां झुरत आहे. एखादे वेळेस तो आपल्या जिवाला कांहीं तरी करून घेईल; केव्हां काय करील याचा नेम नाहीं '

मग कांहीं वेळपर्यंत कोणी कांहींच बोललें नाहीं समोरच्या आरशांत पाहून कपाळावर आलेली ती तुळतुळीत कृष्णवर्ण केंसाची बट मागें सारून निहालकुवरबाई ह्मणाली ' खरंच बाई हें मोठें विलक्षण ! बायको मेली ह्मणून वर्षांचें वर्ष रडत बसलेले मला नाहीं माहीत ! पुरुषांना काय? पहिली मेली कीं दुसरी. जरा झाडोरानं चांगली व नाकाडोळ्यानं तरतरीत,

अशी मिळाली कीं पहिली होती कीं नव्हती. तसेंच, दुर्दैवानं तीही गेली, तर पुन्हां तिच्यापेक्षां चांगली व मोठी मिळाली कीं तिच्या चवदावे दिवशींचे हळद; पुरुषांना काय मेलें त्याचें एवढें ? आमच्या सारखें कां आहे ? आमचें जिणं सदा दुसऱ्यांवर अवलंबून.'

'मामी, नारायणराव चव्हाण त्यांपैकीं माणूस नव्हे बरें कां; तीं माणसें निराळीं. त्यांना मनुष्य हें नांव तरी शोभतें कां ? शृंग-पुच्छ-विहिन पशूच ते ! बायको मेल्यापासून त्याचें काळीज फुटून गेलें आहे हो !!'

'अरेरे ! किती वाईट ! काय मेलीला मरायला झालं; आपण मेली ती मेली आणि त्याला संकटांत पाडेलं. कशाला मरावं तिनें, किती दुष्ट ती !' असें तोंड जरा वाईट करून ती म्हणाली.

'सगुणाताई जें नेहमीं म्हणते तें अगदीं खरें बरें कां. इचे विचार अगदींच पोरकट' असें गणपतराव आपल्या मनासींच म्हणाले.

इतक्यांत जगदेवरावांनीं 'कोणरे आहे रे बाहेर ? बाळया' म्हणून एकां नोकराला हाक मारिली; आणि तो 'जी सरकार' म्हणून आंत आल्यावर, 'सर्व तयारी झाली का' तें सोंवळेकऱ्याला विचारून ये,' म्हणून त्याला सांगितलें. त्यानें 'व्हय सरकार तयारी हाय' म्हणून उलट येऊन सांगितल्यावर 'चलां तर खालीं' असें म्हणून जगदेवराव उठले. त्या बरोबर ही मंडळीही उठली आणि खालीं गेली.

हातपाय धुऊन अस्तन्या वर सारून जगदेवराव व गणपतराव जोडीनें बसले. त्यांच्या समोरच बाईसाहेब व सगुणाताई बसल्या. 'सोंवळेकरी' पदार्थ आणून वाढूं लागला. मामी साहेब आपल्या भाच्याला वरचेवर आग्रह करीत होत्याच तों मध्येंच जगदेवराव 'सोंवळेकऱ्याला' म्हणाले 'अरे रामा, गणपतरावाला, आज सकाळीं हरिण मारून त्या मारतंडानें आणला, त्याचे फुटाणे केलेले आणि तो वळशेवडा वाढ; त्याचे करतां तर मुद्दाम आज आणविला.' जगदेवराव आपलें बोलणें संपवितात कीं नाहीं तोंच 'अरें ती भजी कां नाहीं वाढलीस त्यांना ? ही आंडयांची भजी त्यांना फार आवडतात असें काल सगुणाताई सांगत होती म्हणून तर मीं मुद्दाम ताजी अंडी आणवून ती तयार करविली' असें हंसत हंसत बाईसाहेबही म्हणाल्या:

'मला नको मामी आतां कांहीं, रात्रीची वेळ आहे; आपलें बेतानेंच असावें, उगीच त्रास होतो मग' असें गणपतराव म्हणाले.

हें ऐकून जगदेवराव हंसत हंसत म्हणाले 'अरे तुम्ही तरणे बांड कालची पोरें. गारगोटचा पचवाव्यात; आणि म्हणतो 'रात्रीची वेळ आहे, त्रास होतो.' तुम्ही आलीकडचे लोक असेच ते; तेवढे कपडे पाहून घ्यावेत, अंगांत शक्तीच्या नांवानें भोंपळचा एवढें आणि आतां तुम्ही राज्य कारभार करणार! तोंडच्या बाता ऐका तेवढचा. अरे, जो खाईल तो काम करील.'

जगदेवरावाचें हें बोलणें ऐकून निहालकुवरबाई मोठ्यानें हंसली आणि सगुणाताईनें जरा हंसरें तोंड करून हळूच खालच्या दृष्टीनें गणपतरावाकडे पाहिलें.

आपली प्रिया फार आनंदांत आहे असें पाहून जगदेवराव हंसत हंसत म्हणाले 'गणपतराव, आज पहा कशी गुलगुल गोष्टी सांगत आहे आणि हंसत आहे! परवां कसें झालें तें विचार कीं; परवां करविराहून आलों तेव्हां कसें हिरमुसलें तोंड करून बसली होती! निराशा झाली तेव्हां कसें झालें' आतां कशी कळी उमलली पहा'!

'निराशा'!! ती कसली! एवढेंच गणपतराव म्हणाले.

'होय; गणपतराव. त्या दिवशीं मला बाई फारच वाईट वाटलें. तुम्हांला सांगतें अं, काय झालें तें. परवां सकाळीं, करविराहून आमच्या कालेजाच्या प्रिन्सिपाल बाईकडून, ती फार आजारी पडून मरायाला टेंकल्याची तार आली; तिची माझ्यावर फार मर्जी असे; 'येऊन भेट' म्हणून तिनें तार केली. जेवण करून करविराला जावयाला आम्हीं निघालों. त्या तारेंत कांहीं पत्ताबित्ता तिनें लिहिला नव्हता, मला तरी काय वाईट डाऊक! जेव्हां पत्ता लिहिला नाहीं, तेव्हां मला वाटलें कीं, तीन वर्षांपूर्वी, मीं इकडे येण्याचे वेळीं ज्या घरांत ती रहात होती तेथेंच ती असेल म्हणून पत्ता लिहिला नाहीं झालें. आम्हीं स्टेशनावर उतरल्याबरोबर गाडी करून तिच्या बंगल्याकडे निघालों. ती ज्या घरांत रहात होती तेथें जाऊन गाडी उभी केली आणि भरभर खालीं उतरून आंत जाऊन पाहतें तों सगळेंच नवें! पहिलीं माणसें मुळींच नाहींत, दुसरेंच कोणीं राहिले होतें; त्यांना विचारिलें, तर ते म्हणाले 'आम्हांला नाहीं माहीत.' पूर्वी

मी तेथें असतांना त्या रस्त्यावर दुकानें विकानें पुष्कळ होतीं पण आत पहातें तों कांहींच नाहीं. करविरास माझी दुसऱ्या कोणाची ओळख बिलकुल नाहीं. कोणाला, विचारूं तरीं कोणाला ? अशा पंचाइतींत पडले. इकडे ओळखीला काय कमी ? शोध करून तिचा बंगला हुडकून काढाया झणून फार खटपट केली, पण व्यर्थ. पत्ताच लागेना ; खरंच बाई अलीकडे करवीरची वस्ती किती तरी वाढली आहे ! जिकडे पहावें तिकडे नवेंच नवेंच दिसतें. कांहीं पत्ताच लागत नाहीं ! ! मग गणपतराव वाईट वाटायाचें नाहीं हो ? तुम्हीच सांगा ? न भेटतां तशीच आलें. मग तेव्हांपासून माझ्या जिवाला फार चटपट लागून राहिली आहे. '

गणप०—खरेंच. तार पाठवावयाची आणि पत्ता लिहावयाचा नाहीं. हा मोठाच मूर्खपणा.

' अहो गणपतराव, हें सगळ्याला सांगतां येतें. ती वेळ फार वाईट. एखाद्याचे घरांत माणूस मरावयाला लागलें झणजे काय होत असतें, हें त्यासच विचारावें. ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सर्वांस सांगतां येतात; प्रसंग आला झणजे कळतं. ' असें ती मोठ्या गंभीर स्वरानें झणाली.

इतक्यांत जगदेवराव, ' रामा, भात आण ' झणून झणाले. रामानें भात वाढला; सर्व मंडळी कांहीं न बोलतां जेऊं लागली. जेवण झालें व सर्व जण आंचवून पानसुपारी खाण्याकरितां दिवाणखान्यांत वर गेले.

दिवाण खान्यांत आल्यावर जगदेवराव शतपावली करूं लागले, सगुणाताई विडा खाऊन कोंचावर पडली, निहालकुवरबाई व गणपतराव अंगून तक्कापाशींच बसले होते. बाईसाहेबांची टकळी सुरूं होतीच; गणपतरावाचें मन मात्र जाग्यावर नव्हतें. त्यांचें मन ह्या वेळेस करविरास त्यांच्या बावडघावरच्या बंगल्यांत होतें. तो आपल्या मनाशींच झणूं लागला, ' या वेळेला नारायणराव चिरूट ओढीत, कुत्र्याबरोबर खेळत, खोलींत बसला असेल. छे बोवा, आपल्याला असें वाईट कधींच वाटलें नव्हतें. ज्या प्रमाणें एखाद्या निराश्रित अतिवृद्ध मनुष्याचा एकुलता एकच मुलगा कोठें एकाएकीं नाहींसा व्हावा आणि त्याला मग कसें वेड लागल्यासारखें होतें त्याप्रमाणें मला आज झालें आहे; हे देवा त्याची बायको त्याला परत दे आणि त्याला सुखानें बायकोपोरासुद्धां नांदूं दे ! ' पुनः त्यांचे मनांत आलें ' तो शिरोळास आपल्या मुलाला भेटावयाला गेला आहे, नाराणराव, वा-

बकोत्रा शोक करून करून; काळीज फुटून मरून पडला आहे.' हें मनांत आल्याबरोबर त्यांच्या अंगावर कांटा येऊन त्यानें एकदम अंग झाडलें.

हें पाहून निहालकुवरबाई झणाली 'गणपतराव तुमचें लक्ष कोठें आहे ? कसला विचार करता ' ?

' कसला नाहीं—नारायणरावबद्दल. '

नारायणरावाचें नांव ऐकिल्याबरोबर, अंगावर कांटा आल्यासारखें करून ती झणाली ' खरंच सांगतें तुम्हाला, नारायणरावाची गोष्ट काढिली कीं माझें मन कसेसेंच होतें. मला बाई त्याच्याबद्दल वाईटच मनांत येतें. '

' ईश्वर करो आणि तसें कांहीं नसो. परंतु मलाही वाईट वाटतें खरें '

' जाऊंदे फिरे; त्याचें काय एवढें ! काय वेडें पोर पहा ! एकदम घेऊन बसला आहे ! आणि ही ही अशीच. दोघेही दीड शहाणेच. जातो कोठें ? असेल करत्रिरीं. पुरे आतां तें. सगुणे, झण तुझें तें; संगीत का काय तें ' असें जगदेवराव झणाले.

निहालकुवरबाई लागलीच झणाली, ' ती कशाला ? मीच झणतें, पियानोवर; चला गणपतराव पियानोजवळ, तुमी एखादें चांगलेंसें पद काढून द्या झणजे मीं झणतें.

गणपतराव व ती पियानोजवळ जाऊन बसले; पियानो वाजवीणयाला व गायला तिनें सुरवात केली. मध्येंच थोडें थांबून तोंडावर आलेली ती बट मागें सारण्याकरितां हात तिनें वर केला तों, मनगटांतील नो वर्खी बिलवर व जडावाचें कंकण मागें कोंपराकडे जरा सरकलें; पुन्हा खालीं हात करणार इतक्यांत गणपतरावाचें लक्ष तिकडे गेलें व ' अरे ! मणगटावर ओरखडे कसले हे तुमच्या ! ! मामी, तुमच्या मणगटाला कांहीं लागलें वाटतें ' असें ते झणतात इतक्यांत कांकणही जागच्याजागीं जाऊन बसलें. ' कांहीं नाहीं माझं मेलं कानडच फार मऊ आहे; जरा कांहीं लागलें कीं दिसतं. ' असें झणून पुन्हा पियानो ती वाजवूं लागली. आमच्या जगदेवरावाला हें ऐकून कोठलें चैन पडायाला ! लागलीच बाजवरून कोंचावरून उठून, " कोठें लागलें पाहूं ' असें झणत ती बसली होती तेथें जाऊन नो गोंडस नाजूक केतकीवर्णाचा हात आपल्या रांउ व जरा सुरकुत्या पडलेल्या हातांत धरून ' कशानें, केव्हां लागलें ? ' झणून विचारपूस करूं लागले.

'काय बाई एवढसं लागलं तें काय आणि त्याची चौकशी ती किती पहा ! त्याची मेली चौकशी कशाला एवढी ? माणसाला नेहमीं असं लागतं त्याचें काय ? परवां मीं उगीच हातांत गोफ घेऊन फिरवित बसलें होतें, तों सहज मणगटाला बांधला; तों त्याचे हे वण उठले आहेत झालं;' असें ती हंसत हंसत म्हणाली.

गणप०—नो; मामी तुम्ही खरें नाहीं सांगत. हे वण अगदीं ताजे दिसतात. अजून रक्त साकळलेलें तसेंच आहे; नवढी जागा कशी अगदीं हिरवी निळी झाली आहे ! तुम्ही कांहीं ही म्हणा, हे गोफाचे वण नव्हेत.

जगदे०—(तिचें मणगट हातांत धरून) अरे गणू, तें शोभदान जरा अलीकडे घे पाहूं. कितपत लागलें आहे तें मला पाहूं दे नीट;

गणपतरावानें शोभदान अलीकडे घेतलें.

'काय, तो एकच कां वण होता ? एक डिकाणींच कां ओरखडलें होतें ? छे. तसें अगदीं नाहीं. कोणी तरी दांडग्यानें इचें हें बिलतंतुवत् नाजूक मणगट मट्ट पांचीं बोटांनीं मुठींत आंवळून धरिलें असावें असें दिसतें. तें पहा. चार वण हिरवे निळे दिसत आहेत ते; तीं नखें ओरखडलेलीं दिसतात ! ! तें पहा, अनामिका बोटांतील अंगठीचा खालचा भाग स्पष्ट उठला आहे. अरेरे ! ! ती अंगठी पहा अगदीं मांसांत बुडालेली दिसत आहे !'

गणप०—तुम्ही कांहीं म्हणा मामी तुम्ही ती गोफाची हकीकत सांगता तो निवळ गप्प आहे. आपल्याला कांहीं खरें वाटत नाहीं.

'बरें; आतां त्याला कांहीं लावायें कीं नाहीं' ? असें या तरुणीच्या कृत्रिम प्रेमपाशांत गुंतलेला वृद्ध जगदेवराव म्हणाला.

गणप०—(खिशांतलें नाच काढून) अरे पावणे दहा वाजले; बरें तर, मीं आतां जातों मामासाहेब बिऱ्हाडीं. सकाळचेच गाडींनें मीं करविराला जाईन. लवकर गेलें पाहिजे. एकदां नारायणरावाला कोल्हां भेटेन असें झालें आहे. तो जर करविरां नसला तर मला शिरोळाला जावें लागेल आणि तेथेंही नसला तर—

पुढें तें बोलण्यांत तो मध्येंच ती म्हणाली—

'तर मग ?—

'तर मग, खास कांहीं त्याला झालें, कांहीं तरी त्याच्या जिवाला धोका

आहे असें मीं म्हणेन. (मग) येतों आतां मामी. सगुणाताई कोठें आहे ? निजली वाटतें जाऊन. निला सांगा मी गेलों म्हणून '

याप्रमाणें निरोप घेऊन गणपतराव वाड्यांतून निघाले. साऱ्या रस्त्यानें नारायणरावाविषयींच विचार. 'सूर्यप्रकाश' खाणावळींत येऊन आपल्या खोलींत चिरूट ओढीत बिछान्यावर असेच विचार करीत ते पडले. ' कां बरें याच्यामुळें मला इतकें वाईट वाटावें आणि काळजी लागावी ? खरें म्हटलें असतां, माझा कांहीं तसा संबंध नाहीं; नेहेमी एक ठिकाणीं रहाण्याचें हें फळ; स्नेह म्हटला म्हणजे फार वाईट. काय होईल तें होईल, त्याला भेटल्या खेरीज आपण राहणार नाहीं, जातो कोठें ? काय ? जग फोडून जातो कीं काय ? '

घटकेंत एक घटकेंत दुसरा, याप्रमाणें अनेक विचारतरंग त्यांच्या मनोजलधीवर येऊं लागले; व तशांतच विचार करतां करतां त्यांना झोंप लागली.

एखाद्या विषयावर गणपतराव विचार करूं लागले म्हणजे त्या विषयाच्या दोन्ही बाजू घेऊन तर्क शास्त्राचे नियम त्यास लावून फार चांगल्या रीतीनें ते तो विषय प्रतिपादन करीत. हे नेहेमी असे रंगेल; कधीं कोर्टांत जावयाचे नाहींत, कधीं कोणाचें वकील पत्र घ्यावयाचें नाहींत, म्हणून हे मंद बुद्धीचे किं काय ? तसें मुळींच नव्हतें. यांची विचारशक्ति फार चांगली व तरतरीत असे.

आम्हीं एवढें खात्रीनें सांगतो कीं, जरी दुसरे वकील लोक यांस हंसत, आपल्याला पैसा फार मिळतो म्हणून शहाणपणाचा गर्व करीत, किंवा नवीन नवीन होणारी वकील मंडळी ऐटीनें करविरीं सरन्यायाधीश 'कोर्टांत, करकर बूट वाजवीत फिरत; तरी, एकदांच जर आमच्या गणपतरावांनीं कोणाचें तरी वकील पत्र घेऊन सरन्यायाधीश कोर्टांत जाऊन 'केस' चालविली तर खरोखरच सर्व वकीलांना ते लाजवितील व ' ग'ची बाधा असलेल्या सर न्यायाधीशास ' हो ओह मोठा हुशार ' असें खास म्हणावयाला लावतील.

भाग १२ वा.

महाराजांच्या 'न्यू प्यालेस' वाडचावरच्या घडचाळांत साडेसातांचे ठोके पडतात न पडतात इतक्यांत, गणपतराव आपल्या बंगल्यांत येऊन पोहोंचले. ज्या खोलींत नारायणराव निजत असे त्या खोलींतच, राघू, मैना इत्यादि पक्ष्यांचे पिंजरे टांगलेले होते; गणपतरावाचा शब्द ऐकिल्या बरोबर हे पिंजऱ्यांतले पक्षी चिंव चिंव करून, पंखाचा फड् फड् अवाज करून, अडूवर इकडे तिकडे उडचा मारूं लागले. आजकाल या दोन दिवसांत, ह्या खोलींत माणसांची कांहीं वर्दळ होती असें गणपतरावाच्या नजरेला मुळींच आलें नाहीं. प्रत्येक वस्तु जिथच्यातेथें तशीच. फारतर काय, चिरूट ओढल्याचें देखील कांहीं चिन्ह दिसलें नाहीं; जळकी काडी देखील कोठें त्याच्या नजरेस भाली नाहीं; नारायणराव येथें आला होता असण्याचें कशानेंच सिद्ध होईना; प्रत्येक मिनिटा मिनिटाला नारायणरावाच्या भेटीचा आशातंतू फारच नाजूक होऊं लागला. गणपतरावांनीं आपल्या एका नौकराला हाक मारिली व कांहीं टपाल आलें आहे कां व कांहीं कोणाची चिट्ठीबिट्ठी आहे कांअसून विचारिलें. त्यानें नाहीं ह्मणून सांगितल्यावर त्यांच्या मनाची काय स्थिति झाली असेल, याचा, वाचकहो, आपणच विचार करा.

बराच वेळ विचार केल्यावर गणपतरावांनीं ठरविलें कीं, तो रात्रीचे रात्रीं येथें राहून, पहांटेच्याच गाडीनें शिरोळाला गेला असावा हें खास. रात्रीं जर येथें राहिला असेल, तर आपल्या बाबाजीला माहीत असेलच; कारण रात्रीं तोच बंगल्यावर असतो. मग त्यांनीं बाबाजीला हाक मारिली. करकर वाहणा वाजवीत, त्या पांढऱ्या सफेत मिशांवर व कल्ल्यावर हात फिरवीत फिरवीत बाबाजी आला; व दारापाशीं वाहणा काढून ठेवून, आंत जाऊन आपल्या धन्यास लवून मुजरा करून पुढें उभा राहिला.

'नारायणराव रात्रीं येथें आले होते काय?' ह्मणून धन्यानें विचारल्या बरोबर, 'नाहीं सरकार; रात्रीच्या नऊ वाजतां सगळ्या खोल्यांत फिरून सर्व जिकडे तिकडे नीट नेटकें आहे कीं नाहीं हें पाहून, सर्व दारें लावून

पुढच्या दाराला कुलुप लावून, मीं जाऊन निजलों. आतां एक तासच झाला; रामा लोटून काढायाला आला म्हणुन दार उघडलें. कोणी आले नाहीं आणि गेले नाहीं. नारायणरावाचा पत्ता नाहीं कीं काय ? त्यांना कांहीं झालें बिलें कीं काय ? ' त्यानें असा जवाब दिला.

' कांहीं झालें बिलें कीं काय ' हे शब्द ऐकिल्यावरोबर गणपतरावाला फार राग आला आणि खस् करून त्याच्या अंगावर जाऊन ' काय लेका होतें काय त्यांना ? कालच दोन वाजतां तो तेथून निघाला झालें ' ते त्याला दरडावून म्हणाले.

मग बराच वेळ विचार केल्यावर ते म्हणाले ' जा, लवकर स्वयंपाक कर. मीं जेवून बारांचे गाडीला जाणार आहे, आटप लवकर. '

संध्याकाळीं दिवस बुडण्याचे सुमारास गणपतराव शिरोळास पोहोंचले. नदीकडच्या ओसाड अशा एका गल्लींतल्या एका जुनाट घरापुढें जाऊन ते उभे राहिले. हे नारायणरावाचे सासरे तुकोजीराव शिंदे यांचें घर. गल्लीचा तो औदासीन्य उत्पन्न करणारा ओसाडपणा पाहूनच आपला मित्र येथें आला नाहीं, असें त्यांच्या मनांत आलें असें वाटतें. दारांत उभे राहून ' आंत कोणी आहे कां ' म्हणून मोठ्यानें त्यांनीं विचारिलें, तों आंतून एक पोक्त मनुष्य बाहेर आला. हाच आपल्या हतभागी नारायणरावाचा सासरा. गणपतरावाला पाहिल्याबरोबर ' आंत या ' असें तो झणाला. नें दोघे आंत गेले. परकी गृहस्थ सोप्यावर येत आहे, हें एक लहान पोर माजघराच्या दारांतून डोकें बाहेर काढून पहात होतें. हें पोर कोण हे आमच्या चाणाक्ष वाचकांस निराळें सांगणें नको. हें नारायणरावाचें एकुलतें एक मूल. हाच काय तो या नैश्वर जगांत आमच्या भाग्यहीन नारायणरावाचा जीवंत रहाण्याचा आशातंतु.

सोप्यावर येऊन बसल्यावर तो म्हातारा झणाला ' नारायणरावाबरोबर गगनपुरास त्या प्रसंगीं तुम्ही आलां होतां नाहीं ? तुम्हाला पाहिल्याचें आठवतें. ' ' तो प्रसंग ' हीं अक्षरें तोंडांतून पडल्याबरोबर म्हाताऱ्याच्या डोळ्यांला खळकन पाणी आलें.

' हं ! ईश्वरेच्छेपुढें उपाय नाहीं, ' एवढेंच गणपतराव झणाले. म्हाताऱ्यानें डोळेबिळे पुसल्यावर कांहीं वेळानें, ' तुमचे जांवई बोवा येथें आले आहेत असें समजून मीं इकडे आलों ' असें गणपतराव झणाले.

ह्मा०—काय ? ते इकडे येणार हें तुम्हाला माहीत होतें तर !!

गणप०—(जरा उत्तुक्तनेनें) मग नारायणराव येथें आहे तर !!

ह्मा०—नाहीं, आतां ते येथें नाहींत, परंतु येथें आले होते.

गण०—केव्हां ?

ह्मा०—काल रात्रीच्या गाडीनें.

गणप०—आणि तो लागलीच गेला !!

ह्मा०—सुमार तास दीड तास ते येथें होते.

गणप०—शिव ! शिव !! काय गृहस्थानें उगीच मला काळजींत टाकिलें आहे पहा, काय याचा अर्थ तरी काय !

ह्मा०—काय ! त्यांचा बेत तुम्हाला नव्हता माहीत वाटतें.

गणप०—कसला ?

ह्मा०—पुन्हा चिनाला जाण्याचा—

गणप०—होय; मला माहीत आहे. हा विचार त्यांच्या मनांत नेहमीं घोळत असे. परंतु यांत आजकाल कांहीं विशेष झालें असें मला नाहीं वाटलें.

ह्मा०—आज रात्रीच्या आगबोटीनें तो मुंबईहून निघेल. काल रात्रीं सुमारें दोन वाजतां तो येथें मुलाला भेटावयाला ह्मणून आला. मला ह्मणाला कीं, 'मीं आतां कधीं परत येणार नाहीं. मला फार वैताग आला आहे. येथें घटकाभर बसला, पोराला मांडीवर घेतलें, त्याच्या तोंडावरून हात फिरविला, मुका घेतला आणि आतां येतों, असें ह्मणून पहांटेच्या साडेचारच्या मेल गाडीनें गेला.

गणप०—याचा अर्थ तरी काय ? मला कांहीं उमजच पडत नाहीं; असें एकाएकीं मला न कळवितां तो कां बरें गेला असावा ? काय मूर्ख पहा. मला एक अक्षर देखील यासंबंधानें बोलला नाहीं. निदान बोटभर चिठ्ठी तरी. त्याचा माझा किती स्नेह. मला घटकाभर विसंबायाचा नाहीं. गृहस्थानें कपडे देखील नेले नाहींत! सगळे माझ्या बंगल्यांतच हाका मारतात ! फक्त अंगावर एक कोट पाटलोण एवढेंच आहे. काय करावें आतां अशा मूर्खाला ! असा चमत्कार मीं कधीं पाहिला नाहीं. काय वेडबीड तर नाहीं लागलें त्याला ?

ह्ना०—तुह्माला माहीत आहे गणपतराव, (कपाळाला हात लावून) ती पोरगी गेल्यापासून त्याची ही अशी स्थिति झाली ती !

गणप०—(तिरस्कारानें) छे, हो. ह्मणून काय झालें ? त्याचें डोक बिघडलें कीं काय ? छे, नांव घेऊं नका. तुम्हा आम्हासारखा चांगला आहे. त्याला काय झालें आहे ?

'कदाचित् मुंबईहून तो तुह्मांला पत्र पाठवील. तुमचा इतका स्नेही तेव्हां तो पत्र पाठविल्याखेरीज राहणार नाहीं.' असें म्हातारा ह्मणाला. नारायणरावाविषयीं आपण असें वाईट उद्गार काढिले ह्मणून याला राग येईल तो न यावा अशा हेतूनें तो असें आपलें पहिलें बोलणें फिरवून ह्मणाला असावा.

गणप०—अलबत. त्यानें मला पत्र पाठविलेंच पाहिजे. त्याचा माझा कालचा स्नेह आहे असें नका समजूं. तो आणि मी करविरीं लहानपणीं शाळेंत असतांना सोबती. तेव्हां पासून अगदीं गट्टी. छे, नारायणरावानें माझ्या बरोबर असें वागायाचें नव्हे.

ह्ना०—खरोखरच हें त्याला शोभत नाहीं. काय असेल तें असो; त्यांचें त्यांना ठाऊक.

इतक्यांत माजघराच्या दारांतून जें मूल डोंकावून पहात होतें, तें हळूच बाहेर आलें. आणि आपल्या आजोबाच्या पाउंवर पडून गणपतरावाकडे पाहूं लागले.

गणपतरावानीं त्या मुलाला आवडीनें हाताला धरून ओढिलें, मांडीवर बसाविलें, आणि 'कायरे तुझा बाप गेलाना गांवाला ?' ह्मणून विचारिलें.

ह्ना०—कां, तुला ठाऊक आहे कां बाळ्या, तुमचे वडील नारायणराव चव्हाण रात्रीं आले होते ते; तुझा मुका घेतला तो; तुला काय माहीत ? तूं आपला स्वस्थ घोरत होतास. हा बेट्या ! !

मुलगा०—नाहीं अजोबा, मला नाहीं माहीत.

'नाहीं' ह्मणतांना ते भुरभुर उडणाऱ्या झुलपांनीं शोभित झालेलें डोकें हललेलें पाहून, गणपतरावाला त्याचें फार कौतुक वाटलें. लहान मुलाचें अकृत्रिम सौंदर्य व स्वाभाविक लीला पाहून कोणाला आनंद होणार नाहीं. असा या जगांत शून्यहृदय किंवा सर्वानंदपराङ्मुख कोण आहे ? तो मुलगा उगीच गणपतरावाच्या तोंडाकडे पहात पहात एकदम 'ती बाई कोठें आहे ?' असें ह्मणाला,

गणप०—अरे, कोणाचीरे ती?

मु०—ती–ती–पुष्कळ पुष्कळ दिवस झाले, येथें येते ती–ती-

म्हा०—ती, गगनपुरास आम्चे येथें होती एक बाई. ती केव्हां केव्हां येते येथें. तो तिचें सांगतों झालें.

मु०—अंहं–ती नव्ह. ती, आली कीं रडते. ती नव्हे.

म्हा०—हं–गप्प बैस.

मु०—(न थांवता) मला नाहीं ती आवडत; ती नेहमीं रडते. ती चांगली गोरीपान आहे. मला तें सोन्याचें घडयाळ दिलें ती.

म्हा०—हां. आमच्या त्या सुभेदाराची बायको येत असते केव्हां केव्हां; त्यांची आमची जुनी ओळख आहे, तिला म्हणतो झालें. ती नेहमीं याला कांहींनाकांहीं खेळायाला आणून देते.

मु०—आजोबा, माझें घडयाळ कोठें आहे हो ? तें द्या, मी यांना दाखवितों. कसें मांझ छान घडयाळ आहे ? तुम्ही पाहिलें का हो ? कसलें छान आहे ?

म्हा०—तें नीट करायला दिलें रे बाळा.

मु०—किती दिवस तरी नीट करायाला ! !

म्हा०—गणपतराव, घडयाळ चांगलें आहे. त्याला काय झालें आहे. (असें म्हणून खिशांत हात घालून एक कागद काढून) हें पहा.

हा कागद काय बरें ? कांहीं नाहीं. सावकाराच्या घरीं पन्नास रुपयाला तें घडयाळ गहाण ठेवल्याची चिट्ठी.

म्हा०—गणपतराव, खरोंखरच पैशाची फारच टंचाई झाली आहे; नारायणराव मदत करतो खरा. परंतु दुसरे कोणी—दुसरे कोणी–मला नीट मदत करीत नाहीं. (डोळ्यांत पाणी आणून) नशिबीं असेल तसें होईल. (मुलाकडे पाहून) अरे निजला कीं तुमच्या मांडीवरच; झोंप लागली याला. अजून जेवला नाहीं तसाच निजला पहा. जरा बसा बरें कां. मुलाला एवढें जेवावयाला घालून निजवून येतों. बसा आतां आलों.

असें म्हणून मुलाला घेऊन म्हातारा आंत गेला. गणपतराव, तेथें एकटेच, उगीच इकडे तिकडे पहात बसले. जिकडे तिकडे मोडक्या तुटक्या मुलाच्या खेळावयाच्या जिनसा अस्ताव्यस्त पडलेल्या, जाजमावर एक पानसुपारीचें तबक व तस्त पडलेलें, व कागदाचे तुकडे पडलेले त्यांच्या

दृष्टीस पडले. त्यांना चिरूट ओढण्याची तलफ झाली. परंतु कदाचित् म्हा-
ताऱ्याला आवडणार नाहीं, तेव्हां कसें करावें, अशा विचारांत ते पडले;
इतक्यांत पलीकडे कोंपऱ्यांत चिलीम असलेली त्यांचे दृष्टीस पडली;
म्हातारा स्वतः ओढतो मग आपल्याला काय हरकत आहे, असें मनांत
आणून त्यांनीं खिशांतून चिरूट व काडयांची पेटी काढिली. का-
डयांच्या पेटींत एकच काडी होती. ती त्यांनीं ओढून व चिरूटाला लावली
पण चिरूट लवकर पेटेना, काडी विझत आली; तेव्हां दुसरा कांहीं कागद
बिगद पेटवून मग चिरूट त्यावर पेटवावा असें मनांत आणून मागें
पुढें गडबडीनें पाहूं लागले, तों तक्याजवळच त्यांना कागदाची एक सुर-
ळी सांपडली. ती पेटवून त्यावर चिरूट पेटविला, आणि ती अर्धीच जळालेली
सुरळी विझवून खालीं टाकून चिरूट ओढूं लागले. चिरूट ओढीत उ-
गीच बसतां बसतां त्यांनीं ती सुरळी पुन्हां हातांत घेतली आणि ती उक-
लून पहातात तों, तो लिहिलेला एक तारेचा फार्म त्या कागदाचा वरचा
कांहीं भाग जळून गेला होता. सोप्यावर फार उजेड नव्हता म्हणून जो-
त्यावर जाऊन तो कागद वांकडा धरून, ते काय लिहिलें आहे म्हणून
पाहूं लागले. त्यांना अर्धी तुटक तुटक अशीं अक्षरें त्यावर दिसली.—

'.....व .....व्हाण येथें आला ..... रात्रीच्या मेलनें चिनास
जाण्याकरितां मुंबईस गेला.'

या फार्मावरची तारीख, पाठविणाराचें नांव, मुक्काम वगैरे जळून गेलें
होतें. ही तार वाचण्याबरोबर गणपतराव काळा ठिक्कर पडला. त्याला अ-
तिशय वाईट वाटलें. त्यानें त्या कागदाची नीट घडी करून खिशांतली
स्मरणवहीच्या पोटीं ठेविली मग जरा थांबून उद्गत स्वरानें आपल्याशींच
तो म्हणाला. 'अरे देवा! काय हें!! काय? याचा अर्थ तरी काय?
चला; आतां रात्रीच्याच गाडीनें मुंबईला जातों आणि सर्व चौकशी करतों.'

अरेरे! किती तरी ती दुष्ट वेळ. गणपतरावाच्या हातून तो कागद कां
जळावा? आणखी एखादी काडी त्याच्या जवळ असती तर तो कागद कां
जळाला असतां व असें घोटाळ्यांत-गणपतराव कां पडते? पण काडी
आणखी एक असती तर त्या सुरळीकडे यांचे लक्ष तरी कसें गेलें असतें?
कोणच्या वेळेला काय होईल याचा काय नेम? ती तार सबंध वाचावया-
ला मिळाली असती तर मोठी बहार झाली असती, नाहीं बरें?

भाग १३ वा.

पहांटेच्या मेलगाडीनें गणपतराव करविराला परत आला. झुंजरुक झुंजरूक उजाडलें होतें. पिंजऱ्यांतील पक्षी फडफड करूं लागले होते.

संध्याकाळच्या टपालानें पुष्कळ पत्रें व वर्तमानपत्रें येऊन पडलीं होतीं. तीं चाकरानें आणून दिलीं. सगळीं पत्रें पुन्हां पुन्हां चाळून पाहिलीं, परंतु नारायणराव म्हणाणाचें, त्यांत कांहीं पत्र नव्हतें.

आपल्या मित्राच्या शोधाकरितां दोन दिवस वणावण फिरून, गणपतराव फारच दमला होता, त्यांत, झोंप अगदींच नसल्यानें, फारच थकला होता. त्याच्या वयाला आज ३० वर्षें होत आलीं पण त्याला अशी दगदग कधींच माहित नाहीं. नारायणरावाला पाहून कितीएक वर्षें झालीं असें त्याला आतां वाटूं लागलें. अडेचाळीस तासां पूर्वीच आपण व तो निहालगड गांवीं नदीच्यां कांठीं बाभळीच्या झाडाखालीं बसलों होतों, हें त्याचें मनांतच येईना.

झोंप अगदीं नसल्यानें त्याचे डोळे लाल होऊन फार चुरचुरायाला लागले.

खोलींत, बिछान्याचे पोटीं, टेबलावर, कपाटावर, इकडे तिकडे, चोहोंकडे नारायणरावाचें पत्र असेल म्हणून त्यानें शोधिलें, परंतु कोठें कांहीं सांपडेना; तेव्हां कंटाळून ज्या खोलींत आपला मित्र निजत होता, तेथेंच, आंगांतला कोट किंवा डोकींची बत्ती न काढतां, तो पलंगावर पडला. व 'संध्याकाळच्या डाकेची वाट पाहूं, पत्र आलें तर बरें; नाहीं तर एक मिनीट वाट न पाहतां मुंबईला निघून जाऊं' असें म्हणाला.

तो अतिशय थकून गेला होता, त्यामुळें पडल्यावरोबर त्याला झोंप लागली. या झोंपेनें याचा थकवा जाणार काय? गाढ झोंप येईल तर थकवा जाईल. स्वप्नावर स्वप्नें पडूं लागलीं, मग गाढ झोंप कोठची?

एकदां त्यानें असें स्वप्नांत पाहिलें. 'त्या तारेच्या बातमीचा पक्का शोध लावण्याकरितां आपण परकी लोकांचा पाठलाग करीत आहों, अनोळखी घरांत शिरत आहों, आपण गगनपुरास गेलों आहों, व तेथेंच नारायण

रावाच्या त्रायकोच्या थडग्याचें काम चाललेलें पहात आहों;' अशीं ना-नातऱ्हेचीं विलक्षण व असंबद्ध स्वप्नें त्यास पडूं लागलीं.

आणखी कायसें त्याला स्वप्न पडत होतें, 'इतक्यांत आपल्या खोलीच्या दारावर कोणी ठोठावीत आहे, असें त्यास भासून तो एकदम जागा झाला.

या वेळेला चांगलें फटफटीत उजाडलें होतें. पिंजऱ्यांतील मैना एकमेकांवरोबर भांडत होत्या. थंडीचा फार कडाका पडला होता. चाकर लोक रेवड भरलेल्या घोंगड्या पांघरून हातपाय पोटाशीं घेऊन अजून पडलेच होते; ती स्वप्नांची धांदल आणि दारावर कोणी ठोठावीत आहे, आणि हाक मारीत आहे, याची गडबड अशी एकच खिचडी त्याच्या मनांत होऊन गेली. गणपतरावाला कशाचाच नीट उमज पडेना. बाहेर काय चाललें आहे, हें त्यास चांगलेंसें कळेना; या वेळेला तो अर्धा झोंपेंत व अर्धा जागा असा होता.

नंतर बिछान्यावर या अंगावरचे त्या अंगावर होऊन तो आपल्याशींच त्रासिक स्वरानें स्वप्नांत म्हणाला. 'हा गाढव राम्या असेल झालं. हा पहा आणखीं आपटावयाला लागला. थोडें थांबून कां झाडायाला येईना ? छे, इतकी लेकाला कोठची अक्कल ? मी नुकतांच येऊन पडलों आहें आणि याचा हा त्रास ! याचा आपला एक मार्ग; धोरण म्हणून गाढवाला अगदींच नाहीं. आतां या वेळेला उठून कोणी कडी काढावी बरें ?'

दारावर ठोठावणार राम्या होता कीं दुसरा कोणी होता हें कोणाला ठाऊक ? हें पहा पुन्हा दार आपटावयाला लागला.

याच्या या खोलीच्या आणि दिवाणखान्याच्या मधलें दार अर्धें उघडें होतें. त्यांतून राम्या दिवाणखान्यांत झाडून काढीत असलेला, टेबल साफसुफ करित असलेला, खुर्च्या जरी जागच्या जागीं होत्या तरी पुन्हा उचलून तेथेंच त्या ठेवित असलेला गणपतरावाला दिसला. त्यास पाहून.—

गणप०—कोणरे, तें ? राम्या कारे ?

रामा०—व्हय सरकार.

गणप०—तर मग मूर्खा, बाहेरून कडी निघून होती तर मला उगीच दार आपटून आपटून का त्रास दिलास 'ब्लडी फूल.'

रामा०—अन् दार आपटलें कोणी जी !

गणप—एकसारखी पंधरा मिनिटें कटकट चालविली होतीस कीं, अ।-णि कोणी म्हणतोस महा मुर्खा?

रामा—सरकार, म्यां मुळींच वाजाविलें नाहीं. दाराला आंतून कडीबिडी नव्हती. आक्शी हाळूच दार उघडून आनमंदी आलों.

गणप०—अरे, मग कोण दारावर आपटीत होतें ? सारखा खडखड आवाज चालला होता. दुसरें कोणी तरी असेल; जिन्यांत तुला कोणी भेटलें का ?

रामा—मला येऊनशानी लइ याळ झाला! पहिल्यान् लाबरीमंदी झाडून हिकड आलों; मला न्हाइ कोणी भेटलं

गणप०—काय ! तुला कोणी भेटलें नाहीं! अरे, जिन्यांत नाहीं, खालीं दारांत.

रामा—चिट्पांखरूं नाहीं सरकार.

गणप०—अरे! मग कोण वॅर असावा ? कोण आला होता; कोणाकडे आला होता, कांहीं कळलेंच नाहीं कीं. 'ठेरी स्ट्रेंज,' नारायणराव षष्ठहाणा-कडून कोणी आलें नसेल कशावरून ? कांहींच पत्ता नाहीं, हें काय?

रामा०—(शांतपणानें) जरूर असेल तर येईल, विचारा पुन्हां अपुनच येतोया.

गणप०—होय; कांहीं महत्त्वाचें काम असेल तर येईल पुनः.

शिरोळास त्या जळक्या तारेंतलि मजकूर वाचल्यापासून नारायणराव भेटण्याची आशा आतां गणपतरावास मुळींच राहिली नाहीं, यांत कांहीं तरी लवाडी आहे, कांहीं तरी गूढ आहे, असें त्यास वरचेवर वाटे. त्याचा कोणीतरी घात केला असावा, किंवा अशा कृत्यानें आपला तरी कोणी घात योजिला असावा असें त्याचे मनांत वारंवार येई. आपल्या हातांत त्यानें सर्व पैसा देविला आहे; तेव्हां तो उपटण्याकरितां त्या थेरड्यानें कांहीं तरी लुच्चेगिरी केली नसेल कशावरून ? हे व्यसनी व्हातारे लोक, काय करितील याचा भरंवसा नाहीं. नारायणराव मुलाला भेटावयाला म्हणून शिरोळास गेला असेल आणि तेथें त्या म्हाताऱ्यानें त्याला नाहींसें करण्याची कांहीं तरी युक्ति योजिली असेल! अहो, पैशाचा लोभ फार वाईट आहे. आज २५००० रुपये मिळणार थोडे कां झालें ?

— महा तत्त्ववेत्ता बेकन तो देखील वेळ आली तेव्हां पाघळला! रावर्ड वालपोलानें तर निवळ दुकानच सुरू केलें होतें! मागच्या गोष्टी कशाला! आपण रोज काय पाहतों? कंटाळभर पगार घेणारे, अगदीं खरे 'जान बुल' म्हणून अभिमान बाळगणारे जर आज 'रेग्युलर' व्यापारच सुरू करितात मग या अज्ञानी अशिक्षित मुन्या समजुतीच्या म्हाताऱ्याची काय गोष्ट! अशा नानाविध कल्पना त्याचे मनांत एकामागून एक येऊं लागल्या.

होय म्हातारा लबाड, त्यानें पैशाकरितां नारायणरावाला कांहीं तरी केलें, किंवा दुसरे कोणी आपला घात करण्याकरितां त्यास (नारायणरावास) कांहीं केलें; या योगानें तारेंतील बातमीचा उलगडा झाला काय; त्या तारेंतील बातमीचा मेळ बसविण्याची तर गणपतरावाची मुख्य खटपट. मग या विचारानें ती कितपत सिद्धीस गेली? टपालाच्या शिपायानें पत्र कांहीं आणून दिलें नाहीं; किंवा पहांटे दारावर जो कोणी ठोंठावीत होता, तोही आला नाहीं. गणपतरावांनीं त्याची नऊ वाजेपर्यंत वाट पाहिली परंतु कांहींच नाहीं. अखेर जेवण करून पुन्हां नारायणरावाच्या शोधाला जाण्याकरितां गणपतराव स्टेशनाकडे निघाले व वीस मिनिटांचे आंत स्टेशनावर येऊन गाडी केव्हां सुटते म्हणून टाईम टेबल पाहूं लागले.

मित्रसंगमविषयीं अति चटकन झालेले आमचे वकीलसाहेब स्टेशनावर येण्यापूर्वीच, अर्धातास, मुंबईला जाणारी 'फास्ट' ट्रेन गेली होती. आतां एक 'मिक्स्ड' ट्रेन सुटणार होती तिला अजून सव्वा तास भरपूर अवकाश होता.

अजून सव्वा तास वाट पाहिली पाहिजे व पहिली गाडी आपली चुकली म्हणून वाईट वाटून 'प्रचाट फॉर्मावर' इकडून तिकडे हातगाडयानें सामान नेणाऱ्या म्हणणाऱ्या पोर्टराच्या दंडाला दंड घांसीत व दुसरे लोकांचे सामानाचे गठ्ठे पडले होते ते ओलांडून त्यांतून वांकडे तिकडे ते फार खिन्न होऊन फिरूं लागले.

त्यांनीं तेथें एक 'टाइम्स' विकत घेतलें आणि चिनांत जाणाऱ्या लोकांची नांवें छापिलीं आहेत कां म्हणून, व तसेंच कोणी मेलें वगैरे यांची व अपघात झालेल्याचीं कांहीं नांवें आहेत कां? म्हणून गडबडीनें त्यांत पाहूं लागले.

मुंबईस कारनाक बंदरावर कोणीएक बुडून मेलेला सांपडल्याचें स्थानें ऐकत वाचलें.

'नारायणराव चव्हाणच हा गृहस्थ असेल काय ? नारायणरावाचा अशाच अंत झाला असेल काय ? निःसंशय नाहीं. त्या तारेंत काय बरें होतें? ती तार नारायणरावाच्या सासऱ्याला केली होती; यावरून तिचा नारायणरावाच्या नाहींसें होण्याशीं, खास संबंध आहे. तोच कायतो तपास करण्याचा मुख्य मुद्दा आहे.' असें त्याच्या मनांत आलें.

गणपतराव रात्रीं आठ वाजतां 'व्हिक्टोरिया टरमिनस'वर उतरला, या वेळेला नारायणरावाची विशेष चौकशी करण्याला कांहीं मार्ग नव्हता, म्हणून फक्त पी. ॲन्ड ओ.च्या आफिसांत जाऊन गेल्या दोन दिवसांत चिनाला आगबोट सुटली कीं काय ? म्हणून त्यानें चौकशी केली.

'आज तिसरे प्रहरीं चार वाजतां गोदावरी नांवाची आगबोट हांगकांगला जाण्याला सुटली. आगबोटीवर कोण कोण प्रवासी आहेत त्याची नांवनिशी पाहिजे असल्यास उद्यां सकाळीं म्यानेजराला भेटा, म्हणजे तुम्हाला पाहिजे ती माहिती मिळेल,' असें तेथें एका नोकरानें त्यांस सांगितलें.

दुसरे दिवशीं सकाळीं दोन वाजतांच, ऑपिसांत कोणी कारकून वगैरे आले नाहींत तोंच गणपतराव तेथें गेला. दहा वाजतां सर्व कारकून लोक आले; म्यानेजरही आले. म्यानेजराला जाऊन भेटल्यावर, त्यांनीं 'त्या पलीकडच्या कोंपऱ्यांत लिहीत बसलेल्या गृहस्थाला जाऊन विचारा,' म्हणून सांगितलें. त्या कारकुनाजवळ जाऊन रीतीप्रमाणें 'गुड् मार्निंग' करून 'कालच्या स्टीमरनें नारायणराव चव्हाण नांवाचे कोणी गृहस्थ गेले आहेत कां ? तें मेहेरबानगीनें सांगा,' असें गणपतराव म्हणाला; कारकुनानें हातांतलें पेन आडवें दांतांत धरलें; आणि एक बुक काढून त्याचीं कांहीं पानें मागें पुढें चाळून कांहीं नांवें मनांतल्यामनांत वाचून 'चव्हाण या नांवाचे कोणी नाहींत' म्हणून सांगितलें. 'स्टीमर सुटण्याचे अगोदर दोन चार तास कोणी प्यासेंजर घेतला आहे कां ?' म्हणून पुन्हां गणपतरावांनें विचारिलें. त्या कारकुनाजवळच बसलेला दुसरा एक कारकून आपल्या पुढच्या टेबलावर कोंपर टेकून तळ हातावर डोकें टेकून, 'होय' आगबोट सुटण्यापूर्वी तासभर म्हणजे तीन वाजतां, एक गृहस्थ पैसे घेऊन आला ; आणि त्यानें प्यासेज घेतला. त्याचें नांव अगदीं सगळ्यांचे खालीं त्या कोंपऱ्यांत लि.

हिलें आहे पहा ?' असें तो पहिल्या कारकुनास म्हणाला. हें ऐकून गणपतराव त्या कारकुनास 'पहा' असें फार उत्सुकतेनें म्हणाला. त्यानें पुन्हा पाहिलें; आणि 'तें एका पारशाचें नांव ; कैकोबाद नारीमन् असें आहे' म्हणून सांगितलें.

गणपतराव, हें ऐकिल्याबरोबर जरा डोकें खाजवून, आपल्या मनाशींच म्हणालें. 'नारायणरावानें नांव तर बदललें नसेल कदाचित्, त्यानें खोटें नांव घेतलें असेल.' तुमच्यानें जो कारकून बोलला त्यास, 'सगळ्याचे मागून ज्यानें प्यासेज घेतला, त्या गृहस्थाचा चेहरा आपल्या लक्षांत आहे कां?' म्हणून गणपतरावानें विचारिलें. तो कारकून म्हणाला 'नाहीं, त्यावेळेला फार गर्दी; पुष्कळ लोक येत होते व जात होते, त्यावेळेस आमची अगदीं लग्नघटिका; माझे कांहीं लक्षांत नाहीं बोवा.'

गणपतरावाला येथें नारायणरावाची कांहींच माहिती मिळाली नाहीं त्या कारकूनास गुड मार्निंग करून, 'थ्यांक् यू' म्हणून, ऑफिसांतून परत जाण्याला निघाला तो तों, एक कारकून सहज म्हणाला—'होय; कैकोबाद नारिमन माझें लक्षांत आहे. त्याचा उजवा हात गळ्यांत पट्टयानें अडकाविला होता.' याच्या बोलण्याकडे गणपतरावांनें लक्षच दिलें नाहीं. मुंबईस कांहीं नारायणरावाचा पत्ता लागला नाहीं म्हणून तो रात्रीचे गाडीनें परत करविरास गेला.

रात्रभर गणपतरावाला चैन पडलें नाहीं; झोंप येण्याविषयीं त्यानें पुष्कळ खटपट केली पण कांहीं केल्यानें झोंप येईना. मन स्वस्थ असलें नर झोंप येईल कीं नाहीं ? सकाळीच करविरीं पोंहचल्यावर नित्यविधि आटपून, 'टाइम्स' वाचीत तों बसला; नांवाला मात्र वर्तमानपत्र हातांत, त्यांतल्या ओळी मागून ओळी वाची; पण काय वाचलें हें त्यानें त्यालाच कळेना. मनांत सर्व नारायणरावाविषयीं विचार चालला होता. याप्रमाणें विचार करीत इकडे तिकडे कांहीं वाचीत, जेवणाची वेळ होईपर्यंत कसातरी त्यानें वेळ काढिला. दाहाचे टोके पडले; इतक्यांत बाबाजी 'सोंवळेकरी' 'जेवायाला चला' म्हणून बोलावयाला आला. गणपतरावांनें जेवण केलें, जेवून आराम खुर्चीवर चिरट-ओढीत पडले होते, इतक्यांत, त्याच्या मनांत कांहीं आलें; त्यासरसें झटकन उठून, टेबलाजवळ, कांहीं लिहावें म्ह-

पुन, खुर्चीवर बसला बराच वेळ विचार केल्यावर, तो आपल्याशींच म्हणाला 'नारायणराव चिनाला गेला नाहीं, हें खास. तो जर जिवंत असेल तर दुसरीकडे कोठें नाहीं; या करवीर प्रांतांतच असेल; अथवा मेला असला तर त्याचें प्रेत या करवीर प्रांतांतच कोठें तरी पुरलेलें असलें पाहिजे.'

याप्रमाणें विचार करीत व चिरुट ओढीत तो त्या खुर्चीवर तासानतास बसला; मग तोंडातील चिरुट फेंकून दिला, दौत आलिकडेस घेतली, एक फुलस्कॅप कागद पुढें घेतला, आणि शाईत पेन बुडविलें; परंतु कागदावर टांक न ओढतां, तो पुन्हां थांबला. त्यानें आपलें कपाळ टेबलावर टेंकलें; आणि तसेंच बराच वेळ विचार करण्यांत गुंग झाला. मग हळूंच डोकें वर उचलून, 'निहालगडाला गेल्यापासून ते आज तारखेपर्यंत काय काय गोष्टी घडल्या त्यांचें एक टिप्पण करूं, असें म्हणाला. त्यानें मग लहान लहान तुटक तुटक, वाक्यें लिहून, कलमवार एक टांचण तयार केलें. तें येणें प्रमाणें.

'नारायणराव चव्हाण नाहींसे होण्यांत,'
'ज्या ज्या गोष्टी घडल्या, व त्यांशीं'
'ज्या कांहीं गोष्टींचा परोक्ष किंवा'
'प्रत्यक्ष संबंध आहे असें वाटतें'
'त्यांचें टांचण.'

याप्रमाणें कागदाचे मथळ यावर लिहिलें; व त्याकडे वरचेवर जरा ऐटीनें पाहूं लागला; सरकारी कामगाराप्रमाणें कसें आपण लिहिलें याचा त्याला फार आनंद झाला व म्हणाला; 'खरोखरच मी आपला धंदा चालविला असता तर, आमच्या सर न्यायाधीशांची खात्रीच केली असती. ते काय या पेक्षां चांगलें लिहितात ? सरकारी तऱ्हेचें लिहिणें दुसऱ्याला येत नाहीं म्हणे. न यायला काय झालें ?' मग पुनः थांबून, थोडा विचार करून, तोंडांत चिरुट धरून, लिहिण्यास सुरवात केली.

१. नारायणरावाला घेऊन निहालगडाला येतों म्हणून मीं सगुणाताईला पत्र पाठविलें.

२. नि हालकुवरबाई नको म्हणतात म्हणून, 'येऊं नका,' असें सगुणाताईचें उत्तर.

३. नको म्हटलें असतां आम्ही निहालगडाला गेलों. मामी साहेबांची

भेट. स्यात्र दिवशीं, संध्याकाळीं 'दमून भालें' म्हणून नारायणरावांची भेट नको, असें तिनें म्हणणें.

४. दुसरे दिवशीं संध्याकाळीं जगदेवरावानें आम्हाला भोजनास आमंत्रण.

५. दुसरे दिवशीं सकाळीच निहालकुवर बाईला करविराला येण्याकरितां तार येते.

६. सगुणाताई, निहालकुवर बाईचें पत्र दाखविते; त्यांत मीं व नारायणराव करविराला परत कधीं जाणार म्हणून तीं विचारिते; ताजाकलम घालून पुन्नां पुन्नां तेंच विचारिते.

७. आम्हीं वाडा पहावयाला जातों. मामीसाहेबांच्या महालाला कुलुप.

८. गुप्त वाटेनें आम्हीं तिच्या महालांत जातों; त्या गुप्त मार्गाची तिला माहिती नाहीं; एका खोलींत तिची तसवीर आम्हीं पाहतों.

९. अकाळीं पावसानें नारायणरावाची तबेत जरा बिघडते; सारी रात्र स्याला चैन पडत नाहीं.

१०. दुसरे दिवशीं सकाळीं त्याची नेहमींप्रमाणें वृत्ति असते. करविराला जाण्याची माझी सूचना; संध्याकाळपर्यंत राहण्याचा विचार.

११. आम्हीं मासे धरण्याला जातों; व वाडयाकडे जाण्याकरितां नारायणराव मला सोडून जातो.

१२. नारायणरावाची अखेरची खरी बातमी मला निहालगडावर मिळते. मामीसाहेबांला भेटावयाला म्हणून तो बागेकडे गेला, असें तेथील चाकरांचें सांगणें.

१३. त्याच्याविषयीं स्टेशनावर मला कांहीं माहिती मिळते; मग ती खरी असो किंवा खोटी असो.

१४. पुन्हां त्याच्या संबंधाची बित्तिम माहिती मला शिरोळास मिळते. स्याच्या सासऱ्याच्या सांगण्याप्रमाणें कालच्या रात्रीं त्याचे तेथें तासभर असणें.

१५. ती शिरोळास मिळालेली तार.

हें पंधरा कलमी टांचण गणपतरावांनीं तयार केलें. लिहितां लिहितां मध्यें तो वरचेवर थांबे; वरचेवर खोडा खोड करी; पुन्हां शोध घालून लिही; कांहीं कलमाच्या आंकडयाचे मागें त्रिशूळ खुण करी; खोडी, पुन्हां लिही; मग सर्व लिहिलेलें, पुन्हां वाची पुन्हां विचार

करीत, कांहीं कांहीं ठिकाणीं, स्यांनें पुन्हां तांबडघा सिस्पेनीनें खुणा केल्या; आणि मग कागदाची घडी घालून, पालिकडच्या खोलींत जाऊन, टेबलावरचें कपाट उघडून, 'महत्वाचे कागद' नांवांची चिठी मारलेल्या ज्या खान्यांत पूर्वी स्यांनें सगुणाताईचें पत्र ठेविलें होतें, स्याच खान्यांत हा कागद ठेविला.

परत येऊन, तो आराम खुर्चीवर चिरूट ओढीत पडले 'आरंभापासून अखेर पर्यंत, अगदीं अंधकार. या गूढ चारित्राचें मूळ निहालगडास किंवा शिरोळासच सांपडणार आहे. आतां काय होईल तें होवो; आपला बेत ठरला. आतां प्रथम निहालगडावर मोतिचौक वाडघांत जावयाचे आणि तेथें नारायणरावाबद्दल अगदीं बारीक चौकशी करावयाची. 'असें म्हणाला.

भाग १४ वा.

'नोटीस—रा० रा० नारायणराव चव्हाण —ज्या कोणा गृहस्थाला मशारनिल्हे गृहस्थ चालू महिन्याच्या तारीख ७ चे पुढें भेटले असतील, किंवा त्यांजबद्दल सदरहु नारख नंतरची त्यांच्या डाव ठिकाणाची माहिती असेल, त्यांनीं समक्ष किंवा पत्रद्वारें करवीर येथें त्रावडयावर 'न्यू प्यालेस,' रस्त्यावर, घर नंबर १४. येथें अ. क. यांस भेटावें व माहिती सांगावी. या बद्दल बक्षीस फार मोठें दिलें जाईल.' ही ज्ञानमंदिर पत्रांत छापलेली नोटीस जगदेवरावांनीं चहा पिण्याचे वेळीं आमच्या वाईसाहेबांस व सगुणाबाईस वाचून दाखविली.

नोटीस वाचल्यावर जगदेवराव झणाले. 'मग गणूच्या मित्राचा अजून शोध नाहीं लागला वाटतें ?'

आमच्या वाईसाहेब मोठ्या शोकानें झणाल्या. 'ही नोटीस देणारा कोणी तरी फार चंचळ स्वभावाचा, अधिऱ्या मनाचा असला पाहिजे किती वेडेपणा हा.'

ही नोटीस पुष्कळ वेळां जरी वर्तमानपत्रांतुन आली, व तसेंच पुष्कळ वेळां जरी आमच्या निहालगडावरच्या खाशामंडळीच्या नजरेखालून गेली, तरी नारायणरावाचा कांहीं अजून शोध लागत नाहीं, झणुन त्यांच्या मुळींच पुन्हा कधीं लक्षांत आलें नाहीं. त्यांनीं त्याजबद्दल अगदींच काळजी दाखविली नाहीं; एवढेच नव्हे, जगदेवराव, किंवा आमच्या वाईसाहेब, किंवा सगुणाताई यांच्या तोंडीं, कधीं नुसते त्याचें नांव आलेलें ही आम्हीं ऐकिलें नाहीं.

गणपतराव, ज्या दिवशीं संध्याकाळीं भोजनाला आला होता, त्यादिवशीं मायलेकींच्यें जें, काय विशेष सलगीचें भाषण झालें असेल तेवढेंच; त्यांचे भाषण नेहमीं होई पण तें फक्त कामापुरतें. व तेही मोकळ्या मनानें नाहीं.

'ती मोटी डामडौली, तोरा मिरविणारी, सदां आपल्या आढ्यतेंत, नट्टापट्टयांत चूर, अशी ती आहे. नाहींरे! सिझर' असें एके दिवशीं सगुणा आपल्या आवडत्या कुत्र्याचे दोन्ही कान धरून लीलेनें ओढून, झणाली. 'नखरा करून व गोड गोड बोलून आमच्या बाबाला अगदीं तिनें वेडें केलें आहे

नाहीं रे सिझर? मला नाहीं बाई हें अगदीं आवडत. परकी कोणी तर, मुरडते काय, आणि लाजते काय, हळूच हंसते काय, एक एक तें विलक्षणच. होय नाहींरे सिझर ? ' इचें माझें कधीं नाहीं जुळणार. मेली चावट.'

असा आपल्या सावत्र आईविषयीं मनांत झिट्कारा आल्ला तिचें व इचें एकमेकांविषयीं मन शुद्ध नाहीं, ही गोष्ट जगदेवराव कानावर गेली. पोरीची याबद्दल थोडी कानउघाडणी करावी जगदेवरावांनीं सगुणाताईस एके दिवशीं हाक मारिली.

जगदे०—अग सगे, ती फार कोंवळ्या मनाची आहे, तूं कधींच्याशीं नीट बोलत नाहींस, त्यानें तिला फार वाईट वाटतें; तें ग कां करतेस ?

सगुणा०—तुझी तिला पाहिजे तर कोंवळ्या मनाची झणा; मी झणणार नाहीं: एखाद्याचे हात पाय फार नाजूक असले, रंग फार असला, केंस फार लांब काळेभोर सडक असले, ह्मणजे त्यांचें फार नाजूक असतें, असें नाहीं. अशा नाजूक हातानेंच नाहीं नाहीं फुल्यें होतात; तीं इतकीं भयंकर असतात कीं ज्याला आपण अतिशय दैय ह्मणूं, त्याचे हातून देखील तीं होणार नाहींत. (या वेळेस बापाला राग आला असें पाहून जरा हळू व मर्यादेच्या स्वरानें) एकुलत्या पोरीवरच्या मायेंत ही वाटेदारीण झाली; तरी बाबा, तुमच्याकडे त्यापासून तुह्माला बरें वाटतें ह्मणून, मीं आतां तिच्या बरोबर बोलत ईन; माझें काय गेलें ? पण मनापासून ह्मणाल, तर नाहीं बाबा. माझें कसें जुळावें ! माझा कुत्रा देखील तिला आवडत नाहीं ! त्याचे बर देखील द्वेष ! परवां त्याच्या डोक्यावर कसें तिनें काड्कन मारी तेव्हांपासून हा देखील तिला पाहिलें कीं गुर्र् करून अंगावर जातो. सगळ्यांशीं जुळेल पण माझ्या या सिझरशीं (त्याच्या पाठीवर थापटून) कधीं नाहीं जुळणार!

जगदे०—(मोठ्या रागानें) संभाळ बघ सगे, जर तुझ्या कुत्र तिला कांहीं केलें तर गोळी घालून त्याला ठार केलाच ह्मणून समज.

या बेळेस सिझरनें आपले गुंजेसारखे लाल डोळे जगदेवरावाकडे फि विले. जणूं काय, ते काय म्हणाले हें त्यास कळलेंच ! इतक्यांत फ

कीं, निहालकुवरबाईसाहेब तेथें आल्या, तिला पाहिल्याबरोबर गुरगुर करून तो कुत्रा आपल्या धन्याजवळून चवताळून उठला. सगुणानें 'चपराय' म्हणून गळपट्ट्याला धरून त्याला बसाविलें; कुत्रा जात्याच मोठा उग्र, पाहिल्याबरोबर भीति वाटावयाची; चांगल्या पुरुषाची तो गाळण करून टाकणार, मग बायकोची काय कथा? आणि त्यांत आमच्या निहालकुवरबाईसारख्या नाजुक माणसाची तर गोष्टच पुसूं नका.

आमच्या बाईसाहेबांचा स्वभाव फार मनमिळाऊ असे. त्यामुळें सगुणा आपल्याशीं असें वागते, हें तिच्या सहज लक्षांत आलें; ती याबद्दल कधींच कांहीं बोलत नसे. एकदांच काय ते तिनें याचा उच्चार केला. ती म्हणाली, 'सगुणा, मग आतां तुझं माझं कधीं जुळत नाहीं म्हणावयाचें; या जन्मांत माझें कोणाचें वांकडें आलें नाहीं. आतां तसा प्रसंग आला आहे. उपाय नाहीं. उगीच तोंडाला तोंड देण्यांत काय अर्थ आहे! उगीच अडाणी बायकांप्रमाणें मीं भांडणारी नव्हें. तू आतां मजबरोबर कधी ती बोलत जाऊं नकोस, एवढेंच पुरे. उगीच विनाकारण माझ्यावर आग मात्र पांखडूं नकोस बरें. एवढेंच मागणें आहे.

सगुणा०—(जरा आश्चर्यानें) मी! आणि तुझ्यावर आग पांखडणार! मीग बाई कशाला पाखडूं?

निहाल०—दुसरें काय? तिकडे कांहीं तरी मनांत भरवून देशील झालं. आणि मीं एकदां मर्जीतून उतरलें म्हणजे तुझं काम झालं.

सगुणा०—तुझ्यासारखें इकडून हंसत हंसत मन बोलतां येत नाहीं, हें खरें, तुझ्यासारखें गोड बोलावयाला येत नाहीं, हेंही खरें; परंतु मी असा नीचपणा कधींही करणार नाहीं? मी हिंमतबाहदराच्या पोटची आहें. मी हलकटपणा कधीं करणार नाहीं. आणि त्याहूनही, मीं कांहीं सांगितलें तर, माझ्या सांगण्यास काय होणार आहे? बाबाला कोणाचं खरें वाटतें? तुझ्याच गुणानें तूं आपलें नुकसान करून घेशील, हें मात्र खरें. तुझं तूं आपलं संभाळ.

निहाल०—(जरा कर्कश आवाजानें) सगुणे, कितीग तूं लबाड बोलतेस? तरी मीं मोठी लबाड आहें हाच कीं नाहीं तुझ्या बोलण्याचा भाव? नाहीं बाई कोणाला उगीच तुटून बोलवत. लोकांबरोबर चांगलें करून व ग आपलं काय गेलें? माझं हें आपलं स्वाभाविकच आहे.

झालें. याप्रमाणें सगुणाताईचें व निहालकुवरबाईचें मिटलें. आतां हे हेगामाचे व वसुलाचे दिवस. जगदेवरावाचें या दिवसांत नेहमीं घरीं राहणें कोठलें? आणि आमच्या बाईसाहेबाला तर घटकाभर जर कोणी बोलावयाला नसेल तर चैन पडावयाचें नाहीं; मग आतां बोलाचालायला आहे कोण? येऊन जाऊन आपली आवडती कुणबीण मैना.

निहालंकुवरबाईला मैना ही योग्य दासी होती. कोर्टांतील कुणबीण ती आतां आमच्या बाईसाहेबांची आवडती दासी. जिवाभावाची काय ती तीच. हितगुजाचें काय तें भाषण इच्याजवळच. लहानपणीं इच्या आईनें इला शाळेंत घातलें होतें; शिवाय, ती आपल्या आईबरोबर पाटणकराचे वाड्यांत नेहमीं जात येत असे, तेथें त्यांच्या मुलींच्या सहवासानेंही, इला बरेंच जास्ती शिक्षण मिळालें होतें; आमच्या बाईसाहेबांनींही तिला इंग्रजी शिकविलें. बाईसाहेब झप् झप् इंग्रजी नाटकें कांदंबऱ्या वाचूं लागल्या, झणजे इला त्यांतलें YES, NO (यस, नो) वगैरे लहान शब्द, व कांहीं, फार झालें तर, वाक्यें कळत झालं. बाईसाहेब वाचूं लागल्या, व मध्येंच कांहीं गमतीचा भाग आला, व त्या हंसल्या कीं इनें हसावें; व 'समजलें कां. झटलें कां ' होय ' झणावें.

ह्या उत्तेजित सहवासांत नेहमीं वागल्यानें मैनाच्या तोंडची ग्राम्य भाषा आतां पुष्कळच लयास गेली. शुद्ध बोलण्यासाठीं ती नेहमीं यत्न करी, ती तरी चुकून मधूनच चटकन् ग्राम्य शब्द तोंडीं येई.

हे—अखेर,—व आरंभाचे दिवस. जिकडे तिकडे झाडांचीं जीर्ण पर्णें गळून झाडांच्या खालीं राशीच्याराशी पडूं लागल्या; वाऱ्यानें गळलेलीं पानें जिकडे तिकडे भरभर उडूं लागलीं; जुन्या पडक्या तटाच्या मागची पडकी विहीर, अगोदरच झाडा झुडपांनीं भरलेली, त्यांतही वाळलेल्या पानांची भर पडली; कुरणांत व चिंचेच्या बनांत, बोडक्या झाडांखालींच कां होईना, पण ऐन दोन प्रहरीं, सांवलींत बसावें झणून, गाई झशी जमा होऊं लागल्या; मत्स्यपल्वलाचें पाणी कितीतरी मोत्यासारखें स्वच्छ ! पण तें देखील आतां पानपाचोळ्यानें खराब झालें; जगदेवरावांनीं झाडलोट करून, पानपाचोळा गोळा करून, बाग साफ करण्याकरितां १ नौकर जास्ती ठेविला; व निदान मत्स्यपल्वलाचें पाणी तरी स्वच्छ ठेवा, झणून वरचेवर त्यांची सक्त ताकीद, व त्याप्रमाणें व्यवस्था ठेवण्यांत नोकरलोक फार

ी वेत; तरी सृष्टिक्रमापुढें कोणाचा उपाय चालणार आहे ? कांहीं
ठिकाणीं बोडकीं झाडें तांबड्या धुरस वर्णाच्या कोंवळ्या पालवीनें
लगलीं होतीं, व वाराही बराच जोराचा वाहूं लागला होता.
तोवेळीं एके दिवशीं संध्याकाळीं आमच्या बाईसाहेब बागेंत फि-
रतां, जिकडे तिकडे हीं बोडकीं झोंड व खालीं पानपाचोळा पडले-
ला पहून म्हणाल्या, ' काय मेले दिवस तरी हे ! जिकडे तिकडे ओसाड
दिसत आहे नें पहा ! जीर्ण झालेलीं पानें पहा कशी गळून पडताहेत
तीं झाडें फार शोभिवंत दिसत होतीं तीं आतां किती तरी ओंगळ
न ! मनुष्यांची देखील वृद्धावस्थेंत अशीच स्थिति होत असेल नाहीं
काय ? आणखी कांहीं दिवसांनीं माझे देखील हे काळेभोर केंस, ह्या
झ्या पानांसारखें पिकून गळून पडतील काय ? आतां ह्या झाडांचें स-
ौंदर्य गेलें आहे, तसेंच माझेंही जाईल नाहीं ! परंतु ही पहा कांहीं
ा नवी पालवी फुटूं लागली आहे, व ज्याप्रमाणें लहान मूल भुरभुर
ऱ्या मोऱ्या जावळानें शोभतें, त्याप्रमाणें हीं झाडें तांबड्या व कोंव-
कोंवळ्या पानांनीं शोभत आहेत. त्यांना तारुण्यावस्था पुन्हा प्राप्त
ण। तसें भला पुन्हा तारुण्य येईल काय? छे. असें कोठें झालें आहे काय?
नें मनुष्याला कां बरें असें देविलें नाहीं ! तो मोठा लबाड झटलें
ुर तर मग म्हातारपणीं मीं फार वाईट दिसणार ना ! मग माझें कसें
बरें!

विचार मनांत आल्याबरोबर भयावेशानें तिचे रोमांच थरारून
हिले. मग त्वरेनें ती परत वाडग्यांत जाण्याला निघाली. ती इतकी
लद पाऊल टाकूं लागली कीं तिची दासी, मैना, इला कांहीं के-
तिला गांठणें होईना !

ति त्वरेनें बरोंच पावलें जाऊन, पुन्हा हळू हळू चालूं लागून, जरा
ून, ती मैनेला म्हणाली, ' काग मैने, तुला आहे कांस्मरण ? परवां
ह्या एका इंग्रजी कादंबरींत वाचलें —कीं एका अति रूपवती बा-
ने मोठा गुन्हा केला. काय बरें तो गुन्हा ? मला नाहीं बाई आठवत
ही मोठ्या श्रीमंताची, सर्व गांवभर तिच्या रूपाची प्रशंसा, आणि
ेवटीस तिनें गुन्हा केलेला ; तुला आहेका आठवण, कीं तिनें तो
कांहीं वर्षांमा न येतां किती एकां वर्षें उपवन डोंगेला ! तें मोठें

मजेदार वर्णन केलें आहे नाहीं ? गुन्हा होऊन किती दिवस झालें नर्मा नेहे ! सारखेंच परक्याला काय, पण घरांतल्या माणसाला देखील मुळींच कळलें नाहीं; कांहीं न झाल्याप्रमाणें, सर्व सुरळीत; तें देखील एक दिवस नाहीं, दोन दिवस नाहीं, कितीएक वर्षें ! आश्चर्य नव्हे ? परंतु पुढें वृद्धावस्थेंत जेव्हां तिचे केंस अगदीं पांढरे सफेत झाले, डोळ्यांनीं धड दिसेना सुद्धां, तेव्हां कांहीं विलक्षण समापत्तीनें त्या गुन्ह्याचें स्फोटन झालें. अशा रीतीनें गोपनस्फोट कादंबरीकार नेहमीं करीत असतात. मग तिची चौकशी सुरू झाली, अपराध शाबीत झाला, आणि तिला मग जिवंत जाळण्याची शिक्षा झाली ती ! जे लोक तिची फार साध्वी साध्वी म्हणून स्तुति करीत होते, तेच आतां तिचें नांव काढूं नका असें म्हणूं लागले. ज्या बालबोध कित्याच्या बायका ती फार साध्वी म्हणून वर्णन केला त्याच आतां ' मेलींचं तोंड देखील पहाणें नको ' असें म्हणूं लागल्या. ज्या हजारों गरीबागुरिबांनीं तिच्या हातचा दानधर्म घेतला होता, ते आतां उघड आपण अशा महा चांडाळणीचे हातून दानधर्म घेतला, असें म्हणूं लागले. जीं गांवांतलीं पोरें धर्मनिष्ठ म्हणून तिच्या पायां पडत, तींच पोरें आतां तिला ' माणूसमारी, माणूसमारी ' म्हणून मागें अरेडत, तिला दगड मारूं लागलीं. '

' माईसाहेब, असल्या गोष्टीचा मला लई कंटाला आहे. असल्या गोष्टी वाचल्या कीं आंगावर कांटाच येतो, आणि असल्या ह्या उदास वाड्यांत त्या वाचल्या तर संमद डोळ्याम्होरच हित हाय असें वाटतें. '

हें ऐकून आमच्या निहालकुवरबाई कांहींच बोलल्या नाहींत. फक्त हंसल्या मात्र.

मग जरा थांबून निहालकुवरबाई म्हणाली, ' खरेंच मैना,हा वाडा कोणीकडच्या कोणकिडे एका बाजूला बांधला आहे; गांव तरी जवळ आहे; तेंही नाहीं. बांधणाऱ्यानें काय म्हणून बांधला तें त्यालाच ठाऊक ? जाहगिरदाराचा वाडा म्हटला तर गांवांत असावयाचा; मी आतां कितीएक दिवस, मोंग हुट,हुट लावून, करवीरास छान बंगला बांधावयाला लाविलेंआहे तेथें वाडा आहे, नाहीं असें नाहीं; पण जुना, गांवांत अगदीं दाटणींत; मोकळी हवा सुद्धींच नाहीं. ह्या वाड्याला नांव ठेवतां अगदीं उपयोगी नाहीं. त्याचा मोठा तिकडे राग येतो. मीं परवां सहज म्हटलें कीं

येथें किती तरी उदास आहे, तर लालालच राग आला. उदास नाहींग दिसत सगळें मैने ? चार चाकर माणसं आहेत तेवढींच. दुसरं कोणीं कधीं दृष्टीत तरी पडणार आहे काय ? फार बाई उदास !! भाऊंनी मी मोठी जाहगीरदारीण आहें, माझ्या मी होतेप्रमाणें आंत जागा सजविली आहे; पण खरें सांगतें मैना, सरलष्कराचे घरीं जिनकें मला बरें वाटत होतें, तिनकें कांहीं येथें वाटत नाहीं. माणूसच्च कोणी नाहीं, तर काय करावें ?

निहालकुवरबाईच्या प्रिय दासीच्या,—दासी झटल्यापेक्षां मैत्रीण झटल्यास विशेष शोभेल—आतां पगार भरपूर असतां, काम मुळींच नसतां, बाईसाहेबांची चाकरी सोडून जाण्याचें मनांत येणें हें आश्चर्य नव्हे ? परंतु मैना जाणार हें तर खास. कामंदेयाचा तडाकाच कांहीं विलक्षण आहे. जोतिबाचरोबर लग्न लावून जाण्याचा तिचा पक्का निश्चय झाला. कुवरबाईसाहेबासारखी गुलहौशी धनीण सोडून, मोतीचौक वाड्यासारखें राहण्याचें ठिकाण सोडून, बाईसाहेबांच्या पंक्तीला बसून सुग्रास जेवण्याचें सोडून, जोतिबासारख्या ज्ञानहीन नरपशूच्या ताब्यांत राहण्याला, गांवांत कोठें तरी मोडक्या पडक्या खोपटांत संसार मांडायाला, व जोतिबाबरोबर, केव्हां आंबील, केव्हां माडगें भाकरी, कोठें कधीं तरी सणावारीं हत्तीभोग तांदुळाचा भात खाण्याला, मैना तयार झाली. होईलच, अलबत होईल.

आमच्या जोतिबानें कसेंतरी करून जास्ती पगाराची, व कमी श्रमाची एक सैसाची जागा आपल्या प्रिय पात्राच्या मध्यस्तीनें निहालगडावर मिळण्याची खटपट केली. मैनाच्या सांगण्यावरून जागा मिळाली, मैनाचा तो रमण ; व त्यामुळें बाईसाहेबांची त्याच्यावर पूर्ण मर्जा. मग त्याला काम सांगतो कोण ? खुद्द जगदेवरावाचा देखील दम होत नसे ; जगदेवराव कधीं घोड्यावर बसून निघाले, तर हा कधीं बरोबर जावयाचा नाहीं. मग आमच्या सगुणताईची तर गोष्ट लांबच. फक्त निहालकुवरबाईसाहेब कधींतरी घोड्यावर बसून निघाल्या तर ही स्वारी जात असे. पहिल्याच स्वारीला त्याच्या लक्षांत आलें कीं, बाईसाहेबाना कांहीं चांगलें बसतां येत नाहीं ; फक्त काय तें करड्या तट्टावर मांड त्या बसतात. चेर आहे. त्यावरोबर पळावें बिळावें मुळींच लागत नाहीं.

या दोघीजणी एके दिवशीं वस्त्रपरिधानगृहांत असतां, [illegible]

बाई उगीच एक बुक हातांत घेऊन कोंचावर पडली होती. मैना नेहमीच खालीं, जरीची वेलबुट्टी हांतरुमालावर काढीत बसली होती. तों निहालकुंवरबाई मध्येंच ह्मणाली, 'कांग मैने, खरोखरच कां ग्या हेडमुद्यां सैसावर तुझें मन बसलें आहे ?'

मैनान लागलींच कांहीं उत्तर दिलें नाहीं. वर तोंड करून तिच्याकडे पाहिलें मात्र. हातांतला रुमाल खालीं टेवून, आंगाला ओळखे पिळोके देऊन, थोडा विचार केल्यासारखें करून, ती ह्मणाली, ' मला नाहीं ते कांहीं कळत. त्याची माझी फार दिवसांची ओळख. नवा मला पदर देखील आला नव्हता. मग पदर आल्यावर त्याची माझी दोस्ती झाली. तेव्हां मी पंधरा वर्षांची होतें. तेव्हांपासून लग्न करावयाचें ठरलं आहे. आतां कसें नाहीं ह्मणूं ? त्यालाही आतां हातानं भाकरी करायाचा लई कंटाळा आला हाय. त्याची आई ह्मातारी जक्क हाय; पन तिच्यानें काय व्हत या ? तिलाच भाकरी भाजन घालावी लागते. आतां जर मी नाहीं ह्मटलें तर मेला काय करील याचा नेम आहे ? त्या मागच्या वडाच्या झाडाखालीं बसतो अन् तेथें मीं कधीं गेलें, तर माझा गळाच कापील कीं; तो नाहीं सोडणार. मला फार भय वाटतें, त्यालाही मीं जुमानलं नसतं, आपून असल्यावर तो काय करतो ? पन् आतां एक पाळीबी चुकल्यावाणी झालीया. काय नेम ? आन् पोटची राहीलें तर पंचाईत; ह्मणून ह्मणतें, बाईसाहेब, एकदां लगीन उरकून द्यावें.'

निहाल०—भग खुळे पोरी, असल्या कांहीं पंचायतींत पडूं नकोस; पाळी चुकली ह्मणन काय झालें? त्याच्च काय एवढें? मला तें सर्व माहीत आहे; कानास कोन कळूं देणार नाहीं: अगदीं नऊ महिने झाले तरी काय झालें? मीं आहेंना? काय तुझा तो जीव घेईल ? होय; जीव अगदीं वाटेवर पडला आहे तर! लग्न झाल्यावर तरी तो कांहीं करणार नाहीं हें कशांवरून ग? एखादे वेळेस तुझी त्याची कांहीं कुरबुर झाली, किंवा पुरुषाचा काय नेम, त्याला दुसरी एखादी चांगली फटाकडी बायको करावी असें वाटलें, किंवा तुझ्याजवळ जें कांहीं आहे नाहीं तें लुबाडुन घ्यावयाचें त्याच्या मनांत आलें, आणि याकरितां जर, तुझा खून केला तर कसं ? मीं खरेंच सांगतें मैना, तूं त्या फंदांत पडूं नकोस. पहिली गोष्ट ही कीं, त्या दांडग्याचा मला मोठा राग येतो, आणि दुसरी गोष्ट ही कीं, तुला माझ्यान कांहीं सोडवत नाहीं.

हें बघ, आतां असें करूं या. त्याला आपण कांहीं रुपये देऊन दुसरी एखादी बायको कर म्हणून सांगू म्हणजे झालं.

मैनानें एकदम उठून तिचे घट्ट पाय धरिले, आणि म्हटलें, 'माईसाहेब, मला असल्या घाटाळ्यांत घालू नका; यांत मलाही अडचण आणि त्यालाही पण तसें. एकदां मला त्याच्या बरोबर लग्न लावूंद्या सरकार, आपल्याला त्याचा स्वभाव काय माहीत आहे? मीं जर त्याला सोडिलें तर माझें वाटोळेंच झालं म्हणून समजा. त्यांत दुसऱ्याचंही पण वाटोळं होणार. छे. मीं लग्न लावणारच.

निहाल०—वर बाई मी कशाला अडथळा करूं! यांत कांहीं तरी मुळांत कपट किंवा कांहीं गौप्य असेल झालं.

मैना—(उठून तोंड फिरवून) होय माईसाहेब तसेंच कांहीं आहे.

निहाल०—तूं जाणार म्हणून मला बाई आतांपासूनच वाईट वाटावयाला लागलें; परंतु मी वचन दिल्याप्रमाणें,तुला अंतर देणार नाहीं, अवश्य मदत करीन बरें; लग्न झाल्यावर तो मेला येथेंच कामावर राहणार, का जाणार कोठें दुसरीकडे? काय बेत ठरला आहे तुमचा?

मैना—तेंच्या मनांत एक पाथिकाश्रम घालायाचा आहे.

निहाल०—तर मग खासें! खाऊन खाऊन हाच फस्त करील कीं सगळें. आज संध्याकाळीं गोपाळदेशमुखाकडे जेवायला तिकडे जावयाचें आहे, आणि ती आमची सगीही सरलष्करच्या येथें जाणार आहे; मग रात्रीं जेवण झाल्यावर, त्याला येथें वर बोलाव, म्हणजे काय करावयाचें तें मीं सगळें त्याला सांगतें.

मैना—आह्मां गरीबांवर आपली फार दया आहे माईसाहेब.

जेवण करून येऊन रंगमहालांत निहालकुंवरबाई कोचावर पडली होती; यावेळेस ती तांबडें भलवन नेसली होती, आंगावर कांहींएक नव्हतें, वेणींत हिरव्या चाफ्याचा गजरा होता; महालांत जिकडे तिकडे गाद्या गिरद्या, टेबलें खुरच्या, हांडया झुंबरें, यांचा अगदीं चकचकाट झाला होता. आणि अशा सुंदर रमणीय महालांत, लिंबीचा वास आंगाला येणारा, हेडमुन्शी तेथें उभा राहिल्यानें फार शोभा आली असेल नाहीं? त्याचें तें डोकें खाजवीत खाजवीत, वांकडी मान करून 'हं तसंच' म्हणत बोलणें व मांडयावरचें धोतर मागेंच सारून बसलेला पाहून आमच्या बाईसाहेबांना फार बरें

घाटलें असेल नाहीं बरें! निहालकुवरबाईनें त्याला बरेच पैसे देण्याचें कबूल केलें. तोही अडाणी पणानें 'बरें, आतां सध्या पुरत' एवढेंच म्हणाला. त्याला काय उपकार मानण्याची सुधारलेली रीति माहीत ?

मैना तेथें त्याच्या जवळच उभी राहिली होती; त्याचा असा हा उर्मटपणा पाहून तिला फार वाईट वाटलें; मग ती म्हणाली,—म्हणाकीं, आपून लई उपकार आम्हा गरिबावर केले म्हणून !'

मला नाहींबा असं कांहीं माहीत. थुःतिच्या! २०० रुपये ते काय आन उपकार न फकस्त म्हन! एवढ्या रुपयामंदी कस व्यापार करावबा ? 'आणखी २०० रुपये द्या म्हन कीं' असें तो पुनः उर्मटपणानें तिलाच उलट म्हणाला.

'वस्स. मीं नाहीं आतां एक पै देणार जास्ती,' असें निहालकुवरबाई तिरस्कारानें म्हणाली. त्याचा हा उर्मटपणा पाहून तिला त्याचा फारच तिट्कारा आला. 'मेल्या, जास्ती पैसे द्या असें कसें म्हणतोस ? तुझ काय मी कर्ज बिर्ज लागनें होय ? तें इतक्या जोरानें मागतोस तें? मूर्ख कोठला!!'

जोतिबा—होय सगळ खरं. पन् तुमी देनारच; न देऊन सांगतां कोणाला? चारशें नाहीं, हजार नाहीं कां देणार ? नाहीं तर आतां पहा कसें तें!

निहालकुवरबाई तट्कन उठून उभी राहिली, आणि सारख्या नजरेनें जोतिबाकडे पाहूं लागली. त्यानेंही तिच्या दृष्टीला दृष्टि दिली.

मग मैना उभी राहिली होती तेथें जाऊन जरा रागाच्या झपाट्यानें व गडबडीनें ती म्हणाली. 'मैने तूं याला सांगितलेंस वाटतें ?'

मैनानें चट्कन तिचे पाय घट्ट धरिले; आणि गोरें मोरें तोंड करून रडव्या स्वरानें म्हटलें ,' माईसाहेब, माफ करा. दया करा. यानें माझ्या कडून बळानें सर्व कांहीं काढून घेतलें. मला सांगणें भाग पडलें. नाहीं तर याला कध्धीं कध्धीं सांगितलें नसतें. '

भाग १५ वा.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें जोतिबा व मैना यांचा विवाह झाला. या विवाहास, विवाह झटल्यापेक्षां पाटच झणूं, झणजे या विवाहसमारंभाची सर्व कल्पना आमच्या वाचकांच्या लक्षांत सहजच येईल. पाट झणण्याचें कारण येवढेंच कीं, मागें राणीसाहेबांनीं उदारबुद्धीनें धर्मकृत्य झणून एकशें आठ लग्नें केलीं त्यांतच हिचे इच्या वयाच्या दुसऱ्या वर्षी लग्न झालें होतें; पण इचा बाळपति पुढें दोन महिन्यांनींच स्वर्गगत झाला. भातां आम्ही या पाटाचें काय वर्णन करावें? मैना व जोतिबा एके ठिकाणीं जेऊं खाऊं लागले व एका घरांत राहूं लागले यापेक्षां जास्ती नाहीं. कारण, लमापासून जी फलप्राप्ती व्हावयाची, ती तर, आमच्या या जोडप्यास अगोदरच झाली होती. मग लमाची काय मातब्बरी राहिली!

निहालकुवरबाईनें या प्रसंगीं आपल्या प्रिय दासीस आपले जुने एक दोन शालू, एक दोन जरीकांठी चोळ्या, कांहीं जुनी अडंगर भारी किंमतीचीं लुगडीं बक्षीस दिलीं. निहलागडच्या पश्चिमेच्या बाजूनें एक मोठा रस्ता जातो; त्या रस्त्यावर या गांवापासून पांच सहा मैलांवर जगदेवरावाचा एक पडका बंगला आहे; तो या जोडप्यास त्यांनीं राहवयाला दिला. तेथील जरूरीपूर्ती डागडुजी होईपर्यंत, हें जोडपें निहालगडावरच होतें.

निहालगडच्या आसपास रानडुकर, हरिण इत्यादि शिकार फार चांगली मिळते, झणून करवीराहून पुष्कळ सरदार लोक व कामगार लोक दिवसांत इकडे येत. त्यास राहावयास कांहीं तरी सोय असावी झणून जगदेवरावांनीं हा बंगला बांधिला होता; पण येथें जेवणाखाण्याची विशेष सोय नसल्यामुळें कोणी उतरत नसे; हा बंगला डागडुजी नसल्यानें मोडकळीस आला होता; व हा माळावर असल्यामुळें वारा नेहमीं फार सोसाट्याचा आंत येत असे. वारा, पाऊस व ऊन्ह खाऊन याचीं दारें काळीं झालीं होतीं; दाराचें एक गंधवाल धड तर दुसरें अर्धेच मोडलेलें, जिसरें तर अजीबातच निखळून गेलेलें; खिडकीचें एक झडप निघून गेलेलें, व एक काय मोडकें तुटकें राहिलेलें, तें वाऱ्याच्या सपाट्यानें

सारखें खडखड खडखड चौकटीवर आपटत असे ; कांहीं झणून निहालग-
फुटल्यानें, आंत सूर्याचीं किरणें यथास्थित येत होतीं; व कांहीं खांदेवट्या
मुळींच नव्हतीं झणून, ज्या रिपा उघड्या पडल्या होत्या एक पेटी, आणि
सों करित सारखा येत असे. कांहीं ठिकाणचा गिलावा च्या तवाकूचे चार
व कांहीं ठिकाणीं धलपे धलपे निघाले होते, व त्यांतून गि
तयार करितांना आंत घातलेल्या गवताचे तुकडे वर दिसत होते; येत;
ठिकाणच्या खुंट्या निघून गेल्या होत्या, व त्या पूर्वी येथें होत्या हें पाहून पाय
ण्यास ती भोकें मात्र कायम होतीं ! व कांहीं ठिकाणीं त्या लटपट हात
होत्या !

जरूरीपुर्ती डागडुजी झाल्यावर, व तेथें संसारोपयोगी अवश्य लागणाऱ्या सामानाची तजवीज केल्यावर, एके दिवशीं शुभमुहूर्तावर निहालकुवरबाईच्या धमनी गाडींत बसून जोतिबा व मैना आपल्या नव्या घरांत रहावयास निघाली. या वेळेस, आपल्या बाईसाहेबांनीं दिलेल्या लुगड्यांपैकीं एक लुगडें नेसून जरीकांठी चोळी आंगांत घालून मैना तयार होऊन आली. गाडींत बसावयाचे वेळेस जोतिबाचे मित्र, दुसरे सेस, चाकर माणसें वगैरे, व मैनाच्या मैत्रिणी, झणजे वाड्यांतल्या दुसऱ्या दासी वगैरे लोक गाडीपाशीं जमा झाले होते. मैना, निहालकुवरबाईंच्या व इतर खाश्या मंडळीच्या पाया पडून, 'येतें,' म्हणून विचारून, गाडींत बसण्याला गेली. बाईसाहेबही पोहोंचावयाला खालीं आल्या. फार दिवस राहिलेलें, व आपला चारितार्थ चांगल्या तऱ्हेनें चाललेलें, स्थळ सोडून जातांना मैनाला फार वाईट वाटलें हें अगदीं सृष्टिक्रमानुरूप आहे. तिचे डोळे पाण्यानें डबडबले, ती वरचेवर ते पुसूं लागली नाकाची बोंडी लाल झाली, वरचेवर तिला रडण्याचा हुंदका येऊं लागला, हें पाहून आमचे अडमुठे जोतिबा मोठ्या आढ्यतेनें झणाले, 'काग, ये ! हें काय आरंभलयास. तुझ्या मनामंदीं न्हवतं तर कां पाट लावलास ? अन् तस मंग का न्हाई बोललीस; आतां रडतीया ? मीं का तुला फाशी देया नेतो व्हय ? कां, सुळावर चढावितों ? कां बकऱ्यावानी मुंडी कापाया नेतो ? करतो तरी काय ? इचभन, काय रडतीया अवदसा ! जनु इच कुनी मेल बिलच !!'

वर मैनानें आलेला हुंदका आंत लेआंतआंवरला; डोळे रेशमी लुगड्याचा गंडेरी पदर जरा सरसावून घेतला. ी पदराकडे न्याहाळून पाहून, गाडींत बसतां बसतां भाखानें झणाला, 'इचभन लुगड बगॉ कसल नेसली मागील भागांकाय, लई शिरमंताची वरमायच्च झाली हाय !! आपली या विवाहासंडीं अन हे काय ? आपल्या युगतेपरमान लुगड नेसावं ; भाची सर्वाईसाहेबांनीं दिल झणून नेसलीस, उद्यां माझ्या घरीं कुटल आ-ण्याचा आसलं ? दीड रुपडीचा बांडच बग !'

सरनौबताच्या शिफारसीवरून करवीराहून मैनाच्या जागेवर एक दासी आली. ही फार झोंकदार, नेहमीं उंची उंची लुगडीं चोळ्या फाडण्याची इला फार हौस, सदा नखऱ्यांत अशी असे. निहालगडावर आल्यावर, येथें फार उदास आहे, कांहीं करमणूक नाहीं झणून कुरकुरत नेहमीं असे.

यंदा हिवाळ्याच्या अखेरच्या दिवसांत पुष्कळ लोक निहालगडाकडे शि-कारीला येऊं लागले. जोतिबानें, "भीमंत व सभ्य हौसी शिकारी लोकां करितां उत्तम राहण्याची व जेवणाची सोय. भीमत सर जगदेवराव यांच्या पूर्ण आभयाखालीं," अशीं पांढरीं अक्षरें असणारी पाटी दारावर लाविली. तेथेंच त्यानें एका खोलींत सोडावाटर, लेमोनेड वगैरे पेय पदार्थांचें दुकान सुरू केलें. व असें एक गृह स्थापन केल्याची, ज्ञानमंदिर पत्रांत नोटीसही दिली. या भपकेदार नोटीशीवरून पुष्कळ हौशी व शिकारी लोक-तेथें उतरायाला आले, बडे लोकांच्या नोकरांनीं हें गृह अगदीं गजबजून गेलें. त्यांच्या कुत्र्यांचें कयांव कयांव ओरडणें जिकडे तिकडे एकू येऊं लागलें, मोडक्या तुटक्या खिडक्यांतून दिव्याचे उजेड दिसूं लागले, माडीवरच्या खोलींतून हंडयांचे उजेड व खिदळण्याचे अवाज ऐकूं येऊं लागले, माडी-वरच्या खिडक्यांला तांबडे अलवानी पडदे फडकूं लागले. तबेल्यांत घोडे खिंकाळूं लागले, स्वयंपाकघरांतून अनेक पदार्थांचे घमघम वास येऊं लागले. सोडावाटर लेमानेट इत्यादि पेय वस्तूंच्या खोलींतून. फाडफाड बुचांचे अवाज कानीं पडूं लागले. रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्यांनीं लांबून संध्याकाळचे येळां हें सर्व पाहिलें झणजे हा कोणातरी जहागीरदाराचा वाडा असावा असें वाटे; परंतु जवळ येऊन दारावरची पाटी वाचली झणजे खरी स्थिति नेत्रांच लक्षांत येई.

आमचे गुलहौशी गणपतराव वकील ही शिकारीला झणून निहालगडाला आले. त्यांनीं आतां आपल्या बरोबर पांच तहा इंग्रजी कादंबऱ्या आणल्या त्यांत *झोलाचाच भरणा विशेष, चिरूटाची एक पेटी, आणि शिवाय आपल्या ' ब्याग ' मध्यें ' वर्डस आय ' नांवाच्या तंबाकूचे चार डबे व सिगरेटच्या कागदाच्या चार पांच वह्या आणल्या.

येथें बहुतकरून सर्व जातींचे धंद्यांचे व पेशाचे चांगले लोक येत; आणि नाना व्यवसाय करणारे येथं जमत असल्यामुळें, नानातऱ्हेचे विषय संभाषणांत निघत व हंशा पिके.

निहालगडावर शिकारीला झणून जेव्हां जेव्हां गणतराव येत, तेव्हां आपल्या मामाच्या गरीबऱ्या करड्या रंगाच्या घोडयावर बसून, दोन कुत्रीं बरोबर घेऊन, नांगरलेल्या शेतांतून माळामाळांनीं, आडवाटेनं, पुष्कळ फिरावयाचें; मग कोठें तरी, कोणाच्या तरी, मळ्यांत जाऊन, कोपीपाशीं हुरडा करून उतरावयाचें, व ' आज फार शिकार झाली; आतां नाहीं आपण जात, ' असें झणावयाचें; केव्हां केव्हां मत्स्यपल्वलांत मासे धरण्याकरितां गळ टाकावयावा तेथेंच कांठावर स्वस्थ घोरायाला लागावयाचे, मग कोर्णांतरी उठवून आंत जाऊन निजण्यास सांगावयाचें. केव्हां केव्हां डागकार्टमध्यें बसून चढणीच्या रस्त्यानें फिरायला जावयाचें; व प्रत्येक दहा बारा पावलाला ' अरे दमधर, गादी सरकली नीट करतों' असें कोचमनला झणावयाचें; अशी गणपतराची वहिवाट असे, परंतु झा खेपेची गणपतरावाची तऱ्हा कांहीं वेगळी; शिकारीला झणून आले खरे, परंतु एक दिवस देखील बाहेर गेले नाहींत! सदा आपल्या मामी साहेबांच्या महालांत आरामखुर्चीवर आळसानें जांभया देत आपल्या मामीबरोबर व सगुणाताई बरोबर गप्पा मारीत ते स्वस्थ पडत.

निहालकुवरबाईला गणपतरावाची ही तऱ्हा फार आवडली. त्यांना अ-

---

* हा एक फ्रेंच कादंबरीकार आहे. जगातले खरेखुरे निंद्यकर्म, कृष्णकृत्यान व्यभिचारादी महापातकें ते आपल्या कादंबऱ्यांत हुबेहुबे वर्णन करतो. जगांतली निंद्य स्थिति वर्णन करून तो निंद्य कर्मात प्रोत्साहन देतो असें कांहीं लोक झणतात व कांहीं लोक अशा लिहिण्यानें तो निंद्य कर्माचा स्फोट करून लोकांच्या मनांत त्या विषयीं तिटकारा उत्पन्न करून लोकांस नीतिमार्गास लावण्याचा यत्न करितो अ प्रतिपादन करतात.

गोदर बोलावयाला कमीच पाहिजे! आयती करमणूक झाली; परंतु सगुणाताईला मात्र हें अगदीं आवडलें नाहीं.

सकाळचे वेळीं कांहीं उपहार करून, रोजच्याप्रमाणें बाहेर फिरावयास जाण्याकरितां घोड्यावर सामान ठेवण्यास सांगून, सगुणाताई नेसलेल्या पातळाची कांस मारून, हातांत चाबूक घेऊन, निहालकुवरबाईच्या महालांत गणपतराव बसले होते, तेथें आली; गणपतराव, आरामखुर्चीवर स्वस्थ चिरूट ओढीत पडले होते; सगुणाताई हातांतला चाबूक आपल्या पातळाच्या ओंच्यावर आपटीत आपटीत गणपतरावास म्हणाली. 'या खेपेला आपली तबेत अशी कां झाली ? असा विलक्षण आपल्या तबियतींत फेरफार कां झाला नकळे ! या सालींच आपल्याला काय झालें नकळे यंदा हें काय आपण धरलें आहे ! स्वस्थ 'झोला वाचीत माईपाशीं बसतां हें काय ?

आमचे तरुण गृहस्थ मोठ्या विनयानें म्हणाले ' माझे लाडके सगुणा, तूं इतकी सगाऊं नकोस? कोणत्याही गोष्टीचा पूर्ण विचार केल्याखेरीज त्याबद्दल आपलें मत स्थापित करूं नये. उगीच आपले एखाद्याला नांवें ठेवण बरोबर नाहीं.असा अंतर कां पडला म्हणशील,तर त्याचें कारण एवढेंच कीं,गावांत रानांत, उगीच लंगोटयांबरोबर वेळ घालविणें मला अगदीं आवडत नाहीं; म्हणून मी येथें मामीबरोबर वाचीत, बोलत बसतों झालें. तूंच सांग, लंगोटयाबरोबर वेळ घालविणें बरें कां तें? मामी साहेबांच्या संगतीनें मला फार करमणूक होती तशी त्या गांवढळ मित्रापासून मुळींच होत नाहीं. कां सगुणा, तूं विचारलेल्या प्रश्नाचा हा योग्य जबाब आहे कीं नाहीं ?

सगुणाताई--' पुरे झालें तुमचें' असें म्हणून, तिरस्कारानें मानेला झट्का मारून म्हणाली. 'होय मला वाटलें होतेंच असें उत्तर येईल म्हणून. हं चालूं द्या, तुमचें ठीक आहे. खुशाल सारा दिवस आरामखुर्चीवर लोळत पडा! पडूंद्या ती घाणेरडी कुत्रीं त्या कोचावर! सोडा सगळ्या महालांत तंबाकूची घाण करून! आण जे जे कोणी येथें येतील, त्यांकडून ' पहा कसा पडला आहे आळशी ' असें म्हणवून घ्या! '

गणपतरावजी, आपले पाणीदार डोळे वर उचलून, आतां काय उत्तर द्यावें, हें न सुचून, गांगरल्यासारखें करून तिच्याकडे पाहूं लागले

सगुणाताई तेथें हातांतला चाबुक फिरवीत फिरवीत इतस्ततः फिरत होती तिचा चेहरा अगदीं लाल झाला होता; तिचे ओंठ थरथर कांपत होते; या सर्व चिन्हांवरून तिला फार राग आला आहे असें गणपतरावाच्या लक्षांत तेव्हांच आलें.

ती म्हणाली. 'होय. तुमचें असें बोलणें मला सर्व कळतें. आपल्याला ठाऊक आहे कां गणपतराव, कीं, आपण जरी असें ओढून ताणून सौजन्य आणिलें आहे, तरी अत्रलिप्तता आपल्यांत पूर्ण भरली आहे ती! आमच्या सर्व तऱ्हेच्या करमणुकीला धिक्कारिता, 'त्यांत काय आहे, असल्या पोरखेळांत? पुनः असले खेळ आपल्याला नाहीं आवडत?' असें म्हणतां; व पुन्हा खुर्चीवर चिरट ओढीत पडतां? खरोखरच आपण फार विरक्त व निरुत्साही झालां आहां!!'

काय! सगुणा! मी विरक्त—अरे देवा हें काय!

अशीं तोंडांतून अक्षरें निघाल्या बरोबर हातांत असलेलें वर्तमानपत्र ऐकदम त्यांच्या हातांतून खालीं पडलें.

सगुणाताई पुन्हा रागानें म्हणाली—'होय खरोखरच फार विरक्त व आपमतलबी झालां आहां. कोठलीं तरी अन्ना वांचून मरावयाला टेंकलेलीं दोन चार कुत्रीं आपल्या बरोबर आणतां, आणि बसतां त्या बरोबर खेळत. आहाहा! सौजन्य तरी किती अंगीं आतां आलें आहे पहा! एका गालावर मारिलें तर दुसरा गाल पुढें! परंतु दुसऱ्याच्या म्हणून कधीं उपयोगी पडूं नका. त्याचें दुःख मनांत आणूं नका! ते आनंदपुरचें सर नौबत झुंजारराव, जरी ते अजून सरदार क्लासांत कालेजांत आहेत तरी, इकडल्यापेक्षां फार बरें! जरी त्यांना मोठ्या ऐटीनें बोलावयाला येत नाहीं, साखर पेरायाला येत नाहीं, तरी ज्याला म्हणून एकदां आपलें म्हटलें त्याजकरितां ते आपला जीव देखील गहाण ठेवतील—नाहीं तर,

इतक्यात गळा दाटून आल्यानें तिला पुढें बोलवेना. तिचे ते नेत्र पाण्यांनीं डबडबून आले.

चटकन आराम खुर्चीवरून उठून खालीं गालीच्यावर बसलेल्या कुत्र्यांस अडखळून, त्यास पलीकडे लाथाळून पुढें येऊन गणपतराव म्हणाले.

'माझे सगुणा, माझे लाडके, हें काय असें,? असें कां बरें! (तोंडावरून हात फिरवून) असें रडायाला काय झालें?'

सगुणा०—(स्फुंदत स्फुंदत) कांहीं नाहीं, हा चाबकाचा शेवट फिरविता फिरविता डोळ्यावर लागला झाले. पुढें ते कांहीं विशेष प्रभ करणार तोंच ती दुड दुड जिना उतरून खालीं गेली.

तिच्या मागोमाग खालीं जाऊन कांहीं समजून करावी असें त्याचे मनांत आलें पण आतांच समजून करूं लागलों तर त्यापासून कांहीं उपयोग न होतां उलट तिच्या या ताज्या दुःखास पुष्टीकरण होईल. असा विचार करीत करीत तेथंच आराम खुर्चीवर, ते पडले. इतक्यांत आमच्या बाईसाहेब वेणी फणी करून, उपहार करून, ताज्या तवान्या होऊन, संगीत सौभद्रांतील ' रुचती कां तीर्थयात्रा ' हें पद म्हणत म्हणत, महालांत आल्या; व एक खुर्ची खिडकीपाशीं नेऊन लोंकरीचें काम करीत त्या बसल्या. आमच्या वकीलसाहेबांनीं हें सर्व पाहिलें.. आणि म्हणाले—

' माझ्या तंबाकू ओढण्यानें तुम्हांला त्रास तर होत नाहींना मामी ! '

निहाल०—छे अगदीं नाहीं. मला आहे ह्या त्रासाची संवय. मीं सरलष्करांच्या घरीं होतें तेथंच संवय झाला; ते नेहमीं सकाळपासून निजेपर्यंत ओढीत बसावयाचे; त्या चिरूटाला विसावा म्हणून कसा तो नाहीं ! सगळ्या घरभर त्याचा वास !

गणप०—सरलष्कर मनुष्य फार चांगला आहे नाहीं ?

निहाल०—(जरा गालांतल्यागालांत हांसून) खरोखरच फार भला माणूस आहे. फार संभावित—तो मला सालाचे तीनशें रुपये देत असे, शिवाय धडुत पांघरूण. तेवढ्या तीनशें रुपयांत माझें कसें नामी चाले ! आणि आतां तीनशें; नुसत्या या माझ्या लोंकरीला पुरत नाहींत! सरलष्कराला कांहीं कमी कां इनाम केलें आहे ? पण परवां मी त्यांच्या बायकोला डाक्टर येतील आन्नयान नांवाच्या तलम मलमलीचं पातळ नजर म्हणून पाठविलें, त्यानें तिला किती म्हणून आनंद झाला ! माझें असें कल्याण झालेलें पाहून त्यांना फार बरें वाटतें. फार मंडळी चांगली आहे ! आणि-आणि

असं म्हणून आमच्या बाईसाहेब मनापासून हांसल्या.

सारखा टक लावून तिच्याकडे पहात गणपतराव आत्मगत म्हणाले—

' खरोखरच मोठा फरक पडला आहे. काय बोलत होती तें ती विसरली खास– असें विसरल्यासारखें करून चेन्ज (फरक) झाल्याचें दाखविण्याचें बायकांचे आंगांत फार कसब असतें. '

निहालकुवरबाईनें वर पाहिलें व गणप[illegible]णें किंवा राइणें, नसेंच खुनी ग-
पहात आहे हें पाहून ती जरा लाजली. स[illegible]भसतें; आहे मला वडिलापा
ण्याची वेळ, बाजूच्या तावदानी खिडकींतून सूय[illegible]दायक गोष्टींचा नाद सो
नाजूक गालावर पडलीं होतीं, तिच्या त्या गुला[illegible]आहे, परंतु केव्हां केव्हां अस
वळ्या, हिरव्या, रंगाच्या तावदानांतून त्याच[illegible]ला नको आहे, ती मुद्दाम करणें
तो गाल किती तरी या वेळीं नामी दिस[illegible]ल्यां मला प्राप्त झाली आहे, मामी, अ

गणपतराव चैनींत, सिगरेट त[illegible]यार करतात याची थिअरी (उपपत्ति
नेटकें करीत आपल्याशींच गुण[illegible]
माणें नाहीं दिली चांगली तंबाकू[illegible]जसारख्या भावडया बायकांना अशा गो-
हेशून म्हणाले, ' मामी तुम्ही [illegible]हां बायकांना काय माहीत तुमचा तो का-
अलीकडे ओढतात म्हणून म्ह[illegible]
आहे. मीं नाहीं बोलणार गा[illegible]ई काय बोलली हें न ऐकिल्यासारिखें क-

मोठा सुस्कारा टाकून, [illegible]ा पुरावा म्हणजे ती एक मजबूत सांखळीच
म्हणाली. ' गणपतराव, कोणा गळफांस लावण्याला फार उपयोगीं पडते,
अेसंच तुम्ही कांहीं तरी बोलानें पुरावा तयार करवत नाहीं, परंतु आतिशय
गणप०—ठीक! मींच [illegible]ची सांखळी तयार केली कीं, किती जरी तुट
वितां पेंचांत!

ती तेथून चटकत उठली; [illegible]ती त्या कृत्यांस, मग तीं कृत्यें कितीही भ-
च सुया ठेऊन जरीचा [illegible]त जगापुढें मांडते ! या गोष्टी फारच क्षुल्लक
अगदीं कोंपऱ्यांत लांब, ए[illegible]ा चिंटोरा, फाटक्या तुटक्या अंगरख्याचा ए-
लीच्या एका टोंकाला त[illegible]गरख्याची एखादी गुंडी, मनुष्याच्या तोंडांतून
चेहरा कृष्णवर्ण मेघांत कि कांहीं शब्द निघणें, एखाद्या पत्राचा कांहीं
सुंदर केशकलापांत दिस[illegible]झांकणें, खिडक्यांच्या पडद्यांची सावली, एखाद्या

निहालगडावर येऊ[illegible]शा शेंकडों, हजारों गोष्टी, ज्या अपराध्यांच्या
किंवा निहालकुवरबाई[illegible]हीत, त्या फार उपयोगीं पडतात. परंतु ' डिटेक्टी
गोष्टच काढिली नाहीं [illegible]ं यांच अति क्षुल्लक गोष्टींची सांखळी लोखंडाच्या
गप्पा झाल्यावर, आतां [illegible]होते. आणि मग काय, शिडी तयारच; सकाळचे
निहालकुवरबाईनें आपल्य[illegible]लागतात ; अपराधी घर चढाअेला, फळी ओढली
नारायणराव असें अडख[illegible]

' चव्हाण ? ' असें म्ह[illegible]

सगुणा०—(स्फुंदत स्फुंदत) चव्हाण. कसले बाई नांव, मोठेंच विलक्षणचि तां फिरावेनां डोळ्यावर लाग तसाच विलक्षण. अलीकडे तो तुह्मांला तोंच ती दुड दुड जिना उं ?

तिच्या मागोमाग खालीं जा न त्याची माझी भेट नाहीं; त्या दिवशीं नांत आलें पण आतांच समजून के नदीवर गेलों, तेथें माझा थोडा डोळा योग न होतां उलट तिच्या या ताज्या वर भेट नाहीं.

चार करीत करीत तेथंच आराम खुर्चीवर, कसला चमत्कारिक माणूस बाईसाहेब वेणी फणी करून, उपहार करून गा तरी पाहूं सगळं !

गीत सौभद्रांतील ' रुचती कां तीर्थयात्रा ' हें त्याची शिरोळास जाण्याची आल्या; व एक खुर्ची खिडकीपाशीं नेऊन ले ळल्याची हकीकत, व आपण सल्या. आमच्या वकीलसाहेबांनीं हें सर्व थोडक्यांत सांगितलें. तिनेंही ' माझ्या नंबाकू ओढण्यानें तुह्मांला त्रास तर हे

निहाल०—छे अगदीं नाहीं. मला आहे ह्य

लष्कराच्या घरीं होतें तेथंच संशय झाला; ते नेहेंवरून तुह्मीं काय काढितां ? ओढीत बसावयाचे; त्या चिरूटाला विसावा म्हण भारीच बाई माझ्या जी• ळ्या घरभर त्याचा वास !

गणप०—सरलष्कर मनुष्य फार चांगला अ आहे. मला कशाचा नीट

निहाल०—(जरा गालांतल्यागालांत हांसू नाहीं, तथापि त्यांतल्या माणूस आहे. फार संभावित—तो मला सालाचे ती त्या बद्दलकरून खऱ्या वाय धड्न पांचरूण. तेवढ्या तीनशें रुपयांत म। आणि आतां तीनशें; नुसत्या या माझ्या लोंकरीला रासा कांहीं कमी कां इमानें केलें आहे ? पण पर ळ्या पलीकडे गेलाच डाका येईल आत्रयान नांवाच्या तलम मलमलीचं री. पाठविलें, त्यानें तिला किती म्हणून आनंद झाला ! म. लावला ना ? त्याचा लेलें पाहून त्यांना फार बरें वाटतें. फारमंडळी चांगली. व संशयाला कांहीं

असं म्हणून आमच्या बाईसाहेब मनापासून हां

सारखा टक लावून तिच्याकडे पहात गणपत म्हणतां तरी काय !

' खरोखरच मोठा फरक पडला आहे. काय बो अजूनपर्यंत आपण कांहीं खास— असें विसरल्यासारखें करून चेन्ज (ार महत्त्वाचें व जोखमीचें ण्याचें बायकांचे आंगांत फार कसब असतें. ान होण्यानें यांचे हातीं

असतें. फार तर काय, दुसऱ्याचा जीव जाणें किंवा राहणें, नसेंच खुनी मनुष्याला योग्य शिक्षा होणें, त्याच्या हातांत असतें; आहे मला वडिलापार्जीत पोटापुरतें, म्हणून बाकीच्या जगांतील त्रासदायक गोष्टींचा नाद सोडिला आहे, तसा याचाही पण सोडिला आहे. परंतु केव्हां केव्हां असा कांहीं प्रसंग येतो कीं, जी गोष्ट आपणाला नको आहे, ती मुद्दाम करणें भाग पडतें; आणि तशीच स्थिति सध्यां मला प्राप्त झाली आहे, मामी, अप्रत्यक्ष गोष्टींवरून पुरावा कसा तयार करतात याची थिअरी (उपपत्ति) तुह्मांला माहीत आहे कां ?

निहाल०—गणपतराव, मजसारख्या भावडया बायकांना अशा गोष्टी विचारितां तरी कशा ? आम्हां बायकांना काय माहीत तुमचा तो कायदा आणि कलम !

गणप०—(निहालकुवरबाई काय बोलली हें न ऐकिल्यासारिखें करून) मामी, अप्रत्यक्ष गोष्टींचा पुरावा ह्मणजे ती एक मजबूत सांखळीच ह्मणतो, तिच्या कडया एकांत एक फार चांगल्या रीतीनें गोंवल्या असतात, तर सांखळी एखाद्याला गळफांस लावण्याला फार उपयोगीं पडते, अतिशय शहाण्या मनुष्याच्यानें पुरावा तयार करवत नाहीं, परंतु अतिशय अप्रत्यक्ष गोष्टींवरून पुराव्याची सांखळी तयार केली कीं, किती जरी दुष्ट कृत्यें छपलेलीं असलीं तरी तीं जगापुढं ढळढळीत उभीं राहतात; या सांखळीचा जोरच असा आहे ; ती त्या कृत्यांस, मग तीं कृत्यें कितीही भयंकर असोत, खेंचून आणून जगापुढें मांडते ! या गोष्टी फारच क्षुल्लक असतात ; एखादा कागदाचा चिटोरा, फाटक्या तुटक्या अंगरख्याचा एखादा तुकडा, फार तर अंगरख्याची एखादी गुंडी, मनुष्याच्या तोंडांतून नकळत त्या अपराधाबद्दल कांहीं शब्द निघणें, एखाद्या पत्राचा कांहीं भाग, दार उघडें, किंवा झांकणें, खिडक्यांच्या पडद्यांची सावली, एखाद्या वेळेचा नियमितपणा, अशा शेंकडों, हजारों गोष्टी, ज्या अपराध्यांच्या ध्यानांत देखील येत नाहींत, त्या फार उपयोगीं पडतात. परंतु ' डिटेक्टीव्ह ' पोलीसाच्या बुद्धीनें याच अति क्षुल्लक गोष्टींची सांखळी लोखंडाच्या सांखळी पेक्षांही मजबूत होते. आणि मग काय, शिडी तयारच; सकाळचे प्रहरीं जेल पुढें लोक जमूं लागतात ; अपराधी वर चढाविला, फळी ओढली कीं पार. मसलत!

आमच्या बाईसाहेबांच्या तोंडावर, खिडकीच्या हिरव्या, पिंवळ्या भिंगांच्या त्याच रंगाचा उजेड पडला होता. परंतु गणपतराव बोलतांना त्यांच्या प्रत्येक शब्दाला तिच्या चेहऱ्यांत विलक्षण फरक होई, हें चांगलें कळत असे. तिचा चेहरा एकदम उतरून काळा ठिक्कर पडला. ती खुर्चीवर बसली होती ती तशीच खुर्चीच्या पाठीवरच्या गादीवर तिनें मान टाकिली. हात अगदीं निर्जीव अन दोन्ही बाजूंला लोंबूं लागले. आणि ती एकदम बेशुद्ध पडली.

'हं, ठीक आहे. झणतां झणतां जवळच येऊन टेकलें. नारायणराव चव्हाण शिरोळाला गेला नाहीं हें खास' असें गणपतराव आपल्या मनांत झणाले.

भाग १६ वा.

शिकारीचा व हवा बदलण्याचा काल संपत आला; पथिकाश्रमांतल्या खोल्या हळू हळू रिकाम्या होऊं लागल्या; स्थूल व थलथलीत पोटाचे श्रीमान, जोतिबाच्या निळ्या रंगाची खोली सोडण्याची तयारी करूं लागले; करवीराहून फिमेल कालेजांतून, हवा पालटण्याला म्हणा, किंवा चार गुलहौशी लोकांच्या समाजांत आपण जरा चमकावें म्हणून म्हणा, आलेल्या विद्यार्थिणींनीं गुलाबी रंगाच्या खोल्या रिकाम्या करून, कोष्ट्याला तेथें आपलें जाळें निर्भयपणें विणण्याला परवानगी दिली; करवीराहून आलेले मोठमोठे कामगार, वकील मंडळी, सरदार, जाहगीरदार, इनामदार आपआपली निघण्याचीं तयारी करूं लागले; आपआपलें सामान बांधूं लागले, किंवा चाकर माणसांस बांधाबांधी करण्यास व स्टेशनावर जाऊन सामान 'लगेज' करण्यास हुकूम फर्मावूं लागले; श्रीमंतांच्या बायका आपआपलीं हलकीं वस्त्रें साफसुफ करून, 'आतां काय पुढले वर्षी या दिवसांत पुन्हां भारी यांचा उपयोग!' असें म्हणत, त्यांच्या घडच्या करूं लागल्या; जुने खिळखिळ वाजणारे तांगे व कांहीं खटार गाडच्या, पथिकाश्रमापुढें येऊन उभ्या राहूं लागन्या. 'अरे गाडीची वेळ झाली. आटपा लवकर' असें यजमान आपल्या चाकरांस म्हणूं लागले; नोकर लोक गडबडीनें सामानाचे गठ्ठे गाडच्यांत आणून टाकूं लागले; व 'हं, लवकर हांक आतां' असें डोकीस पागोट्याऐवजीं तांबडी चिंधी बांधलेला, व नाजूक भाग झांकण्याकरितां एक सहा बोटें रुंदीचें फडकें लंगुटी म्हणून लावलेल्या व बुडाशीं घोंगडी घेऊन बसलेल्या गाडीवानास म्हणूं लागले. जगदेवरावाच्या घरींही पुष्कळ पाहुणे ह्या वेळेस आले होते, तेही आतां जाऊं लागले व कांहीं गेले; म्हाताऱ्याच्या जिवाची कोण धांदल? म्हाला घटकाभर विसावा नाहीं. पाहुण्यांना पोहोंचविण्याकरितां गाडी तयार करवावयाची, त्यांचें जेवण झालें कीं नाहीं हें पहावयाचें, कांहींना रामराम करावयाचा, कांहींशीं नव्या रीतीप्रमाणें हस्तस्पर्शविधि करावयाचा. ही घरीं उतरलेल्यां पाहुण्यांची गोष्ट झाली. शिवाय सूर्यप्रकाशखाणावळींत व पथिकाश्रमांत उतरलेल्या कामदारांस व जहागीरदारांस भेटावयाला व 'आ-

'पण तेथें असें तोंपर्यंत आमचा वेळ फार चांगला गेला, मज गरिबाकडून आपल्या योग्यतेप्रमाणें आपला वेतबात ठेवणें झालें नाहीं; परंतु आहे त्यांत गोड करून घ्या,' असें म्हणण्यांत, व तरुण स्त्रियांकडे पाहून मुलींना संभाळून न्या' असे बोलण्यांत, जगदेवरावाला एक मिनिटाची फुरसत नाहीं. थोड्या अवकाशांत सर्व गोष्टी करावयाच्या. निहालकुवरबाईलाही घटकेची फुरसत नाहीं. रोज घरीं मेजवानीचे वेत व्हावयाचे, त्या तयारींत ती गढून गेलेली; शिवाय, रोज भेटावयाला जावयाचें व दुसरे भेटावयाला यावयाचें त्यांत तिला अगदीं फुरसत मिळेना.

दोन दिवस बोलाचालायाला पुष्कळ लोक, पाहिजेत तशा गप्पा चालत होत्या; त्यांत त्यांनें निहालकुवरबाईला फार करमणूक झाली. परंतु ते लोक आपआपल्या नित्य व्यवसायांत गुंतण्याला आतां गेले; तेव्हां तिला फार वाईट वाटलें. दुःखांत सुख येवढेंच कीं, गणपतराव वकील अजून गेले नव्हते. आपल्या मामाचें घर सोडण्याचें त्यांच्या मनांतच येईना. ते म्हणत 'मला काय करावयाचें आहे अशा गडबडीनें जाऊन ? आपल्याला कोंहीं कोर्टांत काम नाहीं. धाम नाहीं. आतां या दिवसांत अंदरसन गार्डनमध्यें हवा फार छान गार असते; पण त्या एका कोंपऱ्यांतून इतका कांहीं गार वारा येतो कीं तो जर पांच मिनिटें घेतला, तर संध्याकाळीं हिंवताप अगदीं ठेवल्यासारखाच, येथें काय आपल्याला कमी आहे म्हणून एवढें धांवत पळत करवीराला जावयाचें !'

गणपतरावांनीं असें म्हटलें म्हणजे जगदेवराव म्हणत 'रहा बाळा' खुशाल रहा; तुझ्या मर्जीला येई तोंपर्यंत रहा. मला तरी कोण आहे ? मुलगा नाहीं, कांहीं नाहीं. तूंच माझा मुलगा. तिच्या (निहालकुवरबाई) बरोबर आनंदानें, तंटा भांडण कांहीं न करितां, रहा बाबा. तुझेंच घर आहे.'

यावर गणपतराव कांहीं उत्तर देत नसत पण नुसते हांसतच व 'आमचे मामासाहेब म्हणजे 'आलीजाखां नवाब आहेत' असें म्हणत.

यात्र दिवशीं रात्रीं, जेवणखाण आटपल्यावर, जगदेवराव आमच्या बाईसाहेबांच्या शय्यागृहांत जाऊन कोचावर स्वस्थ पडले होते. इतक्यांत निहालकुवरबाई पायांतलि तोरड्यांचा छन् छन् भवाज करीत तेथें आल्या, आणि आपल्या रमणाच्या आंगाला टेंकून बसून आपलें डोकें त्याच्या छातीवर ठेवून व एक हात आंगावर टाकून मोठ्या लडीवाळपणानें म्हणा-

ल्या, 'गेले बाई सगळे पाहुणे एकदांचे आज सगळे गेले म्हणावयाचे. महिनाभर सारखी गर्दी चालली होती; जसें लग्नघर झालें होतें. मला घटकेची फुरसत नव्हती. खरेंच सांगा होती कां ती ? इकडे तरी कधीं फुरसत होती पण म्हणा? एक दिवस निवांतपणीं बोलत बसेन म्हटलें तर झालें नाहीं. (आपला गाल त्याच्या तोंडावर ठेवून) हें या महिन्यांत एक दिवस ही मिळालें नाहीं. आतां कसें निवांत झालें बाई!'

जगदे०—(प्रेमानें चुंबन घेऊन, उगीच तिच्या सुवासिक केंसांवरून हात फिरवीत) होय खरेंच माझे लाडके.

निहाल०—फक्त गणपतराव तेवढे राहिले आहेत. ते किती दिवस राहणार ? ते आपले भाचेच, त्यांना काय ? कोण विचारणार?

जगदे० —त्याचें काय पोरांचें ? पाहिजे तितके दिवस राहोना. घर त्याचेंच आहे. (रंगपाहून पुन्हां बोलणें फिरविल्यासारखें करून) त्याच्या राहण्यानें तुला बरें वाटलें तर, त्याच्या कुत्र्याचा, चिरूटाचा, व त्याचें आपलें ते आळशासारखें पडून राहणें,याचा तुला कंटाळा येत नसला तर असेना. नाहीं तर त्याचें राहणें मला काय करावयाचें ? तुला आवडेल तर सगळें !!

निहालकुवरबाईनें आपला नाजूक लालबूंद अधर दांतांत धरला आणि ती, खालीं पाहून कां मग, बोलूं नको. बोलूं कां नको, असें थोडा वेळ करून म्हणाली, तसें कांहीं नाहीं म्हणा. पण हें पहा, मीं अशी तरणीताठी. ते सदा घरांत राहणार. तेव्हां लोक काय? जनाच्या तोंडाला कोणीं हात लावावा ? कोण काय म्हणतें मन् कोण काय म्हणतें! आणि म्हणून उगीच आपल्या या वयांत—

जगदे०—(जरा रागानें) आणि म्हणून काय ?

निहाल०—माझ्याबरोबर नेहेमीं ते मोकळ्या मनानें हांसत खेळत वागतात. त्यानें सगुणाच्या मनाला कांहीं नीट वाटत नाहीं. म्हणून म्हणतें गणपतराव आतां जातील तर बरें म्हणजे सगीला बरें वाटेल; हो, तिला ज्यांत सुख होत नाहीं, तें आपण कां करावें ? आम्हीं किती जरी जीव तोडून तिच्यावरोबर चांगलें वागलों तरी, कांहीं झालें तर, लोक मलाच म्हणणार कीं नाहीं ? कारण सावत्र हें एक विशेषण आमच्या मागें लागलें आहेना !

जगदे०—बरें आहे. खरेंच, माझ्या नाहीं लक्षांत आलें. आतां

आलें माझ्या लक्षांत. आतांच त्याला सांगतों जा म्हणून. पहांटेसच त्यानें चालतें व्हावें. इतके दिवस माझ्या हें लक्षांतच आलें नाहीं. तुझ्याबरोबर परपुरुषानें जास्ती सलगीनें वागणें खरोखर चांगलें नाहीं; कांहीं नसतां इतीच अपवादाला कारण; म्हटलें असतां आमचा गणू कांहीं तसा वाईट नाहीं, परंतु लोकापवादाला भ्यावें लागतें. पहांटेच जा म्हणून त्याला आतांच सांगतों.

निहाल०—नको नको, अशी घाई नको. असें एकाएकीं नका सांगू; त्यांचा अपमान केल्यासारखें होईल. त्याना वाईट वाटेल. इतकें निष्ठुर होऊं नका. सोई सोईनें सर्व घ्यावें.

जगदे०—निष्ठुर ! यांत कसला निष्ठुरपणा ! तो बसला असेल खालीं चिरूट ओढीत. आतां त्याला सांगून येतों.

त्याप्रमाणें जगदेवराव खालीं आले. गणपतराव चिरूट तोंडांत धरून दिवाणखान्यांत इकडे तिकडे फिरत होते. जगदेवराव त्याच्या जवळ गेले आणि ' तूं पहांटेस करवीराला जा. येथें आतां वरचेवर येणें ठीक नाहीं. ती तरुण आहे. तिच्याशीं जास्ती सलगीनें तुझें राहणें बरें नाहीं. तुझ्या सारख्या तरण्या पोराला तिच्या बरोबर सलगी ठेवणें बरें नाहीं. उगीच लोकापवादास कारण. ती म्हणते तें खरें आहे, समजलास ? '

हें ऐकिल्याबरोबर गणपतरावांनीं आश्चर्यानें भिंवया वर चढविल्या व एक स्कंध जरा उचलला.

गणप०—(थोडें थांबून) होय. मीं तिच्या बरोबर सलगीनें वागतों खरा. मामी, नेहमीं माझ्याबरोबर हांसत खेळत, मोकळ्या मनानें वागते हेंही खरें. (जरा गळा दाटून येऊन) मामासाहेब, ईश्वर करो आणि माझे मनांत पापवासना न येवो. तुमचा या वयांत वदलौकिक व्हावा, असें माझ्या मनांत मुळींच येत नाहीं. ईश्वर करो आणि तुमची या म्हातारपणीं मानहानि अगदीं न होवो. आणि त्यांत माझ्याकडून तसा प्रसंग मुळींच न येवो. माझ्या हातून असें कांहीं न होवो, एवढेंच माझें त्या परमेश्वरापाशीं मागणें आहे.

आमचे तरुण गृहस्थ हे शब्द तुटक तुटक, अर्धमुर्धे, असे मोठ्या कष्टानें बोलले. मग त्यानें चट्कन् तोंड फिरविलें, आणि पाण्यानें भरलेले डोळे आपल्या हातरुमालानें पुसले.

रात्रीं ही दहा वाजण्याची वेळ. गणपतराव जास्ती कांहीं बोलले नाहींत. मुकाट्यानें त्यांनीं आपली बॅग भरली व 'आतांच जातों' असं म्हणून बाहेर पडले.

रात्रीच्या अकराचे गाडीनें करवीराला जाण्याकरितां हा गेला, असें जगदेवरावास वाटलें. पण त्यानें तसें न करितां जोतिबाच्या पथिकाश्रमाचा रस्ता धरिला. आणि आंत जाऊन, 'दोन खोल्या आतांच भाड्यानें द्या,' असें मैनास झटलें व तिनें 'कोणत्या खोल्या पाहिजेत ?' म्हणून विचारिलें.

भाग १७ वा.

निहालगडाची ज्याप्रमाणें उत्तम मृगयास्थळ म्हणून प्रसिद्धी होती त्याप्रमाणें, किंवहुना कांकणभर चढत्च, आरोग्यावह स्थळ म्हणूनही प्रसिद्धी होती. याकारितां येथें येणाराचा दोन्ही कडूनही फायदा होत असें. आमच्या वकील साहेबांला ज्या खोलींत मैना बाईनें आणून बसविलें त्या खोलीच्या, व ज्या खोलींत लेमोनेड इत्यादि पेय पदार्थ जोतिबा विकीत, त्या खोलीच्यामध्यें फक्त एक शिंद भरलेली भिंत होती.

गणपतरावांनीं आपले भोंवतीं चोहोंकडे पाहिलें, आणि 'मोठाच फरक खरा' असें म्हटलें. कोणीकडे मोतीचौकवाडा आणि कोणीकडे हे पडकें झोंपडें ! मोतीचौक सोडल्या बराबर करवीरास आपल्या बंगल्यांत आराम खुर्चीवर पडण्याचें सोडून, येथें या भिकारड्या झोंपडींत येऊन रहावें असें त्याच्या मनांत येणें आश्चर्य नव्हे काय ? येथें कसली करमणुक आली आहे त्यांना ?

परंतु त्यानीं आपल्या बरोबर पांच सहा इंग्रजी 'सेनसेशनल' कादंबऱ्या, तंबाकू, चिरूट, व रोडकीं दोन कुत्रीं आणिलीं होतीं; या एवढ्या जिनसा त्यांना करमणुक होण्याला पुरे होत्या.

मैनाबाई गणपतरावाला त्या खोलींत बसवून, लागलींच बाहेर आली; आणि तिनें एका दहा बारा वर्षांच्या पोराला बोलावून आणिलें. गांवांत व इकडे तिकडे जरूर लागली म्हणजे, मैनाबाईचा निरोप घेऊन, हें पोर नेहमीं जात असे. तें पोर येऊन पुढें उभें राहिल्यावर तिनें त्याच्या हातांत एक घडी करून चिठी दिली, आणि त्यास म्हटलें, 'निहालगगर तुल माहीत आहे कांरे सुंब्या ?'

सुंब्या—व्हय माय.

मैना—हे बग बाळ, एवढें काम कर. ही चिट्ठी घेऊन निहालगडावर. जर आतांचेआतां जाशील, आणि माईसाहेबांचे हातांत देऊन येशील तर तुला एक नवली खाऊला देईन बरका ?

सुंब्या—व्हय माय

मैना--विसरशील नाहींतर !

सुळ्या--छे. नाहीं वा.

मैना—तर मग पळ कसा. हें बग, ऐकिलेंस कां ? देवडीवर कोणीं विचारलें तर, चिट्ठी आणिली आहे म्हणून सांगूं नकोस अं; कांहीं निरोप सांगावयाचा आहे, असें सांग आणि माईसाहेबांजवळ गेल्यावर हळूच ही चिट्ठी दे–चुकूं नकोस बरकां ? नाहींतर घोंटाळा करशील.

सुळ्या—न्हाई करनार.

मैना—जा तर, पळ. मार धूम. त्यांच्याच हातांत दे बरकां ?

तें पोर ' मार धूम ' म्हटल्याबरोबर पळत सुटलें; मागाहून मैना आणखी काय म्हणाली, हें ऐकण्यास तें थोडें देखील थांबलें नाहीं; मैना तेथेंच उभी राहून तो दिसेनासा होईपर्यंत त्याच्याकडे पहात होती; व परत आंत येतांना आपल्याशींच म्हणाली ' हा जर कांहीं वाईट हेतूनें येथें आला असला तर, वेळेवरच आपण माईसाहेबांला सूचना दिल्यासारखें झालें. आपल्याकडून सावध असावें. '

गणपतराव जेथें बसले होते, तेथें मैना एका हातांत चहादाणी व एका हातांत ' कप सासर ' (पेला व बशी) घेऊन आली; ती या वेळेस आंतील साडी नेसली होती; पहिल्याप्रमाणें कांस मारून नेसण्याची चाल तिनें आतां सोडून दिली होती. ब्राह्मणांच्या बायकांप्रमाणें कासोटा घालून ओंचा खोऊन ती लुगडें नेसली होती; तिनें आंबाडी बुचडा बांधला होता. केंस अगदीं साफ सूफ तुळतुळीत दिसत होते, त्यावरून संध्याकाळीं तेल लावून तिनें केंस विंचरून बुचडा बांधला असावा असें वाटतें.

ती दारांतून आंत येतांना तिच्याकडे न्याहळून पाहून गणपतराव म्हणाले–' गुप्त गोष्ट इलाच माहीत असली पाहिजे. ' तिनें ती चहादाणी व ' कपसासर ' तेथें एका टेबलावर ठेविलें. गणपतराव उठले; व टेबलाजवळ असलेल्या खुर्चीवर जाऊन बसले. ती तेथेंच टेबलाच्या पायांजवळ उभी राहिली होती; तिच्याकडे पाहून, ' तेवढा चहा ओता या कप मधें पाहूं ' असें गणपतराव म्हणाले.

चहा ओततां ओततां, व 'कप' त्यांच्या हातांत देतां देतां, ती म्हणाली, ' आपण थेट निहालगडावरूनच आतां आलां वाटतें? '

गणप०—होय नुकता एक तासच झाला निहालगड सोडून.

मैना—आणि सरकार व माई साहेब ठीक आहेत ना ?

गणप०—होय, ठीक आहेत·

मैना—नेहेमींप्रमाणें आनंदी व मजेंत आहेत कां ?

गणप०—होय अगदीं नेहेमींप्रमाणेंच.

इतकें गणपतरावाबरोबर ती बोलली व गणपतराव चहा पिऊं लागले. तों ती परत खोली बाहेर जाऊं लागली ! ती दारापर्यंत गेली तोंच ते पुन्हां म्हणाले. ' निहालकुवरबाई सरलष्करची येथें होती व तींस तेथें चंपाबाई म्हणत हें तुम्हाला माहीत आहे नाहीं ? '

मैना—परत येऊन(होय सरकार,)ती तेथें मास्तरीण होती; व मीं कोंडींत कुणबीण होतें.

गणप०—अं खेरंच कीं काय ? ती तेथें बेरंच दिवस होती वाटतें ?

मैना—होय. होती अजमास दडि एक वर्ष तेथें.

गणप०—ती करवीराहून आली नव्हे कां?

मैना—होय, सरकार.

गणप०—आणि तिला कोणी आईवाप नाहींत वाटतें ?

मैना—होय सरकार.

गणप०—तिचा, आतां आहे असाच आनंदी स्वभाव तेथें ही असे वाटतें ?

मैना—होय. नेहेमीं असाच. सरकार.

गणपतरावांनीं चहाचा पेला रिकामा केला व तिच्या हातांत दिला. तिनें त्यांच्याकडे जरा बारीक दृष्टीनें व संशययुक्त मुद्रेनें पाहिलें.

गणपराव आपल्याशींच म्हणतात ' इला जर साक्षीदारांच्या पिंजऱ्यांत उभें केलें तरफार मजा होईल. इला फेर तपासणींत घोंटाळ्यांत घालावयाला चांगला हुषारच वकील पाहिजे. इला कांहीं माहिती असलीच पाहिजे "

मैना चहादाणी व कपसासर घेऊन निघून गेली.

गणपतराव खुर्चीवरून उठले, व तेथेंच असलेल्या पलंगावर जाऊन बिरूट ओढीत स्वस्थ पडले.

आम्हीं मागें सांगितलेंच आहे कीं, गणपतरावाच्या ह्या खोलींमध्यें व जोतिबाच्या पेय पदार्थ विकण्याच्या खोलीमध्यें फक्त एक भिंद भरलेली भिंत होती. ह्यामुळें पलीकडच्या खोलींतलें बोलणें, हांसणें, खिदळणें.

इकडे गणपतरावाला स्वच्छ ऐकूं येई. हांसणें थोडें कमी झालें म्हणजे बोललेला प्रत्येक शब्द ऐकूं येई. त्यांतून जोतिबाचा उमटट आवाज सहज त्यास ओळखतां येई.

'येथें बसून काय करावयाचें आहे ? चला घटकाभर जोतिबावरोबर बोलत बसूं म्हणजे या गोटीचा थोडा विसर पडून कांहीं समाधान वाटेल. स्त्रीमोहजालांत सांपडून वृद्ध लोकांचें मन कसें फिरतें ह्याचें आमचे मामा द्योतकच आहेत ?' असें आत्मगत म्हणून पानगृहांत जाण्याचा यानें विचार केला.

पानगृहांतली गडबड कमी होऊन, सामसुम होण्याची गणपतरावांनीं बरीच वाट पाहिली. मग ते पानगृहांत गेले. मैना तेथेंच आपल्या यजमानाची इजार फाटलेली शिवीत होती. निहालगडावर शालूवर कशिदा काढण्याचें, लोंकरीचें काम करण्याचें, जरीची वेलबुट्टी काढण्याचें काम होतें, तें जाऊन येथें फाटकी इजार शिवीत बसण्याचें इच्या नशिबीं आलें. नशिबीं आलें नाहीं, तिनें होऊन आणिलें!

गणपतराव तेथें आलेले पाहून ती एकदम दचकली, व त्यांच्याकडे घाबऱ्या घाबऱ्या पाहूं लागली. तिच्या चेहऱ्यावरून तिला संशययुक्त भीति वाटूं लागली असें स्पष्ट दिसलें. ' काय करावें, झोंपच येईना. म्हटलें घटकाभर गप्पा तरी माराव्या म्हणून इकडे आलों जोतबा; ' असें गणपतराव जोतिबास हंसत म्हणाले.

गणप०—(मैनाकडे तोंड करून) चिरूट ओढण्याला आपला कांहीं प्रतिबंध आहे काय ? म्हणजे तंबाकू ओढल्यानें आपल्याला त्रास नाहीं ना होणार ?

मैना—अगदीं नाहीं सरकार.

जोतिबा—(उमटपणानें) इच भन तुमाला ती नग म्हनती काय ? मी अन हत् समदी येनार जानार वढल्यातीन् !

गणपतरावांनीं चिरूट पेटविला, व पुढें कांहीं बोलण्याचे पूर्वी दाहा बारा झुरके त्यांनीं मोठ्या जोरानें ओढले.

गणप०—जोतबा, तुमच्या या दुकानावइल मला कांहीं बोलावयाचें आहे.

जोतिबा—(हंसून) खुशाल विचारा. काय राव, या जागेसारखी

वाईट जागा मीं कधीं पाहिली नाहीं. एक पैची प्राप्ति नाहीं. त्याचें कांहीं मीं ह्मणत नाहीं म्हना. लोक कुट चांगल येत्याती ? काय शिकारीच्या दिवसांत येत्याती तेवढच. ते समद लुच्चेत्र ! इत्रभन हेत्र जर कागलास, किंवा निपाणीस, किंवा करविरास, तेथें तर लईत्र भार ह्मन, दुकान घातल असत तर लई नामी ह्माल ह्मसत वगा. पन ही हाय ना. इतच घालावयाच ह्मणून हट्ट घेतला. लई झाड वगा.

आपले यजमान याप्रमाणें व्याख्यान देत आहेत, हें ऐकून मैनानें हातांतली इजार खालीं ठेविली आणि ह्मटलें, 'माग्च्या दाराला अडसर घालण्याचा राहिला आहे. येता कां मला सोबत ह्मणजे तेवढा घालून येतें.'

जोतिबा—राहीना उघडच दार !! आपून आतां राजाचानी तंबाकू वोढित बसनार. तुझी काय कटकट उगीच ! (ते चिलीम घेऊन व त्यांत तंबाकू घालून वर विस्तव ठेवण्याची तयारी करूं लागले)

मैना—तें दार तसेंच ठेवणें बर नाहीं बर कां ! वाहेरून कडी सहज निघते. पलीकडच्या रामोशांचीं पोरें केव्हां दार उघडून आंत येतलि कळणार सुद्धां नाहीं. कांहीं तरी जाईल तेव्हां बसाल हांका मारित ह्मालं.

जोतिबा—उगीच मला कंटाळा आनू नको. तूंच जा अन् लावून ये कशी.

मैना—अहो मी गेलें असतें—पण तो अडसर लई जड हाय; मला एकटीला वडत नाई.

जोतिबा—ठाऊक हाय मोठी नाजुक भवानी हायस ती ! काळजी घेणार संसाराची माहीत हाय ! तुझ्या मनामंदी मीं यांच्या बरोबर बोलत बसूं नये व्हय ? व्हय तेंच. डोळे नको असें वटारू इत्रभन, मला भेडसावतीया वगा ! तुझ्या डोळ्यांन मी नाई मानार कळलका ? तुला लई वाईट खोड हाय. मीं कुनाबरोबर बोलायाला लागलों कीं तूं आपल त्वांड मदी घातलच. लई चावट ह्मालीया. मला नाई हें खपनार. समजलीस ? पुना बोल ह्मनजे, पेकाडच मोडून टाकतों वग. ह्माड रांड कुटली ! शिरीमंताजवळ राहून चावट ह्मालीया आकशी. मीं नाहीं ते कांहीं ह्मननार वग पेकाटच मोकळ करीन ! जीवच घेईन मेलीस तर पायपुस गेला ! तुजा ह्माताडावर उद्या ३ वाघकु अनली वग !

इजारीची घडी करून सुईदोरा पलीकडे टेऊन ती आपल्या नवऱ्याकडे खिन्नमुद्रेनें पहात उगीच बसली.

नवराबायकोचें हें प्रेमयुक्त भाषण बंद करावें या हेतूनें गणपतराव म्हणाले, ' तर मग तुम्हांला येथें राहणें आवडत नाहीं म्हणावयाचें ? '

जोतिबा—छे. अगदीं नाहीं. मला नाहीं आवडत. माझ्या मनांत कागलासारख्या एखाद्या ठिकाणीं दुकान घालावं. काय ही जागा ! वारा तर सदा घोंघो करतो. वरचा खापरं उडून जाण्यातीच जनूं; टाळक्यावरच्च कयासबी उपटून जायाच ह्या वाऱ्यान !! इतच रहा म्हणून लई इना आमत्र मला. इच्या या शंभर रुपयाला—आन् शंभर रुपयाला—काय जाळायाच्च आहे ? इला म्हन् ती माईसाहेब का फाईसाहेब अगदीं जवळ पाहिजे.

मैना—(आपल्या नवऱ्याकडे रागानें पाहून) हं हं काय हें !

जोतिबा—आतां नाहीं सटवे तुझ्या बोलण्याला मी भिनार. इचभन मला दात्रातिया बगा ! हे बग, मी पुन्हां म्हनतों, त्या शंभर—शंभर रुपयान मला काय करावयाचें हाय ? मला कुनाची दर्द हाय ?

मैनाच्या चेहऱ्याकडे लक्ष लावून पाहून, जोतिबाला अनुलक्षून, गणपतराव म्हणाले, ' नाहीं. खरेंच नाहीं. तुम्हाला कायहो शंभर रुपये म्हणजे खीलगणतींत. आणि त्या देणाराला तरी काय त्याचें एवढें ? '

गणपतरावाचें हें बोलणें ऐकून मैनाचा चेहरा उतरला; गणपतराव आपलेकडे पाहत आहे, हें पाहून तर तिची फारच गाळण होऊन ती खालीं पाहूं लागली.

गणप०—(खिशांतलें वाच काढून पाहून) आं ! पावणेबारा झाले ! फार रात्र झाली तर! चला जाऊन निजूं आतां. जोतबा, रामराम. निजतों जाऊन. मैनाबाई, आतां सकाळीं नऊ वाजेपर्यंत उठवूं नका बरकां. मग चहाची तयारी.

भाग १८ वा.

दुसरे दिवशीं सुमारें अकरा वाजण्याच्या वेळेस, गणपतराव जेवणखाण आटोपून, आपल्या खोलींत आरामखुर्चीवर दोन्ही पाय पसरून चिरूट ओढीत पडले होते. तों रोडकीं दोन कुत्रीं पलीकडच्या टेबलाखालीं लोळत होतीं. त्यांनीं करवीरचें ज्ञानमंदिरपत्र हातांत घेतलें होतें, विद्याविलासपत्र पायांवर टाकलें होतें, व मधून मधून मुखपत्रांतील जाहिराती पहात होते. आमच्या ज्ञानमंदिरपत्रांतल्या जाहिराती ह्मणजे बायकोनें सोडचिठ्ठी मागण्याच्या, गरमीवर रामबाण औषध, कांहीं वटसावित्रीची कथा, सत्यनारायण कथा, अशा पोथ्या; व दुसऱ्या कांहीं वेड्यावांकड्या जाहिराती होत्या. तें पान उलटून गणपतराव 'लोकल' वाचूं लागले. त्यांत देखील बरोबरच फार माहिती मिळणार! 'आले,' 'गेले,' 'येणार,' 'एका माईस रेडकूं झालें,' 'कारकून बदलला' अशी मोठ्या अक्षरानें सदरें घातलेलीं व आंत रावसाहेब गेले. रावबहादूर येणार, अमक्याच्या बायकोस रेडकूं झालें इत्यादि असावयाचें! त्यांनीं उगीच त्यावरून नजर फिरविली व 'डयाम धिस' ह्मणून हातांतलें पत्र फेंकून दिलें; व चिरूटाचे कांहीं झुरके घेतले. इतक्यांत मैना आंत आली, आणि निहालगडावरून माईसाहेब आल्या आहेत ह्मणून तीनें सांगितलें.

ते मोठ्या आश्चर्यानें ह्मणतात, 'काय! निहालकुवरबाई आल्या आहेत! फार चांगलें. बोलाव त्यांना आंत' मैना माईसाहेबांला आंत आणण्याकरितां बाहेर गेली तों गणपतराव आपल्याशींच ह्मणाले, 'येण्यांत कांहीं तरी मतलब आहे, त्याखेरीज ही येणार नाहीं.'

निहालकुवरबाई नेहमींप्रमाणें आनंदी दिसत होती. अशा वेळीं उन्हांत येण्यानें साधारण लोकांचें तोंड काळें व्हावयाचें, पण आमच्या बाईसाहेबांना तसें कांहीं झालें नाहीं. अहो, ती साधारण लोकांसारखी चालत किंवा घोडयावर बसून ऊन खात का आली ह्मणून ऊन लागेल! ब्रूममध्यें बसून चंदनाच्या पंख्यानें वारा घेत ही स्वारी आलेली!!

ती गुलाबी रंगाचा शाल नेसली होती व गणपतरावांनीं काश्मीराहून

आणून दिलेली शालजोडी पांघरली होती. गालांवरची गुलाबी छटा जा घातल्या होत्या. ती अगदीं पोरकट दिसे, भारद्वा तिचे डोळे लाल झाले. ळींच दिसत नव्हता; आंत आल्याबरोबर, आंगाव असा तुमचा काय शेजारच्या मोडक्या खुर्चीवर ठेवून, गणपतराव बसले मैनानें आणून ठेवलेल्या खुर्चीवर ती बसली; आणि झणाल ेना बरें का ऊन तरी.'

गणप०—खरोखरच फार कडक ऊन आहे. अशावेळीं का झाल्या• मामी ? मला

निहाल०—कारण, तुम्हांला भेटावें म्हणून. कांहीं विशेष—

गणप०—खरेंच कीं काय !

निहाल०—होय. (काय बोलावें हें लवकर न सुचून गोंधळल्या सारखी होऊन) होय. आपली व्यवस्था जशी रहावी तशी राहिली नाहीं त्यामुळें आपल्याला वाईट खास वाटलें असेल तर या अपराधाबद्दल माफी असूंद्या, ऐवढेंच मागणें आहे.

गणप०—मामी, माझी माफी मागतां ! हें काय ! असें कोठें झालें. आंहे काय !

निहाल०—असें कोठें झालें आहे काय ? मागितलीच पाहिजे. तुम्ही का म्हाला परकी अहां ? लोकांसारखे कां तुमचें आगत स्वागत नेहमीं करीत राहिलें पाहिजे असें नाहीं. तुम्ही तेथें होतां त्यामुळें आम्हांला फार बरें वाटे. तुम्हालाही कांहीं अडचण नव्हती, परंतु काय तिकडे डोक्यांत वेड शिरलें कोण जाणे ! काय म्हणे, 'तुमच्या सारख्या सवीस सत्तावीस वर्षांच्या तरुण पुरुषानें माझ्या रंगमहालांत तंबाकू ओढीत बसणें बरें नाहीं !' असें म्हणाले आणि एकदम 'जा' म्हणून सांगितलें ! एका घटकेंत पहा कशी आपल्या कुटुंबांत फुटाफुट झाली. काय म्हणावें या स्वभावाला ! साठी नी बुद्धि नाठी झाली. सर्वांला औषध आहे, पण स्वभावाला कोठें औषध आहे ? होय गणपतराव ? खरेंच सांगा गणपतराव, असें केल्यावर माणसानें कसें गावें बरें ?

निहालकुवरबाई, हें आशा कांहीं रीतीनें बोलली कीं, हें बोलणें अगदीं हजिक व मनापासून आहें, त्यांत लपंडाव मुळींच नाहीं, असें ऐकणाला वाटावें. गणपतराव खालीं मान करून हें सर्व ऐकत होते.

भ

रन) मामी, ईश्वर करो आणि माझ्या हातून .हेवांच्या अब्रूला डाग लागण्याचा प्रसंग कधींही

दुसरे दिवशीं सुमारें .ालविलें, कांहीं फिकीर नाहीं ! बेहत्तर आहे आटोपून, आपल्या खे .च्यांत पाय ठेवूं दिला नाहीं तरी. पण त्यांच्या अ- पडले होते. तीं रे .इतकाही न लागो.

त्यांनीं करवीलेपर्यंत आमच्या बाईसाहेब आपल्या गळ्यांतील चंद्रहाराचा पायांवर लांत धरून त्याकडे पहात होत्या. हें बोलणें ऐकिल्याबरोबर त्यांच्या आमच्यी कांहीं चमत्कारिक स्थिति झाली. त्यांनीं डोकें वर केलें आणि गणपतरावाकडे पाहिलें. त्यावरून त्या फार घाबरल्या आहेत असें दिसलें.

गणप०—मामी, अशा घाबरूं नका. उगीच अशा वेडयासारख्या कां घाबरतां ! 'डयूमास' किंवा 'बोलझाक' किंवा 'डिकनस' यांच्या कादंबऱ्यांतील एखादें पात्र ज्याप्रमाणें कांहीं क्षुल्लक कारणावरून घाबरलेलें असतें, त्याप्रमाणें तुम्ही मला पाहून घाबरूं नका.

आमच्या बाईसाहेब कांहीं बोलल्या नाहींत, पण त्यांनीं आपला हातरुमाल काढला, आणि आपल्या तोंडावरचे घर्मबिंदु पुसले.

निहाल०—गणपतराव, तुम्ही जर असे गूढार्थानें बोलूं लागलां, तर मजसारख्या अज्ञान भाबडया पोरीला काय कळणार बरें ? तुमच्या अशा प्रश्नाचा जबाब दिला नाहीं म्हणून मला दोष मात्र लावूं नका म्हणजे झालें, आम्हा बायकांला असलें बोलणें कसें कळावें ?

गणपतराव यावर कांहींच बोलले नाहींत.

निहाल०—(स्वर बदलून)—गणपतराव, असल्या उदास ठिकाणीं राहण्याचें तुमच्या मनांत तरी कसें आलें ! कारण तरी काय ?

गणप०—हौस—दुसरें काय ?

निहाल०—हौस !

गणप०—होय. ह्या आमच्या घोगऱ्या अवाजाच्या जोतिबाच्या सहवासांत कांहीं दिवस रहावें असें माझ्या मनांत फार दिवस होतें. मोठा थट्टेखोर आहे, सदा आनंदी. असे लोक मला फार आवडतात. पण मोठा भयंकर आहे बरकां मामी ! त्याची शक्ति फार विलक्षण आहे ! काय करील याचा नेम नाहीं. त्याच्या तडाक्यांत मात्र कोणीं सांपडूं नये !।

निहालकुवरबाईचा चेहरा अगदीं उतरला. गालांवरची गुलाबी छटा जाऊन पांढुरकी आली व क्षणांत हें बदलून रागानें तिचे डोळे लाल झाले.

निहाल०—(मोठ्या त्वेषानें) गणपतराव, मीं असा तुमचा काय अपराध केला आहे म्हणून तुम्ही मला असें छळतां !

गणप०—(मोठ्या गंभीरपणानें) माझा एक मित्र होता बरें का मामीसाहेब, तो माझा फार जिवाचा कलीजा होता. तो नाहींसा झाल्या-पासून अशीच माझ्या हातून लोकाशीं वागणूक होते. सर्व लोकांचा मला तेव्हांपासून फार तिट्कारा येऊं लागला आहे. संशयानें माझें मन व्याप्त झालें आहे. जो मनुष्य बघावा तो दोषीच दिसतो.

निहाल०—तुमचा मित्र म्हणजे तो चव्हाण, जो चिनाला गेला तोच कीं नाहीं.

गणप०—होय तोच चव्हाण. चिनाला जावें म्हणून मुंबईला गेला-म्हणून मला कोणीं सांगितलें तें-तोच.

निहाल०—तर मग तो चिनाला गेलाच नाहीं, असें तुम्हांला वाटतें कीं काय ?

गणप०—होय, असें खरें.

निहाल०—तसें कां ? कारण—

गणप०—मामी, माफ करा, कारण तेवढें मला विचारूं नका.

निहाल०—(उदास वृत्तीनें) तुमच्या मर्जीप्रमाणें.

गणप०— माझा मित्र नाहींसा झाल्यावर एक आठवड्यानें, मीं मुंबईच्या व पेकीनच्या प्रसिद्ध पत्रांत नोटीस दिली; कारण कीं, मुंबईस अस्तर तर आपला बेत चिनाला जाण्याचा आहे कीं नाहीं, तें त्यानें कळवावें व चिनांत गेला असला तर, मी असा शोधीत आहे, व त्यानें आपला पत्ता व हकीगत मला कळवावी, हें त्यास समजावें. नारायणराव चव्हाणानें निहालगड ७ वे तारखेस सोडला. निहालगड सोडला म्हटल्यापेक्षां निहालगडाहून नाहींसा झाला असेंच म्हणणें बरें. ह्या महिन्याअखेर मला त्या नोटिशीचें कांहीं तरी उत्तर यावें असें आहे. आज तारीख २७. दोन तीन दिवसच राहिले. आली, जवळ आली वेळ अगदीं.

निहाल०—आणि कांहीं उत्तरच आलें नाहीं तर ?

गणप०--उत्तर जर आलें नाहीं, तर माझ्या मनांत शंका आलेली खरी असें मानीन, व त्याप्रमाणें पुढच्या तजविजीस लागेन.

निहाल०--तुम्ही म्हणतां याचा अर्थ तरी काय ?

गणप०—ह्या गोष्टीचा तपास लावण्याला मीं असमर्थ आहें, असें तुम्हाला वाटतें ? या, या, पथिकाभ्रमांतच माझ्या जिवलग मित्राचा नाश झाला नसेल असें कशावरून ? अमकेच ठिकाणीं तो गुप्त झाला हें तरी कसें कळावें ? मीं आतां ज्या खुर्चीवर बसलों आहें, त्याच खुर्चीवर तो बसला असतांना, त्याच्या गळ्यावर कोणी सुरी टेविली नसेल असें कशावरून ? आणि मीं येथें वर्षभर जरी राहिलों, तरी मीं येयल्या उंबऱ्यांत सुद्धां कधीं पाय टेविला नाहीं, त्याप्रमाणें त्याच्या नाशाच्या बातमीचा सुगावा मला येथें लागणार नाहीं हें तरी कशावरून ?

आपण नेहमीं राहतों अशा घरांतच कसल्या कसल्या विलक्षण तऱ्हेच्या गुप्त गोष्टी घडतात त्याचें कोणाला तरी अनुमान करतां येईल काय ? उद्यां जर मीं पुण्याला गेलों, आणि तेथला शनवारचा वाडा पाहिला तर तेथें त्यांच्या रंगमहालांत, अगदीं दिवसा ढवळ्या, खुद्द भीमंत नारायणराव पेशवे यांस त्यांच्या सख्या चुलतीनें मारविलें ! ह्याच ठिकाणीं त्याची गर्दन सुमेरसिंगानें उडविली ! ह्याच ठिकाणीं तुळाजी प्रेत होऊन पडला! याच ठिकाणीं त्यांनीं 'काका वांचवाहो,' म्हणून, राघोबादादाच्या गळ्याला मिठी मारिली; असा पूर्वीचा इतिहास जर मला माहीत नसता, तर माझ्या मनांत अशी कल्पना आली असती काय ? किंवा ज्याला इकडच्या देशाचा इतिहास माहीत नाहीं अशा गृहस्थाला तो जर वाडा सर्व शाबूत व जशाचातसा असतांना दाखविला असता, तर त्याला तरी असें वाटलें असतें कां कीं येथें मोठेमोठे खून व मारामाऱ्या झाल्या असतील म्हणून ? ज्या घरांत आदरातिथ्य विशेष असतें, जेथलीं माणसें फार संभावित असे सर्व लोक म्हणतात, अशाच ठिकाणीं अति नीच कर्में झालेलीं आहेत ! ! अति उत्तम आनंदाच्या जागा, उदाहरणार्थ एखाद्या सरदाराचें शय्यागृह, किंवा रंगमहाल, किंवा दिवाणखाना, किंवा त्याचें आवडतें उद्यान, अशा ठिकाणीं अति भयंकर, अंगावर कांटा उभारण्यासारखे गुन्हे होतात; गुन्हे होतात एवढेंच नव्हे, तर ते गुन्हे होऊन, येथें

असे गुन्हे झाले म्हणण्याला यत्किंचितही जागा नसते! एखादे वेळेस असें होत असेल कीं, आपण, आपल्याला नकळत, ज्या टिकाणीं हजरों खून झाले आहेत, तेथून निर्भय सावकाशपणें फिरत असूं, किंवा मला वाटतें, एखादा खुनी मनुष्य हंसत असलेला आपण पहात असूं, व त्याचें तें सौंदर्य पाहून त्याची आपण तारीफ करीत असूं. तो प्राणघातक आहे, असें मनांत तरी येईल काय ?

निहाल०—(जरा तिट्कारा आल्या सारखें करून) अशा भयंकर विषयावर बोलत बसण्याची आपल्याला संवयच आहे वाटतें ! डिटेक्टिव्ह पोलिस अमलदार आपल्याला नेमलें तर फार चांगलें होईल !

गणप०—आपण डिटेक्टिव्ह पोलिसचें काम उत्तम करूं, असें कधीं कधीं माझ्या देखील मनांत येतें.

निहाल०—कारण ?

गणप०—कारण-कारण तें मला आतां विचारूं नका मामी.

निहाल०—बरें, हें असो. पुढें नारायणराव चव्हाणाचें काय ! तुमच्या निरूपणांत त्याची तशी अर्धीच हकीकत राहून गेली. तुमच्या नोटिशीला उत्तर मिळालें नाहीं तर मग कसें ?

गणप०—मग माझा मित्र कोणाच्या तरी दुष्ट आशयाग्नींत आहुति पडला म्हणून मी जें अनुमान केलें आहें तें खरें मानण्यास मला जागा झाली.

निहाल०—होय; आणि नंतर—?

गणप०—करवीरास माझे बंगल्यांत त्यानें जी कांहीं आपली चीज बस्त ठेविली आहे ती सर्व मीं तपासून पाहीन; व त्यापासून त्याच्या शोधाला कांहीं मदत मिळाली तर बघीन.

निहाल०—(हांसत हांसत) खरोखरच. आणि ती काय काय आहे? मला वाटतें अंगरखे, बंड्या, बूट, चिरूट, पेटी किंवा चिनी मातीच्या चिलमी, दुसरें काय ?

गणप०—नाहीं. पत्रें—त्याच्या मित्रांचीं पत्रें, त्याच्या जुन्या सहाध्यायांचीं पत्रें, त्याच्या पलटणींतल्या अंमलदारांचीं, व बरोबरीच्या शिलेदारांचीं पत्रें; आणि त्याच्या बापाचीं पत्रें.

निहाल०—असें ?

गणप०—आणि त्याच्या बायकोचीं पत्रें सुद्धां.

आमच्या बाईसाहेबांनीं विचार करीत हातांतल्या चंदनी पंख्याकडे कांहीं वेळ पाहिलें आणि मग झटलें, ' त्यांच्या बायकोचीं पत्रें तुम्हीं कधीं पाहिलीं होतीं कां ?

गणप०—नाहीं. गरीब बिचारी ! मेली बापडी ! तिच्या पत्रापासून, माझ्या मित्राचा सुगावा लागण्याला मोठाच उपयोग होईल असें आहे. मी खात्रीनें सांगतों, दुसऱ्या बायका, ज्याप्रमाणें वेडें वांकडें कुत्र्याचा पाय मांजराला आणि मांजराचा पाय कुत्र्याला, लिहितात त्याप्रमाणेंच ती लिहीत असेल झालें. कसें कां लिहिना. कांहीं यत्किंचित् त्यापासून सुगावा मिळाला तर वस्स. मामी, तुमच्या सारखें सुंदर मोत्यांच्या ओळीप्रमाणें अक्षर लिहिणाऱ्या बायका विरळा; नाहींच झटलें तरी चालेल.

निहाल०—माझें अक्षर तुमच्या ओळखीचें आहे झणावयाचें तर ?

गणप०—हो पूर्ण ओळखीचें.

निहाल०—(विषय बदलून) तुम्हांला घालवून दिलें याबद्दल मला फार वाईट वाटतें हें खरें. झणून मीं तर क्षमा मागावयाला आलें. परंतु तुम्हांला तें पसंत पडलें नाहीं. बरें असो. पण माझ्याबद्दल मात्र कांहीं मनांत वाईट बाळगूं नका, झणजे झालें. माझी तुमच्यावर आहे तशीच माया आहे कीं नाहीं ? कां त्यांत कांहीं कमी झालें आहे ? आहे झणा पाहूं एकदां; म्हणजे मला बरें वाटेल.

गणप०—छेः अगदीं नाहीं. असें मनांत देखील आणूं नका. मामी, अहो खरी माया कोठें गेली आहे काय ?

निहाल०—येतें तर आतां अं; आणि मीं सांगतें तेवढें करा. येथें मात्र अगदीं राहूं नका. कोण वारा हा ! करवीराला अजारी पडून जावयाचें नसलें तर लवकर ही जागा सोडा.

गणप०—उद्यां सकाळींच.

निहाल०—बरें तर येतें आतां अं.

असें झणून ती निघाली. गणपतरावही तिला गाडीपर्यंत पोहोंचवावयास गेले. गाडी निहालगडाकडे न जातां जवळच्या बद्रपूर स्टेशनाकडे वळलेली त्यांनीं पाहिली. बद्रपूर स्टेशन येथून सारें सहा मैलच होतें.

गणपतराव तेथें दारांतच चिरूट ओढीत, येणाऱ्या जाणाऱ्यांची मजा पाहत, तास दीडतास उभे राहिले होते; इतक्यांत मघांचीच गाडी रिकामी दारापाशींच येऊन उभी राहिली. बाईसाहेबांनीं जी कांहीं चिरीमिरी दिली त्याचा एक ग्लास झोंकावा असें मनांत आणून 'कोचमन' खालीं उतरला व आंत येऊं लागला. त्यास गणपतरावांनीं विचारलें, 'कारे माईसाहेबांला निहालगडावर नेऊन पोहोंचविलेंस कां ?'

कोचम०—नाहीं सरकार. मी आतांच वद्रपूर स्टेशनावरून आलों. माईसाहेब १-१५ चे गाडीनें करवीराला गेल्या.

गणप०—काय ? करवीराला !

कोचम०—होय सरकार.

गणपतराव खोलींत येऊन बसले आणि आत्मगत ह्मणाले, 'आमच्या माईसाहेब करवीराला गेल्या ह्मणावयाच्या तर! बरेंतर. चला आपणही पुढच्या ह्या गाडीनें निघूं. मला ठाऊक आहे ती कोठें जाणार ती ! आतां तिला गांठतोंच पहा.'

गणपतरावानें आपली ब्याग भरली, एका सांखळीनें तीं दोन कुत्रीं एके ठिकाणीं बांधलीं ; आणि एक गाडी पाहिजे असें जोतिबाला सांगितल्यावरून त्यानें आपल्या गिऱ्हाईकाला नेहमीं जरूर लागते ह्मणून भाड्यानें देण्याला ठेवलेली गाडी जोडून पुढें आणिली. गणपतराव त्यांत बसून स्टेशनावर गेले, गाडीचे पैसे चुकते केले, सेकंडक्लास टिकीट काढून गाडींत जाऊन बसले, चिरूट पेटविला व 'करूं दे—किती पाहिजे तितके बाय. लाज (कानू) करूं दे—बोंबलूंदे कंपनीला. आपण नाहीं सोडणार 'स्मोक' (तंबाकू ओढायाला) करावयाला. जोंपर्यंत त्या गाढव स्टुपिड गार्डाला देण्याला माझ्या खिशांत खुळखुळत आहे, तोंपर्यंत मी नाहीं भिणार. पुढची-बात पुढें' असे त्यांनीं उद्गार काढले.

भाग १९ वा.

आमचे गणपतराव वकील करवीरच्या स्टेशनावर उतरून वाच काढून पाहतात तों बरोबर चार वाजून पांच मिनिटें झालेलीं त्यांचे नजरेस आलीं, त्यांनीं एका 'पोरटरला' हांक मारून कुत्रीं, ब्याग वगैरे सामान गाडींतून काढण्यास सांगितलें. ब्याग वगैरे सामान झट्कन काढून आणून त्यानें ठेविलें; परंतु ह्या गाडीला डबे फार होते, ह्मणून सर्व माणसें उतरून त्यांचें सामान उतरल्यावर, 'गार्ड' साहेबांनीं कुत्र्यांचा डबा उघडण्याचें मनांत आणिलें. मग आमचे गणपतराव काय करितात ! वाट पाहत स्वस्थ तेथें एका बाकावर बसले. इतक्यांत त्यांना एक घंटा झालेली ऐकूं आली. या वेळेला कोणची गाडी सुटते, हें पाहण्याच्या हेतूनें त्यांनीं 'टाईमटेबल' पाहिलें तों 'डौन ट्रेन' आतां सुटणार असें त्यांस आढळून आलें. "उगीच तों-पर्यंत येथें बसून काय करावयाचें आहे? चला 'डौन ट्रेनला' आपले कोणी ओळखीचे 'प्यासेंजर' आहे कां ते पाहूं." असें ह्मणून गणपतराव पुलावरून पलीकडच्या 'प्लयाटफार्म' वर गेले. ते जाऊन तेथें उभे रहा-तात न राहतात तोंच एक बाई मोठ्या गडबडीनें टिकीट घेऊन गाडीकडे आली. तिची ही धांदल झालेली पाहून ती नुकतीच गांवांतून अगदीं गाडी सुटण्याच्या वेळीं स्टेशनावर येऊन, गाडी मिळते कीं नाहीं असें मनांत असल्यानें, तिची एवढी धांदल उडाली असावी हें खास. 'प्लयाटफार्म' वरून ती इतक्या कांहीं गडबडीनें चालली होती कीं, आपले जवळ कोण उभें आहे हें न पाहतां, त्यास धांदलींत धक्का मारून, ती गाडींत बसण्याला गेली. धक्का लागल्यावर 'माफ करा' ह्मणून ह्मणावें ह्मणून तोंड वर करून ती पाहते तों, धक्का लागलेले गृहस्थ गणपतरावच आहेत असें तिला दिसून आलें. मग एकदम चपापल्यासारखें करून 'काय गणपतराव, आला कां तुम्हीं इतक्यांत येथें ?' असें ती जरा घोटाळून ह्मणाली.

गणप०—होय मामी, आलों. ती जागा फार उदास आणि त्यांतून तुम्हीं म्हणालां—

निहाल०—मला वाटलेंच होतें कीं तुमच्या हातून तेथें फार दिवस राहणें होणार नाहीं. तुम्हांला तेथें लवकर कंटाळा येईल ह्मणून मीं भा-

कीतच्च केलें होतें. बरें ! एवढें गाडीचें दार उघडा पाहूं. आतां गाडी दोन मिनिटांत सुटेल वाटतें.

गणपतराव आपल्या मानीकडे जरा गोंधळल्यासारखे होऊन पाहूं लागले 'काय बरें ? हें आहे तरी काय ? आतां नुकतेंच चार तासांपूर्वी ल्या पथिकाभ्रमांत माझ्यापुढें एक हा खुनी मनुष्य धरून आणल्याप्रमाणें अगदीं घाबरलेली, निस्तेज, गरीब, बापुडवाणी दिसत होती. आणि इतक्यांत अशी गुलहौसी व आनंदी ! एवढी 'चेंज' होण्याला काय बरें कारण' ? असा विचार करीत करीतच त्यांनीं गाडीचें दार उघडलें, तिला आंत नेऊन बसविलें, तिच्या शालजोडीची घडी करून तिच्या जवळ देविली, व आपण बाहेर आले.

हे विचार येथें लिहिण्याला जितका वेळ लागला तितक्या वेळांत याच्या गणपतरावाच्या मनांत पांच पन्नास आवृत्त्या झाल्या असतील!

गाडींत बसल्यावर खिडकीपाशीं येऊन तोंड बाहेर काढून ती गणपतरावाला झणाली, ' तुम्ही वेळेवर येथें भेटला झणून बरें झालं बाई, नाहीं तर अशा गडबडीच्या वेळेस, फार बाई पंचाईत पडते; हातांत हें सामान हें लटांबर,ही गाडी निघण्याची गडबड, व त्यांत दार लवकर उघडत नाहीं; एकच त्रेधा!

तुम्हीं आतां म्हणाल कीं, अशा उन्हांत एवढ्या गडबडीनें इकडे कां आलें, परंतु काय करूं ! फिमेल कालेजांतल्या मुलीकडून मीं आपल्या हिऱ्या शालूवर वेलबुट्टी काढवून घेतली; फार चांगलीच काढली आहे. त्याचें ' बील ' ' सुपरिंटेंडंट ' कडून आलें; त्यांत फारच रक्कम दाखविली होती, याकरितां कांहीं तोड जोड करून पैसे भागवून यावें झणून जरूरीनें गेलें होतें; त्यांना मीं सांगून देखील आलें नाहीं. उगीच एवढें मोठें बिल पाहिलें झणजे रागावतील व त्यांचे मनास वाईट वाटेल; असें कां करा? होय कीं नाहीं? झणून म्हटलें, आपण स्वतांच जाऊन सर्व निकाल करून यावें. आणि मग तिकडे कळवावें.'

' होय. खरेंच त्यांना वाईट वाटेल असें आपण कधींहि करूं नये.' असें गणपतराव फार शांतपणानें व गंभीरस्वरानें झणाले; तिनें त्यांच्याकडे पाहिलें आणि हांसली मात्र. ती अशा कांहीं डौलानें हांसली कीं, त्या हांसण्यावरून तुमच्या बोलण्यांत कांहींच अर्थ नाहीं, असें तिनें स्पष्ट दाख-

विलें. आणि मग बराच वेळ थांबून, 'त्यांना वाईट वाटण्यासारखें मीं कधींही करणार नाहीं' असें ती पुन्हां म्हणाली.

इतक्यांत दुसरी घंटा झाली, गाडीनें शीळ फुंकली, व भप् भप् करीत सपाट्यानें निघाली. गाडी चालू लागल्यावर पुन्हा तिनें गणपतरावाकडे पाहिलें; व तुमच्या आंताच्या बोलण्यांत कांहींच अर्थ नाहीं असें भासविण्याच्या हेतूनें, ती हांसत गेली.

'कांहींही असो, कोणच्याही हेतूनें ती करवीरास येवो, तिचा हेतु सिद्धीस गेला असें तिच्या चेहऱ्यावरून उघड दिसतें. ती आपल्या स्त्रीकापट्यानें माझे सर्व बेत निर्फल करणे काय ? सत्य हें मला कधींच सांपडणार नाहीं काय ? माझें मन जन्मभर असें साशंकीतच राहणार काय ? अखेर होतां होतां या संशयाच्या योगानें मी अगदीं एक विषयोन्मत्त होईन काय ? ती करवीराला कां बरें आली असावी ? मघां पत्राची गोट निघाली होती. त्याच्या बायकोचीं पत्रें माझ्याजवळ आहेत असें चुकून माझ्या तोंडांतून गेलें. तेव्हां इचा कांहीं संबंध असेल तो त्या पत्रावरून कदाचित् सिद्ध होईल म्हणून येवढ्या गडबडीनें येऊन माझ्या नौकरास पैसा देऊन वश करून घेऊन फसवून तीं पत्रें तिनें उपटलीं नसतील कशावरून ? नौकर घरीं शोध केला पाहिजे. काय असेल तें असो, कां दुसऱ्या कांहीं हेतूनें ती येथें आली ?'

असा विचार करीत करीतच, गणपतरावाची स्वारी कुत्र्यांसह आपल्या बंगल्याच्या दारापाशीं येऊन पोंहोंचली.

सर्व खोलींत सर्व सामान जागेजागीं व्यवस्थेशीर असल्याचें त्याला शोधाअंतीं आढळून आलें. दिवाणखान्यांत एका टेबलाच्या खुराला कुत्र्यांची सांखळी गुंतवून आपण आंत एका लहानशा खोलींत जेथें कपडे वगैरे ठेवीत असे, तेथें गेला. ह्याच खोलींत 'क्रिकेट' खेळण्याची उपकरणें होतीं, ह्याच खोलींत नारायणराव चव्हाणाचें सामान ठेविलेलें होतें ; एका मोठ्या पेटीवरून एक भली मोठी कातडयाची 'ब्याग' त्यानें खालीं काढली ; व त्यापुढें गुढघे टेकून बसून, मेणबत्ती पेटवून जवळ ठेवून त्या ब्यागेचें कुलूप तो तपासूं लागला.

नारायणराव चव्हाणांनीं आपल्या बायकोचें वर्षश्राद्ध झाल्यावर चिंचोलीला जाण्याचा बेत केला होता; तेव्हां त्यांनीं यांत सामान भरून कुलूप

विचारतों तुझीं आपल्या उद्योगाला जा. होय, संतराम आज आला होतां. तुझी आणि—.'

तो करचगार मध्येंच जरा अडखळत झणाला, 'होय सरकार माझ्याकडून चूक झाली. माफ करा ! मला आज बावडयावर तुकोजीरावाच्या बंगल्यावर बोलावलें होतें. पण घाईघाईंत मीं त्यांच नांव इसरलों. आन् आपल्याकड आलों. माग एकदोनदां आपल्याकड आलों होतों, तें आपलच नांव घेनांत अ ल आन् तिकडे गेलों; तिथ गेलों आन रामाला हाक मारली कुलप बगितली तर संमदी नीट होती'

गणप०—पण तुझीं तेथें अर्धातास होतां झणे ?

संत०—होय सरकार. एक कुलप बिघडलें होतें; ते जिन्याजवळच्या दाराचे. तें मी काढून नीट करून पुन्हा बसविलें. तेवढया एका कुलुपाकरितां आपल्याला सरकार मी नाहीं कांहीं मागणार; त्याचें एवढें ! आपण माझें मायबाप अहा. आणि सरकार, या येत्या दिवाळीला दुकान घालून मला तेरा वर्षें झालीं माझ्या हांतून चूक कधीं झाली नाहीं. आणि—

गणप०—(गंभीरपणानें) अशा नव्हेची चुक पुर्वी होण्याचा कधींच प्रसंग आला नाहीं अं ? असा प्रसंग क्वचित् येतो. संताराम तुझें नशीब आज उघडलें. आज तूं काम फार नामी केलेंस. आज काय तुमचें उखळ पांढरें झालें अं ! होय कीं नाहीं. ?

असें झणून गणपतराव त्याच्याकडे न्याहाळून पाहूं लागले; परंतु त्याच्या चेहऱ्यांत कांहीं फरक पडल्याचें त्यांना दिसलें नाहीं. गणपतराव जसे त्याचेकडे पाहूं लागले तशी संतरामानें खालीं मान घातली. आणि 'सरकार चूक झाली. माफी असावी' असें तुटक तुटक झणाला.

गणपतरावांनीं 'बरें' असें झणून मान हालवून झटले, 'माफी नको मागावयाला. चालूं द्या जेवणखाण तुमचें. खुशाल होऊंद्या मी जातो.

दारांबाहेर सडकेवर पोहोंचवायाला येऊन राम राम करून संतराम परत आंत आला. तो जास्ती कांहींच बोलला नाहीं.

गणपतराव परत आपल्या बंगल्यांत येऊन, 'आणि ते घेऊन ती मोठ्या आनंदानें गेली' असें जें तो करचगार झणाला, यावर विचार करूं लागले. ते आपल्याशीं झणूं लागले, 'ती कोण असावी बरें ? मी जेव्हां हाक मारली तेव्हां तो करचगार आपल्या पोराला कोणाची बरें

गोट सांगत होता ? अरे माझ्या प्रिय मित्रा नारायणराव, तुझा काय परिणाम झाला आहे हें मला कधीं तरी कळणार ! खात्रीनें पण साक्षात्कार कां होईना, तुझा पत्ता लावण्याच्या मार्गांतच मीं आहें हें खरें काय ? ज्या कुटुंबावर माझी विशेष ममता, त्याच कुटुंबांतल्या एका माणसाकडून तुझा शोध मला लागणार काय ? या सर्वांचा परिणाम तरी काय होणार नकळे ! '

बाबाजीनें ताट वाढून आणलें. त्या दिवशीं त्यानें ' मटनचाप ' यजमानाकरितां तयार केलें होतें; गणपतराव मोठ्या दुःखांतःकरणानें भोजनाला बसले. कांहीं पदार्थ वाढतां वाढतां बाबाजी म्हणाला, ' किती वेळ झाला जेवण तयार होऊन; अगदीं निऊन गेलें अन्न; आन् त्याचे तर जळून जळून कोळसे झाले. '

गणपतरावांनीं घाईघाईनें दोन घांस खाल्लें आणि ' झालें माझें, ' म्हणून हात धुऊन उठून आत्मगत म्हटले, ' नारायणराव गेल्यापासून ह्या घरांत आपल्याला एक दिवसही जेवण गोड लागत नाहीं. जणूं काय या पलीकडच्या खोलींतच माझा मित्र मरून पडला आहे व मीं इकडे जेवीत आहें असें वाटतें ! ! अरे त्या दोन प्रहरीं तो नाहींसा झाला त्याला आज किती तरी दिवस झाले ! मला आतां तो पुन्हां केव्हां भेटेल ? पुराणांतरीं कल्पित वर्णन आहे ना कीं पृथ्वी दुर्भंग होऊन पुण्य प्राण्यावर कांहीं संकट आल्यास त्यास आपल्या पोटांत घेते; किंवा पातालांतील नागकन्या सुंदर पुरुषाला आपल्या उपभोगाकरितां एकदम नकळत खालीं घेऊन जातात; तशीच गत माझ्या मित्राची झाली काय ? '

भाग २० वा.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें गणपतराव जेवण करून उठले व आपल्या लिहीत बसण्याच्या खोलीकडे गेले. याच खोलींत, टेबलावरच्या कपाटांत, नारायणराव चव्हाणाच्या हकीकतीचा जो एक कागद तयार केला होता, तो त्यांनीं ठेविला होता. त्यांनीं कपाटाचें दार उघडलें, आणि 'महत्त्वाचे कागद' ह्मणून चिठ्ठी मारलेल्या खान्यांतून तो कागद काढिला आणि तो पुढें घेऊन त्यावर कांहीं लिहावें ह्मणून विचार करीत लेखणी हातांत घेऊन टेबलाजवळ ते खुर्चीवर बसले. त्यांनीं पुष्कळ नवीन कलमें पहिल्या कलमास जोडलीं; या नव्या कलमानांही यांनीं पहिल्याप्रमाणेंच अनुक्रम नंबर घातले.

सुमारें तीस मिनिटें तें याप्रमाणें लिहीत बसले. नंतर लिहिणें बंद करून त्यांनीं तो कागद पाहिल्याप्रमाणेंच नीट घडी करून, जेथून काढला होता त्याच खान्यांत जपून ठेवला; मग तेथून उठून चिरूट ओढीत, हातांत मेणबत्ती घेऊन, ज्या खोलींत त्याच्या सामानाच्या पेट्या होत्या, व जेथें नारायणराव चव्हाणाच्याही पेट्या होत्या त्या खोलींत ते गेले.

त्यांनीं खिशांतून किल्यांचा जुडगा काढला, आणि अमकीच किल्ली नारायणरावाच्या पेटीला लागते, हें पक्कें माहीत नसल्यामुळें, ही नाहीं ती ती नाहीं ही, असें दोन चार किल्या हातांत घेऊन लावून पाहिल्यावर, एका किल्लीनें तें कुलूप काढून पेटीचें झांकण उघडलें.

त्यांनीं मोठ्या काळजीनें प्रत्येक वस्तु हळूच काढून जवळच्या खुर्चीवर ठेवण्याचा बेत केला; व त्याप्रमाणें एका मागून एक सर्व जिनसा पेटींतल्या काढून बाहेर खुर्चीवर ठेविल्या; या जिनसांत कांहीं जुने कपडे, कांहीं नाटकाच्या जाहिराती व हस्तपत्रिका, चिनी मातीच्या विलायती नमुन्याच्या कांहीं धडक्या व कांहीं फुटक्या चिलमी, कांहीं अत्तरांच्या कुप्या, कांहीं पत्रांचीं पुडकीं—प्रत्येक पुडक्यावर पत्र पाठविणाराचें नांवाची चिठी मारलेली,—आणि कांहीं फाटकीं तुटकीं पुस्तकें त्यांच्या दृष्टीस पडलीं. परंतु इतक्या सगळ्या जिनसांत त्यांना पाहिजे होतें तें मु

ळींच मिळालें नाहीं. ते नारायणरावाच्या बायकोचीं पत्रें त्यांत आहेत कां म्हणून पाहत होते, परंतु सर्व व्यर्थ. आपल्या बायकोचीं पत्रें आपल्या जवळ आहेत असें नारायणरावानें यांना पुष्कळ वेळां सांगितलें होतें. व एकदां तिच्या पत्राचें पुडकें काढून वाचीत बसलेला नारायणरावास यानीं पाहिलेंही होतें. व तसेंच वाचून झाल्यावर पुन्हा दोरीनें बांधून जशाची तशीच ती पेटींत ठेवल्याचें यांना ठाऊक होतें. मग पुढें नारायणरावानेंच त्यांचा कांहीं विल्हेवाट केली, किंवा तो नाहींसा झाल्यावर कोणीं तीं उपटलीं, कीं काय झालें हें कांहीं निश्चयानें सांगतां येत नाहीं. परंतु तीं नाहींशीं झालीं एवढें मात्र खरें.

गणपतरावांनीं दुःखाचा मोठा सुस्कारा टाकिला आणि 'खास पत्रें तिनेंच उपटून नेलीं. या करत्वगारानें युक्तीनें कुलूप काढून आयतेंच पुडकें उपटून नेऊन दिलें; पण काय असेलतें असो; ईश्वराला माहीत ' असें म्हणून जशा त्या जिनसा काढल्या तशाच त्या पेटींत पुन्हा भरल्या; तेवढीं तीं पुस्तकें मात्र त्यानीं आंत घातलीं नाहींत. तीं वर ठेविलीं व ' बघूं यांत कांहीं सांपडतें कां ' असें ते म्हणाले.

नारायणरावाचा हा पुस्तकसंग्रह फार मोठा व महत्वाचा होता असें नाहीं. त्यांत एक संस्कृत व्याकरण होतें, एक मराठी पुस्तक होतें, त्याचें मुखपत्र व अखेरचें पत्र दोन्हींही फाटून गेलीं होतीं; त्यामुळें तें कोणचें पुस्तक होतें हें आंत वाचून पाहिल्याखेरीज कळण्याला मार्ग नव्हता; घोडे स्वारांनीं ' परेड ' कशी करावी या विषयावरचें एक इंग्रजी पुस्तक होतें, एक फाटकें शेक्सपीयरचें जुलियस सीझर नाटक होतें; लेडी आफ दि लेक्चें, फक्त एकच पुट्ठा गेलेलें, पुस्तक होतें शिवाय संगीत शाकुंतल व सौभद्र हीं पुस्तकें होतीं; हीं नवींच दिसत होतीं.

गणपतरावांनीं पेटीला कुलूप लाविलें. तीं पुस्तकें काखेंत मारून तें आपल्या निजण्याच्या खोलींत आले. तेथें रामा लवेकरी, बिछाना घालीत होता. तोंपर्यंत ते आराम खुर्चीवर पडले व आपण बरोबर आणलेल्या पुस्तकांपैकीं एक हातांत घेऊन त्याकडे पाहूं लागले. त्यांचें लक्ष त्या पुस्तकाकडे मुळींच नव्हतें. या वेळेस त्यांच्या समोर त्यांच्या मामीची मूर्ति उभी राहिली होती. रामानें बिछाना घातला. शामदान पलंगाजवळ

लावून देविलें. आणि बाहेर जाऊन दार पुढें ओढून घेतलें. गणपतराव खुर्चीवर उठून बिछान्यावरून जाऊन निजायाचे सोडून खोलींत इकडे तिकडे फिरूं लागले आणि आपल्याशींच म्हणूं लागले, 'काय, मीं असें काय करूं लागलों आहे? प्रत्येक पदोपदीं, प्रत्येक मिनिटामिनीटाला, मीं गुप्त गोष्ट बाहेर आणण्याच्या खटपटींत आहें; आणि त्याप्रमाणें मला यशही येत चाललें आहे. पण मी असें कां करूं लागलों नकळे! काय? मला एखाद्या चक्राला बांधलें आहे काय कीं तें जसें जसें फिरेल तसें तसें मीं फिरावें! आहे तरी काय? किंवा आज असें म्हणावें काय, कीं, मी आपल्या मित्राचा माझ्याकडून होईल तितका शोध केला, पण सर्व व्यर्थ, तेव्हां आज मीं हा नाद सोडून दिला. असें करण्यांत मीं आपलें कर्तव्यकर्म केल्यासारखें होईल काय? मला वाटतें माझा मित्र माझ्या दृष्टीस आतां कधीं नाहीं पडणार! गेला! तो या जगांतूनच गेला! तेव्हां उगीच आतां भ्रम करण्यांत काय अर्थ आहे? तो मेला असें म्हणण्याला आतां काय हरकत आहे? तो कसा मेला व कोठें मेला हें शोधून काढण्याचें माझें काम आहे काय? व असलें तर मी त्याच मागींत आहे काय? आहे तरी काय? मीं आतां काय करूं–मीं काय करूं? मला कांहींच सुचेना.'

असें म्हणून ते एकदम खालीं बसले आणि गुडघ्यावर कोंपर ठेवून दोन्ही हातांनीं तोंड झांकून, घळघळ लहान मुलाप्रमाणें रडूं लागले! बराच वेळ याप्रमाणें बसल्यावर ते एकदम उठले. त्यांचे डोळे लाल झाले होते. व त्यांच्या चेहऱ्यावर निश्चयाचें तेज दिसत होतें. 'मृत मनुष्याचा न्याय पाहिल्यानें आणि मग जिवंत असणाराचा दया किंवा कायतें' असें म्हणून तीं पुस्तकें घेऊन ते बिछान्यावर जाऊन पडले. शामदान जवळ घेऊन प्रत्येक बूक हळूं हळूं चाळून पाहून, प्रथमतः प्रायः ज्या पानावर मालक आपलें नांव लिहितो तें पान ते पाहत; आणि मग बाकीच्या पानांत एखादा कागदाचा चिटोरा आहे कां म्हणून तीं ते चाळीत; संस्कृत व्याकरणांत पहिल्याच पानावर 'ना. च.' अशीं अक्षरें होतीं, तीं फार पोरकट दिसत होतीं. मधीं मधीं कांहीं ठिकाणीं सिसपेनीनें नारायणराव चव्हाण असें नांव लिहिलें होतें व दुसरें कांहीं खरकटलें होतें. लेडी आफ दि लेकवर तें पुस्तक

विकत घेतल्याची तारीख होती, व कोणाचें कीं दुसऱ्याचें नांव होतें. संगीत शाकुंतल व सौभद्र यांवर कांहींच लिहिलेलें नव्हतें. बहुतेक सर्व पुस्तकें चाळलीं. त्यांनीं मोठा सुस्कारा टाकिला. काय तें एकच पुस्तक आतां पाहण्याचें राहिलें हें राहिलेलें पुस्तक त्यांनीं हातांत घेतलें; त्याच्या मुखपत्राच्या आंतल्या बाजूला एक कविता लिहिली होती. ती कोण्या तरी स्त्रीनें लिहिली असावी असें त्या अक्षरांवरून दिसत होतें. त्यानें याकडे विशेष लक्ष दिलें नाहीं; आंत पानांच्या पोटीं खूण म्हणून एखादा कागदाचा चिटोरा, किंवा पत्र, आहे कां म्हणून ते पानें चाळूं लागले. त्यांना कागद विगद कांहीं सांपडला नाहीं.

मग हें पुस्तक, आतां उचलून बाजूला ठेवावें म्हणून हातांत घेऊन, उगीच पुन्हा पानें चाळतां चाळतां, पाहतात तों पहिलीं दोन पानें एकाला एक अगदीं घट्ट चिकटलीं आहेत, असें त्यांना आढळून आलें; कागद फाडण्याच्या हस्तंदती चाकूनें तीं पानें मोठ्या युक्तीनें सोडविलीं, व एका पानावर कांहीं लिहिलेलें पाहून आपल्या श्रमाचें सार्थक्य झालें असें त्यांस वाटलें. हा लेख कलमवारीनें लिहिला होता. तीं तीन कलमें होतीं. तीं एकाच मनुष्याच्य हातचीं नव्हतीं. तिघांच्या हातचीं तीन होतीं. पहिलें कलम, तें पुस्तक ज्या सालीं छापलें त्या सालींच लिहिलें होतें असें त्याच्या तारखेवरून दिसत होतें; 'व त्यांत मुक्काम पुणें, दुर्गाबाई ईस मिस लिटल इनें तिच्या चांगल्या वर्तणुकीबद्दल बक्षीस दिलें' असें लिहिलें होतें. दुसरें कलम पुढें पांच वर्षांनीं लिहिलें होतें, असें त्याच्या तारखेवरून दिसत होतें। हा दुर्गाबाईचा हातचाच लेख होता. तिनें हें पुस्तक करवीर येथील 'फिमेल कालेजांतील' गोदुबाईस प्रेमपुरःसर मित्रभावानें बक्षीस दिलें असें; लिहिलें होतें. आणि तिसरें कलम गोदुबाई उर्फ आनंदीबाई चव्हाण इच्या हातचें होतें; व तिनें तें पुस्तक नारायण चव्हाण यांस नजर केलें होतें. 'नारायणराव चव्हाण यांस नजर' हीं अक्षरें वाचतांच व तें अक्षर ओळखतांच गणपतरावाचा चेहरा उतरला, 'असें व्हावयाचेंच; मला वाटलेंच होतें' असें म्हणून मोठा सुसकारा टाकून त्यांनीं तें पुस्तक झांकलें, आणि पलीकडे टाकलें. 'वाईट प्रसंग मजवर येणार हें ईश्वरानें ठरावलेंच आहे

आणि तो प्रसंग तर आला, आतां माझ्या सर्व लक्षांत आलें मला आतां शिरोळाला गेलेंच पाहिजे.

'तो म्हातारा तिला खास अनकूल असला पाहिजे. त्याला सर्व माहित. त्या लुच्याचीच सर्व लबाडी. प्रसंग आला तर तो त्या पोरालाही कांहींही करण्याला मागें पुढें अगदीं पाहणार नाहीं. मला अगोदर त्या पोराला युक्तीनें त्या थेरड्याजवळून काढलें पाहिजे. निदान कसेंही करून म्हाताऱ्याचा त्याच्या जेवणाशीं तरी संबंध नसेल असें अगोदर केलें पाहिजे. तर आतां जातोंच शिरोळाला. मुलाची व्यवस्था अगोदर. आणि मग दुसरें काम. ठरला निश्चय. "आय मस्ट गो." '

भाग २३ वा.

नारायणराव चव्हाणाच्या पेटींत गणपतरावाला जी पत्रांचीं पुडकीं सांपडलीं, त्यांत एक त्याच्या बापाच्या पत्रांचें पुडकें सांपडलें होतें. आपल्या मुलानें आपल्याला न कळवितां, आपल्या मर्जीविरुद्ध, आपल्या पेक्षां कमी जातीनी मुलगी केली म्हणून, बापाचा मुलावर फारच राग झाला होता ; लग्न झाल्यापासून मुलाला विचारायाचें बापानें अगदींच सोडलें होतें. नारायणराव चव्हाणाचे वडील हैबतराव चव्हाण यांस गणपतरावांनीं कधींच पाहिलें नव्हतें ; परंतु नारायणरावाच्या सांगण्यावरून हैबतराव चव्हाणाच्या चालचलणुकीविषयीं, व स्वभावाविषयीं त्यांना कांहीं माहिती झाली होती. नारायणराव नाहींसा झाल्यावर लागलेंच गणपतरावांनीं, हैबतरावाला ' आपला मुलगा नाहींसा झाला, व वाईट परिणाम त्याचा झाला असावा, ' अशा अर्थाचें एक पत्र पाठविलें होतें. बरेच दिवसपर्यंत नारायणरावाच्या बापाकडून गणपतरावाला कांहींच उत्तर आलें नाहीं. अखेर महिना दीड महिन्यांनें एक पत्र आलें ; त्यांत हैबतरावांनीं लिहिलें होतें कीं ज्यादिवशीं त्या मूर्ख पोरानें त्या कडू शिंद्यांच्या पोरीशीं संबंध केला त्याच दिवशीं तो मला मुकला, आणि त्याला मीं मुकलों. जातिकुळापेक्षां पोटचें पोर मला अधिक नाहीं. तो नाहींसा कोठें होतो मसणांत. त्या पोरीला घेऊन कोठेंतरी लांब जाऊन राहिला असेल झालें." पुन्हां ताजाकलम घालून आमच्या या पितृरूपी शत्रूनें लिहिलें होतें, " उगीच नाहींसा झाला अशी खोटी बातमी आपल्या मित्राच्या साहाय्यानें उठविली असेल, व अशी बातमी मला कळवून माझ्याकडून पैसे उपटावे म्हणून त्यानें व त्याच्या मित्रांनीं बेत केला असेल ; तर अशा गोष्टींनें मीं कधींही फसणार नाहीं; कांहीं तरी वर्षें, या जगांत मी तुमच्यापेक्षां अधिक घालविलीं आहेत."

गणपतराव वकीलांनीं या पत्राचें उत्तर मोठें खरमरीत पाठविलें होतें. त्यांनीं लिहिलें होतें ' आपल्या बापाकडून मदत व्हावी अशी नारायणरावाची मुळींच इच्छा नाहीं. त्यानें नाहींसें होण्यापूर्वी न्यूनकेंत दहा पंधरा

हजार रुपये ठेविले आहेत. आपल्याला जर नातू नसता तर ती रकम आपल्यालाच मिळाली असती; परंतु ईश्वरानें आपल्यासारख्याच्या हातीं ती न पडावी ह्मणून फार दयाळुपणानें, त्याच्या मुलास सुखी ठेविलें आहे. आपल्याला नारायणरावाचे तीर्थरूप ह्मणण्यास देखील मला फार फार वाईट वाटतें. पिता ही पदवी ईश्वरानें आपणांस दिली नसती तर फार चांगलें ह्मालें असतें ! !'

वास्तविक ह्मटलें असतां, अशा प्रसंगीं ज्याच्याकडून विशेष मदत या कामांत मिळावयाची, त्याच्याकडून ती मिळण्याची गणपतरावाला मुळींच आशा राहिली नाहीं. हैबतरावाला पुन्हां पत्र पाठविण्याचा त्यांनीं नादच सोडून दिला. परंतु अलीकडे अलीकडे जेव्हां सर्व गोष्टी या थराला येऊन पोहोंचल्या तेव्हां पुन्हां त्या शत्रुस्वरूपी पित्याविषयीं त्यांच्या मनांत येऊं लागलें. ते ह्मणाले,—' शिरोळास जाऊन आल्यावर, लागेलच गारगोटीला जाऊन, हैबतरावा ना भेटून येतों एकदां; आपल्या पोराचा पत्ता कांहीं लावावयाचानाहीं, त्याचें काहींही होवो, त्याचा कोणी गळा कापून खून केला असो, किंवा कोणी जीवंत त्याला पुरलें असो, किंवा पाठीला मुद्दाम दगड बांधून एखाद्या विहिरींत त्याला बुडविलें असो, कांहींही होवो; आपण कांहीं त्याची चौकशी करणार नाहीं, असें जर तो ह्मातारा ह्मणेल, व मुलाची चौकशी केल्याखेरीज जर तो स्वस्थांतःकरणानें मरत असेल, तर माझें कांहींएक ह्मणणें नाहीं. मग मीं तरी कशाला एवढी उठाठेव करूं ? मी गारगोटीला जातों, आणि सर्व हकीकत त्याला एकदां सांगतों. माझा कोणावर वहीम आहे तेंही त्याला सांगतों, आणि आतां पुढें काय करावें ह्मणून त्याला विचारितों. '

दुसरे दिवशीं सकाळीं गणपतरावबकील साताचे मिक्सड गाडीनें शिरोळाला जाण्याला निघाले. 'त्या गरीबीबच्चाऱ्याबद्दल माझे अंतःकरणांत इतकें प्रेम आहे असें कोणाला वाटेल तरी काय ? किंवा त्याच्या वांचून मला अगदींच चैन पडत नाहीं, हें कोणाला खरें वाटेल काय ? बारा आणे शेंकडयाचें घरीं बसून मला व्याज पडत आहे, शिवाय मागें पुढें मामाची इस्टेटही मला मिळण्याचा संभव आहे; तसेंच, मामाचा किताब ही मला मिळाला तर मिळेल, माझा अगदीं जीव कीं प्राण अशाएका तरुण स्त्रीच्या संगतीनें माझे आयुष्याचे दिवस आनंदानें जाणार आहेत हें खास;

हें सगळें खरें, परंतु नारायणरावापुढें हें मला कांहींच नाहीं. आज जर मला कोणी असें वचन देईल कीं नारायणरावाला आणून तुझ्या पुढें उभें करितों, आणि त्याच्या नाहींसं होण्याची सर्व समाधानपूर्वक हकीगत सांगतों; परंतु या जगांत तुझें म्हणून जें कांहीं आहे तें सर्व मला त्याबद्दल दे; तर मीं आतां फक्त एक नेसवें धोतर उेवून बाजूला होतों. व सर्व माझी इस्टेट लिहून देतों'! असे अनेक विचार करीत गाडींत सेकंडक्लासांत 'आ-ईल क्लॉथच्या' गादीवर हे लोळत पडले होते.

अकरा आणि बारा यांचे दरम्यान गाडी स्टेशनावर येऊन थडकली. गणपतराव खालीं उतरले व चालत गांवाकडे निघाले. गांवांत मामलेदारकचेरी जवळ आले तों घडयाळांत बारा ठोके पडले; तसेंच कचेरीवरून वोळावोळांनीं एका ओसाड अशा गल्लींत एका पडक्या घराजवळ येऊन ते उपल.

तुकोजीराव शिंदे ह्यांचें हें वसतिस्थान होय. घराचा पुढचा दरवाजा अगदीं पडला होता. तो चांगला टाकीच्या दगडाचा बांधला असावा असें दिसत होतें. दाराच्या चौकटीचीं गणेशपट्टी निखळून जाऊन किती दिवस झाले हें शेजारच्या चांगल्या दाट्टी मिशांच्या गृहस्थांना ही कांहीं सांगतां येत नसे; त्यांच्या आडनांवाच्या बाहेरचीं ही गोष्ट झाली होती. दाराजवळच्या भिंती पक्क्या विटाच्या होत्या; त्यांना कधीं तरी एकदां चुना लावला असावा, असें त्या पांढरूक पांढरूक जाग्यावरून दिसत होतें. भिंतीवर व दाराची एकच फळी होती तीवर, वेलफिंनीं व पाटील कुळकर्ण्यांनां नोटिसा चिकटविल्या होत्या. त्यांपैकीं कांहीं अर्ध्या मुर्ध्या फाटून गेल्या होत्या. वरचा भाग तर कोठांच पत्तत्याला मिळाला होता! वर राहिलेला भाग वाऱ्यानें वरचेवर उडून आणिक आणिक फाटत चालला होता; त्यावर मुनसफ नाझर इत्यादिकांच्या सह्या दिसत होत्या. कांहीं नोटिसा तर काल परवांच लाविलेल्या होत्या. गांवातल्या उनाड पोरांनीं या भिंतीवर कांहीं ठिकाणीं अपशब्द लिहिलेले होते; दारांतून आंत पाहिलें म्हणजे सुद्धां जिकडे तिकडे पडकें पडकेंच दिसे; अशाच घरांत दुर्दैव हें लक्ष्मी वडीलबहिणीच्या सहवासानें सुखानें नांदत असतें! हा सर्व देखावा पाहून गणपतरावाला फारच वाईट वाटलें. इतक्यांत एका शेजारच्या घरांतून एक मुलाचें शव स्मशानाकडे नेत होते; तें त्याच्या दृष्टीस पडलें. तें पाहून तो आत्म-

गत झणाला 'हें शव जर नारायणरावाच्या मुलाचें असेल तर मग कसें बरें ? त्याच्या जीवाभावाला जास्ती कमी कांहीं झालें तर मीं त्याचा जवाबदार आहें, नाहीं ?' ही कल्पना आल्याबरोबर त्यांच्या अंगावर थर्रर् करून कांटा उभा राहिला. गणपतराव, अंगणांत जाऊन उभे राहिले आणि 'आतां पोराला एक घटकाभर येथें ठेवणार नाहीं. सर्व जबाबदारी मजवर आहे,' असें पुन्हा जोरानें झणाले.

त्यांनीं तुकोजीरावाचें नांव घेऊन हाक मारली तेव्हां एक मांडचोळणा घातलेला नोकर पुढें आला व त्यानें सोप्यावर बसा झणून त्यांना सांगितलें. सोप्यावरच्या उजव्या हातच्या खोलीचें दार अर्धेंच उघडें होतें. तेथें एक लहान मूल आपल्याशींच बडबडत आहे, व कांहीं खडखड करीत आहे, असें गणपतरावास दिसलें. आपण करवीराहून आलों आहों, तुकोजीरावाकडे आपलें कांहीं काम आहे, त्यांस बोलाव, असें त्या नोकरास सांगून, आपण त्या डाव्या हातच्या खोलीचें दार नीट उघडून आंत जाऊं लागले; हें पाहून तो चाकर त्यांच्याकडे आश्चर्यानें पाहूं लागला. आणि मनांत कांहीं येऊन चटकन् डोक्यावर 'मुंडास' ठेवून पळत बाहेर गेला.

तो धांवत धांवत एका आड गल्लींत एका घरापुढें जाऊन उभा राहिला; त्या घरांत पुढेंच, एका ओटयावर पांढऱ्या तांबडया रंगाच्या पातळ पातळ पदार्थांनीं भरलेल्या वाटल्या ठेविल्या होत्या; कांहीं मोंप होतीं. पांच सहा असामी गप्पा मारीत तेथें बसले होते, यावरून हें सुरादेवीचें मंदिर होय असें वाटतें. तेथें तुकोजीराव सुरादेवीच्या पुजाऱ्याशीं कांहीं बोलत होते; ते त्याजवळ प्रसाद मागत होते. पुजारी झणत होता देवीची दक्षिणा दिली नाहीं तर मग प्रसाद कसा मिळेल ? मागची दक्षिणा अजून येणें आहे, ती अगोदर द्या. तुकोजीराव अगदीं तलफेनें वेडे होऊन खिशांत हात घालून कांहीं खुळखुळतें का झणून पाहत होते. खिशांत काय खुळखुळणार आहे ? तेथें काय असणार ! तंबाकूच्या दोन काड्या त्या देखील वेळेवर नसावयाच्या.

इतक्यांत त्या चाकरानें जाऊन तुकोजीरावाच्या कानांत कांहीं हळूच सांगितलें. तुकोजीरावांची मुद्रा एकदम पालटली, जणूं काय आपला शत्रु आपला पाठलाग करीत आला असें त्यांला वाटलें !

इकडे गणपतराव खोलींत जाऊन पाहतात तों एक स्त्री त्या मुलापाशीं कांहीं खात बसली आहे, तो मुलगाही मधून मधून कांहीं खात आहे, व कांहीं खडबड करीत आहे; ती स्त्री तारुण्याच्या फुरकींत आहे, असें जवळ गेल्यावर दृष्टीस पडलें. ही स्त्री अजमासें पन्नास वर्षांची असावी असें दिसत होतें. इच्या हातांत दोन दोन काळीं कांकणें होतीं, व एक एक रुप्याचें कांकण होतें; गळ्यांत कांहीं नव्हतें, मंगळसूत्र व काळी पोत दिसत नव्हतीं; यावरून ती विधवा असावी असें वाटतें. तिनें बुचडा बांधला होता, केस फार मलिन दिसत होते; यावरून नाहून इला फार दिवस झाले होते हें खास. ती एक अडीच तीन रुपयांचा पिंवळ्या कांठाचा बांडनेसली होती, तिच्या गालांवर आतां सुरकुत्या पडलेल्या होत्या, त्यांत ती गालांवर गोंदलेली डाळिंबी झांकून गेली होती. नाक चांगलें सरळ होतें, पण आतां, कांहीं दांत पडल्यानें त्याचा शेंडा ओंठावर येऊन पडला होता; तो आपल्या तारुण्यावस्थेंत खरोखर फार चांगला दिसत असेल. गणपतरावाला पाहिल्याबरोबर ती मर्यादेनें उठून उभी राहिली आणि 'कोणाकडे आलां?' असें म्हणून थोडी हांसली. हांसल्याबरोबर तोंडांत खालचे दोनच दांत असलेले त्यांना दिसले; ते दांतवण लावल्यानें अगदीं काळेभोर झाले होते. शेजारच्या रिकाम्या हिरड्याही दांतवणानें काळ्या भोर रंगल्या होत्या. खरोखरच या रंगानें या तोंडाला मोठी शोभा येत असेल नाहीं? ती मोठ्या मर्यादेनें म्हणाली, 'तुकोजीराव बाहेर गेल्याती. आन् घरपट्टी मागाया आला असला तर—'

पुढें ती कांहीं बोलणार इतक्यांत नारायणरावाच्या मुलानें गणपतरावाकडे पाहिलें; आणि तें धांवत धांवत त्यांच्याजवळ आलें आणि म्हणालें, 'अं तुम्ही मागें त्या-त्या गांवीं आलां होतां नाहीं? आणि येथेंही आलां होतां; मला खाऊला पैसे दिले ते, आजोबांनीं देवले ते; मला कोणीं पैसे दिले म्हणजे अजोबाच आपल्याजवळ देऊन घेतात, मला देतच नाहींत!'

त्यांनीं मुलाला उचलून घेतलें आणि जवळच्या पेटीवर जाऊन बसून 'बाळा, नीट उभा रहा; मला पाहूंदे एकदां नीट तुझ्याकडे' असें ते म्हणाले; त्या मुलाचें तोंड उजेडाकडे फिरविलें. आणि आपल्या दोन्ही हातांनीं त्याची तोंडावर आलेली झुलपें मागें नीट सारलीं व 'बाळा, तूं आतां

थेट आपल्या बापासारखा दिसतोस कांरे ? तूं आतां मोठा होऊं लागलास. आतां शाळेला नाहींका जायाचें,' असें पुनः ते प्रेमानें म्हणाले.

तें मूल मोठ्या उत्सुकतेनें म्हणालें, 'होय मीं जातों शाळेला. मला पाटी घेऊन द्या. मीं तात्यापंतोजीच्या शाळेंत जात होतों. ती पलीकडे त्या मोठ्या घरांत शाळा आहे ती. आजोबा मला पाटीच देंत नाहींत! मला गोंवर आला त्यापासून शाळेंत जाऊं नको म्हणून आजोबा म्हणतात. पंतोजी 'फी' मागतो. आजोबा देत नाहींत, मग तो येऊं नको म्हणतो. तुम्ही फी देतां ? मीं जातों शाळेंत. गिरजामावशी मला नेऊन घालवील. होय नाग गिरजा मावशी ?'

'होय बाळा, तुझ्या अजोबानें नेऊन घाल म्हणून सांगितलें, तर आतां नेऊन घालतें वरं बाळा' असें ती गिरीजाबाई म्हणाली. गणपतराव मनांत म्हणाले, 'काय बरें या थेरडीचा संबंध ? मला ही म्युनिसिपल कमेटीचा 'टयाक्स कलेक्टरच' समजते काय ! हिला वाटतें मीं नोटीस लावायाला आलों आहे! किंवा तिच्या वृत्तींत अशी चलबिचल होण्याचें कांहीं दुसरें गुप्त कारण आहे ? काय असेल तें असो. तुकोजीरावाचें कांहींही गौप्य असो, तें इला माहीत नसेल कीं असेल ? असेलही कदाचित्, नाहीं कोणी म्हणावें ? इतक्या वेळांत ती म्हातारी गिरिजाबाई हे दोघे बसले होते, त्या पेटीच्या कोंपऱ्याला लागून उभी राहिली, आणि त्या मुलाला हळूच ओढूं लागली; तें मूल चटकन् पलीकडे सरकून जाऊन बसलें.

गणप०—काय त्या मुलाला करता ?

गिरिजा०—अहो, जेवतां जेवतां तसाच बसला आहे. हात तोंड धुतें. चांगला निर्मळ करतें. तोंड आंग मातीनें भरवून घेतल हाय. अस का चांगल दिसत व्हय ? आतां कला चांगला करून अनते वगा, आतां धुतल्या मोत्याबानी सवछ करून आनते जगा थांबा.

असें म्हणून पोराला घेण्याकरितां तिनें हात पुढें केला तोंच गणपतरावांनीं तिला तसेंच थांबविलें आणि म्हटलें, 'गिरिजाबाई, राहूं द्या; बरा आहे असाच. त्याला काय झालें आहे ? तोंड मळलें असलें म्हणून काय झालें. मला कांहीं येथें फार वेळ रहावयाचें नाहीं; आतां मीं या गाडीनें जाणार आहें, तोंपर्यंत मला बोलूं द्या मुलाबरोबर घटकाभर. तो काय सांगतो तें ऐकूं तर द्या.'

तो मुलगा, हें वकील साहेबाचें बोलणें ऐकून त्यांच्या अंगाला चिकटून बसला. आणि म्हणाला, ' तुम्हीं मागें आलां तेव्हां मला तुमचें भय वाटलें. आतां मीं मोठा झालों, आतां नाहीं मीं भीत. नाहीं हो ?'

मित्रवियोगानें वेडे झालेले आमचे वकील त्या मुलाकडे न पहातां त्या म्हातारीकडे लक्ष लावून पाहत होते. ती म्हातारी त्यांच्यापासून लांब सरकून खोलीच्या खिडकींतून बाहेर उगीच पहात उभी राहिली होती. बराच वेळ तिच्याकडे टक लावून पाहिल्यावर ते तिला म्हणाले, ' तुम्ही कोणाची तरी वाट पहतां वाटतें ? कोणी येणार आहे वाटतें ? तुकोजीराव ? '

गणपतरावांचें हें बोलणें ऐकून ती जरा गोंधळली, आणि म्हणाली, ' नाहीं. मीं तुकोजीरावाची वाट पाहतें. तुम्ही गेलां आणि ते आले. म्हणजे तुमची त्यांची भेट होणार नाहीं; त्यांना फार वाईट वाटेल मग. '

गणप०—मग मीं कोण हें तुम्हाला कळलें म्हणावयाचें तर ?

गिरिजा०—नाहीं. परंतु—

इतक्यांत त्या मुलानें आपल्या खिशांतलें वाच काढलें आणि गणपतरावाला ' हें पहा ' असें म्हटलें, त्यानें तिचें बोलणें तसें अर्धेंच राहिलें.

गणपतरावाच्या मांडीवर आडवें पडून तो मुलगा म्हणतो, ' हें बघा मला हें वाच त्या बाईनें दिलें. ती कशी छान गोरीपान आहे. इतके दागिने तिच्या अंगावर आहेत. आतां आजोबा हें घेऊन जातील. कोणीं पैसा मागायला आला कीं घड्याळ नीट करून आणतों म्हणतात आणि घेऊन जातात. तो लवकर नीट करून देतच नाहीं. आणि मीं रडूं लगलों म्हणजे आजोबा म्हणतात, अरे तें घड्याळ गेलें तर गेलें ' ती बाई पुन्हां नवें छान आणून देईल. तुम्ही पाहिली कां ती बाई ? कशी गोरीपान आहे. ती परवां आली ती. ती— ती आली म्हणजे —

गणप०—नाहीं पाहिली रे बाळा. मला दाखविशील कां ती ? तो तुला काय काय म्हणाली सांग पाहूं ?

मुलाचें हें बोलणें ऐकून गिरजाबाई झपाट्यानें खिडकीपासून आली आणि मुलाचा शेंबूड काढावा, म्हणून आपला पदर त्याच्या नाकापाशीं नेऊं लागली; गणपतरावानें झटकून त्या मुलाला बाजूला केलें व ' गिरजाबाई, थोडा वेळ थांबा, आतां यावांचून कांहीं अडलें नाहीं; जरा पांच

मिनिटें मेहेरबानी करा. त्या बाईविषयीं काय तो हकीकत सांगतो तें मला ऐकूं द्या. उगीच मधीं मधीं अडथळा आणूं नका; बसा बाजूला जरा. ये बाळा, बैस येथें माझ्या मांडीवर अं, आणि सांग पाहूं ती बाई कसली आहे ती ?' असें उत्तर दिलें.

बाळा त्यांच्या मांडीवर बसला; आणि त्यांच्या घड्याळाच्या सांखळीशीं खेळत खेळत म्हणाला, 'मीं सांगतों अं. अजोबांनीं कोणला सांगूं नको म्हणून सांगितलें आहे. सांगितलें तर मारीन म्हणाले, तुम्हा त्यांना सांगूं नका बर. ती बाई येथें आली होती (हात उंच करून) त्याला पुष्कळ दिवस झाले, तेव्हां मीं एवढा मोठा नव्हतों. ती रात्रीं आली, मीं निजलों होतों. माझ्या जवळ आली, आणि मग मला हें घड्याळ दिलें, कां गिरजामावशी ? तूं कां नको सांगूं म्हणतेस ! हें पहा हो, ही पहा मला चप्पराव म्हणते, डोळे वटारते पहा ! मी सांगणार जा. तुझें काय गेलें ? असें तो त्या गणपतरावाच्या मागें उभी राहिलेल्या म्हातारीला मध्येंच म्हणाला. हें ऐकून गणपतराव त्या म्हातारीला म्हणाले, ' हें पहा गिरिजाबाई, तुम्हीं जर या मुलाला असें बोलूं देत नाहीं, तर एखाद्याला सहज संशय मात्र येईल, कीं तुम्ही व तुकोजीरावांनीं मिळून कांहीं तरी लबाडी केली असावी; तुम्ही व त्यांनीं मिळून कांहीं तरी गोंधळ केला असावा. व आतां हें पोर कदाचित् पट्कन सांगेल म्हणून त्याला दरडावतां होय ? अशानें दुसरें कांहीं होत नाहीं, संशय मात्र उत्पन्न होतों. कांहीं तरी यांत कपट आहे हें खास.

हें ऐकिल्या बरोबर गिरिजाबाईचा चेहरा उतरला; घाबरून बोबडी वळली. ओठ सुकून गेले. जीभ कोरडी पडली. एक अक्षर तिच्या तोंडांतून उटेना. गिरिजाबाईकडे पाहून तो मुलगा म्हणाला, 'माझ्या गिरजामावशीला रागें नका भरूं बरें. ती माझ्यावर फार फार माया करती. मला खाऊ देती. कधीं मारीत नाहीं. मोठी चांगली आहे. नाहींग गिरजामावशी ? ही आमच्या चंद्राची आई. तुम्हाला माहीत आहे कां आमची चंद्रा. ती नेहमीं रडत असे. ती अजारी पडली होती. तिला ताप येत होता ती—ती—मग तिकडे—

तो पुढें कांहीं बोलणार इतक्यांत तुकोजीराव शिंदे खोलीच्या उंबऱ्यावर येऊन उभे राहिले. त्यानें त्यांचें बोलणें तसेंच राहिलें. तुकोजीराव गण-

तरावाकडे कांहीं भीतीनें, कांहीं शिलेदारी बाण्यानें, कांहीं झिंगल्यासारखे होऊन पाहूं लागले; तो त्यांचा शंकरही, त्यांच्या जवळच धापा टाकीत उभा होता; तुकोजीराव अडखळत अडखळत, रेंगांळतरेंगांळत, सावकाश गिरिजाबाईला जरा रागानें म्हणाले, 'फार शाहणी आहेस तूं! पोराला जर त्यांच्यापासून लांब बसवावेंस का नाहीं! त्याच तोंड काय भरलें आहे? धुऊन बिऊन स्वच्छ करावें कीं नाहीं! हं काय! तुझ्या मनांत आहे तरी काय! माझ्यावर खापर फोडणार वाटतें! माझें तेवढें वाटोळें कर म्हणजे सुटलीस. उचल त्या पोराला. जा धुऊन आण जा. पाहतीस काय?'

'गणपतराव तुम्ही आलां फार चांगलें केलें. मला मोठा आनंद झाला, तुम्ही आमच्या गरीबाच्या झांपडांत कधीं आला याल?'

तुकोजीराव याप्रमाणें गणपतरावास हळू स्वरानें व मर्यादेनें म्हणाले, व तेथें एक कांबळें पडलें होतें त्यावर 'हुश्श' करून बसले.

गिरिजाबाई गडबडीनें पोराला घेऊन आंत गेली. तेव्हां गणपतरावाच्या मनांत आलें 'या दारूकंसाच्या कसल्याही गुप्त गोष्टी असोत त्या या थेरडीला माहीत असल्याच पाहिजेत. हें काय गौप्य आहे हें कळत नाहीं; पण तें क्षणोक्षणीं दृढतर होत चाललें आहे हें खरें. एक विचारानें नारायणराव मेला हें खास, आतां त्याचा शोध कशाचा, असें वाटतें. व एक मनानें त्याचा शोध (मग तो जिवंत असल्याबद्दल अथवा मेल्याबद्दल) लावल्याखेरीज राहू नये असें वाटतें.'

भाग २२ वा.

गिरिजाबाई रुलाला आंत घेऊन गेल्याबर गणपतराव तुकोजीरावाला मोठ्या गंभीर स्वरानें म्हणाले, ' तुमच्या नातवाला मीं आतां आपल्या बरोबर घेऊन जातों. आतां नाहीं हरकत दिसत. एकटें राहण्यास संवय झाली पाहिजे.'

सूर्यप्रकाशानें सकाळचे वेळीं निकडे निकडे दाट पडलेलें धुकें जसें नाहींसें होऊं लागतें तशी आमच्या या वृद्ध व्यक्तीची दारूची गुंगी, गणपतरावाला पाहून हळू हळू जाऊं लागली. त्या म्हाताऱ्यानें गणपतरावाकडे धुंदीनें लाल झालेल्या डोळ्यांनीं पाहिल, आणि तो म्हणाला, ' होय होय. न्या, न्या, न्या, अशा या वृद्धापकाळीं माझ्या जवळून त्या पोराला : मला असें वाटलेंच होतें.' दारूनें धुंद झालेल्या त्या म्हाताऱ्याच्या चेहऱ्याकडे मोठ्या आश्चर्यानें पाहून गणपतराव म्हणाले, ' काय ! तुमच्यापासून मीं पोराला घेऊन जाईन असें तुमच्या मनांत नेहमीं येत असे नाहीं ? असें तुमच्या मनांत नेहमीं कां बरें येई तुकोजीराव ?'

आतां मघांपेक्षां बरीच धुंदी कमी झाली; व जरा शुद्धीवर आल्यासारखा होऊन तो म्हातारा म्हणाला, ' असें कां मनांत आलें म्हणतां होय ? कारण, मनांत आलें झालें एवढेंच.' (गणपतरावाच्या तोंडाकडे पाहून जरा थांबून पुन्हां) ' कारण मला वाटलें होतें कीं तुम्ही किंवा त्याचा बाप त्याला घेऊन जाल म्हणून.'

गणप०—मीं मागें येथें आलों तेव्हां नारायणराव चव्हाण चिंनाला गेलाम्हणून तुम्ही सांगितलेंत नाहीं ? आठवण आहे कां त्याची तुम्हाला तुकोजीराव ?

तुकोजी०—(डोकें खाजवीत, जरा गोंधळून होय. होय. तें खरं. परंतु तो परत आला असेल. आला नसेल म्हणतां ? त्याची वृत्ति फार चंचल त्या वेळेस झालेली होती तो एके ठिकाणीं फार दिवस राहिला नसेल. तो आला असेल परत.

हेंच वाक्य पुन्हां हळू हळू म्हणत त्यानें ओणवा होऊन कोंपऱ्यांतील चिलीम घेतली आणि जवळच एक पिशवी पडली होती तींतील तमाखू

काढून तो त्या चिलमींत घालूं लागला. चिलमींत तमाखु घालतांना त्यांचीं बोटें थरथर कांपत आहेत हें गणपतरावास स्पष्ट दिसलें. हात कांपूं लागला चिलमींत तमाखु भरतांना खालीं निम्याच्या वर सांडली, पण तसेंच कांपऱ्या कांपऱ्या, चिलमींत तमाखु भरून वर विस्तव ठेवण्याकरितां तो बाहेर येऊन चिलमविर विस्तव ठेवून तो ओढीत ओढीत पहिले ठिकाणीं जाऊन बसला. तो येऊन बसल्यावर, आपण आतां बोलणार याचा परिणाम; त्याच्यावर कसकसा होतो हें बारिक रीतीनें पहाण्याचा निश्चय करून गणपतराव झणाले, 'तुकोजीराव, नारायणराव चव्हाण चिनाला गेला नाहीं हें पक्कें ठाऊक आहे, एवढेंच नाहीं. यापेक्षांही कांहीं अधिक मला माहिती तुम्ही आहे. तो शिरोळाला कधीं आलाच नाहीं. आणि मागच्या ... .. च्या आठव्या तारखेस मी येथें आलों तेव्हां तो चिनाला गेला झणून तुम्ही मला खोटें सांगितलेंत तें केवळ तुह्मांला त्याच दिवशीं जी तारेनें बातमी आली त्यावरून सांगितलेंत. हें ऐकून ती घाणेरडी चिलीम त्या मळक्या छापीसह त्याच्या हातांतून एकदम गळून पडली. ती उचलून घेण्याचें झाताऱ्यास भान न राहून घाबरून कांपत कापत गणपतरावाकडे दीन मुद्रेनें तो पाहूं लागला.

झातारा आपल्याकडे पहात आहे असें पाहून गणपतराव झणाले, 'कोणाच्या तरी सांगण्यावरून तुह्मी खोटें बोललां. सांगितल्याप्रमाणें तुह्मी काम छान बजावलें. ... ... सात तारखेच्या पुढें नारायणरावाला तुह्मी येथें कधीं पाहिलें नाहीं, हें मीं खात्रीनें सांगतों. तुह्मांला वाटलें कीं ती तार आपण नाहींशी करून टाकिली, आतां कोण पहातो? तुह्मी ती नाहींशी केली खरी, पण माझ्याजवळ ती आहे.' आतां मात्र तुकोजीरावाची धुंदी पूर्णपणें उतरली. ते आतां चांगले शुद्धीवर आले आणि झणाले, 'हें काय माझ्या हातून झालें? हें काय झालें! अरेरे!! अरेरे!!!'

गणप०—गेल्या × × × महिन्याच्या सातव्या तारखेस बरोबर दोन वाजतां निहालगड प्रांतांत एके घरीं नारायणराव चव्हाण जिवंत आणि शाबूद असा दृष्टीस पडला.

या बोलण्यानें झाताऱ्याच्या चेहऱ्यांत काय फरक पडतो हें पहाण्याला गणपतराव थांबले. या शब्दानें झाताऱ्यांत कांहीं चलबिचल झाली नाहीं.

तों तसाच नखशिखान्त कांपत कांपत गणपतरावाकडे दीन मुद्रेनें पाहत मात्र होता.

गणप०—त्या दिवशीं दोन वाजतां माझा मित्र जीवंत शाबूद मीं सांगतों त्या घरीं—वर दृष्टीस पडला होता. त्या घटकेपासून या घेऊपर्यंत तो कोणाच्या दृष्टीस पडला असें मीं तर ऐकिलें नाहीं. मीं त्याच्याबद्दल इतकी कांहीं बारीक चौकशी केली आहे कीं तो जर जिवंत असता तर पत्ता अवश्य लागलाच पाहिजे होता. हें काम मीं फार शांतपणानें, आस्थापूर्वक केलें आहे आणि मोठ्या आशेनेंही पण केलें; आतां तो मेला अशी माझी पूर्ण खात्री झाली आहे.

या बोलण्यानें झाताऱ्याच्या चेहऱ्यांत अंतर पडेल एवढेंच गणपतरावाला वाटलें होतें. त्याच्या सर्वांगाला कांपरें सुटून घामानें अगदीं निथळून निघून तोंडांतून एक शब्दही निघणार नाहीं असा कांहीं त्याचा तर्क झाला नाहीं. हे शब्द ऐकिल्याबरोबर झताऱ्याची अशी स्थिति झाली. मग मोठ्या कष्टानें तो झणाला, 'नाहीं, कधीं नाहीं, नाहीं. कृपा करून असें झणूं नका. असें मनांत देखील, आणूं नका. अगदीं आणूं नका. माझे मनांत असें भरवून देऊं नका. माझ्या ध्यानीं मनीं देखील असें येत नाहीं. मेला नाहीं—मेला नाहीं, हें खास खात्रीनें सांगतों. तो मेला नाहीं.' एखाद्या वायु झालेल्या माणसाप्रमाणें तो हें बडबडला. त्यानें कपाळावर हात मारून घेऊन मागें भिंतीवर आपलें डोकें ठेविलें. त्याचे हातपाय कांपण्याचे आतां राहिले. त्यांत आतां शक्तीच राहिली नाहीं. ते अगदीं लुले पडले.

गणप०—(मोठ्या क्रूर मुद्रेनें) मला वाटतें नारायणराव निहालगड प्रांत सोडून गेलाच नाहीं आणि गेल्या × × × च्या सातव्या तारखेस त्याचा अंत झाला हें निश्चित.

तो झाताराा भिंतीवर डोकें ठेवूनच अजून तसाच बसला होता. तो एकदम उठून गणपतरावाच्या पायांपाशीं येऊन पडला आणि रडत रडत झणाला, 'नाहीं, गणपतराव खरोखरच तसें नाहींहो. तुम्ही विचार करून बोलत नाहीं. अहो गणपतराव, या तुमच्या बोलण्याचा अर्थ कायहो? तुम्ही विचार न करितां कांहीं तरी बोलतां.'

गणप०— तसें नाहीं, तुकोजीराव, मीं विचार करूनच बोलत आहें.

मीं काय बोलत आहें याचा अर्थ मला पूर्णपणें कळूनच बोलत आहें. आतां देवानेंच दया करावी!

मग मोठ्या कष्टानें उठून उभा राहून तो म्हातारा खोल स्वरानें म्हणाला, 'मीं हें काय करीत आहें? गणपतराव, दारू पिऊन बेसावध झालेल्या माणसाच्या घरीं येऊन त्याला धमकी देण्याला तुम्हांला कोणी अधिकार दिला आहे? तुम्हाला येथें येण्याला मुळींच अधिकार नाहीं. तुम्हीं माझ्या उंबऱ्यांत कोणाच्या परवानगीनें पाऊल टेविलें? अहो रावसाहेब, एखाद्या अंमलदाराला देखील जो--जो—जो.' तो बोलतानां अडखळूं लागला असें नाहीं. त्याचे ओंठ थरथर कांपूं लागले, त्यानें त्याच्या तोंडांतून असे तुटक नुटक शब्द पडूं लागले. 'एखादा अम्मलदार, मीं पुन्हा म्हणतों, एखादा अम्मलदार, जो चोराला, किंवा, किंवा एखाद्या, एखाद्याला धरावयाला येतो' तो ओंठाला ओलावा आणण्याकरितां त्यावर जीभ फिरवीत उगीच उभा राहिला, परंतु ओलावा कांहीं येईना. एखादा चोर किंवा खुनी—' एवढेंच तो मोठ्यानें बोलला; पुढें बोलवेना. नुस्ते ओंठ हालतेले मात्र गणपतरावाला दिसले, त्यावरून त्याचें काय म्हणणें आहे हें त्यास समजलें—' एखादा अम्मलदार जो त्या चोराला किंवा खुनी मनुष्याला तूं असें असें बोल म्हणून सक्त ताकीद देतो.' 'वकील साहेब, कायद्यांत—कायद्यांत संशयावरून पकडलेल्या आरोपावर कां—कांहीं—कांहीं द—दया करावी म्हणून आहे. परंतु रावसाहेब, तुम्ही—तुम्ही माझ्या घरीं आ—आला आ—आणि अशा—अशा वेळेला मीं—मीं—मीं बेसावध असतां तु—तुम्ही संधि सा—साधलीत म—मला धमकी दे—देता आ—आणि-तुम्हाला अधिकार नाहीं. हे—हे—' पुढें त्याला काय म्हणावयाचें होतें तें नसेंच अंगविक्षेप करण्यांत व गळा दाटून आल्यानें राहून गेलें. तो मटकन् खालीं बसला आणि रडूं लागला. ज्या घरांत नेहमीं दारिद्र्याची वस्ती असते तेथें असें रडणें भेकणें नेहमींच असतें. तुकोजीरावासारखा म्हातारा मनुष्य खालीं मान घालून मोठमोठ्यानें रडत आहे हें पाहून गणपतरावाला त्याची फार दया आली व ते आपल्याशींच म्हणाले, 'मला जर असें कळतें, तर मीं याला असें इतकें छळलें नसतें. असें छळलें नसतें तर बरें झालें असतें.' मग बराच वेळ विचार केल्यावर तो त्या म्हाताऱ्याला पुन्हां म्हणाला 'तुकोजीराव, मीं तुम्हाला, असें बोललों म्हणून

मला माफी करा असें मी म्हणत नाहीं. नारायणरावाच्या विचारानें माझें मन अगदीं उचंबळून गेलें होतें. माझे विचार भडभडून कधीं तरी बाहेर येणारच होते. मीं नाहीं. दुसरें कोणी तरी तुम्हांला सांगावयाला आलें असते. अशा कांहीं गोष्टी,—गणपतराव मध्येंच बोलूं कां नको असें मनांत येऊन थांबले. म्हाताऱ्याचें स्फुंदणें चाललेंच होतें; पण तें केव्हां फार मोठ्यानें व केव्हां फार हळू हळू. मध्येंच त्याला मोठा हुंदका दाटून येई न पुन्हां कमी येई, पण अगदींच नाहींसा होत नसे. 'अशा कांहीं गोष्टी या जगांत आहेत कीं त्या कधींच छापल्या जात नाहींत, असें जे शहाणे शहाणे म्हणतात तें अगदीं खरें आहे. त्यांचे तें पुस्तकी ज्ञान नव्हे. त्यांचें तें स्वानुभवजन्य ज्ञान होय. जर—जर माझा मित्र मेला असें मानून मीं स्वस्थ बसलों, तर ज्यानें कधीं नारायणराव चव्हाणाचें नांवही ऐकिलें नाहीं अशा एकाद्या परकीय गृहस्थाला कांहीं विलक्षण समापत्तीनें त्याच्या मरणाच्या कारणाचा पत्ता लागण्याचा संभव आहे. आज नाहीं उद्यां, उद्यां नाहीं परवां, परवां नाहीं दहा वर्षांनीं, दहा वर्षांनीं नाहीं, पुढल्या पिढीला. त्या वेळेला त्याचा खन करणारा देखील त्याच्याप्रमाणेंच मरून गेला असेल. माझे मनांत देखील आतां याची चौकशी पुरी करावी असें येतें, पण काय करूं ? हा विचार फार वेळ टिकत नाहीं. माझ्या मनावर माझा अम्मलच चालत नाहीं. काय करूं ? तुमचें कांहीं वाईट व्हावें असें माझ्या मनांत नाहीं. तुमचेंच काय पण दुसऱ्या कोणाचेंही वाईट व्हावें व त्याने संकटांत पडावें असें मीं अगदीं इच्छीत नाहीं. परंतु पूर्ण शोध मला केलाच पाहिजे मी आपलें काम सुरू ठेवणारच. याबद्दल तुम्हांला कोणाला कांहीं सूचना द्यावयाची असेल तर अवश्य द्या. मीं जो आतां तपास सुरू केला आहे व हळू हळू मला कांहीं पत्ता लागत चालला आहे त्यांत जर तुमच्या कळवळ्याचा कोणी सांपडत असेल, तर त्यास माझा तपास पुरा होण्याचे पूर्वीच कोठें तरी पळून जाण्याला सूचना द्या. माझा ज्यावर वहीम आहे, मग तो वहीम खरा किंवा खोटा असो, ती एक स्त्री आहे. मला खरें जर विचाराल तर तिला हा देश सोडून तोंड काळें करून कोठें तरी जाऊं द्या. तिनें आपल्या आप्त इष्टाला सर्वांना सोडून चालतें व्हावें हें चांगलें. उगीच त्यांच्या मोठ्या नांवाला तिनें काळोखी लावणें चांगलें नाहीं. तिनें एकदम निघून जावें हें फार उत्तम. आम्ही तिचा पाठलाग करणार नाहीं हें खास,

परंतु जर ती तुमच्या सूचनेप्रमाणें वागणार नाहीं, तुमच्याकडून होईल तितकें सांगू नही ती सध्यां आहे त्या डामडौलांत, मोठ्या घराण्यांत रहाण्याचा हट्ट धरील, तर तिला याद धरून रहा म्हणून सांगा; माझ्याशीं गांठ आहे. वेळ आली आणि माझ्या तडाक्यांत ती सांपडली, म्हणजे फार जड जाईल. मीं शपथपूर्वक सांगतों, मग माझ्याकडून दया म्हणून काडीमात्र होणार नाहीं. तिला धुळीलाच मिळवीन, सोडणार नाहीं.'

म्हाताऱ्यानें ह्याच वेळेला तेवढें वर पाहिलें, आणि खिशांतला मळकट फाटका रेशमी हातरुमाल काढून डोळे व घाम पुसून तो म्हणाला, 'गणपतराव, तुम्ही काय म्हणतां हें मला अगदीं कळत नाहीं तुमचा संशय काय आहे हें मला मुळींच उमजत नाहीं. नारायणराव मेला असें मला कांहीं वाटत नाहीं.' 'मला जर कोणी नारायणराव जिवंत आणून दाखवील, तरमग दुसरें तर काय पण आपल्या आयुष्यापैकीं दहा वर्षें देईन' असें गणपतराव मोठ्या दुःखी स्वरानें व निश्चयानें म्हणाले. 'तुकोजीराव तुमच्याबद्दल मला फार वाईट वाटतें. खरोखरच आपणां सर्वांवर असा प्रसंग आला म्हणून मला फार वाईट वाटतें.'

तुकोजी०—मला नाहीं वाटत नारायणराव मेला असेल म्हणून. मला नाहीं वाटत तें पोर मेलें असेल असें !!

नारायणराव चव्हाणाच्या मरणाच्या बातमीनेंच आपल्याला इतकें वाईट वाटलें असें दाखविण्याची त्या कपटी म्हाताऱ्यानें फार खटपट केली, परंतु ढोंग किती वेळ खपणार !

हात पाय, तोंड स्वच्छ धुऊन मुलाला घेऊन गिरिजाबाई इतक्यांत खोलींत आली य मोठ्या आश्चर्यानें तुकोजीरावाकडेपाहून ती म्हणाली—'आगबाई ! हें काय !! मला सोप्यावरच्च फुंदन ऐकूं आलें. काय झालें तरी काय ?'

बाळा मोठ्या प्रेमानें आपल्या आजोबाच्या अंगावर जाऊन पडला आणि गळ्याला एका हातानें मिठी घालून दुसऱ्या हातानें आपल्या आजोबाचे पाण्यानें डबडबलेले डोळे पुसतां पुसतां म्हणाला, 'आजोबा, रडूं नकाहो. असें कां करितां ? तुम्हांला यांनीं मारिलें होय ? (गणपतरावाकडे पाहून) माझ्या अजोबाला मारतां होय ? दम धरा गिरिआमावशीला सांगतों. अजोबा रडूं नका. हें घ्या माझें घडग्याळ तुम्हांला. हं चला

जाऊं आपण शेटजीच्या दुकानीं म्हणजे तो आपल्याला पैसे देईल. मग नाहींना रडणार ? (हाताला धरून ओढून) चला कीं हो आजोबा, रडूं नका. मग मी रडेन बरें. ' आमच्या लहान अज्ञान बाळानें खिशांतून घड्याळ काढून अजोबाच्या हातांत दिलें. हें घड्याळ म्हणजे आमच्या तुकोजीरावाचा परीसन. हेंत्र घड्याळ शेटजीकडे गहाण ठेवून किती वेळां तरी यांनीं आपली तलफ भागविली !

तो मुलगा आपल्या अजोबाला चला म्हणून ओढीत आहे' हें पाहून गणपतराव म्हणाले, 'अरे बाळा, तुझ्या आजोबाला आज घड्याळ नको. वरें कां बैस. उगीच.'

बाळा—(जरा लबाडीनें) मग ते रडतात कां ? जेव्हां त्यांना घड्याळ लागतें तेव्हां ते असेच रडतात आणि (आपण तशी नकल करून दाखवून) कपाळावर हात मारून घेतात आणि ती—ती गोरीपान बाई—ती बाई आजोबाला फार त्रास देते. आणि मीं घड्याळ दिलें म्हणजे अजोबा मला जवळ घेतात आणि ' माझ्या बाळ्या ' म्हणतात आन् मुका घेतात. नाहींहो आजोबा ? '

पोराच्या या बडबडीनें गणपतरावाला जरी त्रास झाला, तरी त्या म्हातान्याला जरा त्यापासून बरें वाटलें. तुकोजीरावांनीं या पोराची बडबड सर्व कांहीं ऐकिली नाहीं; ते कांहीं विचार करीत होते.

गिरिजा०—(गणपतरावाकडे पाहून) काय बाई झालं यांना असं रडाया. लई दुक आल्यावानी दिसतया. काय झालं व ?

गणप०—(तिच्या तोंडाकडे टक लावून पहात) त्यांचा जांवई मेला, गिरिजाबाई. यांची मुलगी गोदूबाई, म्हणजे आनंदीबाई—हें तिकडचं नांव—मेल्यावर दीड वर्षांनीं तो मेला. त्या गगनपुरास तिची छत्री बांधिली आहे ती.

गणपतराव अगदीं टक लावून जरी तिच्याकडे पहात होते, तरी तिच्या चेहऱ्यांत या योगानें मोठासा फरक झाल्याचें त्यांना दिसलें नाहीं. पण आतां कांहीं ती बोलणार, तों भीतीनें ओंठ सुकून गेल्यानें तिला बोलतां येईना, म्हणून ओंठाला ओलावा आणण्याकरितां तिनें जीभ त्यावरून फिरविल्याचें मात्र स्पष्ट त्यांचे दृष्टीस पडलें.

गिरिजा—काय, चव्हाण मेले ! अरेरे ! फार वाईट झालें. यांना म्हातारपर्णा लई दूक झाल आतां.

चव्हाण हीं अक्षरें ऐकतांच त्या मुलानें गणपतरावाकडे पाहिलें आणि म्हणाला, 'कोण हो ? चव्हाण माझें नांव आहे. कोण मेलें ? मेलें म्हणजे देवाचे घरीं गेले होय; परवां माझा गोपू असाच मेला. पण अजोबा म्हणाले तो देवाच्या घरीं गेला. नाहींहो अजोबा ? '

गणप०—कोण नाहीं. तो दुसरा चव्हाण. (तुकोजीरावास उद्देशून) मग मीं मुलाला घेऊन जाऊं तर ? हरकत नाहीं ना तुकोजीराव ?

या वेळेला म्हाताऱ्याचें मन शांत झालें होतें. पुन्हां नातवं भोंवतीं म्हणून चिमणी भरून वर विस्तव ठेवण्याच्या विचारांत ते होते.

गणप०—(पुन्हां) मग कांहीं हरकत नाहींना ?

तुकोजी०—नाहीं रावसाहेब, आमची कसली गरीबाची हरकत ? तुम्ही त्याचे कायद्यानें पालक आहां आणि त्याला नेण्याला तुम्हांला सर्व प्रकारें अधिकार आहे. माझ्या या म्हातारपणीं ती माझी अंधळ्याची काठी होती. बरें बाबा, न्या. माझ्या गरिबांच्या हातून काय होणार आहे ? तुम्ही नव्या चालीचे लोक. तुमच्या रीतीप्रमाणें मीं त्याला शाळेंत घालण्याची किंवा कपडालत्ता चांगला देण्याची काळजी घेतली नाहीं, हें खरें असेल. आतां याच्या बापाचा पैसा पुष्कळ, यानें कपडे चांगले असावे, हें सर्व खरें. परंतु माझ्या ऐपतीप्रमाणें मीं केलें आहे. एक मिनिटभर देखील त्याला मीं विसंबलों नाहीं; त्याला मीं आपल्या जिवाच्या पलीकडे संभाळलें, हें अगदीं खरें आहे. फार काय सांगूं, नुसतें त्याला 'अरे' असें देखील झटलें नाहीं. तुम्ही आठ दिवस राहून पाहिल असतें म्हणजे सर्व कळलें असतें.

आपला आजोबा असें डोळ्यांत पाणी आणून बोलत आहे, हें पाहून तो मुलगा गळा काढून रडूं लागला व 'मीं नाहीं जात यांचेबरोबर,' असें म्हणाला.

गणप०—(जरा दुःखी स्वरानें) तुकोजीराव; काल रात्रीं इकडे येण्याचा मी बेत केला, तेव्हां ही गोष्ट अशा थराला येईल असें मला किंचितही वाटलें नव्हतें. परंतु आतां काय त्याचें ? माझें कर्त्तव्यकर्म मला केलें पाहिजे. मीं या पोराला दुसरीकडे कोठें नेत नाहीं. येथेंच सरकारी बोर्डिंग शाळेंत ठेवितों. तेथें जेवणाखाणाची, कपडेलत्त्याची, संभाळण्याची व शिक-

विण्याची व्यवस्था आहे. सर्व कांहीं यथास्थित होतें. तुम्हांलाही वरचेवर भेटतां येईल. आपण महिन्याचे महिन्यास फी दिली म्हणजे झालें. आतां तुमच्या मनांत येत असेल कीं मीं याला घेऊन जाऊन याच्याकडून हरतऱ्हेनें तुमच्या गुप्त गोष्टी काढून घेईन म्हणून. तर तुम्हीं अगदीं गांठ बांधून ठेवा कीं, मीं या बाबतींत या लहान बाळाला चकार शब्द सुद्धां विचारणार नाहीं. मीं कांहीं गुप्त पोलिस नाहीं. आणि मला वाटतें कीं गुप्त पोलिस देखील अशा लहान मुलाचा कधींच उपयोग करून घेत नसेल.

तुकोजीरावांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. चिलीम ओढीत ते स्वस्थ बसले. मग थोडें थांबून ते म्हणाले, 'गिरिजाबाई, त्याला कपडे घाला. तो यांच्या बरोबर आतां जात आहे. त्याचें जें काय खेळण्याचें सामान आहे, त्याचें एक गाठोडें बांधून द्या.'

गिरिजा—(मोठ्या तिरस्कारानें गणपतरावाकडे हात करून) अशा माणसाच्या हातून कां कोणें पोर संभाळणें होतें ? काय बाई ! नाहीं तेंच यांचें एक ! हें काय, असे बाप्ये जर पोरें संभाळूं लागले तर मग आम्ही बायका कशाला ! यांच्यान कांहीं संभाळणें होणार नाहीं. तुम्ही कांहींही म्हणा.

तुकोजी०—(तिच्याकडे रागीट मुद्रेनें पाहून) हं पुरे. ते हुशार आहेत. जा, सर्व तयारी कर जा. मला काय आतां या जगांत कितीसे दिवस रहावयाचें आहे ? त्यांचे ते पोराची काळजी घेतात, ठीक आहे. असें बोलतांना म्हाताऱ्याच्या डोळ्यांला खळकन पाणी आलें. गिरिजाबाई मुलाला घेऊन आंत गेल्यावर तो म्हातारा गणपतरावाला म्हणाला, 'आहो, तुमच्या मित्राला मीं कधीं दुखविलें नाहीं. निदा त्याचे कांहीं वाईट व्हावें असें माझ्या मनांत देखील आलें नाहीं व येणारही नाहीं. असा जांवई मला कधीं मिळावयाचा नाहीं. पोटचें पोर काय मजवर माया करणार ! त्यापेक्षांही त्यांचें प्रेम मजवर अधिक! त्यांचा पैसा नीं—मीं खर्च केला. खरें. परंतु आतां मला त्याबद्दल फार वाईट वाटतें. तो भेला असें तुम्ही म्हणतां, पण माझा नाहीं त्यावर भरंवसा बसत. अहो, तो असा कसा मरेल ?

हें सर्व बोलेपर्यंत यांच्या डोळ्यांला पाण्याची धार लागली होती. यावर गणपतरावांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. ते उगीच दाराकडे पहात बसले,

गिरिजाबाई मुलाला कपडे घालून घेऊन आली. गणपतरावांनीं त्या मुलाचा हात धरला आणि 'आजोबाच्या पायां पड' असें म्हणाले. मुलगा पायां पडल्यावर म्हाताऱ्यानें चिरंजीव म्हणून अशीर्वाद दिला व 'बाळा, जातोस?' एवढेंच तो म्हणाला. पुढें त्याच्यानें बोलवेना. त्याचा गळा दाटून आला. डोळे पाण्यांनीं भरले. मुलाचा मुका घेतला व रडत रडत 'ये बरें बाळा. नीट शीक बरें असें तो पुन्हां म्हणाला.

'अजोबा, रडतां कां? मीं शाळेला जातें. मग मीं मोठा झालों म्हणजे तुमच्यासारखा शहाणा होऊन तुम्हांला व गिरजामावशीला भेटावयाला येईन अं!' असें तें पोर म्हणालें.

तुकोजी०— (रडत रडत) होय बाबा. गणपतराव, न्या त्याला. मजें आंज काळीज तापविलेल्या सांडसानें ओढून नेत आहां! माझी अंधळ्याची काठी तुम्ही हिरावून नेत आहां!

बाल्यावस्थेंतील अज्ञान किती तरी मोहक व मोहक असतें! आपला आजा इतका रडतो, तें कां हें मुलाच्या मनांत तरी आलें काय? त्याच्या मनांत एकच आनंद! आतां आपण शाळेला जाणार हाच आनंद! लहानपणाच्या अज्ञानांत व मोठेपणाच्या अज्ञानांत केवढें तरी अंतर!! लहानपणाच्या अज्ञानानें परकीयास मोठा आनंद होतो व मोठेपणाच्या अज्ञानानें सर्वांस महत् दुःख होतें. गणपतरावांचा हात धरून 'शाळेला जातो' म्हणून म्हणत उड्या मारीत बाळा त्यांच्या बरोबर निघाला.

गणपतराव त्या मुलाला घेऊन आपल्या एका स्नेह्याच्या घरीं आले. हा स्नेही वकील होता. हे रत्नागिरीकडचे रहाणारे कोंकणस्थ ब्राह्मण. हवा पालटायाला म्हणून आले तों देशावरचा गांव चांगला, दोन पैसेही मिळतात, असें वाटून त्यांनीं आपले पाय येथेंच रोंवले होते. कोंकणची मंडळी देशावर आल्यावर पुन्हां कधीं परत गेली आहे काय!! येथें हरबऱ्याची डाळ, भुईमुगाच्या शेंगा इत्यादि अनेक पौष्टिक पदार्थ खाण्याचे सोडून त्या भिकार कोंकणांत तो भात आणि कोकंबाचें सार किंवा फार झालें तर ताक व अळवाची भाजी खाण्याला कां जातील! हे वकील सध्यां सडेच होते. त्यांनीं आपली 'मंडळी' अजून 'विलायतेहून' आणिली नव्हती. स्वयंपाकाला एक देशावरचा उत्तम स्वयंपाकी ठेविला होता.

रीतिप्रमाणें नमस्कारचमत्कारादि कशलवर्त्तविधि उरकल्यावर गण-

पतरावांनीं बरोबर आणलेल्या मुलाची थोडक हकीकत आपल्या व कील मित्राला सांगितली.

आमच्या ह्या तरुण गणपतराव वकीलाना अशा लहान मुलाला खायाला काय द्यावें, जेवायाला काय काय घालावें लागतें, व एकंदरींत लहान मुलाची व्यवस्था कशी ठेवावी, हें काय माहीत ? हें सडे फटिंग नेहमीं चैनींत रहाणारे. त्यांना ती मुलाची घिस घिस काय सोसते ! परंतु करतात काय ? प्रसंग तर येऊन पडला ! मग आतां पोराला खायाला काय द्यावें या पंचायतींत ते पडले. पंचवीस वर्षांपूर्वीची आपल्या लहानपणची स्थिति मनांत आणून आपली मामी त्या वेळेला काय काय खायाला घालीत असे याची ते आठवण करूं लागले. बराच वेळ आठवण करण्यांत गेल्यावर त्यांना आठवण झाली कीं, सकाळीं सात आठ वाजण्याचे सुमारास उन्हून तूप भात व तोंडीं लावण्याला मेतकूट ती घालीत असे. केव्हां केव्हां दूधभाकरीचा काला करून देई. पुढें दोन प्रहरीं ती जेवायाला काय घाली याची त्यांना आठवणच होईना. पुष्कळ वेळ खटपट केली पण व्यर्थ. त्यांना एकदां वाटे आपण आपल्या मामाघरोघरच जेवीत असूं, एकदां वाटे आपण व आपली बहीण मिळून निराळेच जेवीत असूं; पक्कें काय तें लक्षांत येईना. मग अशा स्थितींत बराच वेळ गेल्यावर त्यांनीं त्या मुलाला विचारिलें, 'अरे बाळा, तुला भूक लागली कां, कांहीं खातोस कां ?' मुलानें होय म्हणून उत्तर दिलें. ' मग सांगूं तर भात करावयाला ? ' ' छे, मी नाहीं आतां भात खात. अजोबा ह्या वेळेला मला चुरमा किंवा खीर करून खायाला देतात व पापड तोंडीं लाव म्हणतात. मीं सकाळीं भात खाल्ला. आतां नको मला तो. खीर करून घाला, ' असें तें पोर गणपतरावांला मोठ्या लडिवाळपणानें म्हणालें. 'अरे हा तर निव्वळ सरदारघा मुलगा बनला आहे. ह्याला तर रोज त्या पटवर्धनांसारखी तूपसाखर खाण्याची संवय लागली आहे! ह्यातारा इतका भिकारी झाला तरी या पोराला खायाला चांगलें घाली असें दिसतें. हें मोठें कठिण दिसतें बोवा! ' असें मनांतल्या मनांत म्हणत गणपतराव मिशाला पीळ घालीत घालीत त्या मुलाकडे पाहूं लागले, व तसेंच पुन्हा त्या मुलाला ते म्हणाले, 'तूप भात व मेतकूट तोंडीं लावायाला घातल्यावर जेवशीलना' ? हें गणपतरावांचें बोलणें ऐकून तें पोर मोठ्यानें हंसले आणि 'अजोबांनीं हें मला सकाळींच घातलें. आतां मला खीरन् पापड पाहिजे असें म्हणालें. '

गणपतरावांला हें मोठेंच गूढ येऊन पडलें. आतां ह्या पोराला काय घालावें, याची त्यांना मोठी पंचाईत पडली. अखेर मुलाची समजूत कशी तरी केली पाहिजे असें मनांत आणून, 'बरं, चुरमा खा आज अं, उद्यां खीर घालीन बरं बाळा,' असें ते त्याला म्हणाले. मुलानें हूं म्हटल्यावर त्यांनीं आपल्या मित्राच्या स्वयंपाक्याकडून चुरमा करून त्याला जेवायला घातलें, आणि, 'येथेंच खेळ. मीं बाहेर जाऊन येतों व मग तुला शाळेला नेतों अं,' असें मुलाला सांगून बोर्डिंग स्कूलाकडे गेले. तेथें मास्तराबरोबर सर्व उरक करून फी देऊन त्याला त्यांनीं सांगितलें, 'मुलाच्या जेवण्याकडे नीट लक्ष ठेवा. माझ्या परवानगी वांचून कोणाला येऊं देऊं नका. नीट काळजीनें शिकवा,' इत्यादि जरूरीच्या सूचना करून ते परत आले. परत आल्यावर मुलाला हांक मारून 'चल बाळा, शाळेला येतोस ना?' असें म्हणून त्याचा हात धरून ते शाळेकडे निघाले. वाटेंत त्या मुलानें त्यांना नानातऱ्हेचे प्रश्न विचारिले. त्याची ती गडबड पाहून, त्याचें तें गोड बोलणें ऐकून यांना फार समाधान वाटलें. शिशुलीला पाहून आनंद वाटणार नाहीं असा भरसिक शून्यहृदय या जगांत कोण आहे बरें ? या मुलाच्या प्रश्नाचें कौतुक वाटून त्यांना फार हसूं आलें. तें पोर मध्येंच म्हणालें, 'मग मला नवा अंगरखा घाल ना ? ती गिरिजामावशी हें फाटकेंच ठिगळ लावून देते. नवा देतच नाहीं. मग मी हा अंगरखा त्या जगूला देईन. देऊं काहो ?'

हें ऐकून ते पुन्हा हंसले आणि 'जगू कोणरे !' म्हणून म्हणाले.

जगू होय ? तो आमच्या चंद्राचा धाकटा मुलगा. तो फार गरीब आहे. आमची चंद्रासुद्धां फार गरीब होती. परंतु ती—

इतक्यांत ते शाळेच्या दारापाशीं येऊन पोहोंचले व तीं मुलें व त्यांचा तो गोंगाट पाहून आमचा बाळा बोलतां बोलतां मध्येंच थांबला तो थांबलाच. पुन्हा गणपतरावाला त्या चंद्राची हकीकत ऐकायाला मिळाली नाहीं.

भाग २३ वा.

हैबतराव चव्हाण गारगोटीस नेहमीं रहात. या गांवांत यांना पोटापुरती बतनवाडी असून गांवांत खाऊन पिऊन सुखी अशा चार संभावित लोकांत हे मोडत. हे गृहस्थ अगदीं जुन्या चालीचे होते. सध्यां नवीन तऱ्हेच्या मराठे मंडळींना तुमचे वडील अशा तऱ्हेचे होते असें जर कोणाच्या मनांत दखविण्याचें आलें, तर आमचे हैबतराव चव्हाणास दाखविलें असतां र काम होणार. त्यांचा बाणा अगदीं जुन्या चालीचा. नव्या चालीचा अम्मल मा- काडीमात्र देखील त्यांच्यावर झाला नाहीं. मांडचोळण्याखेरीज दुसऱ्या ल तऱ्हेची इजार यांना कधींच माहिती नाहीं. ते अंगांत नेहमीं एक खादीची बंडी घालीत. व कधीं स्वारीला, शिकारीला जाण्याचा प्रसंग आला तर (तो तर आतां नाहींच झणा) किंवा कधीं सणावारीं, किंवा कधीं करवीरीं महाराजांला ' मुजरा ' करावयाला गेले तर तो रूमरी शिपाईबाण्याचा पायघोळ अंगरखा घालीत. डोकीला पिळदार शिंदेशाई नमुन्यावर बांधलेलें पागोटें नेहमीं असे. दांड, पट्टा, बोथाटी, इत्यादि जुन्या मर्दुमकीच्या खेळांत हे मोठे पटाईत होते. अलीकडची बंदुकीची शिकार यांना मुळींच आवडत नसे. अमका एक सरदार गोळी फार नेमकी मारितो, रोज शिकार केल्याखेरीज अन्नास शिवत नाहीं, असें जर कोणी यांना सांगितलें, तर ते लागलेंच मोठ्या डौलानें व गर्वानें झणत, ' काय सांगता राव, ही खोंकडं कसचीं शिकार करत्यात ! बंदुकीनें हे चिमण्या कावळ मारत्यात झाल. नंगी तरवार हातांत घेऊन वाघाच्या मानगुटीवर नेऊन ठेवावी लागती ! ! नाहीं तर शत्रूंच्या छाताडावर पाय देवून गरदन उडवावी लागती !! ह्यांव न्हाई वाटत ? गोळीचा न्योम धराया येईना आन् बंदूक मारत्याती. अव हे चिमण्या कावळ्यांच काळ. आन् शत्रु पाहिला की घातलच शेंपूट.' या गृहस्थाची पन्नाशी उलटून गेली होती. हा मोठा उंच, सडक, पिळदार, दुहेरी हाडाचा असा होता. यांचा चेहरा फार उग्र होता. पाहिल्याबरोबर एखाद्याला भीति वाटावी. त्या पांढऱ्या सफेत मिशा फार भपकेदार व पिळदार होत्या. यांचे डोळे मोठे असून सदा गुंजेसारखे तांबडे लाल असत. डोक्याला बरेंच मोठें टक्कल पडलें होतें. दोन्हीकडे कानांवर असलेलीं पांढरीं

झुलपें पीळ घालून नेहमीं नीट नेटकीं डेविलीं असत.यांचें बोलणें मोठें कठोर असे. नेहमीं पहांटे स्नान करून, पार्थिवपूजा करून, तिबोटी अडवा पांढरा सफेत चंदनाचा नाम लावून, मग हे बाहेर पडत. हा मोठा सदाचरणी असे, अगदीं एक धोरणी; लांडी लबाडी कांहीं खपावयाची नाहीं. मोठा सरळ मार्गी मनुष्य; अलीकडच्या लोकांत विरळा. याच्या चालवलणुकींत न्यून्य काढूं म्हटलें तर काडीमात्र सांपडणें नाहीं, पण स्वभावानें फारच नेटी. एकदां कांहीं डोक्यांत शिरलें कीं तेंच खरें. कधीं कोणाचें ऐकावयाचा नाहीं, कधीं कोणाच्या पंचाइतींत पडावयाचा नाहीं. आपली शेतनीडी बरी कीं आपण बरा. त्यानें आपल्या मुलाचा त्याग केला त्याचें नीटि कारण हेंच. तो नेहमीं म्हणे, 'तें गाढव पोर माझ्या मर्जीविरुद्ध मागलें. बरें तें असो, पण आपल्या कुळाला बट्टा लावला.--असला मुलगा असलान् नसला सरखाच.' त्याला आपल्या मोठेपणाचा फार अभिमान. त्याच्या इतका अभिमानी गृहस्थ दुसरा सांपडणें कठीण न; अभिमानानें नेहमीं भरलेला. आपल्या मुलानें शिंद्याच्या पोरीचरोबर लग्न केलें, हें फार वाईट, अतें वाटण्याला तरी कारण हेंच. अशा मनुष्याच्या अंगीं अभिमान व हट्टीपणा असा असावा हें मोठें नवलच! ज्यांनीं त्यांनीं 'हे फार चमत्कारिक आहेत' असें म्हणण्याला तरी कारण हा अभिमान व हट्टीपणाच. आम्हांला वाटतें कीं ज्यानें अभिमानाला पडून आपल्या पोटच्या पोराचा वध करण्यास हुकूम दिला, व तो हुकूम सर्व जनलोकांनीं मंजूर केला, त्या ज्युनिअस ब्रूटसनें आपल्या अंगाचा तिरस्कारार्ह अभिमान आमच्या हैबतरावाला दिला. आपल्या पोराबद्दल त्यांना किती वाईट वाटत असेल, हें एक सर्वसाक्षी ईश्वरासच माहीत! चार चौघांत नांव निघण्याचें काम मोठें कठीण आहे. चांगल्या गोष्टीवरून जसें नांव निघतें, तसें वाईट गोष्टीवरूनही निघतें. तसेंच आमच्या हैबतरावाचें होतें. ते आपल्या हट्टी स्वभावाबद्दल व वृथाभिमानाबद्दल प्रसिद्ध होते. "मी जर त्यांना पत्र पाठविलें, तर ते पहिल्यानें तें वाचतील, मग त्याची खुरळीच करतील आणि घरांतल्या प्रत्येकाला हाक मारितील, तें पत्र दाखवितील, 'हें पहा पत्र आमच्या चिरंजीवाचें. अशानें कां मी वळतों?' एकदां जें त्यांच्या मनांत आलें तें ब्रह्मदेवाच्यानें फिरवणार नाहीं. त्यांच्या जवळ अपराधाला क्षमा म्हणून मुळींच नाहीं. उगीच पुन्हा पत्र पाठविण्यांत कांहीं अर्थ नाहीं!" असें

जेव्हां जेव्हां नारायणरावाची प्रिय पत्नी वडिलाला पत्र पाठवा, ते मदत करतील म्हणून आग्रह करीत होती, तेव्हां तेव्हां नारायणराव आपल्या लाडकीला उत्तर देत होते. त्याना आपल्या बापाचा स्वभाव पूर्ण माहीत होता.

गणपतराव पहांटेच्या गाडीनें शिरोळाहून गारगोटीला जाण्याला निघाले. साडेअकरा वाजण्याचे सुमारास कापशी स्टेशनावर उतरले. गारगोटीला जाण्याचें स्टेशन हेंच. येथून गारगोटी अजमासें दहा मैल आहे. तांगे वगैरे पुष्कळ मिळतात. स्टेशनावर उपहारगृहामध्यें कांहीं उपहार करून तांग्यांत बसून गणपतराव पुढें निघाले. एक वाजण्याचे सुमारास गारगोटीस जाऊन हैबतरावाच्या घराचा शोध करीत करीत त्यांच्या घरापुढें जाऊन उभे राहिले. हैबतरावाच्या घराचें पुढचें दार या वेळेला बंद होतें. गणपतराव 'दार उघडा हा' म्हणून मोठ्यानें दाराशीं ओरडले. यांचा अवाज ऐकल्याबरोबर आंतून एक चाकर आला व त्यानें दार उघडलें. 'हैबतराव चव्हाण आहेत कां?' म्हणून गणपतरावांनीं विचारल्यावरून चाकरानें 'व्हय, हायत आंत, ताटाला गेल्यातीं.' या बसा सोप्याला,' असें सांगितलें. 'आपल्याला भेटायाला कोणी आलें आहे, असें जाऊन त्यांना कळीव' असें गणपतरावांनीं सांगितल्यावरून चाकर आंत गेला व लागलींच परत येऊन गणपतरावाला म्हणाला कीं, 'अस या वाटन आंत या.' 'माझी ही ताटाची वेळ हें समद्या गारगुटीला ठाव हाय, आन् मग कोन आल' 'असें ते म्हणाले.'

'अरे मी गारगोटीचा रहाणारा नव्हे,' एवढेंच गणपतराव म्हणाले व त्या गडग्याच्या मागून आंत गेले.

आंत मागें टेंकावयाला एक पाट ठेवून पाटावर हैबतरावांची स्वारी भोजनाला बसली होती. तेथें पलीकडेच एक सतरा अठरा वर्षांच्या वयाची तरुण स्त्री चोळी शिवीत बसली होती. गणपतरावांना पाहिल्याबरोबर हैबतराव त्यांना 'या बसा' म्हणाले. हैबतरावाला पाहून हे नारायणरावाचे वडील असें गणपतरावाच्या मनांत मुळींच आलें नाहीं. पिता पुत्रांत साम्यता अगदींच नव्हती. पण त्या तरुण स्त्रीकडे पाहिल्याबरोबर ही नारायणरावाचीच बहीण असावी असें गणपतरावाच्या चट्कन लक्षांत आलें. बहीणभावांत फारच मोठी साम्यता होती.

ती स्त्री गणपतरावांना पाहिल्याबरोबर तशीच चोळी शिवतां शिवतां तेथेंच टाकून मर्यादेनें आंत निघाली.

'वैस कमळे, तुला काय पोरीला' असें हैबतराव आपल्या नेहमींच्या कठोर स्वरानें तिला म्हणाले. ती तशीच पुढें जात आहे व गणपतराव तिच्याकडे पहात नाहींत असें पाहून 'वैस म्हणतो तर ! तुला काय ? ही आपली चोळीन् ती सांगशी घेऊन जा पाहिजेचतर, ' असें हैबतराव म्हणाले.

बापाचे हे शब्द ऐकून कमळा जरा लाजली व मर्यादेनें खालीं बसून दोऱ्याची गुंडाळी करूं लागली.

पेल्यांतल्या पाण्याचा घोंट घेऊन ढेंकर देऊन गणपतरावांकडे आपण कोण, कोठून आलां, हें जाणण्याचे हेतूनें पाहून 'करवीराहून येन झालं वाटतं' असें मोघमांत हैबतराव म्हणाले.

गणप०—होय, शिरोळाहून आलों. आपले चिरंजीव नारायणराव यांचा स्नेही गणपतराव वकील जो तोच मीं.

वाढावयाला आलेला स्वयंपाकी यजमानाकडे पहात उभा राहिला होता; त्याजकडे पाहून हैबतराव म्हणाले, ' अरे गोंद्या, तूं कां उभा राहिलास ? थोडी रोटी मला आन कीं. हे जेवून आल्यावानी दिसत्याती, त्ये आतां नाहीं खायाचें कांहीं. (गणपतरावाकडे पाहून) नव्ह का ? नसल तर उठा सांबर भात खा, अनमान नका करूं. '

गणपतरावांनीं स्टेशनावर थोडा उपहार केला असल्यानें आतां यांना चांगली सडकून भूक लागली होती, तरी त्यांच्या बोलण्याचा असा हा रोंख पाहून 'नको, आतां जेवून आलों ' असें म्हणणें त्यांना भाग पडलें.

हैबतरावांचें जेवण आटपत आलें होतें. त्यांचें जेवण झालें ते हात धुवून येऊन तेथेंच एका पाटावर मोठ्या आढ्यतेनें बसले व ' शिद्या, चिलीम आन्. कमळा तें पानदान इकडे घे, गणपतरावांला इडा खाऊं दे, ' असें मोठ्यानें आपल्या चाकराला व लेकीला म्हणाले.

आतां बोलण्याला कांहीं हरकत नाहीं, असें पाहून गणपतराव म्हणाले, ' हैबतराव, कांहीं दिवसांपूर्वी मी आपल्याला पत्र पाठविलें होतें. '

हैबतरावांनीं ' हूं ' म्हणून मान हालविली. आपल्या नाहींशा झालेल्या मुलाबद्दल कांहीं बोलावयाला हे आले आहेत. असें त्यांनीं चटकन ताडलें

आतां मुलाच्या चौकशीस प्रारंभ झाला झणावयाचा ! आमचे ' ज्यूनिअस ब्रूटस ' आतां न्याय करण्यास बसले खरे ! !

हैबत०—होय, तुमचें पत्र आलें खरें, आन् मींबी त्याचें उत्तर घातलें. मला लई पत्रं येत्याती. त्यांत्रें उत्तर मीं लागलीच घालतों. आकशी अवकाश करीत न्हाई.

गणप०—मो तें तुमच्या चिरंजीवांबद्दलचं पाठविलें होतें. त्याची हकीकत लिहिली होती.

ती तरुण स्त्री बसली होती तेथें कांहीं खसबस आवाज झाल्याबरोबर गणपतरावांनीं तिच्याकडे पाहिलें; परंतु तिच्यांत कांहीं हालचाल झाल्याचें त्यांचे दृष्टीस पडलें नाहीं. ती चोळी शिवण्याची सोडून स्वस्थ खालीं पाहत बसली होती.

' ती नारायणरावासारखीच जरी आहे, तरी तिचें काळीज तिच्या बापाप्रमाणें दगडासारखें काडिप आहे,' असें गणपतराव आपल्या मनांतल्या मनांत झणाले.

हैबत०—व्हय. मला येक मुलगा व्हता खरा. त्याच्याकरितां तुम्ही पत्र पाठविलें होतें हेंबी खरें. गणपतराव, तुमच्या धेनामंदी अतूं द्या कीं, मला आतां मुलगा झनून कुनी नाहीं.

गणप०—आपण कांहीं हें मला सांगणें नको; हें मला पक्कें ठाऊक आहे, तुह्मांला आतां मुलगा नाहीं. हें झणण्याचें माझ्या नशिबीं आलें खरें. तो मेला अशी माझी देखील आतां खात्री झाली आहे.

गणपतरावाच्या ह्या भाषणानें हैबतरावावर कांहीं विशेष परिणाम झाला नाहीं. त्यांनीं जरा भिंवया वर चढविल्या व ' हें मीं भाऊीतच केलें होतें ! ! ' असें झणून सुस्कारा टाकून कपाळाला हात लावला.

हैबत०—(बराच वेळ विचार केल्यावर) नाहीं, तसें नाहीं खास. कांहीं झालं नाहीं हें खास.

गणप०—गेल्या ..... त तो मेला असावा, असें मला वाटतें.

ती तरुण स्त्री, जिला कमळा झणून हांक मारीत, ती त्या चोळीची घडी घालून ती मांडिवर ठेवून जरा पाठमोरी बसली होती, ती तशीच. ती गहूंभर देखील हालली नाहीं. गणपतराव आपल्या भावाच्या मरणाची बातमी सांगत होता. ती ती स्वस्थपणें ऐकत होती. या बातमीनें तिच्या चेहऱ्यांत

कांहीं बदल झाला किंवा नाहीं हें, ती पाठमोरी बसल्यानें, नीटसें गणपतरावांस दिसलें नाहीं.

हैबत०—नाहीं गणपतराव, तस अगदीं नाहीं बगा. तुम्ही भरमांस आहां.

गणप०—नारायणराव गेला, असें मीं ह्मणतों, हें खोटें कां?

हैबत०—(शहाणपणाचा तोरा दाखविण्याच्या हेतूनें मोठ्यानें हंसून) खरोखरच नाहीं रावसाहेब. यांत मोठी लबाडी हाय. गणपतराव, तुमच्या ध्यानामंदी न्हाई यायाचें हें. तुम्ही अलीकडच शान आसच बगा. आतां, लपून बसण्याची युगत त्यानें चांगली काढलीया. पन राव, अशी युगत करून हा हैबतराव (छा.ला हात लावून) फसत नसतो बरें कां? हें बगा, माझें जरा वायच ऐकून घ्या. तुमच्यापक्षीं मला थोडी तरी अक्कल जास्ती हाय. मी तुमची समजूत घालतों बगा. तो मेला नाहीं, ही अगदीं गाढ बांधून देतो. आपून नाहींस झाला ह्मणून बातमी उठवावी, आन् मग मी काळजी करावी, भ्याव, आन् त्याला घरांत ये म्हनाव, ह्मणून आस केल हाय! आन् त्या बटकीच्या पोरीला घेऊन घरांत ये म्हन्हू व्हय? मी चव्हाणाच्या पोटचा हाय. अस्सल मराठा! पोर नसलं तर नसलं. मला झालंच नाहीं ह्मनीन झालं. पन मीं जात नाहीं बाटविनार! मीं घरांत घ्यावा ह्मनून त्यानं ही युगत काढलीया तुम्हाला कळलना. तुम्ही कागद वाचतां आन् मोठमोठ्या साहेबापाशीं आंग्रजी बोलता, आन् हें कसं कळना व्ह!! काय बी होऊ, मीं नाहीं त्याला घरांत घेनार! दुसर कांहीं नाहीं. त्यानं आतां यां आन कांहीं तरी रोजगार करून पोट भरून रहावें हें चांगल बगा, गणपतराव.

गणप०—तर मग तो मुद्दाम छपून राहिला आहे, असें आपण ह्मणतां? मुद्दाम—

हैबत०—(मध्येंच) होय, मुद्दाम मला फसवावं ह्मणूनशानी.

एकदां हैबतरावाच्या मनांत आलें तेंच खरें. लोकांनीं कितीही समजून सांगितलं तरी तें खोटें. आपला विचार तो खरा! अशा स्वभावाला काय औषध आहे?

हैबत०—(पुन्हां) होय मुद्दाम मला फसवावं ह्मनूनच छपून राहिला हाय. आन् माझा सभाव त्याला माहीत नाहीं व्हय? अशा गोष्टीनं

माझ मन वळत नसतं, हें त्याला जाव नाहीं व्हय ? उगीच येडचान असल सोंग केलं. मीं घाबराव झनून लपून बसला. आन् अशान मीं वठनी येत नाहीं अशी खात्री झाली झणजे इळूच येईल वगा. तुमीच बगाल. आन् मग मीं त्याला क्षमा करीन. खरंच करीन गनपतराव. "मला फसवावं झनून तूं लई खटपट केलीस पन मीं फसलों नाहीं. मीं घाबराव म्हनून तूं असं केलस पन मीं तशानं घाबरणार नाहीं." अस म्हणीन व कांहीं पोटापुरतें देईन त्याला मग.

हें मोठ्या गंभीर विचाराचें भाषण ऐकून गणपतरावांनीं मोठा हुस्कारा टाकिला. मोठ्या दुःखानें ते झणाले 'ईश्वर करो आणि त्याला माफी करण्याची वेळ लवकर येवो. हें आपलें भाषण ऐकावयाला आपले चिरंजीव जर येथें असते तर फार बरें झालें असतें ! आपण त्याला क्षमा करण्याला तयार आहां, हें ऐकून मला फार आनंद होत आहे. परंतु आतां या जगांत तो कांहीं पुन्हां दृष्टीस पडणार नाहीं. या विषयावर मला पुष्कळ आपल्याला सांगावयाचें आहे. (त्या पाठमोऱ्या बसलेल्या तरुण स्त्रीकडे पाहून) पण मीं आपल्याला एवढेंच सांगतों—'

हैबत०—या विषयावर माझ झणन काय हाय तें ह्या पोरीला सर्व माहीत आहे. काय हरकत नाहीं. आपून खुशाल बोला. तिनं ऐकिलं तर काय हरकत नाहीं. (मुलीकडे पाहून) कमळे, (गणपतरावाकडे हात करून) हे गणपतराव वकील बरें. तुझ्या भावाचे मित्र.

त्या तरुणीनें गणपतरावांकडे 'अस्स कां ?' असें झणून त्यांच्याकडे पाहिलें.

गणप०—कांहीं हरकत नाहीं. मीं सांगतों त्यानें तिला जर कांहीं वाईट वाटत नाहीं, तिला आपल्या भावाबद्दल जर कांहीं दुःख होत नाहीं, तर कांहींच माझें म्हणणें नाहीं ! हा मीं सांगतों.

मग गणपतरावांनीं आपल्या खिशांतून कांहीं कागद काढले व ते पुढें पसरून ठेवून, सर्व कागद उलथे पालथे करून बऱ्याच वेळानें नारायणराव नाहींसा झाल्यावर लागलीच त्यांच्या हकीकतीचें टिप्पण झणून जो एक कागद त्यांनीं ठेविला होता तो हातांत घेऊन ते झणाले, 'हैबतराव, मेहेरबानगी करून मी जे कांहीं आतां सांगतों, तें लक्ष लावून ऐका. अशी वाईट

गोष्ट सांगण्याचें माझे वांट्याला आलें, त्यानें मला फार दुःख होतआहे. तुमचा मुलगा माझा जिवलग मित्र होता. त्याचा माझा एक जीव होण्याला पुष्कळ निरानिराळीं कारणें आहेत. त्याच्यापेक्षां या जगांत मला कोणतीच वस्तु अधिक प्रिय नाहीं, असें म्हटल्यास कांहींएक बाध येणार नाहीं. त्याच्यावर कसकशीं संकटें आलीं ह्याची माहिती मजपेक्षां दुसऱ्या कोणालाही अधिक नाहीं. बिचाऱ्यावर एकामागून एक अशीं अनेक अरिष्टें आलीं ! ! अशा प्रसंगीं त्याला कोणाची काडी इतकीसुद्धां मदत नाहीं. आपल्याकडून मदत होण्याचीच काय ती मुख्य आशा. ती तर अशी निर्फळ झाली ! काय पहा ! आशा वेळेला त्याचा जीव कीं प्राण जी बायको तीही पण कां मरूं नये ! वरें मेली तर मेली. पण मागें एक लहान मूल. त्याची काय वाट ! अरेरे ! ! फारच कठिण प्रसंग तो !'

आपल्या सुनेचें नांव काढलेलें पाहून मध्येंच हैबतराव मोठ्या जोरानें म्हणाले 'ती त्या कडू शिंद्याची पोरगी कीं नाहीं ?' गणपतरावांनीं या प्रश्नाला कांहींच उत्तर न देतां पुढें सांगण्यास सुरवात केली. 'तो जर तसाच काळजीनें झुरणीस लागून घरींच मेला असता, तर मीं त्याची व्यवस्था सर्व कांहीं केली असती. माझा तो कलिजा. माझ्या डोळ्यासमोर, माझ्या हातानें तरी सर्व विधि झाला असता ! त्याचें मला इतकें दुःख वाटलें नसतें ! परंतु आतां (डोळ्यांत पाणी आणून) तो एकदम नाहींसा झाला व त्याचा कोणी तरी खून केला, हें मनांत येऊन मला अतिशयच दुःख होत आहे. त्याचा कोणी तरी खून केला असावा अशी माझ्या मनाची पक्की खात्री झालेली आहे.'

'काय ? खून ! !'

हीं अक्षरें त्या बापाच्या व बहिणीच्या तोंडांतून एकदमच बाहेर पडलीं. बापाचा चेहरा एकदम खरकन् उतरला व काळा ठिक्कर पडला. लेकीनें आपली मान दोन्ही गुडघ्यांत घातली ती अखेरपर्यंत वर केलीच नाहीं.

हैबत०—गणपतराव, तुम्हास्नी वेड लागलें आहे खास ! किंवा तुमच्या मित्रानें मजजवळ अशी अशी बतावनी कर म्हनुन सांगून तुम्हांला पाठविलें असावें. यांत कांहीं तरी लबाडी आहे. कांहीं तरी निराळा बेत दिसतो या. मघा माफी करीन म्हनालों पण आतां माफी करूं-नये असें मला वाटतें.

जरा शुद्धीवर येऊन हैबतराव हें बोलले. गणपतरावांनीं सांगितल्याचा परिणाम त्या म्हाताऱ्याच्या मनावर फार त्वरित व कडक झाला, परंतु तो अगदींच क्षणिक ! !

गणप०—कांहीं कारण नसतां आपल्या मनांत भीति उत्पन्न करण्याचा माझा मुळींच हेतु नाहीं. ईश्वर करो आणि आपलेंच बोलणें खरें होवो ! व माझें म्हणणें खोटें ठरो ! असें होवो म्हणून मीं मनाभावापासून ईश्वराची प्रार्थना करितों; परंतु असें होईलसें मला वाटत नाहीं ! अगदीं आशा देखील नाहींहो ! आपली सल्ला द्यावी म्हणून मीं आलों आहें. मला जे जे कांहीं संशय आले आहेत ते ते मीं आपल्यास सांगण्याला आलों आहें. ते सर्व संशय निराधार व मूर्खपणाचे आहेत, असें जर आपण म्हणत असाल, तर कांहीं हरकत नाहीं. आपल्या सारख्या पोक्त व अनुभवी मनुष्याचा विचार ऐकायाला हा मीं तयार आहें. मला जे कांहीं संशय आले आहेत ते साधार करण्यास जो मीं पुरावा तयार करीत आहे तो तसाच सोडून देईन; आपण जर पुढें चालूंद्या म्हणून सांगाल तर मी सुरू करीन.'

गणपतरावांनीं आपल्यास असा मोंडपणा दिलेला पाहून आमच्या हैबतरावाचा अभिमान जागृत झाला. गणपतरावाचें जें कांहीं म्हणणें आहे तें पूर्णपणें ऐकून घेण्यास ते तयार झाले. व या कामांत लागेल ती मदत आपल्याकडून होईल तितकी देण्यास त्यांनीं त्यांस पूर्ण आश्वासन दिलें.

गणपतराव जरा पुढें सरकले आणि अगदीं हैबतरावाजवळ जाऊन नारायणराव चिनाहून परत करवीरास आल्यापासून तों तहत तो नाहींसा होईपर्यंत ज्या ज्या गोष्टी घडल्या त्या त्या सर्व इत्थंभूत त्यांस त्यांनीं सांगितल्या. आणि तो नाहींसा झाल्यावर याचसंबंधाचें जें जें कांहीं घडलें तें तें सर्व सांगितलें. हैबतरावांनीं फार लक्ष लावून तें ऐकिलें. मधून मधून गणपतरावास एखाद्या माजिस्ट्रेटासारखे ते प्रश्न विचारीत होते ! कमळाबाईनें मान जी एकदां गुडघ्यांत घातली होती ती वर केलीच नाहीं.

सोप्यावरच्या घड्याळांत दीड वाजला तेव्हां गणपतरावांनीं हकीकत सांगण्यास प्रारंभ केला होता. आतां त्यांचें हकीकत सांगणें संपतें तोंच घड्याळांत तीन वाजले.

ही सर्व हकीकत सांगण्यांत जेव्हां जेव्हां आपल्या मामाचा व मामीचा संबंध आला, तेव्हां तेव्हां गणपतरावांनीं त्यांचीं नांवें मोठ्या शिताफीनें बगळलीं!

ही सर्व गोष्ट सांगणें झाल्यावर गणपतराव म्हणाले, ' रावसाहेब, आतां आपलें काय मत आहे ? माझें मत असें कां झालें आहे याचीं सर्व कारणें आपण आतां ऐकिलींच. मीं जीं आतां कारणें सांगितलीं त्यांवरून आपण काय निकाल करतां ? मी म्हणतों असेंच आपल्याला वाटतें काय ?'

केवळ दुराग्रहानें व दर्पोक्तीनें हैबतराव म्हणाले, ' माझें जें कांहीं एकदां मत ठरलें आहे तेंच ठाम. तुमच्या अशा वाक्पांडित्यानें माझें मत कधींही फिरणार नाहीं. ज्याप्रमाणें पूर्वीपासून मला वाटत आहे त्याप्रमाणेंच अजूनही माझा मुलगा जिवंत आहे असेंच मला वाटतें. आपण छपून बसून मला फसविण्याचा त्यानें बेत केला आहे. पण मीं नाहीं असा फसण्याचा !'

गणप०—(मोठ्या गंभीरपणानें) मग मीं पुढें प्रयत्न करूं नये म्हणतां ?

हैबत०—मी तुम्हाला एवढेंच सांगतों. तुम्हाला जर आणखी कांहीं खटपट करणें असेल तर खुशाल करा. तुम्ही आपल्या मनाचा संशय फेडायाला करा चौकशी पाहिजे तर. माझ्याकरितां म्हणून त्या पंचायतींत पडूं नका. तुम्हीं जी कांहीं मला आतां हकीकत सांगितली तीवरून कांहीं माझ्या—नाहीं, तुमच्या मित्राच्या, जिवाला धोका आहे, असें मला बिलकुल वाटत नाहीं.

गणप०—(एकदम) फार चांगलें आहे तर. या घटकेपासून आपण या गोष्टीचा नाद सोडला. आतां कशाला त्याचें ? ती गोष्ट आतां विसरूनच गेलें म्हणजे झालें. गणपतरावांनीं खालीं काढून ठेवलेली पगडी डोकीला घातली, व एकदम उठले. त्यांमीं कमळाबाईकडे पाहिलें. ती खालीं मान घालून बसली होती ती तशीच. 'येतों हैबतराव, रामराम. ईश्वरकरो आणि आपलेंच भाकीत खरें होवो ! परंतु मला वाटतें कीं असा एक दिवस येईल कीं, त्या दिवशीं आपण आपल्या एकुलत्या एक पोराच्या आशा अकालीं मृत्युबहल एवढें औदासीन्य धरिलें, हें मनांत येऊन, खरोखरच फार शोक कराल. अंतकालीं पुत्रशोकानें भ्रमिष्ट होऊन नारायण-नारायण करीत प्राण सोडाल, हें मात्र खरें ?'

असें म्हणून गणपतरावांनीं मोठ्या अदबीनें हैबतरावाला व त्या तरुण स्त्रीला राम राम केला. ती स्त्री अजून तशीच खालीं मान घालून बसली होती.

ते जरा तेथें घुटमळले. ती तरुण स्त्री वर पाहील व हम धरा असें कदाचित झणेल, असें त्यांना वाटलें.

हैदरावांनीं आपल्या नेहमींच्या कठोर स्वरानें एका चाकराला हाक मारिली व यांना दरवाज्यापर्यंत पोंहचते कर, म्हणून सांगितलें.

अगदीं जातां जातां मागें वळून भजुन खालीं मान घालून बसलेल्या त्या स्त्रीकडे त्यांनीं पुनः पाहिलें व 'ती आपल्या बापासारखीच आहे. हे हतभागी नारायणराव, या जगांत तुझ्या जिव्हाळ्याचें, या तुझ्या मित्राखेरीज, कोणीच कोरे नाहीं !! हा प्रत्यक्ष बाप व ही पोटची बहीणना ?' असे दुःखोद्गार काढले.

भाग २४ वा.

गणपतराव बाहेर आले तों आपण सांगितल्याप्रमाणें तांगा दारांत उभा आहे, असें ल्यांस दिसलें. तांगेवाला 'आतां रावसाहेब कवा येत्यातीवा ?' असें म्हणून कंटाळून, हिऱ्या तंबाकूची चिलीम फुंकून थोडी डुलकी घेत होता. आपले यजमानच जर झोंप घेऊं लागले तर मग त्या घोड्यानें तरी कां आळस करावा ? खालीं डोकें करून डोळे झांकून तें करडें घोडें स्वस्थ झोंप घेत होतें. घोड्याचें तें भूस पेंड खाऊन सबर घोडी सारखें मोठें झालेल्या पोटाच्या कुसा जरा हळूहळू श्वासोच्छ्वासानें उडत होत्या, त्यावरूनच ह्या श्यामकर्ण वारूस महानिद्रा लगली नाहीं असें वाटे. गणपतराव तांग्याजवळ आले आणि तांगेवाल्यास 'ए कोचमन्. उठो चलो जलदी' असें म्हणून आपण मागच्या बाजूस बसले. तांगेवाला खडबडून उठून डोळे चोळून हातांत ती कधीं तेलसावणाचा स्पर्श न झालेली तुटकी 'रेन' धरून घोड्याला एक सपाटून चाबूक मारून रेनला जोरानें हिसडा दऊन च, च, च, असें त्या निद्रावश झालेल्या घोड्यास म्हणाला. चाबकाचा तडाका खाल्ल्याबरोबर घोडें सावध झालें आणि त्यानें आपली दुडकी चाल धरिली.

तांग्यांतून त्या घराच्या आंगणाकडे पाहून ते आत्मगत म्हणतात 'काय हा बाप व काय ही बहीण ! बापाचा स्वभावच असा आहे, असें तो नेहेमीं सांगे, तेव्हां त्यांत कांहीं विशेष नाहीं; परंतु 'ही बहीण आपली फार लाडकी आहे, तिची फार आपल्यावर माया आहे,' असें तो म्हणे, परंतु येथें पाहवें तों प्रत्यक्ष 'तुझा भाऊ मेला' असें मीं सांगितलें तरी तिच्या डोळ्यांला पाण्याचा बिंदूही नाहीं, तेव्हां काय म्हणावें !! ह्याच आंगणांत ती आपल्या भावाबरोबर किती वेळां तरी आंबळीकोशिंबीर खेळली असेल ? आणि तेंही पण किती प्रेमानें ! त्यावेळेस किती लडिवाळपणानें बोलली असेल ! ह्याच आंगणांत अगदीं लहानपणीं नारायणराव ह्याच निर्दय बापाच्या कडेवर बसून किती वेळां तरी फिरला असेल ! ह्याच बापानें त्यावेळेस किती तरी आवडीनें त्याचें चुंबन घेतलें असेल ! अरेरे !!! हें व्यर्थ आहे ! प्रत्यक्ष बाप ! त्याला देखील मुलाची मृत्युवार्ता ऐकून दुःख होत नाहीं ना ? 'ज्यनिअस ब्रटस' चा हा खरा अवतार ! असे

दुष्ट बाप होते म्हणून आपणँ इतिहासांत वाचीत होतों, तें आज प्रत्यक्ष माझ्या अनुभवास आलें. हे परमेश्वरा ! असलीं माणसें जगांत उत्पन्न तरी कशाला करितोस ? अशांना संतति तरी कां देतोस ? अशीं मनुष्यें जन्मतांच कां मेलीं नाहींत ? जन्मास येऊन न येऊन हीं सारखींच. तीं आपल्या आईचें तारुण्य हरण करण्याला मात्र जन्मतात. ' मातुः केवलमेव यौवनवन-च्छेदे कुठारा वयम् ' ही कव्युक्ति अगदीं खरी आहे. अलीकडच्या ' फि-लॉसफर्स ' (तत्ववेत्ते) यांच्या मताप्रमाणें ' प्रॉजनी ' (प्रजा) कमी हो-ण्याचें जर कमी होईल तर फार बरें. त्यापासून निदान असलीं माणसें तरी जास्ती निपजण्याचा कमी संभव होईल. याचा बाप असा, बहीण ही अशी; मग नारायणरावाचाच स्वभाव इतका उदात्त, दयार्द्र, मनमिळाऊ, इतका चांगला कसा झाला कळत नाही. मुलें आपल्या आईबापांच्या वळणावर जातात. कांही कांहीं तर थेट आईप्रमाणें किंवा बापाप्रमाणें व केव्हां केव्हां आजाप्रमाणें, चुलत्याप्रमाणें, नाकाडोळ्यांनीं असतात. कांहीं कांहीं ठिकाणीं तर आवाजही थेट बापाप्रमाणें असतो ! मग इतकें असून स्वभावामध्येंच कसें अंतर कां पडतें नकळे ! कांहींही असो, नारायणराव फार क्रमनशिबाचा खरा. कशाला तें आतां ! आपणही हा नाद सोडलाच. '

तांगा हळूहळू उत्तरेच्या रस्त्यानें चालला. हैबतरावाच्या घराला वळसा घालून अमळ पुढेंच गेल्यावर दुसऱ्या रस्त्याला तो लागला. घोडें खुदडत खुदडत—चाललें होतें. गणपतराव असेच कांहीं विचार करीत खालीं सुपलीला पायाचा ताण लावून मागें तक्क्याला टेंकून बसले होते. इतक्यांत एक तरुण स्त्री लांब तांग्यामागें पळत येत आहे व हांतांत कांहीं पांढरें फडकें घेऊन तो हात वर उंच करून मोठ्यानें ओरडत पळत असल्याचें त्यांना दिसलें. ' ही कोणाला बरें हाका मारीत आहे ? ती कमळाच काय ? (खिशांत हात घालून पाहून) माझा हातरुमाल तिथें राहिला वाटतें. तो हैबत-रावांनीं इच्छाबरोबर पाठविला कीं काय ? मलाच हाका मारिते कीं आ-णखी कोणाला ? ' असें मनांत येऊन तांगेवाल्यास त्यांनीं तांगा उभा क-रण्यास सांगितलें. तांगा उभा राहिला, हें पाहून ती स्त्री अधिकच पळूं ला-गली. अखेर पळत पळत मोठ्यानें धापा टाकीत टाकीत ती तांग्याजवळ येऊन पोहोंचली.

त्यांच्या दृष्टींत जरा व्यंग असल्यानें ती अगदीं तांग्याजवळ येईपर्यंत

स्यांना ओळखूं आली नाहीं. अगदीं जवळ आल्यावर स्वच्छपणानें अ तिला गणपतरावांनीं हें पाहिल्यानेंच पाहिलें. तेथें घरीं, ती पाठमोरी व थो डी लांब असल्यामुळें तिचा चेहरा त्यांस नीट दिसला नाहीं. ती इतक सुंदर आहे, हें पाहून त्यांना फार आनंद झाला. इतके दिवस ते आपल्य मामीला व तिच्या लेकीला फार सुंदर मानीत असत. परंतु आतां इत पाहिल्याबरोबर ती सर्व भ्रांति आहे, असें त्यांना वाटूं लागले. 'खरें सौंद तें हेंच, असें रूप आपण पाहिलेंच नाहीं. इच्यापुढें कामदेवाची रति काय सर्व तुच्छ आहे. इच्या या काळ्यासावळ्या चेहऱ्यांत, पळत आल्यानें श्रम होऊन तांबडेपणा आलेल्याची थोडी झांक मारत आहे, तो रक्तिम तर ह्यावेळेस फारच शोभा देत आहे,' असें गणपतरावाला वाटलें. तिनें एक हात तांग्याच्या बावटयावर ठेविला व मोठा सुस्कारा टाकिला. तिचे डोळे अगदीं रक्तासारखे लाल दिसत होते, पण त्यांत पाण्याचा थेंब नव्हता. व ळूंत पाणी खरें पण साहरा वाळवंटांत कोठलें ! व त्यांत उष्ण काल तिच्या मनांत कांहीं बोलावयाचें आलें, पण ओंठ थरथर कांपूं लागले, त्या- मुळें तिला धड बोलतां येईना, हें पाहून ते म्हणाले, 'कमळाबाई, अन् तुम्हीं इकडे ! आणि कांहीं'—त्यांना पुढें बोलू न देतां ती मध्येंच म्हणाली, 'मला बोलूंद्या नाहीं तर मीं अगदीं भ्रांतिष्ट होईन. मीं तें सर्व कांहीं ऐकिलें, तुम्हांला वाटतें तसेंच मलाही वाटतें. माझ्या भावाचा कोणीं- तरी खून केला असेल त्याचा सूड उगविलाच पाहिजे. नाहीं तर मीं भ्रमिष्ट होईन, मला वेड लागेल !'

एक पळभर गणपतरावास कांहींच सुचेना, ते गोंधळून गेले. ही असें बोलेल हें त्यांच्या स्वप्नींही पण आलें नव्हतें.

गणप०—कमळाबाई, जरा शांत व्हा. मीं उतरतों. चला त्या तेथें आपण बसूं; व याजबद्दल आपण शांतपणानें बोलूं. तुमचें हद्गत मला पूर्वी कळतें तर मीं असें बोललोंच नसतों. मला जर असें पूर्वीच कळतें तर—

कमळा०—माझी भावावर फार माया आहे, हेंच कळतें तर कीं नाहीं ? माझी फार माया आहे, हें तुम्हांला कसें कळावें ? अशा ह्या बापा- जवळ राहिल्यानें व कधीं एक शब्दही प्रीतीचा बोलण्याचा प्रसंग न आल्यानें, तुमच्या सारख्या तिऱ्हाइताला हें खरें कसें वाटावें ? अशा प्र- संगीं मीं आपल्या भावावर प्रीति करितें. हें जर बापाला कळलें तर त्यांत

माझें नुकसान व त्याचेंही ाण नुकसान. मीं प्रत्यक्ष त्याच्या पाठची बहीण! मला कसें वाईट वाटणार नाहीं ? दुःखानें काळीज करपून गेलें आहे. !! इकडे आड व तिकडे विहीर, अशी माझी स्थिति झाली आहे !! मीं काय करूं ? माझ्या हातांत काय आहे ? बाबा करतील तें करोत. पुन्हां येऊन भेटला तर आपलें नशीब, असें झणून स्वस्थ बसलें. आमच्या बापाला माया नाहीं, असें नका झणूं. जरी वर असे कठोर बोलतात, असे उग्र दिसतात, तरी त्यांचें मन फार कोंवळें आहे. आतां, ते लोकांसारखे आपल्या मुलांवर विशेष ममता दाखवीत नाहींत, हें खरें असेल. नेहमीं कडक रीतीनें राहण्याची संवय असल्यानें असें होतें. पण लोकांला हें कसें खरें वाटावें? (एकदम मधेंच थांबून मागें पाहून) बाबा ह्याच वाटेनें रोज फिरावयाला जातात, त्यांनीं जर मला पाहिलें तर धडगत नाहीं; मीं मागच्या दारानें त्यांचा डोळा चुकवून हळूच निसटून येथें धांवत आलें व तुह्मांला गांठलें. चला. तांगा ह्या रस्त्यानें असा आणा, व त्या तेथें उभा करा; मागच्या दारानें आपण आंत जाऊं, व तेथें बागेंत विहिरीजवळ बोलत बसूं, म्हणजे कोणाला दिसणार नाहीं. रस्त्यानें काय हजारों येणार जाणार; सगळा गांव आमच्याओळखीचा. कोणी तरी बाबांना सांगितलें म्हणजे पंचाईत! चला. '

ती थरथर कांपत आहे, असें पाहून गणपतराव झणाले, ' कमळाबाई, तुमच्या आंगांत नीट नाहीं वाटतें? तापबीप येत असतो कीं काय? चला, वाड्यांत नका उभ्या राहूं. घरांत जा. थंडी होईल कदाचित्. ती झणाली, छे, अगदीं नाहीं. मला काय झालें. मीं चांगली आहें. ' त्याच्या-वाटचा माझा कां कोणीं खून केला नाहीं ? त्याची बातमी ऐकल्यापासून मला असें कांपरें भरलें आहे. '

ते खालीं उतरले व तांगेवाल्यास कमळाबाईनें दाखविलेल्या ठिकाणीं तांगा उभा करावयास सांगून ते व ती मिळून मागच्या दारापाशीं आलीं. तिनें दार हळूच उघडिलें व ' दम धरा ' झणून आपण आंत गेली व पुनः लागलीच परत दाराशीं येऊन ' या आतां ' असें त्यांस झणाली. ते आंत आल्यावर तिनें दार लाविलें. दोघेही विहिरीला उजवें घालून एका मोठ्या चंदनाच्या झाडापाशीं आले. व मग ' बसा येथें, आतां मला सगळें सांगा ' असें कमळा झणाली.

तीं दोघें झाडाखालीं बसलीं. 'आतां आशा घाबरूं नका. जरा धीर धरा' असें सांगून ती अजूनही कांपत आहे असें पाहून तिला ते म्हणाले,

'माझें जें मत झालें आहे, तें कदाचित् चुकीचें असेल!'

कमळा०—(मोठ्या त्वेषानें) छे, छे, छे, मनांत देखील आणूं नका. त्याचा खून केला हेंच खरें. सांगा मला त्या सटवीचें नांव, जिनें माझ्या भावाचा खून केला म्हणून तुम्हांला संशय आहे तिचें सांगा तिचें नांव. असली कोण कैकया आहे, तें तरी कळूंद्या—त्याच्या नाहींसें होण्यांत, छे, खून करण्यांत जिचें अंग आहे असें तुम्हांला वाटतें तिचें.

गणप०—तें मला नाहीं सांगतां येत एव्हांशीच.

कमळा०—एव्हांशीच ? तर मग केव्हां ?

गणप०—ती अपराधी आहे, अशी माझ्या मनाची पक्की खात्री होईल तेव्हां.

कमळा०—' आतां आपण तो नाद सोडला म्हणून बाबाला सांगितलेंत. काय असेल तें असो, आपण आतां चौकशी करणार नाहीं, असें म्हणालां. अहो, त्याचें काय झालें हें कसें कळावें ? गणपतराव ! असें नका करूंहो. असा मित्रद्रोह करूं नका. माझ्या दादावर तुमची इतकी माया ना ? ज्यांनीं त्याचा नाश केला त्यांचा सूड उगविलाच पाहिजे. तुमच्या हातून एवढें नाहींना होत ? तुम्हीं नाहीं कां करीत ?

हें ऐकून, गणपतरावांचा चेहरा एकदम उतरला. शिरोळास आपण काय प्रतिज्ञा केली होती त्याची आठवण झाली. पंधरा मिनिटांपूर्वीच ' आपण हा सर्व नाद सोडला ' असेंही म्हटल्याची त्यांना आठवण झाली. परंतु आतां या बंधुप्रीतीनें उचंबळलेल्या स्त्रीच्या बोलण्यानें पुन्हां पुढें आपला क्रम चालवावा, असें त्यांच्या मनांत आलें.

गणप०— कमळाबाई, आतां पुढें शोध करण्यांत माझ्यावर काय संकटें येणार आहेत, हें जर तुम्हांला कळलें तर तुम्हीं हा हट्ट सोडून द्याल, असें मला वाटतें.

कमळा०—(मोठ्या त्वेषानें) नाहीं, तसें नाहीं. कराच शोध. माझ्या दादाचा कसा अंत झाला, त्याची तुम्हीं चौकशी केलीच पाहिजे. होय किंवा नाहीं ? एक सांगा.

गणप०— बरें, समजा, मीं 'नाहीं' असें म्हटलें; मग काय तुम्ही कराल?

कमळा०---(अधिक त्वेषानें) मग काय? मी-मी-स्वतः त्याचा शोध लावीन. मी ती बाई शोधून काढीन. करवीर प्रांताच्या कोणत्या भागांत तो नाहींसा झाला, हें जरी तुम्ही सांगत नाहीं, तरी वेहेत्तर आहे. ही दुनिया सोडून तर त्याचा अंत झाला नाहीं? मीं पायीं सर्व दुनियेच्या पाठीवर फिरेन आणि त्याचा पत्ता लावीन. कधीं सोडणार नाहीं. तुम्हीं नाहीं असें म्हणा, म्हणजे पुरे. मीं कांहीं आतां लहान नाहीं. मरतांना आईनें मला आपले सर्व दागिने दिले आहेत. ते सर्व मोडीन व शोध लावण्यांत खर्च करीन. भीक मागेन पण त्याला हुडकून काढल्याखेरीज सोडणार नाहीं. माझ्या दादाची ज्याला ज्याला म्हणून माहिती आहे, त्याला त्याला प्रसंग पडला तर पैसे देऊन त्याची मदत घेईन. गणपतराव, बोला चटकन. तुम्ही मित्रद्रोही न होतां माझ्या दादाचा खून करणाराचा पत्ता लावतां कीं मी लावूं?

त्यांनीं लक्ष लावून तिच्या तोंडाकडे पाहिलें, तेव्हां मृत्युवार्ता ऐकून श्मशानवैराग्य येतें, किंवा मृतावइल सुहृज्जनाच्या तोंडून कांहीं वेळ अशा गोष्टी येतात, तशांतला हा प्रकार बिलकुल नव्हे, इचा दृढ निश्चय खरा आहे, असें त्यांना आढळून आलें. इचा निश्चय कशानेंही काडीमात्र ढळणार नाहीं, असें तिच्या चेहऱ्यावरून त्यांना स्पष्ट दिसलें.

ती फार खोल स्वरानें म्हणाली, गणपतराव, मी सदा त्या कडक वृत्तीच्या बापाच्या हाताखालीं वागलेली. सदा परतंत्र. आतां आम्हीं त्यांच्या बरोबरीनें झालों. पण स्वतंत्रता काडीइतकी नाहीं. सदा त्यांच्या धाकांत रहावें, यांतच त्यांना मोठेपणा वाटतो! आम्हीं काय करावें, नेहमीं संवयीनें आमचा देखील स्वभाव तसाच झाला आहे! कांहीं सुचत नाहीं, तुम्हीं सांगितल्यापासून पोटांत अगदीं आग पेटलीहो! वरचेवर भडभडून येतें! कोणाजवळ मन मोकळें करून बोलेन म्हटलें, तरसुद्धां जागा नाहीं! नुसतें मन मोकळें करून रडेन म्हटलें, तर तेंसुद्धां स्वाधीन नाहींहो!! बाबांचा स्वभाव फारच कडक. ते फार हट्टी. दादाला आवडली ती त्यानें बायको केली! (मोठ्यानें हुंदका येऊन रडत रडत) अरे, पण माझा दादा मला भेटेल काय? असा सोन्याचा दिवस कधीं उगवेल काय? बरें, असो. जिनें माझ्या भावाचा खून केला ती सांपडो तिचा सत्यानाश होवो. (आंखांवर दोन्ही हातांचीं बोटें कडकड मोडून) जळो तिचें घर.

ईश्वरा तिला एकदा लयकर या जगांतून नाहींशी करो. असली महामाया कां उत्पन्न केली ? असें ह्मणून, ती ढळढळां रडूं लागली.

गणप०--(जरा थांबून) कमळाबाई, शांत व्हा. अशा रडूं नका. जरा धीर धरा. रागावूं नका. हें पहा, तुमच्या भावाचा खून करणाऱ्याचा पत्ता लाविल्याखेरीज मीं राहणार नाहीं. जरा तुह्मी दम धराल व माझ्यावर भरंवसा ठेवाल, तर सांगतों. तुमच्या हातून माझ्यासारखें काम होणार नाहीं. मी कसा ह्मालों तरी वकील. सर्व बेतावातानें सोयीसोयीनें घेतलें पाहिजे. एकदम घाई करतां उपयोग नाहीं. तुमची मदत मला असूंद्या ह्मणजे ह्मालें.

कमळा०--तुमच्यावर माझा पूर्ण भरंवसा आहे.

हैबतरावांबरोबर संभाषण करितांना नारायणरावाच्या नाहींसें होण्यांचे संबंधानें अशा अशा गोष्टी घडल्या, येवढें त्यांस त्यांनीं सांगितलें. त्या गोष्टींवरून असें सिद्ध होतें, हें त्यांनीं मुळींच खुलासेवार सांगितलें नव्हतें. हें त्यांनीं मुद्दाम वगळलें होतें. करवीराला आल्यापासून तें तो नाहींसा होईपर्यंतची सर्व हकीकतच त्यांनीं तिला सांगितली. परंतु त्या सर्व गोष्टींवरून आपल्याला जें वाटतें तेंच कमळाबाईला वाटतें, असें तिनें सांगितल्यावरून त्यांचे ध्यानांत आलें. दोघांचें मत एकच ह्मालें.

गणप०--तुमच्या दादाचीं कांहीं पत्रें तुमच्याजवळ आहेत कां, कमळाबाई ?

कमळा०--होय दोन आहेत. एक त्यानें आपलें लग्न ह्माल्याबरोबर पाठविलें व एक चिनाला निघण्याच्या अगोदर मुंबईहून पाठविलें तें.

गणप०--मला तीं दाखवाल कां ?

कमळा०--होय. तुमचा पत्ता मला सांगा, ह्मणजे मी त्या पत्त्यावर तीं पाठवीन. वरचेवर मला पत्र पाठवाल ना ? कसें काय, कोठपर्यंत शोध लागला, हें वरचेवर मला कळवा. येथें पत्र येण्याची मोठी पंचाईतच आहे. पण मी लवकरच दोन तीन महिने गांवाला जाणार आहे. मग कांहीं हरकत नाहीं. माझी मी मालकीण आहे.

गणप०--काय, हा करवीर इलाखा सोडून जाणार कीं काय ?

कमळा०--अँ, हँ; त्या निहालगडाकडे माझी चुलत मावशी आहे, तिनें मला बोलाविलें आहे दोन दिवस, ह्मणून जातें.

निहालगडाचें नांव घेतल्याबरोबर त्यांनीं तिच्याकडे आश्चर्यचकित होऊन पाहिलें; तिनेंही त्यांच्याकडे पाहिलें. ते अशा आश्चर्यानें पाहत आहेत, हें पाहून त्यांच्या मनांतलें तेव्हांच तिनें ओळखलें. त्यांच्या मनाची ही जी चंचलवृत्ति झाली, त्यानें त्यांचें सर्व गूढ बाहेर पडलें.

कमळा०--(त्यांच्याकडे पाहून, खोदून). माझा दादा निहालगडाकडे नाहींसा झाला वाटतं ?

गणपतरावांच्यानें ' ना ' म्हणवेना.

गणप०--अखेर तुम्ही माझ्या मनांतलें ओळखिलेंत ! इतकें तुम्हांला कळलें म्हणावयाचें. दिवसेंदिवस माझी स्थिति फार संकलित होत चालली; उपाय नाहीं. येतों तर आतां.

तिनें वेर म्हणून मना हालविली. तिचें कांपरें कमी झालें नाहीं. तिच्या सर्व आंगाला घाम सुटला होता. त्यामुळें तिचें अंग कालासारखें थंडगार पडलें होतें. ती वरचेवर कपाळाचा घाम पुशीत होती. आतां असा पुसावा, तों पुन्हां घर्मबिंदु उभेच. अशी कांहीं चमत्कारिक स्थिति तिची झाली होती.

गणप०—तुम्हीं आतां आंत जा. वारा घेऊं नका. आजच्या या प्रसंगानें तुम्हांला फार त्रास झाला. उगीच प्रकृति बिघडेल.

कमळा--(तिरस्कारानें) प्रकृति बिघडेल! कायहो ! ऐन उमेदींत माझा लाडका दादा नाहींसा झाला, (डोळ्यांत पाणी आणून) हें ऐकून मला कांहीं झालें नाहीं आणि आतां मला काय होतें! देवानें मला कांनेलें नाहीं त्याच्या वाटचें ? तो खुशाल मुलांबाळांत आनंदानें राहिला असता. ह्या वाऱ्यानें मला काय होणार ! मी आतां दगडाची झालें आहें. मला आतां कशाची भीति नाहीं. येथून करवीराला अनवाणी चालत जाईन. तो जिवंत आहे, असें कळलें तर लोटांगणें घालीत जाईन. मी त्याच्यासाठीं पाहिजे तें करण्याला तयार आहें. पण तो जिवंत आहे, असें मला सांगाहो ! (मोठ्यानें हुंदका दाटून येऊन रडूं लागते.)

ती अशी धाय धाय रडते, हें पाहून गणपतरावांच्या डोळ्यालाही पाणी आलें, तें हातरुमालनें पुसून, ते म्हणाले, ' रडूं नको बाई. वैरी चिंतीत नाहीं तें मन चिंतितें. बाई, तुझा भाऊ जिवंत नसेल कशावरून ?

कमळा०—(रडत रडत मोठ्या गडबडीनें) असें होईल कांहो ! असें होईल कांहो ! असा सैतान्याचा दिवस मीं कधीं पाहीनहो ! तुमचें बोलणें खरें होवो. तुमच्या तोंडांत साखर पडो !

गणप०--ईश्वर करो आणि तसेंच होवो. मीं येतों आतां. उशीर झाला.

कमळा०--डोळे पुसून, बरें या. अहो दम धरा. तुमचा पत्ता या विसरलां वाटतें.

गणपतरावांनीं आपल्या खिशांतून कागदपेनसील काढून आपला पत्ता लिहून दिला. तिनें तो कागद पोटकुळीं ठेविला. 'मीं दादाचीं पत्रें पाठवितें तीं तुमच्या उपयोगीं पडलीं तर पहा. बरें तर या अँ,' असें ती म्हणाली. ते बाहेर पडल्यावर तिनें दार लावून घेतलें व डोळे नीट पुसून पदर नीट घेऊन ती घरांत गेली. गणपतराव तांग्यांत बसले आणि आंत जातांना 'किती तरी प्रेमदृष्टीनें मजकडे तिनें पाहिलें! तिचें ते रडणें माझ्या डोळ्या-समोरच उभें आहे' असा विचार करीत ते स्टेशनाकडे निघाले.

भाग २५ वा.

गणपतराव गारगोटीहून निघाले ते रात्रीं साडेनऊ वाजण्याचे सुमारास करवीरच्या स्टेशनावर येऊन उतरले. तेथून भाड्याचा शिग्राम करून वाघडयावर आपल्या बंगल्याकडे न जातां रीजंट स्ट्रीटमधल्या 'जगदोद्धारिणी' होटेलकडे घेऊन जाण्यास गाडीवाल्याला त्यांनीं सांगितलें. ते आंत गाडीला टेंकून पाय पसरून रस्त्यांतल्या धुराच्या दिव्यांकडे पाहात चालले असतां त्यांच्या मनांत विचार आले, 'हें आयुष्य ही एक मोठी अमोलिक चीज आहे. हा एक अवर्णनीय ईश्वरीप्रसाद आहे! हा एक महानंदांपैकीं एक आनंद. एखाद्याला आपल्या आयुष्यांत सुख किती आहे, हें पाहणें असेल, तर त्यानें असें करावें. त्यानें एक कागद घ्यावा व त्यावर आपल्या आयुष्याचे दिवस किती गेले हें मांडावें. मग यत्किंचित्ही त्यांत दुःखाचें मिश्रण नाहीं, असे सुखाचे तास किती ते मांडावे. आणि मग त्या एकंदर आयुष्याच्या वेळांतून ह्या सुखाच्या वेळा किती गेल्या हें त्यास चट्कन् कळल. खरोखरच ह्या एवढ्यावरून तीस बत्तीस वर्षें घालविलेल्या वयांत फक्त एक आठवडाच काय तो मोठया सुखाचा, ज्यांत दुःखाचा म्हणून लवलेश नाहीं, असें त्यास कळेल. हे सात आठ दिवसच खरें सुखाचे गेले असें त्यास वाटून त्याला हसें येणार नाहीं काय? आपण जे कांहीं सुखाचे दिवस घालविले असतील त्यांची किती वेळां तरी वरचेवर आठवण करितों! व ते दिवस पुनः येतील काय म्हणून व्यर्थ आशा करितों! सुख, अर्थात् त्यापासून होणारा आनंद, हा स्थित्यंतरप्रिय असा एक पक्षी आहे, असें म्हटल्यास कांहीं हरकत नाहीं. हा आपल्या उडण्यांत अनियमित आहे. अमके दिवशीं हा येईल याचा बिलकुल नियम नाहीं. तो आपल्या जवळ असावा असें प्रत्येक व्यक्तीला वाटतें; पण तो केव्हां भेटेल याचा नियम नाहीं व आलेला पुनः केव्हां जाईल व फिरून येईल कीं नाहीं, याचीही पण खात्री नाहीं. उदाहरणार्थ, दूर कशाला, हें लग्नच घ्याना. या लग्नापासून कोणेंही मिळणार नाहीं, असें सुख प्राप्त होतें असें म्हणतात, पण माझ्या अनुभवाला तर तसें येत नाहीं. हें लग्न काय आहे?

'हा एक प्रकारचा पुरुष व स्त्री यांतला करार आहे. जशी इतर सर्व क-

रारांला कांहीं मुदत व शर्त, असते तशी याही करारांला कां असूं नये ? विचार केल्यास कांहीं अंशीं आहे ही मिसेस केर्डच्या मतानुसारणें लग्नाची व्याख्या कां करूं नये ? अशी स्थिति आमच्या या राष्ट्री स्थितींतल्या लोकांना प्राप्त होण्याला अजून कितीएक वर्षे पाहिजेत. स्वभावतः स्त्री या व्यक्तीकडे कांहीं दोष आहे कीं काय ? मुळींच नाहीं. सर्व गोष्ट तिच्या शिक्षणावर अवलंबून आहे. ही पहा येथें ही मुलगी अपल्या आईचा हात धरून वस्त्रविहीन ऊभी राहिली आहे. हीच पुढें कांहीं वर्षांनीं या जगांतल्या अति मोठ्या तत्त्ववेत्त्याला सुख देणारी होणार नाहीं, हें कशावरून ? सर्व कांहीं तिच्या 'ट्रेनिंग' (शिक्षण) वर अवलंबून आहे. ही सर्व व्यवस्था नीट ठेवण्याचें काम 'सोसायटी' (मंडळी) चें आहे. अमुक एक स्त्रीबरोबर पुरुषाला, व अमुक एका पुरुषाबरोबरच स्त्रीला तूं हा करार केला पाहिजेस; व तो तूं कधींही मरेपर्यंत कांहींही अडथळा आला तरी मोडतां उपयोगी नाहीं, असें सांगणारे त्या त्या व्यक्तीचे कोण मालक ? हें ज्याचे त्याच्या मनावर असलें पाहिजे. हा करार ठरविण्याला मध्यस्थ प्रीति 'I mean love' पाहिजे आहे. तीच ह्या करारास जामीन पाहिजे. हिनेंच दोन्ही 'पार्टीला' एके ठिकाणीं धरिलें पाहिजे. ही नाहींशी झाल्याबरोबर हा करार 'Null and Void' (रद्द) ठरला पाहिजे.' इतक्यांत विचार बदलून ती कमळा त्यांच्या डोळ्यासमोर उभी राहिली. 'जर त्या कमळाला आणखी दहा मिनिटेंच उशीर लागला असता, तर मीं तिला भेटलें नसतें. तिच्या आंगीं निःस्नेहता व कठिणहृदयता पूर्ण आहे असें जें मीं ठरविलें होतें, तेंच माझें मत कायम राहिलें असतें; व नारायणरावाचा शोध लागला नाहीं ह्मणून जी माझ्या मनाला खरखर लागली ती मरेपर्यंत गेली नसती. तिच्यांत अनुकंपा पूर्ण भरली आहे, व ती फार सुंदर आहे अशी आतां माझी खात्री झाली. आपल्या भावाचा शोध लागावा ह्मणून जर येवढी तिनें गळ घातली नसती, तर मी हा नाद हैबतरावांच्या त्या अविचारी भाषणावरून सोडलाच होता. तुझ्या भावाचा खून झाला व तो अमक्याकडून झाला, हें मला माहीत झाल्यावर माहीत नाहीं, असें तिला मग कसें ह्मणूं ? माझ्यानें आतां असें ह्मणवणार नाहीं. तिला निमी हकीकत तर कळल्यासारखीच आहे. बाकीची तिला लवकरच कळेल. आणि मग—' इतक्यांत शिग्राम 'जगदोद्धा-

रिणी ' होटेलपुढें येऊन उभा राहिला व दारांतील विजेच्या दिव्याचा प्रकाश त्यांच्या तोंडावर एकदम पडला. त्यांनीं चट्कन् शुद्धीवर आल्यासारखें करून ' उघड दार ' असें गाडीवाल्यास सांगितलें.

गाडींतून उतरून त्याचे पैसे चुकते करून तोंडानें शीळ घालीत तेथें ओळखीचे कोणीं भेटल्यास त्यास ' Good Evening ' (सलाम) ' Shake Hand ' (हस्तस्पर्शविधि) करीत एका टेबलाजवळ खर्चीवर ते बसले. ' किती तरी नामी व्यवस्था व वेतबात हो ! ' फूडला ' (अन्नाला) तरी किती रुचि. ! नाहींतर आमचा बाबाजी स्वयंपाक करतो ! एकदां जे जुन्या चालीचे दोन चार जिन्नस करावयाला शिकला आहे तेवढेच काय ते. कांहीं पुढें नांव नाहीं. जुना मनुष्य स्वयंपाक फार नामी करतो, म्हणून मामांनीं दिला, पण व्यर्थ; सर्व जुनी तऱ्हा· ती आम्हांला काय पसंत ! येथील पहा किती ' क्लीन व टेस्टफुल ' (स्वच्छ व रुचिकर) पदार्थ असतात ते! इतक्यांत एक नोकर त्यांचे जवळ आला ; व ' काय काय आणूं सरकार ' म्हणून त्यानें त्यांस विचारिलें. आमचे वकीलसाहेब ह्या विचारांत अगदीं गुंग होऊन गेलेले, त्यांस त्यानें काय विचारलें याचें कोठें भान आहे ? त्यास पाहून ' आण कांहीं तरी ' येवढेंच ते म्हणाले. गणपतराव नेहेमीं तेथें येणारे. नानातऱ्हेचीं विलायती पक्कान्नें त्यांना फार आवडतात, हें याला ठाऊक. असें असून वकीलांनीं आज असा हुकुम केला, हें पाहून त्याला फारच आश्चर्य वाटलें असेल, व त्यानें आंत जाऊन ' बावड्यावरच्या वकीलाचें डोकें आज जरा बिघडलें आहे, असें आपल्या यजमानास सांगितलें असेल ' हें खास. नोकरानेंही ' कांहीं तरी ' म्हणून ' मटन चाप ' ' बॉइल्ड टंग ' ' टीबीफ ' ' हेरसुप ' आणि यॉर्कशायर पुडिंग ' आणून ठेविलें. पाण्याचे ऐवजीं सोडावाटर लेमोनेडच्या दोन बाटल्या ठेविल्या. गणपतरावांनीं त्यांतला बराच भाग पार केला. त्यांनीं जरा ' स्टिम्युलंट, म्हणून तांबडें पाणी मागितलें. त्याचाही एक ग्लास झोंकला. त्यांचें आत्मगत भाषण सुरू होतेंच. तें कांहीं कमी झालें नाहीं. उलटें या तांबड्या पाण्यानें त्यास उत्तेजन मिळालें ! त्यांनीं चिरूट पेटविला. तो ओढीत ओढीत एका आरामखुर्चीवर पडेल असतां, उत्तेजन मिळालेलें त्यांचें आत्मगत भाषण असें होतें--' ह्या काळ्या सांवळ्या पोरीनें मला अगदीं भाळून टाकिलें. मला अगदीं आ-

पल्या मुठींत आणिलें. 'आतां पुन्हां चौकशी करणार नाहीं' असा मीं निश्चय केला असून, तिनें तो निश्चय मला मोडावयाला लाविलें. माझ्यावर तिच्याच मनाचा पगडा विशेष बसला. तिचा पूर्ण अंमल मजवर बसला. आतां मला 'नाहीं' म्हणतां येत नाहीं. काय पहा! एका घटिकेंत तिनें मला कसें भुरळ घातलें! त्याचा शोध लावण्यास माझे अंगीं आतां ताकद नाहीं, असें म्हटल्यावर तिनें जेव्हां 'छे, तुमच्या अंगांत ताकद आहे, तुम्हीं केलेंच पाहिजे,' असें म्हटलें, तेव्हां माझें तोंड बंदच झालें. आयता मोकळा झालेंला होतों, तो पुन्हां या पंचाईतींत पडलों. आतां याचा पूर्ण पत्ता लाविल्याखेरीज मला सुटका नाहीं. मी आपल्यावर कसलें हें लचांड आणून घेतलें पहा! आतां काय त्याचें! सांपडूं नये तो सांपडलों खरा त्यांत. आतां ती कमळा जें सांगेल तें मुकाट्यानें ऐकणें भाग आहे. बायकांच्या तडाक्यांत सांपडला म्हणजे कला मऊ येतो तो पुरुष! तो पुष्कळ चैन करो, मेजवान्या झोडो, रांज साखरभात खावो, विद्वान असो, शूर असो, अचाट कृत्यें करो, कांहीं करो. तो जर स्त्रीच्या आधीन झाला तरच सर्व त्याचें हें वैभव! नाहींतर सर्व व्यर्थ. त्यांच्या तडाक्यांत कोणी सांपडला नाहीं, असें कसें होईल? स्त्री ही मोहाची मूर्तीच आहे. कापट्याची खाणच. निव्वळ विषकुंभच. हिच्या मुखावर मात्र अमृत पुरुषांला फसविण्याकरितां ठेविलें आहे. ज्याला म्हणून स्त्री आहे, तो मग कितीही बाहेरच्या लोकांना कडक असो, तो तिच्यापुढें मऊच. ह्या बायकांचे मनांतलें खरें कधीं कळावयाचें नाहीं. घरांत सदा धांदल, सदा बडबड सुरू आहेच त्यांची भांडण काढावयाला उशीर नाहीं. घरीं जर भांडायाला कोणी नसलें, तर त्या शेजाऱ्या बरोबर तरी भांडतील. दहीं वाळत घालून भांडणाऱ्या बायका. सर्व दुःखाचा पाया एक स्त्री, असें जें मोठमोठ्या विरक्त पुरुषांनीं म्हटलें, तें खोटें काय? अनुभवानींच त्यांनीं हें ठरविलें आहे. कापट्य व चांचल्य ह्या दोन मूलतत्वांच्याच त्या बनल्या आहेत. स्त्रियांचे हातून ज्या कांहीं या जगांत येवढ्या उलाढाली होतात, त्यास कारण त्यांचें चांचल्य. शांतता ही त्यांना कशी माहीतच नाहीं!! 'कर्तुं अकर्तुं अन्यथाकर्तुं' शक्ति यांचे अंगीं आहे. ह्या काय कमी आहेत? 'सेमीरामीस' 'क्लीओपाट्रा' 'जोन आफ् आर्क' 'क्वीन

ह्या मनांत आणा, म्हणजे बायका काय आहेत तें तेव्हांच लक्षांत येईल. त्या कोणच्या वेळेस काय करतील याचा नेम नाहीं. स्त्रियांची अति आश्चर्याची, धाष्ट्र्याची, अति कापट्र्याची व अति लबाडीची कृति पाहणें असेल, तर युरोपियन स्त्रियांकडे पहा. स्त्रिया येथून सर्व एकच. अमेरिकेंतल्या काय, युरोपांतल्या काय, आणि आमच्या एथल्या काय? एखाद्या पुरुषाला घोंटाळ्यांत घालण्याचें त्यांचें मनांत आलें कीं पुरे. सर्व साहित्याची जय्यत तयारी. घातलाच त्याला पेचांत. पाहिजे तें करतील, पण आपला हेतु सिद्धीस नेल्याखेरीज सोडणारच नाहींत. राईचा पर्वत करण्याचें त्यांचे अंगीं सामर्थ्य आहे. ह्या स्त्रिया अबला ह्मणे! सूर्याच्या अंगीं उष्णता नाहीं, असें ह्मणणारा जितका शहाणा गणला जाईल, तितकाच तोही गणला जाईल. सबल काय तर त्याच. महत्वाकांक्षा व हातांत धरलेलें काम कितीही अडथळे आले तरी शेवटास नेण्याचा त्यांच्यात्र अंगीं दम-किति असतात, आणि भातां काय आमच्या बायकांना आपल्या पश्चात्य भगिनींप्रमाणें विचारस्वातंत्र्य व शारीरस्वातंत्र्य पाहिजे. आहे! होय, तेवढें त्यांस मिळूंद्या, कीं मग आह्मां पुरुषांना त्यांच्या वशिल्यानें कलेक्टरच्या, जज्जाच्या व फार तर काय एखादे वेळस गव्हरनरचीही जागा खास मिळणारच. फार तर काय, इंग्लंडच्या पार्लमेंटमध्यें मेंबरच्याही पण जागा मिळतील. फार चांगलें आहे. त्यांना हें स्वातंत्र्य मिळूंद्या. कांहीं हरकत नाहीं. त्यांना ब्यारिस्टर होऊंद्या, डाक्तर होऊंद्या, पंडित होऊंद्या, प्रोफेसर होऊंद्या, सेनाधिपति होऊंद्या, कायदे कौन्सिलचे मेंबर होऊंद्या, काय पाहिजे तें होऊंद्या—पण त्यांनीं तेवढें आपल्या स्वभावाचें चांचल्य सोडिलें पाहिजे—मग काय पाहिजे तें होऊंद्या. ' गणपतरावांनीं तोंडांतला चिरूट काढला; व त्याची राख नीट झाडून पुन्हां तोंडांत धरून एक हात आपल्या डोक्यावरून फिरवीत ते पुन्हां विचार करूं लागले. हा त्यांचा विचार मोठा त्वेषाचा होता. ' मीं ह्या स्त्रियांचा तिरस्कार करतों. पुरुषजातीचा नाश करण्याकरितांच ईश्वरानें त्यांच्या अंगीं हें ऐवढें धैर्य, कापट्र्य, महत्वाकांक्षा ,चांचल्य इत्यादि दुर्गुण उत्पन्न केले आहेत. ज्या गोष्टी पुरुषांच्या ठायीं असल्यानें सद्गुण ह्मणून वाटतात त्याच स्त्रियांच्या अंगीं दुर्गुण होतात!! खरोखर त्या फार निंदास्पद आहेत. फार लांब कशाला. हें चाललें आहे तेंच घ्याना. आ.

रंभापासून अखेरपर्यंत सर्व बायकांचें कृत्य. पहा कसें तें ! तो, ती फक्त सुंदर म्हणूनच एका कडू जातीच्या स्त्रीबरोबर लग्न करितो, आणि याच-मुळं त्याचा बाप त्याला एक कवडीही न देतां घरांतून घालवितो ; ह्याच स्त्रीची मृत्युवार्ता तो ऐकितो, व त्यानें त्याचें हृदय द्विधा होतें—केवढा धीराचा शिलेदार ! लढाईंत बकरीं कापल्याप्रमाणें माणसांला कापून काढणारा ! पायाखालीं मुडद्याची रास पडली तरी कैसभर डगणार नाहीं, पण या मृत्यूनें पहा कसें झालें तें !—पुढें तो एका स्त्रीच्या घरीं जातो व तेव्हांपासून पुन्हां दृष्टीसच पडत नाहीं ! आणि आतां माझी या स्त्रीची गांठ पडते ! तिचा माझ्यावर पगडा बसेल, असें आज सकाळपर्यंत माझ्या क्षुद्धां मनीं ध्यानीं आलें नाहीं ! याच स्त्रीच्या सांगण्यावरून मीं आतां वागणार. (अप्रासंगिक गोष्ट मनांत येऊन) आणखी ती पीडा माझ्यामागें झटली म्हणजे नी सगुणा. माझ्याबरोबर लग्न करण्याचा तिचा पूर्ण मनोदय आहे. मामांच्याही मनांत आहे. मला तिच्याबरोबर लग्न लावणें तें भाग पडणारच. परंतु मीं तें होतां होईल तितकें करून टाळीनच. तिची माझ्यावर फार प्रीति आहे. तिचा स्वभाव चांगला आहे. रूपानेंही चांगली आहे. आतां अगदीं तारुण्याच्या ऐन भरांत आहे. प्रत्यक्ष माझ्या मामाची लेक. लांबची नाहीं. माझीही तिच्यावर ममता आहे. सगळें खरें, परंतु खरा विचार केला, म्हणजे ह्या बायकांच्या तावडींत कधींही सांपडूं नये असेंच वाटतें. '

तोंडांतला चिरूट संपत आला. निःसत्व भाग फेंकून देऊन त्यांनीं होटे-लच्या मालकाला हांक मारून त्याचे पैसे चुकते केले. नोकर लोकांना चि-रिमिरी दिली. आमचे वकीलसाहेब मोठे उदार. जगांतील दुसऱ्या कोणच्याही गोष्टींची त्यांनीं कधीं काळजी घेतली नाहीं, त्याप्रमाणेंच ह्या नाशमूलक चवल्या, पावल्या, अधेल्या व रुपये यांचीही ह्यांनीं कधीं काळजी घेतली नाहीं. खरोखरच आमचे वकील हे ह्या गोष्टींत एक अपल्याला उदाहरणच होत. कारण, मोठमोठे तत्त्ववेत्ते, पांच पांच डिग्र्या मिळविलेले, 'मॉरल फिलॉसफीचे' (नीतिशास्त्राचे) पारायणांचीं पारायणें केलेले, हें जग म्हणजे निव्वळ भ्रम आहे, ही सर्व माया आहे असे वाद करणारे मोठमोठे पंडित, वेदांतावर अहोरात्र विचार करणारे, असे अनेक विद्वान लोक तर पैशाच्या कामांत मोठे तत्पर. एक पैचीही कसर त्यांना खपावयाची नाहीं !! पैशाची

गोष्ट आली कीं प्रत्यक्ष बाप, भाऊ किंवा भावाची तरुण निराश्रित विधवा इला देखील ओळख द्यावयाची नाहीं, मग मदत तर लांबच राहिली. उलटें तिच्याजवळ जें कांहीं खिडुकमिडुक असेल तें तिला खोटी माया दाखवून उपटण्याला मात्र तयार! मग एखाद्या होटेलमधल्या चाकरांना चिरिमिरी कोठली? ते कां कलेक्टर इत्यादि गौरकाय अंमलदाराचे शिपाई आहेत, ह्मणून बोवा कांहीं चिरिमिरी दिली तर एखादे वेळेस खावंदाची भेट लवकर करविनील व लांगूलचालनाला संधि देतील! पण या मंडळींत ही एक अपवादक गोष्ट आहे. ती ही कीं, विश्वयोषिता व द्राक्षारस यांत मात्र त्यांना केव्हां केव्हां हात सैल सोडावा लागतो! काय करतील बिचारे! पांच पांच डिग्र्या घेतल्याचें व मॉरलफिलासफीचें (नीतिशास्त्राचें) पारायण केल्याचें यावांचून सार्थकच होत नाहीं! त्याची ही सांगताच आहे!! एका पैकरितां वादविवाद करतील. जणूं काय 'मेटयाफिजिक्स' (आत्मतत्त्वशास्त्र) मधील 'Ego' अथवा 'Non-ego' याच्या अस्तित्वाबद्दल साशंकित मनानें मोठ्या जोरानें प्रतिपादन करीत आहेत! बरें असो. आमच्या गणपतरावांनीं तर त्यांना चिंरिमिरी दिली. व लागलेंच एक शिग्राम करून आपल्या बावडघावरच्या बंगल्यावर येऊन स्वस्थ निजले. झोंप लागेपर्यंत नारायणराव व त्यांची बहीण हेच सर्व त्यांचे मनांत. मधेंच ते मोठ्यानें हंसले आणि ह्मणाले, 'काय करावें, आज माझ्या मनांतून ती कमळा जातच नाहीं. काय मी इतका वेडा झालों!' अखेर बराच वेळ असा विचार करीत पडल्यावर त्यांना झोंप लागली.

दुसरे दिवशीं सकाळीं उठून प्रातर्विधि आटोपून चहा घेत ते बसले आहेत, तों टपाल आलें. त्यांत एक दोन वर्तमानपत्रें होतीं व एक पत्र होतें. या पत्रावर पत्ता सुवाच्य लिहिला होता. तें अक्षर पाहिल्यावरोबर हें कोणातरी स्त्रीनें लिहिलें आहे, असें मनांत येई. गणपतरावांनीं तो लाखोटा खालीं वर उलटापालट करून मागच्या बाजूला 'गारगोटी' ह्मणून पोष्टाचा छाप असलेला पाहिला. हातांतला लाखोटा खालीं ठेवून चहाचा एक घोंट घेऊन त्याकडे पाहत पाहत ते ह्मणाले, 'हँ, त्या पोरींचेंच पत्र. दुसरें कोण त्या भिकार गांवांतून पाठविणार? होय, तिचेंच. इच्या अक्षराचें व नारायणरावाच्या अक्षराचें वळण एकच आहे. अगदीं त्याच्या सारखेंच!' लाखोटा फोडला व पत्र बाहेर काढून घडी उलगडून वाचूं

लागण्याचे पूर्वी 'आतां त्यांत कमळा काय वरें म्हणणार ? माझ्या दादाचा शोध लावा; असेंच अर्धें टाकूं नका. ती महामाया शोधून काढाच. दुसरें काय ?' असें त्यांत असेल असें त्यांना वाटलें, पण ते पत्र वाचूं लागतात तों हें कांहींच नाहीं. येवढेंच त्यांत होतें 'हीं दोन पत्रें पाठविलीं आहेत. जरूर असेल तोंपर्यंत ठेवून मग परत करा. आपली, कमळा चव्हाण.' नारायणरावाची हीं दोन पत्रें होतीं. त्यांत, मुंबईहून जें पत्र पाठविलेलें होतें त्यांत 'आपण चीनाला निघालों, इकडे कांहीं निभाव लागत नाहीं' येवढेंच होतें. दुसरें होतें तें लग्न झाल्यावर लागलींच पाठविलेलें होतें. त्यांत त्यानें आपल्या प्रिय पत्नीचें पूर्णपणें वर्णन केलें होतें. इतक्यांत नुकताच प्रेमांकुर फुटून तो मोठ्या जोरानें पुढें वाढत आहे अशा वेळेस आपल्या प्रियेचें वर्णन केलेलें, मग तें किती बहारीचें असलें पाहिजे हें आपणच मनांत आणा. गणपतरावांनीं वरचेवर तीन वेळां तें पत्र वाचलें.

शेवटीं आमचे वकील उदास वृत्तीनें म्हणाले, 'या पत्रांत तिचें हें वर्णन करितांना जर माझ्या नारायणरावाला पुढें हें वर्णन एका प्रसंगीं अशा कामाला उपयोगीं पडणार आहे, असें जर कोणीं सांगितलें असतें, तर त्याच वेळेस त्याचा हात गळून पडला असता. यापैकीं त्याच्या हातून एक मात्राही पण पडली नसती.'

भाग २६ वा.

कमळाबाईचें पत्र येऊन जवळ जवळ आज पंधरा दिवस होत आले, तरी मित्रवियोगानें विव्हल झालेले आमचे वकीलसाहेब अर्जुन आपल्या बावडयावरच्या बंगल्यांत, कसें करावें, काय करावें, या विचारांतच दिवस घालवीत होते. रोज सकाळीं चहा घेऊन हळू हळू कोंवळ्या उन्हाची तिरीप खात 'अंडरसन गारडन' मध्यें एका बांकावर स्वस्थ चिरूट ओढीत हे बसत. या करवीरांत त्यांचे मित्र थोडे होते असें नाहीं. परंतु काय असेल तें असो, ते आतां पहिल्याप्रमाणें मंडळींत मिसळत नसत. सदा आपले एकटे, उदास, कांहींतरी विचारानें डोकें भरलेले असे असत. कधीं कधीं 'अंडरसन गारडन'मध्यें त्यांची मित्रमंडळी त्यांना भेटे, पण हे एक दिवसही त्यांच्याबरोबर हास्यविनोद करीत नसत. फार तर काय नुसत्या मोकळ्या मनानें त्यांच्याशीं बोलत देखील नसत. चैनी रंगेल वकीलमंडळी यांना नाच, तमाशे, बैठका, गाणेंबजावणें, इत्यादि करमणुकीच्या मजलशींस मोठ्या आनंदानें बोलावीत, पण हे तिकडे एक दिवसही गेले नाहींत. नारायणराव चव्हाण गुप्त झाल्यापासून त्यांना जगांतील सर्व तऱ्हेच्या मनाला आनंद देणाऱ्या गोष्टींचा फार वीट येऊन गेला होता. मोठ्या मिनतवारीनें आमंत्रण केलें, तरी हे 'पार्टीला'—मग ती कोणाचीही असो—येत नाहींत हें पाहून बाकीचे वकील मंडळीनें ठरविलें कीं 'ही स्वारी कोणत्या तरी एखाद्या × × × नादीं लागली असेल व तें मनाप्रमाणें घडलें नसेल म्हणून ही स्वारी अशी विरक्त झाली आहे, दुसरें काय?' ते यांना एखाद्या गाण्याच्या पार्टीला 'गोल्डन नाईट' (शनिवार) दिवशीं आमंत्रण करावयाला आले म्हणजे थट्टेनें म्हणत, 'अहो फक्कड, असे शुकाचार्य बनूं नका. एवढें काय त्यांचें? तिच्याकारितां कां डोक्यांत राख घालून जातां? आजचे पांखरू तरी पहा कसें आहे तें! अवाज तरी किती मधुर म्हणून सांगावा! असा मारू अवाजच आपण कधीं ऐकिला नाहीं. हिच्या पुढें तानसेन काय? राव, तुम्ही एकदां पहा, म्हणजे ही विरक्तता किती वेळ टिकते ती पाहूं. याच बरेंका! तुम्हीं आल्याखेरीज मजा नाहींहो. सर्व मंडळीचा फार आग्रह आहे. परवां इच्याच गाण्याला

त न्यायमूर्ति रावबहादूर आले होते. त्यांनीं तें प्रकरण पाहून त्या वेळेला तुमची फार फार आठवण केली.'

याप्रमाणें नुसत्या गाण्याच्या पार्टीचेंचसें काय, मेजवान्या, नाटकें, म्याचीस, बाल इत्यादिकांचींही त्यांना आमंत्रणें येत, पण यांनें एकच कीं 'सध्यां मला बरें नाहीं. माफ करा. जरा बरा झालों कीं आहेंच तुमच्या सेवेला तत्पर. मी कोठें पळून जातों कीं काय. मी मंडळीच्या बाहेर नाहीं.'

आमच्या वकील साहेबांला हे चैनीचे प्रकार कसले सुचतात ? त्यांना मनीं, ध्यानीं, स्वप्नीं, जलीं, काष्ठीं, पाषाणीं नारायणराव दिसत होता. प्रल्हादाला ज्याप्रमाणें सर्व चराचर वस्तूंचे ठायीं श्रीलक्ष्मीकांत नारायण दिसत, त्याप्रमाणें आमच्या वकील साहेबांना हे आनंदीकांत नारायणराव दिसत होते. सदा त्याचा शोध कसा लागेल हाच विचार. दुसरें कांहीं नाहीं. आपल्या मामाच्या घराबर मोठें अरिष्ट आलें आहे. म्हाताऱ्यानें इतके दिवस आब्रू मिळविलेली आज जाऊं पहात आहे. ही एकदां काळोखी त्याला लागली कीं तो फार दिवस मग जगणार नाहीं. असे विचार रोज त्यांचे मनांत शेंकडोंदा येऊनं त्यांना फार वाईट वाटे. कधीं कधीं ते म्हणत, 'तिला मीं सूचना दिली आहे त्याप्रमाणें ती पळून कोठें तरी कां जात नाहीं? मीं तिला ही फार चांगली संधि दिली आहे. तिचा उपयोग ती कां करून घेत नाहीं कोण जाणे !'

या पंधरवड्यांत गणपतरावांला त्यांच्या मामीचीं व सगुणाताईचीं दोन चार पत्रें आलीं. सगुणाताईच्या पत्रांत नवलविशेष कांहीं असावयाचें नाहीं. 'बाबांची तब्यत ठीक आहे. तुमच्या मामीसाहेब कुशल आहेत. नेहमींप्रमाणें आनंदांत, मजेंत, चैनींत, सर्वांशीं आपल्या अधिकाराचा तोरा मिरवीत आहेत,' एवढेंच.

ह्याच पंधरवड्यांत शिरोळाहून तेथील बोर्डिंगस्कूलचे हेड मास्तर अण्णासाहेब उखळवेंवे यांचेंही पत्र आलें. त्यांत 'बाळू चव्हाण हा कुशल आहे. त्याला आतां अक्षरओळख चांगली झाली आहे, पण जोडाक्षरें मात्र अजून नीट येत नाहींत. तुकोजीरावांनीं मुलाला घराकडे पाठवून द्या झणून दोन चार वेळां निरोप पाठविला होता, परंतु आपण सांगितल्याप्रमाणें त्याला मुळींच तिकडे पाठविलें नाहीं. पुन्हा एकदा त्या ह्याताऱ्यानें मुलाला कांहीं खाऊ झणून तळलेले पोहे, पेढे व चांचणीच्या बेसनाचे लाडू याचा एक

खवा पाठविला होता. परंतु तोही आपल्या हुकमाप्रमाणें, "पोहे हे अमांश. कारक आहेत व पेढे, लाडू या गोड पदार्थांनीं मुलाला जंत होतात" याकरितां असे जिन्नस देण्यास आम्हांस सरकारची परवानगी नाहीं, असें निमित्त करून परत पाठविला, ' असें लिहिलें होतें.

हा पंधरवडा संपतां संपतां निहालगडाहून सगुणताईचें आणखी एक पत्र आलें. त्यानें तर यांचें मन फारच उदास झालें. आतां पुन्हां त्या दुष्ट कपटी स्त्रीचा समागम होणार व जिनें आपल्याला घालवून दिलें तिच्याच घरीं पुन्हां नाक मुठींत घेऊन जाणें आलें, यामुळें त्याला फार वाईट वाटलें. सगुणाताईचें पत्र असें होतें:—

"... ... ... विज्ञापना विशेषः—बाबांची प्रकृति बिघडली आहे; बरीच बिघडली आहे. पण घाबरण्यासारखें कांहीं आहे असें अगदीं नाहीं. एक दिवसा आड थंडी वाजून ताप येतो. घांस लवकर येत नाहीं, त्यानें अगदीं थकून जाऊन नेहमी अंथरुणावर निजूनच असतात. तुमची ते रोज दहा वीसवेळां आठवण करितात. एकदां येऊन भेटून जा. तिनें घरांतून जा म्हटलें म्हणून बाबांवर कां रागावयाचें आहे? ती कोण? काल आलेली पाहुणी. तिच्यावर कां रुसावयाचें? आपल्याला बाबांकडे पाहणें आहे. हें पत्र पावतांच निघून या. येथें आल्यावर मीं पत्र पाठविलें होतें, म्हणून बाबांजवळ बोलूं नका. कळावें हे विज्ञापना.

आपली लाडकी—कीं काय म्हणूं-
सगुणा. "

हें पत्र वाचून आमच्या वकीलांच्या मनास फारच अस्वस्थता प्राप्त झाली. त्यांना अतिशयच वाईट वाटलें. त्या झपाटयांत ते म्हणाले, ' मीं हें केलें हें ठीक केलें काय? माझ्या मनांतिल शंका योग्य प्रसंगीं घटाला लावायाच्या, म्हणून बेत केला, तो ठीक झाला काय? मीं बापाप्रमाणें ज्याला मानतों त्याला, उगीच पुरती चौकशी केल्याखेरीज, ही गोष्ट सांगून दुःखांत पाडूं नये, म्हणून मीं एवढी खटपट केली, ती सर्व व्यर्थच होती काय? आतां मीं गेल्यावर, ते अगदीं काठिनावस्थेंत असले, तर मग कसें? समजा, अगदीं नाकीं सूत धरलें आहे. अगदीं प्रायोपविष्ट झाले आहेत व ती आपल्या मांडीवर त्यांचें डोकें घेऊन बसली आहे, व तेथेंच ते आतां राम म्हणणार, तर मग कसें? मग मीं काय करावें? मोठी पंचाईत आली खरी. '

जावें कीं न जावें, यावद्दल त्यांनीं पुष्कळ विचार केला. अखेर जावें असें ठरविल्यावर लागलींच आपली 'डागकार्ट' जोडून 'ब्याग' घेऊन स्टेशनावर ते गेले. सगुणाताईचें पत्र पोहोंचल्यापासून पांच सहा तासांचे आंत गणपतराव निहालगडास पोहोंचले. तेथील स्टेशनमास्तराजवळ आपली ब्याग ठेवून ते आपल्या मामाच्या मोतीचौक वाडयाकडे येण्यास मोठ्या जलदीनें निघाले. एखादें जवळचें नातेवाईक आजारी असल्याचें पत्र आलें आणि त्याला भेटावयाला निघालें झणजे त्या आजारी माणसाचें घर जसजसें जवळ येऊं लागतें, तसतशी हृदयांत धडकी भरते, वाईट कल्पना मनांत येतात, व आतां आंत गेल्यावर आपण काय पाहूं, याची फार काळजी पडते. तसेंच आमच्या गणपतरावांलाही झालें. मोठा रस्ता सोडून चिंचेच्या वनांतल्या रस्त्याला ते वळले, तोंच त्यांच्या मनांत विलक्षण कल्पना येऊं लागल्या. ती चिंचेचीं झाडें, लिंबाचीं झाडें, ती कमान सर्व यांच्या पूर्ण ओळ खीचीं. पण तीं आतां यांना सर्व नवींशीं वाटूं लागलीं. जिकडे तिकडे यांना उदास दिसूं लागलें. ह्या रस्त्यानें ते हजारों वेळां आले गेले असतील व या कमानीपासून दिल्लीदरवाजा फार लांब नाहीं, हे त्यांना पूर्णपणें माहीत होतें. परंतु आतां त्यांना तो रस्ता संपतां संपेना ! ह्या कमानीपासून दरवाजा किती दोन मैल आहे कीं चार मैल आहे किंवा आपण वाट चुकलों, असे अनेक उदास विचार मनांत येऊं लागले.

गणपतरावांची लहानपणींच आई मेलेली. तेव्हां मामानेंच त्यांचें संगोपन केलेलें. सर्व लहानपण मामाच्या घरींच गेलेलें. सर्व कांहीं गोत मामाच. प्रत्यक्ष बापाची देखील इतकी माया नाहीं, तेव्हां मामा आजारी पडल्याचें ऐकून गणपतरावांला कसें वाईट वाटणार नाहीं ? खरोखर प्रत्यक्ष बाप आजारी पडल्याचें जर पत्र ह्यांना आलें असतें, तर गणपतराव कांहीं इतक्या घाईनें व काळजीनें धांवत गेले नसते.

जेव्हां ते मत्स्यपल्व लाजवळ आले, तेव्हां त्यांच्या मनांत आलें कीं, 'माझे मामा आज जर मेले, तर ह्या सर्व जाग्याचें काय बरें होईल ? कोणी परकी लोक येथें येऊन राहतील कीं काय कोण जाणे ! व एवढ्या काळजीनें सुशोभित केलेल्या मत्स्यपल्वलावर मौजा मारितील ! ह्या इंद्रभुवनासही लाजविणाऱ्या दिवाणखान्यांत विलास करतील, नाहीं बरें ?'

हे विचार मनांत येऊन गणपतरावांचा गळा दाटून आला व डोळे पा-

ण्यांनें डबडबले. त्यांनीं चट्कन खिशांतला हातरुमाल काढला, व डोळे पुसले; दारांत चौकीपाशीं जाऊन 'कोण आहेरे चौकीवर' असें झटलें. हा ओळखीचा आवाज ऐकून एक शिपाई एकदम पुढें आला व त्यानें त्यांस रामराम केला. चौकींतल्या दिव्याचा उजेड गणपतरावांच्या तोंडावरच नेमका पडला, त्यामुळें हे फार घाबरून आले आहेत, असें त्या शिपायास तेव्हांच दिसलें.

तो शिपाई म्हणाला, 'बर केल रावसाहेब लवकर आलां, आतां जरा सरकारासनी वर वाटल. आपली लई आउव करत्याती. सरकार वर निजल हायत. माईसाहेब आन् ताईसाहेब येरवळीच जेऊनशानी वर त्यांच्याजवळ बसल्याती. 'सोवळेकरी' अजून आंतच हाय, जरा वायस खा अन् आपूनबी वर जाऊन बसा.'

गणप०—छे कांहीं नको. अगोदर मामासाहेबांला भेटून येतों आणि मग काय तें—जाऊं कारे एकदम वर? कां झांप बिप लागली असेल?

शि०—नाहीं सरकार, तसं काय नाय. उगीच वायसा जाळ येतोया. जाकी वर हरकत! आन् आपल्याला?

ते दिवाणखान्यांत येऊन उजव्या हाताच्या जिन्यावर वळले तों दिवाणखान्यांतील जगदेवरावांची नेहमीं बसण्याची किनखाबानें मढविलेली भव्य आरामखुर्ची रिकामी पाहून त्यांस फार वाईट वाटलें. जेव्हां पहावें तेव्हां जगदेवराव दिवाणखान्यांत ह्याच खुर्चीवर बसलेले असत, तेव्हां ती अशी अनाश्रित पाहून त्यांना कां बरें वाईट वाटणार नाहीं?

जातां जातां गणपतराव आमच्या वाईसाहेबांच्या वस्त्रपरिधानगृहांतून गेले. तेथें तिची ती मोठी तसबीर त्यांनीं सहज पाहिली. मागें पाहिली तेव्हां तिचें काम सगळें पुरें झालें नव्हतें. आतां अगदीं ती पूर्ण झालेली होती. जातां जातां 'आतां मात्र फार चांगली दिसते,' एवढेंच म्हणून जगदेवराव ज्या खोलींत निजले होते त्या खोलीच्या दारांत जाऊन हे उभे राहिले. जगदेवरावांचा नुकताच थोडा डोळा लागला होता. निहालकुवरबाई पलंगाजवळ एका खुर्चीवर बसली होती. जगदेवरावांचा एक हात पांघरुणांतून बाहेर उघडा पडला होता, तो या पेलवांगीनें आपल्या कोमल हातांत धरला होता. पलीकडे एका लहानशा क्यानव्हसच्या आरामखुर्चीवर सगुणा, वर टांगलेल्या हंडींतल्या ज्योतीकडे पाहत होती. तेथील सर्व सामान

जिकडे तिकडे व्यवस्थेनें ठेविलेलें होतें. एक वृद्ध पुरुष पलंगावर निजला आहे व एका तरुण व सर्वांगसुंदर स्त्रीनें त्याचा एक हात आपल्या सुकुमार करांत धरला आहे व दुसरी एक युवती लाकडी छताकडे वर टक लावून पहात आहे व जिकडे तिकडे अगदीं शांतता वास करीत आहे, या देखाव्याचें चित्र काढण्याचें जर कोणीं एखाद्या कुशल चित्रकारानें मनांत आणिलें, तर खरोखरच फार हृदयंगम हें चित्र निघेल ! निहालकुवरबाई त्या दिवशीं नाहली असल्यामुळें तिचे ते मोकळे, लांब, सडक, कमरेच्याखालीं लोळणारे, काळेभोर, कांहीं गळ्यांत आलेले, व कांहीं पाठीवर लोळणारे, केश पाहून व तो रत्नकंकणांनीं युक्त असा नाजूक हात, त्या भव्य रुंद कांबीच्या मनगटावर ठेविलेला पाहून, पौराणिक कालांतील ,एखादी महान् पतिव्रता साध्वी, मनांत आल्यावांचून खचीत राहणार नाहीं !

आपण आंत गेलों तर आपल्या पावलांच्या आवाजानें कदाचित् मामा जागे होतील, ह्मणून आंत जावें कीं न जावें, असा विचार करीत गणपतराव उंबऱ्यावरच उभे राहिले. ते आपल्या पावलांचा आवाज होऊं नये ह्मणून फार जपून हळूच आले होते, तरी त्यांचीं पावलें निहालकुवरबाईला ऐकूं आलीं व ती जगदेवरावांकडे जी टक लावून पाहत होती, ती एकदम मागें वळून पाहून हळूच कांपऱ्या स्वरानें व एकदम चेहरा बदलून 'कोण ? गणपतराव !' असें ह्मणाली.

हळू बोल, गप्प बैस असें सांगण्याच्या हेतूनें सगुणाताईनें एक बोट आपल्या नाकापुढें उभें धरिलें व आपल्या आईकडे पाहिलें. तिनें गणपतरावांला खुणेनें आंत या म्हणून सांगितलें व जवळ आल्यावर खुर्ची दाखवून 'आलां, बरें केलें' असें हळूच म्हणाली. गणपतराव खुर्ची घेऊन पलंगाजवळ त्याच्या पायथ्याशीं जाऊन बसले आणि इकडे जवळ ये, म्हणून त्यांनीं आपल्या मामेबहिणीला खुण केली.

ते बसल्यावर कांहीं वेळानें निहालकुवरबाईच्या चेहऱ्यावर पहिली कळा आली, असें त्यांच्या नजरेस आलें.

'फार कांहीं नाहींना? काळजीसारखें कांहीं नाहींना ?' असें गणपतरावांनीं फार हळू विचारलें.

आपल्या स्वामीच्या मुखाकडे पहात पहातच ती म्हणाली, 'छे' तसें कांहीं नाहीं. पण बाई फार काळजी वाटते. माझें मनच मोठें द्वाड आहे.'

आपल्याला पाहिल्याबरोबर इचा चेहरा असा उतरला कां, याचाच विचार गणपतराव करीत होते. ' तिनें आतां मजकडे पाहिलें, म्हणजे असें कां झालें तें ओळखतों. तिला आतां मजकडे पहावयाला लाविलों. तिची माझी दृष्टादृष्ट झाली कीं तिच्या मनांतलें खरें काय आहे, तें काढल्या-खेरिज मीं कधींच रहाणार नाहीं. माझ्यापाशीं असे छक्केपंजे कांहीं चालणार नाहींत, हें तिनें पक्कें लक्षांत बाळगावें. '

खोलींत जिकडे तिकडे शांत. फक्त जगदेवरावांच्या उशाशीं असलेल्या सोन्याच्या घडयाळाचा टिक टिक आवाज व निद्रावश झालेल्या जगदेवरावांचे व्हस्त दीर्घ श्वासोच्छ्वास मात्र मधून मधून ही शांतता मोडीत. गणपतराव निहालकुवरबाईच्या तोंडाकडे टक लावून पहात हळूच म्हणाले, ' खरोखरच मामी, तुम्हांला काळजी असलीच पाहिजे. तुमच्यापेक्षां तें अधिक मायेचें कोण आहे ? तुम्हांला काळजी न वाटेल तर काय होईल ? तुमचें सर्व सौख्य, वैभव आणि विशेषेंकरून तुमच्या जीवाची निर्भयता, यांच्यावरच सर्वस्वीं अवलंबून आहे. '

हे शब्द त्यांनीं इतके कांहीं हळू उच्चारिले कीं ते पलीकडे बसलेल्या सगुणेला देखील ऐकूं गेले नाहींत !

' होय मला तें सर्व ठाऊक आहे. कोणाला मला कांहीं अनिष्ट करावयाचें असेल, तर तें यांच्या (नवऱ्याकडे बोट करून) मार्फतच झालें पाहिजे. असेंच कीं नाहीं ? ' असें म्हणून ' यांच्या मार्फत ' म्हणतांना तिनें जगदेवरावांकडे बोट केलें होतें तें तसेंच धरून गणपतरावांकडे मोठ्या उत्सुकतेनें पाहिलें व तुमच्या म्हणण्यांत अर्थच नाहीं, असें दर्शविण्याकरितां थोडी गालांतल्या गालांत ती हंसली. गणपतरावांनीं आपलें डोकें मागें खुर्चीवर टेकलें व एक तळहात डोळ्यावर ठेवून स्वस्थ बसले. या मधल्या पडद्यानें आतां गणपतराव काय म्हणतात, त्यांचा चेहरा कसा होतो, हें तिला दिसण्याचें बंद झालें. ते अजून बारीक दृष्टीनें तिच्याकडे पहात होते. किंवा तिच्या विषयीं कांहीं विचार करीत होते. आणि ते कसला विचार करीत होते कोण जाणे ?

असे पलंगाजवळ सुमार तासभर बसल्यावर त्यांचे मामा जागे झाले. आपला भाचा आला, हें पाहून त्यांना फार समाधान वाटलें. ते म्हणाले, ' आलास बाळा; फार चांगलें केलेंस. अजारी पडल्यापासून

मीं रोज तुझी आठवण करितों. आतां तुला एवढेंच सांगतों, इच्याबरोबर नीट वागत जा. उगीच तंटाभांडण करूं नकोस बरें बाळा. अरे, ती कोणी परकी कां आहे ? जरी ती तरुण, सुंदर आणि—आणि—आणि—तरी तुझी—आहे समजलास कां गणू ?' गणपतरावांनीं आपल्या मामाचा हात प्रेमानें घट्ट धरिला व खालीं मान करून ते मोठ्या गंभीर स्वरानें झणाले 'समजलों, मामा, तुमचें झणणें मला सगळें कळलें. त्यांचें तें कांहींही असो. मला ती मातोश्रिच आहे. त्यांच्या आंगीं कितीही वशाक्रिया असो व कितीही चित्तविलोभनत्व असो, मला काय त्यांचें ? हें तिलाही पण पूर्णपणें माहीत आहेच.'

निहालकुवरबाईनें आपला खालचा ओंठ जरा दांतांत धरून पुन्हां लागलींच सोडून गणपतरावांस उत्तर दिलें, 'काय बाई वेडयासारखें बोलतां ? नाहीं तेंच तुमचें बोलणें. मजसारख्या तरुण पोरीला तुम्ही भाचे शोभत नाहीं, असें मीं कधीं काळीं झटलें असेन तर असेन, तेंच आपलें घेऊन बसावयाचें. एवढ्यावरूनच तुम्हीं झणतां कीं नाहीं ? माझ्या मनांत कांहीं—'

असें अर्धेंच बोलून जरा ती घुटमळली व पुढें बोलणार इतक्यांत प्रतारावं सरलष्कर आपल्या वैद्याला घेऊन जगदेवरावांची प्रकृति पाहण्यास आले, त्यामुळें तिचें बोलणें तसेंच राहून गेलें.

नेहमींप्रमाणें या वसा झाल्यावर वैद्यानें जगदेवरावांची नाडी पाहिली. त्यांना स्वतःला दोनतीन प्रश्न विचारले. सगुणाताईला व निहालकुवरबाईलाही कांहीं प्रश्न विचारिले. व 'आज प्रकृति बरी आहे. आतां लवकरच गुण पडेल' असें सरलष्करांस सांगितलें. सरलष्करांनीं जगदेवरावांस 'घाबरूं नका. जपून असा. लवकर बरे व्हाल' असें कांहीं उपदेशपर व धैर्यपर सांगितलें. व 'येतों आतां' असें म्हणून थोडा वेळ बसून मग निरोप घेऊन परत जाण्याकरितां ते दोघे निघाले. गणपतरावही उठले व 'जिन्यांत अंधेर आहे दिवा दाखवितों' असें म्हणून दिवा घेऊन त्यांच्याबरोबर निघाले.

'नको, नको गणपतराव, कशाला पाहिजे दिवा ? मला माहीत आहे जिना. मीं रोज येणारा. मीं कां पायऱ्या चुकतों' असें सरलष्कर मोठ्या अदबीनें म्हणाले.

गणपतरावांनीं ऐकिलेंच नाहीं. ते तिघेही जिना उतरून खालीं दिवाणखान्यांत आले. खालीं आल्यावरोबर गणपतरावांनीं जिन्याचें दार लावून घेतलें. आतां एकदम गाडींत बसण्यालाच सरलष्कर येतील असें समजून वैद्यबोवा दिवाणखान्याबाहेर थेट जाऊन उभे राहिले. वैद्यबोवा बाहेर गेले, आपण व सरलष्कर दोघेच दिवाणखान्यांत आहों, असें पाहून गणपतराव त्यांस म्हणाले 'जरा आपल्याबरोबर कांहीं बोलावयाचें आहे. बसा येथें खुर्चीवर. गुप्त आहे. कोणाला कळतां उपयोगी नाहीं. आपण कां सांगतां म्हणा, पण उगीच सूचना केली.'

प्रतापराव (खुर्चीवर बसतां बसतां) हो अलबत असें कोठें झालें आहे कीं काय ? आतां तुम्हीं आपल्या मामाबद्दल विचारीत असाल, तर मी खात्रीनें सांगतों कीं त्यांच्या जिवाला कांहीं धोका नाहीं. ती काळजी अगदीं सोडा. तसेंच कांहीं भिण्यासारखें असतें तर लागलींच तार करून करवीरच्या डाक्टर साहेबांला आणिलें असतें.

गणप०—आपण त्यांच्याविषयीं काळजी घेतां हें अगदीं खरें आहे. याबद्दल मी आपला फार आभारी आहें. आपल्यापेक्षां मी काय अधिक करणार ? परंतु मी आपल्याला मामा विषयीं नाहीं विचारीत. मला दुसऱ्याच एका व्यक्तिविषयीं कांहीं विचारावयाचें आहे.

प्रताप०—खरेंच काय ?

गणप०—ती व्यक्ति कोण झणाल, तर कांहीं दिवसांपूर्वी आपल्या घरीं चंपाबाई झणून मास्तरीण होती ती, व सध्यां निहालकुवरबाई झणून माझी मामी झाली आहे ती.

प्रतापरावांनीं मोठ्या आश्चर्यचकित मुद्रेनें गणपतरावांकडे पाहिलें आणि उत्तर दिलें, ' गणपतराव, तिच्याविषयीं मला तें काय विचारणार ? तुम्ही कोणच्या हेतूनें मला असें विचारितां, हें माझ्या लक्षांतच येईना. कां बरें इतकी खोल चौकशी करितां ? यदाकदाचित् जगदेवरावांचें कांहीं—— झालें तर पुढें कांहीं—बेत आहे वाटतें ? व असल्या कामांत माझी मदत ! तुम्हीं मला तिच्याबद्दल कांहीं विचारूं नका. जगदेरावांच्या परवानगीवांचून मला कांहीं एक सांगतां येणार नाहीं, हें पक्कें लक्षांत बाळगा. माझ्या हातून तसें कधीं घडणार नाहीं. '

गणप०—तसें अगदीं मनांत आणूं नका. चंपाबाई मास्तरीण झणून

होती, तेव्हां देखील मी तिला पूज्य मानीत होतों, व आतांही परम पूज्य मानितों. ती केवळ एका सरदाराची बायको झाली म्हणून पूज्य मानितों असें नाहीं, तर ती माझ्या मामाची बायको म्हणून मी विशेष पूज्य मानितों. तिच्या ठिकाणीं मी पापवासना कधींही ठेवणार नाहीं. याकरितां मी विचारितों तेवढें आपण कृपा करून सांगितलेंच पाहिजे.

प्रताप०—(मोठ्या तिरस्कारानें) सांगितलेंच पाहिजे ?

गणप०—होय. आपण माझ्या मामाचे मित्र आहां. त्यांच्याबरोबर लग्न होण्यापूर्वी ती आपल्या येथेंच होती. आपणच लग्न जुळवून दिलें. 'आपल्याला कोणाचा आश्रय नाहीं,' असें तिनें आपल्याला सांगितलें. 'या जगांत आपल्याला कोणी भाऊ नाहीं बंद नाहीं, इष्ट नाहीं मित्र नाहीं, कोणी नाहीं' असें तिनें मामांला सांगितलें. एवढीच मला कायती तिची माहिती आहे.

प्रताप०—मग यापेक्षां अधिक माहिती मिळवून तुम्हांला काय करावयाचें आहे ? काय कारण ? कळूं द्या.

गणप०—कारण ! ओ ! फार मोठें. कारण, कांहीं दिवसांपासून संशयानें माझें मन अगदीं वेडें होऊन गेलें आहे व दिवसेंदिवस ते संशय अधिकच होत चालले आहेत. व उगीच 'यांत काय आहे,' असें म्हणून व कांहीं तरी पोकळ पांडित्यानें माझे हे संशय फिटणारे नव्हेत. संशय उत्पन्न झाला म्हणजे तो घालविण्याकरितां कांहीं तरी मनाची समजूत करावयाची, अशी पुष्कळांची चाल आहे. पण तशानें माझी मजूत होणार नाहीं. माझ्या मामांबरोबर ज्या स्त्रीनें लग्न लाविलें आहे, ती त्यांना अगदीं योग्य नाहीं असें मला वाटतें. हिंमतबहादरीण होण्याची तिला योग्यता नाहीं. कदाचित् माझें मत चुकीचें असेल. ईश्वर करो आणि तसेंच होवो. आनुमानिक पुराव्याची जी कांहीं मी एक सांखळी तयार केली आहे, तिचा फांस एखाद्या निरपराधी माणसाला न बसो म्हणजे झालें. मनांतला संशय एकदां नाहींसा तरी करावा किंवा आहे तो पूर्णपणें बळकट तरी करावा, अशी माझी फार इच्छा आहे. आणि हें करण्याचा एकच उपाय आहे आणि तो हा कीं, आज ह्या तीन तास रात्रीपासून तों मागल्या सहा वर्षें पर्यंतची माझ्या मामीची सर्व कांहीं खडानखडा माहिती मला मिळाली पाहिजे. आज १८-च्या * * * महि-

ख्याची-२४ वी तारीख आहे तर १८-चया ..... महिन्याची २३ व्या तारखेपर्यंतची तिची सर्व दिनचर्या मला कळली पाहिजे.

प्रताप०—आणि तुम्ही हें चांगल्या बुद्धीनेंच करतां?

गणप०—होय. तिच्याबद्दल माझ्या मनांत जो कांहीं संशय आला आहे तो नाहींसा होण्याकरितांच मी एवढी खटपट करीत आहें.

प्रताप०—तो काय तुमच्या एकट्याच्याच मनांत आहे?

गणप०—आणखी एकाच्या.

प्रताप०—काय बरें त्याचें नांव? सांगण्याला कांहीं हरकत आहे?

गणप०—(निश्चयानें) नाहीं, मी सांगूं शकत नाहीं. मी आतां जें कांहीं बोललों त्यापेक्षां अधिक मला बोलतां येत नाहीं. पुष्कळ गोष्टींत माझ्यानें दृढनिश्चय धरवत नाहीं हें खरें. पण या गोष्टींत माझ्या मनाचा दृढनिश्चय झाला आहे. माझें मन फार चंचल आहे हेंही खरें, पण ह्या गोष्टींत माझ्या मनाचा दृढनिश्चय झाला आहे. मेहरबानगी करून चंपाबाईची सर्व हकीकत आपण मला सांगितलीच पाहिजे. आपण या कामांत मला मदत करण्याचें नाकाराल, तर मला दुसऱ्या कोणाची तरी मदत घेणें भाग पडेल. काय होईल तें होवो. संशयांत असें गटकाळ्या खाण्यापेक्षां खुद्द मामांलाच विचारिलें तर काय वाईट? आतां यापासून त्यांना फार वाईट वाटेल हें खरें, पण तें पत्करिलें.

प्रताप०—गणपतराव, तुमच्या या प्रश्नानें मला कितीतरी आश्चर्य आणि भीति वाटली म्हणून सांगूं! तुमच्या मामीविषयीं मला कांहींच सांगतां येत नाहीं. तुम्ही या कामांत मला हट्टी असें म्हणाल, परंतु माझा उपाय नाहीं. तिच्याविषयीं माझें फार चांगलें मत आहे. तिच्याविषयीं माझे मनांत वाईट येणारच नाहीं. इकडचा सूर्य तिकडे जरी उगवला, तरी माझें मन बदलणार नाहीं. आज तारखेपासून मागच्या सहा वर्षांची तिची माहिती पाहिजे आहे नाहीं?

गणप०—होय तसेंच.

प्रताप०—गेले वर्षी ..... महिन्यांत तिचें तुमच्या मामांबरोबर लग्न झालें, म्हणजे १८— माझ्या घरीं ती तीन महिने, फार झालें तर सव्वातीन महिने असेल एवढीच. १८—च्या ..... महिन्याच्या ..... तारखेस किंवा त्या सुमारास ती आमच्या येथें राहिली असें वाटतें.

गणप०—आणि ती कोठून आली ?

प्रताप०—करवीराहून मिस ..... नें पाठविली. ती करवीरच्या ग्रँट इन् एड फिमेल हायस्कूलची प्रिन्सिपाल आहे ती. तिची माझी फार ओळख आहे, तेव्हां इच्याबद्दल मी जास्त चौकशी केली नाहीं. मला ती वाईट माणूस देणार नाहीं, ही माझी खात्री आहे.

गणप०—मग त्या बेळेला आपण मिस ..... ला भेटलों होतां कीं काय ?

प्रताप०—छे, मीं नाहीं तिला भेटलों. एक मास्तरीण पाहिजे म्हणून मीं वर्तमानपत्रांत नोटिस दिली होती. त्यावरून ह्या चंपाबाईनें मला पत्र पाठविलें व 'आपल्याविषयीं मिस ..... ला माहिती आहे. तिच्या हाताखालीं आपण असिस्टंट आहों. तिला विचारल्यास आपली लायकी कळेल' असें तिनें त्यांत लिहिलें होतें. माझ्या मागें सत्रा हजार कामें. स्वतः करवीराला जाऊन चौकशी करण्याला मला कोठें सवड होती ? करवीरच्या खासगी फीमल हायस्कूलच्या मिस ..... ला विचारावें म्हणून लिहिलें आहे. व तेथें ती असिस्टंट आहे, तेव्हां ती चांगलीच असेल अशी माझी खात्री झाली. त्या मिस ..... ला मीं एक पत्र मात्र पाठविलें व इची हकीकत विचारली. तिनें, 'चंपाबाई चालीरीतीनें फार उत्तम आहे, हुशार आहे, गरीब व फार मनमिळऊ आहे,' असें उत्तर पाठविलें; अशी माझी खात्री झाल्यावर मीं इला मास्तरीण नेमिलें. गणपतराव, मला इच्या संबंधानें माहित आहे, तें एवढेंच.

गणप०—(खिशांतलें नोटबुक काढून) मेहरबानगी करून त्या मिस ..... चा तेवढा पत्ता सांगतां काय ?

प्रताप०—हो, ती ब्रह्मपुरीवर नंबर नऊच्या बंगल्यांत त्या बेळेस रहात होती.

गणप०—(एकदम कांहीं आठवल्यासारखें करून) हो हो हो ! खरेंच. ब्रह्मपुरीवर नऊ नंबरचा बंगला नव्हे का ? हा पत्ता मागें एकदां मीं ऐकिला होता. केव्हां बरें ? (जरा थांबून) हो ..... महिन्यांतच मिस ..... ची तार आपण फार अजारी आहों, भेटून जा म्हणून माझ्या मामीला आली होती, वाटतें. परंतु बंगला सोडून

ती कोठें दुसरीकडे राहिली व ती आतां कामाबरही नाहीं झणे, झणून तिचा पत्ता लागला नाहीं व भेट झाली नाहीं, असें कांहीं मामी सांगत होती खरी.

प्रताप०—मजजवळ त्या कधीं याबद्दल बोलल्या नाहींत.

गणप०—नसेल कदाचित्. त्या वेळेस मीं येथेंच होतों. आपण ए वढी माहिती दिलीत त्यामुळें मीं आपला फार उपकारी आहें. यानें मागच्या अडीच वर्षांची हकीकत कळल्याप्रमाणें झालें. अजून तीन वर्षांची हकीकत पाहिजे आहे. कशी मिळेल ती मिळों. आपल्याला मीं फार वेळ बसवून घेतलें. आपल्याला रात्र झाली. वैद्यबोवा बाहेर वाट पहातच आहेत. आपल्याला मात्र तसदी पडली. बरें आहे, राम राम.

गणपतरावांनीं सरलष्करांस मुजरा केला; सरलष्कर गाडींत बसायाला बाहेर गेल्यावर गणपतराव दार उघडून मामांच्या खोलींत जाण्याला निघाले. सुमारें पंधरा मिनिटेंच ते खालीं होतें. जगदेवरावांला पुन्हां झोंप लागली होती; व आमच्या बाईसाहेबांनीं पलंगाची मच्छरदाणी खालीं सोडून अंधेर केला होता. वस्त्रपरिधानगृहांत त्या दोघी मायलेकी कांहीं फळफळावळ खात व चहा पीत बसल्या होत्या. जगदेवराव निजले होते त्या खोलींत गणपतराव जाऊन त्यांस झोंप लागली आहे व आमच्या बाईसाहेब व सगुणाताई तेथें नाहींत, असें पाहून पलीकडे वस्त्रपरिधानगृहांत जेथें त्या बसल्या होत्या तेथें आले.

पुढें रुप्याच्या ताटांत फळफळावळ घेऊन निहालकुवरबाई बसली आहे, त्या रत्नमुद्रावलयांकित हस्तानें साखरलिंबाच्या फोडी करीत आहे. मोकळे असलेले केस वरचेवर तोंडावर व गळ्यांत येत, ते हात न लावितां मागें सरावेत झणून नाजूक मान वरचेवर मुरडीत आहे. हळूच वांकड्या नजरेनें सगुणाकडे मधेंच पहात आहे. तों गणपतरावांस उंबऱ्यांत पाहून 'या. बरें वेळेवर आलां. हें साखरलिंबूं किती तरी गोड आहे. खाता कां एक फांक ' असें मोठ्या विनयानें झणाली. ती या वेळेस फारच मनोरम दिसत होती; अगोदरच मनोरम, त्यांत अशा नाजूक कामांत व्यग्र झालेली, मग तो सुंदरपणा काय विचारावा ? गणपतरावांनीं ' आपल्या मर्जीप्रमाणेंच ' झणून उत्तर दिलें.

निहाल०—भगबाई ! पण तुमचें अजून जेवण झालें नाहीं. तूम्हांला

अजून जेवावयाचें असेल नाहीं? सांगूं कां सोंवळेकऱ्याला भात देवायाला

गणप०—छे छे. नको. निघतांनाच मी जेवण करून निघालों. आत अगदीं भूक नाहीं. थोडा चहा द्या झणजे पुरे.

गणपतराव तेथें सगुणाताईच्या पलीकडे जाऊन बसले. सगुणा एक पुस्तक मांडीवर देवून त्यांत अगदीं गढून गेल्यासारखी दिसत होती. बाप आजारी पडल्यापासून सगुणेच्या चेहऱ्यावर काळजीची छाया आली होती तिच्या नेहमींच्या अल्लड स्वभावांत जरा स्वास्थ्य व मांद्य आल्याप्रमाणे दिसत होतें. पुष्कळ वेळ तिला नकळत तिच्याकडे पाहून गणपतराव झणाले 'तूं अलीकडे किती खराब दिसतेस सांगूं!'

सगुणानें वर पाहिलेंही नाहीं, व उत्तरही कांहीं दिलें नाहीं. पण फक्त मान मात्र हालविली.

मग मोठ्या निष्काळजीपणानें ती झणाली, 'दिसत असेन झालें, त्याचें काय एवढें. तुमच्याप्रमाणें 'फिलॉसफर' (तत्ववेत्ते) होण्याचें माझ्या मनांत आहे. व ती आतां खटपट चालविली आहे. मी खराब दिसतें, कां चांगली दिसतें, याची कोणाला पंचाईत. होय कीं नाहीं गणपतराव वकील साहेब?'

'कसली तरी ही चमत्कारिक पोर गी' असें गणपतरावांना वाटलें. त्यांना पक्कें माहीत कीं जेव्हां जेव्हां आपली मामेबहीण आपल्याला 'गणपतराव वकील साहेब' झणते, तेव्हां तेव्हां कांहीं तरी त्यांत विशेष असतें.

'मीं तुला सहज चांगलें विचारतों, तर तूं अशी कां बोलतेस? असें खोंचून बोलणें मला समजतें बरें कां सगुणाताई. कोणाला पंचाईत झणजे? या बोलण्यांत कांहींच अर्थ नाहीं. होय मला पंचाईत. मला नाहीं कां काळजी? (जरा थांबून) तशीच आनंदपुरच्यांनाही नाहीं कां काळजी? त्यांना तर फार,' असें ते झणाले. सगुणानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. कपाळाला आठ्या घालून त्यांच्याकडे पाहिलें आणि पुन्हां वाचूं लागली. मग अर्धा प्याला चहा प्याल्यावर ते पुन्हा तिच्याकडे पाहून झणाले, 'काय वाचतेस?'

सगुणा०—'दैव व त्याचे खेळ.'

गणप०—कादंबरी आहे वाटतें?

सगुणा०—होय

गणप०—कोणाची ?

सगुणा०—'सौंदर्य आणि त्याचा परिणाम.' याच्या कर्त्यानेंच केलेली.

गणप०—काय ? फार चटकदार आहे काय ?

सगुणा०—(मान हालवून) नाहीं, तशी कांहीं म्हणण्यासारखी नाहीं.

गणप०—मग आज तुझा भाऊ येथें भेटायाला आला आहे, उद्यां सकाळींच जाणार, तेव्हां अशा वेळेस तूं हें वाचीत बसलीस हें फार उत्तम केलेंस ! खरोखरच यानें तुला भावाचें किती अगत्य, हें मात्र उघड दिसतें.

'काय ? उद्यां सकाळीं!' असें एकदम आश्चर्यानें निहालकुवरबाईनें विचारलें.

हें बोलतांना तिच्या चेहऱ्यावर जी आनंदाची झांक मारिली ती अतिशय क्षणिक होती, तरी आमच्या वकील साहेबांना ती दिसल्याखेरीज राहिली नाहीं.

गणप०—होय उद्यां सकाळींच गेलें पाहिजे. कांहीं जरूरीचें काम आहे. पुन्हां परवांचे दिवशीं येईन आणि मग मामा चांगले हिंडूं फिरूं लागेपर्यंत राहीन.

निहाल०—(मोठ्या काळजीनें) कांहीं फार घाबरण्यासारखी प्रकृत नाहीं ना ? तुम्हांला कसें वाटतें ?

गणप०—छे. अगदीं नाहीं. असें वाईट कां तुम्ही मनांत आणतां ? ईश्वर करो आणि तसा प्रसंग न येवो.

माईसाहेब मोठ्या गहन विचारांत गुंग होऊन त्या समोरच्या रिकाम्या चहाच्या पेल्याकडे पहात उगीच बसल्या. मग मोठा सुस्कारा टाकून म्हणाल्या.

निहाल०—खालीं तुम्हीं प्रतापरावांबरोबर फार वेळ बोलत होतां. इतके वेळ बोलत होतां, त्यानें मला मोठी काळजी लागली. इकडच्या प्रकृती-विषयींच बोलत होतां ?

गणप०—नाहीं, हेंच कांहीं सगळें नव्हतें.

ती पुन्हां चहाच्या पेल्याकडे पाहून थोडें थांबून म्हणाली, 'दुसरे विषय काय निघाले होते ? म्हटलें असतां तुमची त्यांची इतकी कांहीं सलगी नाहीं. एवढें काय गुप्त चाललें होतें ?'

गणप०—कांहीं नाहीं. कांहीं कायद्याच्या संबंधानें मला सल्ला विचारीत होते.

निहाल०—(मोठ्या उत्सुकतेनें) खरेंच कीं काय ? काय वरें तें ?'

गणप०—आह्मा वकीलांकडे हजार तऱ्हेचे हजार खटले येत असतात. आह्मांला ते दुसऱ्याला सांगतां येत नाहींत.

गणपतरावांनीं असें झटल्याबरोबर तिनें भिंवया जरा वर चढविल्या व खालचा ओंठ दातांत घट्ट धरिला . सगुणानें तें पुस्तक बाजूला ठेवून आंग मोडून त्यांच्याकडे पाहिलें. त्यांनींही मधून मधून आपल्या बहिणीला अप्रासंगिक असे कांहीं कांहीं प्रश्न विचारिले. अखेर मोठ्यानें जांभई देऊन डोळे चोळून सगुणा झणाली, ' गणपतराव , अहो वकील साहेब, तुमच्यानें एखाद्याला करमणूक मात्र फार नामी होईल. आज आपलें मन आपल्या जवळ नाहीं वाटतें. आतां उद्यां आलां झणजे तेवढें हुडकून घेऊन या. कोठें तरी अंडरसनबागेंत चरत असेल. अलीकडे पाहतें तों आपलें मन कधींच जाग्यावर नसतें. कोणी तरी ओढून नेलें आहे वाटतें. असेल कागलकरांची किंवा, गाईकवाडांची पोरगी झालें. झणूनच असे वेडे झालां. इतक्यांतच अहो असे भुलूं नका ! ' आमच्या वकीलांच्या मनांत ती कमळा घोळत होती. तिचा तो सांवळ्या रंगाचा सुंदर चेहरा त्यांच्या नजरेपुढें असलेला जाईचना ! तिचें बोलणें त्यांच्या कनांत अजून गुणगुणत होतें. ' तुम्हीं माझ्या दादाचा पत्ता लावतां, कां मीं लावूं ? ' हे शब्द आतां, त्या वेळेस आपल्या जवळ ती बोलत आहे असें त्यांना वाटत होतें. त्यांचें मन निहालगड गांवांतल्या खाणावळींत गेलें होतें. त्यांचें मन ज्या नदीच्या कांठीं नारायणराव नाहींसा झाला तिकडे भडकलें होतें. बरें येथें जाऊन तरी तें थांबलें होतें कां ? छे, अगदीं नाहीं. मनावर त्यांचा कांहीं दाबच बसेना. त्यांना तें बिलकूल ऐकेना. तें स्वेच्छाचारानें फिरूं लागलें. त्यांनीं पुष्कळ खटपट केली, पण व्यर्थ. कांहीं केल्यानें त्यांना तें आटपेना. कमळाच्या त्या गयावया तोंड करून बोलण्यानेंही आटपेना.

अगदीं दगडासारखे स्तब्ध उभे राहिले. कांहीं मिनिटें पुढें काय करावें हें त्यांस सुचेचना. मग कांहीं वेळानें मोठ्या उदासीनतेनें आपल्याशींच ते म्हणतात, 'कोणी मला एवढी उठाउेत सांगितली ? आतां काय करावें ? ती भाडें न देतां पळून गेली तेव्हां अर्थातच तिला पैशाची टंचाई पडली होती, हें खरें. तेव्हां ती कोठें तरी मालकाला पत्ता न लागवा अशा ठिकाणीं राहिली असेल. मी जर बालनटाईन सारखा फरडा बॅरिस्टर असतों, तर असल्या गोष्टींत पडण्याला मला वेळच न मिळता. मग एक मिनिट म्हणजे एक मोहोर, अशी माझी स्थिति झाली असती. मग प्रसंग आला तर असल्या भिकार खटल्यांत ब्रीफ घेतलें असतें कीं काय ? छे, नांव नको. मल्हारराव चा खटला किंवा विलसनचा किंवा कमिशनपुढें आज चाललेला क्राफर्डचा खटला मिळाला असता. बरें आतां काय त्याचें. सध्यां पुढें आहे तें खरें. '

याप्रमाणें विचार करीत रस्त्यानें हळूहळू ते चालले. त्यांस वोंटन पुष्कळ साहेब लोकांची लहान मुलें फिरावयाला घेऊन गेलेल्या आया भेटल्या.

त्यांस तरी विचारावें म्हणजे कांहीं शोध लागला तर लागेल, असें मनांत येऊन त्यांनीं त्यांपैकीं पुष्कळांस विचारिलें पण त्यांनीं आपणांस माहीत नाहीं असें सांगितलें. अखेर एका 'आयानें' त्यांना खालील माहिती दिली, त्यामुळें त्यांस बराच उपयोग झाला.

गणप०—येलू, आया, मिस ..... येथें कोडें राहते तें तुला माहीत आहे ?

आया—तुम्ही त्या नऊ नंबरच्या बंगल्याचे मालक काय ? तुमचें दोन वर्षांचें भाडें देणें आहे नाहीं ? ती—ती—ती.

पुढें ती बोलेना. घोटाळूं लागली व लाजंकमुद्रेनें गणपतरावांकडे पाहूं लागली.

गणप०—अशी घाबरूं नको. मी बंगल्याचा मालक नाहीं. माझें कांहीं खासगी काम आहे. मला तिचा पत्ता सांग तेवढा.

आया—मला नाहीं माहीत. मी तिच्याजवळ कांहीं दिवस होतें. इगीच एखाद्याचें वाईट कां काढा?

गणप०—असें उडवाउडवीचें उत्तर नको. मी कोणी सरकारी अमलदार नाहीं, खुशाल सांग. माझें कांहीं खासगी काम आहे. मागें मीं

भाग २७ वा.

गणपतराव पहांटेच्या गाडीनें निघून सकाळींच करवीरच्या स्टेशनावर पोहोंचले. उतरल्यावरोबर चावडयावर आपल्या बंगल्याकडे न जातां एक भाडयाचा शिग्राम करून ब्रम्हपुरीकडे ते निघाले. ह्या पत्त्यावर ज्याप्रमाणें आपल्या मामाला ती मास्तरीण सांपडली नाहीं, त्याप्रमाणें आपल्यालाहीपण सांपडणार नाहीं, असें त्यांना आधींच वाटलें होतें; परंतु मामाला पत्ता लागला नाहीं म्हणून काय झालें? आपल्याला तिचा कांहीं सुगावा लागेल व त्या सुगाव्यानें तिला हुडकून काढण्यावें त्यांनीं ठरविलें.

'त्या तारेंत काय लिहिलें म्हणून मामी सांगत होती? (जरा विचार करून आठवल्यासारखें करून) हं, ती मरायला टेंकली आहे, हीच तार. जर मला कर्मधर्मसंयोगानें ती मास्तरीण सांपडली, तर लिहान ती तार खरी कीं खोटी एवढें तरी तिच्याकडून बाहेर काढीन,' असें ते आत्मगत म्हणत, तों शिग्राम ब्रह्मपुरीवर आला. कोचमनास परत येईपर्यंत अमेके एके ठिकाणीं वाट पाहत शिग्राम उभा कर, असें सांगून गणपतराव लागलीच त्या मिस ..... च्या बंगल्याचा शोध करूं लागले. बराच वेळ हुंडा बंगल्यावरून त्या बंगल्यावर पायपिटी करून त्यांनीं नंबर नऊचा बंगला हुडकून काढला. तेथें दारांत लहान मुलाला घेऊन एक 'अया' बसली होती तीस 'मिस ..... आहेत कां?' म्हणून विचारिलें. तिनें आजन्मांत हें नांव ऐकिलें नव्हतें, तथापि 'आंत जाऊन मेम साहेबाला विचारून येतें, उभे रहा' असें त्यांस म्हणून ती आंत गेली व मेम साहेबांस विचारून येऊन त्यांस म्हणाली कीं, 'मेम साहेब बोलते कीं मिस ..... येथें होती, पण आपण येथें रहायाला येण्याचे आधीं तिला हें घर सोडून दोन महिने झाले.

हें ऐकून गणपतराव निराशेनें म्हणाले 'पण हा बंगला सोडून ती कोठें रहायाला गेली हें तुझी सांगूं शकत नाहीं कां?'

आया—नाहीं साब. मेम साहेब बोलते कीं, तिची व बंगल्याच्या मालकाची कांहीं भाडयाबद्दल तक्रार झाली आणि ती एकदम निघून गेली- कोठें गेली माहीत नाहीं. हें ऐकून कांहीं चलनवलन न करितां गणपतराव

येथें आलों होतों. तिची माझी ओळख आहे. आतां बंगला सांपडेना ह्मणून पंचाईत झाली.

आया—(जवळ येऊन, खांद्यावरच्या पोराला थोपटीत थोपटीत) तिची व त्या माळावरच्या साहेबाची लई दोस्ती. तो नेहमीं येथेंच पडलेला. दुसरे पुष्कळ साहेब येत्याती. रोज शाळेला जाईना. सरकारी कामांत चुका झाल्या. अखेर थोरल्या साहेबानें शिव्या दिल्या, तेव्हां राजीनामा दिला. मग पैसे कोटले ? पगार नाहीं कांहीं नाहीं. कर्न झालें. चैन चालली होती. अखेर चार महिन्यांची पोटगी राहिली तेव्हां त्या साहेबाबरोबर एक दिवस जाऊन लग्न लावून आली. व मला ह्मणाली, 'वेल्, आया, हम अबी शादी किया, हसबंटके तरफ जाता. तुमकू हम अबी नई मंगता.' मी आपला पगार मागितला, पण सारा एक महिन्याचाच दिला. बाकी पांच महिन्यांचा बुडविला रांडेनें. आतां त्या साहेबाला घेऊन त्या तिकडे लांब कात्यायिनि हिल्सवर जाऊन राहिली आहे. पाद्र्याच्या शाळेंत रोज मुलींला शिकवायाला सांजची येती. मोठी द्वाड रांड. आतां शादी करून राहिली खरी, पण आमचे हे येथले पाद्रीसाब तेथें नेहमीं पडलेले, आन् त्याकरतांच येथें शिकवाया येती.

गणप०—मग ती कात्यायनी-हिलसवर राहते ?

आया—होय साब. तिथच 'ग्वालडपार्क' बंगल्यांत आहे.

गणप०—(खिशांतून आठ आणे काढून) ही घे तुला चिरिमिरी. तूं मला माहिती दिलीस फार चांगलें झालें.

' आपण मोठे सरदार अहां. ' असें ह्मणून लवून सलाम करून पोराला ' बाबालोक रोना नई बेटा. '——असें ह्मणत ती निघून गेली.

गणपतराव शिग्राम उभा केला होता तिकडे सिधाले. व त्यांत बसून त्यांनीं कात्यायनी-हिलकडे तो हाकण्यास सांगितलें. जातां जातां ते मनाशीं ह्मणतात, ' ठीक, बरेंच काम झालें. ह्या आया अशा हलकट खऱ्या, पण एखादे वेळेस असा त्यांचे पासून मोठा उपयोग होतो. कोणच्या वेळेस कोणापासून काय उपयोग होईल हें कळत नाहीं. ह्या हलक्या लोकांकडून सोईनें मात्र काढून घेतलें पाहिजे ह्मणजे तेव्हांच बातमी. त्यांत थोडें थोडें मधाचें बोट लावल्यावर उशीरच नाहीं. ' बराचवेळ गेल्यावर कात्यायनी-हिलसच्या पायथ्याशीं येऊन ते पोहोंचले. येथें ह्मणजे चांगले

मोठे कामगार किंवा इतर सभ्य गृहस्थ रहात होते असें मुळींच नाहीं. रे॰ लवेकडचे कांहीं साहेबलोक व कांहीं हलके कामगार येथें रहात होते. वर जाऊन गणपतरावांनीं 'गोल्डपार्क' नांवाचा बंगला शोधून काढला. तेथें दारांत जाऊन खिशांतून एक कार्ड काढून त्यावर 'चंपाबाई, सरलष्कराच्या घरच्या मास्तरणीचा नातलग' अशा अर्थाचें इंग्रजींत आपल्या नांवाखालीं लिहून तेथें बसलेल्या चाकराजवळ ती कार्ड देऊन 'आंत मेम साहेबाला नेऊन दे' असें म्हणाले.

चाकर आंत जाऊन चिठी देऊन आला, व गणपतरावांस आंत नेऊन 'ड्राइंग रूम' मध्यें एका खुर्चीवर त्यानें बसविलें.

' गणपतरावांला तेथें बसून पांच दहा मिनिटें होतात न होतात इतक्यांत आपून मिस ..... (पण आतां मिसेस ..... तथापि आपण तिला मिस ..... (म्हणूनच म्हणूं) ते बसले होते तेथें आली. इंग्रजी रीतीप्रमाणें हस्तस्पर्शादि कुशलवृत्त विधी झाल्यावर खालील अर्थाचें इंग्रजींत दोघांचें संभाषण झालें.

मिस—(एका आराम खुर्चीवर बसून) गणपतराव वकील–कार्य ? काय काम तुमचें आहे ?

गणप॰—होय. आपल्याकडे माझें फार मोठें काम आहे. याकरितां कांहीं वेळ जास्ती लागेल याची माफी असावी.

मिस—वरें आहे. बोला काय तें ?

गणप॰—मीं ह्या चिठीवर लिहिलेल्या नांवाची स्त्री आपणाला ठाऊक आहे ?

मिस—होय, तिची माझी फार ओळख आहे.

गणप॰—तीं आपली शाळा सोडून गेल्यावरची तिची हकीकत आपणांस माहित आहे काय ?

मिस—फार थोडी. वास्तविक म्हटलें असतां, कांहींच नाहीं. चंपाबाईला सरलष्करांचे घरीं माझ्या शिफारसीवरून जागा मिळाली, व तिकडे ती गेली. तेव्हांपासून मी तिच्याबद्दल ह्या वेळपावेतों कांहीं एक ऐकिलें नाहीं.

गणप॰—पण आपला व तिचा पत्रव्यवहार असेलच ?

मिस—खरोखरच नाहीं.

गणपतराव कांहीं वेळ उगीच बसले. निराशेची छाया त्यांच्या चेहऱ्यावर दिसूं लागली.

गणप०—(पुन्हां) मागें 'आपण फार अजारी आहों, भेटून जा' अशी तिला आपण तार पाठविली होती नाहीं? गेल्या ... महिन्यांत वाटतें?

मिस—(त्यांच्या प्रश्नास मोठ्यानें हंसून) मी अशी तार कधींच पाठविली नाहीं. मीं अजूनपर्यंत कधींच अजारी पडलें नाहीं.

गणपतरावांनीं खिशांतून नोटबुक काढलें व त्यावर कांहीं सिसपेनीनें खरकटलें आणि' आपल्याला कांहीं महत्त्वाचे प्रश्न विचारणार आहें. त्यांचीं उत्तरें आपण मेहरबानगीनें द्या. मला मेहेरबानी करून त्या प्रश्नांचीं कारणें मात्र विचारूं नका. तेवढें माफ करा.' अशी तीस विनंती केली.

मिस—अलबत. चंपाबाईच्या गैरफायद्याचें मला कांहींच माहीत नाहीं. माझ्यापासून तिचें कधींही नुकसान होणार नाहीं.

गणप०—तर मग प्रथमतः आपल्याकडे ती कधीं आली तें सांगा पाहूं. कोणची बरें तारीख?

मिस—(मोठ्यानें हंसून व डौलानें मान हलवून), गणपतराव, असे प्रश्न विचारण्यांत कांहींच अर्थ नाहीं. मीं फार निष्काळजी मनुष्य आहें. माझ्या लक्षांत तारीख मुळींच रहात नाहीं. मी त्याबद्दल अगदीं काळजी घेत नाहीं. हें खरें आहे, कीं शाळेंत मुलींना तारीख लक्षांत ठेवा म्हणून नेहमीं मीं सांगतें. वुइल्यम दी कांकरर कधीं गादीवर आला? म्यग्ना कार्टा कधीं झाला? हें माहीत असलें पाहिजे हें मी नेहमीं मुलींना सांगतें. पण चंपबाई कधीं आली, हें मला मुळींच माहीत नाहीं. त्याला पुष्कळ दिवस झाले. ती आली तेव्हां मी तो रेशमी झगा मुंबईहून आणविला. एवढें खरें. बरें पण आपण टॉन्क्सला 'कन्सल्ट' करूं.

टान्क्स म्हणजे कोणी मनुष्य आहे, कां कांहीं वस्तु आहे, हें त्यांस कळेना. त्यांना वाटलें टान्क्स म्हणून तिची रोजनिशी असेल, किंवा खासगी पत्राचें फाईल असेल. इतक्यांत मिस ..... नें टेबला वरची आव्हानघंटिका वाजविली. त्याबरोबर बाहेर बसलेला नौकर दार उघडून आंत आला. त्यास मिस ..... नें टान्क्स 'लेकर आव' म्हणून सांगितलें. पांच मिनिटांचे आंत पोरच्यूगीज जातीची एक स्त्री थेंते आली व तिच आमच्या मिस ...ची टांक्स. तिला पाहून

मिस ..... (गणपतरावांकडे वोट करून) झणाली, 'हे त्या चंपाबाईचे कोणी नातलग आहेत. यांना कांहीं माहिती पाहिजे. ती आपले येथें ब्रह्मपुरीवर केव्हां बरें आली तुला आठवतें कां? तुला कोठली आठवण असणार? तूं महामूर्ख आहेस. बहुतकरून नसेल आठवण. होय कीं नाहीं?

टाँक्स—ती १८—व्या ..... माहिन्यांत आली वाटतें. त्या दिवशीं १७ कीं १८ तारिख होती, असें मला वाटतें. पण १७ किंवा १८ होती एवढें खरें. आणि त्या दिवशीं मंगळवार होता. हो, मंगळवारच.

मिस—फार चांगलें सांगितलेंस. आमच्या टाँक्ससारखें हुषार माणूस मिळणार नाहीं.

आणि झणूनच वाटतें तिला आज दोन वर्षें पगार मिळाला नाहीं!! हें तिच्या हुशारीचें तिला बक्षीस वाटतें! थ्यांक यू (फार आभारी आहेंच.) असें मेम साहेबांनीं झटल्यावर मग आणखी अधिक तें काय पाहिजे!! ह्या मधुर शब्दांपुढें त्या भिकारड्या पांढऱ्या धातूंच्या तुकड्यांची काय किंमत? पाश्चात्यजनांच्या सेवेचें फळच असें आहे. असो.

मिस—बरें गणपतराव, आणखी कांहीं माझ्याकडून किंवा टाँक्सकडून माहिती पाहिजे? माझ्यापेक्षां इचीच स्मरणशक्ति उत्तम आहे.

गणप०—तुमच्या शाळेंत ती आली तेव्हां कोणत्या गांवाहून बरें आली?

मिस—आतां कांहीं माझ्या लक्षांत नाहीं. पण निकडून कोणीकडूनशी आली एवढें खरें. काग टाँक्स, तुला माहीत आहे कां ती कोठून आली ती?

टाँक्स—(डोकें हलवून) नाहीं. चंपाबाईनें मला कांहींच सांगितलें नाहीं. ती अशी जरी भोळी दिसत होती, तरी आपली गुप्त गोष्ट कशी झांकून ठेवावी, हें तिला चांगलें कळत होतें. मोठी हुषार बायको खरी.

गणप०—मग तिची कांहीं गुप्त गोष्ट होती झणावयाची? तुम्हांला माहीत आहे तर ती एकूण?

टाँक्स—होय. मला टाऊक आहे. तिची गुप्त हकीगत मला सर्व माहीत आहे. तिला त्या चांगल्याचें शिफारसपत्र मिळालें नसतें, तर मेम साहेबांनीं तिला आपल्या शाळेंत कधींच जागा दिली नसती?

गणप०—(मिस ..... कडे पाहून) मग आपल्याला तिची माहिती आहे म्हणावयाची ?

मिस—(बरेंच घोटाळून) नाहीं. मीं कांहीं इतकी बारीक चौकशी केली नाहीं. तिनें कधीं काय पगार देतां म्हणना विचारिलें नाहीं, तेव्हां मीं-ही तिला अधिक कांहीं विचारिलें नाहीं. ती एकदां सांगत होती कीं, आ-पल्या बापावरोबर कांहीं तंटा झाला म्हणून सर्व गोत, इष्ट, मित्र सोडून लांब जाऊन रहावें म्हणून इकडे आलें. लहानपणीं आपण दुःख फार भो-गलें, तेव्हां त्यांतून सुटावें म्हणून इकडे आलें. तेव्हां अशा गोष्टी मीं तिला कशी विचारूं ? कोणी एखादी हलकट तशी असती, तर एक खरें. ती तर फार संभावित वायको; आणि अगे टॉन्क्स, तिला तूं असें म्हणतेस ?

टॉन्क्स—हो. लबाड लोक असेंच गोड गोड बोलून अर्जव करून मर्जी संपादीत असतात.

मिस—तिला मीं विशेष मेहरबानगी कधींच दाखवीत नसे. बाकी दोघी जणी;- तशीच ती एक होती. तिचा तूं फुकट हेवा करतेस. तुझें तिचें कांहीं वाकडें होतें वाटतें ?

टॉक्स—छे. तसें कांहीं नाहीं. ती फार हुशार नाहीं. फक्त पोशाखी आहे. ड्राईंगरूंमध्यें पिआनो वाजविण्याच्या उपयोगी. कोणी सरदार शा-ळा पाहण्याला आले, तर पुढें पुढें करण्याचे उपयोगीं ती आहे, असें आप-णच नेहमीं म्हणत होतां. नाहीं का ?

ह्या टॉन्क्सची व चंपाबाईची कांहीं तरी चुरस असावी, असें गणपत-रावांला पक्कें वाटलें. इतके दिवस झाले तरी ही चुरस अजून गेली नाहीं, तेव्हां चांगलीच चुरस असावी, असें त्यांचें दृढतर मत झालें, व ती कांहीं सांगेल असें वाटूनच गणपतरावांनीं दोन चार प्रश्न तिला विचारिले, परंतु टॉन्क्सक-डून विशेष माहिती मिळाली नाहीं. ' ती फार दुःखी, दारिद्रानें गांजलेली, आप्त इष्टांनीं त्रास दिलेली, अशी होती ' एवढेंच कळलें.

गणप०—आतां आपल्याला एवढेंच विचारितों कीं, चंपाबाई आप-ल्या शाळेंतून गेली तेव्हां कांहीं बुकें किंवा कांहीं सामान आपल्याजवळ ठेवून गेली काय ? आपल्याखेरिज येथें तिची कोणाची ओळख नव्हती, तेव्हां काय ठेविलें असेल तें येथेंच.

मिस—मला तर कांहीं आठवत नाहीं.

टांक्स०—(गडबडींमें मधेंच) होय. कांहीं आहे खरें. एक मोडकी पेटी आहे. मी ती वर ठेविली आहे. त्यांत आतां मी आपले कपडे ठेवीत असतें. आपल्याला ती पहावयाची आहे काय?

गणप०—हो. मेहरबानगीनें दाखवाल तर-

टांक्स०—हो. ती कांहीं फार मोठी नाहीं. आतां घेऊन येतें.

असें म्हणून गणपतरावपुढें कांहीं बोलणार तोंच ती धांवतच माडीवर गेली.

'ह्या बायका एकमेकाचा किती तरी हेवा करितात! माझ्या ह्या प्रभापासून तिला कांहीं धोका आहे, असें जाणून ही मिस् ..... योग्य उत्तरें देण्याला टाळाटाळ करिते. व ती आपल्या स्वजातीवर संकटें येण्याकरितां होईल तितकी खटपट करीत आहे, व मला मदत करीत आहे! काय हा संसार! पहा ह्या बायका कशा आम्हाला पेंचांत घालतात! त्या गिरिजा बाई, माझी मामी निहालकुवरबाई, ती कमळा आणि आतां ही टान्क्स. आरंभापासून अखेरपर्यंत सर्व बायकांशीं संबंध,' असें गणपतरावांच्या मनांत आलें.

इतक्यांत टान्क्सनें पेटी खालीं आणून गणपततरावांपुढें ठेविली.

गणपतराव खालीं गुडघे टेंकून त्या पेटीवर इकडे तिकडे आगगाडींतून जातांना वर चिठ्या मारलेल्या व दुसऱ्या कांहीं नांवाच्या चिठ्या बारीक तऱ्हेनें पाहूं लागले. ह्यावरच्या कांहीं चिठ्या अगदींच फाटून गेल्या होत्या, व कांहीं त्या स्थितींत येऊं पहात होत्या. कांहीं चिठ्यांवर कानडी अक्षरें होतीं, त्यांवरून 'एस. एम. रेलवेनें' ती पेटी गेली होती, असें त्यांचे लक्षांत आलें. पुष्कळ चिठ्या वाचतां वाचतां एका पिंवळ्या चिठ्ठीवर दाजीपूर स्टेशनचें नांव होतें. त्यावरून गगनबावड्याकडे कोठें तरी ती गेली असावी असें त्यांना वाटलें.

फार वेळ बारीक तऱ्हेनें न्याहाळून पाहिल्यावर पहिल्या एका चिठ्ठीवर ही चिठ्ठी चिकटविलेली आहे, असें त्यांस अढळून आलें व टान्क्सला ते म्हणाले 'थोडें पाणी आणि स्पंज मला आणून देतां काय? ही एवढी वरची चिटी मला काढून घ्यावयाची आहे. निघते का पहावें. निघाली तर सगळें—

टॉक्स—मी काढून आणूं कां ?

गणप०—नको, मीच काढितों सोइसोईनें. मला येईल काढावयाला. तेवढें पाणी आणि स्पंज आणा ह्मणजे झालें.

गणपतरावांनीं दोन चार वेळां स्पंजानें पाणी फिरवून चिठी ओली केली व हळूच न फाटतां व खालच्या चिठीला न चिकटतां, ती काढली. टॉक्स गणपतरावांच्या मागें उभी राहिली होती. तेथून त्यांच्या आडून त्यावर काय लिहिलें आहे, हें पाहण्याची तिनें पुष्कळ खटपट केली, पण व्यर्थ. गणपतरावांनीं ती खालची चिठीही तशीच काळजीनें हळूच न फाडतां काढली. व त्या दोन्ही चिठ्या त्यानीं आपल्या नोटबुकाच्या पोटीं जपून ठेविल्या.

गणप०—(मिस ..... कडे व टॉक्सकडे पाहून) आपला फार वेळ मी घेतला. माफ करा. आपण ही माहिती मला दिली याबद्दल मी आपला फार फार आभारी आहें. येतों आतां. सलाम.

मिस हंसली व आपली भेट झाली येणें करून आपल्याला फार आनंद झाला, वगैरे अर्थाचें कांहीं हळू हळू बोलली. ती टॉक्स गणपतरावांकडे एकसारखी निष्ठापूर्वक नजर लावून पहात होती. गणपतराव, कात्यायनी हिल्सवरून शिवाजीनगर बसून आपल्या बावड्यावरच्या बंगल्यांत येण्याला निघाले. जातां जातां वाटेनें ते आपल्याशीं ह्मणाले, "मला जो आज चिठ्यांचा पुरावा सांपडला आहे, तेवढाच न्यायाधीशाला व असेसराला पुरा होणार आहे. यावरून आपण हलकट व लबाड स्त्रीबरोबर लग्न केलें, अशी मामाची पूर्ण खात्री होणार नाहीं काय? अलबत झालीच पाहिजे.



भाग २८ वा.

'सर्व कांहीं माझ्या ह्या स्मरणवहींत आहे. ज्ञानमंदिर वर्तमानपत्रांत ज्या स्त्रीच्या मृत्युविषयीं वातमी होती ती स्त्री, व या माझ्या मामाच्या घरांत मालकीण झणून मिरविणारी स्त्री, या दोघींना जोडणारी ही सांखळीच आहे. ती मिसे ... च्या शाळेंत होती, येथपर्यंतच चंपाबाईची मा-गील हकीकत मिळते. ती केव्हां आली, हें ती मिस ... सांगते; पण कोठून आली, हें ती मुळींच सांगू शकत नाहीं. बरें त्या टाँक्सपासूनही कांहीं याबद्दल निघालें नाहीं. तिच्या जन्मापासून तों ती ह्या शाळेंत मास्त-रीण होईपर्यंतची माहिती लागत नाहीं. यापेक्षां तर कांहीं जास्ती मा-हिती माझ्यानें निघत नाहीं. त्या कमळाला वचन देऊन तर चुकलों. आतां त्याप्रमाणें वागण्याला काय बरें करावें ? कांहीं सुचत नाहींसें झालें आहे! (मध्येंच थोडें थांबून) ' काय बरें करावें आतां ? मला वाटतें आतां दुसऱ्या दिशेकडून शोध करीत यावें. नारायणराव चव्हाण चिनाला गे-ल्यापासून तों गगनपूर येथील मृत्यूपर्यंतची आनंदीबाईची माहिती मिळविली पाहिजे. एक कमळाला पत्र पाठवूं आणि कांहीं जास्ती माहिती मिळाली तर आणखूं, झणजे आपल्याला पुढचा मार्ग धरण्याला बरें पडेल. '

असा विचार करून ते एका टेबलाजवळ जाऊन बसले. व एक पत्र लिहून बंद करून आतांचे आतां तें ' पोष्ट हाफीसांत ' नेऊन टाकण्यास त्यांनीं आपल्या एका चाकरास हुकूम केला. लग्न झाल्यावर नारायणराव आपल्या कुटुंबासह कांहीं दिवस शिरोळ सोडून कोठें हवाशीर जागीं गेला होता कीं काय, व गेला असेल तर तुकोजीराव शिंदे कधीं त्या वेळेस तिकडे गेले होते कीं काय ? ह्या दोन गोष्टींचा खुलासा त्यांनीं कमळास या पत्रांत विचारिला होता. नारायणरावांचा व गणपतरावांचा जरी इतका एक जीव होता, तरी त्या वर्तमानपत्रांत ती मृत्युवार्ता वाचल्यापासून ग-णपतरावांनीं या संबंधानें त्याला कधींच विशेष विचारिलें नाहीं व त्यानें-ही आपण होऊन कधींच याबद्दल विशेष कांहीं सांगितलें नाहीं. लग्न झाल्यावरचें जें नारायणरावाचें पत्र होतें, त्यावर मुक्काम दाजीपूर होता; यावरून तो दाजीपूर जंक्शनावरून बावडयास गेला असावा, असें गण-

'पतरावांना पाहून त्यानें सलाम केला. रात्रीचे रात्रीं राहण्यास आपणाला जागा पाहिजे आहे, असें वकिलांनीं सांगितलें. त्या नौकरानें 'व्हय सरकार. आंत या' असें ह्मणून, त्यांना आंत घेऊन गेला.

गणपतराव आंत जाऊन एका खोलींत खुर्चीवर बसले व कोटाचें बटन मोकळें करतात तों तो नौकर ह्मणाला कीं, आपल्याला निजायाला स्वतंत्र खोली पाहिजे कीं त्या पलीकडच्या खोलींत दोन चार बिछाने आहेत तेथें निजतां.

गणप०—नको बाबा. आतां मला उठवत नाहीं. हीच खोली बरी आहे. येथेंच एक बिछाना आणून घाल ह्मणजे झालें. आतां आपल्याला फार भूक लागली आहे, तर थोडें मटन चाप व एक ग्लास उत्तम वाटलींतलें आणशील, तर फार मजा होईल.

नौकर—फार बरें. आपल्या मर्जीप्रमाणें.

गणप०—बरें तें असो, अगोदर मी विचारितों येवढें सांग पाहूं.

नौकर—(हात जोडून) विचारा सरकार. या दिवसांत कोणी विलायतेंहून येथें येऊन उतरत नाहीं. मग आमच्या बरोबर कोण बोलणार ? येऊन जाऊन आम्ही दोन चार आहों येवढेच. जवळ गांव ना शीव. फारशास येतो. उन्हाळ्यांत मातुर फार चांगल. अगदीं ... खाजवाया फुरसत मिळत नाहीं. बोलून बोलून तोंड दुखाया लागत. ह्या वाघडयावरची आन् ह्या डोंगरावरची खडान् खडा मला माहिती आहे. काय पाहिजे तें विचारा.

गणप०—छे, ही माहिती मला नको. येथें ह्या बंगल्यांत मागें आले गेल्यांची मला माहिती पाहिजे. तूं येथें किती दिवस आहेस ? (टिपून ठेवण्याचें हेतूनें स्मरणवही हातांत घेऊन)

नौकर—फार दिवस नाहीं. मला परवां आमच्या यजमानांनीं नेमिलें. मी काम चांगल करतों ह्मणून पुष्कळ मोठ्या साहेबांचें व खुद्द महाराज सरकारचें सरटिफिकीट आहे. मीं येथें सहा वर्षें सारखा आहे. माझ्या हाताखालीं लई होऊन गेले, टिकतच नाहींत.

गणप०—यापूर्वी कोठें होतास ?

नौकर—वर किल्यावर गडकरी होतों.

गणप०—बरें, मग कांहीं दिवसांपूर्वी, आजमास दोन तीन वर्षांपूर्वी

पतरावांना वाटलें. व याच अनुभवावरून त्यांनीं कमळाबाईस पत्र पाठविलें. व जरूर उत्तर येण्याकरितां तार कर, असें त्यांत लिहिलें.

दुसरे दिवशीं सकाळीं आठ वाजतां तार येऊन पोहोंचली. त्यांत मारायणराव गगनबावडयास जाऊन कांहीं दिवस राहिला होता असें होतें.

लागलीच गडबडीनें जेवण खाण आटोपून गणपतराव बावडयाचें तिकीट घेण्याकरितां १०॥ वाजतां करवीरचे स्टेशनावर येऊन पोहोंचले.

भपभप् आवाज करीत पश्चिमेच्या बाजूला आगगाडीचें इंजिन फार वेगानें निघालें. ह्या रस्त्यानें आमचे गणपतराव कधींच गेले नव्हते. त्यांस वाटेंत लागणारी प्रत्येक वस्तु अनोळखीची वाटूं लागली. संध्याकाळीं ७ वाजतां आमचे वकीलसाहेब दाजीपूरचे स्टेशनावर आले. येथेंच कांहीं यांचा प्रवास संपला नाहीं. येथून आलेल्या गाडींतून उतरून शिवगड घाटांतून बावडयाकडे जाणाऱ्या गाडींत त्यांना बसावयाचें होतें.

अर्ध्या तासाचे आंतच गणपतराव सह्याद्रीवरील शिवगड घाट चढूं लागले. ते दोन दोन चार चार मैल लांबीचे बोगद्यांचें अमानुष शिल्पशास्त्राचें काम पाहून गणपतरावांसारख्याच्या देखील संस्कृत मनाला आश्चर्य वाटल्या वांचून राहिलें नाहीं. सुमारें दोन तासांचे आंतच वकील साहेब गाडयाचे स्टेशनावरच्या उपहारगृहांत 'टी मंगता' म्हणूं लागले. चहा पिणें झाल्यावर त्यांनीं एका हमालाला हाक मारिली; व 'ही ब्याग घेऊन प्रवासी बंगल्यांत चल. तेथें अंथरूण वगैरे मिळेल कीं नाहीं. तो बंगला किती लांब आहे' वगैरे विचारिलें.

ती ब्याग त्या हमालानें आपल्या खांद्यावर घेतली व हंसून म्हणाला, 'अंथरुणाला या दिवसांत काय कमी? उन्हाळ्यांत मातुर पंचाईत. तवा लई साहेब व सरदार हवा खायाला इकडं येत्याती, म्हनून मिळत नाहीं. आतां काय एक सोडून पंचवीस; तो प्रवाशांचा बंगला स्टेशनापासून जवळच होता. सात आठ मिनिटांचे आंतच ते त्या बंगल्यांत पोंचले. हा बंगला आमच्या पंत अमात्यांनीं उन्हाळ्यांत हवा खाण्याला येणाऱ्या हौशी लोकांच्या सोईचाच बांधला होता. त्यांत जेवणाखाणाची निजण्याबसण्याची चाकरनोकराची सर्व सोय उत्तम केली होती. संभावित व पैसा खर्च करणाऱ्याला कांहींच अडचण पडत नसे. त्या हमालानें तेथें असलेल्या एका नौकरास हाक मारिली. हाकेसरशीं तो बाहेर आला व गण-

तुकोजीरावं शिंदे यॉं नांवाचे गृहस्थ येथें कांहीं दिवस राहिले होते काय?

नौकर—(आठवण केल्यासारखें करून) कोण बरे शिंदे? ते खंडवा शिंदे एक आणि दौलतराव दोन व येसाजी शिंदे तीन असे तीन शिंदे नांवाचे येथें आले होते. हो, ते तिकडे कुरुंदवाडास कीं मिरजेस कारभारी आहेत ते न्हवका?

गणप—छे. ते नव्हेत रे. अरे ते शिरोळचे. महाराज सरकारच्या लष्करांत होते. ते पांढऱ्या मिशांचे. सातारी नमुन्याचें पागोटें घालतात ते.

नौकर०—हँ, हँ, हँ, ते. ते पेनशन घेऊन बसल्याती, ते व्हय? माग कोण सुभदार कीं काय व्हत म्हन. त्यांना एक लेक हाई व्हय. ते तर येथें लई दिवस होते. मग वर बाव्हडयावर गेले. आतां आल लक्षांत. ते तुकोजीराव शिंदे खर. खर खर. येथें असतांनाच त्यांची लेक अन् जांवई बावडयावर राहिली होतीं. मग ते सगळेच गेले. तो जांवई कोडें पळून चिनाला कीं काय. गेला म्हन. तेच पुन्हां एकदां मधीं लेकीला घेऊन आले, तेव्हां असें सांगत होते. त्यांच्या जांवयाचें नांव नारायणराव आणि त्यांच्या बायकोचें काय वर आन—आनंदी.

गणप०—(मध्येंच आठवण करून देऊन) आनंदीबाई.

नौकर—हो. आनंदीबाई.

गणप०—बरें, तुला लिहितां वाचतां येतें कां?

नौकर—म्हणजे! मीं इथला वाकनीस. सगळा हिशोब मीच लिहितों. थोडें इंग्रजीही येतें कामापुरतें.

गणप०—बरें तर सांग पाहूं—१८—सालापासून तूं येथें आहेस नाहीं?

नौकर—होय. १८—च्या नवंबर महिन्यापासून आहें. त्याच्या आगोदर गडावर होतों. मला लिहितां वाचतां येतें, म्हणून माझी नेमणूक इकडे केली.

गणप०—बरें, ती आनंदीबाई तूं पाहिली होतीस काय?

नौकर—होय. गांवांत माझ्या शेजारींच राहिली होती. रूपानें फार नामी. स्वभाव फार चांगला. सगळ्यांलों पाहिजेच. तिचा नवरा गेला म्हणून समजलें, तेव्हां सगळ्या गांवाला फार वाईट वाटलें.

गणप०--हें असो. नारायणराव गेल्यावर पुन्हां तुकोजीराव आपल्या लेकीस घेऊन येथें किती दिवस होते ?

नौकर—(कांहीं वेळ विचार करून) होय. अमकेच दिवस ते होते हें मलां नाहीं सांगतां येत. नाहीं, येवढें मला माहीत आहे, कीं तुकोजीराव येथें ह्याच ह्याच खोलींत बसून आह्मांलां नेहमीं सांगे, कीं आपला जांवई ठून गेला. तो आपल्या मुलीला फार जाच करीत असे. फार वाईट मनुष्य. त्यानें आपल्याला फसविलें वगैरे. परंतु किती दिवसांनीं मग तो (तुकोजीराव) येथून गेला. हें मला आठवत नाहीं, (मधींच कांहीं आठवल्या सारखें करून गडबडीनें) अरे हो. बरी आठवण झाली. ती बावडयावरची आमच्या घराजवळची देशमुखीण तुह्मांलां सर्व कांहीं सांगेल. तिच्याच घरांत ते भाडयानें राहिले होते. तिचें घर पडक्या मारुतीजवळ आहे. गांवांत बजा देशमुखीण ह्मणून विचारा. तेव्हांच वर सांपडेल. फार चांगली ह्मातारी आहे.

गणेप०—फार चांगलें. उद्यां सकाळीं मीं वर जाईन आणि तिला भेटेन. बरें, आणखी एक प्रश्न विचारितों अं. तुला जर ती आनंदीबाई दाखविली. तर तूं तिला आतां ओळखशील ?

नौकर—हें काय सरकार! ओळखीन ह्मणजे ! ती आमच्या घराजवळ किती दिवस तरी होती. नेहमीं आमच्या येथें येत असे. आतां लई दिवस झाले ह्मणून काय झालें? वळक कुट जाती व्हय ?

गणपतराव वकिलांनीं आपल्या स्मरणवहींत बजा देशमुखिणीचा पत्ता लिहून घेतला. मटन्चाप व ग्लासभर शेरी पार पाडली.एक दोन चिरूट ओढले. मग स्वस्थ ब्ल्यांकेट पायांवर घेऊन निद्रेची मार्गप्रतीक्षा करूं लागले.

ह्या गेल्या दोन दिवसांत त्यांना विश्रांति मिळालीच नाहीं, ह्मटलें तरी चालेल. ह्या गांवाहून त्या गांवाला जाण्यायेण्यानें हे अगदीं दमून गेले होते. तेव्हां पडेपडे तों त्यांना झोंप लागली. इतके थकून भागून आलेले ह्मणून त्यांना शांत गाढ झोंप लागली कीं काय ? मुळींच नाहीं. त्यांना वरचेवर मधून मधून स्वप्नें पडत होतीं, ह्मणून वरचेवर त्यांचें तोंड वाईट होत आहे. पुन्हां यांतून मी वांचलों असें वाटून चेहऱ्यावर आनंद दिसत आहे.कधीं न पाहिलेल्या गोष्टी स्वप्नांत जरी येतात, तरी त्यानें स्वप्नावस्थेंत असणाराला आपण त्या प्रत्यक्ष अनुभवीत आहों व त्या त्या चांगल्या किंवा वाईट

स्वप्नाप्रमाणें त्याच्या चेहऱ्यावर त्यांचें प्रतिबिंब उठत असतें. मनाचें प्रतिबिंब दाखविणारा चेहरा हा अति उत्तम आरसा आहे. असा स्वच्छ दुसरा आरसा कोठेंच मिळणार नाहीं.

ह्या अशा वेडयावांकडया स्वप्नांत त्यांनीं असें पाहिलें, कीं त्या लिंबाच्या व चिंचेच्या झाडांत तो मोतीचौक वाडा निर्मनुष्य होऊन उदास व भयाण असा दिसत आहे. त्या समोरच्या बागेतलीं फुलझाडें सर्व मरून जाऊन गुडघाभर गवत व रानटी झाडें झुडपें माजून गेलीं आहेत. तें मत्स्यपल्वल फुटून समुद्राप्रमाणें चोहोंकडे त्याचें पाणी पसरलें आहे. अगदीं आंत वाडयांत सुद्धां पाणी शिरलें आहे व वरचेवर उंच उंच चढत आहे; आतां तास अर्ध तासाचे आंत सर्व वाडा बुडून जाईल असें वाटतें. त्यांतच एक सुमगा गट्टकळ्या खात आहे व डोकें वर आल्याबरोबर 'वांचवा' म्हणून ओरडत आहे व तिला पाहिल्याबरोबर हीच आपली मामी, हिनेंच सर्व घात केला, असें मनांत येत आहे, इतक्यांत पाणी एकदम उतरूं लागलें, तें मत्स्यपल्वल पहिल्यासारखें लहान झालें. वाडा शाबूत राहिला. काडीभर देखील त्याला इजा झाली नाहीं !

असें स्वप्न पडल्याबरोबर गणपतरावांना फार भीति वाटून ते एकदम जागे झाले. ते जागे झाले खरे, परंतु भीतीनें डोळेच उघडीनात. अजून त्यांना आपण पाहिलें हें सर्व खरेंच असें वाटत होतें. मग मोठें धैर्य करून त्यांनीं डोळे उघडिले व उठून बसले, तेव्हां आपणाला स्वप्न पडलें, असें त्यांना वाटलें. स्वप्न पडत असतांना आपल्या छातीवर कांहीं ओझें पडलें आहे, असें त्यांना वाटत होतें ! तें आतां अगदीं हलकें वाटूं लागलें ! ते लघवीला जाऊन आले व चूळ भरून पुन्हां निजले. आतां मात्र त्यांना गाढ झोंप लागली. एकदां निजले ते सकाळीं सात साडेसात वाजेपर्यंत जागेच झाले नाहींत. खोलीं झाडून साफसूफ करणाऱ्यानें जेव्हां बाहेरून दोन चार हांका मारल्या तेव्हां हे जागे झाले. उठल्यावर आपला प्रातर्विधि आटोपून चहा घेऊन एक भाडयाचा तांगा करून वर बावडयावर गांवांत जाण्याला निघाले. वाटेनें डोंगरांतून जातांना यांना सभोंतालची वनश्री पाहून फारच आनंद झाला. बावडयावर गेल्यावर तेथून खालचा भाग पाहून यांना फार समाधान वाटलें. वरून खालीं लांबवर पाहिलें म्हणजे एक हिरवा गार गालिच्याच पसरला आहे असे वाटे. या वेळेस त्यांचें

मनांत आलें कीं हा वनशोभा पहाण्याला नारायणराव आपल्या बायकेबरोबर येथें किती वेळां तरी उभा राहिला असेल ? त्या वेळेस ती त्याच्या बरोबर कितीतरी मंजुळ स्वरानें बोलली असेल ? किती प्रेमानें त्याच्याकडे तिनें पाहिलें असेल. किती आनंदानें या जोडप्यानें येथें दिवस घालविले असतील. ह्या स्त्रीकडून आपला नाश होणार आहे, ही कल्पना त्या वेळेस त्याच्या मनांत तरी आली असेल काय ? छे, नांव देखील नका.

गणपतराव त्या बजा देशमुखिणीच्या घराचा शोध करीत करीत तिच्या घरीं येऊन पोहोंचले. आंत जाऊन त्यांनीं 'बजाबाई घरांत आहेत कां' म्हणून विचारिलें. ती म्हातारी समोरच सोप्यांत कांहीं धान्य सुपांत घेऊन नीट करीत बसली होती. त्यांची हांक ऐकल्या बरोबर तिनें 'होय आहे. मीच ती. या बसा येथें.' असें उत्तर दिलें. तेथें तिनें आणून दिलेल्या कांबळ्यावर ते बसले. या बजाबाईचें वय अजमासें साठ वर्षांचें होतें. चेहऱ्यावरून ती फार संभावीत 'पोक्त' थोर घराण्यांतली असावी, असें दिसे. तिच्या जवळच खालीं पडवीला एक तपकिरी रंगाचा मोठा पश्मी कुत्रा बांधला होता. तो या परकी गृहस्थाला पाहून भुंकूं लागला, तेव्हां 'अरे, ओरडूं नको मोत्या' असें म्हणून त्यास गप्प करून त्यांस 'काय जागा पाहिजे ? किती दिवस रहणार ?' असें म्हणाली.

घर फार मोठें. ही मुळची चांगली खानदानीची. आतां आलीकडे येकटीच कोणी पोर ना बाळ. रांडमुंड झालेली. एक शेत, तेवढ्यावर व घर भाड्यानें देऊन त्या भाड्यावर कसातरी निर्वाह करीत असे. तेव्हां तिला कोणी परकी मनुष्य आला कीं जागा भाड्यानें मागण्याला आला, असें वाटणें अगदीं साहजिकच आहे. व याप्रमाणेंच तिनें त्यांस वरील प्रश्न केला.

त्यांनीं आपल्या येण्याचें कारण तिला उलगडून सांगून तिला म्हणाले 'मला येवढेंच पाहिजे आहे कीं येथून म्हणजे वावडघाहून आनंदीबाई कधीं गेली ? त्या प्रवासी बंगल्याच्या वाकनीसानें मला सांगितलें, कीं तुम्हांला सर्व माहिती आहे. तुम्ही सर्व पूर्ण माहिती द्याल.'

बजाबाई कांहीं वेळ बोलली नाहीं. त्यांचें बोलणें ऐकून घेऊन पुढें असलेल्या सुपांतील धान्य उगीच बोटानें इकडे तिकडे फिरवूं लागली.

अशा स्थितींत बराच वेळ गेल्यावर ती म्हणाली 'तुकोजीराव शिंदे केव्हां गेले, हें पाहिजे तर मी सांगतें. कारण ते गेले तेव्हां त्यांना माझें बरेंच देणें होतें, त्याकरितां त्यांनीं मला एक कागद लिहून दिला होता; तो आहे माझ्या जवळ, त्यावरून कळेल तर पाहा. पण आनंदीबाईचें--? असें अर्धेंच बोलून ती थोडी थांबली व पुन्हां बोलूं लागली 'तुम्हांला ठाऊक आहे कां ती आनंदीबाई, एकदम मधींच कोठेंशी निघून गेली ती.' नाहीं. मला नाहीं हें कांहीं माहित, त्यांनीं उत्तर दिलें.

ती म्हातारी मग मोठ्या आश्चर्यानें म्हणाली, 'होय कां? गरीब बिचारी एकदम निघून गेली. तिचा नवरा कोठें पळून गेल्यावर ती व तुकोजीराव येथें राहिले होते. तुकोजीराव फार वाईट माणूस. एवढा थेरडा पण कांहीं अक्कल नाहीं. ती येथें कांहीं कशीदा काढून, कोणाचें शिवण काम करून, पोट भरीत असे. तिनें पोटापुरते मिळविलेल्या त्या दोन पैशांत या तुको' जीरावाची दारू. तो सदा या पलीकडच्या गुत्त्यांत पडलेला. नेहमीं दोघांचें भांडण होत असे, पण एके दिवशीं काय जास्ती झालें देवाला ठाऊक. त्या लहान पोराला टाकून एकदम किंहो रात्रीचे रात्रीं पार झाली!! काय बाई काळीज तरी!!'

गणप०--परंतु, ती केव्हां गेली, म्हणजे कांहीं तारीख बिरीख तुम्हांला माहीत नाहीं वाटतें?' 'नाहीं बाबा. मला नाहीं तें कांहीं सांगतां येत. परंतु थांबा हो. दुसरे दिवशीं सकाळींच तुकोजीराव येथून गेले. मी घरांत नव्हतें. मी त्या पलीकडच्या वाडीला गेलें होतें. तेथें माझें शेत आहे. त्यांनीं जातांना एक चिठी मला देण्यासाठीं म्हणून आमच्या येरयापाशीं दिली होती. ती असेल मजजवळ, त्यावर कांहीं असेलसें वाटतें.' असें म्हणून ती म्हातारी उठली व माजघरांत जाऊन चोळीच्या गाठींत असलेली किल्ली काढून तिनें एक पेटी उघडली. पेटींत बराच वेळ इकडे तिकडे कांहीं उलथें पालथें करून चार पांच कागद, ते अगदीं धुरकटून पिंवळे झालेले, दांतांत घेऊन पुन्हां कुलूप लावून बाहेर येऊन 'यांत कांहीं असलें तर असेल' असें म्हणून गणपतरावांपुढें ते टाकिले.

गणपतरावांनीं एक दोन कागद वाचून पाहून यांत कांहीं नाहीं असें म्हणून मोठ्या निराशेनें ते खालीं टाकले. मग दुसरा एक कागद घेऊन वाचतात, तोंच त्यांच्या तोंडावर आपल्याला पाहिजे तें मिळाल्याचें

चिन्ह दिसूं लागलें. तुकोजीरावानें या चिठींत असें लिहिलें होतें– "माझ्यावर तुमचे फार उपकार आहेत. हे उपकार माझ्यानें कसे फिटतील ? (हो, खरोखरच उपकार ! भाड्याची पैही वेळेवर दिली नाहीं. अगदीं दारांत धरणें बसलें म्हणजे निमेशिमे पैसे द्यावयाचे. तरी ती म्हातारी घर सोडं म्हणाली नाहीं. तेव्हां हे लहान कां उपकार ?) माझी पोरगी मला टाकून गेली. आतां मला किती दुःख झालें याचा विचार तुम्हीच करा. एकुलती एक पोरगी ! दुसरें मूल ना बाळ. आतां म्हातारपणीं मीं काय करूं ? गेली ती गेली. पण ह्या लहानशा आपल्या बाळालाही टाकून गेली ! हा मला किती तरी ताप झाला ! मला आतां कांहीं सुचत नाहीं; काल रात्रीं आवशीं पैशाच्या बाबतींत कांहीं थोडी तिची माझी बोलाचाली झाली. या संबंधानें आमचें नेहमींच चालत असे; पण काय असेल तें असो; मीं सकाळीं उठून पहातों तों पोरगी नाहीं; आतां काय तरी करूं ! तुम्हांला हें खोटें वाटेल कीं भाडें न देतां पळून जाण्याची मीं ही युक्ति काढली, पण तसें मुळींच नाहीं. ती गेली तेव्हां तिनें ही चिठी लिहून ठेविली होती, ती तुम्ही पहा, म्हणजे खरें वाटेल.

दुःखानें भांबाऊन गेलेला

गगनबावडा. ता. १६ वी १८८४. तुकोजीराव शिंदे."

अनंदीबाईची चिठ्ठी जी होती ती अगदींच लहान होती. त्यावर चारच ओळी याप्रमाणें लिहिल्या होत्या,—

' मला आतां जिवाचा फार कंटाळा आला. ह्या स्थितींत राहण्याचा मला अगदीं वीट येऊन गेला. दुसरी कोठें सोय झाली तर पाहतें. सर्व आप्त इष्टांची लाज सोडून मीं निघालें आहें.मागच्या माणसांचा आणि माझा अगदीं संबंध आज तुटला. मीं आपल्या मनाला असा ताप करून घेतला माझ्या मनाची अशी चलबिचल झाली याबद्दल व दुसरें कांहीं या बाबतींत माझेकडून अपराध झाले असतील व होतील या बद्दल मला क्षमा करा. तुम्ही मला क्षमा कराल्च, कारण अशी मी कां वागूं लागलें, यांचें कारण तुम्हांला माहीत आहेच. ज्या एका गोष्यावर माझें सर्व जीवित अवलंबून आहे, तें तुम्हांला माहीत आहेच. म्हणूनच मला या कामांत तुम्ही दोष देणार नाहीं.

तमची लाडकी...'

होतें. हें पत्र हातांत घेऊन ते फार वेळ विचार करीत बसले व म्हणाले, "काय बरें ह्या दोन वाक्यांचा अर्थ ! तुम्ही मला क्षमा करालच कारण मी असें कां वागूं लागलें याचें कारण तुम्हांला माहितच आहे. ज्या एका गोष्टीवर माझें सर्व जीवित अवलंबून आहे, तें तुम्हांला माहीत आहेच."

आमच्या वकीलसाहेबांनीं ह्या दोन वाक्यांचा अर्थ लावण्यांत आपली होती नव्हती तेवढी अक्कल खर्ची घातली. या वाक्यापुढें त्यांच्या लॉजिकचा (तर्कशास्त्र) कांहींच उपाय चालेना. त्यांनीं पुष्कळ आठवण केली, पण या वाक्याचा अर्थ जुळण्याला कांहींच मार्ग त्यांना सुचेना. त्यांना हें एक मोडें कोडें येऊन पडलें. कालेजांत असतांना ... ... साहेबांनीं सांगितलेल्या लॉजिकच्या नियमांचें पुनः त्यांनीं पारायण केलें, पण सर्व व्यर्थ. त्यांनीं आपल्या लॉजिकला पुष्कळ चालन दिलें, पण त्यापासून या दोन वाक्यांचा अर्थ लागण्याला कांडीभरही उपयोग झाला नाहीं. तुकोजी रावाच्या पत्रावरून १८—महिन्याच्या सोळावे तारखेस ती गेली असें ठरलें. त्याच सालीं, त्याच महिन्यांत टान्कसच्या सांगण्याप्रमाणें सतरावे किंवा अठरावे तारखेस ती मिस—च्या बंगल्यांत मास्तरीण राहिली. म्हणजे वावडयाहून तिचें जाणें व मिस—च्या बंगल्यांत नौकर राहणें, यांत कायतो दोन दिवसच अंतर पडतो. अनुभविक पुराव्याच्या सांखळींत ही फारच लहान कडी होती हें खरें, परंतु ही किती जरी लहान असली तरी त्या सांखळीला तीं कांहीं तरी जास्त वळकटी देईलच.

गणपतरावांनीं त्या बजाबाईला मग विशेष कांहीं विचारिलें नाहीं. तिला तीं दोन पत्रें मागून घेऊन आपल्या स्मरणवहीच्या पोटीं ठेवून तिचा निरोप घेऊन तेथून ते निघाले, ते थेट त्या प्रवासी बंगल्यांत आले. तेथें त्या वाकनीसाकडून आगगाडीचें वेळापत्रक मागून घेऊन गाडी करवीराला केव्हां सुटते हें त्यांनीं पाहिलें. एक वाजून १५ मिनिटांनीं गाडी सुटणार होती. एका हमालाजवळ आपली बॅग देऊन वाकनिसाकडे सर्व जेवणाखाणाचे पैसे चुकते करून देऊन त्यांची पावती घेऊन स्टेशनावरच्या दगडी प्लॅटफॉमवर निरूद्ध ओढीत गाडी सुटण्याची वाट पहात इकडे तिकडे ते फिरूं लागले. फिरतां फिरतां ते म्हणतात 'चंपाबाई व आनंदीबाई चव्हाण या दोघींच्या माहितीच्या मूळाशीं जाऊन अगदीं भिडलों. आतां गगनपुरीस जोगळ्या स्त्रीची छत्री बांधली, याचा तपास करावयाचा.'

भाग २९ वा.

गगनबावडयाकडून करवीरास परत आल्यावर खालील मजकुराचें आपल्या मोमबोहणीचें आलेलें एक पत्र गणपतरावांस मिळालें. 'शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष—बाबांची तब्येत आतां पुष्कळ बरी आहे. काय असेल तें असो, अलीकडे तुम्ही येथें लवकर यावें ह्मणून माईनें फारच आग्रह धरिला आहे, आणि सध्यां तुम्ही कोठें आहां, कोणिकडे फिरतां वगैरे प्रश्न वरचेवर विचारून माझें डोकें तिनें उठविलें आहे. तर कसें ही करून एकदां लवकर या. व तिला भेटून एकदां तिचा जीव थाऱ्यावर आणा.

मु. निहालगड

ता०—

आपली

सगुणा.'

आरामखुर्चीवर बसून चिरूट ओढीत ओढीत गणपतराव आत्मगत ह्मणतात 'तर मग मी काय करतों, कोठें फिरतों, हें समजण्याची आमच्या बाईसाहेबांला फार इच्छा झाली आहे ॐ? तिचें मन फार उत्सुक झालें आहे. आणि ती सगुणाला आपल्या नेहमींच्या पोरकट तऱ्हेच्या प्रश्नांनीं बेजार करीत आहे. अरेरे!! गरीब बापडी! परांच्या गादीवर लोळूनही तिला सुख नाहीं! सौंदर्याचा शालू पांघरलेल्या या चंडीस, महापातकीस, कोटली शांतता!! असतां मात्र तिचें आमचें चांगलें जुपलें. अजून पुष्कळ संधी आहे, तर ती पळून कां जात नाहीं. तिला मी चांगली खरमरीत इशारत दिली आहे तर ती अद्याप कां काळें करीत नाहीं? काय कारण असेल तें ईश्वराला माहित.'

हा प्रश्न, एकामागून एक एकसारखें चिरूट ओढीत—हें ओढणें इतकें कांहीं झपाट्यानें चाललें होतें, कीं एखाद्याला वाटेल हा आगगाडीच्या बंबांतूनच धुराचा लोळ येत आहे!—त्यांनीं हजार वेळां पुन्हां पुन्हां उच्चारिला.

'ती कां पळून जात नाहीं हें कांहीं कळत नाहीं. ह्या कुटुंबावर मीं नसतें संकट कधींही आणणार नाहीं. या घरापेक्षां अधिक मायेचें कोणाचें घर मला या जगांत आहे काय? पण माझ्या नाहींशा झालेल्या मित्राला शोधून काढणें हें माझें मुख्य कर्तव्यकर्म आहे, तें मला केलेंच पाहिजे. ज्या अति नीच कपटपट्ट स्त्रीबरोबर त्यानें फक्त क्षणिक

जेत, ह्मणजे मग मामी साहेबांची भेट होणार ! अरे देवा, काय तरी ह्या स्त्रीचें कपटजाल ! आज काय आम्ह इष्टाला भेटावयाला गेली ह्मणे. इच्या सारखी कपटपटू दुसरी स्त्री या जगांत मिळणें नाहीं. परंतु तिनें खुप समजून असावें कीं, माझ्या मामाच्या घरांत कांहीं तिचे आतां हे खेळ चालणार नाहींत. मीं तिला सूचना अप्रत्यक्ष रीतीनें केलीच आहे. याला ती कांहीं जुमानति नाहीं. फार चांगलें. आज संध्याकाळीं तिला उघड सर्व सांगतों.' असें ह्मणाले.

इतक्यांत गायन बंद ह्मेऊन 'हारमोनियम' ची पेटी बंद करीत असल्याचें त्याना ऐकूं आलें.

'अरे, अशा मधुर गायन करणाऱ्या स्त्रीचें मुख तरी पाहूं या. अशा भिकार गांवांत कोण गाणार आहे, तें तरी कळेल.' असें ह्मणून ओवरींतून उठून सभामंडपाकडे ते निघाले. ते कांहीं पावलें पुढें गेले तोंच एक दहा बारा वर्षांचा कुणब्याचा मुलगा डोकीवर पेटी घेऊन आपलेकडेच येत आहे व त्याच्या मागोमागच एक तरुण सुंदर स्त्री अगदीं साधा पोषाख केलेली येत आहे असें त्यांना दिसलें. गणपतरावांना पाहिल्याबरोबर ती स्त्री मनांत एकदम कचरली व तिचा चेहरा थोडा उतरला. ही तरुण स्त्री आमची कमळाबाई होय.

ही आपल्याला येथें भेटेल हें आमच्या वकील साहेबांच्या ध्यानीं मनीं सुद्धां नव्हतें. ह्या आकस्मित भेटीनं गणपतरावांना फारच आश्चर्य वाटलें. निहालगड प्रांतीं आपण आपल्या मावशीला भेटावयाला जाणार आहें, असें तिनें यांना सांगितलें होतें. परंतु येथें ह्या निहालगडास ती येईल हें त्यांच्या मनांतच कधीं आलें नाहीं. तिला पाहिल्याबरोबर त्यांना आपल्या मित्राची पुनः आठवण झाली. व गारगोटीस तिला दिलेलें वचन त्यांच्या डोळ्यांपुढें उभें राहिलें. त्यांच्या मनाची इतकी कांहीं चलबिचल झाली कीं, त्यांना कांहीं बोलावयाचें सुचेना.

आमच्या कमळाबाईनेंच प्रथम बोलण्यास सुरवात केली. 'माझा येथें येण्याचा कांहींएक संभव नसतां, मीं येथें आलें, हें पाहून फार आश्चर्य वाटलें असेल नाहीं?'

गणप०—होय, खरोखरच मीं अगदीं थक्क झालों. माझी कांहीं कल्पनाच चालेना.

कमळा०—निहालगडाकडे मीं आपल्या मावशीला भेटावयाला व चार दिवस राहावयाला जाणार आहें, म्हणून तुम्हांला सांगितलेंच होतें. मीं परवांचे दिवशीं निघालें, व अगदीं निघण्याचे तयारींत होतें, तोंच तुमची तार मला मिळाली. येथून त्या पथिकाश्रमाजवळच गांव आहे तेथें माझी मावशी राहते. तेथें मीं काल आलें. हें देवालय फार चांगलें आहे, असें ऐकून काल संध्याकाळीं मीं येथें पाहण्यास आलें होतें. हें निवांत भव्य व रमणीय स्थान पाहून मला फारच आनंद झाला.

माझी मावशी आज सकाळीं इकडे गांवांत कांहीं काम आहे म्हणून निघाली, तेव्हां घरीं बसून तरी काय करावयाचें आहे, असें मनांत येऊन ती येईपर्यंत मी ही पेटी घेऊन येथें पदें म्हणावींत म्हणून आलें. ह्या गांवाचेंही नांव निहालगड आहे, हें मला नव्हतें माहीत. मला वाटतें तुमच्या मामाच्या वाड्यावरूनच या गांवालाही पण तेंच नांव पडलें असावें.

गणप०—(आपल्या मनाची इतकी चलबिचल झाली असून हिचें मन इतकें शांत आहे, हें पाहून आश्चर्य वाटून) होय. असेंच असावें असें मला वाटतें. मागें आमच्या थोरल्या संभाजी महाराजांच्या वेळेस आमच्या मामाच्या पूर्वजांपैकीं एकजण फारच सुंदर व शूर होता. त्याचें सौंदर्य व शौर्य पाहून महाराज फार खुष झाले व त्यांनीं हा गांव व तो वाडा, व या खालचा मांत त्यांना जहागीर दिला. तेव्हांपासून त्यांचेंच नांव पडलें आहें. पहिलें नांव कांहीं निराळें होतें असें म्हणतात. मग तुम्हीं आतां जाणार, कीं मावशीची वाट पाहणार ?

कमळा०—'येथेंच वाट पाहात राहा, मावशी येतें,' म्हणून तिनें मला सांगितलें आहे.

गणप०—आणि ती आल्यावर लागलीच तुम्ही जाणारना ?

कमळा०—होय.

सूर्यनारायण भांबावल्यासारखे होऊन वेड्यासारखे त्या देवळाच्या शिखराकडे पहात उभे राहिले. त्यांचा तो उतरलेला चेहरा कमळाच्या लक्षांत येतांच आत्ता

कमळा०—परवां मी तुम्हांला पाहिलें त्यापेक्षां आतां तुझी फारच खराब दिसतां. आजारी बिजारी होतां कीं काय ?

गणप०—छे ! आजारी मुळींच नव्हतों, परंतु या संशयवृत्तीनें मनाला अगदीं चैन नाहीं. स्वास्थ्य ऋसें तें डाऊक नाहीं; त्यानें अगदीं त्रासून गेलों आहें.

आतां ती काय म्हणते, तिचा तर्क काय निघतो तें पाहूं, असें मनांत येऊन ते तिच्याकडे पाहूं लागले. नारायणरावाच्या नाहींसें होण्याची हकीकत त्यांनीं तिला सर्व सांगितली होती व तसेंच आपल्याला कोणाचा वहीम आहे हेंही सांगितलें होतें. फक्त या कपटजालांतील इसमांचीं नांवें मात्र त्यांनीं मुद्दाम वगळलीं होतीं, परंतु जर त्या कमळानें मुद्दाम त्यांनीं ही नांवें वगळलीं असें तर्कानें ताडलें तर मग कसें ?

ती त्याच्याकडे अगदीं टक लावून पहात होती. जणूं काय त्याच्या मनांतील सर्व गुप्त गोष्ट ती आतां बाहेरच काढीत आहे !

गणप०—(आत्मगत) सर्वस्वी मी इच्या हातांत सांपडलों आहें, इचा तोंडवळा तरी पहा कसा अगदीं माझ्या मित्रासारखा आहे. इचें शहाणपण तरी पहा किती आहे ! इच्या सारखी तर्काची माणसें फार थोडीं. जणूं नाना फडणवीसाचा अवतारच. पहा ! [illegible] काळ्याभोर डोळ्यांनीं माझ्याकडे टक लावून पहाण्यानें [illegible] मनांतलें सर्व बाहेर काढते आहे ! अ[illegible] तिच्या या शहाणपणापुढें व य[illegible]

' बरेंतर मी आतां'

करून घसा साफ

का होता व [illegible]

होते, तीच '

कमळा

जाईन म्हणून

माझ्या दादा

त्यावरून ज

गणपतर'

काय बरें :

मग कांहीं वेळानें ते ह्मणाले ' तुमच्या भावाच्या या चमत्कारिक परिणामाशीं अनुमानिक पुराव्याच्या ज्या सांखळीनें, एका मनुष्याचा संबंध जोडला होता, त्या सांखळीच्या कड्या फारच कमकुवत व नाजूक आहेत असें मला वाटतें. तुमची माझी गारगोटीस भेट झाल्यापासून त्या सांखळींत मीं नवी एक अधिक कडी जोडिली आहे. '

कमळा०—आणि अधिक काय शोधून काढलें आहे, हें तुम्ही मला सांगत नाहीं ?

गणप०—आणखी कांहीं थोडें अधिक शोधून काढल्यावर तुह्मांला सांगावें असें मनांत आहे.

कमळा०—तुमचा गगनबावड्याकडे जाण्याचा बेत आहे, असें मला तुमच्या तारेवरून वाटलें.

गणप०—हो, गगनबावड्याकडे जाऊन आलों.

कमळा०—खरेंच कीं काय ? तर मग जास्ती जो काय शोध लागला तो तेथेंच वाटतें ?

गणप०—होय तसेंच. कमळाबाई, तुमच्या हें पक्कें ध्यानांत असलें पाहिजे कीं, मी जी ही संशयाची इमारत बांधली आहे तिचा मजबूत पाया कोणता ह्मणजे [illegible]तें तादात्म्य. उघडपणें या दोन व्यक्तींचा [illegible] अशा मानलेल्या व्यक्तींचें जीवंत [illegible]का कपटजालांत तुमचा बंधु [illegible]त्र यात्र व्यक्तींच्या [illegible]प्रमाणें त्याच [illegible]रीस छत्रविर [illegible] तर साक्षें [illegible] मीं सांगूं [illegible] उघडपणें [illegible] मला येऊन [illegible] गीं खात्रीनें [illegible] [illegible] [illegible]

मग कमळाबाई शांतपणानें ह्मणाली, 'गणपतराव, माझ्या भावाचा काय परिणाम झाला, हें शोधून काढल्याखेरीज तुझी कधींही राहणार नाहीं अशी माझी पक्की खात्री आहे.'

तिचें हें बोलणें संपतें न संपतें तोंच तिची मावशी तेथें आली. तिला पाहून 'येतों आतां,' असें ह्मणून जातां जातां ते पुढें ह्मणाले, 'कमळाबाई, मी कुचकामाचा आळशी माणूस आहें. परंतु एवढें खरें कीं, तुमच्या भावाचा शोध लावण्यांत व त्याला पुन्हां सुखासमाधानांत पाहण्यांत माझें सर्वस्वी नुकसान करून घेण्यास मी आज तयार आहें. परंतु यांत एवढें मात्र होणार कीं, माझ्या जीवापेक्षांही अधिक प्रिय जे आहेत त्यांचा नाश होणार आहे.'

कमळाबाईची मावशी जवळ आल्यावर तिला ती हंसत हंसत ह्मणाली 'तुझ्याबरोबर आतां येथें बोलत उभा राहिला होता तो कोण? मोठा सरदार दिसतो.'

कमळा०—नो एक कील आहे, माझ्या दादाचा स्नेही. याचें नांव गणपतराव. फार भला स. त्यांची माझी आकस्मात् येथें भेट झाली. आमच्या या हिम्मतबहादराचा कोणी नातेवाईक आहे?'

'अस्सं. मला वाटं तवहादाज
'कोण? जगदे तेहाकि आन
'होय बाई. या -कलाप, हें ?
प्रांताचे माल न; तिला क
प्याला जाऊं, तें
पडेलच.'

'काय!
ह्मणाली. 'ज
'होय. द
भिकारड्या
सर्वत्र कांहीं
बाई, उभीं र
आहे. चल
आहे?'

कमळाबाई व तिची मावशी मागच्या बाजूला बसल्या व तो पेटी घेऊन जाणारा मुलगा पुढें बसून येक्याचें घोडें हाकूं लागला.

एकमेकींशीं कांहीं न बोलतां बराच वेळ मार्ग क्रमिल्यावर कमळा म्हणाली, 'मावशी, या हिमतबहादरांच्या बायकोची सर्व हकीगत सांगशील कां ? तिची हकीगत ऐकण्याची मला फार वाई इच्छा आहे. तिचें पहिलें नांव काय तें तुला ठाऊक आहे ?'

'होय सांगतें हो, काय म्हणे चंपाबाई.'

'रूपानें फार चांगली आहे नव्हे कां ?'

'खरेंच बाई फार चांगली आहे म्हणे. मी कांहीं अजून ती पाहिली नाहीं, पण फार चांगली आहे, असें सर्व सांगतात. डोळे मोठे काळेभोर असून फार पाणीदार आहेत. केस फार लांब, सडक व काळेभोर अगदीं ढुंगणाच्या खालीं लोळतात! तिच्यांत भारदस्तपणा मात्र नाहीं. अगदीं पोरकट आहे. पाहिल्या बरोबरच तिचा स्वभाव पोरकट आहे, असें दिसतें म्हणे.'

कमळाबाई कांहींच बोलली नाहीं व तिनें पुढें आणखी कांहीं विचारलेंही नाहीं.

लग्न झाल्यानंतर लागलीच नारायणराव चव्हाणानें जें तिला पत्र पाठविलें त्याचें तिला स्मरण झालें, तें वाक्य हें

साडकी माझ्याजवळ बसलेली आहे.

ती तरी आनंद होतो ! तिचे ते

कलाप, हें पाहून स्वर्गांतल्या

तिला काय पाहीन, असें

भाग ३० वा.

चौक्या समोरच्या कमानीजवळच्या डिक्या गार मैदानावर आपल्या मामीची मार्गप्रतीक्षा करीत गणपतराव इकडे तिकडे उगीच फिरत होते, इतक्यांत निहालकुवरबाई आपल्या लेकीसह गाडींत बसून तेथें आली. गाडी कमानीजवळ येते न येते तोंच गणपतरावांनीं गाडीस गाठून 'मामी' ह्मणून हांक मारली. गणपतरावांची हांक ऐकिल्याबरोबर गाडी उभी करण्यास कोचमनास तिनें इशारा केला. गाडी उभी राहिल्याबरोबर गणपतराव, आमच्या बाईताहेबांनीं खालीं उतरावें ह्मणून, गाडीचें दार उघडूं लागले.

निहालकुवरबाई या वेळेस लाल भर्जरी शालू नेसली होती, व वर गणपतरावांनीं आणलेली शाल पांघरली होती. या पोशाखानें ती फारच रमणीय दिसत होती. गणपतरावांना पाहून तिला फार आनंद झाला, असें दिसलें, व नोट्या मोहक तऱ्हेनें हंसून, खालीं उतरत उतरत ती ह्मणाली 'काय बाई तरी, इतकीं जेव्हां वरचेवर पत्रें पाठवून अगदीं पत्रांचा सेतु बांधला तेव्हां एकदां [illegible] ला आपल्या पायांनीं, जातांना पाहत आतां, तें आहे कसे पळून जातात, तें पाहूं कीं, होय न हसका मारला व ह्मटलें 'अगदीं. अगदीं आहे! त्याला बोलावयाचें गणपत ह्मणाले 'असेल तें 'काय भरीत ह्मह्यांच्या मन

सांत असावित ते सर्व इच्याजवळ आहेत. आणि तथापि—' इतक्यांत शंका व अडचणी यांनीं हे अगदीं व्यस्तचित्त झाले. आपल्या मनांत आतां काय आहे, हें त्यांचें त्यांसच कळेना.

तेथेंच कमालीजवळच्या हिरव्या गवतावर उगीच इकडे तिकडे आपल्या लेकीबरोबर हळू हळू फिरत आमच्या बाईसाहेब गणपतरावांना उद्देशून म्हणाल्या, ' काय हो गणपतराव, गेल्या दोन तीन दिवसांत आपली स्वारी कोणीकडे झुकली होती? ' हा प्रश्न ऐकिल्याबरोबर गणपतराव झोंपेंतून एकदम उठल्यासारखें करून तिच्याकडे टकमक पाहूं लागले. त्या वेळचा तिचा तो आनंदी चेहरा, तिचें तें पोरकटपणाचें विचारणें, इत्यादि अनेक गोष्टींनीं वेडे होऊन, त्यांनीं तिच्याकडे मोठ्या चमत्कारिक वृत्तीनें पाहिलें !

' मी होय? तिकडे गगनबावडयाकडे गेलों होतों. तो माझा मित्र नारायणराव अपलें लग्न झाल्यावर तिकडे जाऊन आपल्या बायकोला घेऊन राहिला होता, तिकडे गेलों होतों, ' हें ऐकिल्याबरोबर आमच्या बाईसाहेबांच्या चेहऱ्यावरची टवटवी एकदम कमी झाली एवढेंच. ती हंसली; पण तें हंसणें आनंदानें झोंडें - ' अगदीं नाहीं; आपल्या वृत्तींत कांहीं फरक झाला - महाम हंसली खरी. परंतु ह्या हंसण्यानें न गणपतरावांचे मनावर दुसरा- डयांत जाण्यास ती निश्च य उत्पन्न केला. ' जाऊं द्या कीं त्यावें आहे. इ. उशीर वेणीफणी न द्यावें

हा प्रश्न विचारतांना तिच्या मनाचा अगदीं गोंधळ उडून जाऊन अगदीं चेधा उडाली आहे, असें त्यांस स्पष्ट दिसलें.

'काय बाई, मजबरोबर तें काय बोलावयाचें आहे!' असें ती पुन्हां म्हणाली.

गणप०—(सगुणाकडे पाहून) जरा थांबा, सांगतों. तुम्ही आणि, मीच असलों म्हणजे—

सगुणा तेथें जवळच उभी होती, तिने हें सर्व ऐकिलें. तिला वाटलें कीं, आपल्या ह्या सावत्र आईचें सौंदर्य पाहून ही स्वारी अगदीं कामपीडित होऊन तिच्या प्रेमपाशांत व मोहजालांत सांपडूं पहात आहे. असल्या चंचल स्वभावाच्या पुरुषाच्या हांतून अतें होणें अगदीं साहजिकच आहे असें तिनें ठरविलें. आपण येथून जावें, असें गणपतरावांच्या मनांत आहे, हें जाणून ती कांहीं न बोलतां आंत निघून गेली. आंत जाऊन आप-ल्याशींच ह्मणाली 'मला जर असें पूर्वीचें कळतें, तर ही याचा नादच सो-डला असता. पुरुषाची जात फार बेमानी. एक रूप चांगलें अतलें कीं लागले कसे लाळ घोटावयाला. मग ती आई असो, बहीण असो, लेक असो, भावजय असो, कोणी कां असेना. त्याचा नाहीं विचार मग. काय जाळावयाचें आहे त्यांच्या विद्वत्ते[illegible]ली. कोणी नांवें ठेविलीं कीं लागलीच 'अं[illegible] काय आहे!' ह्मणावयाचें. अग[illegible] तें, तर फार फार बरें होतें.

असा विचार [illegible]
सीझर कुड्यात[illegible]

सगुणा [illegible]
च्या थोरल्या[illegible]
बसूं; चला [illegible]

'बरें अ[illegible]
हींच आल्या[illegible]
गली. जणूं [illegible]
सपास तीं[illegible]

'काय मामी तुम्हांला थंडी वाजते कीं काय? अलें हुडहुडी भरल्या-सारखें कां करतां'

काय हो, मला हुडहुडी भरल्यासारखेंच झालें, काय अलेल तें असो. तुमचें हें बोलणें आणखी केव्हां तरी कां होईना?

'येवढें कशाला. आपण उद्यांच क्रीडागारांत स्वस्थ बोलत बसूं. येथें कशाला? मला मेजवानीला आतां जावयाचें आहे. मला अजून वेणी-फणी करावयाची आहे. डागडागिने अंगावर घालावयाचे आहेत. दुसरा शालू नेसावयाचा आहे. झालें झटलें तर, आज सकाळच्या दहावाजल्या-पासून तिकडे भेटलेंच नाहीं. तर मला जाऊंद्या आतां. उद्यांच बोलूं. जाऊं तर आतां?'

हें ती फार गयावया नींड करून अगदीं रडक्या स्वरानें जणूं काय तिला कोणी आतां फांशी देण्याला नेत आहे, तेव्हां 'वांचवा' अशा म-णण्याच्या स्वरानें म्हणाली.

हें पाहून, गणपतरावांना देखील फार वाईट वाटलें, तथापि जरा जोरानें व निश्चयानें ते झगाले.---नाहीं नाहीं. आतांच बोलणें झालें पाहिजे. आतां मला तुझी फार निर्दय असें झगाना कां, परंतु तशी निर्दयता माझे अंगीं येण्याला कारण तरी ---ग वडाक्यांतून चुकलां असतां, हें तुम्हांला स ---ला आणा झ सूचना, तीहि पग अशी ---ण्याला मी काय करूं आत ---नें कांहीं एक चालायचें ---नांच बोलणें झालें

---र्या, बरोबर
इतकेलला
उजेडांत
जिकडे
---हीं रडवा
या अ-
खील एक-
तरी आहे,

ती. अंधारांत दिव्या घेरीज या खोलींतून त्या खोलींत सुद्धां मला जावयत नाहीं. मला बाई फार भय वाटतें.'

गणप०—काय, तुम्ही फार भित्र्या आहां ?

निहाल०—होय हो ! फारच ! तें कांहीं विचारूं नका. मी सरलष्करांचे येथें होतें, तेव्हां माझी भीति जावी ह्मणून त्यांनीं व त्यांच्या बैद्यांनीं नानातऱ्हेचे उपाय केले, पण बाई माझी भीति ह्मणून कसली ती गेली नाहीं.

गणप०—मामी, तुह्मांला आठवतें कां तो म्याकबेथ आपल्या बैद्याला काय सांगतो तें ? सरलष्करांनीं पुष्कळ उपाय केले असतील खरे, पण जेथें मनच बिघडलें आहे, तेथें ते बिचारे सरलष्कर काय करणार ? आणि त्यांचा तो बैद्यही पण काय करणार ?

निहाल०—माझें मन दूषित झालें आहे, असें कोण ह्मणतें ?

गणप०—कोण ह्मणजे ? मी म्हणतों. तुह्मीच सांगतां कीं 'मी फार मितरी आहें' ह्मणून. हा मितरेपणा कां कोठें औषधानें जात असतो ? असल्या बैद्यांच्या हातून हा कधींही जावयाचा नाहीं. त्याला बैद्य मीच योग्य खरा ! आतां त्याचें मूळ शोधून काढतों. खरोखरच ह्मणाल, तर तुमच्यावर कांहीं प्रसंग येऊं नये, अशी माझी मनापासून इच्छा आहे. ती खरी कां खोटी, तें एका परमेश्वरालाच माहीत. दुसऱ्याचा न्याय करण्यांत माझ्याकडून होईल तेवढी मी तुह्मांला सवलत देईन. पण न्याय झाला पाहिजे, एवढें खरें.

निहाल०—(थोडें सावमानानें हंसत) तुमच्या मर्जीप्रमाणेंच.

गणप०—तुमचें मन दूषित होण्याला कारण येवढेंच कीं, ह्या वाड्यांत तुह्मांला वाहेरवासा झाला असावा. भूतबीत बडवलें असावें !

निहाल०—काय ! भूत लागलें !

गणप०—होय ! नारायणराव चव्हाण लागला असावा !

तिनें आपली शालजोडी अंगाला अगदीं गुरफटून घेतली होती, तरी ती थरथर कांपत आहे, व तिची छाती धडधड उडत आहे, दांत खडखड वाजत आहेत, हें त्यांस तेव्हांच कळलें.

निहाल०—(कांहीं वेळ थांबून व मोठ्या त्वेषानें ओरडून) काय ! तुह्मी ह्मणतां तरी काय हें ! त्या मेल्या नारायणराव चव्हाणाच्या गोष्टी काढून मला कां उगीच त्रास देतां ? तुमचा डोळा चुकवून कोठें तरी

दोन महिने तो गेला असेल झालें! मला कां त्याचा ताप! गणपतराव, तुम्हांला वेडबीड कांहीं लागलें नाहींना? एक विषयोन्मत्त होऊन कांहीं तरी बडबडतां झालें. किंवा तुमचें डोकें फिरलें खास. त्याखेरीज असें वेड्यावेड्यासारखे तुम्ही कधीं वरळणार नाहीं. मला त्या मेल्या नारायणरावाला घेऊन काय करावयाचें आहे? जाईनाका पाहिजे तिकडे उलथून मला कां उगीच छळतां?

गणप०—तुमची त्याची अगदीं ओळख नाहीं अं? तुम्ही कोण, तो कोण. अगदीं परकी!

निहाल०—होय, निःसंशय. तो कोणत्ही मी के.ण? त्याचा माझा काय संबंध? मला तो परकीच.

गणप०—बाईसाहेब, नारायणराव चव्हाण नाहींसा कसा झाला, ही सर्व हकीकत आपणांला इत्थंभूत सांगूं कां?

निहाल०—नको. मला नाहीं त्याची जरूर. तो मेला झणे. कोणी मेल्याची वार्ता ऐकून कोणालाही वाईट वाटतें, तसें मलाही वाटतें. वरें तो जीवंत असला, तरी मला काय करावयाचें आहे? त्याचें तिकडे कांहीं का होईना? मला उठाठेव करण्याची जरूर? तो तिकडे आडांत पडो, कीं विहीरींत पडो! मला काय त्या मेल्याचें! चला सोडा, मला जाऊंद्या आंत. अगदीं वाट पहात बसले असतील. अशीच जर मला येथें बसवून ठ्याल, तर खरोखरच ह्या भीतीनें व थंडीनें माझा प्राण जाईल.

गणप०—(दृढ निश्चयानें) मी काय म्हणतों, हें सर्व ऐकून घेतल्याखेरीज मी नाहीं जाऊं देणार. जरूरीपेक्षां जास्ती वेळ येथें तुम्हांला मीं कधींही बसवून घेणार नाहीं. माझें एवढें ऐकून घेतल्यावर कसें काय वागावयाचें तें ठरवा.

निहाल०—(निष्काळजीपणानें) फार चांगलें. काय बोलावयाचें तें बोला लवकर. तुमचें म्हणणें मी सर्व ऐकून घेतें.

गणप०—(मोठ्या गंभीरपणानें) नारायणराव चव्हाण चिनाहून परत आला, तेव्हां त्याच्या मनांत एकच विचार प्रमुख होता. आणि तो कोणचा म्हणाल, तर आपल्या लाडक्या बायकोविषयींचा.

निहाल०—(चटकन् अनवधानपणें) जिला तो सोडून पळून

गेला ?—(मग थोडा विचार करून) तुम्ही आपल्या मित्राची हकीकत सांगितलीत, तेव्हां असेंच कायसें म्हणालां होतां, हें मला आठवतें.

गणप०—(तिच्या या भाषणाकडे लक्ष न पोंचून पुढें) त्या वेळेस त्याच्या मनांत आपल्या बायकोविषयींच विचार घोळत होते. चिनाहून मिळवून आणलेल्या पैशाचा तिनें व आपण आनंदानें उपभोग घ्यावयाचा, हा त्याचा पूर्ण बेत. चिनाहून आल्यावर पहिल्या प्रथम मलाच तो भेटला. तेव्हां आपल्या प्रियपत्नीला भेटण्याचा केवढा तरी आनंद त्याला झाला होता ! काय औत्सुक्य ! तें सर्व अजून माझ्या डोळ्यांसमोर दिसत आहे ! तसेंच तिच्या मरणाची बातमी ऐकून त्याच्या मनाला केवढा धक्का बसला ! हेंही पण मला माहित आहे. ह्या आकस्मिक धक्कयानें त्याच्यामध्यें केवढें मोठें तरी अंतर पडलें होतें ! त्या 'ज्ञानमंदिर' वर्तमानपत्रांत स्त्री मेल्याची बातमी वाचल्याबरोबर त्याचा चेहरा एकदम काळा ठिक्कर पडला व डोळे पाण्यानें डबडबले. हें मला सर्व आतां दिसत आहे ! ! आतां मला खास वाटतें, कीं त्या वर्तमानपत्रांतील ती बातमी निव्वळ रद्दबाडीची व कपटाची असली पाहिजे.

निहाल०—खरेंच ! काय म्हणतां ! त्याची बायको जीवंत असतां मेली म्हणून कोणीं मेल्या दुष्टांनीं छापलें हो ! काय बाई छाती तरी ! असें हो कसें होईल ? नाहीं तेंच तुमचें !!

गणप०—(शांतपणें) कोणीं म्हणजे, तिनें तिनेंच छापविलें असेल !

निहाल०—आणि तिला असें करण्याला कारण ?

गणप०—येवढेंच—तो येथें नाहीं, हें पाहून अशी बातमी उठवून दुसरा श्रीमंत नवरा करून घ्यावयाचा !

हें ऐकून थर्र करून आंगावर कांटा आल्यासारखें निहालकुंवरबाईनें केलें.

निहाल०—तुमच्या ह्या कल्पना निव्वळ पोकळ आहेत. ह्या ऐकून मला तर हंसू येतें. याला कांहीं सयुक्तिक कारण असेल तर सगळें खरें.

गणप०—(तिच्या प्रश्नाकडे लक्ष न देऊन) तुम्हांला माहीत आहे मामी, मुंबईस निघणाऱ्या दोन मोठ्या प्रत्याहिक पत्रांच्या 'फाइली' मी चाळून पाहिल्या आहेत. त्यांत 'परदेशांतली माहिती' या सदराखालीं मी असें वाचलें कीं 'एक करवीराकडचे गृहस्थ चिनांत कांहीं वर्षांपूर्वी येथील कांहीं व्यापाऱ्यांचे एजंट होऊन गेले होते, ते पुष्कळ पैसा मिळवून इकडे

येण्याला कुमुदबांधव आगबोटींतून निघाले आहेत.' या पत्राची तारिख २ सन १८— आहे. तो उतारा करवीरच्या पत्रांनीं घेतला होता. त्यांत म्हणजे कांहीं विशेष आहे, असें कांहीं नाहीं मामी; परतु त्या वेळीं म्हणजे १८—सालीं करवीर प्रांतीं लिहितां वाचतां येणाऱ्या प्रत्येक स्त्रीपुरुषाला ही हकीकत माहीत असली पाहिजे, एवढें मात्र खरें. आलें कां तुमच्या लक्षांत ?

निहाल०—नाहीं, मला नाहीं नीटसें समजलें. नारायणरावाच्या बायकोच्या मरणाशीं करवीरच्या पत्राचा काय संबंध?

गणप०—थोडा दम धरा. क्रमाक्रमानें सर्व कांहीं येईल. ज्ञानमंदिर वर्तमानपत्रांत छापलेली बातमी खोटी आहे, अशी माझी पक्की खातरी आहे. व या कामांत नारायणरावाचा सासरा तुकोजीराव शिंदे व नारायणरावाची बायको आनंदीबाई या दोघांचें पूर्णपणें अंग असलें पाहिजे. त्यांनीं कट केला असावा, हें खास.

निहाल०—काय झणतां! कट ?

गणप०—होय. निःसंशय. त्या लबाड स्त्रीनें कटच केला आहे. आपला प्रामाणिक, मायाळू पण गरीब नवरा परदेशाला गेला, ही संधी साधून मरणाची खोटी बातमी उडविण्याचा महान् अपराध करून एका मोठ्या संभावित श्रीमंत घराण्यांत शिरून ती बसली आहे. खरोखरच मामी, ती स्त्री फारच धैर्याची, हुशार व कपटीही तशीच. आरंभापासून अखेरपर्यंत हूं कां चूं होऊं न देतां सर्व काम तिनें पार पाडलें. त्या दुष्ट स्त्रीच्या कधीं ध्यानीं मनीं सुद्धां आलें नाहीं, कीं या योगानें आपण ज्याचा गळा कापला व विश्वासघात केला त्याला काय दुःख झालें असेल तें!! अरेरे! फसली बिचारी!! तिच्या लक्षांतच हें आलें नाहीं कीं कितीही गुप्तपणें पाप केलें, तरी तें सर्वसाक्षी ईश्वरास कळल्याखेरीज राहत नाहीं व ता कांहीं तरी युक्तीनें तें सर्व बाहेर आणितो! वर्तमानपत्रांत ती बातमी छापविण्यापेक्षां मोठें पाप तिनें कोणतेंच केलें नाहीं! तिनें त्या इमानी नवऱ्याचा गळा कापण्याला ती सुरीच तयार केली! इतकी दुष्ट स्त्री या जगांत दुसरी मिळणार नाहीं! तिनें सर्व मानवी प्राण्यांला आपल्या ह्या नीच कृतीनें काळोखी लाविली!

निहाल०—अहो, पण ती बातमीच खोटी, असें कसें तुम्ही म्हणतां ?

तुम्हींच आम्हांला नाहीं कां सांगितलें, कीं नारायणरावांबरोबर गगनपुरीस त्याच्या बायकोची छत्री पाहण्याला गेलों होतों म्हणून. नारायणरावाची बायको जर मेली नाहीं म्हणतां, तर ती छत्री कोणाची मग ?

गणप०—खरेंच मामी, हा एक मुख्य प्रश्न आहे, व या प्रश्नाचा जबाब दोन तीन असामींना माहीत आहे. त्यांपैकीं एखाद दुसरा लवकरच मला या प्रश्नाचें उत्तर देईल. मामी, हें तुम्ही लक्षांत ठेवा, नारायणरावाच्या मरणाचें हें काय जें मौठें रहस्य आहे, तें मी बाहेर आणल्याखेरीज राहणार नाहीं. तुम्हांला वाटतें कां, कीं बायकांच्या अशा लबाडीनें व चाळवणीनें मी फसेन म्हणून. एक एक कडी मिळवून मी ही पुराव्याची सांखळी तयार केली आहे. आतां कांहीं फार नाहीं. आणखी एक दोन कड्या घातल्या कीं ही भयंकर साखळी तयार झालीच म्हणा. तुम्हांला वाटतें कां इतक्या थराला गोष्ट येऊन मी फसेन, व माझ्या हातून ती सांखळी पूर्ण होणार नाहीं म्हणून ? मामीसाहेब, मी असा फसावयाचा नाहीं. आतां कोणत्या मार्गानें जावें, हें मला पूर्णपणें माहीत आहे. शिरोळास गिरिजाबाई म्हणून एक म्हातारी आहे, तिला आमच्या नारायणरावाच्या सासऱ्याची कांहीं गुप्त गोष्ट माहीत आहे. गगनपुरी येथें कोणाची छत्री बांधली, याचा सुगावा तिच्याकडूनच मला लागणार आहे. तो शोध लावण्यांत मी अगदीं कसर करणार नाहीं. तथापि,—

निहाल०—(मोठ्या बांदलीनें) 'तथापि' म्हणजे काय ?

गणप०—तथापि, ज्या स्त्रीची फजिती होऊं नये, अशी माझी फारच इच्छा आहे, ती स्त्री सर्व अपराध कबूल करून, मी सांगतों त्याप्रमाणें करण्याला तयार असेल, तर मी येथेंच थांबतों. तिनें माझ्या म्हणण्याला होकार द्यावा हें बरें.

निहाल०—त्या स्त्रीनें तुमच्या या वाकिली भाषणानें फसून कांहीं भलतेंच सांगितलें, तर तिनें होऊन आपल्या पायांवर दगड पाडून घेतल्यासारखेंच होईल, असें मला वाटतें. अहो गणपतराव, पित्तप्रकोपानें आपलें डोकें अगदीं चढून गेलें आहे, म्हणून असें बरळतां ! थोडी सुतशेखरची मात्रा तरी द्या म्हणजे बरें ! तुमच्या डोक्यांत हें करलें वेड शिरलें म्हणतें ! ! तुम्हांला न कळत नारायणरावाचा परिणाम झाला, म्हणजे तुम्हांला न कळवितां तो कोठें तरी निघून गेला असावा झालें. मग त्याचें काय ये

कें ? तुम्हींच सांगतां कीं बायको मेल्यावर त्याचें मन अगदीं स्थिर न-व्हतें. त्या वेडेपणांत तो कोठें तरी गेला असेल. आणि उगीच तुम्ही राईचा पर्वत करून वेड्यासारखी व्यर्थ खटपट करीत आहां. आनंदीबाई मेली; 'ज्ञानमंदिर' पत्र ती मेली म्हणून छापलें; तिचा बापच ती मेली म्हणून तु-म्हांला सांगतो; गगनपुरीस तुम्ही स्वतः जाऊन तिची स्मशानभूमिका पा-हून येतां; (मोठा कर्कश आवाज काढून) आणि उगीच येथें येऊन नारा-यणरावाविषयीं मला कां छळतां ? मला त्याची माहिती विचारण्याची तुम्हांला हो काय गरज ? त्याची बायको अजून जीवंत आहे, असें तुम्ही क-शावरून हो म्हणतां ?

गणप०—कशावरून म्हणजे ? आनुमानिक पुराव्यावरून व कांहीं प्रत्यक्ष पुराव्यावरून.

निहाल०—आनुमानिक पुरावा तो कोणता ?

गणप०—ऐका. वेळेचा, स्थळाचा, व हस्तलेखाचा पुरावा. ज्या वेळेस गगनबावडयाहून बापाला सोडून आनंदीबाई निघून गेली, त्या वेळेस तिनें आपल्या बापाला एक चिठी लिहून ठेविली होती. त्यांत तिनें लिहिलें आहे कीं, 'आतां या स्थितींत राहण्याचा मला कंटाळा आला आहे. व आतां श्रीमंताशीं संबंध करण्याचा बेत केला आहे.' तें पत्र मला मिळालें आहे तें माझ्या जवळ आहे.

निहाल०—खरेंच कीं काय ?! अग्गबाई !!!

गणप०—तें अक्षर कोणाच्या अक्षरासारखें आहे सांगूं कां ? तें अक्षर व मी म्हणतों ज्याच्या सारखें आहे म्हणून तें, हीं दोन्हीं एखाद्या हुशार मनुष्याला दाखविलीं, तर तो तीं दोन मनुष्यांचीं निरानिराळीं आहेत, असें कधींही म्हणणार नाहीं.

निहाल०—त्यांत हो काय येवढें ? आतांच्या दिवसांत अक्षरांसारखीं अक्षरें फार. त्यांतून बायकांचीं तर विशेष. मी तुम्हांला एक नाहीं, दोन नाहीं, शेंपन्नास अक्षरांसारखीं अक्षरें दाखवितें. तुम्हांला ओळखतां सुद्धां येणार नाहींत.

गणप०—बरें, इतकें असूनही त्यांत कांहीं विशेष साम्य असलें तर मग ?

निहाल०—मग तें फार चमत्कारिक साम्य म्हटलें पाहिजे. असें

साम्य असू शकेल. यांत कांहीं विशेष नाहीं. आनंदीबाईचें अक्षर एखाद्या जीवंत असलेल्या स्त्रीसारखें अगदीं हुबेहुब असलें, म्हणजे त्यावरून ती आनंदीबाई जीवंत आहे, असें कसें म्हणतां येईल ? मेली ती मेलीच.

गणप०—पण अशा अनेक तऱ्हेच्या साम्यतेची मालिकाच असेल तर ? आनंदीबाई आपल्या स्वदस्तूरच्या पत्रांत आपल्या बापाला लिहिते, कीं मला आतां या स्थितीचा कंटाळा आला आहे. एखाद्या श्रीमंताच्या घरांत शिरण्याला मी पाहतें. यावरून काय अर्थ निघतो, माहीत आहे कां तुम्हांला ?

निहाल०—मला नाहीं तें कांहीं समजत. चला, मला जाऊं द्या. ह्यां भेसूर ठिकाणीं उभें राहून मला बाई कंटाळा आला. आम्हांला जेवायाला जावयाचें आहे. आंत वाट पहात बसले असतील. जाऊं द्या लवकर—

गणप०—(मोठ्या दृढ निश्चयानें व कठोरतेनें) नाहीं मामी, तें नाहीं कांहीं चालणार. बायकांच्या अशा लबाडीनें मी फसणार नाहीं, म्हणून एकदां सांगितलें आहें. मी तुम्हांला आगाऊ योग्य सूचना केली आहे दोन महिन्यांपूर्वी. परोक्ष रीतीनें तुम्हांला मी खरमरीत ताकीद दिली आहे.

निहाल०—काय बाई तरी हें ? याचा अर्थ काय ?

गणप०—(आपलें बोलणें पुढें सुरू करून) निहालकुवरबाई, योग्य वेळीं सूचना दिलेली तुम्हांला रुचली नाहीं. त्याला माझा उपाय नाहीं. आतां मला सर्व उघडपणें सांगणें जरूर आहे. तुम्ही जो इतके दिवस हा लपंडावाचा खेळ चालविला आहां तो कधींच फुटणार नाहीं होय ? इतके दिवस निभलें. आतां मात्र कठीण आहे तुमचा आतां तुमच्या सौंदर्यापासून, तुमच्या या मुसमुसलेल्या तारुण्यापासून, तुमच्या या सुधारलेल्या उत्तम रीतिभातींपासून, तुमच्या या साखरपेंड्या स्वभावापासून, तुमच्या या तारुण्याच्या लीलेपासून, आतां मात्र बचाव होणें नाहीं. तुमच्या पापाचा घडा पूर्ण भरला. आतां एक थेंबही मावण्यास अवकाश नाहीं. आतां हीं सर्व तुमचीं हत्यारें, तुमचा गळा काण्यासच उपयोगीं पडतील. यापासून रक्षण होण्याची आशा आतां विसरा. समजलें कां मामीसाहेब? आनंदीबाई पुन्हां आपल्या बापाच्या घरीं कधींच गेली नाहीं. आतां पुन्हां त्या भिकार झोंपडयांत जावयाचें नाहीं, असा पक्का निश्चय करूनच ती गेली. आतां अगदीं निराळा मार्ग स्वीकारावयाचा, असा तिनें बेत केला

होना; व ज्या वेळेस या जगांत एखादें मनुष्य स्थित्यंतर करून नवीन मार्ग स्वीकारण्याचे मनांत आणतें, तेव्हां तें काय करीत असतें, हें तुम्हांला ठाऊक आहे कां ? नसेल कदाचित् माहीत तर मी सांगतों. स्थित्यंतराचा पहिला पाया, म्हणजे नांव बदलणें हा होय. काय सांगूं मामी, ती दुष्ट, कर्कशा, बेमानी, विश्वासघातकी आनंदीबाई आपल्या लहान, निराश्रित बाळाला सोडून गेली. आतां पुन्हां म्हणून याचा संबंध नको. जणूंकाय आपण दुसराच जन्म घेतला. असा बेत करून ती गगनबावडयाहून पळाली. १८—साली —महिन्याच्या १६ व्या तारखेस ती आनंदीबाई निघून गेली आणि त्याच महिन्याच्या १७ वे तारखेस 'चंपाबाई' हें नांव घेऊन, अगदीं निराश्रित, गरीब अशी होऊन एके ठिकाणीं राहिली. तेथें तिची त्यासंबंधानें कांहीं कोणीं विचारपूस केली नाहीं.

निहाल०—(मध्येंच मोठ्यानें ओरडून) गणपतराव, तुमचें डोकें अगदीं बिघडून गेलें आहे. तुम्हांला वेड लागलें आहे हें खास. त्या खेरीज तुम्ही असें नाहीं कधीं बरळणार. वेडयाच्या संगतीला लागून काय उपयोग ? त्याला किती जरी समजावून सांगितलें, तरी त्यानें तें खरें. आतां मला आंत जाऊन तिकडे हें कळवलें पाहिजे. तिकडे कळविल्या खेरीज या वेडयाच्या हातून माझी सुटका होणार नाहीं. आनंदीबाई एके दिवशीं पळून गेली व त्याच्या दुसरे दिवशींच मी एका ठिकाणीं नोकरीस राहिलें, यांत काय मोठें विशेष आहे ? यापासून काय निष्पन्न होणार, मला नाहीं कळत ?

गणप०—तुसतें एवढ्यावरून कांहींच होणार नाहीं, पण त्याच्या जोडाला दुसरा पुरावा घतला म्हणजे.—

निहाल०—तो कोणचा ?

गणप०—मिस···च्या ताब्यांत असलेल्या एका पेटीवरची रेलवेकडची एकावर एक डकविलेलीं दोन 'लेबलें.' वरच्या 'लेबला' वर 'चंपाबाई' हें नांव आहे, आणि खालच्यावर आनंदबिाई हें नांव आहे ! —

हें ऐकून आमच्या बाईसाहेब अगदीं स्तब्ध झाल्या. या वेळेस तिची चर्या कशी झाली आहे, हें गणपतरावांस या अगदीं कडोशाच्या वेळेस नीटसें दिसेना. परंतु भयचकित होऊन तिनें आपले दोन्ही हात डोक्यावर घट्ट दाबिले आहेत, असें त्यांनीं अनमान केलें. आपली मात्रा पूर्णपणें लागू

झाली, हें त्यांच्या तेव्हांच लक्षांत आलें. पुढें कांहीं न बोलतां ते तिच्या जवळच इकडे तिकडे उगीच फिरूं लागले. तीही त्यांच्या मागोमाग जादूनें भारल्याप्रमाणें जाऊं लागली. तीं दोघेंही मागच्या बाजूनें गर्द झाडांतून त्या पडक्या विहिरीजवळ आलीं. या मोठ्या रस्त्यापासून विहिरीकडे जाण्याला, नेहमीं जाण्यायेण्याचा राबता नसल्यानें, फारशी मळली नाहीं अशी पाऊलवाट होती. तिकडे गणपतराव वळले. तेथें गेल्यानें पलीकडच्या खिडकींतला उजेड आमच्या बाईसाहेबांच्या तोंडावर चांगला पडण्यासारखा होता व तेणेंकरून तिच्या चेहऱ्यावर होणारा सर्व फेरफार त्यांना दिसण्याला मार्ग होता. विहिरीजवळच्या धांवेवर जाईपर्यंत ते कांहींच बोलले नाहींत. मोटवणाच्या एका खांबटयाला टेकून उभे राहून तिच्याकडे निहाळून ते पाहूं लागले. त्या वेळेस तिचा चेहरा अगदीं पांढरा फटक झाला होता. गणपतरावांनीं मग पुन्हां सुरू केलें-'निहालकुंवरबाई' तीं दोन 'लेबलें' माझ्याजवळ आहेत. तुम्ही आपली पेटी मिस···च्या येथें काट्यायनी हिल्सवर टेबिली आहे, त्या पेटीवरची मला हीं मिळालीं आहेत. मी तीं मिस··· व नीची असिस्टंट मिस टॉकसच्या समक्ष काढून घेतलीं आहेत. यावर तुमचें कांहीं म्हणणें आहे ? असेल तर येऊंद्या बाहेर. तुमचें नांव चंपाबाई, हें तुम्हीं तर कबूल करीतच आहां, आणि म्हणूनच मला आतां आनंदीबाई या नांवाशीं कांहीं कर्तव्य नाहीं. तुमची मागची ज्यांना माहिती आहे, असे कांहीं साक्षीदार तुम्ही आणूं शकतां काय ? ब्रम्हपुरीवर मिस···च्या येथें राहण्यापूर्वी तुम्ही कोठें होतां बरें ? ही गोष्ट सिद्ध करण्यास कोणी तुमचे नातेवाईक, कोणी आप्त इष्ट, कोणी मित्र किंवा कोणी निदान तोंडओळखीचे तरी असल्यास सांगा. हीच वेळ आहे. बोला. तुम्हांला कोणीच यांपैकीं नसेल तर निदान तुम्ही कोणच्या गांवांत राहत होतां, हें तरी सांगितलें पाहिजे.

निहाल०—(मोठ्या रागानें) बरें, बरें, एखाद्या माजिस्त्रेटापुढें मी जाऊन उभी राहिलें म्हणजे साक्षीन् पुरावा सर्व कांहीं आणीन समजलांत गणपतराव ! तेव्हां आतां तशी कांहीं स्थिति नाहीं, तर मी काय करावें आतां; दुसरें कांहीं नाहीं, तुमचा हा वेडेपणा पाहून हंसतें मात्र म्हणजे झालें. खरोखरच तुम्ही अगदीं वेडे होऊन गेलां आहां. त्या वेडेपणांत मीच आनंदीबाई असें म्हणत असलां तर म्हणा बापडे. माझें काय

होना; व ज्या वेळेस या जगांत एखादें मनुष्य स्थित्यंतर करून नवीन मार्ग स्वीकारण्याचा मनांत आणतें, तेव्हां तें काय करीत असतें, हें तुह्मांला ठाऊक आहे कां ? नसेल कदाचित् माहीत तर मी सांगतों. स्थित्यंतराचा पहिला पाया, ह्मणजे नांव बदलणें हा होय. काय सांगूं मामी, ती दुष्ट, कर्कशा, बेमानी, विश्वासघातकी आनंदीबाई आपल्या लहान, निराश्रित बाळाला सोडून गेली. आतां पुन्हां ह्मणून याचा संबंध नको. जणूंकाय आपण दुसराच जन्म घेतला. असा बेत करून ती गगनबावडयाहून पळाली. १८—सालीं —महिन्याच्या १६ व्या तारखेस ती आनंदीबाई निघून गेली आणि त्याच महिन्याच्या १७ वे तारखेस 'चंपाबाई' हें नांव घेऊन, अगदीं निराश्रित, गरीब अशी होऊन एके ठिकाणीं राहिली. तेथें तिची त्यासंबंधानें कांहीं कोणीं विचारपूस केली नाहीं.

निहाल०—(मध्येंच मोठ्यानें ओरडून) गणपतराव, तुमचें डोकें अगदीं बिघडून गेलें आहे. तुम्ह्मांला वेड लागलें आहे हें खास. त्या खेरीज तुम्ही असें नाहीं कधीं बरळणार. वेडयाच्या संगतीला लागून काय उपयोग ? त्याला किती जरी समजावून सांगितलें, तरी त्यानें तें खरें. आतां मला आंत जाऊन निकडे हें कळवलेंच पाहिजे. निकडे कळविल्या खेरीज या वेडयाच्या हातून माझी सुटका होणार नाहीं. आनंदीबाई एके दिवशीं पळून गेली व त्याच्या दुसरे दिवशींच मी एका ठिकाणीं नोकरीस राहिलें, यांत काय मोठें विशेष आहे ? यापासून काय निष्पन्न होणार, मला नाहीं कळत ?

गणप०—तुसेंत एवढ्यावरून कांहींच होणार नाहीं, पण त्याच्या जोडीला दुसरा पुरावा घेतला ह्मणजे —

निहाल०—तो कोणचा ?

गणप०—मिस···च्या ताब्यांत असलेल्या एका पेटीवरची रेलवेकडची एकावर एक डकविलेलीं दोन 'लेबलें.' वरच्या 'लेबला' वर 'चंपाबाई' हें नांव आहे, आणि खालच्यावर आनंदीबाई हें नांव आहे ! —

हें ऐकून आमच्या बाईसाहेब अगदीं स्तब्ध झाल्या. या वेळेस तिची चर्या कशी झाली आहे, हें गणपतरावांस या अगदीं कडोशाच्या वेळेस नीटसें दिसेना. परंतु भयचकित होऊन तिनें आपले दोन्ही हात उरावर घट्ट ठेविले आहेत, असें त्यांनीं अनुमान केलें. आपली मात्रा पूर्णपणें लागू

झाली, हें त्यांच्या तेव्हांच लक्षांत आलें. पुढें कांहीं न बोलतां ते तिच्या जवळच इकडे तिकडे उगीच फिरूं लागले. तीही त्यांच्या मागोमाग जादूनें भारल्याप्रमाणें जाऊं लागली. तीं दोघेंही मागच्या बाजूनें गर्द झाडांतून त्या पडक्या विहिरीजवळ आलीं. या मोठ्या रस्यापासून विहिरीकडे जाण्याला, नेहमीं जाण्यायेण्याचा राबता नसल्यानें, फारशी मळली नाहीं अशी पाऊलवाट होती. तिकडे गणपतराव वळले. तेथें गेल्यानें पलीकडच्या खिडकींतला उजेड आमच्या बाईसाहेबांच्या तोंडावर चांगला पडण्यासारखा होता व तेणेंकरून तिच्या चेहऱ्यावर होणारा सर्व फेरफार त्यांना दिसण्याला मार्ग होता. विहिरीजवळच्या धांवेवर जाईपर्यंत ते कांहींच बोलले नाहींत. मोटवणाच्या एका खांबट्याला टेकून उभे राहून तिच्याकडे निहाळून ते पाहूं लागले. त्या वेळेस तिचा चेहरा अगदीं पांढरा फटक झाला होता. गणपतरावांनीं मग पुन्हां सुरू केलें-'निहालकुंवरबाई' तीं दोन 'लेबलें' माझ्याजवळ आहेत. तुझी आपली पेटी मिस···च्या येथें काट्यांनी हिल्सवर ठेविली आहे, त्या पेटीवरची मला हीं मिळालीं आहेत. मी तीं मिस··· व नीची असिस्टंट मिस टॉकसच्या समक्ष काढून घेतलीं आहेत. यावर तुमचें कांहीं म्हणणें आहे ? असेल तर येऊंद्या बाहेर. तुमचें नांव चंपाबाई, हें तुम्हीं तर कबूल करीतच आहां, आणि म्हणूनच मला आतां आनंदीबाई या नांवाशीं कांहीं कर्तव्य नाहीं. तुमची मागची ज्यांना माहिती आहे, असे कांहीं साक्षीदार तुम्ही आणूं शकतां काय ? ब्रम्हपुरीवर मिस···च्या येथें राहण्यापूर्वी तुम्ही कोठें होतां बरें ? ही गोष्ट सिद्ध करण्यास कोणी तुमचे नातेवाईक, कोणी आप्त इष्ट, कोणी मित्र किंवा कोणी निदान तोंडओळखीचे तरी असल्यास सांगा. हीच वेळ आहे. बोला. तुम्हांला कोणीच यांपैकीं नसेल तर निदान तुम्ही कोणच्या गांवांत राहत होतां, हें तरी सांगितलें पाहिजे.

निहाल०—(मोठ्या रागानें) बरें, बरें, एखाद्या माजिस्त्रेटापुढें मी जाऊन उभी राहिलें म्हणजे साक्षीन् पुरावा सर्व कांहीं आणीन समजलांत गणपतराव ! तेव्हां आतां तशी कांहीं स्थिति नाहीं, तर मी काय करावें आतां; दुसरें कांहीं नाहीं, तुमचा हा वेडेपणा पाहून हंसतें मात्र म्हणजे झालें. खरोखरच तुम्ही अगदीं वेडे होऊन गेलां आहां. त्या वेडेपणांत मीच आनंदीबाई असें म्हणत असलां तर म्हणा बापडे. माझें काय

त्यांत नुकसान आहे ? परंतु एवढें मात्र पक्कें लक्षांत ठेवा कीं, अशा वेड्यांना ' लुनायटिक् असायलं ' (वेड्याचें इस्पितळ) मध्यें जन्मभर अडकवीत असतात. समजलें ?

निहालकुवरबाईचें हें बोलणें ऐकून गणपतराव एकदम आश्चर्यचकित होऊन आत्मगत म्हणतात, ' हँ, असें काय ? पहिला अपराध छपविण्या करितां ही आतां दुसरा अपराध करणार ! आतां ही मामांना खोट्यानाट्या बाता सांगून भीड घालून स्त्रीकापट्यानें भुलवून त्यांच्या करवी.मला ही ' म्याडहौस ' (खुळ्याची चावडी) मध्यें पाठविणार ! ! शाबास ! याचें नांव स्त्रीचातुर्य ! '

अमचा गणपतराव वकील मोठ्या छातीचा खरा. भीति म्हणून त्याला कशी ती ठाऊक नाहीं, पण आतां निहालकुवरबाईचें हें बोलणें ऐकून त्याच्या अंगावर थरारून कांटा आला. या बायका काय काय भयंकर कृत्ये करतील याचा नेम नाहीं. या जगांत ईश्वरानें स्त्री उत्पन्न केल्यापासून या स्त्रियांनीं किती तरी भयंकर कृत्यें केलीं व पुढें करतील हें मनांत येऊन त्यांना फारच भीति वाटली. ' या स्त्रिया काय करतील,' याचा नेम नाहीं. आपला मतलब साधण्यासाठीं हवीं तसलीं भयंकर व भ्रमाचीं दुष्ट कृत्यें त्या करतील, व पुन्हां अबला व नाजूक म्हणून घेण्याला तयारच ! ! ईश्वरानें असला प्राणी कां उत्पन्न केला हें कळत नाहीं. स्त्रियांचे अंगीं जसें सौंदर्य व मार्दव असतें तशीच खरी दया, माया, अथवा प्रीति असते काय ?

कांहीं न बोलतां गणपतराव निहालकुवरबाईकडे पाहात स्वस्थ उभे राहिले. त्यांना कांहीं चेळ अगदींच सुचेना. मग थोड्या वेळानें त्यांनीं असा विचार केला, ' माझ्या मनांत जें काय होतें तें सर्व इला मी कळविलें. परंतु या कपटपटु स्त्रीनें आपली मात्र हकीकत अजून सांगितली नाहीं. तिनें जें हें संभावितपणाचें सोंग घेतलें आहे, हें घालविणें फार कठिण दिसतें. आमचे मामासाहेब इला कांहीं अपराधी म्हणणार नाहींत. मलाच वेडा म्हणतील हें खास. '

' इच्या अशा नुसत्या भेडसावणीला मीं भ्यावें काय ? इतका मी नामर्द झालों काय ? एकदां कां इच्याविषयीं माझ्या मनांत भीति बसली कीं माझ्या हातून कांहीं होणार नाहीं. येथेंच कोठें तरी आसपास त्या दिवशीं दोन प्रहरीं नारायणराव चव्हाण इला भेटला असावा. आणि इचा व त्याचा झगडा झाला असावा. गरीब विचारा, ह्या राक्षसीच्या मुखीं पडला ! '

सगुणा—काय ? गणपतराव, बाबाला भेटल्याखेरीज जाणें चांगलें नव्हे अं.

गणप०—काय करूं सगुणा ? मी एका मोठ्या महत्वाच्या कामांत पडलों आहे, त्याकरितां आतां मला सवड नाहीं. बरें तर आतां येतों. उद्यां मीच येईन नाहीं तर चिट्ठी पाठवीन समजलंसि ?

असें म्हणन आपल्या मामीस 'येतों बरें कां' असें विचारून ही स्वारी पुढच्या दरवाज्यानें बाहेर पडली. ते दृष्टीआड होईपर्यंत सगुणा व निहालकुवर तेथेंच त्यांच्याकडे पहात उभ्या राहिल्या.

सगुणा—कायबाई याला म्हणावें तरी काय ? असलें कसलें यांचें महत्वाचें काम. मोठा नादी. एकदां डोक्यांत कांहीं शिरलें कीं अगदीं वेडयासारखें करतो. त्याचें त्याला वेडच लागतें.

निहाल०—(गंभीरपणानें) तुझ्या कधीं लक्षांत आली आहे कां तुझ्या भावाची अशी वर्तणूक ?

सगुणा—माझ्या लक्षांत नाहीं बाई कधीं. मी कशाला इतकें बारीक पहात बसूं ? त्याला कशाला एवढें बारीक पाहणें पाहिजे. तो आळशी, नादी, आपल्याच तंत्रानें वागणारा आहे, हें सर्वांना माहीत आहे.

निहाल०—पण तो असें कधीं वेडयासारखें करतो, हें तुझ्या नाहीं कां लक्षांत.

सगुणा—वेडयासारखें काय म्हणा, पण असें नादिष्टासारखें नेहमीं करतो.

निहाल०—त्याचे आईबाप असेच होते वाटतें ? तूं नाहीं मला कधीं हें सांगितलेंस. तुला आहे कां त्यांची आठवण ?

सगुणा—मीं नाहीं त्याची आई पाहिली. ती फार चंचलवृत्तीची होती म्हणे. हा अगदीं लहान असतांनाच ती कागलास गेली.

निहाल०—तिच्याबद्दल कांहीं विशेष माहिती तुला आहे काय ?

सगुणा—विशेष म्हणजे ?

निहाल०—म्हणजे नादी. ज्याला लोक खुळसर म्हणतात अशी.

सगुणा—(मोठ्यानें हंसून) छे, अगदीं नाहीं. माझी आत फारच शहाणी होती असें सर्व सांगतात. मी जन्मण्याचे पूर्वीच ती मेली, तेव्हां मला तिची विशेष माहिती कोठून असणार ?

निहाल०—वरें तुझा मामा तुला आडवतो काय ?

सगुणा—कोण ? आमच्या गणपतरावाचा बाप होय ? हो चांगला आडवतो.

निहाल०—तो असा खुळसर होता काय ? असा वेड्यासारखा ?

सगुणा—होय. तो असा एककल्ली होता. हा अगदीं आपल्या बापासारखाच आहे. पण तो फारच दयाळू. आपल्या बायकोवर त्याची फारच प्रीति होती.

निहाल०—परंतु जरा वेडसरच म्हणावयाचा.

सगुणा—होय. तसाच कांहीं अंशीं म्हटला तरी चालेल.

निहाल०—हां आतां जुळलें ; तुला माहीत आहे कां सगुणा, असा बापाच्या आंगचा वेडसरपणा मुलांला येतो तो ? तुझा भाऊ गणपतराव रूपवान् आहे, वकील आहे, म्हणून त्याच्यावर विशेष नजर ठेविली पाहिजे. त्या लहरींत तो काय करील याचा नेम नाहीं.

सगुणा—(तिरस्कारानें) काय वेडा ? तुम्हांला स्वप्न पडलें वाटतें ? मला—मला—मला—उगीच भीति घालतां वाटतें ?

निहाल०—तसें नाहीं. वेळेवर तुला सावध करतें. तूं म्हणतेस त्याप्रमाणें तो एककल्ली असेल, पण आज संध्याकाळीं तो मजबरोबर बोलला, त्यावरून त्याचा हा एककल्लीपणा वाढून तो आतां वेडा होणार असें वाटतें. आतां चांगलें वेड्यासारखें करतो. त्याचें हें वेड्यासारखें व करणें बोलणें पाहून मी बाई अगदीं भिऊन गेलें. आज मी त्यांच्या (नवऱ्याच्या) कानावर ही गोष्ट घालीनच. लवकर उपाय केला पाहिजे.

सगुणा—काय बाबाजवळ असली गोष्ट बोलणार ? मग चांगलें ! उगीच असलें वेडें वाकडें बोलून त्यांचे मनाला काळजी लावूं नका.

निहाल०—छे, तसें कांहीं नाहीं. मी आपली उगीच त्यांना सुचवून ठेवीन.

सगुणा—या तुमच्या बोलण्यावर बाबा कधीं विश्वास ठेवणार नाहींत. उगीच तुम्हीं आपलें हंसें मात्र करून घ्याल. बाबा हंसल्याखेरीज कधींच राहणार नाहींत, वरें कां माई ?

निहाल०—(हंसत हंसत) तसें मात्र म्हणूं नकोस वरें कां सगुणा. मी जें सांगेन त्यावर तिकडचा पूर्ण भरंवसा.

आमच्या बाईसाहेबही मोठवणाच्या दुसऱ्या खांबावर हात ठेवून पायांतल्या सपातीनें गवतावर पाय फिरवीत गणपतरावांकडे वांकड्या नजरेनें पहात उभ्या राहिल्या होत्या.

गणप०—(मोठ्या गंभीरपणानें) मामी, यांत दुसरें कांहीं नाहीं; खुद्द यमाजी भास्करावरोबरच द्वंद्वयुद्ध केल्याप्रमाणें होणार आहे. माझी सूचना तुम्ही नाकारितां, येथून काळें करून कोठें तरी निघून जाण्यास नाकारितां, न येथें राहून मला धुडकावून चैन करावी म्हणतां, नाहीं ?

निहाल०—(वर मान करून) होय, होय, तसेंच. तुम्हांला वेड लागून तुम्ही कांहींचेंबाहीं बडबडावयाला लागलां, त्याला मी काय करूं ? व त्या वेडेपणांत तुम्ही जर माझ्यावर नसतें संकट आणूं लागलां तर त्यांत माझा काय अपराध आहे ?

गणप०—बरें तसेंच कां होईना ? आपण ज्या रस्त्यानें मघां आलों, त्याच रस्त्यानें माझा मित्र नारायणराव या बागेंत आलेला मीं पाहिला आहे. त्यावर तो पुन्हां कोठेंच दृष्टीस पडला नाहीं ! येथून परत गेलेला कोणींच पाहिला नाहीं ! व तो गेलाही पण नाहीं, अशी माझी पूर्ण खात्री आहे. या बागेंतच तो कोठें तरी मरून पडला असावा. त्याला हुडकून काढण्याकरितां या बागेंतली प्रत्येक झाडाची मुळीन् मुळी उकरून काढीन ! या वाड्याचा प्रत्येक दगड उपटून टाकीन ! कधीं राहणार नाहीं. समजलां कां मामी ?

'अग्गबाई ! काय मेला चांडाळ म्हणतो पहा ? कसा मेला मला छळतो पहा ?' असें मोठ्यानें म्हणून मोठी कर्कश एक किंकाळी फोडून निराशेनें तिनें आपले दोन्ही हात पुढें केले व पुन्हां परत घेऊन छातीवर ते घट्ट धरून डोळे वटारून मोठ्या रागानें त्यांच्याकडे ती पाहूं लागली.

निहाल०—(मग थोडी शुद्धीवर येऊन) बवते मेल्या, कसें काय तूं करतोस तें !! तुझेंच मेल्या अगोदर वाटोळें करतें. मोठा आला सांगायला ! आत्तां येथें तुझा मुडदा पाडतें बघ. मला कां उगीच छळतोस ? माझ्यामागें कां उगचि हात धुऊन लागलास ? मीं काय तुझा अपराध केला म्हणून मला असा त्रास देतोस ? माझ्या पाळतीवर तूं कां इतका राहतोस ? तुझ्या मनांत काय मला वेडें ठरवायाचें आहे ? खूप समजून ऐस मेल्या, तुझ्या हातून कांहीं एक होणार नाहीं. चल मेल्या नीघ येथून

वेड लागून येथें आला आहे आणि बडबडतो मन मानेल तसें! आतां शिपायांकडून गचांडी मारून हांकून लावतें बघ.

गणप०—(शांतपणानें) होय. मला वेड लागलें आहे खरें. तुझ्यावर दया करावी म्हणून मीं असें केलें. त्याचीं हीं फळें!! फार चांगली आहेस तूं! आतां तर तुझ्यावर दया म्हणून होणें नाहींच. आतां फक्त मृत मनुष्याबद्दल न्याय करण्याचें काम राहिलें.

असें म्हणून गणपतराव तेथून निघून पुढच्या दरवाज्याकडे चालले. वाटेंत वाड्याच्या कोपऱ्याजवळच्या स्वयंपाकघराच्या एका खोलींतून बाहेर आलेली सगुणा त्यांस भेटली. निहालकुवरबाईही त्यांचे मागोमाग च होती.

सगुणा—गणपतराव, मघांपासून मी तुम्हांला चोहोंकडे हुडकतें. बाबा खालीं वाचनगृहांत बसले आहेत. चल तिकडे जाऊं. चल तर.

आपल्या मामेबहिणीचा आवाज एकदम ऐकून गणपतराव दचकले व मनाशींच म्हणाले, 'त्या ब्रह्मदेवानें या दोन स्त्रिया एकाच चिखलाच्या केल्या नसतील हें खास. इच्या व तिच्या स्वभावांत किती तरी अंतर! जमीन अस्मानाचें!'

असें म्हणून मागें वळून त्यांनीं निहालकुवरबाईकडे पाहिलें. ती तेथें जवळच त्या स्वयंपाकघराच्या खोलींत जाण्याकरितां त्यांनीं वाट सोडावी म्हणून उभी राहिली होती.

निहाल०—अग सगुणा, तुझ्या भावाला आज कांहीं झालें वाटतें. काय तें कळत नाहीं. तो कांहीं आज शुद्धिवर नाहीं. मीं त्याला पुष्कळ सांगितलें, पण सर्व व्यर्थ. त्याचा मेंदू अगदीं बिघडून गेला आहे. निव्वळ वेडा.

सगुणा—खरेंच कीं काय? तर मग इतका वेळ त्याला शुद्धीवर आणण्याचीच तुम्ही खटपट करीत होतां वाटतें?

गणप०—खरेंच सगुणा, मामींनीं माझी समजूत चांगली केली. एकमेकांचें मन आतां निर्मळ झालें. आतां बरीच रात्र झाली. चला जाऊंया-आतां. मी आतां जोतिबाच्या पथिकाश्रमाकडे जातों. तेथेंच रात्रीं निजेन. माझें कांहीं तेथें जरूरीचें काम आहे. [illegible]

जगदे०—काय म्हणावें या पोराला ? वेडबीड तर नाहींना लागलें ?

हे शब्द आपल्या रमणाच्या तोंडचे ऐकिल्याबरोबर तिचा चेहरा एकदम प्रफुल्लित झाला. तो प्रफुल्लितपणा, ती अंधारांत असल्यामुळें आमच्या भार्यानिरत वृद्धाच्या नजरेस पडला नाहीं. यांच्या ह्या साहजिक बोलण्याची संधि साधून ती मनांत म्हणाली 'हं, आतां ठीक. आतां जुळलें. आतां काय उशीर ? हां हां म्हणतां मन वळवितें पहा. आतां काय ? पाहिजे तसें वळवावें. आतां आलें माझ्या अवसानांत.'

ते कोणच्याच विशेष हेतूनें हें बोलले नाहींत. साहजिक त्यांच्या तोंडांतून असे शब्द निघाले. कांहीं एक हेतु नसतां साधारण भाषणांत मनुष्याच्या हातून आशा चुका होतात. त्यांतलीच ही जगदेरावाची चूक. गणपतराव फार आळशी आहे, त्याला कांहीं काम करावयाला नको, म्हणून तो जरा मंदबुद्धीचा आहे, असें ते नेहमीं म्हणत. त्यांचें आपलें हें ठरीवच मत झालें होतें. वकिलीची परीक्षा होऊनही याची प्रासिद्धि होत नाहीं, तेव्हां याचा मेंदूच जरा शिथिल आहे, असें त्यांनीं ठरविलें होतें.

त्यांच्या हें लक्षांतच कधीं आलें नाहीं कीं, योग्य संधि न मिळाल्यानें, लोकांत पुढें पुढें करण्याचें अंगीं सामर्थ्य कमी असल्यानें, किंवा आत्मस्तुति करण्यास नको असल्यानें, किंवा त्यांना कोणी पुढें आणण्यास नसल्यानें कविकुलगुरु कालिदासासारखे किती तरी या जगांत उत्पन्न होऊन जागचे जागीं लयास गेले असतील ! तसेंच गोब्राह्मणप्रतिपालक शिवाजी महाराजांसारखे किती तरी पुरुष उत्पन्न झाले असतील ! पण वरच्या गोटींची मदत नसल्यानें उदरंभर कीटकांप्रमाणें लयास गेले असतील ! वास्तविक म्हटलें असतां मनुष्यानें आजपर्यंत जें कांहीं कृत्य केलें असेल, त्यावरून त्याची पुढची सर्व कर्तव्यता मनांत आणून अटकळ बांधणें कांहीं अंशीं चुकीचें होईल.

निहालकुवरबाई, बोटाला गुंडाळलेला चंद्रहाराचा पदर सोडून आपल्या प्राणपतिजवळ जाऊन त्याच्या शेजारीं कोंचावर, पायावर पाय देवून, गुडघ्यावर बोटांत बोटें अडकावून देवून, मोठया लीनतेनें बसली व म्हणाली 'गाडींतून उतरल्याबरोबरच मीं इकडे येणार—गाडींतून उतरल्याबरोबरच इकडे येणार खरी, परंतु गणपतरावांनीं थोडा वेळ बोलत उभी रहा, म्हणून मला फारच आग्रह केला. नाहीं तर—

जगदे०—गणूचें आणि तुझें कशावरुन बोलणें चाललें होतें ? इत काय गुह्य होतें ?

आमच्या बाईसाहेबांनीं यावर कांहींच उत्तर न देतां, आपलें डोकें आपल्या प्रियकराच्या मांडीवर ठेवून, खालीं तोंड करून एकदम स्फुंदण्यालाच आरंभ केला.

जगदेवरावांनीं मोठ्या प्रेमानें तिचें डोकें आपल्या हातांनीं वर उचललें तों ते आकर्ण, हरिणबालकांच्या नेत्रांलाही लाजविणारे तिचे नेत्र अगदीं लाल होऊन पाण्यानें डबडबून खालीं थेंब पडत आहेत असें पाहिलें.

जगदे०—(प्रेमानें पाठीवरून हात फिरवून) अग, अग, झालें तरी काय ? बरें झालें तें झालें. आतां नाहीं मीं कधीं उशीर कां लागला म्हणून विचारणार बरें. पुस डोळे. मी आपल्या हातरुमालानें पुसतों मग झालं कीं नाहीं ? अरे ! जास्तीच हुंदका आला! अरे ! झालें तरी काय ? छे बोवा, आपण बाललों ही मोठी चूक झाली. सरकार माफ करा. आतां नाहीं कधीं बोलणार; समजलीस. काय, झालें तरी काय ? नाहीं कां सांगत ? जों जों म्हणावें तों तों जास्तीच रडतेस हें काय !(गालांवरून हात फिरवून) असें काय बरें ? सांगत नाहींस होय ? उगीच फार रडूं नकोस. डोकं दुखेल. डोळे, नाक, गाल पहा किती लाल झाले ते ! ! काय झालें तें सांग पाहूं एकदां. सांग माझी लाडकी ती !

निहालकुवरबाईनें उत्तर देण्याची पुष्कळ खटपट केली, पण पहिल्यानें तिच्या तोंडांतून अक्षरच निघेना ! मागाहून रडण्याचे हुंदक्यावर हुंदके येऊं लागले त्यामुळें त्यांस ती काय म्हणते तें नीट कळेना.

पुरुष कितीही क्रूर असो, शूर असो, शहाणा असो, कसाही असो, पण एकदां कां आपल्या स्त्रीच्या प्रेमपाशांत बद्ध झाला, कीं तिच्या ओढून ताढून आणलेल्या रागापुढें याचें क्रौर्य, शौर्य, शहाणपण इत्यादि गुण जेथल्या तेथेंच जिरून जातात ! आमच्या जगदेवरावांचीही स्थिति अशीच झाली होती. अरेरे ! ! या दुष्ट स्त्रीनें या भोळ्या महताऱ्याला फसविलें तें फसविलें आणि वर रडण्याचें सोंग करून, त्याला पुरा पेंचांत अडकवीत आहे ! पहा ! जों जों ती डोळ्यांतील पाण्याचे थेंब खालीं टाकते, तों तों त्या उपोद्कानें या जगदेवरावांच्या ननुलतिकेस सिंचन केल्याप्रमाणेंच होऊन ती [illegible] कोमेजन जात आहे ! त्या स्फंदण्यानें, त्यांचें काळीज तापविल्याचेहि कोमेजन जात आहे !

भाग ३१ वा.

गणपतराव गेल्यावर स्वयंपाकघराच्या खोलींत जाण्याचें सोडून निहालकुवरबाई वाचनगृहांत जेथें आपले प्राणपति जगदेवराव बसले होते तिकडे गेली. ह्याच वाचनगृहांत संध्याकाळीं सातपासून नऊ वाजेपर्यंत लिहीत, वाचीत, किंवा आपल्या वतनदार कारभाऱ्यांबरोबर विशेष महत्त्वाच्या प्रकरणांचा निकाल करीत बसण्याची जगदेवरावांची नेहमींची वहिवाट असे. तेव्हां रंगमहालांत न जातां निहालकुवरबाई इकडेच प्रथमतः आली, यांत तिनें कांहीं नित्यक्रमाविरुद्ध मुळींच केलें नाहीं.

जगदेवराव एका भव्य कौचावर अपल्या प्रियेची मार्गप्रतीक्षा करीत बसले होते. एक अरगिनचा दिवा पलीकडच्या टेबलावर मंद असा तेवत होता. यांची किती तरी आपल्या भार्येवर प्रीति ! ! या प्रीतींत गौण मिश्रता म्हणून कसली ती नाहीं. इतकी निर्मळ प्रीति कोठेंच मिळावयाची नाहीं. ती किती होती हें आमच्यानें मुळींच वर्णन करवत नाहीं. पण एकमेकांच्या प्रीतिपाशांत बद्ध झालेल्या एखाद्या जोडप्यास ईश्वर जेव्हां त्याच्या खऱ्या प्रीतीचें दर्शक म्हणून प्रथमच फल देतो, तेव्हां त्या बालकावर त्या नुकतीच 'आई' हें नांव पावलेल्या स्त्रीचें जितकें व जसें निर्मळ प्रेम असतें तसेंच किंबहुना कांकणभर जास्तीच प्रेम आमच्या जगदेवरावांचें आपल्या मदनमंजरीवर होतें, येवढेंच खरें.

जगदेवराव जणूं काय हातांत स्मरणी घेऊनच तिचें चिंतन करीत आहेत. तोंच एकदम खाड्कन् दार उघडून त्यांची प्राणप्रिया तेथें दारांतच उभी राहिली.

कांहीं क्षणांनीं तिनें दार बंद केल्यावर ते तिला मोठ्या प्रेमानें म्हणाले, 'कां सरकार, आपली स्वारी इतका वेळ होती कोठें ? एक तास झाला मीं वाट सारखी पहात आहें ? म्हटलें आतां येईल मग येईल तर तुमचा पत्ताच नाहीं ? कोठें होतीस तरी ह्या वेळपर्यंत ? कांहीं कामांत होतां वाटतें ? कांहीं राजकीय प्रकरण होतें कीं काय ?'

आमच्या बाईसाहेब त्या दिव्याच्या पूर्ण उजेडांत उभ्या न राहतां पडसावलींत ह्या प्रश्नाचें उत्तर देण्याचे पूर्वी बराच वेळ स्तब्ध उभ्या राहिल्या.

'मीं मघां-तिकडे-यांना भेटावयाला गेलें होतें. म्हटलें फार दिवस झाले,

अलीकडे गेलें नाहीं. एकदां भेटून यावें आणि... ' एवढेंच अडखळत झणून ती गळ्यांतल्या चंद्रहाराचा एक पदर हातांत धरून घोटाळल्यासारखी होऊन उगीच त्याला पीळ घालूं लागली.

'आणि काय? तिकडून आल्यापासून एवढा वेळ कोठें होतीस? गाडीचा अवाज ऐकून तर मला पुष्कळ वेळ झाला. ती तुझीच गाडी कीं नाहीं? कां दुसरें कोणी आलें?

'होय. मला येऊन तास झाला ' असें पहिल्यासारखेंच घोटाळून तिनें उत्तर दिलें.

'आणि मग तर कोठें होतीस एवढा वेळ?'

जगदेवरावांनीं हा प्रश्न जरा खोंचून विचारला. त्यांच्या मनांत आलें कीं, ही कोठें तरी अज्ञान मुलीप्रमाणें पोरकट गप्पा मारीत बसली असेल. 'मग इतका वेळ कोठें होतीस? मला सोडून इतका वेळ तुला कसें राहवलें बरें?'

'मी आपल्या —आपल्या—गणपतरावाबराबर बोलत बसलें होतें. तिनें हें देखील उत्तर अडखळत जरा घोटाळूनच दिलें.

जगदे०—कोण आपला गणू? काय? आपला गणू येथें आला आहे?

निहाल०—होय. येथें आला होता खरा.

जगदे०—मग आतां गेला नाहींना? कोठें आहे?

निहाल०—नाहीं. तो मघांच गेला.

जगदे०—गेला म्हणजे? म्हणतेस तरी काय? या वेळेस त्याला कां जाऊं दिलेंस? पोर न जेवतांच गेला!! हें काय बरें?

निहाल०—म्हणजे काय? म्हणजे आपले भाचे तिसरे प्रहरीच येथें आले. मीं आणि सगुणा तिकडून आलों, तों तो बागेंत फिरत असलेला अढळला. त्याला जाऊन झाला सुमार अर्धा तास. एवढा वेळपर्यंत मजबरोबर बोलत बसला होता. मीं त्याला जाऊं नको म्हणून पुष्कळ गळ घातली, पण काय बाई, 'जोतिबाच्या पायिकाश्रमांत कांहीं जरूरीचें काम आहे' असें म्हणून गेला पळत तेथें. कांहीं तरी वेडीवाकडी सबब सांगून पार झाला झालें!!

जगदे०—काम? पायिकाश्रमांत कसलें याचें काम? आज रात्रीं तेथेंच राहणार कां परत येथें येणार?

निहाल०—होय. तेथेंच राहीन, असें असेंच कांहींसें सांगाला खरें.

लेल्या सांडसानें वहिर ओढून काढल्याप्रमाणें होत आहे !! अरेरे !! जगदेवरावांची ही स्थिति आम्हांला फारच वाईट वाटते ! अजून या भोळ्या सांबाला इचें कपट कळेना! कशानें कळणार विचाऱ्याला ? मोठे मोठे वेदांती, भर्तृहरीसारखे स्त्रीमोहजालांत सांपडून मोह पावले ! मग आमच्या ह्या जगदेवरावांची काय कथा ! या स्त्रियांच्या मोहपाशांतून कोण सुटला आहे ! अतिशय विद्वान व मूर्ख, महान् वेदांती व संसारलोलुप प्राणी, अत्यंत श्रीमान व दरिद्री, हे सर्व एकदां स्त्रीपाशांत अडकले, म्हणजें या सर्वांची स्थिति एकसारखीच ! ती स्त्री आपल्या एका नेत्रकटाक्षानें, आपल्या उगीच दोन मिनिटें मौन धरण्यानें, किंवा किंचित् स्मित वदनानें जर पुरुषाचें सर्व शहाणपण हिरावून घेऊन, त्यास आपल्या पायांचे दास बनविते, तर त्याचे तें क्रौर्य, तें धाष्टर्य व ती विद्वत्ता काय कामाची ! तो समरांगणांत जाऊन, हातांत नागवी समशेर घेऊन हजारों वीरांचीं मुंडकीं उडवील, आपल्या विद्वत्तेनें हजारों पंडितांस एका क्षणांत जिंकील, जग हें मिथ्या आहे, हीं सर्व माया आहे, भ्रम आहे, असा अतिशय संसारलोलुपांच्या मनांवर पांच मिनिटांत ठसा उठवूं शकेल. पण या स्त्रीपुढें यावे हें सर्व रद्द ! केवढी तरी ही विलक्षण शक्ति हिच्या अंगीं !

जगदेवराव एकदम रागानें उठून उभे राहिले. जणूंकाय हिला ज्यानें छळलें त्यास फांशीं देण्यालाच निघाले !

जगदे०—तुला कोण काय बोललें, हें तूं सांगितलेंच पाहिजेस. कोण बोललें त्याचें नांव तरी कळूं दे. तुला कोण बोलणार आहे ! असा कोण माजला आहे सांग, माझे लाडके, सांग पाहूं !

पुन्हां खालीं कौंचावर बसून तिला पोटाशीं धरून फार प्रेमानें कुरवाळून आपल्या हातांनीं तिचे डोळे पुसून म्हणाले, 'किती तरी डोळे लाल झालेत पहा! काय आतां करावें ! डोकें पहा किती तापलें तें ! '

निहाल०—(डोळे पुसून)खरोखर मीच बाई फार नाही) मला नाहीं बाई नाहीं त्याच्या अशा कृतीनें मला फार कांपरें भरलें धडधड होतें! हें पहा!

जगदे०—कोणीं–कोणीं तें असें केलें) अजून माझें काळीज धड

निहाल०—(रागानें) कोणी–,कोणी वरच्या बंगल्यांत सडे फाटिंग मेला चिरूट किती तरी ओ- पतराव, यांनीं.

जगदे०—कोण ? गणू ! काय, म्हणतेस देखील असें होईल. तसेंच फार

निहाल०—(रागानें) तरी मीं झटलेंच खरें वाटावयाचें नाहीं झणून. तो कसला मैंद आहे ! कसा दिसतो गरीब ! कांहीं बोलावयाचें आहे झणून मला त्या वडाखालीं घेऊन गेला आणि तेथें मला नाहीं नाहीं तें बोलला. काय बाई बोलणें तें ! माझ्या ध्यानीं मनीं देखील नाहीं ! मी अगदीं घाबरून गेलें ! !

'असें काय तुला वाईट तो बोलला ? काय त्यानें शिव्या दिल्या ? ' असें विचारल्याबरोबर निहालकुवरबाईनें भीति वाटल्यासारखें दाखवून, अंग थरारून झाडून, आपल्या प्राणपतीच्या बाहूला घट्ट आवळून मिठी मारली.

जगदे०—अगे, असें तो इतकें भीति वाटण्यासारखें काय बोलला ? सांग तरी लवकर. अशी घाबरूं नकोसग.

जगदे०—नको बाई! कसें तरी तें सांगूं ? मीं सांगितलें झणजे उगीच इकडे वाईट वाटेल; नाहीं तर मीच खुळी झणून मला हंसाल झालें. नकोच तें सांगणें आणि—

निहाल०—काय ! मीं हंसेन ? मग चांगलें !

निहालकुवरबाई यावर लवकर कांहीं न बोलतां जगदेवरावांच्या अंगावर हात टाकून दिव्याच्या ज्योतकिडे पहात थोडा वेळ स्तब्ध बसली. मग कांहीं वेळानें हळूच तोंडांतल्या तोंडांत कांहीं पुटपुटून आपल्या वल्लभाकडे पाहून ती झणाली, ' आपल्याला कधीं—नको बाई उगीच पंचाईत,—नाहीं पण सांगतें;—आपल्याला कधीं—, आपला भाचा थोडा—, '

जगदे०—' थोडा ' काय ? माझे लाडके, बोल पाहूं. मला सांगायाला कां इतकी भीड ? मग तूं सांगणार तरी कोणाला ?

निहाल०—(अडखळत) थोडा व्यस्त मनाचा किंवा थोडें डोकें [illegible]डेलेला—

[illegible]०—(मोठ्या आश्चर्यानें) काय ? डोकें विघडलेला ! कोण! [illegible]य झणतेस तरी काय तूं हें !

[illegible] आतांच नाहीं कां झणाला, त्याला वेड लागलें आहे

झटलें कीं काय ? खरेंच ? मला नाहीं अडवण. सहजवृत्या. कांहीं विशेष हेतूनें मुळींच नाहीं. ; थोडा भोळा आहे झणजे मूर्ख आहे; अति

शहाणा नाहीं असें ही नाहीं. पण वेडा किंवा खुळा कांहीं नाहीं, हें खास. मला वाटतें आपले तर्क अलीकडे फार वाढले, झणून असें कांहीं तरी झणतां झालें !

निहाल०—(जरा रागानें) हो, तसें नको कांहीं झणायाला ? असें वेड परंपरेनें घराण्यांत चालत आलेलें असतें. आणि तसेंच कांहीं आपल्या भाच्याला—

तिचें बोलणें संपण्याचे पूर्वीच जगदेवराव झणाले, 'त्याच्या आईच्या घराण्यांत म्हणजे आमच्या घराण्यांत तर असली कांहीं खोड नाहीं. अजूनपर्यंत तर आमच्यापैकीं कोणी रस्त्यानें दगड मारीत किंवा चिंध्या फाडीत फिरला नाहीं, पुढचें काय सांगूं ?

निहाल०—इकडून नाहीं, तर बापाकडून असेल.

जगद०—मला तर कांहीं अडचण नाहीं बोवा !

निहाल०—हो. असल्या गोष्टी कोणी उघड सांगत असतें वाटतें ? काय नाहीं तेंच आपलें ! आपल्या मेव्हण्याच्या कुळांत असेल असली कांहीं खोड. असलीच पाहिजे.

जगदे०—मला नाहीं कांहीं माहीत; पण आज हें काय तूं काढलें आहेस ?

निहाल०—दुसरें कांहीं नाहीं. तुमच्या भाच्याची वागणूक अलीकडे अशी कां झाली, हें मला कळलें पाहिजे. मीं पुष्कळ विचार केला. माझ्या मनांत हेंच येतें. दुसरें कांहीं योग्य कारण दिसत नाहीं. आतां, मघाशीं मला तो जें काय बोलला, तें जर आपण ऐकिलें असतें, तर आपण देखील खास त्याला वेडा ठरविला असता.

जगदे०—अग सगळें खरें. परंतु तो काय झणाला, हें अगोदर सांगशील ना ?

निहाल०—(अंगावर कांटा आल्यासारखें करून) मला नाहीं बाई सांगवत. नको तें. आठवण झाली कीं कसें उरांत धडधड होतें ! हें पहा ! (त्यांचा हात आपल्या उरावर ठेवून) अजून माझें काळीज धडधडत आहे ! ! दुसरें काय ? बावडयावरच्या बंगल्यांत सडे फाटींग एकटे राहून असें कांहीं तरी करतात झालें. मेला चिरूट किती तरी ओढावा ! सदा आपला आहेच तोंडांत, त्यानें देखील असें होईल. तसेंच फार

वाचल्यानेंही असें होतें म्हणतात. डाक्टर लोक नेहमीं सांगतात, कीं मेंदूला फार श्रम पडले म्हणजे तो बिघडतो. पण त्याला थोडा विसावा मिळाला आणि योग्य औषधोपचार वेळेवर झाले, तर रोगी बरा होतो. आपण कांहीं म्हणा, गणपतरावांला वेड लागलें हें खरें. माझी पक्की खात्री झाली आहे. वेडेपणाचें प्रथम चिन्ह म्हणजे घटकेंत एक व घटकेंत दुसरें बोलणें, मागच्या पुढच्या बोलण्याला संबंध नसणें, एकाच विषयावर बोलावयाला लागलें म्हणजे तोच नाद; कांहीं केल्या तो सुटावयाचा नाहीं; अलंच त्याचें झालें आहे. आपण पाहिजे तर वेडा नका म्हणूं ! मला तर त्या मेल्याचें तोंड पाहणें नको. त्याला जर घरांत घेणें असेल, तर मला अगोदर कोठें तरी पाठवा. किंवा तसें कशाला ? ती घ्या तरवार आणि करा माझें शीर व धड वेगळें ! म्हणजे सुटलें याच्या तापांतून ! ! काय बाई मला छळायाला लागला आहे पहा ! मघां मला म्हणाला कीं नारायणराव चव्हाणाचा तूंच येथें खून केलास ! आणि त्याचा मुडदा हुडकून काढावयाला या बागेंतली मुळीनमुळी उकरून काढीन व ह्या वाड्याची चीपन् चीप उलथी पालथी करीन ! काय बाई तरी हें ! आणि त्या—

इतकेंच बोलून ती थांबली, आणि आपण म्हणतें हें खरें, असें दाखविण्याकरितां स्त्रीजातीला जितक्या म्हणून कल्पना सुचतील तितक्या तिनें यावेळीं उपयोगांत आणिल्या !

जगदे०—काय, ही बाग उपटून टाकीन म्हणाला ? हा वाडा पाडून टाकीन म्हणाला ? काय येथें ह्या निहालगडावर नारायणराव चव्हाणाचा खून झाला असें तो म्हणाला ? काय ? असेंच म्हणाला का गणू ?

निहाल०—होय. असेंच कांहींसें—असेंच कांहींसें, मला भीति पडण्यासारखें असेंच कांहींसें बोलला !

जगदे०—मग हें वेड्यासारखें भाषण खरें. तूं सांगितलेंस त्यानें माझें मन अगदीं गोंधळून गेलें. काय ? गणू असें म्हणाला ! नसेल, त्याच्या बोलण्याचा अर्थ तुला कळला नसेल. तूं त्याचा भलताच अर्थ केला असशील झालें. कांहीं कारण नसतां तो असें कसें म्हणेल ! कांहीं तरी—

निहाल०—(रागानें अडखळत) मीं—मीं—मीं—मीं भलताच अर्थ केला असें मनांत सुद्धां आणूं नका. मीं अशी मूर्ख नाहीं, समजलें कां ? आपण पाहिलें नाहीं कां मीं किती घामाघम होऊन आलें ती ! अजन

छाती धडधड करीत आहे ! तो जर असें कांहीं बोलला नसता, तर मीं अशी घाबरलें नसतें. वेड्याला कसलें करण !

जगदे०—जरा शांत हो. रागाऊं नकोस. खरेंच माझे लाडके, असें कशानें बरें झालें असावें? अशी भयंकर कल्पना त्याच्या डोक्यांत कशानें बेंर शिरली असावी ! काय करावें आतां या पोराला. कोण म्हणे नारायण-राव चव्हाण–आम्हाला नांव देखील माहित नाहीं. आणि त्याचा येथें खून झाला ! आतां जेवण करून जोतीबाच्या पंथिकाश्रमाकडे जाऊन त्या पोराला एकदां पाहून येतों. अग, अगदीं नाळ कापल्यापासून मला तो माहीत. माझ्या जवळ कांहीं त्याचें चालावयाचें नाहीं. मीं नाहीं फसणार त्या पोराला. खरोखरच त्याचें डोकें बिघडलें असलें, तर माझ्या लक्षांत चटकन येईल.

निहाल०—हें उघडच आहे. पण आपल्या जवळच्या नातलगांचीं व्यंगें स्वताच्या लवकर लक्ष्यांत येत नाहींत. परक्यांच्या ध्यानांत तेव्हांच तीं येतात. पण बाई, आतां रात्रीं नका जाऊं तिकडे. रात्रींचें जागरण करूं नका. रात्रीचा गार वारा सोसणार नाहीं बरें कां. अजून पहिल्या सारखी प्रकृति झाली नाहीं म्हणून परवां वैद्यबोवांनीं नाहीं कां सांगितलें? उगीच कांहीं जास्ती झालें म्हणजे रिकामी जिवाला काळजी.

'बरें तर' म्हणून जगदेवराव मागें कोंचाला टेकून पडले. मग थोड्या वेळानें म्हणाले 'होय खरेंच. वैद्यबोवांचें म्हणणें ऐकिलें पाहिजे. उद्यां येईन म्हणाला नाहीं कां गणू?'

निहाल०—होय, म्हणाला वाटतें.

जगदे०—तर मग सकाळीं तो आल्यावर काय तें कळेल. तूं कांहींही म्हण, मला नाहीं हें खरें वाटत. असें कधीं होणार नाहीं.

निहाल०—तर मग त्या नारायणरावाबद्दल मला तो असें कां म्हणतो? त्याचें काय कारण बरें ? कळूंद्या एकदां.

यावर जगदेवरावांनीं नुस्ती मान हलविली.

जगदे०—(मग थोडा विचार करून) मला नाहीं कांहीं कळत. काय असेल तें असो. या मनुष्यजातीवर कसा काय व केव्हां प्रसंग येईल याचा नेम नाहीं. काय करावें या पोराला ? त्याला येथें आणून, बारीक लक्ष लावून कांहीं दिवस त्याची वागणूक मला पाहिली पाहिजे. मला ही मोठीच

काळजी लागली ! आतां मला झोंप सुद्धां येणार नाहीं. पोटच्या पोराप्रमाणें ज्याला मीं वागविलें, त्यांची अशी स्थिति आज व्हावी काय ! अरेरे!! शिव शिव ! ! !

आमच्या बाईसाहेबांनींही या वेळीं आपल्या रमणाच्या दुःखोद्गारांस अनुमोदन देण्याकरितांच कीं काय एक मोठा लांबचलांब सुस्कारा टाकला!

निहाल०—'त्याला येथें आणून ठेवीन' असं आतां म्हणणें झालें नाहीं कां ?

जगदे०—होय.

निहाल०—(रागानें) तर मग माझी अगोदर वाट लावा कशी ! तो येथें आला, तर मी येथें पाणी पिण्याला सुद्धां राहणार नाहीं. मला नको बाई त्याचें तोंड पहाणें आतां. तुमचा भाचा तुम्हांला. घ्या गळ्याला आवळून. माझ्या घरांत येतां उपयोगी नाहीं. मला नाहीं तें खपायाचें.

जगदे०—बरें तर. तुला नको तर मला तरी काय करावयाचा आहे ? तुझ्या मर्जीप्रमाणेंच होऊं दे. मग झालें कीं नाहीं ? तुला ज्यांत सुख नाहीं, अशी गोष्ट मी कधीं करीन होय ? पण अतं तुझ्या मनांत तरी कसें आलें ? करवीरच्या डाक्टराकडून त्याची परीक्षा करवीन व खरें काय आहे तें अगोदर समजून घेईन.

निहाल०—कांहींही म्हणा. मला मूर्ख कां म्हणाना घटकाभर. आपल्याला वाईट वाटलें तर वाटो, पण माझ्याबद्दल त्यांचें मन बिघडलें आहे, हें खरें.

जगदे०—काय ? तुझ्याबद्दल !

निहाल०—होय. त्या मेल्या नारायणरावाच्या नाहींसे होण्यांत माझा कांहीं संबंध आहे, असं तो म्हणतो. कलंक फिटाळ माझ्या अंगावर घालतो पाहिलें !! अगबाईग ! काय हें भाषण ! नको बाई तें ऐकणं !

जगदे०—असं कधींच होणार नाहीं. त्याच्या बोलण्याचा अर्थ तुला कळला नाहीं, हेंच खरें.

निहाल०—(रागानें) पण मला नाहीं वाटत असं.

जगदे०—इतकी जर तूं निःशंक आहेस, तर मग त्याला वेड लागलें, असें म्हणणें भाग येतं. कसली तरी मला ही पंचाईत येऊन पडली पहा आतां ! !

निहाल०—उगीच आपल्या मनाला मी काळजी मात्र लावली झालें.

जगदे०—होय, मला फार काळजी लागली. पण तूं मोकळ्या मनानें हें सर्व सांगितलेंस झणून फार बरें झालें. आतां उपाय तरी वेळेवर होईल.

असें झटल्याबरोबर निहालकुवरबाईनें एकदम आनंदानें जगदेवरावांला गाढालिंगन दिलें. या अलिंगनाबरोबर जगदेवरावांनीं तिचें चुंबन घेतलें व लडिवाळपणानें 'अशी घाबरूं नकोस ' असें झटलें.

निहाल०—कोणी कांहीं, कोणी कांहीं सांगून इकडचें माझ्याबद्दल मन मात्र बिघडवितील. पण माझी खात्री आहे, लोकांनीं किती जरी माझ्याविषयीं सांगितलें, तरी इकडचें मन कधींही बिघडणार नाहीं. बिघडेल होय ?

जगदे०—(प्रेमानें) कधीं कधीं असें होणार नाहीं.

निहाल०—कारण, जगांत दुष्ट लोक कसे असतात हें माहीत आहेच. आमच्या सारख्यांचें चांगलें झालेलें त्यांना पाहवत नाहीं. तशींच वेड लागलेलीं माणसें. कांहीं तरी आपल्याला माझ्या विषयीं वाईट सांगून माझा घात करायाला पाहतात झालें.

जगदे०—पण त्यांचें मजजवळ कांहीं चालणार नाहीं, हें पक्कें लक्षांत ठेव.

आमच्या बाईसाहेब हें ऐकून मनापासून हंसल्या. मग थोडें थांबून झणाल्या ' अगबाई ! बोलण्याच्या नादांत विसरलेंच कीं. देशमुखांच्या येथें जेवायाला जावयाचेंना ? आतां फार रात्र झाली. नको बाई आतां. आम्ही येत नाहीं झणून सांगून पाठवूं कां ? त्या गणपतरावाबरोबर बोलल्यानें माझें डोकें दुखायाला लागलें. केव्हां पडेनसें झालें आहे.

जगदे०—बरें. सांगून पाठीव.

आमच्या बाईसाहेब आनंदानें प्रफुल्लित होऊन निरोप पाठविण्याकरितां बाहेर हंसत हंसत गेल्या. बाहेर येऊन छातीवर हात ठेवून अजून ती धडधड उडत आहे कां तें पाहून ती म्हणाली—

' बरें, मेल्या गण्या, भीतीनें घाबरवून मला अगदीं गांगरून टाकलेंस नाहीं ? आज तूं असें केलेंस. बरें, कांहीं चिंता नाहीं. माझीही पाळी येईल. पाहीन तेव्हां. मला पाहिल्याबरोबर तूं गर्भगळितच व्हावें, असें करतें बघ '

भाग २२ वा.

आमच्या सगुणाताईचें आपल्या सासच्च आईबरोबर एकदां नींटसें पटेना ह्मणून उरलें तें उरलेंच. आतां, पटेना ह्मणजे रोज त्यांच्या मारामाऱ्या होत असत, शिवगाळ होत असे, असा बिलकुल अर्थ नाहीं. त्यांचें एकमेकींचें प्रेमाचें भाषण वर्ज होतें एवढेंच. इचे व्यवसाय निराळे व तिचे निराळे. इची स्नेही मंडळी निराळी, तिची निराळी. आपल्या रंगमहालांत, शय्यागृहांत, वस्त्रपरिधानगृहांत, वृथा प्रेमानें भाळून टाकलेल्या वृद्ध पतीबरोबर आपल्याला अवश्य तेवढे विलास करण्यांत, व कधीं कधीं मैनाची महत्त्वाचे कामांत गुप्त भेट घेण्यांत, ही नेहमीं गढून गेलेली असे. ती आपली, अस्मानीताऱ्यावर बसून रानांत फिरण्यांत, सीझरला बरोबर घेऊन बागेंत फिरण्यांत, किंवा त्याला जवळ बसवून वाचींत बसण्यांत किंवा एकांतीं याच विषयावर विचार करण्यांत वेळ घालवी. इचें तिचें कधीं बोलणें झालेंच तर अगदीं एकमेकीला खोंचून वर्मी काढून असेंच व्हावयाचें. आमच्या गरीब बापड्या सगुणाताईचा तिच्यावरोबर बोलण्याचा काय दम ! जर कदाचित् बोललीच, तर त्यांत इसापनीतींतल्या 'मातीचें भांडें आणि तांब्याचें भांडे' या न्यायानें सगुणेचेंच नुकसान !

ह्या स्थितीचें तिला फार वाईट वाटे; व तिच्या मनांत नेहमीं येई कीं, 'गणपतरावांचा तेवढा चांगला मनमिळाऊ स्वभाव असता, तर असें कां झालें असतें ? त्यांना हा नारायणरावाचा एवढा नाद लागला नसता, तर कसें नामी झालें असतें ! काय! आतां केंस पांढरे होईपर्यंत येथेंच बाबाच्या घरीं या लोकांचें उणेंपुरें बोलणें सोसून घेऊन रहावें काय ? कोणाबरोबर तरी माझे एकदां लग्न कां होईना ! एकदां येथून सुटलें ह्मणजे झालें ! पुरे ही स्थिति ! लोकांना वाटतें मी फार सुखी ह्मणून ! परंतु आंतलें काय त्यांना माहीत ! त्यांचें माझ्यावर केवढें तरी प्रेम ! मला भेटल्याखेरीज किंवा दोन गोड शब्द बोलल्याखेरीज येथें येऊन ते कधींच राहत नसत. पण आतांच काय झालें, देवास ठाऊक! बरें, ही गोष्ट त्यांच्याजवळ काढून सध्यां कांहीं उपयोग दिसत नाहीं. आतां त्यांच्याजवळ गोष्ट काढली काय, आणि ह्या माझ्या सीझरजवळ काढली काय एकच ! काय

करावें ! सध्यां त्यांचें मनच जाग्यावर नाहीं. तो नारायणराव मला राहूच झाला !

गणपतराव, जोतिबाच्या पथिकाश्रमाकडे निघून गेल्यावर, आपल्या लाडक्या स्त्रीनें सांगितल्याप्रमाणें रात्रीं दहा वाजतां जगदेवराव छप्परपलंगावर स्वस्थ पडले. हिरव्या गडद रंगाचे पडदे सोडून खिडक्या बंद केल्या; उशाजवळचा दिवा उचलून पलीकडे मंद जोत करून ठेवला; व 'मला नाहीं अजून झोंप येत. मी तिकडे पलीकडच्या खोलींत कौचावर वाचीत पडतें. हें मधलें दार उघडेंच ठेवतें, कांहीं जरूर लागली तर हांक, मारा' असें सांगून निहालकुवरबाई शाल पांघरून कौचावर एक कादंबरी वाचीत पडली.

वाचण्याकडे तिचें बिलकुल लक्ष नव्हतें. तिच्या मनांत मागची सर्व स्थिति येत होती. मनुष्य एकांतांत निर्व्यापार असलें झणजे त्याला आपल्या पापकर्मांची किंवा सत्कर्मांची बहुतकरून आठवण होते. व तदनुसार पश्चात्ताप किंवा समाधान जें काय वाटणें, तेंही पण ह्याच वेळेला. आपण जे अपराध केले, ते खरोखर अपराध आहेत, त्यांस देहांत दंडाखेरीज प्रायश्चित्त नाहीं, असें तिला वाटलें काय ? खरोखरच नाहीं. असें वाटलें असतें, तर तिला वाईट वाटल्यावांचून कधींही राहिलें नसतें. असें कसें होईल ? पापाचा घडा अजून भरला नाहीं. महत्त्वाकांक्षा, वृथाभिमान, व हेवा हीं तीन जबर पिशाचें तिला लागलेलीं यांच्या तडाक्यांतून ती कशी सुटणार ? एखादा साधारण मांत्रिक भेटला तर त्याला हीं असें झणणार ' ही स्त्री आमच्या पूर्ण ताब्यांत आहे. पाहूं या आमच्या जबड्यांतून इला कोण सोडवितो तो ! '

जों जों ती आपल्या कृतकर्मांबद्दल विचार करूं लागली, तों तों आपण कांहींच वाईट केलें नाहीं, असें तिला वाटूं लागलें! कौचावर पडून दिव्याकडे पाहत पहात आपल्या हातांच्या बोटांचीं नखें दांतांनीं काढतां काढतां तिच्या मनांत आलें.

' लहानपणीं माझा स्वभाव दुष्ट होता कीं काय ? मुळींच नाहीं. थोडा अविचार मात्र माझे आंगीं होता. मी कधींच कोणाला उपद्रव केला नाहीं. निदान मी आपल्या आपखुषीनें तरी नाहीं. खरोखरच मीं कधीं दुष्ट कृत्य केलें काय ? मीं जीं कृत्यें केलीं, त्यांना किती जरी

दुष्ट झणून झटलें, तरी तीं माझ्या तारुण्याच्या मदांत चुकून झालेलीं आहेत. अशा चुका तारुण्यावस्थेंत सगळ्यांच्या हातून होतात. मीं मुद्दाम कपटानें दुसऱ्याचा नाशच व्हावा झणून कधींच कांहीं केलें नाहीं. नाहींतर काय एक एक बायका ! सगळ्या रात्रींच्या रात्रीं कपटकृत्यांत, व दुसऱ्याचा घात करण्यांत घालवितात ! हजारों खून करतात, पण त्यांचें त्यांस कांहीं वाटत नाहीं ! मी म्हणतें, त्यांना त्याबद्दल शिक्षा कशी होत नाहीं ! अशा महान् अपराधांच्या स्त्रियास शिक्षा झाल्याखेरीज असलेल्या आपण थोड्या कां पाहतों ! किंवा त्यांना शिक्षा होऊन— '

एकदम तिचा विचार बदलला. कोंचावरून उठून खिडकीपाशीं जाऊन ती बाहेर पाहूं लागली, व मग पुन्हां परत येऊन कोंचावर पडली.

'गणपतराव, तूं खरोखरच वेडा आहेस ; आणि तुझ्या कल्पना निश्चळ वेड्या मनुष्याच्या आहेत. वेड झणजे काय हें मला पूर्ण माहीत आहे. त्याचीं चिन्हें मला सर्व माहीत आहेत, आणि म्हणूनच म्हणतें, तूं वेडा आहेस म्हणून. '

असा विचार मनांत येऊन तिनें आपलें डोकें दोन्ही हातांनीं घट्ट धरलें. जणूंकाय या विषयावर आतां विचार पुरेत, झणून त्या आंतल्या मेंदूला धरून बंदच करीत आहे ! !

'मला तो जेर येणार नाहीं काय ? माझ्या मुठींत येत नाहीं काय ? यापेक्षां जास्ती पंचाइतींत तो पडेल काय ? त्याला माझी भीति अगदींच वाटत नाहीं काय ? तो आतां येथेंच थांबणार कीं नाहीं ? तो असा कशानें थांबतो ? एक मृत्यूच त्याला थांबवूं शकेल. '

'मृत्यु' हीं अक्षरें ती तोंडांतल्या तोंडांत पुटपुटली. ' माझ्या हातून दुष्ट कृत्यें होणार नाहींत. एखाद्याचा नाश माझे हातून होणार ! ! माझ्या अंगांत तेवढें धैर्य कोठें आहे ? तसें जर धैर्य मला असतें, तर तशा करकरति संध्याकाळीं त्या ओसाड भयाण वडाच्या झाडाखालीं तो मेला मला भेटला असतां मी--मी—'

इतक्यांत खोलीच्या समोरच्या दारावर कोणी टिचकी मारली, त्यानें तिचे त्यापुढचे विचार जाऊन, तिकडे तिचें लक्ष गेलें. एकदम दचकल्यासारखें

करून पायथ्याशीं असलेली शालजोडी अंगावर घेऊन, पुस्तक हातांत घेऊन, ती त्याकडे पहात पडली.

दारावर हळूच पुन्हां टिचकी वाजली.

'कोण तं ? दार उघडून हळूच आंत या !' असें ती पडल्या पडल्या, हळूच पलीकडे आपल्या निद्रावश झालेल्या रमणाची निद्रा भंग होणार नाहीं, अशा स्वरानें म्हणाली.

श्रीमंतापाशीं नेहमीं राहणारे नौकर लोक जसे अदबीनें हळूच दार उघडून येतात, त्याप्रमाणें तें दार उघडून एक तरुण स्त्री उंबऱ्यांत येऊन उभी राहिली. ही आमच्या ज्ञानगंधहीन जोतीबाची बायको मैना.

माईसाहेब, इतक्या रात्रीं पूर्वी आपल्याला न सांगतां येऊन आपली झोपमोड केली, याबद्दल माफी असावी' असें मैना म्हणाली.

निहाल० —बरं, थंडीनें अगदीं कांकडलीस. नीट बोलतां देखील येईना. ये इकडे वैरं येथें पांघरूण घेऊन अगोदर.

निहालकुवरबाईच्या हुकुमाप्रमाणें ती कोंचाजवळ येऊन बसली.

निहाल०—वैस बाई. बरं झालें आलीस, मला बाई आज झोंपच येईना. नाहीं नाहीं तें मनांत येतें. कसें आज उदास वाटतें. आतां घटकाभर बोलत तरी बसूं.

तेथें बसल्यावर, निहालकुवरबाईनें दिलेलें वस्त्र पांघरून, इकडे तिकडे सभोंतीं खोलींत सूक्ष्मतेनें पाहून, मैना म्हणाली—

'सरकारची तबियत आतां बरी आहेना ?'

निहाल०—होय बाई. आतां चांगली आहे. आतांच झोंप लागली. तें मधलें दार तेवढें हळूच लावून घे. अगदीं हळूच बरं कां. नाहीं तर जागे होतील. आणि मग झोंपमोड होईल.

हुकुमाप्रमाणें उठून दार हळूच लावून घेऊन मैना पुन्हां स्वस्थानीं येऊन बसली.

निहाल०—आतांशा बाई मला चैनच पडत नाहीं. सदा आपलें मन उदास. सदा दुःखी. असें कां होतें कोणाला ठाऊक ?

मैना—त्या गुप्त गोष्टीबद्दल मनांत येतें वाटतें ?

मैना हें तोंडांतल्या तोंडांत गुणगुणली, तें आमच्या बाईसाहेबांना मुळींच ऐकूं गेलें नाहीं. त्यांचें लक्ष तिकडे नव्हतें. तिनें आपली रडकथा

तशीच सुरू डेविली होती. मैना तिचा जीव कीं प्राण: इच्याजवळ तिनें आपलें मन मोकळें करूं नये तर कोणाजवळ ?

निहाल०—मैना, माझा अलीकडे फारच बाई छळवाद मांडला आहे ! मला कसें अगदीं त्राही त्राही करून सोडलें आहे ! ज्या मेल्यानें मीं कधीं काडी इतकें वाईट केलें नाहीं, तो मला छळायाला लागला आहे ! मला नाहीं बाई आतां हा जाच सोसवत: आतां मीं त्याला—

बोलतां बोलतां येथें मध्येंच थांबून, दिव्याच्या जोतीकडे पाहून मग पुन्हां तिनें मैनाकडे पाहिलें.

आमच्या जोतीबाची बायको ह्मणाली 'माईसाहेब; तुमच्या मागें असा कोण दुर्वेधन लागला तें सांगूं कां? माझ्या मनांत एकावें नांव आलें आहे, पण तोच कां ?'

निहाल०—माझी गुप्त गोष्ट तुला नाहीं माहीत होय ? हो, तुला माहितच आहे सगळें. मग काय ? सांग पाहूं ?

मैना—तो एक तरुण गृहस्थ आहे नाहीं. माईसाहेब ?

निहाल०—होय.

मैना—तो गृहस्थ दोन महिन्यांपूर्वी आमच्या पथिकाश्रमांत आला होता. व तेव्हां भीं आपल्याला सूचना केली होती तो—

निहाल०—(उतावळेपणानें) होय, होय. तोच ग तोच.

मैना—मला वाटलेंच तसें. तेच राजभी आज पुन्हां आमच्या तेथें आले आहेत.

हें ऐकिल्या बरोबर निहालकुंवरबाई एकदम दचकली. तिचा चेहरा उतरला. भीतीनें घाबरून गेली, काय करावें हें सुचेना. सर्व अंगाला दरदरून घाम आला. 'आतां या मेल्या गणपतरावाला काय करूं. मेल्याच्या नरडीचा घोट घेऊं कां !' असें ती मोठ्या रागानें ह्मणाली.

पुन्हां फार वेळानें—'तुझ्या नवऱ्याकडून तेवढी गुप्त गोष्ट काढून घेण्याला तो गेला असेल खास. अग गाढवे, हे विश्वासघातके, माझा घात करावा ह्मणतेस होय ? त्या दोघांना मोकळ्या मनानें बोलायाला सोडून इकडे कशाला धांवत आलीस रांडे ?'

हें ऐकून मैना घाबरून गेली; व भीतीनें आपले दोन्ही हात उरावर घट्ट धरून भीत भीत ह्मणाली, 'माईसाहेब, मीं आपल्या खुषीनें

आलें असें समजतां होय ? कांहीं जरी प्रसंग आला असता, तरी अशा वेळेस मीं होऊन कधीं कधीं आलें नसतें. परंतु काय करूं ? मला घालवून दिलें, तेथें माझा उपाय नाहीं. मला येणें भाग पडलें. '

निहाल०—कोणीं तुला इकडे पाठविलें ?

मैना—कोणीं म्हणजे ? त्यांनीं. त्यांच्या मर्जीविरुद्ध वागलें, तर ते माझें काय करतील, हें आपल्याला सांगणें नको च.

निहाल०—कां ? कशाकरितां त्यानें पाठविलें ?

या प्रश्नाचें उत्तर मैनाच्यानें लवकर देववेना. अखेर मोठें धैर्य करून ती म्हणाली,' खरोखरच बाईसाहेब, माझ्या मनांत इकडे येण्याचें मुळींच नव्हतें. नेहमीं वरचेवर आपल्याला त्रास देणें चांगलें नव्हे. नुकता एक महिना देखील पुरता अजून झाला नाहीं, असें मीं सांगितलें; परंतु माझ्या रडट्या-ला धरून बाहेर घालवून " जा, आतांच जा, " असें म्हणाले.

निहाल०—(अधिक त्वेषानें) होय. मला तें सर्व समजतेंग.

मैना—आपण काय पाहिजे तें म्हणा. तिकडे अशी उधळपट्टी चा-लली, त्याला मीं काय करूं. मीं किती जरी सांगितलें, तरी त्यांचें आपलें आहे तें आहे. मी काय करूं ? मी आहे म्हणून उर्गाच पोटाला तरी मि-ळतें वेळेवर. परवांच आपण त्या मारवाड्याचा तगादा भागविलात.

निहाल०—होय. मला आहे आठवण. कारण त्या वेळेला मीं डा-गीना मोडून पैसे दिले, आहे कां तुला तें कांहीं आठव ?

मैना—खरेंच माईसाब, पण काय करूं ? परवां दिवाळीला त्या माण्याची उचापत आणली व त्या मारवाड्याकडून कापड आणलें. दोघां-चाही तगादा दारांत बसला आहे. तो मारवाडी तर घरावर जप्तीच आ-णीन म्हणतो ; तेव्हां आपण—

निहाल०—तेव्हां आपण काय ? आपण मदत केल्याखेरीज भाग-त नाहीं, हेंच कीं नाहीं ?

मैना—होय माईसाहेब, होय माईसाहेब. तसेंच खरें. माझा वाई आतां उपाय थकला. त्यांच्यापुढें कांहीं चालत नाहीं.

निहाल०—तुमचें ठीकच आहे. त्या मेल्याचें तरी काय गेलें ? तुल ठाऊक आहे कांग मैना, या वेळपर्यंत मला दोन डागिने मोडावे लागले असेंच कांहीं दिवस चाललें व तिकडे डागिने गेलेंयाच कळलें

तर माझी गत कशी ? आतां विष खाऊन प्राण देण्याची वेळ आली आहे. त्यांच्या पेटींतले तरी पैसे किती काढूं ? तूंच सांग, तिकडे जर ? कळलें तर मला भीक मागतच जावें लागेल. अत्तां घराबाहेर घालवितोस ठाऊक आहे तुला ?

मैना—माईसाहेब, असें वाईट नकाहो जिवाला बोलून घेऊं. मी काय करूं ? माझा कांहीं उपाय आहे कां ? असला तर सांगा आपण.

निहाल०—मला नाहीं बाई कांहीं उपाय सुचत. बरें, आतां गप्प. कसें तरी करून यांची वाट लाविली पाहिजे खरी.

असें म्हणून कपाळावर हात टेवून बराच वेळ ती विचार करीत बसली. मग कांहीं वेळानें हळूच म्हणाली, 'गणपतराव तेथें आहे, मारवाडयाच्या तगाद्याचा माणूसही पण आहे. आणि तुझा नवराही पण आहे. आतां नाहीं म्हणून उपाय नाहीं. नाहीं तर एकांत एक हजार लचांडें उत्पन्न व्हावयाचीं. '

मैना—पण माईसाहेब, आपण आतां येवढें करा कीं हा पैसा दिल्यावर पुन्हां यावर कवडी मिळणार नाहीं, म्हणून निकडे चांगली खरवरीत ताकीद करा. एवढी माझ्यावर दया करा. आतां मी हें घर सोडणार. हा रोजगार पुरे. यांत कांहीं पोट भरत नाहीं. आयते त्यांना रोजें हरींच प्यायला मिळतें. रोज आमच्या मारामाऱ्यानें तंटे. दोनदां तर मीं भगदीं मोठ्या संकटांतून बचावलें.

निहाल०—तें ग कसलें ?

मैना—काय सांगूं माईसाहेब, त्या दिवशीं आम्ही दोघेंही जळून मरावयाचीं ! बरं तर बरें; कोणी परकी त्या दिवशीं आलें नव्हतें म्हणून. नाहीं तर आपल्या बरोबर त्यांचीही आहुति ! याला कारण त्यांची ती शारू!

निहाल०—काय म्हणतेस ! असें कसें झालें ग !

मैना हें पहा माइसाहेब, तेथें वारा किती आहे हें सगळ्यांला ठाऊक आहे. मीं तर आपल्या खोलींत निजलें होतें. ते खालीं दुकानांत दारू पेऊन गुंग झाले होते; तशांत आली लहर न् काय. दिवा हातांत घेऊन गेले वर माझ्या खोलींत. मला लागली होती झोंप. दिवा तेथें एका बाजूला पेट टेवावा कीं नाहीं ! तेथेंच खिडकींत ठेवला; वाऱ्याच्या झुळकीनें खिड-

कीचा पडदा पेटला, पण आह्मीं पाहिलेंच नाहीं. खिडकी पेटली, व मोठा एकदम जाळ झाला, तेव्हां मीं पाहिलें, तर आपली खिडकी पेट घेत आहे कीं !! मग तशीच भरभर उठलें. माझ्याखोलींतच पाण्याची घागर असते ल्यांतलें पाणी घेऊन आग विझाविली. मी जर उठलें नसतें, तर त्या दिवशीं आह्मी दोघेंही पार !!

निहाल०—दोघेंही अंथरुणांतच मरून पडत होतां नाहीं ? बरें झालें असतें, तुझा तो मेला दांडगा मेला असता तर. माझी कपाळची कटकट तरी चुकली असती ! तुला काय, मी फक्कड दुसरा नवरा करून दिला असता.

मैनानें कांहींच उत्तर दिलें नाहीं, पण एक लांबच लांब सुस्कारा मात्र टाकिला.

निहाल०—बरें तर तुला मी आतां पैसे देतें. तेवढा मारवाडयाचा लगादा भागीच जा अगोदर. नाहीं म्हणून कांहीं चालावयाचें नाहीं. होय कीं नाहीं मैना ?

निहालकुवरबाई उठून एक दिवा हातांत घेऊन 'पलीकडच्या खोलींत पेटी आहे, तेथून पैसे आणतें, बैस,' असें म्हणून मधल्या दारानें जायला निघाली, तोंच मैना म्हणाली, 'अगबाई ! मीं विसरलेंच कीं माईसाहेब. या धांदलींत मीं विसरलेंच. तसेंच रहात होतें पाहिलें !'

निहाल०—काय विसरलीस ग !

मैना०—आपल्याला द्या म्हणून मजजवळ इकडे येतांना एक पत्र दिलें आहे.

निहाल०—कोणीं ग !

मैना०—त्यांनीं मला इकडे जा म्हणून सांगितलें. गणपतरावांनीं तें ऐकिलें ; आणि जातां जातां एवढें पत्र घेऊन जा व आपल्याला द्या म्हणून सांगितलें.

जवळच्या टेबलावर दिवा ठेवून हात पुढें पसरून 'दे दे दे लवकर, म्हणून गडबडीनें ती हात हालवूं लागली. अहाहा ! तो हात नव्हे ! तर मंद वातानें आंदोलन पावणारें तें कमलपत्रच होय !

मैनानें निहालींच्या पोटीं ठेवलेलें पत्र काढून तिच्या हातांत दिलें. तिनें चटकन् पाकीट फोडलें. त्या पत्राची घडी उकलण्याची देखील फुरसद

नाहीं, इतकें तिचें मन आंत काय लिहिलें आहे हें पाहण्याकडे लागलें ! तिच्या जिवाची एकच धांदल उडाली ! पत्र अगदीं थोडक्यांत लिहिलें होतें—

" वर्तमानपत्रांत मेली म्हणून छापलें असून, गगनपुरीस तिची छत्रीही बांधली असून, जर त्या तारखेच्या पुढें आनंदीबाई जिवंत असेल, व ती, हें पत्र लिहिणाराला जिचा संशय आला आहे, व जिच्यावर त्याचा आरोप आहे, तीच असेल तर, ती होय किंवा नाहीं, हें खचित सांगण्याला कोणी तरी पाहिजे म्हणून, आतां लांब हुडकायाला जाणें नको. गगनबावडयाच्या रहदारी बंगल्यांतला वाकनीस हें पूर्णपणें सांगूं शकेल. त्याला आणलें म्हणजे संशयनिवृत्ति झालीच म्हणून समजा.

जोतिबाचा पथिकाश्रम. **गणपतराव** "

" तारीख ३ महि.....सन १८—

आमच्या बाईसाहेबांनीं रागानें तें पत्र फाडून दिव्यावर धरलें व मोठ्या त्वेषानें त्या म्हणाल्या, " आतां ह्या वेळेला जर तो मेला दुष्ट माझ्यापुढें उभा असता, तर त्याच्या नरडीचा घोटच घेतला असता.—येथें, माझ्या पायांपाशीं, त्याचा मुडदा पाडला असता. काय करूं ? काय करूं ? "

झट्कन् दिवा उचलून घेऊन शेजारच्या खोलींत ती गेली व आपल्या मागोमाग दार ओढून घेतलें.

भाग ३३ वा.

आमची चाहगात्री ज्या खोलींत बसली होती, त्या खोलीच्या व जग देवराव निजले होते त्या खोलीच्या मध्यें असलेलें दार उघडंच राहिलें होत आमचे सरदार स्वस्थांतःकरणानें पलंगावर पहुडले होते. समांतर व मं असा श्वासोच्छ्वास त्यांचा चाललाच होता. या वेळेस त्यांचें स्मितवद दिसत होतें. अशाच स्मितवदनानें ते आपल्या प्रियतमेकडे नेहमीं पाह असत. निद्रावश झालेल्या आपल्या रमणाचा असा चेहरा पाहून या तरुणी च्या मनांतील पापावगुंठित विचार जरा ढिले पडले. त्यांच्या स्मितवद नानें तिच्या विचारांत कांहीं फरक पडला, पण तो अगदींच क्षणिक.

'यांना जर सर्व हें कळलें, तर त्यांना किती बरें दुःख होईल' असें तं त्यांच्या त्या स्मित वदनाकडे पुनः एकवार पाहून झणाली.

आमचे प्रेमपाशबद्ध झालेले वृद्ध जगदेवराव आणखी शंभर वर्ष जरी वांचले, व तेवढ्या मुदतींत रोज जरी त्यांना कोणी इच्याबद्दल सह स्रशः दुष्ट बातम्या सांगितल्या, तरी तिचें तें लावण्य तिचें तें मंद हास्य तिची ती अंतःकरणाला आकर्षण करणारी लीला पाहून अगदीं वेडे होऊन गेल्यानें, त्यांस हें कधीं खरें वाटलें असतें काय? कधींही नाहीं. खरोखरच त्यांस हें खरें वाटलें नसतें. कोणीही तिच्याबद्दल कितीही वाईट सांगो यांना तिचा कितीही राग येवो, एकदां त्या गजगामिनीला मंदहास्ययुक्त ह्यांनीं पाहिलें कीं यांचा सर्व राग जागचे जागीं शांत! अशी कांहीं वशीकरणविद्या तिच्या आंगीं होती!

त्या वस्त्रपरिधानगृहांत आमच्या बाईसाहेब दिव्याच्या मंद प्रकाशांत आतां जें मैनानें पत्र दिलें त्यावर विचार करीत इकडे तिकडे फिरूं लागल्या. तिला आपल्या नानाविध विचारांनीं क्षुब्ध झालेल्या मनास स्थिरता आणण्यास असें बराच वेळ फिरावें लागलें. कोणच्या तरी एका मार्गाला ते विचार लागल्यासारखे झाल्यावर ती मोठ्या रागानें झणाली,—

'तो असें केल्याखेरीज कधींही राहणार नाहीं. कधींही राहणार नाहीं, हें खास. आतां त्याला मी वेडचाच्या इस्पितळांत नेऊन अडकावीन किंवा— नेल्हांच त्याचें हें बंद होईल.' तिला हें वाक्य पुरतें उच्चारवेना.

इतकी कांहीं या विचारानें तिची क्षुब्धवृत्ति झाली. तिच्या अंगाला दरदरून घाम आला! चेहरा एकदम उतरला! छाती धड धड करूं लागली. हातपाय अगदीं गार पडले! व इकडे तिकडे फिरत होती ती मटकन् 'अग बाई' म्हणून खालीं बसली!

अशा भ्रमिष्ट स्थितींत बराच वेळ गेल्यावर ती उठून आपल्या पेटीकडे गेली. त्या पेटींतून कांहीं काढून तें पोटकुळीं लावून जवळच्या कपाटांतील एक शालजोडी काढून ती पांघरून, पायांत बूट चढवून, बाहेर जाण्याच्या तयारीनें त्या खोलीच्या बाहेर ती पडणार, तोंच कपडयांच्या कपाटावरच्या चिमुकल्या घडयाळांत अकराचे ठोके पडले. ते ऐकून 'आहे, वेळेवरच आहे' असें मनाशीं म्हणून पुन्हां मैना बसली होती त्या खोलींत अशा तयारीनें ती आली.

तिला पाहून मैना मोठ्या आश्चर्यानें म्हणाली, 'माईसाहेब, बाहेर जाण्याची तयारी दिसते. आन् इतक्या रात्रीं?'

निहालकुवर—(शांतपणानें) होय मैने; थोडें बाहेर काम आहे. तुझ्याबरोबर पथिकाश्रमाकडे येतें. मीच स्वतः त्या मारवाड्याचे पैसे देऊन सर्व भागवितें.

मैना—पण माईसाहेब, आतां किती वाजले हें आपण पाहिलें काय? ही वेळ नव्हे बाहेर जाण्याची!

निहालकुवरबाईनें कांहींच उत्तर दिलें नाहीं, परंतु आपल्या दासीला हांक मारण्याकरितां आव्हानघंटिकेवर हात ठेवून ती आतां वाजवावी म्हणून विचार करीत स्वस्थ उभी राहिली.

'रात्रीं दहा वाजतांच तबेल्याला कुलूप लावितात. सैस वगैरे सर्व चाकर माणसें आतां निजलीं असतील. आतां गाडी जोडायाला हुकूम केला तर चोहोंकडे गडबड होईल. सर्व माणसें जागीं होतील. परंतु कोणाला तरी एकाला बोलावून हळूच सांगितलें तर काम होईल,' असें ती आपल्याशींच पण जरा मोठ्यानें म्हणाली.

मैना—पण माईसाहेब, आतांच या घटकेला जाण्याची कां गडबड? उद्यां सकाळीं गेलें तर चालेल. आपण पैसा देतें म्हणून वचन दिलें म्हणजे आठ दिवसांनीं दिले तरी चालतील. मग ते व्यवस्था करतील. मैनेच्या बोलण्याकडे कांहींच लक्ष न देतां ती पुनः आपल्या वस्त्र-

परिधानगृहांत जाऊन पायांतला बूट काढून, आंगावरची शालजोडी टेवून गडबडीनें परत आली व मैनाला म्हणाली, 'हें बघ मैने, मी आतां पथिकाश्रमाकडे जाणार. कितीही वाजोत, अत्तां जाणार. किती कां वाजेनात, त्याचें काय मला ? जायाचें झणून माझ्या मनानें घेतलें आहे, तर मी जाणारच. कशाकारतां जाणार, हें मी तुला आतां सांगितलेंच. यांत मी कांहीं भलतेंसलतें करीत नाहीं. आमच्या सारख्या श्रीमंतांच्या बायकांनीं आपल्या आश्रित जनाला मदत करणें साहजिक आहे. व त्याचकारितां मी जात आहें. मला नांवें ठेवण्याला कोणाला कांहीं यांत काडीभरसुद्धां जागा नाहीं.'

मैना—पण आतां बारा वाजायाला चालले, माईसाहेब!'

मैनेनें असें झटल्यावरोबर तिनें मैनेकडे मोठ्या तिरस्कारानें कपाळाला आंठ्या घालून पाहिलें आणि झटलें, 'तुझ्या नवऱ्याला मारवाड्यानें पैशाचा तगादा लाविला आहे. तो आतां दारांत जागा करायाला तयार आहे. आणि अशा वेळेस मीं तुला, झणजे तुझ्या नवऱ्याला, पैशाची मदत करण्याला जात आहें, तर मला कोण नांवें ठेवायाला येतो, पाहूं दे. हें पहा, मी सांगतें असें जर करशील तर आतां कोणाला न कळवितां जाऊन मी परत येईन ?'

मैना—(नम्रपणानें) आपण सांगाल तें करतें. ही मी तयार आहें माईसाहेब.

निहाल०—तर मग हें पहा. आतां मीं रखमीला (दासीला) हांक मारितें, तो आल्यावर तिच्या देखत 'आतां येतें' असें झणून जा. बाहेर जाऊन कमानिच्या पलीकडे माझी वाट पहात बैस. ही रखमी जाऊन निजली कीं मी येतें. अर्ध्या तासाच्या आंत तुझ्या मागोमाग आलेंच झण. नाहींतर तशीच जाशील तर पहा मग. खास येतें. कांहीं होवो मीं येईनच समजलीस ?

नंतर आव्हानघंटेचा आवाज ऐकल्याबरोबर एक चपल व तत्पर दासी 'जी हुकूम' करून आंत आली.

निहाल०—अग रखमा, इतकी रात्र झाल्याचें मला कळलेंच नाहीं भी आली या मैनेबरोबर बोलण्याच्या नादांतच ! वेळ कसा लवकर

गेला, हें कळलें सुद्धां नाहीं ! आतां कांहीं काम नाहीं. जा, नीज जा आतां समजलीस ? आतां पुष्कळ रात्र झाली.

'बरं सरकार' असें ती रखमा झोपेनें घेरल्यानें डोळे लाल होऊन पेंगत पेंगत आपल्या यजमाननीच्या समोरच जांभई देऊन, 'मैनाबाईला पोंहचवितेंन् दार लावून निजायला जातें' असें ह्मणाली.

निहाल०—होय बाई, इला तेवढें पोंहचवून ये आणि जा नीज जा. बाकी सगळे निजले वाटतें ?

रखमी—व्हय माईसाहेब.

निहाल०—बरेंतर मैना, जा बाई आतां. जोतीला सांग अं मी फार फार विचारिलें म्हणून. बोलण्याच्या नादांत किती वेळ गेला कळलेंच नाहीं !!!

मैना—येतें तर. सांगतें आपला निरोप.

असें ह्मणून मैना रखमाबरोबर खालीं जाण्याला निघाली. जिन्यांतलीं त्यांचीं पावलें आमच्या बाईसाहेबांना चांगलीं ऐकूं आलीं. त्यांचीं पावलें ऐकूं येण्याचें राहीपर्यंत निहालकुवरबाई तशीच बसली व ह्मणाली, 'रखमा वर तिसऱ्या मजल्यावरच्या कोंपऱ्यांतल्या खोलींत निजते नव्हे ? या खोलीपासून ती फार लांब. आतां दाहा मिनिटांनें आंत जाऊं शकेन.'

ती पुनः आपल्या वस्त्रपरिधानगृहांत गेली व पुनः बूट चढवून शाल-जोडी पांघरून बाहेर जाण्याच्या तयारीनें आली.

मग एका आरशासमोर जाऊन स्वताला नखशिखांत पाहत विचार करीत कांहीं वेळ उभी राहिली व 'फक्त मी दाहा मिनिटेंच तेथें राहीन; तेवढ्यांत सर्व मी आटपीन,' असें ह्मणाली.

बरोबर बारा वाजायला पंधरा मिनिटें कमी होतीं. तों ती हातांत दिवा घेऊन खालीं निघाली. पाय अगदीं न वाजवितां, ती तो दगडी जिना हळूच उतरली. एका मागून एक असे अनेक दरवाजे उघडीत ती खालीं चौकांत उभी राहिली. चौकांत आल्यावर हळूच वाचनगृहाचें दार उघडून आंत गेली व तेथें एका टेबलावर दिवा वारीक करून ठेविला.

या वेळेला दिल्लीदरवाजानें शिपायाच्या खड्या पाहऱ्यांतून हिनें बाहेर पडणें, ह्मणजे मोठेंच भयंकर व निव्वळ वेडेपणाचें काम होतें, ह्मणून त्या राजमार्गानें न जातां वाचनगृहाच्या खिडकींतून उडी मारून बागेंतून बाक-

ड्या वाटेनें तिनें मैनाला जाऊन गांठण्याचें ठरविलें! हळूच खिडकी उघडून तिनें बाहेर उडी मारली व हळूच पुन्हां खिडकी लावून घेतली !

बाहेर पडल्यावरोबर पुन्हां तिच्या आंगाला दरदरून घाम आला, हात पाय कांपूं लागले. तिच्यानें पुढें पाऊलच टाकवेना. लवकर जावें असें तिच्या मनांत फार, परंतु तिचे पाय तिचें मुळींच ऐकेनात. ती वरचेवर कपाळावरचा घाम पुसूं लागली. अशी तिची अगदीं त्रेधा झाली. अशी स्थिति होऊन, अगदीं भीतीनें घाबरून तिच्या मनांत आलं, ' काय वाई तरी हें ? मला वाटतें जणूंकाय मी इतक्या रात्रीं कोठें पळूनच जातें आहें! जणूंकाय एकदां गेल्यावर पुनः कोणाच्या दृष्टीसच पडूं नये अशा बेतानेंच मी चाललें आहें ! खरेंच, त्यांच्या सांगण्याप्रमाणें पळून गेल्यास बरें होईल वाई ! म्हणजे त्याच्या तडाक्यांत तरी सांपडणार नाहीं. ते–ते–ते–छे, नारायणराव चव्हाण, आतां काय त्याचा माझा संबंध. पण नांवच येईना लवकर. कां बरें असें होतें? नारायणराव चव्हाण जसे नाहींसे झाले तसें–तसे-नकोवाई तें–मी कोठें तरी पळून जाऊं काय ? व नाहींसे–काय? पण कोणीकडे जाऊं? माझी कोणाची ओळख आहे ! सगळें खरें; पण इतकेंहि करून गेलें तर पोटाला काय करूं ? काय बिवे घालूं? कां जाऊं सगळ्या डागिन्यांसकट पळून ? डागिन्यांसकट पळून गेलें तर येवढे मोठमोठे दागिने कसे छपतील ! बाजारांत मोडायाला गेले कीं चोर म्हणून मला धरून सरकारांत नेतील. म्हणजे आयतीच सांपडलें. काय, करूं तरी काय ? रोख पैसे कोठून आणूं ? रुपयेच त्यांच्या पेटींतून घेऊन पळून गेलें, तर ते किती दिवस पुरतील ! ते कां माझ्या जन्माला पुरतील! मग काय पाहिल्याप्रमाणें भीक, कांबाडकष्ट, मानहानि, हेंच कीं नाहीं ! मरेपर्यंत हेंच. नकोगबाई तें. आठवण झाली कीं कसेंसेंच होतें !' असाच विचार करीत ही त्या कमानीजवळच्या हिरव्या गार जमिनीवर मान खालीं छातीकडे करून, एकांत एक हात अडकावून, ते छातीवर ठेवून थोडा वेळ उभी राहिली. परंतु एकदम मनांत कांहीं दुसरा विचार येऊन हे पहिले विचार जाऊन त्यांचें दर्शक असें हिच्या तोंडावर दृढ निश्चयाचें व आतां जो बेत ठरला तोच खरा, असें दाखविण्याचें तेज दिसूं लागलें.

खालीं पाय आपटून ती हळूच पण स्वच्छ व जोरानें म्हणाली, ' नाहीं,

कधीं नाहीं असें घडणार. गणपतराव, आतां तुमची माझी लढाई जुंपली खरी. आतां दोघांपैकीं कुणाचा तरी एकाचा बळी पडल्याखेरीज मीं हातांतलें शस्त्र खालीं ठेवणार नाहीं.' असें म्हणून पुढें जाण्याला ती झपझप निघाली. त्या भव्य कमानीच्या बाहेर ती पडो न पडते तों देवडीवरच्या घड्याळांत बारा ठोके पडले. तेथें डाव्या हाताच्या पाऊलवाटेवरच मैना वाट पहात बसली होती, तिला जाऊन हिनें गांठलें.

निहाल०—कांग मैना, आलें कीं नाहीं लवकर? तुझा तो पथिकाश्रम मधल्या वाटेनें दोन मैल नव्हेकां? म्हणजे त्या गांवाजवळच जायचें कीं नाहीं?

मैना—होय माईसाहेब, गांवाजवळच कां म्हणतां? त्या गांवालाच म्हणा कीं. तेथून काय एक गोळीच्या टप्यावरच गांव.

निहाल०—दोन मैल, तेव्हां आपण एका तासांत जाऊं तर?

मैना—होय माईसाहेब.

चालतां चालतांच तिला हे प्रश्न विचारिले. सकाळचे वेळीं ती हवा खायाला पायीं जात असे म्हणून पुष्कळ लांववर चार चार पांच पांच मैल जाण्याची हिला संवय होती. त्यामुळें हें चालणें तिला कांहींच वाटलें नाहीं. मघां सांगितलेल्या मार्गानें बरेंच लांब गेल्यावर त्यांना एका माळाची चढण लागली. सडकेनें गेलें म्हणजे ही चढण लागत नाहीं. पण जवळच्या रस्त्यानें म्हणून त्या इकडून निघाल्या. ती चढण संपल्यावर निहालकुंवरबाई म्हणाली, 'कांग मैना, तुझा नवरा अगदीं वाट पहात बसला असेल नाहीं? अगदीं वाटेकडे डोळे लावून?

मैना—होय माईसाहेब, वाट पहात बसले असतील. तो तगादेवाला आलाच आहे. त्याच्या बरोबर गलासावर गलास उडवीत असतील म्हालें. आणखी ते राजश्रीही असतील तर असतील कदाचित्.

निहाल०—ते कोण?

मैना—तो, जो आपल्याला इतका त्रास देत असे तो.—

निहाल०—असेल.

या पाउलवाटेनें बरेंच लांब गेल्यावर जेथें ही वाट राजमार्गाला मिळते, तेथें या जाऊन पोंहचल्या. येथून रस्ता अगदींच डोंगराळ. या अंधारांत ही सडक लांबच लांब फार भयंकर दिसूं लागली. परंतु आमच्या

माईसाहेब काडीभरही नडगमगतां निघून चालल्या. रस्त्यांत दोघींचें बराच वेळ कांहीं भाषण झालें नाहीं. जेव्हां लांबून पथिकाश्रमाच्या एका खोलीतल्या खिडकींतून मंगळाच्या चांदणीप्रमाणें दिवा चमकूं लागला, तेव्हां ती म्हणाली,--

'मैना, तुझा नवरा अजून निजला नाहीं वाटतें ? एकच दिवा दिसतो ? गणपतराव निजले वाटतें ?'

मैना—होय माईसाहेब, ते निजले.

निहाल०—ते आज तुमच्या येथेंच निजलेत, हें तुला पक्कें ठाऊक आहे कां ?

मैना—म्हणजे, मीच त्यांना खोली साफ करून बिछाना घालून दिला. मीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलें आणि शंका म्हणजे काय ?

जोतीबा बाहेरचें दार पक्कें बंद न करितां तसेच आपल्या पानगृहांत बसले होते. इतक्या रात्रीं दार मोकळें टाकिल्यानें कोणी चोर येईल, कांहीं नेईल याची त्यांना भीतिच नाहीं. त्यांना पक्कें ठाऊक कीं, चोराला भिऊन बंदोबस्त केला, तर हा मारवाडी आहेच तयार फुटकें मडकें सुद्धां नेण्याला! मग कशाला काळजी घ्या एवढी ?

पथिकाश्रमाजवळ येऊन पोंचल्यावर मैना दार उघडून आंत गेली. आमच्या बाईसाहेबही मागोमागच आंत गेल्या. पानगृहांत दिवा तेवत होता तो अर्धेच दार उघडें होतें त्यांतून दिसत होता. दाराशीं गेल्यावर कोणी तरी मोठ्यानें हंसत असल्याचें निहालकुंवरबाईला ऐकूं आलें. जरा विशेष लक्ष लावून ऐकल्यावर तें जोतिबाचेंच हंसें असें तिला समजलें.

'माईसाहेब, आपण येथें खुर्चीवर बसा. आपण आलां आहां म्हणून मी त्यांना कळवून येत्यें. मला ठाऊक आहे, ते आतां तारेंत गुंग असतील; तर कांहीं वेडें वाकडें त्यांच्या तोंडांतून आपल्याला शब्द पडले, तर मेहेरबानगीनें मनावर नका घेऊं. आपण येऊं नये असें माझ्या मनांत फार होतें. असें मैना हळूच कुजबुजली.

निहाल०—(उतावळीपणानें) मला माहीत आहे. तो काय मेला बोलतो, त्याला पाहिजे तें बडबडूं दे. बरें जा तूं.

जोतीबा एका हातांत दारूचा गलास घेऊन एका खुर्चीवर बसून टेबलावर तंगड्या फांकून पडला होता. तो नुकताच गलास भरून

आतां तोंडाला लावणार इतक्यांत मैना त्याच्या समोर जाऊन उभी राहिली.

मैनेला पाहिल्या बरोबर हातांतला भरलेला गलास घशांत चट्कन् ओतून गट् करून घुटका घेऊन जरा रागानें, जरा धुंदींत, तिला झणाला, 'कांग ये सटवे, लागली कां तुझी तब्येत इकडे येण्याची ? इचिभन मल धाटलें आज तूं तिकडच निरदाळलीस.

मैना—(शांतपणानें) खरेंच मला थोडा जास्ती उशीर झाला. पण मी माईसाहेबांला भेटलें. त्यांनीं आपल्यावर फार दया केली आहे. त्या खुद्द सगळा निकाल करणार आहेत.

जोतीबा—(हातांतल्या गलासांत असलेल्या दोन चार थेंब दारूंत बोट भिजवून ते चाटतां चाटतां हंसून) काय ! तिनें दया केली ; मला समद ठाव हाय. फुकटची दया काय करायाची !

मारवाड्याचा तगादेवाला पलीकडे झिंगून पडला होता. तो याचें बोलणें ऐकत होता. त्यानें मध्येंच उठून हेलकावे खात खात दिव्यापाशीं येऊन विडी पेटवून ओढण्याला सुरवात केली. त्याजकडे पाहून जोतीबा झणालाः—

'इचिभन दया झन कसली ती ! हा बग उद्यां मला सकाळीं तुरुंगांत आडकावतोय ! मग बैस तूं मजा मारीत. आन दया झन.

जोतीबाच्या या बोलण्याकडे लक्ष न देतां मैना झणाली, 'खरोखरच माईसाहेबांनीं लई दया केली. त्या खुद्द येथें पैसे घेऊन आल्यात आहेत. आन् आतां समदा निकाल व्हइल.

माईसाहेब येथें आल्या आहेत, हें एकल्याबरोबर तो गलास त्याच्या हातांतून खालीं पडला. व 'माईसाहेब आल्याती !' असें फार आश्चर्यानें ता झणाला.

मैना—होय.

मैनानें 'होय' झणायाला व निहालकुवरबाई तेथें खोलींत येण्याला एकच गांठ पडली. ज्याप्रमाणें नाटकांत रंगभूमीवर एखादें हुषार पात्र अगदीं समयोचित शब्दाबरोबर पडद्यांतून बाहेर येतें, त्याप्रमाणें ही स्थिति झाली.

निहाल०—होय जोतिबा. हा तगादा तुमचा घालवावा झणून मी मुद्दाम आलें, समजलें कां ?

हे शब्द तिच्या तोंडांतून कसे निघून गेले हें तिचें तिला देखील नीटसें कळलें नाहीं. जणूंकाय पाठ केलेले शब्दच ती बोलून गेली !!

मोठ्यानें हूं म्हणून ओरडून, व खालीं पडलेला गलास खालीं वांकून वर उचलून, जवळच्या टेबलावर गडबडीनें ठेवून, 'तुम्ही कशाला रातच आला. तिच्याजवळ पैस दिल असत तर काम झाल असत. तुमच्या सारख्या शिरीमंताच्या फकड बायका आमच्या घरीं रातच आल्या म्हनजी चांगलं न्हव. इचिभन उगीच वलामत यायाची.' असें तो मोठ्या मगरुरीनें म्हणाला.

त्याचें हें बोलणें ऐकून मैना मोठ्या जोरानें म्हणाली, 'हं, हं, हं, हें हें काय बोलतां ? माईसाहेब आपल्यावर दया करतात आणि—

जोतीबा—(मधेंच) कसची दया ? काय करील, पेंचांत सांपडलेया म्हणून असी मऊ आली. नाहींतर ही आम्हांला पैसे देती तर ? आडालच ! काय बोलतीस तोंड घेऊन ? दया करती म्हन ? कुनावर ? माझ्या—

निहालकुवरबाई इतक्यांत कांहीं बोलल्या नसत्या, तर हे राजश्री कोणीकडे वाहवले असते कळत नाहीं. ती म्हणाली,—

'गप्प बैस. इतक्या रात्रीं तुझी ही बडबड ऐकून घेण्याला मी नाहीं आलें येथें. किती देणें आहे तें सांग.'

जोतीबा—किती म्हणजे ? आहे १५० रुपये.

निहालकुवरबाईनें आपल्या कनवटीला लाविलेली एक रेशमी पिशवी काढली व त्यांतून शंभर रुपयांची एक नोट व बाकीचे रुपये काढून ते जवळच्या टेबलावर ओतले.

'हं, आटप लवकर. त्याला सांग पावती लवकर लिहून दे म्हणून; मी आतां पावती घेऊन जाणार. अटप लवकर.'

आमचे मारवाडी फुकटची दारू मिळाल्यावर कमी कधीं करतील? दोन गलास जास्ती दिले झोंकून. मैनानें त्याला पुष्कळ खटपट करून कसें तरी करून पावती लिहावयाला लाविलें. त्यानें कांहीं शुद्धींत कांहीं गैर शुद्धींत मैना सांगेल तशी पावती हात कांपत कांपत खरडली; मैनानें ती आणून आमच्या बाईसाहेबांच्या हातांत दिली. ती घेऊन घडी करून तिनें आपल्य रेशमी पिशवींत घालून पोटकुळीं लाविली, व खोलीबाहेर पडली. मैनाही तिच्या पाठोपाठ बाहेर गेली.

मैना—माईसाहेब, अशा अपरात्रीं एकट्या आपण घराकडे जाणार कीं काय ? छे, तसें नका करूं. मी आपल्याला सोबत येतें.

निहाल०—खरेंच बाई, चल मजबरोबर.

असें झणत झणत त्या दोन स्त्रिया अंगणांत येऊन कंपौंडाच्या भिंतीजवळ उभ्या राहिल्या. मैना आश्चर्यचकित होऊन आपल्या अन्नदात्रीकडे पाहूं लागली. तिला वाटलें आतां परत जाण्याची माईसाहेब फार घाई करतील, पण तें कांहींच नाहीं. त्या कंपौंडाच्या भिंतीला टेंकून आमच्या माईसाहेब कांहीं विचार करीत उभ्या राहिल्या. माईसाहेब अशा कां उभ्या राहिल्या झणून मैनाला फार गूढ पडलें.

इतक्यांत त्या घरांतल्या घड्याळाचा एक ठोका पडला. हा ठोका ऐकल्याबरोबर निहालकुवरबाई एकदम दचकली व कांपूं लागली.

निहाल०—मला बाई कसेंसेंच होत आहे ! माझें डोकें फिरून गेलें. आतां घेरी येऊन बेशुद्ध होईन असें वाटतें. मला थोडें थंड पाणी आतां मिळेल तर बरें होईल.

मैना—येथें सदां पाण्याची रड. तथापि नाहणीघरांत हंडयांत थोडें पाणी असेल व माझ्या खोलींतही घागरींत थोडें असेल. आतां आणतें पंचपात्री भरून. आणूं कां ?

मैना आंत जात आहे असें पाहून तिचा हात घट्ट धरून ती झणाली 'नको नको बाई, मीच जातें. मी आपलें सगळें डोकें गंगाळभर पाण्यांत बुडवीन तेव्हां मला बरें वाटेल. गणपतराव कोठें निजले आहेत ?'

हा असा विसंगत प्रश्न एकून मैनाला फारच आश्चर्य वाटून ती झणाली 'ते माडीवर नंबर तीनच्या खोलींत झणजे माझ्या खोलीच्या शेजारच्या खोलींत निजले आहेत.'

निहाल०—तो तुझ्या हातांतला दिवा दे इकडे. मीच तुझ्या खोलींत जाऊन डोक्यावर पाणी घालून येतें. तूं येथेंच उभी रहा. तो मेला जोत्या, मी एकटी वर गेलेली पाहून माझ्या मागें येईल संभाळ. तो मेला नाहीं शुद्धीवर. सांभाळ बाय येथून हालशील तर. असें झणून तिच्या हातांतला दिवा झटकन् घेऊन, ती तो मोडका दादर चढून वर गेली. पुढच्या माडींतल्या खोल्या पहात नंबर तीनच्या खोलीच्या दारांत जाऊन ती उभी राहिली.

या खोलीचें दार लाविलें होतें. आंत अगदीं सामसूम होतें. कोणत्याच प्रकारची हालचाल आंत अहिशी वाटत नव्हती. दारांत जाऊन उभी राहिल्याबरोबर तिच्या आंगांत कांपरें भरलें ! आतां हातांतला दिवा खालीं पडतो कीं काय अशी स्थिति झाली. त्या दाराची कडी तिनें हातांत धरली, तों तिचा हात जास्तीच कांपूं लागला. तिचें धैर्य अगदींच गेलें. तोंडाला कोरड पडली ! जीभ वाळून गेली ! सर्व आंगाला दरदरून घाम आला ! छाती धडधडूं लागली. तसेंच मोठी छाती करून तिनें दाराला बाहेरून कडी हळूच घातली! व लागलीच पळत पलीकडच्या मैनाच्या खोलींत गेली.

तिनें आपले कृष्णवर्ण सुवासिक केस मोकळे करून त्या घागरींतल्या पाण्यानें भिजविले व पाणी लवंडून दिलें; व अगदीं निस्तेज होऊन तिनें आपले भोंवतीं इकडे तिकडे पाहिलें. मैनाच्या खोलींत म्हणण्यासारखें कांहीं सामान नव्हतें. खिडकीला तांबडें अलवानी फाटके पडदे होते. एक गादी मळकट सरपोस घातलेली पडली होती. त्या गादीच्या पायथ्याशीं एक मळकट जुनें ब्लयँकेट पडलें होतें. खुंटीवर दोनचार लुगडीं होतीं. तेथेंच कोनाड्यांत एकदोन लांकडाच्या पेट्या, व राक आईल तेलाच्या दोन चार बाटल्या होत्या. एका कोनाड्यांत अर्धा पारा गेलेला एक आरसा होता. व एका कोनाड्यांत दोनचार फाटकीं नुटकीं पुस्तकें होतीं. खिडकीजवळच्याच खुंटीवर जोखिबाच्या एकदोन त्रिजारी व डोकीला बांधण्याचे गुलाबी व पिवळे पटके होते. पलीकडच्या खुंटीवरचीं लुगडीं वगैरे कापड, आंथरुणांतील पलंगपोस ब्लयँकेट वगैरे त्या खिडकीजवळच्या खुंटीवर तिनें आणून टेविलें. त्या दोनचार राकेलच्या बाटल्यांतील तेल त्या कापडावर ओतलें. व आपण आरशाजवळ जाऊन त्यांत तोंड पाहून विखुरलेले केंस नीट नेटके करून तो दिवा तेथेंच कांपडाला लावून ठेवून आपण खालीं निघाली.

खालीं पडवींत मैना आमच्या बाईसाहेबांची अगदीं मार्गप्रतीक्षा करीत उभी होती. ती तसेच भिजलेले केंस पाठीवर मोकळे टाकून हातांत दिवा न घेतां खालीं येऊन मैनापुढें उभी राहिली. हिच्या हातांत दिवा नाहीं हें पाहून मैनाला फारच विलक्षण वाटलें.

मैना—माईसाहेबें दिवा कोठें आहे ? वर राहिला वाटतें ?

निहाल०—(शांतपणानें) छेग. मी परत येतांना खिडकींतल्यां वाऱ्याच्या झोतानें एकदम गेला, झणून तो मी तेथेंच टेवून आलें.

मैना—माझ्या खोलींत माईसाहेब ?

निहाल०—होय.

मैना—आणि असा कसा एकदम विझला ?

निहाल०—होय, गेला झणून तर मी सांगतें. उगीच कां दिव्याची पिर पिर लावलीस ? उगीच माझें डोकें उठवूं नकोस. एक वाजून गेला. चल लवकर.

असें झणून तिच्या हाताला धरून निहालकुवरबाई निघाली. मैनाचा पायच उचलेना. तिला जोरानें ओढीत ती घेऊन चालली. दाराबाहेर पडल्यावर मध्य रात्रीच्या वेळेस तो डोंगराळ अप्रलेला रस्ता फारच भयाण दिसूं लागला.

निहालकुवरबाईसारख्या ऐषआरामांत नेहमीं असणाऱ्या श्रीमंतांच्या बायकांना अशा अपरात्रीं अशा भयाण रस्त्यानें जाणें झणजे खरोखरच फार छातीचें काम ! डोळ्यांत बोट घालूं झटलें तरीं दिसावयाचें नाहीं, असा अंधार गुडुप. वारा सों सों सों झणून जोरानें वहातच आहे ! रस्त्यानें जिकडे तिकडे निर्मक्षिक ! अशा वेळेस या दोन स्त्रिया हाताला हात धरून चढण चढून माळाच्या माथ्यावर येऊन पोंहचल्या. येथून पथिकाश्रम मैल दीड मैल मागें राहिला. आणखी एक माळ ओलांडला कीं पुढें निहालगाडच.

या माळाच्या माथ्यावर आल्याबरोबर आमच्या बाईसाहेब थोडा विसांवा घेण्याकरितां उभ्या राहिल्या. त्यांना निघून जवळ जवळ तास होत आला तरी अजून या येथेंच.

माईसाहेब येथें थांबल्या झणून मैनाला फार बरें वाटलें. चालतां चालतां ती अगदीं दमून गेली. निहालकुवरबाई निहालगडाकडे तोंड करून राहिली. तों एकदम तिनें बेसूर कर्कश अशी मोठ्यानें किंकाळी फोडून तिच्या पदराला भांबावून घट्ट आंवळून धरिलें.

या अशा अंधःकारांत एक तांबडा लाल ज्वाळांचा डोंबाळा तिला दिसला. 'माईसाहेब, माईसा—हे—ब—,असें ती त्या उजेडाकडे बोट करून ओरडली. 'आप—प—ल्या—ला दिस—स—स—ले—ले—का—यू

'होय पोरी, दिसला मला' असें तीनें धरलेला पदर झट्कन् हिसडा मारून सोडावितां सोडवितां. ह्मणाली 'मग काय म्हणतेस आतां?' 'माईसाहेब ही आग लागली बरं कां? ही आग आहे!'

निहाल०—होय, आगच आहे असें वाटतें. त्या गांवांत कोणाच्या तरी परडयांतल्या गवताच्या गंजीला आग लागली असेल, दुसरें काय? चल, जाऊं दे मला. पुष्कळ रात्र झाली. लागेना बापडी! त्याचें काय आपल्याला?

मैना—होय माईसाहेब. आगच खरी.—गांवांत नाहीं दिसत; अलीकडेच दिसते. पथिकाश्रमालाच लागली वाटतें हो माईसाहेब!

आमच्या बाईसाहेबांनीं यावर उत्तरच दिलें नाहीं. ती पुन्हां थरथर कांपूं लागली.—हो ही रात्रीची वेळ, वारा असा सुटलेला. थंडी वाजत असेल कदाचित! त्यानें कांपरें भरलें असेल नेम नाहीं!!

मैना—(मोठ्यानें ओरडून रडण्या सुरानें) कांहींही ह्मणा, त्या पथिकाश्रमालाच आग लागली! त्यालाच! कांहींही ह्मणा त्यालाच! आजच माझ्या मनांत हें आगीचें आलें होतें, व तेव्हांपासून मला कसें चमत्कारिकच वाटत होतें. अहो, तें सगळें जळून त्याची राखरांगोळी कां होईना? पण त्यांत माणसें आहेत हो! (मोठा गळा काढून) सगळीं जळून राखरांगोळी होऊन पडतील कीं हो आतां! ते तर अगदीं दारू पिऊन झिंगून पडलेत! त्यांच्यानें लवकर बाहेर देखील पळणें होणार नाहीं! आतां कसें करूं? (मोठ्यानें ढळढळां रडूं लागते) आतां ते कशाचे जिवंत दृष्टीस पडतात! झालं माझं वाटोळं! फुटलं माझें कपाळ! अहो, वर गणपतराव किंहो निजले आहेत! आतां.—(इतकेंच ह्मणून मैना स्तब्ध झाली. व खालीं बसून निहालकुवरच्या पायां पडून रडत रडत) आतां काय करूं हो? असं—असं—कं—क—सं—सं—झा—झालं, घर—घर—की—की—बु—बु—डालें हो! फार भयंकर हो!

निहाल०—काय? भयंकर काय?

मैना—माझ्या मनांतला विचार बाई, दुसरं काय?

निहाल०—(मोठ्या रागानें) काय ह्मणतेस ग गाढवी?

तशीच खालीं बसून हात जोडून ती मैना रडत रडत तुटक तुटक शब्दानें ह्मणाली 'अरे देवा! माझा अपराध असेल, तर मला क्षमा कर.

कीं बाई, तूं कां आज रात्रीं आमच्या घरीं आलीस ? गणपतरावाचे व तिकडचें तुमचें वांकडें आहें, म्हणूनच मी नको म्हणत असतीं, आग्रहानें आलीस होय बया ? तुझा मी असा काय अपराध केला सांग बाई ! म्हणून माझ्यावर अशी आग पाखडलीस ? माझा गळा कापलास ! मला माणसांतून उडविलेंस ! ! माझ्या जन्माचें वाटोळें केलेंस ! माझें घर बुडालें ! काय करूं ! करूं तरी काय आतां ! असा मी तुझा काय अपराध केला, सांग बाई ! (मोठ्यानें रडूं लागते) तुझेंही असेंच होवो ! कुठली अवदसा आली पहा ! रांडेनें माझें वाटोळें केलें ! देवा, हिला हाल हाल करून मार ! ! इला चांगली नरकांत पडूंदे !

निहाल०—(मोठ्या रागानें व कठिण स्वरानें) तुला काय सांगायाचें सटवे ? तुला वेड लागलें म्हणून असें बडबडतीस ? वायु झाला वाटतें म्हणून असें बरळतीस ? ऊठ रांडे, मिनी कोटली ! नीघ येथून-हो चालती-अहाहा ! टाऊक आहे नवऱ्याची किती काळजी घेणार ती ! इवळती पहा कशी रांड ! जणूंकाय आगींत सांपडून होरपळायाला लागली ! तुला काय ! त्या मेल्या गण्याचें एवढें ? मरेना आगींत भाजून. तुझा कोण तो म्हणून रडतीस एवढी ? ही तुझ्या पथिकाश्रमालाच आग लागली असें कशावरून म्हणतेस ? त्या गांवांत असेल किंवा पलीकडच्या वाडींत असेल. त्याचें काय एवढें ? ऊठ रांडे, ऊठ जा नीघ येथून. जा आपल्या नवऱ्याला व त्या गण्याला वांचीव जा. जा. जा. नीघ. चिरगूट पांघरूण निघालें तर काढ जा. आपला संसार वांचीव. जा. रांडे. ऊठ नाहींतर लाथ घालतें बघ कंबरेंत. मला नाहीं तुझी जरूर. हो चालती.

मैना—(रडत रडत) माईसाहेब क्षमा करा. आपल्याला मी चुकून बोललें. तुमच्या बोलण्याकडे माझें लक्षच नव्हतें हो. मी काय असा अपराध केला ?

निहाल०—(रागानें) चपराव. जास्ती नको बोलूंस. चल हो चालती. मला नाहीं जरूर. जा म्हणतें तर पुन्हां बोलतेस. चल नीघ जा. मला नाहीं तुझी जरूर. हो चालती.

तसेंच मैनाला रडत तेथें सोडून ही अंधारांत पुढें निघाली. मागच्या बा-

जूला मोठा आगीचा डोंब उसळला आहे व त्याचा आसमंतात्, उजेड पसरला आहे ! पुढच्या बाजूला अंधकार आहे. अशा स्थितींत आमच्या सर जगदेवरावांचें लाडकें कुटुंब आपल्या वाडयाकडे आपल्या प्राणपतीला गाढालिंगन देण्याला निघालें !

भाग २४ वा.

दुसरे दिवशीं सकाळीं नेहमींपेक्षां पुष्कळच उशिरानें निहालकुंवरबाई उठल्या. प्रातर्विधि उरकून, पांढरी स्वच्छ जरीचे बुट्टे काढलेली अब्रवान नांवानें जगद्विख्यात असलेली मलमल नेसून, चहा घेण्याकरितां सुमारें आठ साडेआठ वाजण्याचे अजमासास आपल्या वस्त्रपरिधानगृहांतून वाचनगृहांत जाण्याला ती निघाली. इचा चेहरा अगदीं निस्तेज होऊन त्यावर कृष्णवर्णच्छाया दिसत होती. असें डोळे खोल जाण्याला, झोंप नसल्यानें ते लाल होण्याला, व चेहरा असा फिकट पडण्याला कारण, रात्रीचें फार वेळ वाचीत बसणें हें होय, असें कोणीं विचारल्यास ती सांगे!

सर जगदेवराव वाचनगृहांत आपल्या प्रियतमेची चातकवत् मार्गप्रतीक्षा करीत बसले होते. सगुणाताईच्या मनांत जेवणाच्या वेळेपर्यंत आपल्या आईची गांठ पडूं नये असें होतें, तथापि बापानें चहा घेण्यास हांक मारल्यावरून तिला नाहीं म्हणतां आलें नाहीं; तिला तेथें जाणें भाग पडलें.

ही सकाळची आठ साडेआठ वाजण्याची वेळ. ऊन कसें स्वच्छ पडावें, पण अभाळ येऊन हवा अगदीं कुंद होऊन मधून मधून पावसाची बुरबुरही पण येत होती. सकाळच्या टपालानें कांहींच पत्रें आलीं नाहींत. आणि दुपारच्या टपालालाच प्रत्याहिक वर्तमानपत्रें यावयाचीं; तेव्हां चहाच्या वेळीं संभाषणाला कांहींच ताजा विषय नव्हता, म्हणून त्यावेळेस विशेष कांहीं बोलण निघालें नाहीं.

सगुणाताई उठून खिडकीपाशीं गेली, व तें तावदानी दार उघडून बाहेर पाहून म्हणाली, 'काय मेली हवा कुंद झाली आहे पहा! आज कांहीं घोडयावर बसून बाहेर जाण्याची सोय नाहीं. आज कोणी भेटायालाही येणार नाहीं. तेवढे गणपतराव पथिकाश्रमाकडून आले तर येतील. कशा सारखी रिपरिप लागली आहे पहा! चांगला मोठा पडेनाही व बंद होऊन ऊनही पडना. वाराही कसा गार सुटला आहे तो!!'

एखादा मनुष्य मेला आहे, तो मेला म्हणून तुम्हांला माहित नाहीं; पण त्याच्या मरणाला कारण झालेला एखादा मनुष्य तुमच्या जवळच आहे, व

त्या माणसादेखत तुम्ही त्या मृत मनुष्याबद्दल कांहीं सहाजिकवृत्या गोष्टी काढल्या, तर त्या खून करणाऱ्याच्या मनांत कसें बरें होईल ? त्याच्या काळजांत एकदम धस्स होईल. चेहरा फिक्का पडेल. तुम्ही जरी सहज बोलत असला, तरी तें सर्व आपल्यालाच अनुलक्षून आहे, असें त्यास वाटल्यावांचून कधींच रहाणार नाहीं. आतां काय होईल ? आपला अपराध आतां उमगेल काय ? अशी त्याला भीति पडून त्याच्या मनाची शांतता नाहींशी होईल. त्याचप्रमाणें आमच्या गणपतरावांचें नांव ऐकिल्याबरोबर निहालकुवरबाईची स्थिति झाली !

सगुणा०— खरेंच. आतां अशा पावसांत भिजून चिंब होऊन त्या गुलाबी पगडीचा रंग सगळा खराब होऊन, डोक्याला त्याचे डाग पडून, चिखलानें बूट भरून स्वारी येईल.' छत्रीबित्री कांहीं जवळ असेल कां ? नांव नको. छत्रीबरोबर असूं द्यावी, इतकें कोणें त्यांचें मन नाळ्यावर आहे ? काय बाई डोक्यांत शिरलें आहे कोण जाणे ? माझें नशीब झालें ! दुसरें काय ?

सगुणाताईचें हें सर्व बोलणें जगदेवरावांनीं चांगलें लक्ष लावून ऐकिलें. गणपतरावांविषयीं तिचे अलीकडे असे निराशेचे, उदासीनतेचे उद्गार निघतात हें त्यांनीं पूर्णपणें लक्षांत ठेवलें होतें. तेव्हां कांहीं गोष्टींचा खुलासा करून घेण्यास ही संधी बरी आहे, सहजीं तिच्याकडूनच विषय निघाला आहे, तें ठीकच आहे, असें मनांत आणून जगदेवराव म्हणाले.

' कांग सगे, काल समशेरबहादर खंडेराव मला भेटावयाला आले होते, तेव्हां ते काय सांगत होते बरें ? '

सगुणा०—माझ्या नाहीं बाई इतकें लक्षांत. परंतु, रशिआ लौकरच हिंदुस्थानावर स्वारी करील, किंवा आतां विलायतेंत नवें मंत्रिमंडळ होणार, तेव्हां इकडचे व्हाईसरायही बदलतील, हेंच कीं नाहीं बाबा ? नाहीं तर आपले सेनाधिपति सैन्यांत या या प्रमाणें कमी जास्ती फेरफार करीत आहेत. चोहोंकडे जारीनें नाकेबंदी चालली आहे. मुंबईच्या मलबार टेकडीवर तोफा ठेवीत आहेत. कराची बंदर, तोफखाना दारूगोळा ठेऊन फार मजबूत करीत आहेत, हेंच कीं नाहीं ? किंवा हिंदुस्थानचे लोक अलीकडे फारच अशक्त व अल्पायु झाले. लढाईत यांचा कांहींच उपयोग नाहीं. भराभर बुकें वाचतील पण तीं वाचूनही पुन्हां अक्कल नाहीं ती नाहींच

व्यवहारशून्यता आपली पदरीं बांधलेली आहेच ! हेंच होयना बाबा ? नाहींतर अशाच हतवीर्य मंडळींचें बनाविलेलें सैन्य आज ब्रह्मदेशांत लढत आहे. दोन वर्षें लढतात पण अजून पाय थाऱ्यावर लागेनात ? हीच मंडळी मध्य आशिआंतल्या अस्वलाला मारणार ! होय कीं नाहीं ? हेंच आणि दुसरें काय तें सांगणार ? होयना बाबा ?

जगदे०—तूं आपली सदा अशीच ! ! सावधानचित्त कधींच नाहीं ! कोणाच्या बोलण्याचा कोणता भाग विशेष महत्त्वाचा आहे, हें तूं कधींच लक्षांत देवींत नाहींस. तुला धोरणच नाहीं. या संबंधानें ते कांहींच बोलले नाहींत. तर मग तुझें लक्ष कोठें होतें त्या वेळेला ? ते म्हणाले नाहींत क कीं आनंदपुरचे ते झुंझाररावं, आनंदपुर सोडून आपले सगळे शिकारीचे घोडे, कुत्रीं विकून टाकून, इकडे मनासारखें कांहीं झालें नाहीं म्हणून, वैतागून स्वित्झर्लंडाकडे निघून गेले. मागच्या शिकारीच्या दिवसांत ते येथें आले होते. तुझ्याबरोबर लग्न करावें म्हणून त्यांच्या मनांत फार होतें मलाही त्यांनीं याबद्दल फार गळ घातली होती, पण या गणूकरितां म्हणून त्यांना मीं नाकारलें. तुझ्याही मनांत त्यावेळेला आलें होतें.

झुंझाररावाचें नांव ऐकिल्यावरोबर सगुणाताईच्या चेहऱ्यावर एक प्रकारची सतेजता आली, पण ती लागलीच नाहींशी झाली.

सगुणा०—स्वित्झर्लंडाला 'मी जाईन' असें ते मला म्हणाले होते एकदां. आपल्या मनासारखें जर कांहीं झालें नाहीं तर—तर—तर आपण येथें राहणार नाहीं असें म्हणाले. अरेरे ! गरीब बापडा ? फार मायाळू ! किती अर्जवी !

जगदे०—या गणूची वृत्ति अशी झाली आहे, मग त्याच्या बरोबर लग्न करण्याला तूं खुषी आहेस तर ? त्याचे आलीकडे डोकें बिघडलें आहे आणि ही आमची त्याला—

इतक्यांत मध्येंच पुढें न बोलण्याविषयीं मान हालवून निहालकुवरबाईनें खूण केली व म्हटलें, 'आतां काय त्याचें ? मी काय म्हणतें तें सगुणाताईला माहित आहेच.'

सगुणा०—होय बाबा, ह्या म्हणतात गणपतरावाला वेड लागलें आहे. होय कीं नाहीं ? कोणी पाहिजे तें म्हणूं दे. त्यांची खात्री आहे. आतां, ते असें पिसाटासारखें करतात हें खरें. त्याला कांहीं कारणही असेल, हेंही

पण खरें. ते वेडे नाहींत. आलीकडे त्यांचें मन स्थिर नाहीं. मजवरोवर नीट बोलतसुद्धां नाहींत, म्हणून मी त्यांना वेडे म्हणणार नाहीं. ते कोणच्या तरी महत्वाच्या कामांत व्यग्र आहेत. तें काम संपल्यावर खचीतच पहिल्या प्रमाणें मजवरोवर ते वागतील. किंवहुना कांकणभर जास्तीच.

जगदेवरावांनां यावर कांहींच उत्तर दिलें नाहीं. तिचें हें बोलणें त्यांना मुळींच रुचलें नाहीं. आपल्या लाडक्या वायकोच्या मताविरुद्ध इचें हें बोलणें, तें त्यांना कसें रुचावें ? खरें आहे.

चहा पिणें झाल्यावर जगदेवराव तेथेंच पत्रें वाचित, व कांहीं आपल्या कामांसंवधी लिहीत वसले. सगुणा अर्धाच राहिलेला एका कादंवरीचा दुसरा भाग पुढें वाचावा म्हणून आपल्या खोलींत गेली. निहालकुवरवाई वर जाऊन वाहेरचें दार लावून आंत आपल्या वस्त्रपरिधानगृहांतून, शय्यामंदिरांतून, आरसे महालांतून इकडे तिकडे फिरूं लागली. वस्त्रपरिधानगृहांत जाऊन दार लावून घेऊन कपाटांतून एक लहानशी मोहागनी लांकडाची औषधाची पेटी काढून टेवलावर टेवून ती वसली. पेटी उघडल्या वरोवर आंतल्या दहा वीस 'स्टापर्ड' वाटल्या दिसूं लागल्या. त्यांत 'रेड लव्हेंडर,' 'क्लोरो फार्म,' 'क्लोरो डाईन,' 'इथर,' 'सालव्होलेटाईल' असें कांहीं कांहीं होतें. त्या वाटल्यांकडे पहात त्यांवरून हात फिरवीत फिरवीत एक काळ्या रंगाचा घट्ट अर्क भरलेली वाटली जवळ येऊन ती कांहीं वेळ थांवली. ह्या वाटलीवर 'Opium-Poison' 'म्हणजे अफूचा अर्क—वीष' अशी चिठ्ठी मारली होती. तिनें ती वाटली काढून तिचा कडवट वासही पण घेतला, व एकदम चिळस आल्यासारखें करून ती वाटली पुन्हां जेथल्या तेथें टेविली.

'मीं जर हें-मीं जर हें—पण तें आतां कशाला, पण थोडें-झोंप' असें ती आपल्याशींच कांहीं म्हणाली.

ती पेटी तशीच टाकून ती तेथून उठून खिडकींतून बाहेर रस्त्याकडे पाहूं लागली व पुन्हां म्हणाली,—

'काय बाई तरी आज वेळ जातां जाईना. केवढा तरी दिवस ! मी हा मघापासून कसा लोटतें आहें ! पण कांहीं सरत नाहीं !' याप्रमाणें कांहीं वेळ ती रस्त्याकडे. त्या कमानीकडे पहात उभा राहिली ; पण ते-

वढया वेळांत जाणारे येणारे तिला कोणीच दृष्टी पडले नाहींत. तेथें उभे राहून राहून कंटाळून ती परत कोंचावर येऊन बसली.

त्या आगीची बातमी, मग ती आग कोठेंही असो, अजूनपर्यंत निहालगडास येऊन पोहोंचली नाहीं. आज हवा फारच कुंद झाली आहे. पावसाची बुरबुर चाललीच होती. मधून मधून गार वारा येत होताच. आज कांहीं बाजारचा दिवस नाहीं कांहीं नाहीं, म्हणून पाऊस जरी असला तरी जाणारे येणारे लोक रस्त्याला जास्ती कमी दिसतील. अशा हवेंत कोण उगीच विशेष कारणावांचून बाहेर पडतो ? म्हणून रात्रीच्या आगीची बातमी अजून निहालगड गांवांतही आली नाहीं व तेथून येथें मोतिचौकावरही आली नाहीं वाटतें.

उलटी कांस मारून लुगडें नेसलेली एक तरुण स्त्री आमच्या बाईसाहेबांच्यादारापाशीं आली आणि तिनें 'सरकार' म्हणून हांक मारली. निहालकुंवरबाईनीं दार उघडलें व 'मी जेवून आलें मघांच. माझें बाई डोकें फार दुखत आहे. आतां नको वेणीन् फणी. मग तिसरे प्रहरीं हांक मारीन तेव्हां येऊन जा. जा आपल्या उद्योगाला. अशी पांच वाजतां ये' असें वी आपल्या दासीला म्हणाली.

कांहीं तरी निमित्त करून दासीला तिनें या वेळेला घालविलें झालें. ज्यांना ज्यांना म्हणून श्रीमंताच्या स्त्रियांच्या गुप्त गोष्टी माहीत असण्याचा हक्क आहे, त्या सर्वांत दासीचा हक्क विशेष आहे. सरदार बाळासाहेबांनीं आमच्या वहिनीसाहेबांना मनासारखा शालू घेऊन दिला नाहीं म्हणजे त्यांची तक्रार आमच्या ह्या दासीजवळच. श्रीमंत बाबासाहेब, विश्वयोषितेच्या नादीं लागले, त्यामुळें वर्षांतून एक दिवसही आपला 'महाल' होत नाहीं, याची तक्रार ह्या दासीजवळच. यजमान साहेबांना दोन स्त्रिया आहेत, धाकटीवरच विशेष प्रेम, आपल्याला मुळींच विचारीत नाहींत-तर कांहीं देवरुषी, भालइोरा) करून आपल्यावर मर्जी प्रसन्न करून घेण्याला मदत व मसलत ह्या दासीचीच ! !

तसंच आपला पुतण्या नारायणराव, यास मारविण्याला खुमेरसिंगाला बोलावण्याला, किंवा दादासाहेब आपल्याला अनुकूल होत नाहींत तेव्हां यांना फसविण्याच्या कामांत आनंदीबाईलाही, दासी गिरजाच मदत व मसलतदेणार ! राव बाजीवर फिदा होऊन यांच्या बरोबर जाण्याकरितां

कडव्या मुसलमानांच्या गोटांतून बाहेर पडणाऱ्या मस्तानीला मदतही दासीच ! आपल्या बाईसाहेबांबरोबर हसावें केव्हां, रडावें केव्हां, विनोद करावा केव्हां, गंभीरता केव्हां धरावी, हें सर्व ह्या दासींनाच पक्कें ठाऊक ! श्रीमंतांच्या घराण्यांत अंतर्गृहांत दासी हें एक मुख्य चालक पात्र असतें ! त्यावांचून बाईसाहेबांचे सर्व व्यापार बंद ! बरें असो.

याप्रमाणें दासीला पाहिजे त्या आपल्या बाईसाहेबांच्या गुप्त गोष्टी कळण्याचा हक्क; तरी आमच्या निहालकुरबाई आपल्या ह्या दासीशीं फारच नेतानें होत्या. आणि आज तर विशेषच.

ती पलंगावर जाऊन स्वस्थ पांघरूण घेऊन झोंप यावी ह्मणून पडली. पुष्कळ वेळपर्यंत तिला झोंपच आली नाहीं. अलीकडे झोंप ही तिला कशी ती माहीत नाहीं ! सर्वभ्रमपरिहारक जी झोंप ती इच्यापासून केव्हांच नाहींशी झाली होती ! पण काल रात्रीं अगदीं थकून गेल्यानें तिला अजेर गाढ झोंप लागली. झोंप यावी ह्मणून तिनें त्या काळ्या अर्काचे कांहीं थेंब घेतले होते व त्यानेंच इला अशी ंसावध झोंप लागली.

एकदम जागी होऊन खडबडून उठून ती पाहते तों चार वाजायाला पंधरा मिनिटेंच कमी. उठल्याबरोबर तिनें आपल्या कपाळावरचे घर्मबिंदु पुसले व ' अगबाई ! सगळी चोळी देखील घामानें भिजली कीं ! ! ' असें झटलें.

घरांतलीं सगळीं माणसें ती आगीची बातमी सांगत आपल्या खोलीच्या दारांत ओरडत आहेत, असें तिला स्वप्न पडलें.

दारापाशीं कोणी आलें नाहीं आणि गेलें नाहीं. कोणी ओरडलें नाहीं कीं कोणी बोललें नाहीं. खिडकीच्या कुंड्यांतल्या गुलाबांचीं पानें मात्र त्या खिडकीच्या तावदानावर वाऱ्यानें आपटत होतीं.

मग ती आपल्याशींच ह्मणाली, ' अगबाई ! काय हें स्वप्न तरी ! अशीं स्वप्नें पडूनच भिऊन मीं मरून जाते की ! '

पावसाची बुरबुर थांबली. आकाश अगदीं स्वच्छ झालें. दिनराज पश्चिमेकडे चमकूं लागले. आतां प्रियेला भेटावयाला जावयाचें, ह्मणून अगदीं सौम्य रूप धारण करून, फार उत्कंठतेनें व धांदलीनें दिनराज निघाले आहेत, तर यावेळीं आपणही आतां बाहेर जावें, असें मनांत आणून वेणीफणी करून, नटून थटून आमच्या बाईसाहेब हंसत हंसत तोंडानें

'करावीं धरुनी दतंत्रण करी गाला' हें संगीतसौभद्रांतील पद म्हणत खालीं चौकांत आल्या.

ती वाचनगृहांत गेली, तों जगदेवरावांना वाचतां वाचतांच झोंप लागली आ, वर्तमानपत्र तसेंच हातांत आहे, असें तिच्या दृष्टीस पडलें. त्यांना जागे न करितां, हळूच मागें सरकून, दार पुढें करून घेऊन, ती बाहेर आली, इतक्यांत सगुणाताई ही आपल्या खोलींतून बाहेर आली. तिला पाहून ही म्हणाली (पुष्कळ दिवसांनीं ही आपण होऊनच आपल्या लेकीबरोबर बोलली) 'सगुणाताई, येतेस का ? बागेंत घटकाभर फिरून येऊं.'

सगुणा०—चल वाई, माझी ना नाहीं. ते मेलं 'नाव्हेल' (कादंबरी) वाचतां वाचतां मला कंटाळा आला. जांभयावर जांभया येऊं लागल्या. कधीं संपेलसें झालें !! काय मेलं चव्हाट लावलय! असं अरसिक पुस्तक मीं नाहीं वाई पाहिलें. दोनचार पानांतच कंटाळा येतो !!

ईश्वर करो आणि आमच्या सगुणाताईसारखे वाचक न मिळोत! इच्यासारखे वाचक मिळाले म्हणजे ग्रंथकर्त्याच्या श्रमाचें चीज झालेंच म्हणावयाचें ! इच्यासारख्या मंडळींना नेहमीं कादंबरी वाचतांना मंडुकप्लुति करण्याची फार संवय ! ह्या भागांतलीं दोन पानें वाचलीं कीं, 'चला उगीच चव्हाट लाविलें आहे, पुढें पाहूं' म्हणून मधींच एक भाग काढून पुन्हां याप्रमाणें अर्धें वाचावयाचें ! त्यांत कांहीं बरेंसें वाटलें म्हणजे 'वः फार नामी! असे लिहिणार फार थोडे !' लागलीच म्हणावयाचें. व लगेच दुसरें दिवशीं वर्तमानपत्रांत शिकारस ! अशाच वाचनाची मंडळी फार ! दुर्भाग्य ग्रंथकाराचें, दुसरें काय ? त्याच्या नशिबानें जर चांगला भाग, चुकलों, भाग नव्हे, पान ! पान नव्हे, पारिग्राफ चांगला निघाला, तर सर्व श्रमाचें सार्थक्य नाहीं तर 'यासारखा गचाळ ग्रंथकार नाहीं!' हें बक्षिस आहेच. बरें असो.

या दोन स्त्रिया बागेंत हिंडण्याला निघाल्या चाफ्यांच्या झाडांत, गुलाबांच्या ताटव्यांत, पारिजातकाच्या बारींत बरेंच फिरल्यावर त्या मत्स्यपल्वलाजवळ एका बांकावर बसल्या. या वेळेला सूर्यास्त होऊन कडोसा पडला होता. निहालकुवरबाईच्या मनांत सर्व कांहीं रात्रीच्या आगीचें ! घटकोघटकीं क्षणोक्षणीं, तिला वाटे कीं, आतां कोणी तरी येऊन रात्रीच्या आगीची बातमीसांगेल. तिचें मनःपक्षीच साशंक झालें होतें. तिच्या मनाला अगदीं

स्वास्थ्य नव्हतें. 'कसला बाई आजचा दिवस ! फारच कंटाळवाणा, जातां जाईना. आभाळ काय आलें ! पाऊस काय आला ! हवा किती कुंद ! आज सारा दिवस त्रास झाला. आतां कांहीं बरें आहे' असें सगुणाताई म्हणाली. त्यायोगें इचे हे भयंकर विचार थोडे बाजूला राहिले.

'अगबाई, सहा वाजले ! हे ऐक! मीं येथेंच अजून ! बाबांनीं साडेपांच वाजतां उठीव, म्हणून मला सांगितलें होतें. जातें तर मीं' असें सगुणा घड्याळाचे सहा ठोके ऐकून आपल्या आईला म्हणाली.

'जा बाई. मी इकडे आलें, तेव्हां त्यांना झोंप लागली होती. मी नाहीं उठविलें. झटलें उगीच झोंपमोड कशाला ?'

यामुळें सगुणा गेल्यावर 'आतां कोणबाई सांगायाला येईल! काय बातमी येते कोणाला ठाऊक !! गणपतरावाची ही बातमी ऐकून तिकडे मग कसें होईल?' अशी चिंताक्रांत होऊन, विचार करीत ती तेथून उठून त्या कमानीकडे निघाली. ती त्या कमानीजवळ जाते, तों चांगलाच कडोसा पडला. लांबचें माणूस कांहीं झट्कन् ओळखूं येत नव्हतें. अशा वेळीं ती त्या रस्त्यानें झाडांच्या जवळून हळूहळू चालली होती. इतक्यांत समोर तिला कोणी आपल्याकडेच येत आहे, असें दिसलें. त्याला पाहिल्याबरोबर हा येणारा गृहस्थ 'ती बातमी सांगायाला येत असेल काय ? कोण बरें असेल ? दुसरें कोण ? आमच्या गांवचे ते देशमुख असतील, किंवा तो नवीन आणलेला डाक्टर असेल दुसरें कोण येणार सांगायाला ?' असें ती म्हणत त्या कमानींत जाऊन पोंहचते, तोंच तो समोरून येणारा गृहस्थही तेथें येऊन पोंहोचला. त्याला पाहिल्याबरोबर ती थरथरां कांपूं लागली ! काळी ठिक्कर पडली ! त्या कमानीच्या भिंतीला टेंकून ती उभी राहिली, पण तिच्यानें उभें राहवेना ! मट्कन् खालीं बसली ! सर्व अंगाला दरदरून घाम आला ! बोबडी वळली. डोळ्यांपुढें काजवे आले. अशी तिची क्षणांत स्थिति झाली.

'कोण ? माईसाहेब ?' असें या गृहस्थानें विचारिलें हे गृहस्थ आमचे गणपतराव होत. यांसच पथिकाश्रमांत सतरा तासांपूर्वी बाहेरून कडी घालून इनें कोंडून टाकिलें होतें.

मोठ्या चमत्कारिक तऱ्हेनें ते म्हणाले 'मामी, अशा कां येथें बसलां ? चला. आंत चला कीं. मी हात धरून नेऊं कां ? चला उठा. तुमचा बेत

फसला. काढा, काढा आणखी कांहीं युक्ति ! पण येवढें कशाला ? आज तुह्मांला मीं मुक्त करतों. अनेक युक्ति काढण्याला आतां उगीच आपल्याला श्रम देत नाहीं ! '

गणपतरावांनीं तिला हाताला धरून उठविलें, व तिला आंत नेलें. तिला अतिशयच कांपरें भरलें होतें. तिनें त्यांच्या बरोबर आंत जाण्याला होय नाहीं मुळींच केलें नाहीं. मुकाट्यानें लहान मुलीसारखी ती त्यांच्या बरोबर गेली.

भाग २५ वा.

एका चौकांत आल्यावर गणपतरावांनीं इकडे तिकडे साशंक होऊन पाहिलें आणि 'तुम्हीं आम्हींच दोघें घटकाभर एकांतांत बोलत बसूं, अशी जागा कोठें नाहीं का ?' म्हणून त्यांनीं तिला विचारिलें.

उत्तराऐवजीं आमच्या बाईसाहेबांनीं होय म्हणून नुस्ती मान हालविली. तिनें अर्धेंच उघडें असलेलें केलिमंदिराचें दार उघडिलें. आज संध्याकाळपर्यंत कांहीं विशेष कामधाम न करितां आळसांत वेळ घालविल्याचा कंटाळा येऊन, जगदेवराव आपल्या 'आफिसांत' जाहागिरीसंबंधी कामकाज करण्याला, व कारभाऱ्यावरोबर कांहीं महत्त्वाच्या गोष्टींत विचार करण्याला, जाऊन बसले होते. एक 'मून' दिवा मंद असा एका टेबलावर तेथें जळत होता.

निहालकुवरबाई आंत गेली. तिच्या मागोमाग गणपतरावही आंत गेले. ही कैकया तेथें एका कोचावर बसली; गणपतराव, तिच्या समोरे डावा हात कंबरेवर ठेवून, व उजवा जवळच्या टेबलावर टेंकून, उभे राहिले; आणि मग मोठ्या कठोर स्वरानें तिला म्हणाले, 'निहालकुवरबाई, गेल्या रात्रीं मीं तुम्हांला सर्व उलगडून सांगितलें. परंतु तुम्हीं तें कांहीं मनावर घेतलें नाहीं. आतां कालच्यापेक्षांही उघड करून सांगतों. आतां मात्र तुम्हीं माझें ऐकलेंच पाहिजे, असा प्रसंग आला आहे.'

यावेळेस आमच्या बाईसाहेबांचें मन दुःखानें अगदीं क्षुब्ध होऊन गेलें होतें. तिनें मोठा सुस्कारा टाकून, स्फुंदण्यास सुरुवात केली. तिनें त्यांच्या प्रश्नास मुळींच उत्तर दिलें नाहीं.

गणप०—निहालकुवरबाई, काल पथिकाश्रमाला आग लागली, हें तुम्हांला माहीत आहे काय ? त्या घरांतच मी निजलों होतों, हें तुम्हांला माहीत आहे काय ?

निहाल०—नाहीं. मला नाहीं बाई ठाऊक ! काय ! आग लागली !

गणप०—काल मोठीच खैर झाली. ईश्वराच्या कृपेनेंच मीं वांचलों. वेळ आली होती, पण काळ आला नव्हता. मैनानें मला जी खोली दाखविली होती, त्या खोलींत मी मुळींच निजलों नाहीं. प्रथम त्या माडी-

वरच्या खोलींत निजलों होतों खरा, पण मैना तुमच्याकडे आल्यावर खालीं अंथरूण आणविलें होतें, हें तिला माहीत नव्हतें.

या बोलण्यानें तिच्या चेहऱ्यांत काय फरक होतो, हें पाहण्याकरितां गणपतराव तेथेंच थांबून तिच्याकडे बारीक दृष्टीनें पाहूं लागले.

आमच्या बाईसाहेबांत कांहीं सांगण्यासारखी चलबिचल झाली नाहीं. तिनें आपलें डोकें खालीं दोन्ही गुडघ्यांत घातलें, एवढेंच.

गणप०—तो पांथिकाश्रम जाळून टाकण्याची कोणीं एवढी खटपट केली, हें सांगूं कां बाईसाहेब ?

या प्रश्नाला उत्तर मुळींच आलें नाहीं.

गणप०—(पुन्हां) सांगूं कां बाईसाहेब ?

अजूनही उत्तर मिळालेंच नाहीं.

गणप०—(मोठ्या रागानें ओरडून) अहो, निहालकुवरबाई, आपणच आगलाव्या ! समजलांत ? आपल्याच या घातुक हातांनीं आग लागली ! आह्मां तिघांना त्या घरांत जाळून मारण्याचा बेत करणार आपणच बाईसाहेब ! माझा एक जीव घेतल्यापासून आपणाला कांहीं—कांहीं कां—मोठाचें फायदा तरी होता ! पण त्या दोन गरिबांचा जीव घेण्यांत काय हेतु ? आपल्यावर दया करण्याची वेळ आतां निघून गेली, बरें कां बाईसाहेब ? आतां दया ह्मणून-आणि ती तुमच्याबद्दल-माझ्या मनांत कधींच येणार नाहीं. तुमच्या या कृत्यांत आणखी कोणाची अब्रू मळत असली, तर त्यावर मीं दया करीन एवढेंच. कोणाच्या तरी समक्ष अपराध कबूल करायाचा, असें तुमच्या मनांत असल्यास, तसें कळूं द्या; परंतु या तुमच्या दुष्ट कृत्याचें प्रतिबिंब ज्याच्यावर पडून ज्याला पूर्ण ग्रहण लागणार आहे, त्या थोर गृहस्थाला आपण इतक्यांत येथें आणूं नये, असें मी इच्छितों. पण आपली मर्जीच आसल्यासें माझी तयारी आहे.

याप्रमाणें आपल्या मामासंबंधी विचार मनांत आल्याबरोबर गणपतरावांना फार वाईट वाटलें. त्यांच्या डोळ्यांना पाणी आलें. त्यांना अतिशय दुःख झालें. त्यांना तें आवरेना. परंतु ते पुढें ह्मणाले—

'काल रात्रीच्या आगींत कोणाच्या जिवाला अपाय झाला नाहीं, ही ईश्वराची मोठीच दया. बाईसाहेब, माझ्या मनाला अतिशय त्रास झाल्यानें मला अलकिडे गाढ झोंप मुळीच येत नाहीं. त्याप्रमाणेंच कालही मला

झोंप चांगलीशी लागली नव्हती मीं अर्धी मुर्धी जागाच होतों. आग लागलेली मींच पहिल्यानें पाहिली. मी तरी मोठ्या वेळेवर पाहिली म्हणून सर्वांचे जीव बचावले. त्या मारवाड्याला व दारू पिऊन झिंगून पडलेल्या जातिवाला मींच बाहेर काढिलें. गरीब बिचारा जोतिबा ! निमाशिमा होरपळून निघाला ! तो त्या गांवांत आपल्या म्हाताऱ्या आईच्या घरीं पडला. आहे इथळ ! इतक्या रात्रीं अंधारांत अशा वाऱ्यांत तेथें कोण आलें होतें, हें मला त्या जोतिबापासून व त्याच्या बायकोपासून कळलें. तिला जर मी आतां थोडें छेडलें तर काय काय तिच्यापासून तुमच्या गुप्त गोष्टी बाहेर येतील हें सांगतां येत नाहीं ! परंतु आतां तसें करण्याची माझी इच्छा नाहीं. नारायणराव चव्हाण नाहींसा होण्यांत ज्याचा संबंध आहे, त्याचा पत्ता लावावयाचा अशी मीं शपथ घेतली आहे. तर त्याप्रमाणें मला वागलेंच पाहिजे. आतां मी उघड म्हणतों कीं, तो अदृश्य होण्यास तुमचें विशेष अंग आहे. मला एवढेंच आश्चर्य वाटत होतें कीं, तुमच्यासारख्या सुंदर, नाजुक स्त्रीकडून असें भयंकर कृत्य कसें होईल ? पण आतां माझी सर्व खात्री झाली. संशयनिवृत्ति झाली. काल रात्रीं जो तुम्ही अपराध केला, यापेक्षां मोठा अपराध करण्याचें आतां राहिलेंच नाहीं ! आजपासून तुम्हांला मी मानवी स्त्री असें खास म्हणणार नाहीं. खरोखरच तूं राक्षसी आंहेस. राक्षसी देखील नव्हेस ! तूं केवळ पापदेवताच आहेस ! आतां येथें राहून ही जागा तुझ्या स्पर्शानें भ्रष्ट करण महत् पाप आहे ! आतां तूं इतके दिवस वृथा प्रेम दाखवून व स्त्रीकापट्यानें प्रेमपाशांत पाडून ज्या निर्मलान्तःकरण पुरुषाला फसविलेंस, त्याच्या देखत तूं कोण आहेस, तुझी खरी स्थिति काय आहे, हें सांगितल्याखेरीज निर्वाह नाहीं. मग तुझ्यावर कांहीं दया करणें किंवा न करणें हें काम आमचं आहे. तुझें खरें रूप सांगण्याला ज्या साक्षिदारांची जरूरी आहे, ते साक्षिदार मी हजर करीन, आणि मग अपराध तुझ्यावर शाबीद करीन.

ती स्त्री एकदम उठून काष्ठवत् त्यांच्यापुढें मोठ्या दृढ निश्चयानें उभी राहिली. डोळे अगदीं पाण्यानें भरून, तोंडावर जरा लाली चढून, ती म्हणाली,—

'काय हरकत आहे ! आणा त्यांना. आत्तां येथें घेऊन या. तुम्हीं कशाला ? मीच सांगतें त्यांच्याजवळ ! मी सर्व कांहीं सांगतें. खडान्खड

सांगतें ! मला काय त्यांची एवढी भीति ! तुम्हांपरोवर मी किती त्रास सोसला, हें एक परमेश्वरालाच माहीत ! पण अखेर ईश्वरानें तुलाच जय दिला. मोठा फुशारकी मिळविली नाहीं, गणपतराव? तुझी आपला शांत धिमा स्वभाव फार योग्य कामाला लावलात नाहीं ? एका डोळें बिघडलेल्या, अगदीं वेड लागलेल्या स्त्रीस जिंकून तुम्हांला काय मिळालें! वेडीला जिंकण्यांत काय महत्व ?

गगप०—(मोठ्यानें) काय वेडी !

निहाल०—हायं वेडी. खरोखरच वेडी. गणपतराव, मीं त्याला विश्वासघातानें क्रूरपणानें ठार मारिलें म्हणतां होय ? तर हें अगदीं खोटें आहे. माझें डोकें बिघडलेलें आहे, माझ्या मनावर माझा दाब नाहीं, वेडाच्या लहरींत मीं काय केलें, तें एक ईश्वरालाच माहीत ! तुझी जसें मला आतां छळीत आहां, तसेंच मला नारायणरावानें फारच छळिलें. त्यानें माझें डोकें जास्तीच बिघडून माझ्या हातून अपराध झाला. माझ्या हातून जें कांहीं कृत्य झालें, त्याबद्दल मीं जबाबदार नाहीं. मीं काय करूं ? अति त्रासानें माझें डोकें बिघडून मी वेडी झालें होतें. भागा, त्यांना आत्तां आणा, मी सर्व कांहीं कबूल करतें. सर्व कांहीं सांगतें. बोलवा त्यांना लवकर. माझ्या जन्माची गुप्त गोष्ट त्यांना कळूद्या.

गणपतराव लागलींच आपल्या मामाला हांक मारून आणावयाला गेले. आतां, आपल्या मामाला फारच दुःख होईल, असें मनांत येऊन त्यांना फारच वाईट वाटलें. आनंदीबाईचें वाचडयाचें पत्र त्यांच्या लक्षांत एकदम आलें त्यांत 'माझ्या आयुष्यांतली गुप्त गोष्ट' व 'मी असें कां करितें ह्याचें कारण तुमांला माहीत आहेच. तेव्हां तुम्ही मला क्षमाच कराल.' हीं वाक्यें एकदम त्यांच्या डोळ्यांपुढें यावेळीं उभीं राहिलीं.

जगदेवराव 'आफिसांत' भेटले. गणपतरावांनीं तेथें त्यांना जास्ती कमी कांहीं एक न सांगतां खालीं केलिमंदिरांत आणिलें व तेथें मोठ्या शांतपणानें गणपतराव असें म्हणाले,—

'मामासाहेब, आपल्या समक्ष, मामी कांहीं आपले गहन अपराध कबूल करणार आहे. यांपासून आपल्याला अतिशय दुःख होणार आहे, परंतु आपली अब्रू राखण्या करितां, आपल्या या वयांत पुढें शांतता मिळण्याकरितां, आपण ते सर्व ऐकून घेतलें पाहिजेत. इनें आपल्याला अगदीं फसविलें.

विश्वासानें गळा कापला, झटलें तरी हरकत नाहीं. परंतु हा अपराध नाहीं, असें झणण्याला तिचें काय झणणें असेल, तें सर्व ऐकून घेण्याला आपणांला पूर्ण हक्क आहे. ईश्वर करो आणि आपल्याला यापासून दुःख न होवो!'

एक हात पुढें करून आश्चर्यानें चकित होऊन जगदेवराव पाषाणाच्या मार्तंप्रमाणें स्तब्ध होऊन गणपतरावांकडे पाहत उभे राहिले.

निहालकुवरबाईनें जगदेवरावांच्या पायांवर डोकें टेकिलें, आणि डोळ्यांत आसवें आणून म्हटलें, 'त्यांनीं सर्व खरें सांगितलें. हे 'वेडे नाहींत' हें मीं खरें सांगतें. आपल्यासमक्ष अपराध कबूलकरावा, म्हणून आपल्याला मींच बोलावणें पाठविलें. आपण मजबरोबर फार प्रीतीनें वागलां. पण—पण—पण—मीच चांडाळीण, दु—दु—दुष्ट. मी विश्वासघातकी. मी फार आपमतलबी आहें, असें मीं पूर्वीच आपणांस कळविलें होतें. तसा माझा स्वभावच आहे. माझ्या अपराधापुढें दुसऱ्यांचे अपराध कःपदार्थ आहेत. मी फार—फार—विश्वासघातकी!!'

ती पायां पडल्याबरोबर तिला 'नको नको' म्हणून जगदेवराव उठाविण्यास खालीं वांकणार, पण इतक्यांत तिचें हें पुढचें भाषण ऐकून त्यांना फार वाईट वाटलें, व तसेच दुःखानें शेजारच्या आरामखुर्चीवर पडले.

मग उठून बसून ती म्हणाली, 'माझ्या सर्व आयुष्याची हकीकत आपणांस सांगतें, म्हणजे मी किती दुष्ट आहें, हें लक्षांत येईल. मजसारख्या अपराध्याला देहान्त शिक्षाच योग्य. मी अगदीं लहान होतें, तेव्हां माझी आई कोठें आहे असें मी विचारीत असें. ती मला मुळींच आठवत नाहीं. ती कोठें निघून गेली म्हणून सगळे सांगत. लहानपणापासून सुख कसें तें मला ठाऊकच नाहीं. मला सांभाळायाला एक बाई ठेवली होती, ती फार दुष्ट होती. ती मला नेहमीं त्रास देई. माझा बाप शिरोळास त्यावेळेस होता. तेथेंच मीही होतें. बाप लष्करांत निशापाणी यांमध्यें सदा गुंग! त्या बाईशींच सदा मला प्रसंग. बाप आम्हांला पैसे खर्चावयाला अगदींच थोडे देत असे. तेव्हां गरिबी ही माझ्या जन्मापासूनच लागलेली.'

'या दुष्ट स्त्रीच्या हाताखालीं राहण्याचा मला कंटाळा येई, झणून झणा, किंवा मातृप्रेमानें झणा, मी, माझी आई कोठें आहे झणून जेव्हां जेव्हां विचारी, तेव्हां तेव्हां मला आपला तोच जबाब. मला थोडें जास्ती कळूं लागलें

तेव्हां मी, आई मेली काय म्हणून विचारीं. पण ते नाहीं म्हणून सांगत. ती कोठें गेली पत्ता नाहीं. फार गेली म्हणून विचारिलें, तर ते गुप्त आहे असें सांगत. मग एके दिवशीं मीं फारच त्या बाईला त्रास दिला, तेव्हां तिला फार राग आला आणि म्हणाली, 'कोठली तुझी आई ! ती खुळी आहे. त्या लिकडे धारवाडास खुळ्यांच्या इस्पितळांत तिला टाकिलें आहे.' पण असें सांगितल्याबरोबर तिला पश्चात्ताप झाल्यासारखा दिसला. कारण, उगीच तुझी समजून करावी म्हणून मी बोललें, हें सर्व खोटें आहे, असें तो मागाहून लागलींच म्हणाली. हें गुप्त फोडूं नकोस, अशी माझ्या बापानें तिला ताकीद केली होती. त्यामुळें ती अशी फिरली. ही हकीगत ऐकिल्यापासून रात्रंदिवस माझ्या मनांत माझी आईच घोळूं लागली ! सर्व खुळ्या माणसांच्या कृती माझ्या डोळ्यांसमोर उभ्या राहूं लागल्या. '

'मी बारा तेरा वर्षांची झाल्यावर मला बापानें करवीरीं मराठी इंग्रजी शिकण्याला पाठविलें, लहानपणापासून गरिबींत खेडेगांवच्या उनाड पोरांत राहिल्यानें मला वाईट संवई लागलेल्या तेथें स्वतंत्रतेनें वागण्यापासून जास्तीच वाढल्या. तेव्हां मी विशेष आकळेपणानें वागूं लागलें.'

इतकें सर्व बोलेपर्यंत तिच्या डोळ्यांतून सारखा प्रवाह चाललाच होता.

'मग पुढें कांहीं दिवसांनीं माझा बाप मला भेटावयाला म्हणून करविरीं आला. तेथें ऐके प्रसंगीं बोलतां बोलतां मी आईची गोष्ट काढली; तेव्हां मला सर्व हकीगत कळली आहे, हें पाहून, माझा बाप फारच रडला. त्याला तिची फार आठवण झाली. त्या दोघांची फारच प्रीति होती '

'मग एकदां आम्ही दोघें धारवाडाला आईला भेटावयाला गेलों. तेव्हां तिला पाहून बाबाला फारच रडूं कोसळलें. तिनें आम्हांला ओळखलेंच नाहीं. मा होईपर्यंत ती चांगली होती. पुढें तिला वेड लागलें. तिच्या आईलाही असेंच वेड होतें, म्हणून बाबा म्हणाले,

'हें कोणाजवळ बोलूं नकोस म्हणून मला बाबांनीं सांगितलें. मी जरी लहानच होतें तरी मला चांगलें कळत होतें, तेव्हांपासून ही गुप्त गोष्ट मी उराशीं बाळगून ठेवली, तेव्हां मला वाटलें कीं आइच्या वयाची मी झालें म्हणजे मीही अशीच वेडी होईन.'

'पुढें मी तें विसरूनच गेलें. मी फार सुंदर, मनोहर, मायाळू खरी, पण

केव्हां केव्हां फार दुष्ट आहें, असें लोक म्हणतात. त्याचें कारण हेंच असावें, असें मला आतां वाटतें. मला शाळेंत देखील सगळ्या मुली म्हणत कीं, ही फार स्वरूपवान आहे, पण थोडी निर्दय आहे. असा स्वभाव श्रीमंत घराण्यांत खपतो.'

'मग माझा विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर मी शिरोळास वापाकडे गेलें. यावेळीं माझ्या बापानें पेनशन घेतलें होतें, तरी तेथेंच तो राहिला होता. तेव्हां मी सतरा वर्षांची होतें.'

'त्या वेळेला आमच्या गांवांत माझ्या इतकी सुंदर मुलगी दुसरी नव्हती, झटलें तरी चालेल. तेथल्या पलटणींतले शिलेदार मला पाहून फार वेडे होत. माझ्या मनांत हे शिलेदारच श्रीमंत; यांच्यापैकीं कोणावरोवर लग्न झालें, तर मी श्रीमंताच्या पदरीं पडलें खरी. आपल्या सारख्या किंवा ह्या गणपतरावासारख्या श्रीमंत, हुशार, संभावित लोकांची कल्पनाच मला आली नाहीं. त्या शिलेदारांपैकींच एकजण माझ्या नशिबीं होता.'

असें म्हणून तिनें मोठ्या सपाट्यानें आंग झाडिलें. तिनें आपलें तोंड जमिनीकडे खालीं केलें होतें, त्यानें त्यावर काय काय वेळोवेळीं फेरफार होत आहेत, हें मुळींच दिसेना.

'त्या शिलेदाराची माझ्यावर फारच नजर. माझ्या वापाचे मनांतही मला त्यालाच द्यावी असें आलें. त्या शिलेदाराचें नांव नारायणराव चव्हाण.'

नारायणरावाचें नांव ऐकिल्याबरोबर जगदेवरावांनीं मोठ्या आश्चर्ययुक्त दुःखानें गणपतरावांकडे पाहिलें.

'नारायणराव चव्हाण हा गारगोटी येथील एका श्रीमंत थोर कुळांतल्या गृहस्थाचा एकुलता एक मुलगा. त्यानें आपल्या बापाच्या संमतीशिवाय माझ्या रूपाला भुलून माझ्याबरोबर लग्न लाविलें. तेव्हां मला सतरावें वर्ष संपून नुकतेंच अठरावें वर्ष लागलें होतें. आम्हा नवराबायकोंत अतिशयच प्रेम. त्यांच्यावर माझें प्रेम काय सांगूं! आपल्यावर देखील इतकें माझें प्रेम नाहीं! आपण कां मला कमी केलें! हत्तीच्या गंडस्थळावर बसविलें!'

झालें उजाडलें! स्वप्न उलगडलें! जगदेवरावांना त्या संध्याकाळीं दूची त्या सरलष्करांच्या माडीवरच्या खोलींत भेट झाली, तेव्हांची

आठवण झाली. तेथून परत जातांना त्यांच्या मनाला कांहीं भीति, कांहीं उदासीनता वाटली होती. ती आजच्या प्रसंगाची प्रस्तावनाच होय, असें त्यांना आतां वाटलें. अरेरे ! हा झातारा किती मूर्ख ! हिच्या लावण्याला फसून, हिच्या तारुण्याला भुलून, हिच्यावर प्रेम करूं लागला ! त्याच्या मनांत इच्याविषयीं कधीं तरी वाईट आलें होतें काय ! तिच्या विस्तीर्ण मोहजालांत हा पूर्णपणें अडकेलेला ! याला पूर्ण मोहनी पडलेली ! जगदेवरवा-सारख्या वृद्ध, थोर, अनुभवी व संभावित मनुष्यावर असा प्रसंग आला, त्यानें आह्मांला फारच वाईट वाटतें ! त्यानें कां या स्त्रियेच्या नादीं लागून फसावें ! होणारासारखी बुद्धि. थोर, सरळमार्गी, छक्केपंजे माहित नसणारे मनुष्य असेच केव्हां केव्हां बाह्यच स्वरूपाला भुलतात !

आमच्या बाई साहेब पुढें झणाल्याः—

'आह्मां दोघांची एकमेकांवर फार प्रीति ! आह्मीं दोघें पुष्कळ फिरलों. त्यांनीं मला असेतोंपर्यंत पैशाला, खाण्यापिण्याला, कपड्यालत्याला कधींच कमी केलें नाहीं. माझ्याच पायीं त्यांची नोकरी सुटली. शिरोळास पुनः आल्यावर बाबा व आह्मीं एकेठिकाणींच राहूं लागलों. तेथें आल्यावर पैसे अगदीं संपत आले. फार टंचाई होऊं लागली. खर्च कांहीं कमी नाहीं. त्यांना आपल्या वडिलांना पत्र पाठवून मदत मागा, झणून मी सांगितलें. तसें पत्र त्यांनीं पाठविलें, पण सर्व व्यर्थ. नौकरीची खटपट करा, झणून मग मीं सांगितलें पण तेंही कोठें जुळलें नाहीं. इत-क्यांत मला मुलगा झाला. त्यायोगें तर फारच त्रास झाला. मी वरचेवर त्यांना नाहीं नाहीं तें बोलत असें. मला माझ्या आईची वरचेवर आठवण होई. एक मूल झाल्यावरच तिला खूळ लागलें, हें नेहमीं मनांत येई. तुजसारख्या भिकाऱ्यावरोबर लग्न करून मी फसलें, माझा गळा तूं कापलास, असें नंतर मी त्याला रोज झणूं लागलें. त्याला फारच त्रास दिला. एकेदिवशीं त्याला फार राग आला. आणि रात्रीचे रात्रीं तो कोठें निघून गेला. सकाळीं उठून पाहतें, तों त्याचा पत्ता नाहीं ! अंथरुणा-च्या उशाला एक दोन बोटें चिठ्ठी टेविली होती. त्यावर 'मी परदेशांत पैसा मिळवायला जातों आहें. श्रीमंत होऊन आल्याखेरीज तुला भेटणार नाहीं,' असें लिहिलेलें होतें. काय बाई ती वेळ !'

'तो असा निघून गेला झणून मला फार वाईट वाटलें. अतिशय रागही

आला. आतां या लहान पोराला काय करूं! बाप हा असा नेहमीं कर्जबाजारी दारूकस ! याच्या जवळ तरी काय आहे माती ! आतां उपाशी मरणें आलें. असें वरचेवर मनांत येई व वाईट वाटे. माझा सासरा नणंद सुखांत, आनंदांत, श्रीमंतींत काळ काढितात. आणि मी ह्या पोराला घेऊन भीक मागणार, हें मनांत येऊन फारच वाईट वाटे. सर्व लोक मला पाहून हळहळत. पण काय उपयोग ? मला त्यांचा फार राग येई. आतां ह्या मुलाची मला दयाच येईना. माझ्या डोक्यावर हा बोजाच दिला असें वाटे. माझ्या भाईची स्थिति मला प्राप्त होणार, असें वरचेवर मनांत येई. माझा आणि बापाचा वरचेवर तंटा होई. मला चैन तें कसें पडेना. माझें डोकें फिरून गेलें. पैशासाठीं येवढें !'

'मग एकेदिवशीं कंटाळा येऊन मीं पळून जाण्याचा निश्चय केला. या दुष्ट बापापासून एकदां निसटावें, असें ठरवून, करवीरीं जाण्याचा बेत केला. त्या मोठ्या शहरांत कोणाचा कोणाला पत्ता लागत नाहीं कांहीं नाहीं, असें समजून मी पळून करवीरीं आलें.'

गगनबावड्यास असतांना एका वर्तमानपत्रांत, ग्रयांट-ईन-एड-फीमेल कालेजांत एक मास्तरीण पाहिजे आहे, अशी जाहिरात छापलेली मीं वाचली होती; ह्मणून करवीरीं आल्यावर खोटें नांव घेऊन मी त्या कालेजाच्या प्रिन्सिपाल मिस-इला जाऊन भेटलें. तिनें माझी हुशारी पाहून लागलींच मला जागा दिली. तिनें मला माझ्या विद्वत्तेखेरीजें दुसरें कांहींच विचारिलें नाहीं. बाकीची हकीकत आपणांस माहीत आहेच. आपण लग्नाची इच्छा दर्शविलीत. मी कबूली दिली. तेणेंकरून मी आज अंबारींत बसलें. लहानपणापासून, शाळेंत असल्यापासून, मी सुंदर आहें असें लोक ह्मणूं लागल्यापासून ही श्रीमंताच्या घरांत पडेल, असें सर्व ह्मणत. तेव्हांपासून असा दिवस कधीं येईल, असें मला रोज वाटे. तो दिवस, आपण माझ्या रूपाला भुलून, तारुण्याला मोहून, हुशारीला पाहून, भुलून लग्न करण्याचा विचार ठरवून, मला आणून दिलात.'

'तीन वर्षें अशी आनंदांत सुखानें आपल्या समागमें चटकन् निघून गेलीं. या तीन वर्षांत मी माझ्या नवऱ्याचें नांव सुद्धां ऐकिलें नाहीं. तो मेला, अशी माझी खात्री झाली. नाहीं तर कसेंही करून तो मला हुडकून काढल्यावांचून राहणार नाहीं, असें मला पक्कें ठाऊक. त्याचा स्वभाव मल

पूर्ण माहीत. तेव्हां तीन वर्षांत सुगावा मुळींच नाहीं, म्हणून तो मेला असें समजून, मी आपल्या बरोबर लग्न करण्यास कबूल झालें, व आपल्या बरोबर इमानानें वागावयाचें, असेंही ठरविलें. माझ्यावर असें संकट येईल, असें मला मुळींच वाटलें नाहीं.'

'ही उच्च स्थिति प्राप्त झाल्यानें मला फारच आनंद झाला. माझ्याइतकी दैववान् मीच, असें रोज मी म्हणं. गरीबी मीं फार पाहिलेली, म्हणून गरीबांवर दया करावी असें माझ्या मनांत रोज येई, व त्याप्रमाणें मी नेहमीं गरीबांवर दया करीत आहें. तुमच्या सढळ हातांचा मी हवा तसा फायदा घेत आहे. सर्व लोक माझी स्तुति करीत आहेत. माझ्या रूपाची सर्व लोक प्रशंसा करीत आहेत. तें ऐकून मला फारच आनंद होतो. आतां जन्मभर असेच माझे दिवस जातील. आतां गरीबी, संकटें, त्रास जन्मभर चुकला असें रोज वाटे.'

'माझें मन पूर्वस्थितीवर आलें, असें मला आतां वाटतें. सरलष्करांच्या येथें असतां मीं जरा भ्रमिष्ट आहें, हें त्याच्या लक्षांत येतें कीं काय म्हणून मला रोज वाटे. तें घर सुटलें. पण येथें मात्र तो झटका पुनः झाल्यासारखा झाला.'

'आतांच मी आपणांला सांगितलें कीं माझा नवरा फार दृढनिश्चयी आहे. तिकडून पैसा मिळवून आल्यावर मला शोधून काढण्याला तो खडान् खडा उलथा पालथा करील, हें मला पक्कें ठाऊक. एक मीं मेलें असें कळलें तरच तो स्वस्थ राहणार, हें मला पूर्ण माहीत.'

'पुन्हां माझें डोकें बिघडलें. पुन्हां वेडाचा झटका झाला.'

'मी शिरोळाला गेलें. तेथें माझा बाप माझ्या मुलाला घेऊन रहात होता. मिस.....अजारी पडली तिला भेटावयाला जावयाचें. मी एकटीच जातें, असें आपणांस खोटेंच सांगून, मी जाण्याची खटपट केली. हें आपणांस माहीत आहेच. आपण बरोबर येण्याचा आग्रह धरला, त्यामुळें त्यावेळीं बेत फसला ; पण मी पुनः कांहीं बतावणी करून करवीरीं गेलें व मैनाला तेथें ठेविलें व मी पुढें शिरोळाला गेलें.

'मी बापाला भेटून हें सर्व सांगितलें. त्याला मी श्रीमंत झालें, हें पाहून

'मग माझ्या नवऱ्यानें प्रेमानें व मोठ्या औत्सुक्यानें, पाठविलेलें पत्र मला तेथें मिळालें. कुमुदबांधव आगबोट निघण्यापूर्वी हें पत्र त्यानें मला लिहिलें होतें. त्यांत त्यानें कोणत्या दिवशीं आपण मुंबईस येऊं, हेंही लिहिलें होतें. आतां पुढें कसें वागावयाचें हें त्या पत्रावरून मला चांगलें ठरवितां आलें.'

'आम्ही लागलींच ठरविलें कीं, कुमुदबांधव मुंबईला पोहोंचेल त्याच दिवशीं मी मेल्याची बातमी ज्ञानमंदिरपत्रांत छापावी.'

'असें ठरविल्यावर लागलींच आमच्या लक्षांत आलें कीं, एक मोठी अडचण आहे; ती ही कीं, मृत्यु कोठें घडला, कधीं घडला, हें छापायाला पाहिजे. तर याला काय करावें ! हें मोठेंच कोडें आम्हांला पडलें.'

'हा विचार मनांत येऊन माझा बाप तर अगदींच घाबरून गेला. तो रडूं सुद्धां लागला. त्याला कांहीं सुचेना.'

'मग आम्हीं दोघें फराळ करीत बसलों होतों. तों माझा मुलगा माझ्या मांडीवर खेळत होता. त्याला काय माहीत मी त्याची आई म्हणून. मी गळ्यांतला चंद्रहार काढून त्याच्या गळ्यांत घातला होता. तो त्याच्याबरोबर खेळत होता. माझा बाप व मी कांहीं बोलत होतों. इतक्यांत त्या पोराला संभाळण्याला ठेवलेली बाई तेथें आली. तिला तो पोर माझ्या मांडीवर खेळत आहे त पाहून, मी फार दयाळू आहें असें वाटलें. माझ्यासारख्या श्रीमंताच्या स्त्रीनें गरीबाच मूल घेतलेलें पाहून तिला आश्चर्य वाटलें. त्याची घाण माझ्या शालला लागेल हें मनांत येऊन तिनें स्वच्छ करून देतें असें म्हटलें. माझ्याबरोबर तिचें पुष्कळ बोलणें झालं. त्या पोराचा विषय टाकून तिनें आपली रडकथा सुरू केली. आपण गरीब आहों, कोणी नाहीं, नवरा नाहीं, असें सांगितलें. तिचें वय अजमासें एकुणपन्नास वर्षांचें असेल. तिनें सांगितलें कीं 'आपल्याला एक मुलगी आहे, ती फार आजारी आहे. ती वाडींत असते. आतां वांचत नाहीं. आठ पंधरा दिवसांची सोबती वैद्यांनीं हातच सोडलें वगैरे.'

तिनें आपलें नांव गिरिजा व आपल्या मुलीचें नांव चंद्रा, असें सांगितलें. तिच्या मुलीची सर्व हकीकत विचारून तिचें वय व माझें वय जुळतें, असें वाटून, एकदम माझ्या मनांत कल्पना आली. मी लागलींच जाऊन त्या [illegible] तिच्या आईला

पैसा देऊन वश करून घेतलें. तिला आमच्या कटांत घेतलें. मग माझा बाप ती व तिची ती मरायाला टेंकलेली मुलगी, हीं सर्व गगनपुरीस गेलीं. गगनपुरीस ती त्या ह्याना-त्याची मुलगी व त्या पोराची आई, तिचें नांव आनंदीबाई चव्हाण, असें सर्वांना सांगितलें. पुढें ती तेथें मेली. ती मेल्या-घर लागलींच ज्ञानमंदिरपत्रांत मेल्याची बातमी छापविली. ह्यावेळपर्यंत नारायणराव करवीराला आले. ती बातमी वाचून ते गगनपुरीला गेले. तेथें त्यांनीं तिचो छत्री बांधून त्यावर आनंदीबाई चव्हाण ह्मणून नांव कोरविलें.'

जगदेवराव हळूच खुर्चीवरून उठून उभे राहिले. त्यांच्यानें उभेसुद्धां राहवेना. आमवातानें त्यांचे पाय गेल्यासारखे झाले. या दुःखानें त्यांच्यांतली सर्व हिंमत निघून गेली. ते मोठ्या दुःखमय घोगऱ्या स्वरानें ह्मणाले, 'आतां पुढें माझ्यानें ऐकवत नाहीं. आतां पुढें ऐकावयाचें कांहीं असलें, तरी माझ्यानें आतां ऐकवत नाहीं. अरे गणू, तूंच हें सर्व उघडकीस आणलेंस. आतां माझ्यानें एकवत नाहीं. मी आतां-आतां-कोठेंतरी जातों. आतां मी तीर्थयात्रा करण्याला निघणार. नको मला हें घर ! आणि संसार ! शिव शिव ! काय हा संसार ! ह्यावेळपर्यंत माझी खरी बायको, असें इला मीं समजत होतों. हिची तूंच आतां पाहिजे तशी व्यवस्था कर ; मात्र हिच्या जिवाला धक्का लागू देऊं नको बरें बाबा ! अरेरे ! काय हें झालें ! हिच्यावर माझें केवढें तरी प्रेम ! त्याचा हा परिणाम !! झालें तें झालें ! ईश्वरानें आतां हिला सुखी राखावें ! कसें तरी हिनें माझें अन्न खालें आहे, हिला मीं प्रेमानें वागविलें आहे. हिच्या जिवाला धोका नको आणूस बरें गणू ? आतां मी निघतों. हें घर मला आतां स्मशानवत् भासून केव्हां सोडीन असें झालें आहे !

सर जगदेवराव हिंमतबाहदर असें ह्मणून केलिमंदीरांच्या बाहेर पडले. त्यांनीं त्या स्त्रीकडे पाहिलें सुद्धां नाहीं ! ती खालीं मान घालून मोठमोठ्यानें रडतच होती.

भाग ३६ वा.

असें ह्मणून जगदेवराव केलिमंदिराच्या बाहेर पडल्यावर लागलेंच गणपतरावही निहालकुवरबाईस तशीच तेथें रडत सोडून त्यांच्या मागोमाग भाडीवर जाण्याला निघाले. 'अरेरे! अखेर मामाला फार त्रास व दुःख झालें! अतिशय दुःखानें त्यांचें हृदय होरपळून गेल्यामुळें त्यांच्या तोंडांतून एक अक्षरही जास्ती आलें नाहीं. पण येवढें खरें, कांहीं वेळानें त्यांना अतिशय दुःख होईल व 'शोकक्षोभेच हृदयं प्रलापैरेव धार्यते' असें झाल्यावांचून कधींच राहणार नाहीं. हा शोकाचा उद्दाम वेग त्यांच्यानें कसा आटोपून धरवेल? मीं हा केवढा काठिण प्रसंग त्यांच्यावर आणला! माझा तरी काय उपाय आहे? त्यांना आतां किती दुःख होईल, याचा तर्क मला तर होत नाहीं. परंतु यांच्या वयाची पोक्त मनुष्यें अशा संकटसमयीं फार-धीरानें वागतात. तसेंच मामाही वागतील हें खास. आतां दोन तासांपूर्वीं मामा कितीतरी आनंदांत होते, आणि इतक्यांत पहा कसें झालें ते! हरहर!! दैवगति मोठी विचित्र आहे!!!'

असा विचार मनांत येऊन गणपतराव जरा थांबले. मग पुन्हां कांहीं विचार करून, दाराला बाहेरून कडी लावून घेऊन, ते चौकांत येतात तों जगदेवरावांची जाण्याची तयारी चालली आहे, त्यांचा हुजऱ्या गडबडीनें खालीं तबेल्यांत गाडी जोडा ह्मणून हुकूम कळविण्याला पळत गेलेला त्यांच्या दृष्टीस पडला. आतां ते जिना चढणार इतक्यांत स्वयंपाक घरांतून सगुणा हातांतलें एक इंग्रजी प्रत्याहिक पत्र मांडीवर आपटीत 'काय बाई तरी! किती वेळ झाला! बाबा केव्हां आतां उठतात! आठ वाजून गेले! रोज ह्या वेळेला जेवणें पार! ती देवील अजून खालीं आली नाहीं अन सगळें निवून गेलें ह्मणून सोंवळेकरी हाका मारतो,' असें ह्मणत चौकांत आली. तों गणपतरावांना पाहून एकदम आश्चर्यानें ती म्हणाली, 'कोण तें! गणपतराव? अं! केव्हां आलांत! बाबा कोठें आहेत. अहो, जेवायाला चला कीं. किती उशीर हा? तुह्मांला जेवायाचें नाहीं वाटतें? मला बाई भूक लागली. चला लवकर. बाबांना हांक मारा. कोठें आहेत बाबा?'

गणप०—(शांततेनें) बाबांना आतां फार दुःख झालें आहे.

गणपतरावांचें हें वाक्य ऐकल्यावरोबर सगुणाचें तें मंदस्मित गुप्त होऊन एकदम दुःखाची आणि काळजीची झांक तिच्या चेहऱ्यावर मारूं लागली.

सगुणा—काय म्हणतां? बाबांना दुःख झालें आहे! त्यांना वाईट वाटलें!! काय झालें हो गणपतराव?

गणप०—इतक्यांतच मीं कांहींच तुला सांगूं शकत नाहीं.

असें म्हणून तिचा हात धरून गणपतराव शेजारच्या एका खोलींत गेले व म्हणाले, 'सगुणा येवढें माझें ऐकतेस कां?'

सगुणा—काय बाई तें!

गणप०—अशा दुःखाच्या कठिण प्रसंगीं बाबांना होईल तितकें समाधान व धैर्य द्यावयाचें.

सगुणा—(मोठ्या उतावीळपणानें) होय. अलबत. तें काय विचारावें? तें आपले कर्तव्यकर्मच आहे. असें कसें तुम्ही परक्यासारखें विचारतां? बाबांना काय असें झालें? मी का कोणी परकी आहे?' असें बोलतांना सगुणाचे डोळे पाण्यानें अगदीं डवडबून आले.

गणप०—तसें नव्हे सगुणा. तुला माया नाहीं म्हणून मी असें बोललों, असें नाहीं; तर तुझ्या अंगांत तेवढा तारतम्य विचार आहे कीं नाहीं म्हणून मीं असें विचारिलें.

सगुणा—माझ्याकडून होईल तेवढी मी त्यांना दुःखाचा विसर पाडण्याला खटपट करीन.

गणप०—फार चांगलें. हें बघ सगुणा, मामा आतांच येथून निघून जात आहेत; आतां जें त्याना दुःख झालें आहे, त्यामुळें त्यांना या वाड्याचा या येळेला फारच तिटकारा आला आहे. ते तीर्थयात्रेला म्हणून कांहीं दिवस बाहेर जात आहेत. त्यांनीं एकट्यांनीं जाणें बरें नाहीं. एकटें जाणें चांगलें होय सगुणा? तुला कसें वाटतें?

सगुणा—एकटें! छे. छे. तें नाहीं चांगलें. पण माई जात असेल-ना बरोबर?

गणप०—माई नाहीं जात त्यांच्या बरोबर. त्यांचा व तिचा आतां वियोग होणार आहे.

सगुणा—कांहीं दिवसांपुरताच कीं नाहीं?

गणप०—छे. अगदीं जन्माचा.

सगुणा०—काय ? आतां अगदींच वियोग होणार ? तर मग या महदुःखाचें कारण—कांहीं विशेष भांडण किंवा—

गणप०—होय, तिचा कांहीं याच्याशीं संबंध आहे.

हें ऐकल्याबरोबर सगुणाच्या चेहऱ्यावरची उदासीनता कांहीं कमी झाली. मनांत संतोष वाटल्याचें चिन्ह दिसूं लागलें. असें होण्याचें कारण गणपतरावांच्या लक्षांत आलें.

गणप०—मग सगुणा तूं बरोबर जा. ते हिंडतील तितके दिवस त्यांच्या जवळ रहा. त्यांना दुःख होईल अशी अगदीं वागूं नकोस. या दुःखाचें स्मरण न होईल अशी अगदीं वागूं नकोस. त्यांना हिची गोष्ट काढण्याची संधि देऊं नकोस. अशा वेतानें वाग कीं सर्वतोपरि त्यांच्या मनाला सुख, समाधान, व शांति मिळेल. समजलीस ? तूं शहाणीच आहेस. तुला सांगणें नको. एवढें लक्षांत ठेव बरें कां ? माझे लाडके सगुणे, तूं जर एवढें काम उत्तम बजावलेंस, तर मला जगांत अति सुखाची जी गोष्ट ती तूं केल्याप्रमाणें आहे.

सगुणा०—फार बरें. (आत्मगत) आपली किती तरी माया मजवर! मीच वेडी ! उगीच अलीकडे मी म्हणत होतें कीं माझ्यावर रागावले आहेत म्हणून. (उघडपणें) पण कांहो, येवढा माईवर राग होण्याला झालें तरी काय ? ती कांहीं उद्दामपणानें बाबांना बोलली कीं आणखी कांहीं विशेष-

गणप०—होय कांहीं विशेष पत्र आहे; बरें तें असो. आतां काय त्याचें ? बाबांना या दुःखाचें कारण विचारूं नकोस. आतां सवड नाहीं. तूं परत आल्यावर सांगेन मी सगळें. जा तर; तूं आपली तयारी कर जा. मामींनीं सर्व तयारी केली. आटपा जेवणें लवकर. मामा नाहीं जेवणार वाटतें ?

'बरें' म्हणून सगुणा गडबडीनें आपल्या खोलींत जाऊन दासीला हांक मारून, ती ब्याग घे, हीं लुगडीं बरोबर घे, हीं पुस्तकें घे, बांध लवकर, असें म्हणण्यांत गर्क झाली.

गणपतराव वर गेले व एका खोलीच्या दारापाशीं उभे राहून दार उघडा म्हणून बाहेरून म्हणाले; यांच्या हांकेबरोबर जगदेवराव बाहेर आले. आंत हुजऱ्या सामान बांधीत होता. तेथेंच बाहेर ग्यालरींत ते उभे राहिले.

जगदे०—कायरे बाळा ? आणखी कांहीं सांगावयाचें कीं काय ?

गणप०—छे. तें कांहीं नाहीं आतां. आपण आतांच या मेलनें करवीराला निघणार कीं काय म्हणून विचारायाला आलों.

जगदे०—होय.

गणप०—तेथें उतरणार कोठें ? का माझ्या—

जगदे०—मी पाटणकराच्या येथें उतरेन. ते माझे स्नेही आहेत. झालें का ? एवढेंच ना ?

गणप०—झालें एवढेंच. आणखी सगुणा आपल्याबरोबर येत आहे

जगदे०—सगुणा !!

गणप०—तिच्यानें कांहीं आतां येथें एकटें राहणें होणार नाहीं. ती आपल्याबरोबर असली म्हणजे बरें. मीं व यावें पण मला मागें.....

जगदे०—बरें पण तूं आणि ती राहतां म्हणजे बरें झालें असतें.

गणप०—सध्यां तिला येथें चैन पडणार नाहीं.

जगदे०—बरें तर. येऊंदे.

गणप०—आहे, तिची तयारी आहे. आतां साडेनऊ वाजतां निघाव. यावें. पण जेवण करून.....

जगदे०—छे. छे. आतां मला भूक नाहीं. घांसभर देखील नको.

गणप०—बरें तर, मीं आत्तां क्षणभर खालीं जाऊन पुन्हां वर येतों.

जगदे०—अरे, दमधर. हें तूं सगुणाला सांगितलेंस कीं काय ?

गणप०—नाहीं. मुळींच नाहीं. आपण कांहीं कारणानें जाणार एवढेंच सांगितलें.

जगदे०—वः ! फार शहाणा आहेस रे बाळा. फार चांगलें केलेंस ! असें तुटक तुटक म्हणून गणपतरावांच्या पाठीवरून त्यांनीं प्रेमानें हात फिरविला.

गणप०—(डोळ्यांत पाणी अणून) मामा, तुमच्यावर असा दुःखद प्रसंग आला आणि त्याला कारण मी, म्हणून मला फार वाईट वाटतें .

जगदे०—नाहीं, तें कांहीं नाहीं. अनेक दुःखद विचारांनीं माझें मन व्याप्त झालें आहे आतां मला कांहीं सुचत नाहीं. सध्यां तूं केलेंस तें ठीक केलेंस.

असें म्हणून जगदेवराव आंत खोलींत गेले. गणपतराव, खालीं केलि-

मंदिरांत जेथें चंपावाई, निहालकुवर ऊर्फ आनंदीबाई चव्हाण होती, तेथें आले.

ती तेथें जमिनीवर तशीच दुःखानें विव्हल होऊन लोळत अगदीं मुर्च्छा आल्याप्रमाणें स्तब्ध पडली होती. गणपतरावानें बाहेर जाऊन तिच्या दासीला हाक मारून आणिलें, व " माईसाहेबांची प्रकृति एकदम बिघडली त्यांना हाताला धरून नेऊन त्यांच्या शय्यागृहांत निजीव जा. त्यांना रात्रीं कोठें उठून बाहेर जाऊं देऊं नकोस. संभाळ कांहीं झालें तर, जबाबदार तूं आहेस. सकाळीं मी येईपर्यंत त्यांच्या जवळून हालूं नकोस. अगदीं जवळ बैस " असें सांगितलें.

माईसाहेबांची ही अवस्था पाहून दासी अगदींच घाबरून गेली व 'हें काय बाई झालें ? काय झालें ? कशानें झालें ? ' असें म्हणत त्यांना उठवून, तिनें त्यांना हाताला धरून उभें केलें.

आमच्या बाईसाहेबांना मूर्छा आली नव्हती. त्या लागलींच उठून उभ्या राहिल्या. तिचे सर्व केश विखरले होते. बुचडा सुटून सगळे केश गळ्यांतपाठीवर, तोंडावर लोळत होते. रडून रडून डोळे लाल झाले होते. तोंड अगदीं सुकून काळें ठिक्कर पडलें होतें. तिचा हृदयभाग नेत्रोदकानीं अगदीं ओला चिंब झाला होता.

निहालें०—(उठून) चल बाई, मला घेऊन चल. मला निजूं दे लवकर. माझे डोकें अगदीं तापून गेलें आहे.

असें म्हणून दासीच्या खांद्यावर मान टाकून तिचा हात धरून हळू हळू जातां जातां तिनें गणपतरावांकडे पाहिलें आणि म्हटलें 'ते गेले का ? '

गणप०—नाहीं अजून. आतां अर्ध्या तासाचे आंत निघतील.

निहाल०—त्या पथिकाश्रमाच्या आगींत कोणी दगावलें नाहींना ?

गणप०—कोणी नाहीं बरें.

निहाल०—फार चांगलें. मला बरें वाटलें हें ऐकून.

गणप०—त्या पथिकाश्रमाचा मालक जोतिबा अतिशय भाजून निघाला. तो अत्यावस्थेत त्या गांवांत आपल्या आईच्या खोपट्यांत पडला आहे. परंतु तो जगेल असें वाटतें.

निहाल०—फार बरें. बरा होवो लवकर. गरीब बापडा ! मी जाऊन निजतें आतां गणपतराव.

गणप०—उद्यां तुमच्यावरोबर घटकाभर मला बोलावयाचें आहे.

निहाल०—हो, पाहिजे तेव्हां. जाऊं तर आतां ? निजूं जाऊं ?

गणप०—हो. खुशाल निजा.

तिची अशी शोचनीय स्थिति पाहून गणपतरावांना फार वाईट वाटलें. ते आरामखुर्चीवर, आतां पुढें काय करावें, या विचारांत बसले होते.

इतक्यांत पहाऱ्यावरच्या घड्याळांत नऊ टोके पडले. लागलींच सगुणा आपली ब्याग दासीच्या हातांत देऊन तेथें आली व ह्मणाली 'येतें गणपतराव. आह्मीं निघालों पहा. संभाळा प्रकृतीला, आणखी काय सांगूं ? येतें अं. माई कोठें आहे ? तिला भेटून येतें. तसं जाणं बरें नव्हे, नाहीं गणपतराव ? आत्तां यतें जाऊन.

गणप०—नको. नको. ती आतां भेटणार नाहीं; ती रागानें अगदीं लाल झाली आहे. तुझ्या जाण्यानें उगीच तिचा राग अधिक मात्र वाढेल. आतां नको. मग पाहूं.

सगुणा०—बरें तर तुमच्या मर्जीप्रमाणें. मला पाहून कदाचित् जास्तीच,—

गणप०—हो खरेंच.

सगुणा०—बरें तर यतें अं. नमस्कार करतें.

गणप०—आशीर्वाद ! मामांना संभाळ. दुसरें काय ?

सगुणा०—इं कां मला सांगायाला पाहिजे ?

हें असें बोलतात तों जगदेवराव आपल्या बरोबर येणाऱ्या हुजऱ्या सहित तयारीनें तेथें आले व ह्मणाले,—

'गणू, संभाळ बाळा सगळें. जपून रहा. ह्या घे किल्ल्या. आतां तिचा शेवट ऐकणें माझ्या कपाळीं नको आणूंस. (डोळ्यांत पाणी आणून) तुझ्यावर सोंपवितों ..., पण तूं निर्दय होऊं नकोस. तिच्यावर माझें केवढें प्रेम हें तुला टाऊकच आहे. कसें झालें तरी तीनें माझें अन्न खालें आहे. तिचें इमान तिच्याजवळ. मी तर तिला निष्कपटानें वागविलें. फार दिवस जवळ असलेल्या जनावरासुद्धां मायेमुळें सोडवत नाहीं! इच्य समागमें मी किती तर सुखाच्या घटका घालविल्या!! तेव्हां तिच्या जीवाला आपाय करूं नकोस ह्मणजे झालें.

हें बोलल्या बरोबर त्यांचा गळा दाटून आला. त्यांच्यानें पुढें कांहींच बोलवेना, मुखानें बोलवेना तेव्हां त्यांनीं कांहीं हस्तविक्षेप केला.

गणप०--फार चांगलें मामा. आपल्या मर्जीप्रमाणेंच सर्व करीन. आपण अगदीं काळजी सोडा. तिच्या केंसाला धक्का लागणार नाहीं.

गणपतरावांनीं आपल्या मामांस नमस्कार केला. त्यांनीं आशीर्वाद दिला. गाडींत बसण्याला आपल्या कन्येसह ते बाहेर गेले. गाडीजवळ चाकर नौकर सर्व जमले होते. त्यांनीं आपल्या अन्नदात्यास लवून मुजरा केला; आपल्या सरकारास असे दुःखी पाहून सर्वांस फारच वाईट वाटलें. 'संभाळून रहा. गणपतरावाचें ऐकत चला,' असें सर्व नोकरांस सांगून जगदेवरावांनीं गाडी हांकण्यास कोचमनाला सांगितलें.

गाडी दिसेनाशी होईपर्यंत गणपतराव तेथेंच उभे राहिले होते. मग 'गेले मामा! काय हा दुर्धर प्रसंग! असें कधीं तरी होणार असें मला वाटलेंच होतें,' असें ह्मणून वाचनगृहांत येऊन ते एका आरामखुर्चीवर पडले.

अशा स्थितींत बराच वेळ गेल्यावर त्यांनीं पहाऱ्यावरच्या जमादाराला बोलावलें आणि 'स्टेशनावर जाऊन ऐवढी तार करणें आहे. कोणी तरी शिपाई किंवा स्वार द्या. त्यानें ही तार घेऊन मास्तराजवळ द्यावी व तेथें दोन. अडीच तास वाट पहात बसावें व उत्तर घेऊन यावें,' असें ह्मटलें. 'बरें साव, स्वार पाठवितों, तार द्यावी' असें जमादार ह्मणाल्यावर गणपतराव टेबलाजवळ जाऊन लिहावयाला बसले. ती तार अशी होती.

'गणपतराव वकील यांजकडून. मुक्काम निहालगड.
मिस्तर लानसेट यांस. कोल्हापुर, न्यूरोड. नंबर ४४९.

तुमच्या माहितीचा, कोणी मतिभ्रम (ह्मणजे वेड) रोगाची परीक्षा करण्यात निष्णात असा डाक्टर असल्यास कळवा. कांहीं गुप्त कामांत त्यांचा सल्ला पाहिजे. उत्तर जरूर जरूर.'

ही तार एका लिफाफ्यांत घालून वर मोहर करून दोन रुपये व हा लिफाफा त्यांनीं त्याच्या हातांत देऊन आतांच रवाना करा ह्मणून त्यांस त्यांनीं सांगितलें.

जमादार 'जी हुकूम' ह्मणून सलाम करून बाहेर गेला. इकडे चौकींत आमच्या सर्व शिपायांचें, चाकर नौकरांचें 'कौन्सिल' भरलें. 'सरकार अशा घाईनें असे दुःखीकष्टी होऊन काढ गल.' ह्मण जो तो ह्मणं ला

गला. कांहीं म्हणाले, 'त्यांचा कोनी चुलत भाऊ ममईस हायत ते लई आजारी पडल्याती म्हणून भेटाया गेले.' कोणी म्हणाले, 'ते नव्हंगा बंकजवळ सरकारचे रुपये लई हाईत आन् ते बंकन समींदरांत बुडो मारली म्हन. आन् ती गणपतरावांनीं बातमी आनली. त्या पायीं गडबडीनें गेल.' ती बंकी कानडी आना सरकारची लइ प्यारी ! येंत्रा समदा पैंसा तीजवळच ! ! तिनें असा दगा दिला तवा त्वांड अशी लहान करून धांवत गेलं ! या रांडा अशाच बगा ! ! असें प्रत्येकाचें एक एक नवीनच विचार आले. अखेर 'काय बी असूं; गेल खरे' असें म्हणून तमाखू ओढीत ते स्वस्थ बसले.

कालरात्रीं थोडीशी झोंप लागते न लागते तोंच त्या अग्नीच्या ज्वाला पाहून घाबरून गणपतराव उठले. त्या वेळेपासून जोतिबास वांचविण्यांत त्यानें निवेल तेवढें सामान काढण्यांत, ती आग विझविण्यांत त्यांना फारच भ्रम झाले; तेव्हांपासून ह्या वेळपर्यंत पांच मिनिटें सुद्धा विसावा नाहीं, मग झोंप कोठली ? आतां पुढें कसें करावयाचें यासंबंधानें विचार करीत ते या खुर्चीवर पडले असतां, त्यांना तेथेंच झोंप लागली. ते पुन्हां आंत जमादार आला व त्यानें 'सरकार' म्हणून हांक मारल्याबरोबर जागे झाले. जमादारानें एक तांबडें पाकीट त्यांच्या हातांत दिलें. मघां तार पाठविली त्यानें हें उत्तर होय. तें असें होते.

'म्हणाल तेव्हां सेवेशीं तत्पर. डाक्टर लक्ष्मीकांत घर नंबर ५५० लव्ह लेन. उत्तम.'

ही तार वाचून तिची घडी करितां करितां ते म्हणाले,—

'जमादार, उद्यां सकाळींच एक मनुष्य आणखी एक निरोप घेऊन जाण्याला तयार असूंद्या.'

जमा०—जी हुकूम. किती वाजतां स्वार हजर ठेवूं ?

गणप०—जितकें लवकर होईल तितकें चांगलेंच. बरोबर सहा वाजतां त्याला येण्याला सांगा. बरें, जमादार, रामाला पाठवा; माझे अंथरूण कोठें घातलें आहे त्यानें ?

जमा०—जी हुकूम. पाठवितों.

जमादाराच्या हुकुमाप्रमाणें रामा आला. आपल्या नेहमींच्या खोलींत

तच बिछाना घातला आहे, असें त्यानें सांगितलें. मग मोठ्या दुःखानें एक सुस्कारा टाकून गणपतरावजी निजले.

सकाळीं पाठविण्याची तार अशी होती.

'डाक्टर लक्ष्मीकांत यांस:—तांडीं जरूरीच्या अंतस्थ कामाकरितां जरूर निहालगडास यावें.'

यामप्रमाणें डाक्टर लक्ष्मीकांत यांस पाचारण केलें.

भाग ३७ वा.

आमच्या बाईसाहेबांना रात्रीं चांगली गाढ झोंप आली. खुनी मनुष्याला कधीं कधीं फांशी देण्याच्या पूर्वरात्रीं, सकाळीं 'जेलर' वधस्तंभाकडे नेण्याला येईपर्यंत गाढ झोंप लागते.

नारायणराव चव्हाणाला सोडल्यापासून व हें दुसरें लग्न झाल्यापासून तिच्या जिवाला आजच्या इतकी शांतता कधींच वाटली नाहीं ! डोक्यावरचें मोठें ओझें उतरल्यासारखें तिला आज हलकें वाटूं लागलें ! ज्या गोष्टीची भीति, ती तर घडली; जो प्रसंग येऊं नये म्हणून एवढी काळजी होती, तो तर आला; मग आतां काय त्याचें ! म्हणून तिला शांतपणें झोंप आली, हें खरें.

ती आपल्या शय्यागृहांत परांच्या गादीवर शाल पांघरून उशाशीं शामदान जळत ठेवून दासीला तेथेंच खालीं निजायला सांगून स्वस्थ निजली. इतके दिवस गणपतरावांची तिला फार भीति वाटत होती, तीं आतां नाहींशी झालीं. 'आतां ते काय करणार ? फार झालें तर कोठें तरी लांब नेऊन टाकतील कीं नाहीं ? एवढेंच. आणखी काय करतात ?' असें तिला वाटलें.

राजकीय बंदिवानाप्रमाणें आपल्याला हे उतरतील, अशी तिची पूर्ण समजूत. व त्यामुळें ती अगदींच निष्काळजी होती ! सकाळीं उठून प्रातर्विधि उरकून चहा घऊन थोडी ताजीतवानी होऊन एक तासभर ती एक इंग्रजी कादंबरी वाचीत बसली. मग वेणीफणी करून आंग धुऊन फराळ करून ती आपल्या मंदिरांतून इकडे तिकडे फिरूं लागली. त्यांतील सर्व वस्तू पाहून तिला वाटलं. 'आतां ह्या वस्तू मजजवळून जाणारना ? आतां हे अलंकार असेच टाकून जाऊं काय ? तें कां पण ? सर्व आगावर घालून बसतें म्हणजे पाहिजे तेव्हां मला पाहिजे तिकडे नेऊं द्या. मजबरोबरच ते राहतील. अंगावरचे तर कोणी काढीत नाहीं ?' असें म्हणून दागिन्यांची पेटी काढून, सर्व अलंकार अंगावर घालून, ती एका मोठ्या आरशासमोर जाऊन उभी राहिली !

रात्रीच्या विश्रांतीनें तिच्या गालावर पूर्ववत् गुलाबी छटा आली. तिचे

नेत्र पहिल्याप्रमाणें सतेज दिसूं लागले. 'काय बाई, काल पहा माझा चेहरा किती सुकला होता तो ! आज मात्र पहिल्याप्रमाणें दिसतो. काय मेले सगळे नेतील. पण माझें हें रूप तर कोणीं हिराऊन नेत नाहींना?' असें ती झगाली !

गणपतराव सकाळींच स्नान करून चहा घेऊन चिरूट ओढीत वाचनगृहांत आपल्या मामाच्या आरामखुर्चीवर पडले होते; व 'मी आतां डाक्टर लक्ष्मीकांत यांचा सल्ला घेतों. या एकुणिसाव्या शतकांत डाक्टर आणि लॉयर (वकील) यांखेरीज होणें नाहीं सर्व जगांतील व्यवसाय यांच्यावरच अवलंबून' असें आपल्याशींच ते झगाले.

अकरा साडेअकरांचे सुमारास शिपायानें करवीराहून डाक्टर आल्याची वर्दी दिली. 'आंत इकडे बोलाव,' असें गणपतराव झगाले. डाक्टर साहेब आंत आले. या गृहस्थाचें वय अजमासें चाळीस पंचेचाळीस वर्षांचें दिसत होतें. हा गृहस्थ अंगानें अगदीं सडपातळ होता. याच्या शरीराची काडी उंच असून एकेरी हाडाचो होती. यानें उदी रंगाचा कोट व पाटलून घातली होती. या पाटलुनीनें याच्या उंचींत थोडी भर पडल्यासारखी होऊन, त्यामुळें हा होता त्यापेक्षां अधिक उंच दिसे. गणपतरावांसमोर आल्या बरोबर यानें चटकन् खिशांतून वाच काढून प्रथम पाहिलें; मग 'गुड् मानिंग' वगैरे करण्याची तयारी !

गणपतरावांनीं त्यास समोरच्या खुर्चीवर बसा झगून खूण केली. तो कांहीं न बोलतां, आपल्याकडेच टक लावून पाहत आहे, यावरून आपणच तो वेड लागलेला मनुष्य, असें मनांत येऊन हा आपल्याकडे पाहत आहे, असें गणपतरावांना वाटलें.

मग डाक्टर लक्ष्मीकांत झणाले, 'आपलीच प्रकृति पाहण्याला मला बोलाविलें काय ? नसेल-तर-'

गणप०—नाहीं.

डाक्टर लक्ष्मीकांतानें विलायतेहून मुद्दाम आणविलेलें आपलें सोन्याचें वाच खिशांतून काढून पाहिलें आणि झणाला, 'आह्मा डाक्टर लोकांचा टाईम किती प्रेशस (मौल्यवान) आहे हें, आपणास सांगणें नको. इतक्या गडबडींत मला बोलाविलें, तेव्हां केस डेंजरस असेल,

असें, समजून पहिल्याच गाडीनें हा स्थेथास्कोप हा फीवर थरमामिटर व पाकेट केस घेऊन निघून गडबडीनें आलों. '

आतां विषय कसा काढावा, असा विचार करीत गणपतरावांनीं दुसरा चिरूट पेटविला. मग बराच वेळ गेल्यावर ते म्हणाले, ' डाक्तर साहेब, आपण आलां फार चांगलें झालें. खरोखर मी आपला फार आभारी आहें. एका मोठ्या कठिण कामांत आपली मसलत पाहिजे आहे. तो प्रसंग माझ्या अति निकट मनुष्यावर आलेला आहे.

हें भाषण ऐकिल्यावरोबर आपल्या डाक्तरीबाण्याची जी एक ऐट आणून ते बसले होते, ती त्यांची ऐट कमी झाली. ही गोष्ट आपणास लवकर समजावी, अशी त्यांना फारच इच्छा झाली.

गणप०—मी सांगतों; हें काम फार नाजूक आहे. त्यांत गुप्त गोष्टीचा फार संबंध आहे. ही गोष्ट बाहेर फुटतां उपयोगीं नाहीं.

डाक्तर—काय, इतकी नाजूक आहे ?

गणप०—होय. ही गोष्ट बाहेर फुटतां उपयोगींच नाहीं.

डाक्तर—अलबत—आमच्याकडे अशा सिक्रेट (गुप्त) गोष्टी फार येतात. त्या आम्हाला रिव्हील (फोडतां) करतां येत नाहींत रिव्हील करणें म्हणजे आमच्या धंद्याला कमीपणा आहे. बरें, गो ऑन्.

गणप०—आपण, ' बुद्धिभ्रंश ' या विषयावर विशेष परिश्रम केले आहेत, म्हणें ?

डाक्तर०—होय. मी मानसिक रोगाचीच नेहमीं चिकित्सा करीत असतों !

गणप०—मग आपणांला त्या बुद्धिभ्रंश झालेल्या माणसांच्या नानातऱ्हेच्या चमत्कारिक कृती व गोष्टी पाहण्याला व ऐकण्याला मिळत असतील ?

डाक्तरांनीं होय म्हणून डौलानें मान हालविली.

गणप०—मी जी आतां हकीकत सांगणार, ही माझी स्वतःची नव्हे. आपण ती कोणाजवळ सांगणार नाहीं, असें पक्कें समजून सांगतों.

डाक्तरांनीं मघांसारखीच मान हालविली, पण जरा उद्धटपणानें. ' माझें लक्ष आहे, चालूंद्या ' असें ते फार निष्काळजीपणानें मग म्हणाले.

गणपतरावांनीं आपली खुर्ची जरा पुढेंच घेतली आणि काल रात्रीं निहाल-

कुवरबाईनें केलीमंदिरांत जगदंबरावांदेखत जी हकीकत सांगितली, तीच यांनीं त्यांना सांगितली. डाक्तर त्यांच्या तोंडाकडेच पहात होते. मध्यें मध्यें ते हंसत. गगनपुरी येथील हकीकत जेव्हां गणपतराव सांगूं लागले, तेव्हां डाक्तर जरा मोठ्यानें हंसले. पण आपणाला यापासून आश्चर्य वाटलें, असें मुळींच त्यांनीं दाखविलें नाहीं.

जगदंबरावांनीं जितकी हकीकत ऐकिली, तितकीच गणपतरावांनीं यांना सांगितली. नारायणराव नाहींसे झाल्याचें व त्याबद्दल कोणावर कांहीं वहीमें आल्याचें त्यांनीं मुळींच सांगितलें नाहीं.

गणपतरावांचें सांगणें संपल्यावर डाक्तरांनीं मोठ्यानें हुंकार देऊन मान हालविली.

गणप०—हो. यापेक्षां कांहीं अधिक सांगावयाला पाहिजे, असं मला नाहीं वाटत. एवढें पुरें आहे.

डाक्तर—तुमच्या मनांत या स्त्रीला मतिभ्रंश झाला आहे व त्यामुळें तिच्या हातून जे कांहीं अपराध झाले असतील त्याबद्दल ती जवाबदार नाहीं, असेंच ठरवायाचें कीं नाहीं ?

यावर हें निष्पादन पाहून गणपतरावांना फार अचंबा वाटला.

गण —होय. मतिभ्रंश या सबबीखालीं ती जर मुक्त होत असेल, तर ति ो झणण्याला मी कबूल आहे.

डाक्तर—'मुक्त' झणजे कायद्याच्या कचाट्यांत सांपडूं नये, हेंच कीं नाहीं ?

कायद्याचें नांव ऐकिल्याबरोबर गणपतरावांना धस् झालें. खून केल्याचा इच्यावर आरोप ? तेव्हां आतां पुढ काय बोलावें ? त्यांनीं होय झणून हळूंच उत्तर दिलें.

डाक्तर—या कामांत माझा विशेष उपयोग होईल कीं नाहीं याची शंकाच वाटते ! आतां आपल्याखातर त्या बाईला मी पाहतों. माझी नाहीं. पण ती वेडी असेल, असें मला नाहीं वाटत.

गणप०—कारण ?

डाक्तर—कारण तिनें जें कांहीं केलें त्यांत मतिभ्रंशतेचा प्रकार मुळींच दिसत नाहीं. ती आपल्या घरून पळून गेली खरी, पण तिला तें घर आवडत नव्हतें ; व दुसरें चांगलें घर तिला पाहिजे होतें, झणून त्यांत

कांहीं वेडेपणाचें नाहीं. एक नवरा जिवंत असतां, खोटें सांगून तिनें दुसरा केला. त्यानें तिला पैसा मिळाला, श्रीमंत झाली, मानसन्मान वाढला, हेंही कांहीं वेड्याचें कृत्य नव्हे. जेव्हां हें सर्व आपल्या अंगावर येतें, असें तिला वाटलें, तेव्हां तिनें त्याच्या निरसनार्थ उपाय योजिले, तेही मोठ्या शहाणपणाचेच ; यांतही कांहीं वेडेपणाचें नाहीं. अखेर ती स्वतास वेडी म्हणते, हें देखील शहाणपणाचेंच कृत्य !

गणप०—पण वंशपरंपरा चालत आलेली कांहीं मतिभ्रंशता—

डाक्तर—होय. पण आपण सांगितलेल्या हकीकतीवरून तर तसा कांहीं प्रकार दिसत नाहीं. अशा केसला मतिभ्रंशतेचें कृत्य, असें कोणीच म्हणूं शकणार नाहीं. आतां, खरें म्हणाल तर यांत एवढेंच ; तुमच्या हातून होईल तर तिला तिच्या पहिल्या नवऱ्याकडे पाठवा, हाच उत्तम मार्ग—त्यानें तिला घेतलें तर फारच उत्तम.

गणप०—(मोठ्या आश्चर्यानें त्याजकडे पाहून) तिचा पहिला नवरा जिवंत नाहीं; पुष्कळ दिवस त्याचा पत्ता नाहीं, व तो मेला अशी माझी खात्री आहे.

डाक्तर—या बाईच्या पहिल्या नवऱ्याचा पत्ता नाहीं ! तो मेला असें म्हणतां ! गणपतराव, असें चोरून ठेवूं नका. मला नाहीं तुम्ही हें सांगितलें, मला जर पूर्ण माहिती मिळणार नाहीं, तर माझें काम चालणार नाहीं. मला सर्व कळलें पाहिजे. बरें तर तिच्या पहिल्या नवऱ्याचें काय झालें तें सांगा पाहूं.

गणप०—त्याच्याबद्दल मला कांहीं माहिती नाहीं, म्हणून मीं पहिल्यानेंच सांगितलें नाहीं ?

डाक्तर—पण तुमच्या चेहऱ्यावरून तुम्हांला कांहीं डौट—आय मीन संशय येऊन तुम्ही सांगण्याचें टाळतां, असें उघड दिसतें.

गणपतरावांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं.

डाक्तर—जर आपणांला माझा उपयोग करून घेणें असेल, तर मला सर्व कळलें पाहिजे. तिचा पहिला नवरा नाहींसा झाला नव्हेका ? तर तो केव्हां व कसा हें सांगा पाहूं.

गणप०—आपल्यावर सर्व जोखीम आहे. आमच्या कुळाला चा-

चौघांत कलंक लागण्यासारखें आपण करणार नाहीं, असा भरंवसा देवून सांगतों.

गणपतरावांनीं नारायणरावाच्या नाहींसे होण्याची व त्याबद्दल आपला कोणावर संशय आहे, याची हकीकत सांगितली.

डाक्टर लक्ष्मीकांत यांनीं पाहिल्याप्रमाणं शांतपणानें सर्व ऐकून घेतलें.

'माझ्या वृद्ध मामाच्या अब्रूला कळक आणूं नका. ही गोष्ट घटकाभर होऊं देऊं नका. आतां आमची अब्रू आपल्या हातांत आहे. आमच्या मामाला वृद्धावस्थेंत फार दुःख झालें आहे.' असें गणपतराव मोठ्या नम्रपणानें म्हणाले.

डाक्तरांच्या चेहऱ्यावरून ते या बोलण्याला अनुकूल किंवा प्रतिकूल आहेत, हें मुळींच समजेना. गणपतरावांचें बोलणें संपल्याबरोबर त्यांनीं उठून उभे राहून पुन्हां खिशांतलें सोन्याचें घांच पाहिलें.

डाक्तर—आतां वीस मिनिटेंच राहिलीं. यापेक्षां जास्ती वेळ मला नाहीं. आपली मर्जी असेल, तर त्या बाईला मी पाहतों. तिची आई 'म्याडहौस' मध्यें भेली म्हणतां नाहीं ?

गणप०—होय. तेथेंच. आपण एकटेच जाऊन पाहून आलां, तर बरें होईल.

डाक्तर—आपली मर्जी असेल तशी.

गणपतरावांनीं एका दासीला हांक मारून डाक्तरांना माहसाहेबांकडे घेऊन जाण्याला सांगितलें.

सात आठ मिनिटांचे आंतच डाक्तर परत आले व म्हणाले——

'त्यांच्या बरोबर माझें बोलणें झालें. माझे प्रश्न त्यांना समजले. उत्तरेंही त्यांनीं चांगलीं दिलीं. तिच्या अंगीं अदृष्ट मतिभ्रंशता आहे ! ही एरवीं साधारण मनुष्याला कळणार नाहीं. त्याला डाक्टरच पाहिजे ; तोही असा तसा नाहीं; याच विषयावर विशेष परिश्रम केलेला माझ्यासारखा पाहिजे. या वेडेपणाची शंका जन्मांतून एक दोन वेळां आली तर फार. कदाचित् यापासून पूर्ण वेड बनण्याचा संभव आहे सध्यां. ती कांहीं वेडी नाहीं. पण हा आजार वंशपरंपरेनें आलेला आहे. तेव्हां हा केव्हां इला जडेल याचा नेम नाहीं. मानसिक श्रम अति झाले, तर हा आजार इला होईल.

सध्यां तिनें वेडयाचें सोंग घेतलें आहे, व त्याला शहाणपणाची पूर्ण मदत आहे. गणपतराव, अशी स्त्री फारच भयंकर बरें !'

'तुमच्या मनांत जो संशय आहे, त्यावर मी आतां वादविवाद करीत नाहीं. पण वेडाच्या लहरींत तिनें नारायणरावाला मारिलें, असें कोर्टांत सिद्ध होणें फारच कठिण.'

गणप०--छे. छे. तूं मनांत नका आणूं डाक्तर. अपराध खरा. पण कोर्टाचें नांव नका घेऊं. त्यांत आमची अब्रू जात आहे.

डाक्तर—खरोखरच गणपतराव ! पण गणपतराव, असे अपराध छपविण्याला मी कसा मदत करूं ! तिनें खून केला. अशी जर माझी खात्री झाली असती, तर मी आपणांला मदत केली नसती. पण तसें मला मुळींच दिसत नाहीं. माझ्याकडून होईल तेवढी मी मदत करीन.

असें झटल्याबरोबर गणपतरावांनीं ' फार बरें, फार बरें ' झणून खिशांतून कांहीं काढून डाक्तरांच्या हातांत दिलें. त्यांनीं मुकाट्यानें तें खिशांत घातलें व हंसले.

गणप०—आपले उपकार मी विसरणार नाहीं. पुन्हां योग्य प्रसंगीं–

डाक्तर—ओ पांच मिनिटेंच राहिलीं. मी एक पत्र लिहून देतों.

असें झणून ते टेबलाजवळ जाऊन बसले. व सात मिनिटांच्या आंतच खरखर एक पत्र खरडलें. नोटपेपर पाउपोट भरला. तें एका पाकिटांत त्यांनीं घालून, बंद न करितां यांनीं गणपतरावांच्या हातांत दिलें. त्या पाकिटावर हा पत्ता इंग्रजींत लिंहिला होता.

" **डाक्तर**—कैकुसरू नारिमन एम् डी., हौस सर्जन, लुनाटिक् आसायलम्, आव्हा-ब्रह्मदेश. "

खिशांतला रेशमी हातरुमाल काढून त्याला डाक्तर हात पुशीत आहेत, तों गणपतरावांनीं त्यांच्याकडे साशंकवृत्तीनें पाहिलें.

हें पाहून डाक्तर लक्ष्मीकांत झणाले, ' गणपतराव, हा गृहस्थ माझा परममित्र आहे. त्याची माझी कालेजमधली ओळख. फार संभावित आहे. त्याच्या ताब्यांत असे मोठ्या घराण्यांतलेच ' पेशंट ' (रोगी) असतात. इची व्यवस्था तो फार उत्तम ठेवील.

गणपतरावांच्या मनांत कांहीं बोलावयाचें आलें होतें, पण त्या डाक्त-

राचा तो अधिकारदर्शक असा अंगविक्षेप पाहून त्यांचें बोलणें तसेंच राहिलें.

डाक्तर—आतां तिच्या आयुष्यांतलें वैचित्र्य नाहींसें झालें म्हणून समजा. तिच्या कांहीं गुप्त गोष्टी असतील त्या तिच्या जवळच राहतील. तिच्या हातून अपराध झाले हे एवढेंच. जास्ती होण्याचा संभव आतां बिलकूल नाहीं समजा. अशा माणसाला तुम्ही जिवंत पुरलें तर त्यापासून कांहीं विशेष फायदा आहे, असें मुळींच नाहीं. खरा फिजिऑलिजिस्ट मीं केलें यापेक्षां अधिक कांहीं करूं शकणार नाहीं. आतां मी दहा मिनिटांपूर्वी पाहून आलों. त्या स्त्रीवर भरंवसा ठेवायाचा म्हणजे आज 'फिजिऑलजी'ला (प्राण्यांचे गुण व धर्म यांचें शास्त्र) मिथ्या म्हटलें पाहिजे. मी तिच्या बरोबर बोलत असतांना तिनें जर एकदम उठून त्या चिमुकल्या दोन्ही हातांनीं माझा गळा दाबून मारण्याचें मनांत आणिलें असतें, तर ती तें सहज करूं शकती !

गणप०—तुम्ही कां आलां याचा तिला संशय आला तर ?

डाक्तर—' मी आपल्या आईसारखी वेडी आहें, असें तुम्हांला वाटतें ? व तसें कांहीं चिन्ह आहे कां तें पहाण्याला आलां होय ? ' असें ती मला म्हणाली बरें. 'गुड डे' (सलाम). गणपतराव, दहा मिनिटें जास्ती झाली, आतां निघालेंच पाहिजे, म्हणजे वेळेवर गाडी मिळेल. बरें. गुड् डे.



भाग २८ वा.

आतां बाकी राहिलेल्या कामाचा कसा निकाल करावा, म्हणून गणपतराव वाचनगृहांत एका खुर्चीवर, कोंपर गुडघ्यावर टेकून, तळहातावर हनवटी टेवून, विचार करीत बसले होते.

या तरुण गृहस्थानें या दुष्ट स्त्रीच्या अपराधाचा पत्ता लाविला, त्यानंतर न्यायाधीश होऊन तिचा इनसाफ केला; व आतां हाच 'जेलर' होऊन तिची देखरेख करीत आहे. हें जेलरचें काम, हें पत्र ज्यानें त्यास देईपर्यंत जिकडचा कैदी तिकडे व्यवस्थेनें जाईपर्यंत, याचें संपत नाहीं.

'आपल्याला जरा बराच लांबचा प्रवास करावयाचा आहे. येथून होईल तितकें लवकर निघणें बरें. आज संध्याकाळच्या गाडीनें निघणं म्हणजे, याकरितां आपली जरूरीची तयारी करा, काय सामान घेणें असेल ते बांधून द्या.' अशी एक चिठी त्यांनीं आमच्या बाईसाहेबांकडे पाठविली. ती अशा धांदलीनें, व गडबडीनें सामान बांधण्याचें तिच्या दासीला फारच संकट पडलें. तिला कांहींच सुचेना. निहालसुंदरबाईही तिला मदत करीत होती. अंगावरच्या दागिन्यांखेरीज बहुमोल आलंकारांपैकीं बरेच अलंकार शालजोडीच्या पोटीं, शालूच्या पोटीं, पैठणीच्या पाटीं, इतर लुगड्यांच्या पोटीं, व दुसऱ्या अनेक कापडांच्या पोटीं जिनके इकडून नेण्यासारखे होते, तितके तिनें उपटून नेण्याची तजवीज केली. तिचा हें घेऊं तें घेऊं, असें झालें. अमुक एक जिन्नस सोडावा, असें तिला वाटेचना या बहुमोल उपभोग्य पदार्थांतून तिचें मनच निघेना. त्या तसविरा देखील घेण्याचें तिच्या मनांत होतें. त्यांतून त्या अनंगरंगांतील चवऱ्याशी आसनें दाखविणाऱ्या उत्तम तसविरांवर तिचें मन फारच बसलें. त्या तसविरा घेऊन जाण्याचें तिच्या मनांत फार होतें. पण एवढ्या मोठमोठ्या तसविरा छपवून कशा नेतां येतील? अखेर 'राहूंदे बाई, त्या का पचलात?' असें ती मोठ्या उदासीनतेनें म्हणाली.

गणपतराव 'ट्र्याव्हलर्स गाईड' (प्रवाशांकरितां मार्गदर्शक पुस्तक) व ब्याटिनगिअरीचें 'ब्रह्मदेशाचें वर्णन,' हीं पुस्तकें घेऊन आगगाडी कोठवर आहे, आगबोटीनें किती जावें लागतें, पुढें आगगाडी कोठवर आहे वगैरे जरूरीची माहिती पहात बसले होते. असा बराच वेळ घालविल्यावर

पुण्याहून धोंड-मनमाड लाइनीनें भुसावळ व तेथून खांडव्याहून जबलपुराबरून ईस्टइंडिया रेल्वेनें कलकत्त्यास जावें. तेथून चार पांच दिवस आगबोटींत बसून रंगूनला जावें, व मग पुन्हां रेल्वेनें आव्हाला जावें, असें त्यानीं ठरविलें.

त्यांच्या बरोबर हा त्रासदायक प्रवास करण्यांत, रात्रीच्यारात्री जागरणांत चालविण्यांत आपल्याला कशाला श्रम? गणपतरावांना उपायच नाहीं; त्यांना गेलेंच पाहिजे. जाऊंद्या त्यांना त्या महामायेला घेऊन. आपण जाऊन त्यांना एकदम कलकत्त्यास हुगळी नदींत आगबोटीवरच गांठूं. गणपतराव दोनचहरीं वारा वाजतां 'डफारिन' नांवाच्या आगबोटीवरच्या 'डेक' वर इकडे तिकडे फिरत होते. फिरतां फिरतां अनेक विचार त्यांच्या मनांत आले. या शिठल आणगाट्या कामांतून आतां लवकरच आपण सुटूं, असें वाटून त्यांना जरा समाधानही वाटलें. ह्या खोचा असा परिणाम झाला, याबद्दल त्यांना वाईटही पण वाटत होतें. इतक्यांत त्यांच्या मनांत त्यांचा मित्र आला. त्यामुळें त्यांना फारच दुःख झालें. अशा अनेक विचारांनीं फारच त्रास होऊन ते 'केबीनमध्यें' जाऊन स्वस्थ पडले. आमच्या बाईसाहेबांनीं बहुतकरून मौनव्रतच धारण केलें होतें. निवळ जरूरीपेक्षां जास्ती त्या एक अक्षरही बोलल्या नाहींत. मधून मधून स्टेशनावर 'उपहारगृहांतून कांहीं फराळास आणून देऊं का?' म्हणून गणपतराव तिला विचारीत, तेव्हां 'नको' 'होय' एवढेंच ती म्हणे.

मागें जगदेवरावांबरोबर तिनें कलकत्ता शहर पाहिलें होतें. त्यामुळें तेथें जाईपर्यंत तिला कांहीं वाईट वाटलें नाहीं. तिला वाटलें येथेंच आपला प्रवास संपला. येथेंच आपल्याला डेरा पडेल. पण आगबोटींत बसल्याबरोबर तिच्या काळजानें ठाव सोडला त्याचें अगदीं पाणी झालें. तिचे ताड सुकून गेलें. तिला वाटलें, आतां गणपतराव आपल्याला एका रानटी पेटांत, जेथील लोक दुसऱ्या माणसांला खातात, तेथें नेऊनटाकतात. ती अगदीं घाबरून गेली.

आगबोटींतून उतरल्याबरोबर गणपतराव ब्रह्मी आगगाडींत जाऊन बसले. आव्हाच्या स्टेशनावर उतरल्याबराबर गाडीपाशीं दाढी मिशा विरहित असलेले व बायकांप्रमाणें केंसांचा बुचडा बांधून त्यावर रेशमी रुमाल गुंडाळलेले हमाल सामान उतरून घेण्याकरितां आले. त्यांना पाहून

आमच्या बाईला फारच वाईट वाटलें. आपण कोठें आलों, याचा तिला लवकर उमजच पडेना. आपल्या मुंबईंच्या रेकल्याच्या नमुन्याहूनच पण कांहीं फरक असलेली एक गाडी भाड्यानें करून गणपतराव आपल्या कैद्यासह 'सालिसबरी' हॉटेलकडे निघाले. वाटेंत केळीच्या पानाच्या पुडयांत भात व केळ्याचा तुकडा घालून विकणाऱ्या स्त्रिया त्यांना चोहोंकडे दिसल्या. दुकानांत जिकडे तिकडे माल विकणाऱ्या स्त्रियाच. आपल्या इकडच्या सन्याशासारखा भगवा पोषाख करून, गळ्यांत एक मृण्मय कुंभाकार पात्रावर त्या बेताचेंच तांब्याचें आच्छादन घालून तें गळ्यांत अडकवून 'पुंगी' नांवाचे लिकडचे भट रस्तोरस्तीं फिरत आहेत, त्या कुंभावर स्त्रिया पाणी ओतीत आहेत व त्या 'पुंगीस' अन्नार्पण करीत आहेत, हें पाहून आमच्या दुर्दैवी बाईला आपण ब्रह्मदेशांत आलों, असें चटकन् वाटलें.

'सालिसबरी' हॉटेलमध्यें एका उदासवाण्या खोलींत त्या दुर्दैवी बाईला बसवून हिला बाहेर सोडूं नका असें तेथल्या शिपायाला सांगून, गणपतराव नारिमन डाक्टराकडे गेले. डाक्टर साहेबांना भेटून, तें पत्र देऊन, तोंडानें कांहीं हकीगत सांगून, ते परत हॉटेलकडे आले. मग निहालकुवरबाईस थोडा उपहार करण्यास सांगून एक गाडी आणून तिच्यासह लुनाटिक असायलमकडे तिला नेण्याची त्यांनीं तयारी केली.

'मला कोणीकडे नेतां? असें मला लहान पोरासारखें वागवितां, याचा मला मोठा कंटाळा आला आहे. मला कोणिकडे नेतां सांगा तरी?' असें ती गाडींतून जातां जातां वाटेंत म्हणाली.

गणप०—आनंदीबाई, तुह्मांला जेथें कृतपापाचा पश्चात्ताप करण्याला पुष्कळ वेळ मिळेल, अशा ठिकाणींच घेऊन जात आहें.

असा बराच वेळ गेल्यावर एका भव्य इमारतींच्या दारापाशीं गाडी उभी राहिली. त्या इमारतीच्या अति उंच भिंती, ज्यांच्या कुंभ्यावर कांच बसविलेली आहे, हें पाहून तिचा काळजांत धस् झालें. गाडींतून उतरून आंत गेल्याबरोबर त्या सारख्या ओळीच्या आलवानी पडदे लाविलेल्या खोल्या पाहून, व तेथले ते कंबरेला पट्टा घातलेले रक्षक पाहून, आणि कांहीं लोकांचें हंसणें पाहून व कांहींचें रडणें ऐकून आमच्या या दुःखी स्त्रीनें मोठ्यानें किंकाळी फोडली. इतक्यांत एक स्त्री वेडीवांकडी नाचत

होती, तिची सावली खिडकीच्या आलवानी पडण्यावर त्या दिव्याच्या प्रकाशांत दिला दिसली. ती पाहून गणपतरावांच्या खांद्यावर हात टेकून ती मेाडय़ा दुखेाद्वारानें म्हणाली 'हें पहाहेा ! मला तुझी 'म्याडहौस' मध्यें आणलेंत खरें. अरे देवा ! अग बाह ! आतां काय करूं ! अखेर माझ्या नशिबीं हें आलेंच ! अग आईग, तुझ्या सारखाच माझाही परिणाम झालाना ? त्या संकटांतून निसटावें म्हणून मी वेडाची बतावणी केली, पण अखेर तीच माझ्या नाशास कारण झाली !! आतां काय करूं ! !'

त्या स्त्रीला पाहून एक युरेशियन जातीची स्त्री 'बाईसाहेब फार थकल्या आहेत, बला यावर' असें इंग्रजींत म्हणून एक खुर्ची घेऊन आली.

आमच्या बाईनें खोलींत चोहोंकडे पाहिलें आणि त्या युरेजियन् स्त्रीनें आणून ठेविलेल्या खुर्चीवर एक पाय टेकून उभी राहून ती गणपतरावांस म्हणाली.—

'गणपतराव, काय हो हें ? ह्या जागचें नांव काय ? मी अगदीं लहान पोर आहें, असें तुम्हांला वाटतें होय ? म्हणून मला असें चाळवितां व फसवितां ?'

गणप०—याला 'लुनाटिक असायलम्' (वेड्याचें गृह) म्हणतात. आपल्या सारख्या मोठ्या श्रीमंतांच्या बायकाच येथें आहेत. फक्त बायकांचेंच हें वसतिस्थान आहे. सर्व व्यवस्था उत्तम आहे. काळजी करूं नका.

हें ऐकून ती मोडयानें रंडूं लागली. हें पाहून ती युरोजियन् स्त्री म्हणाली 'रडूं नका बाई. हें स्थान फार चांगलें आहे. डाक्तरसाहेब फार चांगले आहेत. डाक्तरसाहेब फार दयाळू आहेत. आपल्यासारख्या श्रीमंत बायकाच येथें आहेत, आणि—' इतक्यांत डाक्तरसाहेब तेथें आले, त्यामुळें तिचें बोलणें तसें अर्धेच राहून गेलें.

डा. लक्ष्मीकांताचें पत्र हातांत घेऊन, गणपतरावांना डाक्टर म्हणाले 'बहुतेक हकीकत मला कळली; सर्व तऱ्हेची व्यवस्था होईल. या बाई-बाई-ची व्यवस्था त्यांच्या डौलाप्रमाणें राहील.'

हें तो आमच्या बाईकडे पाहून म्हणाला. या स्त्रीचें सौंदर्य व तो उंची पोषाख पाहून तो अगदीं थक्क झाला.

डाक्तर लक्ष्मीकांतानें 'ही फार श्रीमंत आहे. तिच्या योग्यतेची व्यवस्था ठेवा. पैशाची खातर नाहीं' असें लिहिलें होतें, म्हणून त्यांनीं इला चां-

गली खोली दाखविली. गणपतरावांनीं या स्त्रीचें नांव गंगाबाई म्हणून डाक्तरांस सांगितलें, व त्याप्रमाणें आमच्या बाईसही त्यांनीं 'तुमचें खरें नांव कळणार नाहीं व अजून खोवरें होणार नाहीं. तर हेंच नांव तुम्ही वापरा असें सांगितलें'

तिनें मुळींच जबाब दिला नाहीं. आपल्या पदरानें डोळे झकून ती आंतले आंत स्फुंदत होती.

डाक्तर साहेबांनीं तिची सर्व तऱ्हेची तिच्या इतमामाप्रमाणें व्यवस्था ठेवण्यास हुकूम दिला. व तिच्या दिमतीस एक स्वतंत्र दासी दिली.

या व्यवस्थेसंबंधी तो डाक्तर गणपतरावांजवळ बोलत आहे तोंच ती मोठ्यानें ओरडून म्हणाली 'तुम्ही व्हा येथून चालते. मला गणपतरावांबरोबर एकटींच राहूंद्या.' हें ऐकून तो डाक्तर हंसला व बाहेर आपल्या आफिसाकडे गेला. त्याच्या मागामाग गणपतरावही जात आहेत, हें पाहून ती झट्कन् दारांत जाऊन उभी राहिली 'व जाऊं नका' म्हणून त्यांना तिनें अडविलें.

ती म्हणाली 'अखेर् तुम्ही मला या थडग्यांत आणून गाडलें, मला जिवंत तुम्ही गाडलेंत. तुम्ही विश्वासघात केलात; मला फार छळिलेंत, फार क्रूरपणानें मजबरोबर वागलांत.'

गणप०—जें न्याय्य तेंच मीं केलें. तुमच्याबरोबर मी फार ममतेनें वागलों. तुम्हांला असेंच मोकळें सोडलें असतें, तर मी मोठा अपराधी झालों असतों. नारायणराव चव्हाण नाहींसा होऊन व तो अपराध तुम्ही कबूल करूनही मी तुम्हांला असच मोकळें सोडणें म्हणजे गळेकापू, खुनी, दरोडेखोर, लुटारू, बंडवाले यांना अपराध करण्याला परवाना देण्याप्रमाणेंच आहे. येथें तुम्हांला फार चांगल्या रीतीनें वागवितील. येथें तुमच्या हातून नवीन अपराध होण्याची भीति नाहीं व झाल्या अपराधाबद्दल पश्चात्ताप करण्याला पुष्कळ संधी आहे. येथें तुम्हांला कोणी त्रास देणार नाहीं, छळणार नाहीं, कांहीं नाहीं. स्वस्थ पश्चात्ताप करीत पडा.

निहाल०—नाहीं नाहीं. माझ्या या सौंदर्याचा असा उपयोग झाला काय? असें जर मला अगोदर कळतें, तर मीं असें कशाला केलें असतें? ते चिनाहून आल्याबरोबर त्यांच्याजवळ सुखासमाधानानें राहिलें नसतें काय? काय करूं? (असें म्हणून कपाळ बडवून, केंस उपटून, मोठ्यानें

गळा काढून धायधाय रडूं लागली.)

असा बराच वेळ गेल्या .र ती ह्मणाली 'माझ्या मनांत आतां काय आहे, हें तुह्मांला समजलें कां? समजलें कां? ज्या दिवशीं ते (नारायणराव) नाहींसे झाले, त्याची आठवण मला आतां झाली आहे.'

आपल्या मित्राचें नांव ऐकल्यावरोबर गणपतरावांचा चेहरा एकदम उतरला; त्यांना फार वाईट वाटलें.

'तुह्मीं जसें आतां माझ्या समोर उभे आहां तसेच ते (नारायणराव) माझ्यासमोर त्या दिवशीं उभे होते. तुह्मीं ह्मणाला होतां नाहीं कां मी त्यांना शोधून काढायाला त्या बागेंतली मुळीनमुळी उकरून काढीन. व घराची चीपनचीप उलथी पालथी करीन. तर एवढें करणें नको. पडक्या भिंतीच्या मागच्या जुन्या पडक्या विहिरींत त्यांचें (नारायणरावाचें) प्रेत कुजत पडलें आहे.'

हें निहालकुंवरबाईचें बोलणें ऐकून गणपतराव एकदम, 'अरे देवा! शिव! शिव!' ह्मणाले. व आश्चर्यानें तिच्याकडे पाहूं लागले, व पुनः ह्मणाले 'अरे देवा! इतकी उठाठेव करून अखेर माझ्या प्रिय मित्राची मृत्युवार्ताच ऐकणें माझ्या कपाळीं आलें काय? अरेरे! माझ्या एवढ्या श्रमांचें हेंच कां चीज? अर देवा! काय हा प्रसंग! सर्व व्यर्थ झालें! वृथा खटाटोप झाला! शिव! शिव!!!'

आमच्या बाईंनीं पुढें सांगण्यास सुरुवात केली, 'तो त्या गुलाबाच्या ताटव्यांत मला येऊन भेटला. त्याला मीं लांच देऊं केला, त्याला मी शिव्या दिल्या. छीथू केली. हें श्रीमंत सरदाराचं घर सोडून त्या भिकाऱ्याकडे न जाण्याला होईल तेवढी मी खटपट केली. गोड बोलून पाहिले, धमकी देऊन पाहिलें, भीति घालून पाहिलें, तो कांहीं ऐकेना. गगनपूर येथें अशी लबाडी कां केलीस? ह्मणून तो मला शिव्या देऊं लागला. तो ह्मणाला 'माझें काळीजच तूं अग्नींत जाळून टाकलेंस, तेव्हां आतां दया मला मुळींच नाहीं. तुझे सर्व अपराध मीं पोटांत घातले असते, पण त्या गगनपुरीच्या अपराधाला मला जागा देववत नाहीं. तूं महाविश्वासघातकी आहेस. माझा गळा कापलास. महा दुष्ट आहेस,' अशीं अनेक छह्मी भाषण बोलला. मला वेडे ठरविण्याची तुह्मांला जशी युक्ति सुचली व साधली तशी त्याला सुचलीच नाहीं. तुह्मीं मला जसें कळलें तसेंच त्यानेंही

मला छळलें. तुझी जसे माझ्यावरोबर क्रूरपणानें वागलां, तसेंच तोहि वागला. मी त्या विहिरीच्या धांवेवर अगदीं चाकाच्या मेढीजवळ बसलें होतें. तो त्या मेढीला टेकून माझ्याकडे तोंड करून उभा राहिला होता. अखेर मला फार राग आला आणि तुह्मांला जशा शिव्या दिल्या तशा त्याला देण्याला मी चटकन् उभी राहिलें. मी त्याला ह्मणालें 'तर तुह्मी वेडे आहां, लबाड आहां, माझ्या रूपाला भुलून माझ्यावर आळ घेतां, माझें बोलणें प्रीतीनें अगदीं वेडा होऊन गेलेल्या वृद्ध जगदेवरावास कधींच खोटें वाटणार नाहीं. तुलाच वेडा, लुच्चा, ठक, सोदा ह्मणून हांकून लावतील किंवा वेड्याच्या इस्पितळांत कोंडतील!' असें ह्मणून आंत जाण्याला निघालें तों त्यानें माझें नाजुक मनगट घट्ट आंवळून धरून मला उभें केलें. त्याचे ओरखडे तुम्हीं पाहिलेच. त्याबद्दल मी पुष्कळ बतावणी केली, पण तुह्मांला ती खरी वाटली नाहीं. या जगांत मला भीति ह्मणून आहे असा एकच इसम आहे, आणि तो कोण ह्मणाल तर तुह्मी, असें मग माझ्या मनांत आलें.

असें ह्मणून ती कांहीं वेळ थांबली. तिला वाटलें ह्यावर गणपतराव कांहीं बोलतील, परंतु ते दगडासारखे स्वस्थ उभे आहेत हें पाहून ती निर्लज्जा पुढें सांगू लागली, 'तुह्मी जसें मला भंडावून सोडलें तसेंच त्यांनही त्या वेळेस केलें. मग माझें डोकें एकदम फिरलें. मी वेडी झालें. हा माझा नाश करील, असें मनांत आलें, व एकदम मोठ्या जोरानें तो आंत पडावा या हेतूनें ती मेढ पुढें ओढली, त्यासरशीं तो त्या भयाण विहीरींत 'मेलों, मेलों' असें मोठ्यानें ह्मणत पडला. ती विहीर फार खोल आहे असें सगळे सांगत असत. किती खोल आहे, हें मला नाहीं माहीत. त्यांत पाणी नाहीं असें मला वाटतें, कारण तो पडल्या वरोबर पाण्यांत पडल्याप्रमाणें 'धाड' ह्मणून आवाज झाला नाहीं. 'टप्प' असा आवाज झाला. मी गुडघे टेकून विहिरीच्या कांठाला कान लावून ऐकूं लागलें, पण कांहींच आवाज ऐकूं आला नाहीं. मी पंधरा मिनिटें तशी तेथें होतें, पण आवाज पुन्हां ऐकूं आलाच नाहीं.' त्याचा असा अंत केला, तरी ही माझ्या गळ्यांत रेशमी गोफांत ओंवलेली त्याची आंगठी व माझ्या पेटींत असलेलें माझ्या वाळाचें तें सोन्याचें वाघनख नेहमीं त्यांची आठवण देऊन त्रास होई.

ही हृदयद्रावक गोष्ट ऐकून गणपतराव कांहींच बोलले नाहींत! त्यांच्या

मनांत येथून लवकर निघावयाचें होतें; एकच दार तें तिनें अडवून धरिलें, त्यामुळें त्यांचा उपाय चालेना. दुसरी वाट असती, तर ते लगलींच तेथून निसटले असते.

'मला जाऊंद्या,' असें ते मोठ्या शिथिल स्वरानें म्हणाले.

निहाल०—हें पहा, तुमच्याजवळ अपराध कबूल करायाला मी बिलकुल भीत नाहीं, याला दोन कारणें आहेत. पहिलें हें कीं, गुन्हा कोर्टांत शाबीत करून मला फांशीं देणें तुमच्या हातून होणार नाहीं. कारण त्यांत तुमच्या मामाचीच अब्रू जात आहे. त्यांनाच त्यांत धोका आहे, तेव्हां तुम्हीं तें करणार नाहीं, ही खात्री आहे. दुसरें असें कीं, मला आतां तुम्ही जी शिक्षा भोगावयाला लाविलें आहे, यापेक्षां जास्ती शिक्षा कायदा कोर्टून आणतो ? तुम्ही मजवर दया कराल, म्हणून तुमच्या जवळ अपराध कबूल करतें, असा अर्थ नाहीं; आणखी किरकोळ गुप्त गोष्टी—ज्यांनीं माझें मन अगदीं फिरून गेलें होतें—तुम्हांला सांगावयाच्या आहेत, पण आतां त्यांची जरूरी नाहीं. मुख्य गोष्ट कळविली ती पुरे आहे.' असें म्हणून ती दारांतून बाजूला झाली. तिच्या बरोबर एक अक्षर न बोलतां, तिच्याकडे न पाहतां गणपतराव बाहेर आले.

पुढें अर्ध्या तासानें निहालगडावर अंत झालेल्या आपल्या जिवलग मित्राची मूर्ति मनांत आणून दुःखित अंतःकरणानें विचार करीत गणपतराव 'सालिसबरी हॉटेल' मध्यें पुढें असलेल्या ताटांतला एक घांसही न खातां, टेबलावर कपाळ टेकून, विव्हळ होऊन पडले.

भाग ३९ वा.

याप्रमाणें निहालकुंवरबाईची व्यवस्था लावून गणपतराव त्या रात्रीं 'सालिसबरी' हॉटेलमध्यें एका खुर्चीवर हताश होऊन बसले. ईतके दिवस श्रम केलेले व्यर्थ गेले. अखेर त्याची मला मृत्युवार्तादेखिल ऐकावी लागलीना? आतां त्या कमळाबाईला मी काय सांगूं? "तूं जीव तूं हृदय तूं मजला विसावा," असें जिला तो म्हणत होता, त्याच स्त्रीनें कपटानें त्याचा घात कराव्या काय? हरहर! नको हा संसार आणि नको ही माया! असें ते डोळ्यांत पाणी आणून म्हणाले."

दुसरे दिवशींच्या आगबोटीनें निघून ते एकंदर साडेसात दिवसांत पुण्यास येऊन पोंचले. तेथें आल्यावरोबर त्यांनीं श्रीमंत सांगलीकरांच्या वाडयांत आपल्या मामाचा शोध केला. ते सर्व पुढें प्रयागास जाण्याकरितां निघून गेले, म्हणून कळलें. हें ऐकून त्यांना फार समाधान वाटलें. अतां मामाची गांठ इतक्यांतच पडल्यास तिची व्यवस्था काय केलीस म्हणून त्यांनीं विचारिलें तर काय सांगावें? खरें सांगावें तरी पंचाईत, खोटें सांगावें तरी अडचण, असें त्यांना झालें होतें. पुण्याहून निघून ते करवीरीं आपल्या बंगल्यांत आले. तेथें आल्यावरोबर नारायणरावाची ती खोली पाहून त्यांना पहिल्यापेक्षां जास्तीचे दुःख झालें. ते आत्मगत म्हणाले, 'त्या पडक्या विहिरींत सहा महिने कुजत पडलेलें माझ्या मित्राचें प्रेत जर काढिलें, तर आतां पोलीस चौकशी सुरू होईल. ती सुरू झाली म्हणजे मग तिचा अपराध छपला जाणें महत्कठीण. तिचा अपराध उघड झाला, म्हणजे मामाच्या अब्रूला धक्का! तेव्हां त्या खटपटींत पडावें कीं न पडावें?' त्यांचीं जीं तीन पत्रें तेथें येऊन अगोदरच पडलीं होतीं, तीं चाकरानें त्यांच्या हातांत आणून दिलीं. त्यांपैकीं एक त्यांच्या मामाचें, दुसरें सगुणाचें, व तिसऱ्या पत्रावरचें अक्षर त्यांनीं एकदां दोनदांच पाहिलें होतें, तरी तें तेव्हांच त्यांणीं ओळखलें. तें आमच्या कमळाबाईचें होतें. प्रथमतः त्यांनीं सगुणाचें पत्र फोडलें. त्यांत तिनें लिहिलें होतें कीं, येथें पुण्यास आल्यावर बाबांनीं या दुःखाचा चकार शब्द तोंडांतून काढिला नाहीं. पण त्यांच्या मनाला फारच त्रास झाला. त्यांना थोडा ज्वर आला. मीं वैद्यांस बोलावून

प्रकृति दाखविली. मिण्यासारखें कांहीं नाहीं. मनाला फार त्रास झाला व त्यानेंच ज्वर आला, असें वैद्यांनीं सांगितलें. एक दोन दिवस बरें वाटल्यावर आम्हीं प्रयागास जातों. जगदेवरावजींनीं आपल्या पत्रांत 'एक हजार रुपयांची हुंडी प्रयागास पाठवावी. तिची व्यवस्था कशी केलीस हें कळीव' असें लिहिलें होतें. आमच्या हतभागी नारायणरावाच्या बहिणीनें जें काय लिहिलें होतें हें सांगत बसण्यापेक्षां तें पत्रच आपणांस दाखविल्यास काय वाईट?

श्री.

—गांव ता० ६। ।१८८.

'राजमान्य राजश्री गणपतराव वकील यांस

कमळाबाई चव्हाण इचा शिरसाष्टांग नमस्कार. विनंति विशेष.

पथिकाश्रमाच्या आगींतून तुम्हीं वांचविलेला जोतिबा येथें आपल्या आईच्या खोपटींत अत्यावस्थ होऊन पडला आहे. निहालगडचे डाक्तर त्याला दोन वेळ पाहून गेले. त्यांच्या सांगण्यावरून तो फार दिवस जगेल, असें मुळींच दिसत नाहीं. त्याची बायकोच त्याच्या शुश्रूषेस आहे. तुम्ही एकवार जरूर येऊन भेटून जावें, अशी त्या नवराबायकोची फारफार इच्छा आहे. तर कसेंही करून तो मरण्यापूर्वी एकदां येऊन चला. माझ्या मावशीची व ह्याच्या आईची फार ओळख असल्यामुळें मावशी रोज जोतीबाच्या समाचारास जाते. मीही केव्हां केव्हां जातें. तुमची माझी ओळख आहे, हें समजल्यावरून त्यानें मला पत्र लिहिण्यास सांगितलें. कळावें हे विनंति.

आपली,

कमळा चव्हाण.'

हें पत्र मन लावून वाचून घडी करून पुनः खिशांत ठेवून ते चिरूट घेऊन ओढीत बसले. तो चिरूट सगळा संपेपर्यंत त्यांच्या मनांत नारायणराव आणि कमळा, मग कांहीं वेळ विचार करून त्यांनीं लागलींच रात्रीच्या गाडीनेंच निहालगडाला जाण्याचें ठरविलें.

रात्रीं एक वाजून गेल्यावर निहालगड गांवीं नवीन स्थापन केलेल्या दवाखान्याच्या दरवाज्यांत ते आले. दार किलकिलें उघडें होतें, म्हणून

दिव्याचा उजेड बाहेर दिसत होता. गणपतराव हळूच दार उघडून आंत गेले; तों डाक्टर एका त्रिमी मातीच्या खलबत्त्यांत कांहीं औषध घोटीत आहेत, त्यांचा कंपौंडर तेथेंच एका 'डिसेक्शन' (मुडदे फाडण्याच्या) टेबलावर घोरत पडला आहे, असें दिसलें. डाक्टरास रीतीप्रमाणें रामराम करून गणपतराव ह्मणाले, 'डाक्टर, इतक्या रात्रीं तुह्मांला मी त्रास देण्यास आलों, याची माफी असावी. तुह्मी जागेच होतां, नाहीं तर उठवावें लागलें असतें.

डाक्टर—नाहीं. मी आतांच त्या जोतिबाला पाहून आलों.

गणप०—अं. ने. फार आजारी आहे? मला भेटून जा ह्मणून त्याचा निरोप आला ह्मणून मी आलों. मला त्याचें घर माहीत नाहीं ह्मणून—

डाक्टर—मी आतांच हें औषध घेऊंन तिकडे जात आहें. चला मजबरोबर.

गणप०—ह्मणजे? त्याची प्रकृति इतकी बिघडली आहे कीं काय? तो कांहीं फार भानला नव्हता.

डाक्टर—तसें कांहीं नाहीं. पण आतां जगण्याची आशा फार कमीच.

डाक्टराचें औषध तयार करणं ह्मालयावर ते दोघे जोतिबाकडे जाण्याला निघाले. तासभर चालत गेल्यावर त्या गांवांतल्या एका भिकार गल्लींतल्या एका दारापाशीं जाऊन ते दोघे उभे राहिले. आंतला मिणमिण दिवा त्यांना दिसला. व दुखणेकऱ्याचें कण्हणेंही त्यांना ऐकूं आलें. हळूच दार उघडून डाक्टर आंत गेले. त्यांच्या मागोमाग गणपतरावही गेले. आंतल्या खोलींत अजारी मनुष्य विवळत पडला होता.

डाक्टर—तुह्मी आलां आहां, ह्मणून त्याला सांगूं काय?

गणप०—सांगा. माझी कांहीं हरकत नाहीं. पण सांभाळाहो, या एकदम सांगण्यानें त्याला जास्ती तर कांहीं होणार नाहींना? पहा बुवा. नाहीं तर एक करितां एक. पाहिजे तर मी येथें घटकाभर थांबतों. तुमच्या सोईप्रमाणें करा.

डाक्टरानें मान हालविली व हळूंच समोरचें दार उघडून तो आंत गेला. हा डाक्टर फार भला माणूस होता. गरिबांवर नेहमीं दया करीत असे.

जाहगीरदार पगार देतात तेवढ्यावर खुष. पैसा फार मिळविण्याची इच्छा नाहीं झटलें तरी चालेल. यांची परोपकार करण्याची बुद्धि सदा जागृत. खेडेगांवांत असाव डाक्टर पाहिजे. नाहीं तर प्रत्येक 'व्हिजिट' (खेपेला) ला पांच रुपये फी मागूं लागला, तर गरीब शेतकऱ्यांनीं ती कोठून आणावी? माणसाचा प्राण चालला तरी हे 'फी' मिळत नाहीं झणून अडून बसावयाचे डाक्टर! मनुष्याच्या प्राणांपेक्षां यांना हें सोनें रुपें विशेष! अहो, ज्यांना तसा पैसा देण्याची शक्ति आहे त्यांच्याकडून घ्या-पण असें अडवून?

या आमच्या डाक्टरांच्या आंगची भूतदया कोठें गेली कोण जाणे! सरस्वतीमंदिरांतून परवाना घेऊन बाहेर पडतांच हे ती भूतदया त्या विद्यामातेच्या चरणीं सर्वस्वी अर्पण करून येतात वाटतें!! प्रत्यक्ष बाप मरायाला टेकला तरी ह्यांचें फीवांचून पाऊल पडणें नाहीं! मग लोकलज्जेस्तव किंवा घरच्या माणसांच्या भिडेस्तव किंवा आपल्या पितृप्रेमानें विठहल झालेल्या दुसऱ्या (अशिक्षित) भावांच्या अति दुःखाच्या उद्दाम वेगानें डोकें फिरून 'एकदां जाऊं द्या' असें झणून त्याला पाहायाला निघाले तर आपल्या पेटींतले पांच रुपये खिशांत टाकून तेथें जावयाचे, व परत दवाखान्यांत येऊन कंपौंडराला हे पांच रुपये आमच्या बापाच्या विझिटचे जमा कर झणून झणावयाचे!! अहो, अशें कां झटलें तर, 'आम्हां डाक्टर लोकांना फीशिवाय रोग्याला पहायाला जाणें झणजे कमीपणा आहे. कारिनां असें करावें लागतें.' असें उत्तर देतात! वः! खासें!! कायअक्कल व व्यवहारज्ञान!! सर्वच विलायती!!! या नमुन्यापैकीं हा गरीब डाक्टर नव्हता. हा कोठें 'एल्. एम्. ॲन्ड एस्' होता? हा आपला हास्पिटल असिस्टंट. याला कोठें एवढी अक्कल? ही सर्व पढीव वैद्यकीची अक्कल!! गणपतराव तेथेंच सोप्यांत एका फाटक्या कांबळ्यावर बसले. त्यांच्या मनांत मागचे नानाप्रकारचे विचार येऊं लागले. डाक्टर केव्हां येतात झणून ते वरचेवर घड्याळ काढून पाहत सेकंडामागें सेकंड आणि मिनिटामागें मिनिट निघून चाललें. ते वरचेवर त्या खोलीच्या दाराकडे पहात. पण डाक्टर कांहीं लवकर बाहेर येईना. अखेर डाक्टरांनें आपण बाहेर आंना येऊन हळूच हांक मारली. ते हळूच दाराची गणेशपट्टी डोकीला लागूं नये झणून वांकून आंत गेले.

मैनाबाई आपल्या आजारी नवऱ्याच्या पायथ्याशीं बसली होती. तिच्या चेहऱ्यावर काळजीच विशेष दिसत होती. अलीकडे बरेच दिवसांत न्हाणें नसल्यानें तिचे केंस अगदीं मळून गेले होते. त्यांचा तो पहिला तुळतुळीतपणा जाऊन त्यांच्या आंगीं आतां रुक्षता आली होती. तिचे डोळे अगदीं खोल गेले होते, व त्यांच्या पोट्ट्या जरा सुजल्या होत्या त्यांवरून रडून रडून इची अशी स्थिति झाली असावी, असें उघड दिसत होतें तो आजारी मनुष्य एक हात उशीवर टाकून इकडून तिकडे तिकडून इकडे मान हालवीत 'अग आईग ! अग आईग ! ' असें करीत विछान्यावर घातलेल्या केळीच्या पानावर लोळत होता.

गणपतरावांला पाहिल्याबरोबर ही तरुण स्त्री तेथून उठून त्यांच्या जवळ आली व म्हणाली, 'त्यांच्याबरोबर बोलावयाच्या अगोदर मजबरोबर दोन शब्द बोला. मला कांहीं विचारावयाचें आहे.'

'अग काय म्हनतीग ? कोन आलया ?' असें तो आजारी मनुष्य विवळत विवळत तुटक तुटक शब्दांनीं गणपतरावांचा आवाज ऐकून म्हणाला. याचे डोळे अगदीं खोल गेले होते. तोंडावर प्रेतकळा येऊं लागली होती. जगण्याची आशा मुळींच दिसत नव्हती. त्यांतल्या त्यांत रागानें तो आपल्या बायकोला म्हणाला ' अग कोन्, गनपतराव व्हय ? त्यांच्याबर काय येकांत करतीस ? मला माराव म्हनतीस व्हय ? तूं नको कांहीं बडबडूं. मीच समद सांगतों त्येना ! ये इकड बैस आपल्या जागेवर. '

त्याची म्हातारी आई तेथेंच त्याच्या उशाला बसली होती. ती हें त्यांचें बोलणें ऐकून ममतेनें त्याच्या तोंडावर हात फिरवून म्हणाली, 'काय नायर बाळा. तूं लई दुकन्यान पडलास म्हनून सांगतीया. दुसर काय बी न्हाइ. सवस्थ पड. ते ते आले बग ! ' त्या मायलेकरांचा असा संवाद चालला तोंच मैनाबाई गणपतरावांला बाहेर या म्हणून आंगणांत घेऊन आली व हळूच म्हणाली—

' सरकार, आपल्याला कांहीं गुप्त गोष्ट सांगायाची आहे. आपण त्या आगीच्या रात्रीं कांहीं इजा न होतां बाहेर पडलां, तेव्हां मी काय सांगितलें त्याची अठवण असेलच. '

गणप०—होय, आहे अठवण.

मैना—मला जो कांहीं संशय आला, तो तेव्हांच मीं तुझांला सांगितला; अजूनही मला तसेंच वाटतें.

गणप०—बरें मग ?

मैना—त्याजबद्दल आपल्याखेरीज मी कोणाजवळ बोललें नाहीं. ने (जोतिबा) त्या रात्रीचा गोष्ट विसरल्यासारखे दिसतात. मा—आली तेव्हां ते शुद्धीवर नव्हते. दारू पिऊन झिंगून गेले होते. त्यानें त्यांना तिची अडचण नाहीं. मला जसा संशय आला तसा त्यांना आलेला नाहीं. नाहीं तर येणाऱ्या जाणाऱ्याजवळ यांनी बोंब ठोकली असती. त्यांना तिचा संशयच नाहीं. ते झगतात कागलास किंवा निपाणीस हा पाथिकाश्रम स्थापन केला असता, तर असें कधीं झालें नसतें. याला कारण हा वारा···तर आतां आपल्याला झणून पदर पसरून माझें एवढेंच मागणें आहे कीं, तिच्या संबंधानं आपण अवाक्षर काढूं नय.

गणप०—समजलों. बरें आहे. मी वेळानेंच बोलतों.

मैना—माईसाहेब निहालगडावरून गेल्या झणून ऐकतें.

गणप०—होय.

मैना—आतां नाहीं कां त्या येणार ?

गणप०—नाहीं. त्या कधीं आतां येणार नाहींत.

मैना—आतां जेथें त्या गेल्या आहेत, तेथें त्यांचा छळ नाहींना होणार?

गणप०—छळाचें नांव नको. तिला फार चांगलें वागवितील.

मैना—हें ऐकून मला बाई फार समाधान वाटलें. माईसाहेबांची माझ्यावर फार मर्जी होती.

इतक्यांत तो आजारी मनुष्य आंतून मोठ्या संकटानें मोठ्यानें ओरडून मैनाला हांका मारूं लागला, ' अग ये सटवे—कुठ गेलीस उलथायला ? ये इकडे. '

' हें ऐकल्याबरोबर मैनानें गणपतरावांस गप्प झणून नाकावर बोट ठेवून खूण केली, व ती पुन्हां हळूच आंत गेली. गणपतरावही तिच्या बरोबर आंत गेले.

जोतिबा—अग तुझी नाहीं जरूर. गणपतराव कुठ हायती. मला एकटयाला त्यांच्यावर बोलूं दे. तू जा लांब आंगणांत बैस. दाराभाड

बसून ऐकशील तर टकुरीच फोडीन. आईलावी ने. नको, तिला असूदे, तिचें काम आहे

जोतिबाच्या या हुकमावरमाणें मैना बाहेर गेली. जोतिबानें गणपतरावांस आपल्या अंथरुणावर जागा बनवून घेतलें आणि म्हणाला, 'मला वाचविण्याला तुमी लई मेहनत घेतली. आन् तशा आगींतून मी दारू पिऊन झिंगून पडलेला वांचनार व्हय ? पन् आपुन लई दया केली. माझा जीव वांचविला. तुम्ही मजवर लई उपकार केल्याती. या गांवच्या लोकांनींवी मला मदत केली. पन् सगळ्या गांवभर ते बाबलत हिंडत्याती. म्हनून त्यांनीं मला जें काय तत्रा पितळी दिली तें परत केलं. मी कुनाचा उपकार मानीत नाहीं. पन आपला तेवढा आकशी समरून ठेवीन.

गणप०—यांत कसला उपकार बाबा. एकमेकांच्या उपयोगीं पडावें, असा मनुष्याचा धर्मच आहे.

यावर जोतिबानें लागलेंच उत्तर दिलें नाहीं. पण एका अंगावर वळून त्यानें गणपतरावांकडे सारखी टक लावून बराच वेळ पाहिलें आणि मग म्हणाला, 'तो, तो मोतीबौकाचे वाड्यांत नाहींसा झाला तो, तुमचा लइ जिवाळ्याचा मितर होता नाहीं ?'

त्याचा हा प्रश्न ऐकून गणपतरावांना फारच आश्चर्य वाटलें. आपल्या गमित्राचें नांव ऐकल्याबरोबर त्यांच्या काळजांत धस्स झालें.

'त्या नारायणरावाची आपली लई दोस्ती, लई जिवाळा म्हन् ?' असें तो पुन्हां म्हणाला.

गणप०—होय बाबा, तो माझा फार जिवलग मित्र होता.

जोतिबा—तो नाहींसा झाल्यावर आपून लई घाबरलां म्हनून वाड्यांतल शिपाई बोलत व्हत. तुमची त्याची चुकामुक झाली तवा आपल्याला अगदीं येड्यावानी झाल म्हनूनशानी तो सूर्वेप्रकाशचा मालक सांगत व्हता. दोघाची भायावानी आकशी पिरीत म्हन? तो गेल्यावर आपल्याला लई दुःख झाल म्हन. माझ्या मनामदीतुमाला तेच्याबद्दल कांहीं सांगायाचे हाय. सांगतों ऐका.

गणप०—होय बाबा ! होय बाबा ! आतां त्याची आठवण नको. आठवण झाली कीं जास्ती वाईट वाटतें. गेला बिचारा ! व्यर्थ मुकला !! त्या कैकयीच्या कपटजालांत सांपडला ! तं मला [illegible]

मुखेंत जी स्त्री होती, तिनें आपल्या तोंडानें सर्व कबूल केलें. मला सर्व कळलें, जास्ती तें तूं काय सांगणार ? नको मला आतां तें. सर्व पुरे बाबा. सर्व कांहीं निकाल झाला. आतां कांहीं बाकी राहिलें नाहीं. गेला विचारा. प्राणाला मुकला. शिव ! शिव !

गणपतरावांचे हे उद्गार ऐकून जोतीबाला किंचित् हंसूं आलें. तो झणाला 'तुझाला कळल नाहीं, अस मी कांहींच सांगनार नाहीं व्हय ?

गणप०—होय बाबा, तूं काय अधिक सांगणार !

जोतिबा—मग मी कशापाई तसदी घेऊं ? (थोडें थांबून) तिनें तुझांला हें समद सांगितल झनतां ? त्या रांडला काय ठाव ?

गणप०—नको, नको, बाबा आतां तें. तुला माहीत असेल तें तूं सांगूं नये म्हणून तिनें तुला पैसे दिले आहेत. तर मग उगीच कशाला सांगतोस. आणखी मलाही आतां ऐकण्याची इच्छा नाहीं. अखेरपर्यंत तें गुप्त तसेंच तुझें तुझ्याजवळ राहूं दे.

जोतिबा—काय तसच राहूंदे ? पन समजा, तिन तुमाला येक सांगितल ; आन मला येका दुसऱ्याच गुपित गोष्टीकरितां पैसा दिला, व मला तिसरीच गुपित गोष्ट माहीत असली तर कस ?

गणप०—काय, झणतोस तरी काय ?

जोतीबा—मला जें काय गुपित ठाव आहे तें तिला बी माहित नाहीं तिनें एका भलत्याच गुपित गोष्टीकरितां मला पैस दिल. पन ते त्याच्या किंमती इतक मुळींच नाहींत. त्या पैशाचा बडीजाव मुदलीच नाहीं. अशी गुपित गोष्ट मला माहित आहे, आन् मग कस ?

मरणाच्या वेळेस याला हा वायूचा झटका झाला आहे, व त्यांत हा पाहिजे तसा बडबडतो आहे, आतां निर्दोष झालाच म्हणायाचा ! अरेरे ! गरीब विचारा ! व्यर्थ चालला. असें गणपतराव आपल्या मनाशीं त्याच्याकडे पहात दुःखानें म्हणाले. या रात्रींच्या वेळीं जिकडे तिकडे अगदीं शांत होतें. कुत्र्यांचें भोंकणें सुद्धां बंद होतें. रात्र किर्र करून ओरडत होती. जोतीबाच्या उशाला बसलेली म्हातारी कंटाळून कंटाळून मागें भिंतीला डोकें टेकून डुलक्या घेत होती. तों असन्नमरण झालेल्या रोग्याच्या घसा नुकतांच घुरघुर वाजूं लागला होता. त्याचा एक डोळा झांकला होता. दुसऱ्या निस्तेज अशा डोळ्यानें तो गणपतरावांकडे पहात होता.

हा देखावा पाहून, गणपतरावांना फारच वाईट वाटलें त्यांत त्या मित्राची आठवण, मग काय विरावयाचें आहे ? तो म्हणाला 'माझा मित्र मेल्यानें कोणाला दुःख होणार आहे ? एक मला कीं त्याच्या बहिणीला. त्याची बायको तर त्या ब्रह्मदेशांत इस्पितळांत पडली आहे. मी मात्र त्याच्या दुःखानें झुरून झुरून मरणार. मी जरी मेलों तरी कोणाला वाईट वाटणार आहे ? येऊन जाऊन सगुणाच कीं नाहीं ? तिला काय, वाटेल दोन महिने वाईट. आणि मग आनंदानें दुसरे कोणाबरोबर तरी लग्न करून सुखानें नांदेल. हर! हर! मित्रवियोग फार कठिण आहे ! परमेश्वरा ! त्याचा केवळ जीव कीं प्राण अशाच्याच हातून त्याला मरण कसें आलें !! आपल्या सुहज्जनाकडूनच त्याचा नाश व्हावा, अशींच तुझी इच्छा होती काय ! शीव ! शीव !!

भाग ४० वा.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें त्या आजारी मनुष्यानें कांहीं हकीकत सांगून एकदम अंथरुणावर उठून बसून आपल्या आईला मोठ्यानें हांक मारिली.

या हांकेवरोबर गणपतरावांची विचारसरणी बदलली. नाहीं तर त्यांचे विचार कोणच्या पल्ल्याला पोहोंचले असते, हें सांगणें अतर्क्य आहे.

आपल्या मुलाची ही हांक ऐकून झोंपेनें पेंगून डुलक्या खाणारी झातारी एकदम जागी झाली व झणाली 'कार जोतुवा ! डागदाराच्च वखद पीयाला अजून मायंदाळ काळ हाय. डागदाराला जाऊन अजून तास बी नाहीं झाला. मगा दोन तासांनीं घ्या झनून तो बोलला न्हव का ? '

जोतिबा—(त्रासिक स्वरानें) वखद कोन मागातया ? आई, तुला कांहीं इचारायाच्च हायग. परवा गेल्या सपटंबर महिन्याची ... ...तारीख हाय का तुइया धेनामंदी ?

जोतावाचा हा प्रभ ऐकून गणपतरावांनें आश्चर्यानें त्याच्याकडे पाहिलें आणि 'वरचेवर, वरचेवर, हीच्च गोष्ट हा काढून बसतो. नारायणरावाच्या खुनाच्या तारखेशीं याला काय एवढें कर्तव्य ?' असें मनाशींच मोठ्या दुःखानें ते झणाले.

आपल्या मुलाच्या विचारण्यानें झातारी गोंधळून गेली आणि उगीच तिनें कांहीं लक्षांत न येतां मान हालवून जबाब दिला 'आर जोत्या, मला हे काय इचारतुस ? लई वरस झाली, मला अक्शी समरून रहात नाहीं ; तुला ठाव नाहीं कार वाळा ? आवस कधींन् पुनव कधीं मला आठवा ना. नाहीं, आणि हें कसर मला कळल ?'

जोतिबा—थुः इच्या, आग आई हें नाहीं तुला मी इचारलें ? आवसन् पुनव ? आन् तो दिस धेनामंदी आक्शी ठेव झनुनशानी तुला मी बजावल होत न्हव का ? आन् एक दिस त्या गोष्टीची साक्षा तुला भरावी लागल झनून दिवस धेनांत राहूंदे असं सांगितल व्हत नाहीका ?

झातारीनें पुन्हां उगीचच मान हालविली.- 'तूं मला अस सांगितल व्हतस हे खर, मलाबी पुसट पुसट आतां धेनामंदि येतया. (गणपतरावांकडे

पाहून) आव, हे बघा आलिकड मला समरूनच रहात नाहीं ; अक्शी काय करूं म्हनते ? ' असें म्हातारी म्हणाली.

गणप०—जोतिबा, आतां ती गोष्ट कशाला काढितोस, मला त्याचा वीट आला आहे. आतां तें ऐकणें नको.

जोतिबा—ते संमद खर. पन माझ्या मनांतें सांगायच हायच. आन् ती गुपित ग्वाष्ट सांगितल्याविना माझा जीव जायाचा नाहीं. त्यापायीं लई घोटाळतोया. आन मुद्दाम याकरतांच तुमाच्ची बोलावन पाठविलजी. कळल कां रावसाब ? आन् ऐकत नाहीं व्हय ? तिन मला जाळून मा॰ रायाचा बेत केला. तिन मला लई पैसा दिला. लई दया केली पन मी आपल गुपीत तिला सांगितल नाहीं. गुपित ठेव म्हणून मला पैसा दिला, पन ते निराळ रात्र, माझ्च गुपीत लई ख्वाल !

गणप०—अरे जोतिबा, असें काय बरळतोस ? तूं काय सांगणार तरी बाबा ?

जोतिबा—आई, घशाला कोरड पडलीया, वायसा पाण्याचा घोट देग (पाणी पिऊन) आतां संमद सांगतो, ऐका. आई, माझ्या जवळ येग. हत बैस.

ती म्हातारी आपल्या मुलाच्या अगदीं जवळ, प्रेमानें एक हात त्याच्या आंगावर टाकून, बसली.

जोतिबा—आई, त्याची तरी तुला आठवन हाय का, मीं लगीन होण्याच्या अगूदर सरलष्करचे इथ बागवर होतों. त्या वरलीकडल्या बागवर. आन भाकर खाया इथ कवा कवा येत होतों तो—

म्हातारी—व्हय गा व्हय, तवा त्या मळ्यामंदी मिरच्यान् काय कांद लावल व्हत, आन् बंपाऱ्याला भार आला तवा नाहींका ? आतां आठवन झाली खर. व्हय. व्हय.

जोतिबा—आन् मग तुला समरून असलच. त्या राती मी एक गिरस्त हित आनिला होता. तवा आपल्या शेजाऱ्याच्या लिंगापा माळ्यानें केळाची आढी घातली व्हती आनि आपल्याला केळं आणून दिली ती.

गणपतराव मोठ्या आश्चर्यानें लक्ष लावून त्याच्याकडे पाहत होते. जोतिबा काय म्हणतो, हें त्यांस कळेचना

झातारी—व्हय. मैनाला घेऊन आलास न्हवका आन् त्या दिवशीं शेवया शिजविल्या आन् त्याला गूळ न्हवता झनून त्या बसाप्पा वाण्या कडून उधार आणिल्याचा आणला तवाच न्हवका ?

जोतिबा—थुः इच्या, काय झातारी द्वाड हाय वगा. त्या सटवीला घेऊन काय करतीस ? त्या गती दहा वाजल्यावर मी एक गिरस्त घेऊन आलों, हायका समरून ? तो भिजून चिंब झाला व्हता, आन् त्याच समद आंगन् कांवरूण चिकलान भरून च्याड झाली व्हती. त्याचा हातवी मोडला व्हता, आन् भोपळ्यावानी लट्ट तो खवाटा सुजला व्हता, आन् त्याची इकड कुनाचीवी वळख नव्हती तो; आलाका धेनामंदी, इथ येऊन अगदीं मेल्यावानी बेसूद पडला. थंडीनें अकशी काकडून गेला व्हता, आन् मग मी लई शेकाटा करून त्येला पापडावानी भाजून काढला, आन् सुट उगाळून तेच्या डोळ्यामंदी घातली, आन् पळीच्या दांडक्यान दातखिळी उघडून ऊन ऊन माडग पाजला, आन् मग तवा घोंगड कांवरून वायस निजल्यावर वोलाया लागला—तो—तो—झालका—समरून ?

झातारीनें आठवण आहे असें दाखविण्याकरितां मोठ्यानें मान हालविली.

जोतिबाचें हें बोलणें ऐकिल्यावरोबर गणपतरावांनीं अनभुत असे कांहीं उद्गार काढिले, ' अरे देवा ! तुझी लीला अगाध आहे ! माझा नारायणराव जिवंत आहे ? हे परमेश्वरा, तुझी दया असल्यावर काय असंभवनीय आहे ? हे ईश्वरा, मला आज तूं सोन्याचा दिवस दाखविणार काय ? माझ्यानें आतां अधिक बोलवत नाहीं. ' असें झणून त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रूंचा पूर आला. त्यांच्या आनंदाला पारावार नाहींसा झाला. त्यांचा आनंद वर्णन करण्याला मनुष्यभाषेंत शब्दच नाहींत. स्वतः अनुभवल्याखेरीज त्या आनंदाची कल्पना सुद्धां करतां येणार नाहीं ! त्यांचा हा महानंदापेक्षां महानंद.

जोतिबा—दम धरा रावसाहेब. आग आई, त्या जईवरचा तो जस्ताचा डबा इकडे घे पाहूं.

झातारीनें चांचपत चांचपत दोन चार मडकीं खालीं काढून ठेविलीं; मग हळूच एक फाटक्या चिंध्यांचे बोचकें काढून त्यांतून एक मोडका फुटका जस्ती डबा काढून, जोतिबापुढें आणन ठेविला.

गणपतराव अजून तसेच आनंदमिश्रित आश्चर्यानें त्याच्याकडे टक लावून पहात होते.

जोतिबा—रावसाहेब, तुम्ही मला आगींतून वांचविलेत, म्हनून मी तुम्हांला त्यांतून पैसा काढून देतों अस तुम्हांला वाटल, पन तस अगदीं नाहीं. त्या पैशापेक्षांही भारी असा जिन्नस तुमाला देतों बगा.

त्यानें तो डबा उघडून, त्यांतून दोन कागदाचे चिटोरे काढून, गणपतरावांच्या हातांत दिले. त्यांवर शिसपेन्सलीनें कांहीं खरडलेलें होतें. हें अक्षर गणपतरावांना मुळींच ओळखूं आलें नाहीं.

त्या चिटोऱ्यांपैकीं एक चिटोरा हातांत घेऊन गडबडीनें घडी उलगडून गणपतराव म्हणाले, 'हे चिटोरे घेऊन काय करावयाचें ? माझ्या मित्राचा यांशीं काय संबंध ? मला कशाला दाखवितोस बाबा हे ? अगोदर त्याची हकीकत सांग. सांग, सांग लवकर.

जोतिबा—रावसाव, अगुदर वाचून बगा आन् मग मला इचाराजी. पहिल्या चिटोऱ्यावर कांपऱ्या हातानें वेडें वांकडें अक्षरानें असें लिहिलें होतें:—

'माझे जिवलग मित्रा–माझ्या मनाची अगदीं भ्रामक स्थिति होऊन मीं हें तुला लिहीत आहें. अशी भ्रामक स्थिति आजपर्यंत कधींच कोणाचीही झाली नसेल. मला काय झालें हें मला सांगतां येत नाहीं; परंतु हा करवीर प्रांत सोडून, जगाच्या पाठीवर अगदीं एका बाजूला जाऊन, कुणी माझी आठवणसुद्धां करूं नये असें होऊन, दुःखानें काळीज फुटून जाऊन, रात्रंदिवस चिंतेनें झुरून, इहलोक सोडून परलोकीं गमन करण्याचें मीं अगदीं ठरविलें आहे. व तसें ठरविण्याला कांहीं कारणही आहे; पण तें अमकेंच, असें मला सांगतां येत नाहीं. आतां प्रिय मित्रा, मला तूं विसर. माझी आठवण करूं नकोस. तुझ्या मित्रत्वाचा जर या वेळेला कांहीं यत्किंचित् तरी उपयोग होण्यासारखा असता, तर लागलींच तुझ्याकडे मी आलों असतों. सल्लामसलतीनें कांहीं उपयोग होण्यासारखा असता, तर तुझा तो घेतल्याखेरीज मीं कधींच राहिलों नसतों. माझ्या प्रिय मित्रा, आतां मला ईश्वरापाशीं एवढेंच मागणें आहे कीं, त्यानें तुला माझा विसर पाडावा आणि तुला निरंतर सुखांत ठेवावें. तुझ्या ओटींत मीं आपल्या बाळाला

घातलेंच आहे. तुझ्यापेक्षां तें अधिक काळजीचें या जगांत मला कोण मिळणार आहे?'

ना. च.'

दुसरा चिटोरा दुसऱ्याच एका मनुष्याच्या नांवाचा होता आणि त्यांतील मजकूर यापेक्षां संक्षिप्त होता.

'आनंदी.—आज जें तूं कृत्य केलेंस त्याबद्दल मी मनापासून तुला क्षमा करतों. मला तुझी फार फार दया येते. दयाळू परमेश्वर तुझ्यावर दया करो व या कृत्याबद्दल क्षमा करो. आतां स्वस्थ सुखांत नांद. माझी वार्ता आतां तुला कधींच कळणार नाहीं. आज माझा जो परिणाम व्हावा, अशी तुझी इच्छा होती, तोच परिणाम माझा आहे, असें तूं पक्कें समज. तूं तर काय, पण सगळ्या जगानें तसें मानण्यास बिलकुल हरकत नाहीं. माझी भीति बाळगण्याची तुला आतां अगदीं जरूर नाहीं. पुन्हां कधीं परत करवीर क्षेत्रीं यावयाचें नाहीं, असें ठरवून मी जात आहें.'

ना. च.'

हें अक्षर आपल्या मित्रासारखें नाहीं, आंतला मजकूर मात्र त्याचाच आहे, सांकेतिक सहीही त्याचीच आहे, असें पाहून गणपतराव आश्चर्यभरित होऊन जोतिबाकडे पाहूं लागले. यांत कांहीं लबाडी आहे, असा त्यांना संशय आला.

गणप०—हें नारायणराव चव्हाणाचें अक्षर आहे?

जोतिबा—होय. त्यांचेंच जी. माझ्या समक्ष त्यांनीं लिवल. त्यांनीं आपल्या हातांनीं लिवल है. डाव्या हातानें लिवल हाय. उजवा हात मोडला होता म्हनून त्यांना त्या हानान लिवता आल न्हाई.

हें ऐकिल्या बरोबर गणपतरावांच्या मनावरचें संशयपटल एकदम नाहींसें झालें.

गणप०—आलें माझ्या लक्षांत. समजलें मला काय तें. सांग बाबा, सांग लवकर!! तो कसा बचावला, सांग लवकर! मला ऐकूंदे लवकर!!

आपण हें ऐकिलें हें खरें असेल काय? जो मेला असें आपण समजतों, तो जिवंत असून, प्रेमानें आपल्याला आलिंगन देईल काय? आपण पहात आहों, हें स्वप्नांत कीं जागृतावस्थेत पहात आहों, हें त्यास कांहींच समजेना! आनंदानें त्याचें मन अगदीं गोंधळून गेलें.

गणप०—(पुन्हां) सांग बाबा सर्व एकदां ! कधीं एकेनेसें झालें आहे !!

जोतिबा—गेल्या सप्टेंबर महिन्यामधीं मी सरलष्करच्यां बागेंत होतों. मोतिचौक वाड्याच्या पलीकडच्या आंगाला वरच्या बाजूला त्यांचे बाग हाईत. तिकडून रातच्च घरीं यायाला मी वाड्याच्या बागतल्या पाऊल वाटेनें यायला लागलों. माझी येन्याची याळ साधून मैना तत स्या भिंतीजवळ माझी वाट पहात रोज बस. एके दिवशीं दुसऱ्या बागवर जाण्याला मला हुकूम आला; आन, म्हनून तवा इला आज भेटून जावें म्हनून मी नी मागची वगळ वलांडून आलों. आन इतक्यांत वाड्याच्या देवडीवरच्या घडयाळांत नऊ वाजल. तिची भेट घ्यावी म्हनून मी तिथ पडक्या हीरीजवळ वाट पहात उभा राहिलों. ही त्या रातीं कुठ होती पत्ताच लागला नाहीं. लई वाट पाहिली. कटाळून गेलों. मग हळूच जाऊन देवडीवर इची चवकशी करावी म्हनून भितीपासून त्या हिरीच्या जवळून धांववरून पलीकडे दिल्लीदरवाजाकड त्या तळ्याला उजव घालून जायाला निघालों. अगदीं अंधार भित्त पडला होता. मी नेहमीं जानारा म्हनून रस्ता माझ्या ओळखीचा. तवा भी लई सपाटयानें निघालों, आन् त्या हिरीजवळ आलों तर मला कुनाचकी कन्हन ऐकूं आल! मानसाचं इवळन हाय अस मला तवांच वाटल. त्या झुडपांत कोनीतरी पडलाया अस मला वाटल. मला भुताची, येताळाची भीति आक्शी वाटत नाहीं. पन हें इवळन ऐकून मी अगदीं सरदलो बगा. मी तियच येडयावानी उभा राहिलों. माझ्या काळजांन ठाव सोडला बगा. पुना मी इवळन ऐकल. मग कोन ईवळतया पहाव, म्हनून त्या हिरीजवळच्या झुडपाकड गेलों, तर येकजन त्या झुडपांत ईवळत रडत पडलाया की !! मला वाटल आत्तां हा मरतोया ! तर उचलून आंतमंदी न्यावा म्हनून मी उचलाया गेलो, तर त्यान माझा हात घट्ट धरला ! आन् " तूं कोण आन् मला कोठें नेतोस " असें गयावया करून म्हणाला. '

जरी मी त्याला या जन्मांत पाहिलें नव्हतं, तरी त्याच्या त्या इचारण्यावरूनच तो भला गिरस्त आहे, असें मला वाटलया.

" येथें मोतिचौकांत कोणाच्या दृष्टीस पडल्याशिवाय येथून मला जाणें आहे, आज तिसरे प्रहरापासून मी येथें असा पडलों आहें. माझ्यावर दया

करून येवढें येथून मला कोणी न पाहील असें घेऊन जाशील, तर ईश्वर तुझें कल्याण करील. तो तुला चिरायु करो. "

त्याचे अस बोलन ऐकून मला फार वाईट वाटल, मला लई दया आली आणि मग ' बर बाबा, चल नेतो तुला ' असें ह्मनालों. '

" कसेंही करून मला कोरडीं वस्त्रें लवकर दे. पण आंतून मागून आणूं नकोस. तूं मला अगोदर येथून ने आणि मग दे. "

' हें त्याच ह्मनन ऐकुन घेऊन मी त्याला उठवून बसविलें. तवा त्याचा उजवा हात बंब सुजून अगदींच लुला पडला व्हता, आन फार दुखतबी व्हता, अस मला दिसल. त्याकड पाहून अस कशान झाल बाबा ? म्हनून इचारलें. तो म्हनाला ' काय सांगुं बाबा ? तो मोडला, तुटला, निखळून पडला. नुसता हातच काय माझें काळीजही असेंच फुटून तुटून गेलें आहे ' हें तो जरा हळू स्वरानें म्हनाला रावसाव. मी आपल्या घरीं तुला घेऊन जातों आन् तीथ माझी म्हातारी हाय. तुला कोरडीं कांवरुन देतों. चल बाबा तुला नेतों असें मी म्हनाल्यावर तो म्हणाला " तुझी आई कोणाला सांगणार नाहींना ? " ' छे, नांव नको. आतांची गोष्ट घटकेनें तिच्या लक्षांत रहात नाहीं त्याची काळजी नको. चल बाबा ' असें मी म्हणून त्याला उठवून उभें केलें तो त्याचे पाय लटलट कांपत व्हत त्यांत एक पाऊल टाकण्याचीबी ताकत नव्हती, हे पाहून मी त्याला पाटकुळी उचलून घेऊन निघालों. मी त्याला वाटेंत पुष्कळ इचारिलें, पन त्यान उत्तरच दिल नाहीं. ' " चल बाबा लवकर तुझ्या घरीं, मला टाक नेऊन एकदां, मी तुझे हे उपकार कधींच विसरणार नाहीं, " असेंच तो वरचेवर ह्मन.'

' मी त्याला घरीं आनून निजविला, शेकला, भाजला, सुक कपडा दिल. त्याचा तो हात फारच सुजला व दुखूं लागला व त्यानें तो फारच इवळूं लागला. आन तवा मला फारच वाईट वाटलें ह्मणून मीं तसाच गडवडीनें जवळच्या गांवांतून त्या आमच्या हुशार न्हाव्याला बोलावून अनल ; त्यान त्याचा हात बांधला व लांबवून भारावूं नये ह्मणून पट्यानें गळ्यांत अडकवला. हात बरा व्हईपतूर येथें रहा ह्मनून मी फार फार आग्रुव केला, पन त्यानें नाहीं ऐकलें. लागलीच आतां निघनार म्हनून तो म्हणाला. '

'गळ्यांत उजवा हात पटचानें अडकविला' हें ऐकल्यावरोबर गणपतरावांस मुंबईस पी. आणि ओ. च्या कचेरींत एकानें, एक गृहस्थ, आगबोट सुटण्याचे अगोदर तास अर्धातास, गळ्यांत पटचानें हात अडकविलेला आला होता, असें सांगितल्याचें स्मरण झालें. तो आजारी मनुष्य पुढें सांगू लागला,–'त्याचा हात बांधून झाल्वार त्यानें मला कागुद शाई मागितली. माझ्याजवळ कुठला कागुद नी शाई? पन धांवत धांवत शेजारच्या बामनाच्या पोराकडून कागुद आनून दिला. सिसप्यान तेन आपल्या खिशांतून डाव्या हातानें कांपत कांपत ह्या चिटया लिवल्या आणि झणाला 'ती तुला माहीत हाय का?' ती कोन झनून मी इचारल्यावर 'ती निहालगडावरची' एवढेंच म्हणाला व गप्प उभा राहिला. मी 'माईसाहेब होय' म्हणून विचारल्यावर 'होय. तीच. तीला ही वर फुली केलेली चिट्ठी उद्यां नेऊन दे. तिच्याच हातांत दे म्हनाला.' मी बरें होय म्हनून उत्तर दिलें. मग ही दुसरी जगदेवरावांचा भाचा गणपतराव यास दे म्हणून सांगितल. हें सर्व झाल्यावर तों लागलींच स्टेशनावर जाया निघाला. मी त्याला पांहोंचविण्याला गेलों. तो त्याच येळेस गाडीन कोलापुराला गेला. जातांना त्यान मला पन्नास रुपयांची नवाट दिली व 'कोणाजवळ बोलूं नकोस तुझे उपकार माझ्या हातून कधीं फिटणार नाहींत' असें म्हनून पार झाला.

दुसरे दिवशीं भल्या सकाळींच मी सूर्यप्रकाश खानावळींत आपल्याला ही चिट्ठी द्यावी झनून गेलों. पन आपन आदले दिवशींच निघून गेला झनून त्याच्या मालकान सांगितल. तवा ही चिट्ठी तशीच राहिली बगा. संध्याकाळीं मैनाला गांठून बाईसाहेब एकट्या कवा भेटत्याल, हें विचारून चिट्ठी त्यांच्याच हातांत द्यावी झनून मी उरवल. तुमाला चिट्ठी द्यावयाचा आटावच राहिला नाहीं बगा. परवां मला येकायेकी तेंच समरून झाल.

'त्याप्रमान मी नेहमींच्या ठिकानीं मैनाची वाट पहात बसलों; ती आल्यावर मी त्या हिरीच्या धांवत्वर मऊ जागेंत रोजच्यावानी घटकाभर चल म्हनालो तर ती येईना. मी कां म्हनून इच्यारलं तर म्हणाली 'थत भूत हाय, त्याचें मला भय वाटतें. दुसरीकडे चल इत नको.' अस म्हनाली. मी पुष्कळ आग्रेव केला, पन ती कांहींच ऐकेना उगीच हंसे मातुर. मग मी तिच्या दोन मुसक्याटांत लगावल्यावर तिनें मला हळू हळू संमदी

हकीगत सांगितली. ती म्हणाली ' मी आपल्या खोलीच्या खिडकींत उभी होतें. तेथून त्या हिरीवरच सर्व दिसतें. आमच्या माईसाहेब व एक तरना गिरस्त बागेतून हिरीच्या मोटवणावर आलां; व मग '—–' पुरे पुरे बाकीचें मला सर्व माहीत आहे ' असें गणपतराव मोठ्यानें मध्येंच म्हणाले.

' मैनेनें मला सर्व सांगितलें व म्हणाली ' आपुन जर तिचें गुपित ठेविलें तर आपनाला मायंदळ पैसा मिळेल. आपला फायदा होईल. ' हा विचार मला पसंत पडल्यावर मीं ही चिट्ठी तिला देऊं नये म्हणून निश्चय केला. कारण प्रसंग पडला, तर तिला जेर आणाया ही उपयोगीं पडल. गुपित राहण्याकरतां तिनें वरचेवर आम्हांला फार पैसे दिले. मी जें म्हणे तें ती कबूल करी !'

इतका वेळ एकसारखें बोलण्यानें जोतीबास फारच थकवा आला. तो अगदीं निपचीत पडून गणपतराव यावर काय म्हणतात, हें ऐकण्यास अगदीं उत्सुक होता. त्याला वाटलें गणपतराव यावर लांबच लांब व्याख्यान झोडतील, परंतु या वेळेला गणपतरावांनीं ' शिव ! शिव !' या दुःखोद्गारांपेक्षां एक अक्षरही जास्ती तोंडाबाहेर काढिलें नाहीं. फटफटीत उजाडेपर्यंत गणपतराव तेथेंच बसले होते. ती म्हातारी यांचें संभाषण सुरू होण्याबरोबर मागें भिंतीला टेंकून दंतविहीन मुख पसरून जी घोरायाला लागली, ती तशीच अजून घोरत पडली होती. मैना बाहेर पडवीत एका फाटक्या कांबळ्यावर हातपाय पोटाशीं धरून, तोंडावर लुगड्याचा पदर घेऊन पडली होती. त्या आसन्नमरण रोग्याजवळ हे एकटेच जागे. त्यांना झोपच येईना. त्यांच्या अन्तःकरणांत नानाप्रकारच्या विचारांनीं गर्दी केली. आपला मित्र जीवंत आहे, हें ऐकून त्यांनीं ईश्वराचे फार फार उपकार मानिले. ' तुझा दादा जीवंत आहे, ' असें कमळाला केव्हां जाऊन सांगेन, असें त्यांना झालें. चांगलें उजाडल्यावर मैना आंत येऊन आपल्या नवऱ्याजवळ बसली. गणपतराव सूर्यप्रकाश खानावळीकडे गेले.

सात आठ दिवसांत आगबोटीच्या व आगगाडीच्या प्रवासानें व या काळजीनें त्यांना झोंप कशी ती नाहीं. तेथें गेल्यावर ते लागलेच निजले आज सहा महिन्यांपूर्वीं, त्या अकालीं वृष्टीच्या रात्रीं, ते आपल्या मित्राच

रोबेर बौलत ज्या खोलींत निजले होते, त्याच खोलींत ते आज गाढ निश्चेष्ट झाले. सकाळीं नऊ दहा वाजतां उठून प्रातर्विधि उरकून, जेवणखाण करून, एक दोन वाजण्याचे सुमारास ते चिरूट ओढीत कांहीं वाचीत पडले होते. तों जोतिबा सकाळीं नऊ वाजतां मेला, म्हणून खाणावळवाल्यानें चहा आणून देतांना यांना येऊन सांगितलें.

ही बातमी ऐकून त्यांना फारसें वाईट वाटलें नाहीं. संध्याकाळच्या टपालानें त्यांनीं गंगाबाईस ब्रह्मदेशांत डा० नारीमनच्या पत्त्यावर, तिनें किती खोटीं नांवें घेतलीं, व ती अखेर खोटें नांव धारण करूनच मरणार, व जोतिबानें असें असें सांगितलें वगैरे हकीकतीचें एक लांबलचक पत्र पाठविलें.

'तुझा नवरा तारुण्यावस्थेंत अशा क्रूर रीतीनें मेला नाहीं, पण जीवंत आहे,'. हें ऐकून तिला समाधान होईल, असें गणपतरावांना पत्र लिहितांना वाटलें.

भाग ४१ वा.

गणपतरावांनीं लागलींच ही सर्व आनंदकारक हकीकत कमळाबाईस कळविली. ' सप्टंबर महिन्याच्या ९ व्या तारखस आपला एकुलता एक मुलगा चिनाला निघून गेला; व तो तेथें हजार वाट्यांनीं जिवंत असेल ' असें कमळानें गारगोटीस परत येऊन आपल्या बापाला सांगितलें. आपल्या मर्जीप्रमाणें, वडिलांच्या आज्ञेविरुद्ध एका तरुण स्त्रीबरोबर त्यानें लग्न केलें; हा एवढाच अपराध त्याच्या हातून घडला; व या अपराधाची त्याला अशी कडक शिक्षा मिळाली, हें ऐकून तो म्हातारा कदाचित् आपल्या पुत्राला क्षमा करील, असें तिला वाटून, तिनें सर्व हकीकत थोडक्यांत पण मनोवेधक अशा तऱ्हेनें त्याला सांगितली.

ही हकीकत ऐकून हैबतरावांच्या मनाची फारच धांदल उडून जाऊन त्यांची मति अगदीं कुंठित झाली. ज्यूनियस ब्रुटसला अशा विलक्षण घोटाळ्याची स्थिति कधींच प्राप्त झाली नव्हती. या पेंचांतून [illegible] मोकळें व्हावें, हें त्यांस न सुचून गणपतरावांच्या त्या दिवशींच्या संभाषणापासून आपल्याला वाईट वाटलें असें म्हणावें कीं न म्हणावें, हें त्यांचें त्यांसच उमजेना. परंतु इतकें खरें कीं, आपला एकुलता एक पुत्र आज जर येथें आला, तर त्यास प्रेमानें दृढालिंगन देऊन आशीर्वाद देण्याला ते तयार झाले होते. सगळें खरें, परंतु तो परत येण्याचा संभव कसा ? किंवा त्याला पत्र तरी कोठें पाठवावें ? हीच मुख्य अडचण उत्पन्न झाली. मुंबईच्या व चिनाच्या वर्तमानपत्रांत एक जाहिरात दिल्याचें गणपतरावाला स्मरण झालें, तेव्हां तो चिनाला गेला असला तर त्या जाहिरातीला उत्तर कसें मिळालें नाहीं ? त्याचें उत्तर पाठवावयाचें नाहीं, म्हणून त्याच्या मित्रानें उरावच केला कीं काय ? परंतु ज्या अर्थीं त्यानें खोटें नांव धारण केलें आहे, त्या अर्थीं आगबोटीवरच्या त्याच्या मित्राला किंवा कप्तानाला किंवा तेथल्या लोकांना त्याचा संशय खचीत आला नसेल व त्यामुळें जाहिरातीचें उत्तर न देतां त्याला किंवा त्याच्या मित्राला राहतां आलें हेंच खरें. आतां आमच्या या मंडळींनीं काय तोड काढावी; परदेशीं राहण्याचा नाराणरावाला कंटाळा येऊन तो इकडे

येईपर्यंत स्वस्थांतःकरणानें त्यांनीं वाट पहावी ? किंवा कसें तरी करून तो इकडे लवकर येईल, असा एखादा उपाय कढावा ? काय, करावें तरी काय ?

कमळाच्या मागोमाग दोन चार दिवसांनीं गणपतरावांनीं गारगोटीस जाऊन, हैबतरावाला सर्व इत्थंभूत हकीकत सांगितली. ही हकीकत ऐकून हैबतराव म्हणाले ' गणपतराव, तुम्ही कांहीं म्हणा, अलीकडे बायका फारच लबाड झाल्या, आणि त्यांत इंग्रजी शिकून तरबेत झाल्या कीं, लुच्चेगिऱ्या त्यांना पूर्णपणें करितां येतात. तुमच्या ह्या उच्चप्रतीच्या शिक्षणाचें हेंच फळ ? त्या स्त्रीला जर हें फाजील शिक्षण मिळालें नसतें, तर अशी अभुतपूर्व गोष्ट घडली असती काय ? मागच्या आमच्या साळ्याभोळ्या बायकांच्या हातून असें झाल्याचें तुम्ही कधीं ऐकिलें आहे काय ? आतां पूर्वीच्या बायका म्हणजे सगळ्याच चांगल्या, असें मी म्हणत नाहीं; त्यांतही वाईट असतीलच, पण असली ही निंद्य तऱ्हा नाहीं ! हा मासला निराळा ! बायकांना फाजील स्वातंत्र्य दिलें म्हणजे त्या असेच दिवे लावतील ! बाबा, काय तुमची ही विद्वत्ता ! कसले हे पोरकट विचार ! हीच का तुमची सुधारणा ! आतां तरी सावध व्हा ! बायकांना ' मडम ' बनविण्याचा नाद सोडा. ' हें ऐकून गणपतरावांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. त्यांनीं स्वस्थ मनानें सर्व ऐकून घेतलें. मग हैबतराव पुन्हां म्हणाले ' गणपतराव, तुम्हीं केलें हें ठीक केलें नाहीं. त्या दुष्ट सटवीला योग्य शिक्षा झाली पाहिजे होती. आतांचे कायदे आम्हांला काय माहीत म्हणा ! ! पण आमचे पहिले महाराज असते, आणि अशी एखादी रांड निघाली असती, तर तिची गाढवावर शेंपटाकडे तोंड करून बसवून, धिंड काढली असती; व मग हत्तीच्या पायांखालीं तुडवूनच तिला मारली असती. ' हैबतरावांनीं, गणपतरावांना पाहुणचारानें चार दिवस आपले येथें ठेवून घेतलें. एके दिवशीं गणपतरावांनीं कमळाला आपला चिनाला जाण्याचा बेत कळविला. ते म्हणाले ' इतकें केल्यासारखें त्याला एकदां इकडे घेऊन आलों, म्हणजे सगळ्याचें चीज झालें. उद्यां मी करवीराला जाऊन, सर्व तयारी करून, चिनाला जाऊन त्याला आणितों. ' आपल्या भावाकरितां ज्यानें इतके श्रम घेतले, त्यास 'तुम्हीं जाऊं नका' असें कमळा म्हणेल काय ? कधीं नाहीं.

दुसरे दिवशीं हैवतरावांचा व कमळाचा निरोप घेऊन चिनाला जावें म्हणून गणपतराव करवीरीं आपल्या बंगल्यांत आले.

तेथें आल्याबरोबर एका नोकरानें वर्तमानपत्रें, पत्रें, बंग्या, पार्सलें, यांचा एक मेटा भरा त्यांच्यापुढें आणून टाकला, व म्हणाला 'रावसाहेब, एक ोरस्त, दोन तास झाल, आलाया व आपून गांवाहून कधीं येनार म्हनून ाविचारून त्या खोलींत बसलाया.'

आंगांतल्या कोटाच्या गुंड्या मोकळ्या करीत करीत आपली वाट पाहात बसलेल्या गृहस्थाला भेटायाला म्हणून तो बसला होता त्या खोलीकडे हे निघाले. ही संध्याकाळची मनाला आल्हाद देणारी रम्य वेळ होती! पिंजऱ्यांतील मैना मंजुळ साद घालीत होत्या! दार उघडल्याबरोबर पक्ष्यांनें हें मंजुळ गाण त्यांना एकूं आलें. तो गृहस्थ दाराकडे पाठ करून एका खिडकीजवळ चिरूट ओढीत खुर्चीवर बसला होता. खोलींत बुटांचीं पावलें वाजल्याबरोबर खुर्चीवर बसलेल्या गृहस्थानें दचकून मागें पाहिलें. त्याला पाहिल्याबरोबर अति आनंदानें मोठ्यानें ओरडून गणपतरावांनीं 'अरे, माझा प्रियमित्र नारायणराव की!' म्हणून त्याला दृढालिंगन देण्याला आपले दोन्ही लांब हात पुढें केले! या वळेचा गणपतरावांचा आनंद कोण वर्णूं शकेल!

आमच्या बाबाजी सोंवळेकऱ्यानें त्या दिवशीं भोजनाचा फारच उत्तम बेत केला होता. हे दोन जिवलग मित्र मोठ्या आनंदानें व प्रेमानें भोजन करून दिवाणखान्यांत शामदानाजवळ आनंदांत चिरूट ओढीत बसले. गणपतरावांनीं मागील सर्व हकीकत फारच बेतानें, म्हणजे ती ऐकून त्याला एकदम धक्का न बसेल, अशा तऱ्हेनें सांगितली.

त्या दिवशीं रात्रीं तसबीर पाहून आपलें काळीज कसें दुभंग झालें, तेव्हांपासून आपली शांतता कशी नाहींशी झाली, हें सर्व नारायणरावानें फार थोड्या पण वेंचक शब्दांनीं सांगितलें. तो म्हणाला 'काय सांगूं मित्रा! त्या दोन प्रहरीं त्या दुष्ट स्त्रीनें मला त्या अगम्य विहिरींत लोटून दिल्याबरोबर माझें मनांत काय काय विचार आले, ते एका परमेश्वरालाच माहीत! तिनें मला ढकलून दिल्याबरोबर मी त्या आंत दाट उगवलेल्या वेलींतून, झुडपांतून अडखळत अडखळत तळाशीं चिखलांत जाऊन पडलों. माझा उजवा हात पाठीखालीं सांपडला व मोडला. सर्व अंग झाझरून

गेलें. तेथें किती वेळ मी बेशुद्ध पडलों, हें मला मुळींच ठाऊक नाहीं. मग शुद्धीवर आल्यावर त्या मोठमोठ्या वेलींना व झुडपांना धरून वर हळूच चढून आलों. लहानपणीं आमच्या गांवांत सुरपारंब्या खेळतांना झाडांवर जलद चढण्याची मला संवय होती, ती आतां जरी मोडली, तरी चढण्याचें ज्ञान कांहीं गेलें नव्हतें. त्या वेळच्या खेळाचा मला त्यावेळीं फारच उपयोग झाला. त्यानेंच माझा जीव बचावला. कोणची गोष्ट कोणच्या वेळेला उपयोगी पडते याचा नेम नाहीं. त्या वेलींना धरून विहिरीच्या दगडांवर पाय ठेवीत ठेवीत वर चढलों. एक हात मोडल्यानें मी अगदीं निरुपयोगी झालेला एका हातानेंच सगळा कारभार! तेव्हां मला किती संकट पडलें असेल, याचा विचार, मित्रा, तूंच कर! सुमारें पाऊण तास मी वर चढत होतों! अंधार पडल्याखेरीज तेथून कोठें जाण्याची सोय नाहीं, असें मनांत येऊन, वर येऊन, तेथेंच झुडपांत गवतांत छपून राहिलों. मग जो मनुष्य मला तेथें भेटला, त्यानें सर्व बाकीची हकीकत तुला सांगितलीच आहे.'

गणपु०—होय मित्रा! त्यानें मला सर्व कांहीं सांगितलें.

नारायण०—पण मित्रा. त्या विहिरीचा त्याच्याजवळ दिल्यावर माझा बेत फिरला, हें त्यानें नसेल? सांगितलें तुला त्याला काय माहीत? तुला भेटून जावें असें माझ्या मनांत आलें, म्हणून मी येथें पहाटेच आलों. जिकडे तिकडे सामसूम. तूं निजतोस त्या खोलीच्या दारावर पुष्कळ ठोंठावलें, पण व्यर्थ. कोणीच जबाब देईना. तेव्हां तूं भजन करवीरीं आलास नाहींस, असें मनांत आणून, फार निराश होऊन, निघून गेलों.

आजचे नारायणराव चिनाला या खेपेस मुळींच गेले नाहींत. गोदावरी आगबोटींतून चिनाला जाण्याला ते निघाले खरे, पण मध्येंच सिलोनांत ते राहिले कोलंबोच्या डालचिनीच्या बागेंतील कौतुकगृह, परदेशांतील एकांतवासाचे दिवस घालविण्यास, त्यांना पसंत पडलें. परदेशांत कंटाळा येई पर्यंत हे तेथेंच राहिले होते.

आपण सिलोनांत होतों वगैरे सांगून ते म्हणाले, 'काय सांगूं, मित्रा, आपले येथें पोलिटिकल एजंट, रीव्हज साहेब होते, त्यांची साध्वी आई तेथें आहे. ती बाई फार दयाळू आहे. तिचा माझ्यावर फार लोभ. तेथें असेपर्यंत तिनें मला पुत्रापमाणें मानिलें. मी करवीराकडचा आहें, हें समजूनच तिचें माझ्यावर प्रेम बसलें. तिचा नवरा इकडे पूर्वी होता. आपण